[ भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-ग्रंथमाला पुस्तक

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

# षष्ठ--संमेलनवृत्त

शके १८४०

संपादक व प्रकाशक

दत्तो वामन पोतदार बी. ए.

व

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार
बी.ए.

( चिटणीस भा. इ. सं. मंडळ )

पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक
छापिलें व दत्तो वामन पोतदार व गंगाधरराव
मुजुमदार यांनीं ३१४ सदाशिव पेठ (सरदार कन्हैयालाल आतार
संशोधक-मंडळाचें मंदीर ) येथें प्र. मुद्रकें

[ सर्व हक्क राखून ठेविले आहेत. ]

कार्तिक वा॥ ११९ म

किंमत

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-षष्ठ-संमेलन-वृत्त

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ भा. इ. सं. मं. षष्ठ-संमेलन | चिटणीस | १-१२ |
| १ पाटिलबाबांचीं दिल्ली येथील पहिलीं चार वर्षें | रा. द. वि. आपटे बी. ए. | १-२७ |
| २ मराठी भाषेचा कालनिर्णय | डॉ. पां. दा. गुणे एम्. ए. पी. एच्. डी. | २८-४० |
| ३ चमत्कारिक लोकसमजुती लोकाचार वगैरे | रा. रु. वि. आचार्य कालगांवकर | ४१-५३ |
| ४ शके १३७६च्या सुमाराचें मोडीपत्र | रा. द. वि. आपटे बी. ए. | ५४-५६ |
| ५ श्री. शिवाजी महाराज यांचें स्वरूप | रा. पां. मा. चांदोरकर | ५७-६२ |
| ६ विभुराज राष्ट्रकूटाचें सातव्या शतकांतील एक ताम्रशासन | रा. पां. मा. चांदोरकर | ६३-६५ |
| ७ चालू भाषेंतले ऐतिहासिक शब्द | रा. वा. वा. खरेशास्त्री | ६६-७८ |
| ८ मार्शे संशोधनवृत्त ( १८३९ ) | रा. पां. न. पटवर्धन | ७९-८६ |
| ९ मालोजी वगैरेंचीं शिवपूर्वकालीन अस्सल तीन पत्रें | रा. द. वा. पोतदार बी. ए. | ८७-९० |
| १० जुना दगडी नळ | रा. द. वा. पोतदार बी. ए | -९०- |
| ११ श्रीशिवाजी महाराजांचा दुसरा होन | रा. द. वा. पोतदार बी. ए. | -९०- |
| १२ मालोजी राजे यांचें एक अस्सल पत्र | रा. पां. मा. चांदोरकर | ९२-९४ |
| १३ मलिक अंबरचें एक अस्सल पत्र | रा. पां. मा. चांदोरकर | ९५-९६ |
| १४ देवी अहिल्याबाई | प्रो. चिं. गं भानु बी.ए. | ९७-११८ |
| १५ कांहीं जुनीं पंचांगें | रा. ग. स. खरे | ११९-१२० |
| १६ सुरतेची धालमेल | रा स. म. दिवेकर | १२०- |
| १७ कांचीचे पल्लव | रा. चिं. वि. वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी. | १२१-१२७ |
| १८ सातारा येथील छत्रपतींचे व त्यांचे अधिकारी ह्यांचे शिक्के | रा. वा. वि. जोशी | १२८-१३६ |
| १९ हजरतवली मदनशहांच्या संस्थानसंबंधीं एक निवाडपत्र | मिया शिकंदरलाल आतार | १३७-१७६ |
| २० जुनीं मराठी गीतें | रा. वा. दा. मुंडले | १७७-१८० |
| २१ शके १८३९ मधील नऊ महिन्यांतील संशोधन | रा. पां. मा. चांदोरकर | १८१-२१२ |
| २२ थोरले बाजीरावसाहेबांची उत्तर-हिंदुस्थानावर पहिली स्वारी | रा. भा. रा. भालेराव | २१३-२१४ |
| २३ इतिहाससंशोधनवृत्त | मिया शि. ला. आतार | २१५-२२१ |
| २४ वरदनागेश | रा. पां. मा. चांदोरकर | २२२-२२६ |
| २५ सूची | | २२७-२३६ |

श्री

# भा. इ. सं. मंडळाचें षष्ठ संमेलन

मंडळाच्या सहाव्या संमेलनास शके १८४० च्या वैशाख शुद्ध १५ शनिवार रोजीं सकाळीं ८ वाजतां मंडळाच्या कार्यालयांत आरंभ झाला. त्या वेळीं हजर असलेले सभासदांचीं नांवें:—

१ श्री. सं. चिं. मेहेंदळे (पुणें) २ रा. द. वा. पोतदार (पुणें) ३ रा. पां. मा. ऊर्फ आबा चांदोरकर (जळगांव) ४ रा. पां. न. पटवर्धन (पुणें) ५ रा. स. म. दिवेकर (कल्याण) ६ मियां शि. ला. आतार (भिलवडी) ७ रा. शं. ना. जोशी (वाई) ८ रा. वा. वि. जोशी (सातारा) ९ रा. रु. वि. आचार्य (कालगांव) १० रा. वा. शं. फातरफेकर (बेळगांव) ११ रा. स. ग. जोशी (मावळ) १२ रा. रा. द. पराडकर (पुणें) १३ रा. अ. ह. गद्रे (पुणें) १४ रा. द. वि. आपटे (पुणें) १५ नामदार. रा. ब. ग. रु. साठे (सोलापूर) १६ नामदार केशवराव (हैद्राबाद–दख्खन) १७ रा. पां. बा. जोशी (हैद्राबाद–द०) १८ प्रो. गं. गो. कानेटकर (जबलपूर) १९ रा. रा. आ. जोगळेकर (पुणें) २० डॉ. पां. दा. गुणे (पुणें) २१ रा. श्री. नी. चाफेकर (एलिचपुर) २२ रा. ब. द. ब. पारसनीस (सातारा) २३ रा. दा. वि. गोखले (पुणें) २४ रा. न. चिं. केळकर (पुणें) २५ रा. वासुदेवशास्त्री वा. खरे (मिरज) २६ रा. अ. वि. पटवर्धन (पुणें) २७ रा. वि. वा. अक्कलकोटकर (अक्कलकोट) २८ रा. श्री. गो. काळे (गुलबुर्गा) २९ रा. ह. र. भागवत (पुणें) ३० रा. रु. गो. बहुलेकर (कऱ्हाड) ३१ रा. गो. रा. चिनीवाले (सांगली) ३२ रा. अ. वा. फडणीस (सातारा) ३३ रा. रु. म. साहीलकर (पुणें) ३४ बॅ. श्री. त्र्यं. पुणतांबेकर (उमरावती) ३५ श्री. म. मो. फडणीस (पुणें) ३६ वे. पं. रु. शा. कवडे (पुणें) ३७ प्रो. शि. म. परांजपे (पुणें) ३८ रा. पं. रा. आलेगांवकर (आलेगांव) ३९ रा. धों. रु. साठे (पुणें) ४० रा. रा. भि. जोशी (पुणें) ४१ प्रो. वे. का. राजवाडे (पुणें) ४२ श्री. गं. ना. मुजुमदार (पुणें) ४३ रा. रा. वि. पटवर्धन (पुणें) ४४ प्रो. वि. गो. विजापूरकर (तळेगांव–दाभाडे) ४५ प्रो. ह. गो. लिमये (पुणें) ४६ रा. ग. स. मराठे (पुणें) ४७ रा. पां. वा. काणे (मुंबई) ४८ रा. रा. ज. गोखले (पुणें) ४९ रा. मा. रं. गोखले (तळेगांव दमडेरे) ५० रा. दा. वे. आठल्ये (हैद्राबाद) ५१ रा. मा. गो. भिडे (पुणें) ५२ रा. त्रि. रा. गद्रे (पुणें) ५३ रा. वासुदेवराव फडके (सांगली) ५४ वैद्य नानलशास्त्री (पुणें) ५५ प्रो. चिं. गं. भानु (पुणें) ५६ डॉ. गो. स. पळसुले (पुणें) ५७ रा. सि. के. दामले

( पुणें ) ५८ रा. अ. द्वि. रास्ते ( पुणें ) ५९ रा. रा. धों. साठे ( कुंदगोळ ) ६० रा. श्री. रु. कोल्हटकर ( सामगांव ) ६१ रा. ह. ना. आपटे ( पुणें ) ६२ रा. त्रि. रु. राजवाडे ( अकोला )

[ नवीन झालेले सभासद; पैकीं ज्यांच्यामागें फुली आहे ते हजर होते. ]

*१ प्रो. ह. वि. तुळपुळे, वर्ग ४ ( पुणें ) २ डॉ. रु. गो. लोहोकरे व. ४ ( पुणें ) ३ प्रो. वि. ना. कुंभारे व. ४ ( पुणें ) ४ प्रो. रा. प. सबनीस व. २ ( पुणें ) ५ प्रो. वि. ब. नाईक व. ४ ( पुणें ) ६ रा. ब. म. गद्रे व. ४ ( सांगली ) ७ रा. गो. स. सरदेसाई व. २ ( बडोदें ) ८ रा. गो. ज. फणसळकर व. ४ ( सातारा ) *९ रा. द. रु. देवधर व. ४ ( पुणें ) १० रा. पु. ब. गोळे व. २ ( अकोले ) ११ रा. रा. त्रिं. चिपळूणकर व. २ ( नाशीक ) १२ रा. ह. के. गोखले व. १ ( मुंबई ) १३ रा. म. ह. मोडक व. ४ ( जांभुळपाडा ) १४ डॉ. मो. गो. देशमुख व. २( मुंबई ) १५ रा. रु. मो. फाटक व. ४ ( पुणें ) १६ रा. त्रिं. रा. सिधये व. ४ ( पुणें ) १७ रा. ब. शं. नवांगुळ व. ४ ( कऱ्हाड ) *१८ डॉ. श्री. रु. बेलवलकर व. २ ( पुणें ) *१९ राजा धर्मपाल मी. श्री. देशमुख चिंचोलीकर व. २ ( हैद्राबाद दक्षिण ) *२० रा. ल. ब. फाटक व. १ (पुणें) २१ रा. ग. गो. कुळकर्णी व. ४ ( बेळगांव ) *२२ रा. रु. पां. लिमये व. ४ ( पुणें ) *२३ रा. त्र्यं. ना. पंडित व. २ ( पुणें ) *२४ रा. रु. ह. केळकर व. १ ( मुंबई ) *२५ रा. गो. चिं. भट व. ४ ( पुणें ) *२६ ना. गोपाळराव बोरगांवकर व. २ (गुलबुर्गा ) *२७ प्रो. ए. डी. धोपेश्वरकर व. ४ ( कराची ) *२८ रा. सा. रा. त्रिं. कीर्तने व. २ (पुणें) *२९ रा. त्र्यं. शं. शेजवलकर व. २ ( पुणें ) ३० रा. शं. ब. सहस्रबुद्धे व. ४ ( पुणें ) *३१ रा. वि. त्र्यं. आगाशे व. २ ( पुणें ) *३२ रा. स. गो. सर्वे (इंदूर)*३३ श्री. पु. ग. जोशी व. ४ ( पुणें ) *३४ रा. सी. ब. देशपांडे व. ४ ( पांढ पेडगांव )

एकूण ७९ सभासद हजर होते, प्रेक्षकांत इंदूरचे श्री. माधवराव किबे वगैरे सद्गृहस्थ होते. संमेलनास आरंभ करितांना रा. नरसोपंत केळकर यांनीं मंडळाचे अध्यक्ष रा. ब. साने यांना हजर राहतां न आल्यामुळें रा. वासुदेव शास्त्री खरे यांना या संमेलनाचे अध्यक्ष नेमावें म्हणून सूचना पुढें मांडिली; तिला नामदार रा. ब. ग. रु. साठे यांनीं अनुमोदन दिल्यावर रा. वासुदेव शास्त्री खरे अध्यक्षस्थानापन्न झाले. अध्यक्षांनीं प्रथमतः आपल्याला अध्यक्षस्थान दिल्याबद्दल आभार मानून जमलेल्या सर्व सभासदांचें व सन्मान्य पाहुणे मंडळींचें स्वागत करून कार्यक्रमास प्रारंभ करावयाची सूचना केली. यानंतर रा. द. वा. पोतदार बी. ए. चिटणीस यांनीं पंचम संमेलनवृत्तांत[१] वाचून दाखविला; तो सभेनें मंजूर केला. पुढें शके १८३९ चा अहवाल व शके १८४० चें अंदाजपत्रक दोन्हीं वाचण्यांत आल्यावर नामदार केशवराव

---

१ पंचम संमेलनवृत्तावरोवर छापून प्रसिद्ध केलीं आहेत.

यांनीं तीं मंजूर करण्याबद्दल सभेपुढें सूचना मांडली असतां रा. दा. वि. गोखले यांनीं अनुमोदन दिल्यावर एकमतानें मंजूर करण्यांत आलीं. यंदां चैत्रापासून झालेल्या नवीन २१ सभासदांना रुजू करण्याविषयीं चिटणिसांच्या विनंतीस रा. द. वि. आपटे यांनीं अनुमोदन दिल्यावर सभेकडून रुकार मिळाला. पुढें

## रा. चिं. वि. वैद्य यांचा लेख

'कांचीचे पल्लव' हा रा. दत्तोपंत पोतदार यांनीं वाचून दाखविला. त्यानंतर

## रा. पां. मा. ऊर्फ आबा चांदोरकर यांनीं

आपलें गेल्या सालांतील संशोधनवृत्त वाचून दाखविलें. त्यावर रा. पोतदार म्हणाले कीं, रा. आबा यास त्यांना मिळालेल्या एकूण एक संग्रहाचा उल्लेख करण्यास मुद्दाम च सांगण्यांत आलें होतें; कारण मागें एकदां गु. राजवाडे यांनीं "मला ५०० काव्यग्रंथ, ५१०० कागदपत्रें या वर्षी मिळालीं" असें म्हटलें असतां कलकत्त्याच्या एका गृहस्थांनीं "हें विधान खोटें आहे" अशी टीका केली होती. नंतर रा. आबा चांदोरकर यांनीं श्री. सवाईमाधवरावसाहेब व त्यांच्या पत्नी श्री. सौ. यशोदा बाईसाहेब यांच्या जुन्या मोठ्या तैल-तसबिरी मंडळास नजर केल्या. त्यावर रा. वा. वि. जोशी म्हणाले कीं, यांतील तसबीर यशोदाबाई साहेबांची नमून एकंदर तसबिरीच्या स्वरूपावरून दिसणाऱ्या वयावरून ती सौ. रमाबाई साहेबांची असावी." रा. वासुदेव शास्त्री यांचें हि म्हणणें असें च पडलें. रा. य. पारसनीस म्हणाले "हीं जुनीं चित्रें किंवा तसबिरी प्रमाण-शुद्ध नसतात. पूर्वी श्री. सवाईमाधवरावसाहेबांच्या वेळीं येथें (पुणें) एक चित्रशाळा म्यालेटच्या वेल्स नांवाच्या साहेबानें काढिली होती, तींत कांहीं लोक शिकले, पैकीं शिवराम हा एक प्रख्यात चित्रकार झाला. प्रमाणशुद्ध नसल्यानें तसबिरींतील व्यक्तींच्या वयांचा निर्णय करतां येत नाहीं" यानंतर

## रा. द. वा. पोतदार यांनीं

श्रीशिवाजी महाराजांचा आणखी एक होन दाखविला. त्यानें गेल्या वर्षाप्रमाणें च सभेंत कौतुक व आदर उत्पन्न केला. तसें च श्री. शहाजीराजे (शेवटचे) यांची अस्सल तसबीर हि दाखविली. पुढें

## श्री. तात्यासाहेब मेहेंदळे यांनीं

श्री. बाबासाहेब मळेकर (मिरज धाकटी पाती) यांच्या संग्रहांतील श्री. थोरले बाजीरावसाहेब व मल्हारराव होळकर यांची अस्सल तसबीर दाखविली. "तिच्या पाठीवर लिहिलेलीं अक्षरें गंगाधरराव गोविंद यांच्या स्वदस्तुरचीं आहेत" असें रा. वासुदेव शास्त्री म्हणाले. तसबिरींत मल्हाररावास दाढी नाहीं. त्यावर "हें चित्र खरें असल्यास मल्हाररावाची पेशवाईंतील एक दंतकथा (मल्हारराव एकदां सरकार वाड्यांत जेवावयास आला असतां श्रीमंतांच्या कुटुंबांतील स्त्रियांनीं "तुम्हांस तोंड नाहीं काय, सर्व दाढी मिशा च आहेत" असें म्हटल्यावर त्यानें आपली दाढी एकीकडे करून "हें पहा" असें म्हटलें) खोटी होईल" असें रा. खरे शास्त्री म्हणाले. असली

च तानाजी मालुसऱ्याबद्दलची दंतकथा श्री. तात्यासाहेब यांनीं सांगितली. नंतर सकाळचें काम १०॥ वाजतां संपलें.

**दुपारः—**

पहिल्यानें रा. पोतदार यांनीं ठिकठिकाणांहून आलेल्या सहानुभूतीवर तारा व पत्रें वाचून दाखविलीं; तीं मुख्यतः खालील गृहस्थांकडून आलेलीं आहेतः-

१ रा. ब. साने ( अध्यक्ष ), २ प्रो. विजापूरकर ( मागाहून हजर ), ३ रा. ग. स. खरे. ४ रा. वा. दा, मुंडले ५ रा. दादासाहेब करंदीकर वगैरेः-

नंतर ५ नवीन सभासदांची निवड झाली. पुढें

**प्रो. भानू यांचा**

देवी अहिल्याबाई हा निबंध वाचण्यांत आला.

नंतर रा. आबा चांदोरकर यांनीं श्री शिवाजीमहाराजांचे चुलत चुलते मालोजी-राजे यांचे शके १५४४ मधील अस्सल पत्रावरील लेख वाचला. अस्सल पत्र सोबत होतें. पुढें त्यांनीं च त्यांना मिळालेल्या १ अली अदिलखान पातशहा–विजापूर, २ विजापूरचे पांच बादशहा, ३ एक बाईची या तीन अप्रतिम कारागिरीच्या अस्सल तसबिरी मंडळास सादर केल्या. त्यानंतर त्यांनीं वरदनागेश हा लेख वाचला. पुढें रा. पोतदार यांनीं मंडळसंग्रहांतील रागरागिणी, सृष्टिदेखावा, शृंगारिक, गणपती, दरबार हीं पांच जयपुरी चित्रें दाखविलीं. त्यावर रा. खरे शास्त्री म्हणाले १७९६।९७ सालीं गंगाधर गोविंद यानें शिवराम चितारी यांचेकडून या तसबिरी विकत घेतल्या. हीं कांहीं रागाचीं चित्रें आहेत. काशीचा पंडित बिल्दीकर जहागीरदार यानें संस्कृत " रागमाला " म्हणून एक ग्रंथ केला आहे, त्याबद्दलचें एक अस्सल पत्र १० व्या खंडांत येणार आहे. गंगाधर गोविंद याला चित्रकलेचा व ग्रंथसंग्रहाचा फार नाद होता. त्याच्या हातच्या अस्सल याद्या माझ्याजवळ आहेत. पारसनीस आपल्या येथें प्रथम च आले व आल्याबरोबर त्यांनीं एका शिवाजीमहाराजांच्या पत्राचा लाभ हि करून दिल्याबद्दल आपण त्यांचे आभारी आहों. " त्यानंतर

**रा. ब. द. ब. पारसनीस**

म्हणाले " गेल्या वर्षीं च मी येणार होतों पण हातानें अजारी असल्यामुळें मला येतां आलें नाहीं. यंदां रा. पोतदारांनीं आग्रह केल्यावरून आलों. बरोबर श्री शिवाजी महाराजांचें एक पत्र आणलें आहे. त्यांतील शिक्का हि पहाण्यासारखा आहे" असें म्हणून पत्र वाचलें व मूळ कागद दाखविला. मूळ पत्र मंडळास नजर करण्याबद्दल प्रो. भानू यांनीं विनंती केली; त्यावर असली पत्रें दुर्भिळ, सबब फोटो पाठवीन असें रा. पारसनीस म्हणाले. त्यानंतर रा पोतदार म्हणालेः– आपले मित्र रा. पांडोबा हे आपणांस अशीं च शिवाजी महाराजांचीं च काय पण शहाजी महाराजांचीं पवित्र पत्रें दाखवितील व उद्यां मी महाराजांचे आजे मालोजी राजे यांचें अस्सल पत्र दाखवीन. आतां शिवकालीन इतिहास प्रकट होत जाण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत.

नंतर रा. पांडोबा पटवर्धन यांनी हें एक महाराजांचें पत्र वाचलें. ह्या पत्रांत "महादाजी मतिमत प्रधान" यांचा शिक्का आहे. रा. पांडोबा म्हणाले की "महादाजी हा शामराज नीळकंठ रोझेकर (रांझेकर नेव्हे) याचा मुलगा. याचा वंश पटसदेव येथें आहे. त्याची माहिती मी पुढें देणार आहे." रा. खरे शास्त्री म्हणाले "मतिमत नसून मतिमंत असावें. चिटणीसी बखरींत कालविपर्यासाचा दोष आहे. असला अस्सल पत्रव्यवहार जेव्हां सांपडेल तेव्हां तींतील गोष्टींचा नक्की शोध लागेल." रा. पारसनीस म्हणाले "चिटणीसांनीं बखरीकरितां जीं कांहीं टांचणें केलीं होतीं तीं अस्सल माझ्याजवळ आहेत." यानंतर पहिल्या दिवसाचें काम संध्याकाळीं ७ वाजतां संपलें.

---

## दिवस दुसरा

**सकाळीं:—**

७॥ वाजतां प्रारंभ झाला. प्रथम मिया शिकंदर लाल आतार यांनीं मदनशाहाच्या दर्ग्याची माहिती सांगून आपलें संशोधनवृत्त वाचून दाखविल्यावर मुकेश्वर भारताचें एक बाड दाखविलें.

रा. स. ग. जोशी ( मावळ ) यांनीं शालिवाहनाच्या सतराव्या शतकांतील पंचांगांचा संग्रह मंडळास नजर केला. श्री. बावडेकर यांनीं पंचरत्नी गीता सचित्र बारीक अक्षराची दाखविली. रा. पां. न. पटवर्धन यांनीं श्री. दादासाहेब ओंकार–संग्रहांतील एक जुनी गुर्जी नांवाचें हत्यार दाखविलें. त्या नंतर डॉ. पां. दा. गुणे यांचा मराठी भाषेच्या कालनिर्णया वरील लेख त्यांनीं वाचला. त्यांतील राजवाडेप्रभृति संशोधकांवरील आक्षेपासंबंधानें रा. पोतदार म्हणाले:–"शिलाताम्रशासनादिकांच्या प्रतिमा देणेंघेणें किती खर्चाचें काम आहे ! राजवाडे प्रभृतींस अर्धपोटीं आपला उद्योग चालवावा लागतो. तेव्हां हा खर्च त्यास आक्षेपकांनीं मिळवून द्यावा. ज्यांचीं अक्षरें संशयित वाटतात त्या लेखांच्या प्रतिमा डॉ. गुणे यांनीं तरी कां नाहीं आणिल्या ? रा. राजवाडे यांनीं टिपकागदावर वगैरे लेखांचे ठसे घेतलेले आहेत. हे पहा (दाखविले.)"

रा. पां. न. पटवर्धन यांनीं पटवर्धन व इंग्रज हें टांचण परशुरामभाऊ व इंग्रज यांमध्यें झालेल्या अस्सल कराराच्या छायाचित्रासह वाचलें. त्यावर अध्यक्ष म्हणाले कीं "हें सर्व खोटें आहे. हा कागद बनावट आहे. भाऊ पेशव्यांशीं फितुरी करून इंग्रजास मिळतील हें अगदीं अशक्य. हा कागद झाला म्हणतात त्या वेळीं पटवर्धन व पेशवे यांचें रहस्य होतें. इंग्रजांचा अंमल हि तेव्हां प्रस्थापित झाला नव्हता. पेशवाईमध्यें हि पटवर्धन हे इंग्रजांचे ताबेदार होते असें दाखविण्याचा लबाडीचा प्रयत्न या कागदांत आहे" पुढें रा. रु. वि. आचार्य यांनीं लोकसमजुती 'निबंधांतून कांहीं समजुती वाचून दाखविल्यावर सकाळची बैठक संपली.

**दुपार:**– ४ वाजतां आरंभ झाल्यावर नवीन सभासद मंजूर झाले. मग

२ प.

## रा. कृ. वि. आचार्य

यांच्या सकाळच्या पैकीं राहिलेल्या लोकसमजुतींचें वाचन व कांहीं जुन्या पत्रांचें प्रदर्शन झाल्यावर रा. पोतदार यांनीं बडोद्याचे रा. सरदेसाई यांचे सहानुभूतीचें आलेलें पत्र वाचून दाखविलें. नंतर

## रा. आबा चांदोरकर

यांनीं शके १५२९ मधील मलीक अंबर यांचें एक पत्र वाचून दाखविलें. अस्सल पत्र सोबत होतें. त्यापुढें

## रा. वा. वि. जोशी

यांचें भुरके यांच्या येथील शिक्के, हें टांचण वाचण्यांत आलें. व शिक्क्यांचे घेतलेले छाप प्रत्यक्ष पुढें ठेवले गेले. भुरक्यांच्याबद्दल टांकसाळीचा एक हुकूम वाचला; त्यावर अध्यक्ष म्हणाले " मिरजेस व सांगलीस जी टांकसाळ होती तींत सरकार रुपें देई व नाणें पाडून घेई. देवस्थानाकरितां हुकेरी रुपये देण्यांत येत. त्यांची किंमत तेरा आणे असे व त्याच्यावर गणपती असें नांव असे. " यावर

## रा. शि. म. परांजपे

यांनीं महाभारतकालीन संस्कृतेतर भाषेचा एक नमुना या विषयावर अध्यक्षांच्या खास परवानगीनें आपलें म्हणणें तोंडीं च पुढें मांडलें व तें असें:– अस्त्र, शस्त्र, कक्ष इत्यादि म्लेंच्छ शब्द भारतकारांनीं वापरले आहेत, असें चतुर्धर म्हणतो. अलोह व कक्षघ्न हे संस्कृत व म्लेंच्छ यांचे समास आहेत, असें टीकाकार म्हणतात. पण येथें च वाद येतो. इ.

## रा. द. वि. आपटे

यांनीं आपला पाटीलबोवांचीं दिल्लींतील चार वर्षें हा विस्तृत निबंध वाचल्यावर

## रा. द. वा. पोतदार

यांनीं महादजी शिंदे व एक मुसुलमान बादशहा यांच्या तसबिरा दाखविल्या. नंतर

## रा. पां. न. पटवर्धन

यांचें संशोधनवृत्त वाचण्यांत आलें. पुढें

## श्री. खं. चिं. मेहेंदळे

यांनीं म्हासंग्रहांतून आणविलेल्या संभाजी महाराज, खंडेराव, हरी वगैरे कित्येक ऐतिहासिक पुरुषांच्या व इतर सृष्टिविषयक अत्युत्कृष्ट १८ तसबिरी दाखविल्या. व सगुणाबाई निंबाळकर इच्याबद्दल तिचें चित्र सभेपुढें मांडून कांहीं माहिती तोंडीं सांगितली. मोरोपंतांनीं तिच्यावर केलेलें व त्यांच्या हातचें एक काव्य वाचून दाखविलें. तें अप्रकाशित आहे. पुढें बजाजी निंबाळकर याला औरंगजेबाकडून आलेलें अस्सल

फारशी फर्मान तर्जुम्यासगट वाचून दाखवून तुकारामाच्या निर्वाण कालाबद्दल अली-कडील शुद्ध पंचांगाच्या आधारें एक टांचण पुढें मांडलें. त्यावर

### रा. द. वा. पोतदार

यांनीं येथील खाजगीवाले यांच्या वाड्यांत सांपडलेला दगडी नळ व परळीची लेख-शिला यावरील आपले लेख वाचून नळ सभेपुढें ठेविला.

### रा. रा. वि. पटवर्धन

यांनीं कालिदासांचा काल यावर अध्यक्षांच्या खास परवानगीनें आपलें म्हणणें पुढें मांडलें.

### रा. वा. दा. मुंडले

यांनीं पाठविलेलीं ' जुनीं गीतें ' रा. पोतदार यांनीं वाचून दाखविल्यावर दुसऱ्या दिवशीचें काम संपलें.

---

## दिवस तिसरा

**सकाळीं**–नाट्यसंमेलनाच्या हितचिंतकांच्या विनंतीवरून कार्यक्रम बंद ठेवला होता.

**दुपारीं**–३॥ वाजतां सभेस सुरुवात झाल्यावर व रा. पोतदार यांनीं कांहीं नवीन सभासदांची मंजुरी घेतल्यावर

### अध्यक्ष रा. वा. वा खरेशास्त्री.

यांनीं आपला "चालू भाषेंतील ऐतिहासिक शब्द" हा निबंध वाचला. त्यानंतर

### रा. आबा चांदोरकर

यांनीं सातव्या शतकांतील विभुराज राष्ट्रकूटाचा एक ताम्रपट वाचून दाखवून दाखविल्यावर

### कारभारी मंडळाची नेमणूक

झाली. "आहे हें च कारभारी मंडळ यंदां हि असावें" असा ठराव ना. केशवराव यांनीं पुढें मांडला व त्यास रा. सा. वि. अ. पटवर्धन यांनीं दुजोरा दिल्यावर तो सर्वानुमतें मंजूर झाला. दुसरा ठराव "वर्गणीदारानें आपल्या वर्गणीच्या दसपट रकम एकदम दिली असतां त्याला तहाहयात वर्गणीदार समजून पुढें त्याच्याकडून वर्गणी घेऊं नये." हा रा. पोतदार यांनीं मांडला व त्याला रा. दिवेकर यांनीं अनुमोदन दिलें व ठराव सर्वानुमतानें पसार झाला. तिसरा ठराव "१२ रु. देणाऱ्या (वर्ग २ रा) वर्गणीदारांपैकीं २ सभासद कारभारी मंडळांत घेतां यावे" अशा अशयाचा रा. पोत-दार यांनीं पुढें ठेवला व त्यास श्री. आबासाहेब मुजुमदार यांचें अनुमोदन मिळाल्यावर

---

१ मागाहून छापूं. २ चित्रमय जगतांत प्रसिद्ध झालें आहे.

तो सर्वानुमतें मंजूर झाला. नंतर कायमनिधीचा—उत्पन्नापैकीं शेंकडा दहा कायमनिधींत ठेवण्याचा चौथा ठराव रा. नरसोपंत केळकर यांनीं मांडून रा. पोतदार यांचा त्याला दुजोरा मिळाल्यावर तो एकमतानें मंजूर झाला. यानंतर

### रा. स. म. दिवेकर

यांचें शके १६८० तील सुरतेचें राजकारण हें टांचण वाचून झाल्यावर

### रा. आबा चांदोरकर

यांनीं श्रीशिवाजीमहाराजांचें स्वरूप हा आपला निबंध वाचून महाराजांची अस्सल व अपूर्व तसबीर दाखविली; त्या वेळीं सर्व सभासद व प्रेक्षक यांचीं अंतःकरणें आनंद, कौतुक व आदर यांनीं थरारून गेलीं। यंदांचें संमेलन अपूर्व होण्यास महाराजांचें हें अस्सल चित्र हें एक मुख्य कारण घडलें!! यापुढें

### श्री. आबासाहेब मुजुमदार

यांनीं मराठी किल्ले व आंग्रे यांचा मुलूख यांसंबंधीं ओंकारसंग्रहांतील जुने नकाशे दाखविले.

रा. मा. रा. भालेराव (ग्वाल्हेर) यांजकडून कांहीं कागद व निबंध व राव नंदलाल आणि राव तेज करण यांचे दोन फोटो आले होते ते दाखविले. त्याचप्रमाणें धारचे काशीनाथपंत लेले बी. ए. यांनीं कांहीं महत्त्वाचे ऐतिहासिक कागद पाठविले होते ते दाखविले. रा. द. रु. देवधर (पुणे) रा. ग. स. खरे (कुरुंदवाड) रा. रु. गं. अभ्यंकर (वांई) यांजकडून आलेलीं जुनीं नाणीं दाखविण्यांत आलीं. तसें च रा. बांबर्डेकर (मुंबई) एका शिलालेखाचा उतारा; रा. वा. दा. मुंडले (इस्लामपुर) एक मोडी ताम्रपट व संभाजीकालीन कांहीं कागद; रा. नवांगुळ (कऱ्हाड) कांहीं टांचणें; वे. रु. ना. कवडेशास्त्री बी. ए.— एक वैद्यकग्रंथ; व रा. द. रु. देवधर (पुणें) मोडी टाइपांत छापलेला एक ग्रंथ हे सव दाखविण्यांत आले.

### रा. द. वा. पोतदार

यांनीं मालोजी, परसोजी व बुन्हाण निज.मशहा यांचीं अस्सल पत्रें वाचून दाखविल्यावर रा. द. वि. आपटे यांनीं एक जुनें मोडी पत्र वाचून दाखविलें. वरील चार हि अस्सल पत्रें सभेस दाखविण्यांत आलीं. नंतर रा. पोतदार यांनीं मंडळाच्या मंदिराचा नकाशा सर्वांना दाखवून म्हटलें कीं "मंदिराकरितां जागा भाडेपट्ट्यानें घेतली असून रा. सा. आगाशे रिटायर्ड सुपरिंटेंडिंग इंजीनियर यांच्या सहायानें काम चालणार आहे. ७२०० रु. लागतील असा अजमास आहे. कामास प्रारंभ पावसाळ्यानंतर होईल. तरी ज्यांनीं इमारत फंडास आंकडे टाकून अद्याप पैसे दिले नसतील त्यांनीं व इतरांनीं कृपाकरून तावडतोब यावें" अशी विनंति केली. अध्यक्षांच्या सूचनेवरून सभेंत यादी फिरविली असतां सुमारें १००० च्या वर रकम जमली

तींत खुद्द अध्यक्ष यांचे १०१, ना. कशवराव यांचे ५०१ व इतर हि मंडळींचे आंकडे आहेत. यानंतर

## अध्यक्षांचा समारोप

झाला. त्यांत ते म्हणाले "माझ्यावर अध्यक्ष होण्याचा प्रसंग येईल हें, मिरजेस माझ्या स्वप्नांत हि आलें नाहीं. आपले लोक आरंभशूर आहेत असें मला वाटे. हल्लीं ज्या सभा, भाषणें होतात त्यांना मी कधीं जात नाहीं. कारण त्यांत नुसती बडबड असते. काम अतीशय च कमी. म्हणून मी कोणत्या च सभेस जात नाहीं, भाषण करीत नाहीं व चळवळींत हि पडत नाहीं; आणि असल्या च सभेप्रमाणें हें मंडळ हि एक असावें असें पूर्वी मला वाटे आणि म्हणून च मी इतिहासाचा भक्त व त्या करितां थोडेंबहुत काम करीत असतांना सुद्धां पहिल्या पहिल्यानं मी मंडळांत आलों नाहीं; मंडळाकडून काम होणार नाहीं व आपल्या पदरीं नाकर्तेपणा बांधला जाईल असें वाटे. पण तें स्वानुभवानें पुढें खोटें ठरलें व आज तर मला आपण अध्यक्ष निवडून वरील अपराधाबद्दल जणूं काय शिक्षा च दिली. असो. पुणें हें वक्तृत्वाचें माहेरघर आहे. पण मी कांहीं वक्ता नाहीं. आपला हा समारंभ पाहून मला फार संतोष झाला. आज ४० वर्षे झालीं तेव्हांपासून इतिहासाकडे माझी प्रवृत्ति आहे त्या हि वेळच्या मित्रांपैकीं आज येथें असलेले रा. आचार्य हे एक होत. त्यांनीं आपलें काम अद्यापि चालूं ठेविलें आहे. आपल्या आवडत्या विषयाची जेथें सांगोपांग चर्चा होते तेथें हजर रहाण्यापेक्षां अधिक आनंद कशांत आहे ? असो.

कांहीं लोक म्हणतात, इतिहास काय करावयाचा आहे ? त्याची चर्चा कशाला ? असल्यांशीं मला कांहीं एक बोलावयाचें नाहीं. दुसरे कांहीं आहेत ते म्हणतात मंडळ कशाला ? मी एकटा काम करीत नाहीं काय ? सामुदायिक प्रयत्नाचें काय काम ! अशानां माझें सांगणें आहे कीं, व्यक्तिशः प्रयत्नापेक्षां संघटित प्रयत्न केव्हां हि श्रेयस्कर च. इतिहासाचें कार्यक्षेत्र फार विस्तृत आहे. इति-ह- आस म्हटलें कीं तें लक्ष्यांत येईल. प्राचीन भाषाज्ञान, प्राकृत भाषाज्ञान, ताम्रपट वाचणें, शिलालेख लावणें, जुन्या कागदांचा अर्थ सांगणें वगैरे सर्व विषय यांत येतात. आम्हीं काय करीत नाहीं असें कोणीं विचारिल्यास मी सांगेन कीं, प्रस्तुतचें राजकारण तेव्हढें आम्हीं बोलत नसतों. बाकीच्या सर्व विषयांची चर्चा येथें होऊं शकते. तेव्हां असल्या सर्व प्रकारच्या ज्ञानाची प्राप्ति एकट्याला होणें कधीं तरी शक्य आहे काय ? त्याला आमच्यासारखें मंडळ च पाहिजे. साहेबाकडून ज्यांनीं आपल्या ज्ञानाचीं सर्टिफिकिटें मिळविलीं त्यांना एखादें जुनें मोडी पत्र हि धड वाचतां येत नाहीं, अशीं कांहीं माणसें आहेत हें मी स्पष्ट सांगतों. आपल्या येथें वर सांगितल्याप्रमाणें सर्व विषयांतील पारंगत माणसें व सामुग्री हि आहे. येथें प्राचीन व अर्वाचीन भाषाभिज्ञ आहेत; ताम्रपट, शिलालेख वाचणारे आहेत; त्यावर चर्चा करणारे हि आहेत. ज्यांच्या नांवाचें भूषण मिरवितां येईल अशीं विद्वान मंडळी हि-डॉ. बेलवलकर,

डॉ. गुणे वगैरे—येथें आहेत; रा. ब. बाबासाहेब साने यांच्यासारखे इतिहासवेत्ते आपले अध्यक्ष असून, सेक्रेटरी हि उत्साही आहेत. आज २।३ वर्षें मी पाहतों आहे आपली सारखी प्रगति होत आहे. रा. पोतदार, आबा चांदोरकर; पांडोबा पटवर्धन, जोशी यांनीं फार मेहनत घेतली आहे. मिया आतार हे मुसलमान असून आमच्यांत येऊन मिसळतात हें फार चांगलें आहे. तेव्हां अशा या संस्थेला सर्वांनीं येऊन मिळावें. असो. येथें जे निबंध वाचण्यांत आले ते शोधक दृष्टीचे होते. रा. वैद्यांनीं आपल्या निबंधांत "पल्लव हे च इराणांतील पेल्हव असून ते इकडे आर्यावर्तांत आले" या पाश्चात्य मताचें खंडण केलें आहे. पाश्चात्यांना ही एक मोठी खोड असते कीं, सर्व सुधारणांचा उगम यूरोपांत झाला, हिंदुस्थान हें एक नेशन नाहीं, त्यांत फार जाती आहेत वगैरे भ्रामक विधानें ते करीत असतात. पल्लव हे महाराष्ट्रीय च असून कांचीला गेले हें भाषेवरून हि ठरेल. आज मराठी भाषेंत हजारपांचशें शब्द कानडी आहेत. त्यावरून आपल्या इकडे एकदां कानडी राज्य झालें हें ठरतें. रा. वैद्यांचा व माझा एका मुद्द्यावर मात्र मतभेद आहे. ते म्हणतात कीं, हल्लींचे पालवे हे च ते पल्लव, पण असा आडनांवावरून संबंध जोडणें सयुक्तिक नाहीं. आडनांवें व गांवांचीं नांवें हि बदलत असतात. मिरजेस एक जोशांचें घराणें आहे. त्यांना एका गांवाच्या फार पूर्वीच्या सनदा आहेत. पण हल्लीं त्या नांवाचें गांव च कोठें आहे याचा पत्ता लागत नाहीं; सनदा आहेत व जोशी हि आहे. माझें आडनांव खरे पण दुसरे आपटे-खरे-आहेत. खऱ्यांतून आपटे केव्हां तरी फुटून निघाले असावेत; आडनावांची उत्पत्ति हि फार पूर्वीच्या गोष्टीशीं लाविलेली पसंत होणार नाहीं. एक वेळ मुसलमानी अंमलांत गदर म्हणजे बंड करणारे ते गद्रे असे मी कबूल करीन. पण ख्रिस्ती शकापूर्वी गर्त म्हणून लोक होते त्यांचे वंशज हे गद्रे हें मला पसंत नाहीं. सारांश, हल्लींच्या आडनांवाचा पूर्वीच्याशीं संबंध जोडणें सयुक्तिक नाहीं. नंतर रा. भानु यांनीं अहिल्याबाईवर लेख वाचला तो बरा होता. त्यांत देवी म्हणजे मोठ्या पदवीची एक अभिजात स्त्री या दृष्टीनें वर्णन झालें असेल तर मग हरकत नाहीं; पण स्तुतिपर विधानें येथें नकोत. हें इतिहास-मंडळ आहे. मन उदासीन ठेवून येथें काम करावें लागतें. अहिल्याबाई, एकादी सावकार-स्त्री असती तर तिची दानशूर म्हणून ख्याति योग्य झाली असती. पण ती आम्हांला ७२ लक्षांची जहागीर भोगणाऱ्या मल्हाररावांची सून म्हणून माहीत आहे. तिच्याकडे कारभार आला असतां दानधर्माकडे फार लक्ष न देतां तिनें राज्यकारभाराकडे लक्ष दिलें असतें तर ती गोष्ट फार उत्तम झाली असती. सर जॉन माल्कम तिची स्तुति करतो, पण मला ती आवडत नाहीं. Charity covers a multitude of sin अशी एक म्हण आहे. येथें sin नाहीं. पण तिनें जो दानधर्मांत पैसा खर्च केला, तो कोठून आला हा मुद्द्याचा प्रश्न आहे. तो प्रजेचा पैसा होता. तो प्रजेकडे च लागणें युक्त होतें. मराठी साम्राज्याला त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. तिला भट-भिक्षुकांनीं व तुकोजीबावाला लबाड कारभाऱ्यांनीं बुडविले व दोघांनीं पेशवाई बुड-

विली. ज्यानें त्यानें आपलें स्वकर्म करावें. पेशवे हे ब्राम्हण च पण श्री. गोपिकाबाईसाहेब यांच्या "स्नानसंध्या करावी पण ती थोडी च करावी" या म्हणण्याप्रमाणें वागत होते. स्नानसंध्येंत च वेळ घालवावयाचा तर मग राज्य कोणीं करावयाचें ! इतिहास व व्यवहार यांत केव्हां केव्हां विरोध येतो तेथें स्पष्ट मत दिलें च पाहिजे. आतां अहिल्याबाई राज्यकारभार हांकी यांत कांहीं विशेष नाहीं. त्या वेळच्या सर्व मोठ्या घराण्यांतील बायकांना हें राजकारणाचें ज्ञान असे. तेव्हां बायका या कामांत हुशार असणें हें अपरिहार्य च होतें. मालक लढाईवर गेल्यावर त्याच्या जहागिरीचा कारभार मग कोणीं पहावयाचा ! तो त्याच्या बायकोला च पहावा लागे. इंग्रेज मद्रासेहून निघाला व कांजीवरमला आला, आतां पुढें काय करावें याचा विचार त्या वेळच्या बायका करीत. पेशवाईंतील बायकांना राजकारणाचें सक्रिय ज्ञान जितकें असे तितकें हल्लींच्या बायका कितीही शिकलेल्या असल्या तरी त्यांना नाहीं. सरस्वतीबाईची ७ व्या ( ऐ. ले. सं. च्या ) खंडांतील पत्रें पहा. गंगाधर गोविंदाची थोरली बहीण साळूअक्का म्हणून होती. ती ७ लक्षांची दौलत पहात असे म्हणून अहिल्याबाई ही राज्यकारस्थानी होती या म्हणण्यांत एवढें विशेष नाहीं. असो. रा. जोशी यांनीं कांहीं जुनीं पंचांगें आपल्याला दाखविलीं मिरजेस अशीं च कांहीं जुनीं पंचांगें आहेत तीं मिळविण्याची मी हि खटपट करीन. यंदांच्या दुर्मिळ वस्तूंत आपण पाहिलेलीं सुंदर चित्रें आहेत. त्यांत सर्वांत महत्त्वाची तसबीर म्हणजे रा. आबा चांदोरकर यांनीं दाखविलेली श्रीशिवरायाची होय. आपल्या मंडळाला हा एक मोठा च लाभ रा. आबा यांनीं करून दिला आहे. या तसबीरींच्या प्रति त्याच्या मालकांनीं करून घेऊन अस्सल त्यांनीं आपल्या मंडळांत ठेवाव्या, अशी माझी त्यांना विनंती आहे. मिरजेचे गंगाधर गोविंद यांनीं रोज गीता ब्राह्मणांना वाटण्याकरितां कासाराकडून गीतेचे तांब्याच्या पत्र्याचे करविलेल्या ठशांपैकीं कांहीं येथें आहेत. रा. पांडोबांच्या पटवर्धन व इंग्रेज या लेखाबद्दल मीं सांगितलें च आहे कीं तो बनावट आहे म्हणून. लेख वाचतांना त्यांतील मुद्द्याबद्दल इतर पुरावे द्यावे लागतात. रा. आपट्यांनीं पाटीलबोवाबद्दलचा निबंध वाचला तो चांगला आहे. तो पूर्वार्ध होता त्याचा उत्तरार्ध रा. आपट्यांनीं पुढील संमेलनांत वाचावा म्हणजे पाटीलबावांचें १७८३ ते १७९५ पर्यंतचें चरित्र तयार झाल्यासारखें आहे. असो. इतर हि लेख चांगले होते. संशोधकांनीं यंदां कामगिरी हि चांगली केली. संमेलनास संस्थेच्या नेहमींच्या कामास श्री. तात्यासाहेब हे आपली जागा नेहमीं देतात, त्याबद्दल आपण त्यांचे आभारी आहों. पण यंदां जमलेल्या मंडळींच्या संख्येकडे व मंडळाच्या उत्तरोत्तर वाढणाऱ्या व्यापाकडे पाहिलें असतां, ही जागा अपुरी पडून मंदिराची जरूरी अत्यंत भासते. पुढील नाहीं पण याच्या पुढील वर्षीं तरी संमेलन आपल्या मालकीच्या मंदिरांत भरेल अशी आशा आहे. मात्र याकरितां ज्यांनीं इमारतफंडास वर्गणी देण्याचें कबूल केलें असेल त्यांनीं त्वरित आपली रकम चिटणीसांकडे पाठवावी. इतर लोकांनीं हि हें

इतिहासाचें आपल्या पूर्वजांचें एक ऋण समजून पैसे द्यावे. मी हि १०१* रु. देतों आज आपले सभासद् यांच्यांत हि वर झाले ही आनंदाची गोष्ट आहे. कार्य झालें हे व माझ्या मनांत पुष्कळ आहे, पण “अंगीकृतं सुकृतिनः परिपालयंति” या न्यायानें आपण हि कार्य अवश्य पाहिजे व तें आपण करावें असें सांगून व आपण मला अध्यक्षस्थान दिल्याबद्दल आपले आभार मानून मी खालीं बसतों.”

यानंतर प्रो. विजापूरकर म्हणाले “आजचे अध्यक्ष हे नुसते इतिहासकार च नसून, कवि, नाटककार व विद्वान् शिक्षक आहेत. यांनीं घस सोसून इतिहासाचीं ग्रंथें प्रकाशित केलीं आहेत. आपल्या सर्वांच्या तर्फे मी त्यांचे आभार मानतो.”

नंतर शेवटीं रा. पोतदार यांनीं जमलेल्या सभासदांचे, संशोधकांचे वगैरे आभार मानले व रा. नरसोपंत केळकर यांनीं सभासदांतर्फे चिटणीसद्वयांचे आभार मानल्या-वर सहाव्या संमेलनाचें काम संपलें.

## वि. सू.—

शिल्लक राहिलेले निबंध निवडमंडळाचे सल्ल्याप्रमाणें विल्हेस लागतील.

---

* अध्यक्षांनीं ४।५ दिवसांच्या आंत व वरील रकम मंडळाकडे पाठविली.

## भा. इ. सं. मं. पुणें

# शके १८४० चें वार्षिक षष्ठ संमेलनवृत्त

## पाटिलबावांचीं दिल्ली येथील पहिलीं चार वर्षें

पाटिलबावा म्हणजे मराठ्यांच्या इतिहासांतील एक मोठी गूढ व्यक्ति आहे. त्यांनीं आपली महत्वाकांक्षा तृप्त करून घेण्यासाठीं राघोबा, नाना व इंग्रज यांच्याशीं एक वेळ स्नेहभावाचें वर्तन केलें तर कांहीं वर्षांनीं त्यांच्याशीं च पुनः उघडपणें विपाड केला आहे. त्या पैकीं सालबाईच्या तहापर्यंतचें त्यांचें वर्तन रा. खरे यांनीं अनेक ठिकाणीं उत्तम रीतीनें दाखवून दिलें आहे. तथापि, त्यानंतर त्यांनीं दिल्लीस, पातशाही ताब्यांत घेतल्यापासून जीं आठ वर्षें उत्तर हिंदुस्थानांत घालविलीं, त्या अवधींत त्यांना आलेल्या अनुभवानें त्यांच्या मतांत कोठें व कसा फरक पडला याचा उलगडा होणें अगत्याचें आहे. हा उलगडा होण्यास या आठ वर्षांतील दिल्लीकडील पत्रव्यवहार फार उपयोगी पडणार आहे; आणि हा रा. पारसनीस यांनीं इतिहाससंग्रहांमधून दोन भागांत स्वतंत्रपणें छापला आहे व त्याशिवाय, या मासिकांत अनेक ठिकाणीं फुटकळ प्रकरणांच्या रूपानें हि आलेला आहे व अद्याप या पुढें पुष्कळ येईल असें वाटतें. शिवाय रा. राजवाड्यांच्या १२ व्या खंडांत या अवधींतलीं सरासरीं ४० पत्रें आहेत. पण हीं पत्रें वाचतांना मला मुख्य दोन तीन अडचणी भासल्या त्या अशा; रा. राजवाड्यांनीं पत्रांवर शक दिला आहे. रा. पारसनिसांनीं इ. स. दिला आहे आणि मूळ पत्रांत फसली सन आहे. आणि हीं पत्रें कोठें आढळतील व कोणत्या प्रकरणासंबंधीं असतील याचा अगदीं नेम नाहीं. शिवाय यांतील उल्लेख उत्तर हिंदुस्थानांतील घडामोडी-संबंधानें असल्यामुळें, त्यांतील व्यक्तींचीं नांवें इकडच्या मानानें परी च अपरिचित असतात. यामुळें हीं पत्रें व्यवस्थितपणें वाचण्यासाठीं प्रथम एक जंत्री—दर महिन्यास चाललेल्या राजकारणांतील महत्वाची गोष्ट व पाटिलबावांचा मुक्काम देणारा दर मालचा एक नक्शा—तयार केली पाहिजे व या काळचें स्थूल मानानें वर्णन देणारें एक टिपण जवळ पाहिजे असें मला वाटलें. म्हणून मी या उद्योगास लागलों. त्यापैकीं कामाच्या सोईसाठीं मी या अवधीचे दोन भाग केले आहेत. म्हाडेर—गोहदची मसलत आटपून पातशाही कारभार मिळवून, तो चार वर्षांच्या अवधींत (जेपूर सर करण्याच्या

नादीं लागून) त्यांनीं सवेंस्वी गमावेपर्यंतचा काल मी पहिल्या भागांत धरतों व दुसऱ्यांत त्यांनीं परत सर्व घडी बसवून, होळकर व अलीबहाद्दूर यांच्यावर रागावून संतापानें ते पुण्यास येईपर्यंतचा काल, दुसऱ्या भागांत धरितां येईल. पैकीं आज मला पूर्वार्धासंबंधीं च येथें सांगावयाचें आहे. विभाग, मी केवळ कामाच्या सोईसाठीं पाडले आहेत. यामुळें आजचा विषय अर्धवट मध्यें च सोडल्यासारखा भासण्याचा संभव आहे. परंतु आठ वर्षांची हकीकत या वेळीं तयार करणें मला शक्य झालें नाहीं. यामुळें मला या चार वर्षांची च हकीकत सांप्रत तयार करणें भाग पडलें. या हकीकतीचा बहुतेक भाग मी अतवरणें घेऊन च तयार केला आहे; आणि तीं पुष्कळशीं इतिहाससंग्रहांतलीं आहेत.

मराठ्यांनीं दिल्लीकडे स्वारी करावी ही कल्पना, पाटिलबावा व नाना, पुण्यास भेटल्यावेळीं म्हणजे १७७९ किंवा किंचित त्याच्या हि पूर्वीं निघाली होती, असें पाटिलबावांनीं च एके ठिकाणीं म्हटलें आहे. तथापि, त्या वेळीं या स्वारीचा हेतु असा होता कीं, मराठ्यांनीं दिल्लीचा पातशाहा ताब्यांत घेऊन व जमल्यास वजीरास हातीं धरून अंतर्वेदींतून इंग्रजांना हाकून लावावें, एवढें च नव्हे तर साधल्यास बंगाल्यांत देखील त्यांना शह द्यावा. पण सालबाईच्या तहा नंतर इंग्रजांनीं तहाचीं कलमें मोडल्यांवाचून त्यांच्याशीं कुरापत काढणें, मराठ्यांच्या इभ्रतीस व नीतिमत्तेस शोभण्याजोगें नव्हतें. आणि एकंदरींत पाहतां इंग्रजांनीं आपलें वचन पाळलें असें च कबूल करणें भाग आहे. अधूनमधून दिल्लींत मराठ्यांची बसत चाललेली घडी पाहून ते बेचैन होत. पण, हेस्टिंग्स, कॉर्नवालीस वगैरे मंडळी काळवेळ ओळखणारी असल्यामुळें मराठ्यांशीं प्रत्यक्ष बिघाडाचा प्रसंग त्यांनीं येऊं दिला नाहीं. यामुळें इंग्रजांना शह देण्याचा मूळचा बेत बाजूस राहून, दिल्ली येथील सत्ता हातीं घेणें हें च मराठ्यांचें ध्येय होऊन बसलें.

नजीबखानाच्या नंतर, नजबखान म्हणून एक कर्ता पुरुष दिल्लीस अधिकारारूढ झाला होता. त्याच्याशीं मराठ्यांनीं प्रथम सूत्र लावलें होतें कीं, इंग्रज व मराठे यांचें युद्ध चालल्या वेळीं पातशहानें इंग्रजास शह द्यावा. परंतु तें त्यानें अनेक सबबी सांगून टाळलें. त्याच्या म्हणण्याच्या इत्यर्थ असा होता कीं, मराठे जरी सध्या इंग्रजाशीं लढत आहेत तरी ते अखेर त्यांच्याशीं तह करणार. इंग्रजांना निर्मूळ करी पर्यंत मराठे हें युद्ध चालविणार नाहींत. अशा परिस्थितींत आपण इंग्रजाशीं जाहीर रीतीनें वांकडें धरल्यास ते संधी सांपडतांच आपला सूड घेतील; आणि असा प्रसंग ओढवल्यास इंग्रज दिल्लींत तत्काळ येऊन पोंचतील पण मराठे मात्र फार दूरवर असल्यामुळें लौकर मदतीस येऊन पोंचणार नाहींत; याकरितां मराठ्यांचें सैन्य आधीं दिल्लीस पोंचलें म्हणजे आपण उठाव करूं, हें पातशहाचें म्हणणें योग्य होतें. कारण तो स्वतः कर्तृत्वशून्य होता व जवळच्या सरदारांत फाटाफूट फार होती. नंतर १७८२ च्या एप्रील च्या २२वे तारखेस नजबखान मेला, तेव्हां मिर्जा सफी व महमद बेग हमदानी यांमध्यें अधिकारप्राप्ती साठी बरी च झटापट झाली त्यामुळें दिल्लींत बेबंदशाही माजली. या सुमारास इंग्रजांनीं

दिल्लींत शिरण्याचा जोराचा प्रयत्न केला. पण हेस्टिंग्सला कौन्सिलांत उठावाच्या धोरणास पाठिंबा मिळाला नाहीं. डायरेक्टराकडून पैशाची निकड फार लागली व काशीच्या राजावर दांडगाई करण्याचा प्रयत्न केला तो हि अंगलट आला. यामुळें इंग्रजांचा धीर सचल्यासारखा झाला होता. शिवाय चेतसिंगाच्या मदतीनें, पाटिलबावा अंतर्वेदींत उतरणार व वजीरास सामील करून घेऊन कलकत्त्यावर स्वारी करणार असा संभव दिसूं लागला. तेव्हां त्यांनीं मिटतें घेऊन तहाचा घाट घातला. आणि पाटीलबावांनीं त्यांच्याशीं स्वतंत्र रीतीनें बोलणें करून स्नेह जोडला. तो बहुधा अशा हेतूनें जोडला असावा कीं, 'चोहोंकडे एकदम शत्रुत्व उद्भवूं देणें श्रेयस्कर नाहीं. आपला पाय दिल्लींत चांगल्या रीतीनें पक्का होईपर्यंत इंग्रजाशीं स्नेह दाखवावा' दिल्ली येथील पेशव्यांच्या वकिलाचा आग्रह देखील असा च होता व या करितां तो दिल्लीहून पातशहाचा निरोप घेऊन पाटिलबावाकडे समक्ष बोलण्यासाठीं गेला होता. 'येथील सर्व सलतनत हातीं लागल्यास बंगाल्याकडील इरादा जो केला तो सिद्धीस जाईल', असें वकीलाचें म्हणणें होतें. तें पटल्यामुळें असो किंवा कदाचित् अँडर्सन जवळ पाटीलबावांनीं च सांगितल्याप्रमाणें, पुण्यांतील दरबारांत पुढें मागें आपलें बस्तान बसविण्याच्या कामीं इंग्रज उपयोगी पडतील असें त्यांना वाटल्यामुळें असो, पण त्यांनीं इंग्रजाशीं तह करण्याची अंतःकरणपूर्वक खटपट केली एवढें निःसंशय आहे.

पाटीलबावा इंग्रजांच्या सहाय्यानें पुण्याचा कारभार आपल्या हातीं घेऊं पहात होते, असें म्हणण्यास पुरावा, अँडर्सनच्या रोजनिशींतला १५ जून १७८३ मधला जो उतारा, फॉरेस्टकृत वेचांच्या तिसऱ्या भागांत पृ. १७७७ मध्यें दिला आहे, त्यांत सांपडतो तो असाः

Scindia paid me a visit. After he had conversed some time in public, he retired with three or four of his confidential officers to a separate tent where we had a long conference. He expatiated on the warmth of his attachment to the English and to the Governor General in particular. He remarked that the Peshwa was an infant and that although he himself was entrusted with the charge of his interest with respect to the English, yet I must well know the disposition of some of the persons who had acquired an influence in the direction of his affairs. He hinted that he trusted to our support to enable him at some future period to set matters to rights and he inferred that as he looked to us for support in his dom-

estic concerns it would be absurd in him to forfeit our favour by any foreign connections. "

तथापि महादजींची हि सर्व लबाडी असेल व मराठ्याचें पाऊल दिल्लींत पडूं देऊं नये असें म्हणणारा एक जोरदार इंग्रजांचा पक्ष लखनौस होता. दिल्लीस असलेला मराठ्यांचा वकील हर युक्तीनें काढून टाकावा असा त्यांनीं प्रयत्न केला, आणि शेवटीं लताफत अलीखान नांवाच्या खोज्याच्या हातें त्यास ठार मारण्याचा देखील त्यांनीं उपद्व्याप केला. परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

या प्रकरणाबद्दल निश्चित मत देणें कठीण आहे. मुत्सद्यांच्या प्रत्यक्ष शब्दांवरून अनुमान काढणें रास्त नाहीं. पण एकंदरींत नाना व महादजी यांचें इंग्रजाशीं झालेलें वर्तन सिद्धसाधकपणाचें असावें असें वाटतें. कारण इंग्रजाशीं पाटिलबावांचा स्वतंत्र तह झाला तरी नाना, अनेक कारस्थानांची जबाबदारी पाटिलबावावर बेधडकपणें टाकीत असत. शिवाय या तहानंतर फ्रेंचांचा वकील पुणें दरबारीं आला होता, त्यास निरोप द्यावा किंवा काय असें विचारल्या वेळीं, पाटिलबावानीं त्याला अगदींच तोडून टाकूं नका व फारसें प्रेम दाखवूं नका असा सल्ला दिला आहे. एकंदरींत पाटिलबावांचे मधून मधून आढळून येणारे वैतागाचे, ढोंगाचे उद्गार वाचून, त्यांच्या अंतःकरणाची परीक्षा करणें बरोबर होणार नाहीं.

मागें सांगितल्याप्रमाणें नजबखानाच्या मृत्यू नंतर, हमदानी व मिर्जा सफी यांचीं अधिकारप्राप्तीसाठीं दिल्लीस भांडणें सुरू झालीं, तेव्हां दोघांचेही वकील पाटीलबावांकडे आले. त्यानीं अनुपगीर गोसाव्यामार्फत मिर्जा सफीस भेटण्याचें कबूल केलें आणि १७८२ च्या जुलै १ तारखेस आटेरी समीप चमेली नदीच्या कांठीं भेट घेतली. पातशाहजादा व नजबखानाची बहीण या प्रसंगीं आली होती. त्यांस वस्त्रेंभूषणें देण्यांत आलीं. पाटीलबावानीं अँडर्सनची व मिर्जा सफीची ओळख करून दिली. शेवटीं सफीनें जाहीर रीतीनें पाटीलबावांस सांगितलें कीं ' सर्व प्रकारें आम्ही आपले आहों. दिल्लीकडील बंदोबस्त यथास्थित नाहीं याकरितां आपण तिकडे चलावें. आमचा बंदोबस्त पातशाहीचा करून द्यावा. ' तेव्हां बावांनीं उत्तर दिलें कीं ' उत्तम आहे. ग्वालेर गोहदची मसलत उरकली म्हणजे बादबरसात तिकडे येऊन तुमचा बंदोबस्त यथास्थित करून देतों'. या भेटीनंतर मिर्जा सफी डिगेस आला व पाटीलबावा ग्वालेरीस परत गेले. एकंदरींत ही भेट ' अनाहूतो न गच्छेत्' या न्यायानें, आपण बोलावणें आल्यावरून दिल्लीकडे जातों असें दाखविण्याकरितां घेतली असावी.

यावेळीं मराठ्यांचें पाऊल पुढें पडूं देऊं नयें असें म्हणणारा एक जोरदार पक्ष दिल्लींत होता. तो हतप्रभ होऊन पाटिलबावांचें वस्तान त्या दरबारीं बसेंपर्यंत बरेच दिवस दिल्लीदरबारांत यादवी माजली होती. तिचें स्वरूप ध्यानांत येण्याकरितां मिर्जा सफी व आफरासियाबखान या दोघांच्या खुनाची हकीकत देणें अवश्यक आहे. कारण या खुनांचा संबंध इंग्रजी इतिहासकारांनीं पर्यायानें पाटीलबावांशीं जोडला आहे,

तो निराधार आहे हें इतिहाससंग्रहांतील* अस्सल पत्रांच्या आधारें पुढें दिलेली हकी-कत वाचली असतां, कोणास हि दिसून येणार आहे.

श्री. थोरल्या माधवरावांचे कारकीर्दी अखेर मराठ्यांनीं शहा अलमाम १७७१ सालीं दिल्लीच्या तख्तावर बसविलें. नंतर मराठ्यांचें सैन्य श्री. नारायणरावांच्या वधानंतर दिल्लीहून परत आल्यापासून तेथें सर्व कारभार वजीर नजबखान पहात होता. तो २२ एप्रील १७८२ रोजीं मरण पावला. त्याचीं वस्त्रें, त्याचा दत्तक पुत्र आफरासिया-बखान यास देण्यांत आली. परंतु त्या वेळीं दिल्ली दरबारांत आणखी बरी च कर्तबगार मंडळी होती त्यांची माहिती येथें दिली पाहिजे. पैकीं **मराठ्यांना अनुकूल** लोक होते त्यांचीं नांवें अशीं होतीं.

१ अफरासियाबखान–मरण पावलेल्या नजबखानाचा मुलगा.

२ मिर्जा सफी–नजबखानाचा पुतण्या.

३ नजबकुलीखान–सरदार

४ अनुपगीर गोसावी–पाटीलबावांचा पक्षपाती.

याउलट, **मराठ्यांना प्रतिकूल** असे लोक होते ते असे—

१ महमद बेग हमदानी–आग्र्याचा सुभेदार

२ इस्माइल बेग

३ गोहदचा जाट–पाटिलबावांचा वैरी

प्रथम हा पक्षभेद फारसा तीव्रपणें दिसत नव्हता. पण गोहदच्या जाटावर पाटीलबावांनीं युद्ध पुकारल्यामुळें, त्यानें दिल्ली दरबाराकडे मदत मागितली. ती द्यावी असें हमदानीचें म्हणणें होतें. परंतु मिर्जा शफीस मराठ्यांना दुखविणें बरें वाटेना. तो म्हणे, " जाटाची बिशाद किती ! दाक्षिण्यांशी बिघाड करणें ठीक नाहीं. त्यांचा जमाव भारी. त्यांशीं बिघाड केल्या आपलें पारपत्य करितील. यांशीं स्नेह करून, मेळऊन घेतल्यास फार कामावर पडतील." यावेळीं अनुपगीर गोसाव्यानें मिर्जा सफीस भर दिल्यामुळें, तो उघडपणें मराठ्यांचा पक्षपाती झाला. दरबारचीं वजीरीचीं वस्त्रें अफरासियाबखानास मिळालीं होतीं, तरी सर्व कारभार सफीच्या च हातीं होता. तेव्हां त्यानें अफरासियाबखान व पाटीलबावा यांची भेट व्हावी असा घाट घातला. या कामीं पातशाहाजादा देखील त्यास अनुकूळ झाला होता. ही गोष्ट हमदानीस आव-डली नाहीं पण या भेटीच्या प्रसंगीं हमदानी जवळ असूं नये असा करार करून पाटील-बोवांनीं, शाहाजादा, अफरासियाबखान, व सफी यांची भेट घेतली. अर्थात या अप-मानाबद्दल हमदानीस फार वाईट वाटलें. यानंतर भेटीचा समारंभ होऊन मंडळी परत येत असतां, हमदानीनें मिर्जा सफीस गुप्तपणें मारण्याचा विचार केला. प्रथम तो अफरा-सियाबखानास भेटून आला. नंतर मिर्जा सफीच्या भेटीस गेला. " हत्तीवर स्वार असतां दोघांचे हत्ती जवळ जवळ आले. हातासीं हात लावावा तों, आमदानी

---

* ऐतिहासिक स्फुट लेख पृ. ९५–१०५

आपले हत्तीवरून उडून मिर्जा सफीचे अंबारींत खवासींत जाऊन मागून मिर्जा सफीची मान दाबून धरून पोटांत कटार मारून ठार केला."

या खुनानंतर हमदानीचें पारपत्य करण्यासाठीं, अफरासियाबखान व अनुपगीर गोसावी यांनीं युद्ध करावयास पाहिजे होतें. परंतु संध्याकाळ झाल्यामुळें युद्धप्रसंग नीट होणार नाहीं असें समजून, ही मंडळी डीग येथें मिर्जा सफीची आई ( नजबखानाची बहीण ) होती तिकडे गेली. तिनें, सर्वांना धीर देऊन व अफरासियाबखानास वस्त्रें देऊन हमदानीचें पारिपत्य करण्यास सांगितलें. या च वेळीं अनुपगीर गोसाव्यानें पाटीलबावांना सर्व हकीकत कळवून, त्यांची मदत अफरासियाबखानास मिळावी असें ठरविलें.

परंतु मिर्जा सफी मारला गेल्याबद्दल अफरासियाबखानास खरोखर वाईट वाटत नव्हतें. वजीरीचीं वस्त्रें आपणांस मिळालीं असून, मिर्जा सफीच्या तंत्रानें आपणांस वागावें लागतें याबद्दल अफरासियाबखानास वाईट वाटत होतें. यामुळें सफीच्या खुनामुळें एक ब्याद आयती टळली असें त्यास झालें; इतके च नव्हे तर, सफीच्या खुनांत त्याचें अंग असावें असा देखील संशय येतो. सारांश, सफीच्या विरुद्ध सर्व मुसलमान-मंडळी एक झाली होती. परंतु सफीच्या खुना नंतर आपसांत त्यांचें अधिकार पटकावण्यासाठीं भांडण सुरू झालें. या भांडणांत अफरासियाबखान पाटीलबावांची मदत घेणार असें दिसूं लागलें. तेव्हां पुनः एकवार सर्व मुसलमान सरदार अफरासियाबखानाविरुद्ध एक झाले; व अफरासियाबखान पाटिलबावांशीं अधीक च मैत्री जोडण्याचा प्रयत्न करूं लागला.

हमदानीचा भाऊ जैनुल आबदीखान, कांहीं कारणामुळें पांच सात महिन्यापासून पाटीलबाकडे राहिला होता; व त्याचा खर्च ते चालवित असत. तो अर्थात पाटिलबावांचा पक्षपाती होता. पण त्याची बुद्धी देखील फिरून तो अंतस्थपणें आपल्या भावाच्या कटांत सामिल झाला. सारांश आमदानी, जैनुल आबदीखान व मोगल या सर्वांचा मनसबा असा ठरला कीं, 'अफराशाबखान दक्षिणी ( मराठे ) घरांत घालितो. यांस जैनुल अबदीखानानें मारावा म्हणजे पाटीबावा सहज च राहिले.'

या नंतर, जैनुल आबदीखान एका बारगीरास बरोबर येऊन अफरासियाबखानाचे भेटीस गेला. दोन चार घटका गप्पा गोष्टींत गेल्यावर या बारगिरानें एकदम अफरासियाब खानावर हत्यार चालविलें; त्यामुळें तो अर्ध मेला होऊन पडला. इतक्यांत आसपासच्या लोकांनीं येऊन बारगिरास ठार केलें. या गडबडींत जैनुलआबदीखान परत पाटीलबावाकडे गेला. आणि त्यानां खुनाची हकीकत सांगू लागला कीं, 'मी जवळ होतों; तो बारगीरही माझा च; मजला कोणी बदनाम करतील, तुफान घेतील, वास्तव आपणाकडे सांगावयास आलों.' परंतु पाटीलबावा या लबाडीनें फसले नाहींत त्यांनीं जैनुल आबदीखानास धरून कैदेंत ठेवलें.

यानंतर पाटीलबावांनीं आपलीं माणसें पाठवून सर्व हकीकत लक्षांत घेतली व अफरासियाबखानाच्या लोकांना धीर दिला. थोड्या च वेळानें अफरासियाबखानाची धुगधुगी नाहीशी होऊन तो गतप्राण झाला. त्याचें प्रेत पुरण्यासाठीं न्यावयाची तयारी झाली. पण पलटणाच्या लोकांनीं' आमचा पगार मिळाल्या वाचून आम्ही प्रेत नेऊ देणार नाहीं' असा हट्ट धरला. तेव्हा पाटीलबावांनीं मध्यें पाहून ' पातशाहास सांगून तुमचा पगार देववीन ' असें सांगितलें, यामुळें तो प्रसंग निभावला.

पण पाटिलबावांचा सरदार अंबाजी इंगळे फौजसुद्धा मुसलमानी लष्करांत राहिला होता. 'तो आमच्यावर हल्ला करील कीं काय ' असा संशय मोगल्यांना होता, यामुळें ते तक्रार करू लागले. तेव्हां पाटीलबावांनीं त्यांना सांगितलें कीं, ' हे लोक तुमच्या संरक्षणार्थ आम्ही ठेवले आहेत. स्वस्थ राहावे. फौज उठवून आणली तर सलतनत लुटली जाते.'

अशा प्रकारें अफरासियाबखानाच्या लोकांची समजूत पाडण्यासाठीं कांहीं तरी बोलाचाली सुरु होती. पण एवढ्यानें काम भागणार नाहीं हें पाटीलबावांना माहीत होते. आपणाविरुद्ध सर्व मुसलमान एक होतील असें समजून, त्यांनीं सर्व व्यवस्था तातडीनें करण्याचें ठरविलें. इकडे हमदानीनें अफरासियाबखानाच्या सैन्याकडे निरोप पाठविला कीं, ' अफरासियाबखान मेला. आता बादशाही बंदोबस्त पाटीलबावा करतील, बादशाहाची दौलत हिंदूच्या घरांत जात आहे. तुमचा धनी अफरायासियाबखान मेला. आतां तेथें राहणें तुमचे सलाह नाहीं. उठून मजकडे येणें. तुमचा पगार मी देतों.'

या सर्व बातम्या पाटीलबावांना कळत होत्या. तेव्हां 'या गर्मीतच दाब बसविल्यास बसेल. एक दोन रोज उगेच स्वस्थ राहिल्यानें सारे फितुरी एक होऊन शेर झाले तर मग दबणार नाहींत' या विचारानें त्यांनीं धैर्य धरून, नारायणदास व अनुपगीर गोसावी यांचे हातून अनुसंधानें लाऊन हमदानीचें पारिपत्य करण्याचें ठरविलें.

अशा रीतीनें फितुरीस प्रवृत्त झालेल्या अफरासियाबखानाच्या पलटणींतील लोकांना हाताशीं धरून व आपले लोक आघाडीस ठेऊन, पाटीलबावांनीं हमदानीच्या सैन्यावर मारा सुरू केला. तेव्हां त्याच्याकडून निरोप आला कीं, 'बादशाहीचा बंदोबस्त तुम्ही करणार आम्ही तुमचे शरीक करून भांडावें, मरावें कशाला ! ' यास पाटील-बावांनीं उत्तर पाठविलें कीं, ' आम्हांस बादशाहीचा अगर कारभाराचा लोभ असता तर मागे किती वेळ ही गोष्ट साधण्यास अनुकूल संधी आली होती. परंतु आम्ही उलट बादशांहीची स्थापना, मदती करीत गेलों. आतां हि आम्हांस लोभ नाहीं. बादशाहाची दरसाल पत्रें देशी येत गेलीं. ग्वालेरीस असतां मिरजा सफी आर्दीकरून बोलाऊ लागले. आलों. भेटी घेऊन ग्वालेरीस माघारे गेलों. आतां पुनः बादशाहा व अफराशाबखान यांचीं पत्रें येऊन आम्हांस घेऊन आले. बादशाहास आमचास ठेऊन आफराशाबखाम पुढें आले, भेटले. बादशाहा हि बंदोबस्तानें बोलत होते. शुके बरंबेवर

येत आहेत असें समजो राहून जाणें उचित नाहीं. बंदोबस्त करून देऊन माघारें जावें. येथें काश्मागम अफगाणिस्तानाचा पुत्र आहे. त्याची स्थापना करून यावी.'

असें उत्तर पाठवून, पाटीलबावांनीं तोफा लागू करून हमदानांवर मारगिरी केली. शेवटीं त्यास वेढा पडून उपासमार होण्याची वेळ आल्यामुळें हमदानी मराठ्यांच्या स्वाधीन झाला.

याशिवाय आणखी अन्या च लोकांचे खून या मुमागास झाले पण ते सर्व येथें दिल्यास फार विस्तार होईल सबब तसें करीत नाहीं. तथापि उत्तरहिंदुस्थानांतील लोकांसंबंधीं, यापैकीं सदाशिव दिवाकरानें काढलेले उद्गार येथें देण्याजोगे आहेत. तो म्हणतो " मोगले च काय, हिंदुस्थानी माणूस ब्राह्मणा पासोन अतिशूद्र व मुसलमान पावेतों दगलबाज, मात्रागमनी, बेइमान, खुषामदी व तात्काल च निर्दय. प्राण घेणार. पोटच्या संतानापावेतों. त्यांत हि विलायती मोगल काश्मीरी, हे तर आधी खुशामद इतकी दाखवीतील कीं आम्ही च केवळ, आण शपथ हि करावी, ते च काबु (संधि) फावला तर तेच समयीं मान कापावी." अर्थात् तत्कालीन यादवीच्या वेळीं माजलेल्या बजबजपुरीनें विटून गेलेल्या गृहस्थानें, उद्वेगाच्या भरांत काढलेले हे उद्गार आहेत व ते तितक्या अर्थानें घेतले पाहिजेत. हिंदुस्थानी लोकांसंबंधीं मराठ्यांचे हें सामान्य मत होतें, असें यावरून म्हणतां येणार नाहीं.

मिर्जा सर्फास अभिवचन दिल्या प्रमाणें पाटीलबावांना दिल्लीस जाण्यास त्या वेळीं फावलें नाहीं. दिल्ली येथील पेशव्यांच्या वकिलानें व खुद्द पातशहानें त्यांना चरीच आयहाची पत्रें लिहिलीं. परंतु ' लोकरच येतो, इकडे फौजेच्या देण्याचा पेच पडला आहे' वगैरे लिहिण्यापलीकडे त्यांना प्रत्यक्ष कांहीं करतां आलें नाहीं. दिल्लीस तर लटालूट व जुलूम, मारामाऱ्या यांचा कहर उसळून गेला. गुजर, वाणी, सराफ वगैरे देवदर्शना मार्टी जरा घरांतून बाहेर निघाले कीं, त्यांना धरून ठेवावें व हजार पांचशें रुपये दंड घेऊन सोडावें असा प्रकार दिवसा ढवळ्या दिल्लींत चालला. तेव्हां लोक अगदीं त्रस्त झाले. फौजेंत व सरदारांत अगदीं प्राण राहिलें नव्हतें. " जसे श्रीकृष्णजी निजधामास गेले, त्यांनीं अर्जुन आदीकरून सर्वांच्या शक्ती हरून नेल्या आणि काळ्या-काळ्यांनी गोपिका लुटल्या, हे अवस्था या दिवसांत या स्थळाची, नजबखान मेल्यानें जाली आहे " असें वर्णन तेथील वकीलानें केलें आहे. सरदारांच्या ज्या आपसांत झटापटी झाल्या, त्यांत मिर्जा सफीखान हा २३ सप्टेंबर १७८३ रोजीं मारला गेला; व अफरासियाबखान अधिकारारूढ झाला. याचा ओढा इंग्रजांकडे असावा असें वाटतें. त्याच्या जवळ मेजर ब्राऊन म्हणून वकील होता, तो दिल्लीच्या कारभारांत इंग्रजांनीं पडलें च पाहिजे असें म्हणणाऱ्यांपैकीं होता. १७८३ च्या डिसेंबर मध्यें, " The business of assisting the Shah must go on, if we wish to be secure in India or regarded as a nation of faith and honour", असें त्यानें कळविलें होतें. इतकें च नव्हे तर जेंसिंग कन्न्या नांवाच्या शीख सरदारा-

कडे एक मनुष्य पाठवून, " लोक स्वार घेऊन येणें. तुम्ही आम्ही मिळून जो नवा मुलूख घेऊं त्यापैकी सा आणे तुमचे व दाहा आणे आमचे " असा करार करण्याचा प्रयत्न केला. सारांश, " दिल्लींत पाय शिरवून जैसे लखनौस मालक होऊन बसले आहेत तैसे दिल्लींत हि मालक होऊन बसावे " या विचारांत वावरत होता. अफरासियाबखानाचा प्रतिस्पर्धी अबदुल अहद्खान याशीं देखील बाहुनचें सेतकूट जमलें होतें. तथापि पातशाहाच्या मनांत मात्र मराठे च दिल्लीस यावे असें होतें. त्यानें ही इच्छा अनेक वेळां वकीलामार्फत पुण्यास व शिंद्याकडे कळविली होती. परंतु त्याप्रमाणें शिंदे आले नाहींत. तेव्हां तो अगदीं वैतागून गेला. १७८४ च्या फेब्रुवारी महिन्यांत वकीला जवळ तो म्हणाला, " ज्या दिवसापासून विसाजीपंत गेले आहेत, त्या दिवसा पासून पुन्हां इकडील खबर घेतली च नाहीं व राजश्री पाटीलबावास आज दोन वर्षे जालीं लिहितां लिहितां थकलों ! त्यांज कडील आनंद नरसी, एक वर्ष जालें, स्वतंत्र येऊन बसला आहे. तो नित्यांनीं लबाडी करितो कीं, आज पाटीलसाहेब येतात, उद्यां, येतात ! परंतु त्याची गोष्ट कांहीं च अमलांत येत नाहीं. " तेव्हां वकीलानें उत्तर केलें कीं, " गोहद् बहुतच जेर जाली आहे. तेथील फडशा सत्वर च करून, राजश्री पाटीलबावा हुजुरांत येतील. " तेव्हां पातशाहा म्हणाला "जों पावेतों ते येतील, तों पावेतों ईश्वरें काय नेमिलें असेल तें घडेल." हें प्रकरण इतकें हातघाईवर येई पर्यंत पाटिलबावांनीं निघण्याची जय्यत तयारी केली होती. १७८१ आक्टोबर १३ तारखेस शिंद्यांचा (स्वतंत्रपणें) व १७८२ च्या मे १७ तारखेस पेशव्यांचा, सालबाई येथें इंग्रजांशीं तह झाल्यामुळें व ग्वालेर सर झाल्यामुळें दक्षिणेंतून शिंद्यांना पाय काढण्यास हरकत राहिली नाहीं. शिवाय डिबाई मिळाल्यामुळें कवाइती सैन्य तयार करण्याचें काम मनाजोगें जमेल व त्याच्या जोरावर हिंदुस्थानांत अंमल बसविण्यास सोपें पडेल, असें ठरवून १७८४ च्या जुले मध्यें पाटीलबावा आग्र्यास पातशहाच्या भेटीस गेले. तेव्हां पातशहानें ' सलतनतीचा बंदोबस्त ' करण्या विषयीं हुकूम केला. पाटीलबावांनीं उत्तर केलें कीं, " कांहीं पदाखेरीज सलतनतीचा बंदोबस्त कसा होता ! " तेव्हां पातशहानें विसाजी कृष्णाच्या वेळची आठवण देऊन, तुम्ही पुनः आमच्या संरक्षणाची हयगय कराल अशी भीति प्रदर्शित केली. तेव्हां शिंदे म्हणाले, " विना पद दिल्या खेरीज चोघावर दाब बसून सलतनतीचा बंदोबस्त हि होणार नाहीं. " शेवटीं पातशहानें असें बजावलें कीं, " तुम्हांकडे पद सांगावें, आणि वजीर व इंग्रज आदिकरून सर्वांवर दबाव पडून सलतनतीचा बंदोबस्त व्हावा, ऐसा प्रकार घडला पाहिजे. त्यास श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचे नावें वकीलमुतलकी व मीरबक्षीगिरी हीं दोन्हीं पदें त्यांजकडे देऊन त्यांची नायबत आम्हीं तुम्हांस देतों. " पाटीलबावांनीं विनंति केली कीं, " आम्ही श्रीमंतांस विनंति लिहून पाठवितों. तेथून आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. " परंतु असें करण्यांत दिवसगत लागेल व बखेडा वाढेल याकरितां इ

श्रीमंतांना वस्त्रें देण्याचा व शिंद्यांना नायबतीचा खिलत देण्याचा समारंभ तावडतोब च उरकण्यांत आला.

याप्रमाणें दोन वर्षांपासून सारखी गाजत असलेली गोष्ट प्रत्यक्ष पडून आलेली पाहतां च, इंग्रज व शांस गडबडून गेले. हेस्टिंग्जचा शिंद्याविषयीं बरा च अनुकूल ग्रह होता. पण त्याला देखील शिंद्यानें दिल्लीस इतकें चांगलें बस्तान बसूं देऊं नये असें वाटूं लागलें होतें. याकरितां त्यानें शहाजादा जवानबख्त याची एप्रील १७८४ मध्यें भेट घेतली. कारण पातशहा शिंद्याच्या लगामीं असला तरी, शहाजादा आपल्या ताब्यांत राहिल्यास शिंद्याच्या मजबुतींत थोडेसें व्यंग राहील असा त्याचा अंदाज होता. परंतु शिंद्यानें व पातशहानें मिळून थोडें चापल्याबरोबर, हेस्टिंग्जनें शहाजाद्यास शिंद्याकडे पाठवून दिलें. हें हेस्टिंग्जचें कृत्य शिंद्याच्या चापण्या मुळें झालें, कीं त्यानें आपणहून शाहाजाद्यास जाण्यास सांगितलें या बद्दल संशय घेण्यास जागा आहे. शिंद्याच्या चापण्या मुळें हेस्टिंग्ज मऊ आला, असें कलकत्त्याचा नानांचा बातमीदार म्हणतो. पण दिल्लीचा वकील लिहितो, "दक्षिणी सरदारांचा आमचा सलूख जाला आहे, आणि त्यांचे मर्जी शिवाय त्यांशी बदसलुकी करून पातशाहाजाद्यास विना त्यांची मर्जी घेऊन आला, ठीक नाहीं. तर, देखत पत्र पातशाहाजाद्यास माघारा राजश्री पाटीलबावापाशीं विदा करणें. ते पातशहास विनंति करून, पातशाहाजाद्याची तकसीर माफ करून, त्यांचे स्वाधीन करतील. तुम्ही या बखेड्यांत न पडावें म्हणून लिहिलें होतें, असें विलायतचें हेस्टिंगास पत्र आल्यामुळें त्यानें पातशाहजाद्या समागमें दोन पलटणें देऊन, राजश्री सदाशिवपंत बक्षी, राजश्री पाटीलबावांकडील, यांज समागमें विदा केले. व ते लखनउस आले." हा प्रकार १७८४ नोव्हेंबर महिन्यांत घडला.

तथापि पाटिलबावांना दुखवूं नये अशी हेस्टिंग्जची खरोखर च इच्छा होती असें दिसते. १७८४ च्या एप्रील २२ तारखेस वॉरन हेस्टिंग्जनें लखनौ येथून जो खलीता लिहिला आहे, तो हि फारेस्टच्या निवाड्याच्या पुस्तकाच्या १०९० पृष्ठावर दिलेला आहे. त्यांत पुढें दिलेलीं वाक्यें आहेत.

It is impossible to say what effect an extraordinary or unexpected acquisition of power might have on the firmest mind, but if I may judge from all that has lately passed betwixt us and Sindia, from a general review of his conduct and character, and from every insight I have been able to acquire regarding the state of politics at Poona I am warranted in believing that Sindia has firmly connected his interests with ours, and looks to his

alliance with the English, as the surest means of preserving undiminished the power and independence which he now possesses. We must be cautious how we give way to suspicions. There are some situations in which precautions are necessary, but there are others, and this is perhaps one of them, in which the apprehension of danger often leads to measures which prove the means of drawing it on.

या हेस्टिंगरच्या वर्तनाबद्दल पार्लमेंटमध्यें मोठा कडाक्याचा वाद झाला, व हेस्टिंग्जनें पैसे खाऊन शिंदयाशीं हा तह केला असा हि कित्येकांनीं संशय घेतला. परंतु, ' या वेळीं मराठ्यांशीं बिघाड केला असता तर माझी गणना वेड्यांत करावी लागली असती ' अशा अर्थाचें त्यानें दिलेलें उत्तर च खरें वस्तुस्थिति निदर्शक आहे असें वाटतें. या नंतर एक वर्ष, जयपूरचा रावराजा, माचेडीवाला व रणजितसिंग जाट यांचा बंदोबस्त करण्यांत गेलें. हें काम सावकाशीनें होण्याचें कारण, पाटीलबाबाबरोबर दक्षिणी फौज फार थोडी आहे, असें वकीलानें पेशव्यांकडे वारंवार कळविलें आहे. तथापि शत्रि लोकांत एकजूट नसल्यामुळें 'लाहोरापावेतों अंमल दूसऱ्यापावेतों होईलसा प्रकार आहे ' असा त्यानें अंदाज लिहिला आहे.

पाटीलबाबा महत्वाकांक्षी असल्यामुळें त्यांच्या हातून संशय घेण्याजोगीं अनेक कृत्यें झालीं आहेत. त्यांपैकीं एक येथें सांगण्याजोगें आहे. पातशाहाकडून वकील मुतलकीच्या व मीरबक्षीगिरीच्या सनदा पेशव्यांच्या नांवें घ्यावयाच्या असें जाहीर झालें होतें, तरी पातशाहानीं चार सनदा तयार करविल्या. दोन पाटीलबावांच्या नांवें, व दोन श्रीमंतांच्या नांवें; आणि तुम्हांस वाटेल तर स्वतः-च्या नांवें शिक्का खोदवून कारभार करा अगर श्रीमंतांच्या नांवें शिक्का करा, असें पाटीलबावांस कळविलें. पाटीलबावांनीं आठ नऊ महिने आपल्या च नांवचा शिक्का चालविला. ही गोष्ट पेशव्यांना आढळल्यावरून त्यांची मर्जी नाराज झाली. तेव्हां पाटीलबावांनीं शिक्का बदलून पेशव्यांच्या नांवचा केला.

यानंतर लौकर च म्हणजे १७८५ मे १ तारखेस, दरबार भरवून पाटीलबावांना पंतप्रधान स्वामी यांचे नायबनीचीं मुखत्यारीचीं वस्त्रें अर्पण करण्याचा जंगी व थाटाचा समारंभ झाला. या पदवीचें महत्व कळण्यासाठीं पेशव्यांचा वकील लिहितो, " पादशहाजाद्यानीं देखील आपले कामासाठीं यांचे घरास जावें, चिंता नाहीं. याप्रमाणें आहे " तथापि, " राजश्री पाटिलबाबापासी फौज थोडी आणि सारें हिंदुस्थानचें काम भारी. मुखत्यारीचा कारभार म्हणिजे पातशाहाचे प्रतिनिधी. वजिरास व मीरबक्षीस वगैरे ज्यास ज्या समयीं च्याहतील त्यास दूर करतील, अथवा ज्यास च्याहतील त्यास बहाल करतील, ऐसा प्रकार आहे. त्यास या प्रकारासी आणि यांजपासी फौज आहे या सामानासीं ठीक नाहीं ", असा स्पष्ट इषारा दिला होता.

शाहाजादा इंग्रजाकडे मदत मागण्यासाठीं गेला होता. परंतु हेस्टिंग्जनें त्याला शिंद्याकडे बोट दाखविलें, हें सांगितलें च आहे. त्यानें निरुपायानें ही गोष्ट कबूल केली पण त्याप्रमाणें तो शिंद्यांच्या भेटीस आला नाहीं. नंतर लौकर च हेस्टिंग्ज विलायतेस गेला. तेव्हां शाहाजाद्याला इंग्रजाच्या मदतीची पुनः आशा वाटूं लागली. खुद्द इंग्रजांत याबद्दल दुमत होतें च. लखनौचा रेसिडेंट पालमर १७८५ मध्यें लिहितो, "Shah Alum is growing old and lethargic, the interests of the Company seem bound up in those of the heir-apparent. Whilst he remains under British influence the usurpation of Sindia is incomplete and so long as that is so a great danger is avoided" तथापि शिंद्यास उपटसुंभ म्हणून, व म्हाताऱ्या बादशाहापेक्षां तरणा शाहाजादा आपल्या ताब्यांत आहे, तेव्हां शिंद्याच्या वैभवास गालबोट लावल्याचें श्रेय आम्हांस आहे, असें सुचविण्याऱ्या पामराचें हें बोलणें ' द्राक्षें आंबट ' म्हणणाऱ्या कोल्ह्याच्या समाधानासारखें भासतें. शहाजाद्यास यापेक्षां जोराचा पाठिंबा पाहिजे होता. तेव्हां त्यानें पातशहाचें च मत पाटीलबावां विरुद्ध बनविण्याचा प्रयत्न केला, व त्या कामीं त्यास थोडें बहुत यश हि आलें.

शाहाअलम स्थिरबुद्धीचा पुरुष नव्हता. त्यांतल्या त्यांत मुलाचें बोलणें त्याला बरें वाटलें म्हणून असो, किंवा पाटीलबावांच्या सहवासाचा त्याला इतक्यांत कंटाळा आल्यामुळें असो, त्यानें इंग्रज, वजीर व शाहाजादा यांजकडे फितूरीचीं पत्रें पाठविलीं. त्यांत असें लिहिलें होतें कीं, "सर्व दिल्लीप्रांत, आगरे व डीग वगैरे पाणिपत पावेतों, याणीं मुलूख आपले काबूंत घेतला. एक रामगड उर्फ अलीगड मात्र राहिला आहे. त्यास हा हि त्यानीं घेतला म्हणजे सर्व मुसलमानीचा क्षय झाला. याजकरितां तुम्ही सर्व जलद येऊन, आलीगडवाल्यासीं कुमक करावी हें ठीक आहे. "

हा फितूर ध्यानांत येतां च, पाटीलबावांनीं मथुरेहून, दिल्लीपासून पस्तीस कोसांवर असलेल्या सेरगडपर्यंत कुच केलें व पातशहास तावडतोब दिल्लीहून आपणाजवळ येण्यास लिहिलें. इतकी खबरदारी घेण्याचें कारण, या वेळीं म्हणजे १७८५ च्या आक्टोबर मध्यें राघोगड, रामगड, जयपुर व पाणिपत अशा चार दूरदूरच्या ठिकाणीं प्रत्यक्ष युद्ध सुरू होतें. यामुळें पाटीलबावांची फौज चार ठिकाणीं वांटली गेली होती. तथापि पातशाहाच्या या व्यूहापासून कांहीं च निष्पन्न झालें नाहीं. कारण इंग्रजांना दक्षिणेंत यावेळीं फार मोठा पेंच पडला होता. त्यांत पुन्हां मराठ्यांना डवचून आणखी भर पाडणें शहाणपणाचें नाहीं, असा कार्नवालीसचा अभिप्राय होता.

तथापि, पाटीलबावांच्या एकट्याच्या हातून दिल्लीचा कारभार आटपणार नाहीं असा, पेशव्यांचा वकील गोविंदराव पुरुषोत्तम याचा अभिप्राय होता. त्याचा मतें पुण्याहून अधीक सैन्य रवाना झालें पाहिजे; कारण, "दिल्लीची पातशाहात आपले हातीं

लागली आहे. या पातशाहास एक रोग विलायतेचा मात्र आहे. त्यास पन्नास हजार स्वारप्यादा दिल्लीस राहून, अटकेचे दऱ्याचा व कशमीरचे सुभ्याचा बंदोबस्त करून तेथील मजबुती राखल्यास, चहूंकडे दाब बसून पैसयास काही कमी नाही. सबलग पैसा दृष्टीस पडून सल्तनतीचा बंदोबस्त होईल. नाहीं तर, इंग्रेज रिकामा जालियावर, तो अथवा शीख कोण्ही विलायतेचा सरदार येऊन दिल्लीत बसल्यास, मग आपल्यास च भारी पडेल. त्यास, जो बंदोबस्त व फौजेचें बल करणें तें मसलत करावें. नाहीं तर, राजश्री विसाजीपंत धुळीवरील सारवण करून गेले आणि मागें नजबखान बळावला, आणि इटावा वगैरे दरोबस्त अंतरवेद वजीरानें घेतली, तेसा प्रकार होऊं न पावे. तें आपण करतील."

हा इषारा अत्यंत समयोचित होता. कारण, त्याप्रमाणें यावेळीं तर्थांत मराठी सैन्य तिकडे जाऊन एकजुटीनें काम झालें असतें तर, पाटीलबावांवर वर्ष दीडवर्षांत जो भयंकर प्रसंग कोसळला तो कदाचित् कोसळला नसता. लालसोटच्या लढाईंत पाटिलबावांचा झालेला पराभव जरी त्यांनीं हिंमतीच्या जोरावर कसाबसा झाकून टाकला, तरी खरें पाहतां त्यांचें बस्तान यावेळीं जें बिघडलें तें शेवटपर्यंत चांगलेंसें सुधारलें नाहीं. आणि वरील पत्रांत गोविंदरावानें सुचविल्याप्रमाणें एकंदरींत पाटिलबावांचा कारभार म्हणजे 'धुळीवरील सारवण च' ठरलें.

असें होण्याचें कारण, पाटीलबावांनीं चोहींकडे एका च वेळीं हात घातला, मराठी फौज भरपूर ठेवण्या ऐवजीं हिंदुस्थानी फौजेवर जास्त भिस्त ठेवली व सर्व राजे रजवाड्यांना व संस्थानिकांना खंडणीबद्दल फार च निकड लावली. या संस्थानिकांना अलीकडे कित्येक वर्षांपासून पातशहाकडे खंडणी देण्याची सुरीं च सवय नव्हती; आणि पाटिलबावानीं तर मागील बाकी सुद्धा खंडणी तांबडतोब देण्या बद्दल तगादा लावला. यामुळें त्यांना यांच्यावर उलटण्या वांचून गत्यंतर राहिलें नाहीं. उदाहरणार्थ, जयपुरकराकडून रावराजा प्रतापसिंग खंडणी प्रकरणासाठीं आला होता. त्याचे आगतस्वागत पाटीलबावांनीं यथास्थित केलें व सन्मानाचीं वस्त्रें वगैरे भरपूर दिलीं. आणि प्रत्यक्ष मामल्याच्या प्रश्नास सुरुवात होतांच, "तीन करोड चाळीस लक्ष रुपये यांजकडे बाकी व हालाचा मामला आहे" असें त्यास सांगण्यांत आलें. तेव्हां प्रतापसिंग आश्चर्यचकित च झाला आणि म्हणाला, "इतके दगड देखील आमचे हवेलीस नाहींत. मग पैका कोठून यावा!" तेव्हां पाटीलबावांनीं संतापून जयपूरच्या वकिलास लष्करांतून मार्गस्थ करण्याचा हुकूम सोडला. तथापि, उघड बिघाड करून निघून जाणें बरें नाहीं असें या वकीलास वाटल्यामुळें, त्यानें हातापायां पडून साठ लक्षांची तडजोड केली. व त्यापैकीं फक्त तीन लक्ष रुपये मात्र रोख दिले व बाकीचे पाठवितों असें सांगून, आठ दिवसांच्या बोलीनें तो जयपुरास गेला, तो गेला. परत त्यानें तोंड दाखविलें नाहीं.

या च सुमारास शिख व मुसलमान पाटिलबावा विरुद्ध एक झाले. जहांगीरखान नांवाच्या सरदारानें, लखनौस वजीराकडे व इंग्रजाकडे असा निरोप पाठविला होता कीं, " श्रीगंगे अलीकडे हिंदूंचें राज्य जालें, मुसलमानी बुडाली. आम्ही आज पावेतों मुसलमानीचा तगमा जतन करून आहोंत. आमची कुमक करता तर उत्तम आहे. नाहीं तर आम्हांस सुचेल त्याप्रमाणें करूं. " या वेळीं नानांनी पाटीलबावांकडे मुद्दाम मनुष्य पाठवून कांहीं गोष्टी सुचविल्या. त्या पैकीं एक महत्वाची असल्यामुळें येथें देतों.

" हिंदुस्थानचे मसलतीचा प्रकार, एकरोखे मसलत करावी. चोहोंकडे मसलतीवर लांब फौजा फांकल्या म्हणजे समयास सारी फौज जवळ असत नाहीं, व हिंदुस्थानचे फौजेवर केवळ विश्वसूं नये," असें नानांनीं राघोबल्लाळा मार्फत सांगून पाठविलें होतें. त्याचें उत्तर पाटीलबावानीं असें दिलें कीं, " प्रसंग पडल्यास मार्गे पुढें पाहतां येत नाहीं. खेचींनें लबाडी केली, तेव्हां त्याचें पारपत्य करणें प्राप्त जालें; न करावें तर नक्षा जातो, व दुसरे हि लबाडी करू लागतील. यास्तव त्यांचे पारपत्य करणें प्राप्त जाहालें, व बुंदेले यांचे घरांत कलह प्राप्त जाहला, तेव्हां त्याचा बंदोबस्त करावयासी फौज पाठवणें पडली व सिकाच्या तोंडावर फौज पाठवणें आली. जें करणें तें प्रसंग पाहून च करणें लागते. हिंदुस्थानी फौज हजरता कडील चाकर. न ठेविल्यास दुसरीकडे जाऊन, चाकरीस राहून, फितूर फायदा करून बखेडा करू लागतील व हजरतीस हि बरें वाटणार नाहीं. यास्तव फौज व पलटणें सुद्धां ठेयणें प्राप्त जाली.× "

हीं उत्तरें प्रत्युत्तरें चाललीं होतीं तरी पाटिलबावा व नाना यांचीं मनें परस्परांबद्दल शुद्ध नव्हतीं. विकल्प न वाढावा म्हणून, नाना मुद्दाम मनुष्य पाठवून हरएक वर्तमान कळवीत असत. तथापि, नाना तिकडील वर्तमान आपणास कळूं देत नाहींत अशी पाटिलबावांनीं यावेळीं तक्रार केली आहे. आपाजीराम दाभोळकरा जवळ राजश्री पाटीलबावा एकदां म्हणाले कीं, " राजकारणी कारभार. यांजला परस्परें वर्तमानें समजलीं पाहिजेत. आम्ही इकडे मसलतीवर आहों. पातशहाचा कारभार गळां पडला आहे. फिरंगी व वजीर संधी पहात च आहेत. कांहीं कमती पडल्यास दिल्लीचा कारभार आपण साधावा. पहिल्यानें कारभाराच्या मोहोऱ्यानें इमीन ( अप्टन ? ) आला होता, तें साधलें नाहीं. तें त्यांचें चित्तांत आहे. परंतु तहाची संधी सलामती पाहोन मग कर्तव्य तें करावे ऐसें त्यांचें चित्तांत आहे. सीख, जैपूरवाले व मारवाडी हे हि तिथे सभोंवते आहेत. तथापि युक्ती प्रयुक्तीनें व दाबानें आज पर्यंत पाऊल कमती पडों दिलें नाहीं. पुढें हि श्रीमंतांचें पुण्येकरून पडणार नाहीं. परंतु मसलतीस दुरोख शह पडले आहे. इकडील मसलत या प्रकारची आहे. तिकडील मसलत तों भारी प्राप्त झाली

---

× ऐ. टि. भा. २ पृ. ८८.

आहे. यास्तव कळें वर्तमान समजण्यांत यावें. त्यास राजश्री गोविंदपंत वकील, राजश्री नानास पुसावयासी जातात. त्याजला निखालस वर्तमान सांगत नाहीं. त्याजमुळें गोविंदपंत लिहितात कीं 'राजश्री नानांस पुसिलें. नाना सांगतात कीं, एका दोहों दिवशीं पक्कें वर्तमान आलियावर सांगो, ऐसें सांगतात.' परंतु निखालस पहिले वर्तमान सांगत होते, त्याप्रमाणें गोविंदपंतास सांगोन गोविंदपंताचीं पत्रें तपसिलवार येत नाहींत. सारांश, आमचे व राजश्री नानांचे भेटीस फार दिवस झाले, याजमुळें कागदपत्रांत व परस्परें कोणी सांगितल्यास, चित्तांत कल्प विकल्प आले असले तरी त्याची चिंता नाहीं. नानांची आमची भेट झाल्यानंतर निघोन जाईल. परंतु श्रीमंतांचे मसलती मध्यें कल्प विकल्प नसावे. कळें वर्तमान आमचें त्यास समजावें व तिकडील आम्हांस समजावें. याचें कारण, तिकडील मसलतीचा विचार पाहोन इकडे मसलत एखादी करावी लागते.* "

या च सुमारास इंद्रसेन, पाटीलबावा जवळून रुसून गेला. याचें तात्कालिक एक कारण असें होतें कीं, इंद्रसेनानें आपले दोन नोकर फितुरी म्हणून दूर केले, आणि त्या दोघांस पाटीलबावांनीं आश्रय दिला, पण खरें कारण असें होतें कीं, जवानबख्त शाहाजाद्यास आग्र्याचा किल्ला व सुभेदारी द्यावी आणि त्यास आणून आग्र्यांत दाखल करावे म्हणून इंद्रसेनाच्या मार्फत जाबसाल चालला होता, तो पाटीलबावांनीं मान्य केला नाहीं. यामुळें रागास येऊन, लष्करांतून कूच करून तो आग्र्यास जाऊन राहिला. तो निघाला तेव्हां पाटीलबावा त्याच्या डेऱ्यास समजूत घालण्यासाठीं गेले होते. पण तो त्यांचें न ऐकता आग्र्यास गेला. या प्रकरणा बद्दल पाटीलबावांनीं एका पत्रांत असा उल्लेख केला आहे कीं, हा सर्व बहाणा आहे; इंद्रसेनाची बदली होणार अशी त्याला बातमी लागल्यामुळे तो गेला असावा व खरें कारण लोकांच्या लक्षांत येऊ नये म्हणून त्यानें हें ढोंग केलें असावें. या नंतर तो लौकर च परत हि आला. तें कसें हि असो, या दोघांचें स्वारस्य पूर्वी प्रमाणें राहिलें नव्हतें एवढें खरें.

याप्रमाणें निराश झालेला शाहाजादा बंडखोर मुसलमानी सरदारास चांगला उपयोगी पडला. नाजर मंजूर अलीखान नांवाच्या सरदारानें, वीस हजार स्वार त्याच्या ठेऊन पाटिलबावास दिल्लींत येऊं दिलें नाहीं. परंतु पातशहास त्याच्यानें पैसा देणं होईना, यामुळें त्याचें व नाजराचें वांकडे आलें; तेव्हां नाजरानें गुलाम कादरास वश करून घेऊन पातशहास कैद करण्याचा बेत केला. पातशाहानें, शाहाजाद्यास आग्र्याहून आणविलें; व जी सुभेदारी पाटीलबावांनीं देण्याचें नाकारलें होतें ती आग्र्याची सुभेदारी त्याला दिली. तेव्हां शाहाजाद्यास उमेद येऊन, त्यानें " अवघी यवन मंडळी मिळून राजश्री पाटिलबावांस चमेली पार करून द्यावे " अशी हिंमत धरली.

अशा प्रकारें चोहींकडे रंग जमूं लागलेले पाहून आकाश कडाडणार असा गोविंदरावानें अंदाज केला व पुनः एकवार पुण्यास इषारा दिला. हिंदुस्थानी फौज

---

* ऐ टि. भा. ५ पृ. ३१.

टेऊन, वरील अधिकारी जर मराठी असते तर पाटिलबावांचे करणें कदाचित इतकें अंगलट आलें नसतें. पण यांनीं आपला दिवाणी कारभार व लष्करी हुद्यांचीं कामें देखील मराठ्यां कडून काढून, रांगडे व हिंदुस्थानी लोक यांजवर सोपविण्यास प्रारंभ केला. कारण काय तर, आपले सरदार श्रीमंती थाटानें राहतात, तेव्हां ते कारभारांत चरा च पैसा खात असावेत असा त्यांना संशय आला होता.

खंडोजी इंगळे व रामजी पाटील यांनीं राघोगडच्या किल्लेदारास जेरीस आणून किल्ल्यांतून बाहेर काढलें व नंतर त्याच्याशीं सामोपचाराच्या गोष्टी करून, गुन्हा माफ करवून देऊं असें आश्वासन दिलें. परंतु पाटीलबावांना ही गोष्ट कळतां च ते अतिशय संतापले व राघोगडवाल्यास मारून टाकण्यासाठीं अंबाजी इंगळे यास मुद्दाम रवाना केले.

माधवराव गंगाधर नांवाचे एक गृहस्थ पाटीलबावाकडे दिवाणी कारभार करीत असत. त्याजकडे त्यांनीं कांहीं कर्जाऊ रक्कम मागितली. तेव्हां तो म्हणाला, " कार्तीकमासीं दीड लक्ष रुपये बुडते दिधले. आता आणीक पैका मागता ! तेव्हां आपल्याकडे एखत्यारीचा कारभार सांगितल्यास आपणास कोणी पैसा देईल. नाहीं तर आम्ही कोठला द्यावा ! " तेव्हां या उत्तरा बद्दल पाटीलबावांना भारी राग आला व ते म्हणाले, " मी एका घटकेंहातून दिवाणगिरीचें काम घेईन. मजला दिवाण कशास पाहिजे ! " असें नुसते बोलून च स्वस्थ बसले नाहींत तर माधव गंगाधराची दिवाणगिरी काढून, बाळाजी सखदेव म्हणून वीस वर्षांचा एक मुलगा, कारकून होता त्याजकडून हिशेबाचें काम घेऊं लागले व आपण च सर्व दिवाणगिरीचें काम करूं लागले. बिचाऱ्या माधवरावास तर प्रत्यक्ष वेड च लागलें. या च वेळीं जिवबादादा बक्षी सारख्या शूर सेनापतीवर गैरमर्जी करून पाटीलबावांनी त्याला कैदेंत टाकिलें.

तात्पर्य, १७८७ च्या फेब्रुवारींत, दिल्लीच्या स्थितीबद्दल मुग्ध राहणें अगर गुळमुळीत शब्दानें सुचविणें दोषास्पद होईल असें वाटून, दिल्लीच्या पेशव्यांच्या वकीलानें असें लिहून कळविलें कीं, " येथील वर्तमान तरी, कोणी मुत्सद्दी नाहीं. कुलकारभार जातीवर च चालतो. फौज राजी नाहीं. तोफखाना व पलटणें आहेत. यांचा भरंवसा नाहीं कीं, झुंजाचे समयीं एक वार बंदुकीचा काहाडतील. याप्रमाणें माणूस मात्र जे आहे(त) ते दिक आहेत. एक श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे प्रतापेकरून जें होणें तें होईल. वरकड अर्थ फौजेचा व मुलकी आबादींचा, सर्व ईश्वरेच्छा च आहे !"

सैन्यांतील बक्षीगिरीचें काम नोबतराय खत्री म्हणून आग्र्याचा एक हिंदुस्थानी गृहस्थ होता त्याजकडे सांगितलें. पलटण व तोफखाना नोबतरायाकडे दिला यामुळें सर्व दक्षणी माणसें हवालदील झालीं.

शिवाय इंग्रजांविषयीं देखील बऱ्या च चिंता करण्याजोग्या बातम्या उठल्या. ते जैपूरकरास मदत करणार व शाहाजाद्यास घेऊन दिल्लीस येणार, असे बातमीदार

सांगूं लागले. खुद्द पातशहानें, इंग्रज दिल्लींत येणार असें पाटीलबावांस लिहिलें तेव्हां, त्यांनीं लाडोजी शिंदे व शाहानिजामुद्दीन यांस ससैन्य दिल्लीस पाठवून, "पातशाहा इंग्रजाकडे कागदपत्र न पाठवीत व त्यांचे व इंग्रजांचे वकीलाचें एकांतीं बोलणें न होय, फितूर न करीत, ऐसा बंदोबस्त करून असावें" असा हुकूम देऊन, पाटिलबाबा स्वतः जेपूरचा बंदोबस्त करण्यासाठीं निघाले. पातशहाची इच्छा अशी होती कीं, पाटीलबावांनीं जेपुराकडे स्वतः जाऊं नये. परंतु त्यांचा निश्चय झाल्यावर ते कोणा-चा हि सल्ला ऐकत नसत. ते जेपुराजवळ गेले. तेव्हां जेपुर व जोधपूर एक झाली. त्यांचा पस्तीस हजार सैन्याचा जमाव झाला. महमद् बेग हमदानी त्यांच्या मदतीस आला तेव्हां पाटीलबावांना मार्ग म्हणें भाग पडलें. या वेळीं जोधपूरकरा कडून निरोप आला कीं, " हे दोन्ही राज्यें हिंदूंचीं आहेत. आज पावेतों यवनानीं देखील यांस खिपडलें नाहीं. त्यास तुम्ही हिंदू आहांत, आणि आम्ही हें च इच्छितों कीं, हिंदूंचें राज्य व्हावें, आणि आमचे स्थळाचें संरक्षण व्हावें हे इच्छा आहे. त्यास, तुम्ही आम्हांस राज्यभ्रष्ट करता, हें ठीक नाहीं. आपले खंडणीचा ऐवज घेऊन आपले राज्यांतून फौज काढावी. " जेपूरकर देखील सहा लक्ष रुपये खंडणी देण्यास तयार होता. परंतु पाटीलबावांना कोणती च सामोपचाराची गोष्ट मानवेना. जेपूरकरांस चांगला च हात दाखविला पाहिजे, असा जो त्यांनीं एक वेळ निश्चय केला होता तो त्यांना शांत मनानें परिस्थितीचा विचार करूं देईना. पण मारवाड्याकडे सात हजार सिंधी मदतीस आले, व पाटीलबावांकडील कांहीं पलटणें फितूर होऊन तोफासुद्धां उठून गेलीं. तथापि इतक्या हि अडचणीस न जुमानतां त्यांनीं लढाई दिली व राठोडाचा मोड केला. महमद् बेग हमदानी हा तोफेचा गोळा लागून ठार झाला. परंतु १७८७ जुलै २८ तारखेस झालेल्या या लढाईत यश आलें तरी, राठोड देखील जिवावर उदार झाले होते व पाटीलबावांचीं पलटणें फितूर झालीं होतीं. यामुळें हें यश तात्कालिक ठरलें. या लढाई नंतर सहा च दिव-सांनीं आठ पलटणाच्या कुमेदान व जमादार वगैरे लोकांनीं सहा महिन्यांची बाकी तुंबली होती त्याबद्दल दंगा केला. पाटीलबावांनीं आमचास गेल्यावर बाकी चुकती करीन असें सांगून पाहिलें. पण पलटणवाले व गोलंदाज यांना तें पटलें नाहीं व ते १०३ तोफा व दारूचे व गोळ्यांचे छकडे वगैरे साहित्य होतें तें घेऊन जेपूरकरास मिळाले. अर्थात् यानंतर पाटीलबावांना परत फिरण्यावांचून मार्ग च राहिला नाहीं. ते भुसावरावरून डीग येथें आले. हें पाहून विरुद्ध पक्षास जोर आला. चहूंकडे गव्हार गर्दी झाली व गुलाम कादराची हालचाल सुरू झाली.

इकडे दिल्लीची बाजू देखील अशी च अंगावर आली. लाडोजी शितोळे यास दोन पलटणें देऊन पातशाहाच्या तैनातीस ठेवले होते. तो त्याला इकडे तिकडे फिरकूं देईना. या मुळें पातशाहा कंटाळला. इतक्यांत शितोळ्याच्या पलटणवाल्यांनीं मोठा दंगा केला. देशमुखास जीव बचावण्यासाठीं हवेलीचा दरवाजा बंद करून बसावें लागलें. शेवटीं शाह्य निजामुद्दीन म्हणून पातशाह्याचा कारभारी होता, त्यानें तात्पुरता

३

शहराचा बंदोबस्त केला. पण गुलाम कादर मोठें सैन्य जमवून अंतरवेदींतून मराठ्यांचा अमल उठवून दिल्ली जवळ आला. हें ऐकतांच लाडोजी देशमुख पातशाहास न विचारतां रात्रीं दिल्लींतून पळून गेला. त्याचें घर लोकांनीं लुटलें. गुलाम कादर पातशाहास भेटून मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें मागू लागला.

या वेळचें वर्णन करतांना, १७८७ सपटेंबर ४ तारखेच्या पत्रांत, गोविंदराव पुरुषोत्तम लिहितो "पाणिपतापासून आगरिया पावेतों मुलूख होता, तो दरोबस्त ठाणीं उठोन पळून गेलीं. अवघ्या मुलखांत मराठा दृष्टीस न पडावा, ऐसी बदआमली जाली. राजश्री पाटिलबावांनीं आपलीं कुटुंबें व तोफखाना व नौबतखाना वस्तभाव सर्व ग्वालेरीस वाटे लाविलीं. त्याजवरून जितकी हिंदुस्थानी फौज होती, ते हिरासा होऊन त्याजपासोन उठोन दिल्लीस आली. कांहीं थोडे बहुत लोक राहिले आहेत. त्यास तमाम जखाडांतील महाल व अंतरवेदींतील लाऊन दिल्हे. जसा मुलूख मेळाविला होता. तैसाच गमाविला! कांहीं राहिला आहे, तो ज्या जबरदस्ताचा हात पोहोचला, त्यानें जप्त केला. याप्रमाणें चहूकडे गव्हार गर्दी जाली आहे."

दिल्लीस गुलामकादरास मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें देण्याचें पातशाहाच्या मनांत नव्हतें. पण त्यानें एक दिवस जरा उग्र स्वरूप दाखवितांच, पातशहानें त्याच्या सर्व गोष्टी कबूल करून त्याला वाटेस लावलें. आणि पेशव्यांच्या वकिलाला म्हणाला कीं, मी नको म्हणत असता, पाटीलबावांनीं तोफखान्याचा व पलटणाचा भरणा फार केला व शेवटीं पुरभयानीं दगा दिला. लाडोजी देशमुख आम्हांस न विचारता भिऊन पळून गेला, वगैरे तक्रार करून, त्यानें पंत प्रधान यांस निरोप पाठविला कीं, "ज्या समयीं जो सरदार फौजेसुद्धां येईल, त्याचें घर आहे. राजश्री महादाजी शिंदे उगीच आम्हांकडील कांहीं नालीश लिहितील. ते खातरेस न आणावी. तुम्हां खेरीज आम्हांस खैरख्वा दुसरा नाहीं." तथापि, एक महिन्याचे आंत ही परिस्थिती बदलून, पातशाहास पाटिलबावांकडे मदतीसाठीं चिठ्या पाठविणें भाग पडलें. गुलामास बक्षीगिरीचीं वस्त्रें मिळालीं; तेव्हां तो कांहींसा खुष झाला. पण पातशाहाच्या बहिणीनें त्याला बारा लक्ष रुपये देऊं करून आपल्या एका भावास पातशहा करावा, असें पत्र पाठविलें. तें पत्र पातशहाच्या हातीं लागलें, तेव्हां गुलामाचें व पातशहाचें युद्ध जुंपलें. पातशहानें पाटिलबावांस 'दिल्लीस येणें नाहीं, तर कांहीं फौज पाठविणें' म्हणून पत्रें पाठविलीं. परंतु गोविंदराव आपल्या बातमीपत्रांत म्हणतात त्याप्रमाणे, "या दोन्ही गोष्टींतून एक हि गोष्ट प्रत्ययास न आली. त्यांजपासी फौज च नाहीं. मग फौज कोठून पाठविणार? त्यांस तों रजपुतांचा शह सोडून येतां न ये, आणि पातशहास तर फौजेची गरज." तेव्हां त्यांजकडून नजबकुलीखान, इस्माइलबेग, अनुपगीर गोसावी व इंग्रज यांजकडे फौज पाठविण्याबद्दल पत्रें गेलीं.

या सुमारास, पाटिलबावा रेवाडी पाटोडीकडे होते. त्यानीं अंबाजी इंगळे यांस वकीलतीस पाठवून " गुलाम कादरखान यांनीं बेआदाई केली; म्हणोन यांचे पारप-

त्यास आम्हीं आलों आहोंत. त्यास जैसी मर्जी असेल तैसी वर्तणूक करूं", असा निरोप कळविला. परंतु त्याजकडून उलट असें उत्तर आलें कीं, " जुवाबक्ष पातशाहा व अनुपगीर गोसावी व इस्माइल बेग व राजे जयपूरकर वगैरे दिल्लीचे मोंगलिये ऐसे एक विचारें जाले आहेत. यांचें मानस कीं, तुम्हीं दिल्लीस न यावें. ते तुम्हांसीं सर्व दिक आहेत व फिरले आहेत. जर जबरदस्तीनें याल तर तुम्हांपासी फौज थोडी. व हे झुंजावयास सिद्ध आहेत. याजकारितां चार दिवस तुम्ही रेवाडी पाटोदीचें मैदानांत च असावें. पातशाहाजादा वृंदावन मथुरेस आहेत. त्यांस म्या बोलावलें आहे. तो मजपासी दाखल जालियावर मग तुम्हांस लिहून पाठवू. " हें लिहिण्यांत पातशहाचा हेतु दुष्टपणाचा नव्हता. पातशहा खेरीज दरबारांतील सर्व मंडळीच्या मनांतून पाटिलबावांना चमेलीपार घालवून यावें असें होतें, अशा वेळीं त्यांना दिल्लीस आणल्यास ते सर्व एक होऊन आपणास च दगा करतील व शाहाजाद्यास पातशाही देतील अशी त्याला भीति वाटत होती. म्हणून शाहाजाद्यास आधीं दिल्लींत आपल्या जवळ आणून ठेवावें असा त्यानें बेत केला. या नंतर गुलामाच्या व पाटिलबावांच्या सैन्याच्या अनेक चकमकी झाल्या. त्यांत बहुतेक मुसलमानांचा च जय होत असे.

या वेळची स्थिति वर्णन करतांना गोविंदराव लिहितो, " जितके हिंदुस्थानी मोंगलिये व राजे जैपूरकर व जोतपूरकर, या सर्वांचें मानस कीं, राजश्री पाटिलबावास अवघे एकत्र होऊन, चमेलपार करून यावें. व निदान बनल्यास व मऊ लागल्यास ग्वालेर प्रांत देखील खालीं करून घ्यावा. ऐसी सर्वांची मसलत आहे. व राजश्री पाटिलबावा यांचें मानस कीं, सर्वस्व वेचावें. परंतु जैपूरकरांचें व जोतपूरकरांचें पारिपत्य करावें. व पातशाहाचे घरची मुखत्यारी करावी. समागमें फौज राजश्री शिवाजी विठल आदिकरून पागनीस व अंबाजी इंगळे व पागे व शिलेदार वगैरे मुत्सद्दी हे सर्व नामा फकत. कोणाची हि चित्तशुद्धता नाहीं. सर्व दाबाखाले व मर्जानुरूप आचरण करून आहेत. याचें कारण हें च कीं, खुद्द पसंतीनें आजपावेतों जो कारभार करणें तो केला. पुढें हि खुद्द पसंतीनें करतात. कोणाची सल्ला मसलत पसंत पडत नाहीं. म्हणोन मंडळी मनोमय भिन्न आहेत." दिल्लीचा बंदोबस्त आपल्या हातून न झाल्यास "सर्व बुडवून आपण बुडावें. परंतु दुसऱ्याचा पाय, दक्षण्याचा, हिंदुस्थानांत शिरूं देऊं नये. ऐसी यांची मर्जी आहे " असें हि गोविंदराव लिहितो !

आतां, शेवटीं १७८७ ऑगस्ट १५ तारखेस, पाटिलबावांनीं च आपल्या या चार वर्षांच्या कारभाराचें थोडक्यांत समालोचन, अहिल्याबाईकडे पाठविलेल्या एका पत्रांत केलें आहे. त्यांतील उतारा देऊन मी हें प्रकरण पुरें करतों. ते म्हणतात, "गोहदचे मसलतीमुळें पेंचांत येऊन कर्जदार जाहालों. पुढें पातशाहाची मसलत पडली. इंग्रेज पातशाहास आपलेकडे घेत असतां, चंमल उतरोन जाऊन, अमदानीचें पारपत्य करोन पातशाहाचा बंदोबस्त केला. सार दुवलतीचा खर्च त्याचा घालून,

आपले फौजेस हि सांभाळून, राजरजवाडे यांचीं पारपत्यें केलीं. त्यामुळें, इंग्रज वगैरे सर्वांस असह्य जाह्लें. पुढें जयपूरचे मसलतांस दोन वर्षे लागलीं. त्यांत घरचे फितुरामुळें लढाई फत्ते केलेली, विलग जाह्लें. याजकरितां माघारें येऊन, कुटुंब ग्वालेरीस पाठवून दिलें. पुढें जमाव करून रांगड्यांचें पारपत्य करावें हाच इरादा. परंतु फौजेखेरीज होत नाहीं. याविषयीं देशाहून फौज आणविली, त्यास ऐवज रवाना करावा तर ओढीचा प्रसंग. दोन वर्षे या मुलखांत आपत पर्ज्यन्याची जाह्ली. त्या करितां मुलखाचा पैसा आला नाहीं. सावकारास ऐवजा करता म्हणावें तर, सावकार, इतबार या समयास करीत नाहींत. पातशाहींत पाय आमचा पाय शिरकला, त्याजकरितां वजीर वगैरे रांगडे व इंग्रेज सारे एक च जाह्ले आहेत. तुम्हांकडून ऐवजाची सरबरा व फौज व पेंढारी यांची तरतूद लौकर व्हावी. पूर्वापार वडिलावडिलांस मसलती पडल्या, तेव्हां परस्परें साहित्य जाह्लें आहे. फौजे विषयीं व ऐवजा करितां देशीं कारभारी यांस लिहिलें आहे. त्यांजकडून साहित्य होणें, येणें तें येईल. परंतु तूर्त तुम्हीं ऐवजाची व फौजेची रवानगी लौकर करावी." तथापि, कारभाऱ्यांची मदत पुण्याकडून येऊन पोंचण्या पूर्वी, आपण पुनः घडी बसविली पाहिजे अशी त्यांची महत्वांक्षा होती व त्यांनीं अखेर त्याप्रमाणें करून हि दाखविलें, हें येथें सांगितलें पाहिजे.

या हकीकतीवरून, पाटिलबावांच्या स्वभावांतील एक दोन विशेष गोष्टी लक्षांत येण्याजोग्या आहेत. पहिली ही कीं, ते अत्यंत आग्रही किंबहुना हट्टी स्वभावाचे होते. ग्वाल्हेरचा किल्ला घेतल्या पासून जेपूरकराशीं युद्ध होई पर्यंत प्रत्येक ठिकाणीं, केवढी हि हानी झाली तरी आपलें च मत ते चालवीत असत. यामुळें अत्यंत उमेदीनें म्हणून जी स्वारी त्यांनीं हातीं घेतली, तिच्या पायीं चार वर्षांनीं, ते अतिशय निराशाजनक परिस्थितींत जाऊन पडले. पण पाटीलबावांची थोरवी ही च कीं, ते या हि परिस्थितींत बिलकुल डगले नाहींत. यांतून देखील थोड्या च दिवसांत मी आपलें डोकें वर काढून दाखवितों असें सांगून, त्यांनी डिभाई वगैरे भाडोत्री सेनापतींना धीर दिला आणि त्या बोलण्या प्रमाणें अखेरीस करून दाखविलें. दुराग्रही व निश्चयी माणसांत अंतर हें च कीं, चालता काळ असे पर्यंत, एक आपला हट्ट चालवितो व आपली इमारत ढासळूं लागली म्हणजे लोकांना दोष देत किंवा हताश होऊन स्वस्थ बसतो. पण, दुसरा, पडत्या काळांत देखील, यशा प्रमाणें च अपयशाची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन, बिघडलेली घडी बसविण्यास मोठ्या उत्साहानें झटतो. तेव्हां पाटिलबावांचा हा जो एक दोष होता, तो बहुतेक मर्द व कर्तबगार माणसांत असल्यामुळें, तिरस्करणीय नसून कौतुकास्पद होता एवढें मला सांगावयाचें आहे. अशा माणसांना जो आश्चर्यकारक आत्मविश्वास असतो, तो त्यांना कोणतें हि पाऊल निश्चयानें टाकण्यास लावतो. यामुळें त्यांच्या धोरणांत चालढकल किंवा लेचेपेचेपणा कोठें हि नसतो. अर्थात् अपयश आलें तरी ते शहाणे बनतात व सुकाणू धरण्यांत जी थोडीशी चूक झालेली असते ती ते सुधारतात आणि आपलें तारूं इच्छित प्रदेशीं नेतात. तथापि, हा भाग उत्तरार्धा पैकीं असल्या मुळें तूर्त मला येथें च थांबणें प्राप्त आहे.

दत्तात्रय विष्णु आपटे.

## तक्ता

| | | | |
|---|---|---|---|
| इसन्ने संमानीन | जमादिलाखर (१२) | ज्येष्ठ १७०३ | मे व जून १७८१ |
| | रज्जब | आषाढ | जून, जुलै |
| | साबान | श्रावण | जुलै, ऑगस्ट |
| | रमजान | भाद्रपद | ऑगस्ट, सप्टेंबर |
| | सवाल | अश्वीन | सप्टेंबर, आक्टोबर |
| | जिल्काद | कार्तिक | आक्टोबर, नोव्हेंबर |
| | जिल्हेज | मार्गशीर्ष | नोव्हेंबर, दिसेंबर |
| | मोहरम | पौष | दिसेंबर, जानेवारी १७८२ |
| | सफर | माघ | जानेवारी, फेब्रुआरी |
| | रबिलावल | फाल्गुन | फेब्रुआरी, मार्च |
| | रबिलाखर | चैत्र १७०४ | मार्च, एप्रील |
| | जमादिलावल | वैशाख | एप्रील, मे |
| | जमादिलाखर | अधिक–ज्येष्ठ | मे व जून |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| [illegible] अर्बा संमानीन | रज्जब (४) | ज्येष्ठ १७०५ | जून १७८३ | | |
| | साबान | आषाढ | जून, जुलै | | ग्वाल्हेर |
| | रमजान | श्रावण | जुलै, ऑगस्ट | जुलै ३१. ग्वाल्हेरचा किल्ला घेतला. | |
| | सव्वाल | भाद्रपद | ऑगस्ट, सप्टेंबर | गोहद घेण्याचा प्रयत्न. | |
| | जिल्काद | अश्वीन | सप्टें. आक्टोबर | २३ सप्टेंबर. मिर्जा सफीचा खून. | |
| | जिल्हेज | कार्तिक | आक्टो. नोव्हेंबर | अफरासियाबखान अधिकारारूढ. | |
| | मोहरम | मार्गशीर्ष | नोव्हें. दिसेंबर | | |
| | सफर | पौष | दिसें. जाने. १७८४ | मेजर ब्राऊन दिल्लीस गेला. | |
| | रबिलावल | माघ | जाने. फेब्रुआरी | फेब्रुआरी. २४ गोहदचा किल्ला घेतला. | |
| | रबिलाखर | फाल्गुन | फेब्रु. मार्च | | |
| | जमादिलावल | चैत्र १७०६ | मार्च, एप्रील | एप्रील, हेस्टिंग्ज शहाजाद्यास भेटला. | |
| | जमादिलाखर | वैशाख | एप्रील, मे | | |
| | रज्जब | ज्येष्ठ | मे, जून | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| समस संमानीन | रज्जब (१५) | ज्येष्ठ १७०६ | जून १७८४ | | |
| | साबान | आषाढ | जून, जुलै | जून. पातशहा शिंदास आग्र्याजवळ भेटला. | |
| | रमजान | श्रावण | जुलै, ऑगस्ट | अंबाजी इंगळे व शीख सरदारांचा तह. | |
| | सव्वाल | भाद्रपद | आगष्ट सप्टेंबर. | | |
| | जिल्काद | अश्वीन | सप्टेंबर. आक्टोबर | महमद बेग हमदानी यास कैद केलें. | |
| | जिल्हेज | कार्तिक | आक्टो. नोव्हेंबर | नोव्हेंबर २ अफरासियाबखानचा खून. | भरतपूरनजीक |
| | मोहरम | मार्गशीर्ष | नोव्हेंबर. दिसेंबर | हेस्तिंग्जनें शाहाजाद्यास शिंद्यांकडे धाडलें. | फत्तेपूर |
| | सफर | पौष | दिसें. जाने.१७८५ | आग्रा घेण्याची खटपट. | डीग |
| | रबिलावल | माघ | जाने. फेब्रुआरी | १ फेब्रुवारी, हेस्तिंग्ज विलायतेस गेला. | डीग |
| | रबिलाखर | फाल्गुन | फेब्रु. मार्च | | आग्रा |
| | जमादिलावल | अधि.चैत्र १७०७ | मार्च, एप्रील | मार्च २७. आग्रा मराठ्यांनीं घेतला. | |
| | जमादिलाखर | चैत्र | एप्रील, मे | मे १. शिंद्यांनीं नायबतीचीं वस्त्रें घेतलीं. | |
| | रज्जब | वैशाख | मे, जून | देवजी गौळी व इंगळे शेखांच्या पारपत्यास गेले. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सीत संमानीन | रज्जब (२६) | वैशाख १७०७ | जून १७८५ | | |
| | साबान | ज्येष्ठ | जून, जुलै | रायाजी पाटील रायगडच्या मोहिमेवर. | मथुरा |
| | रमजान | आषाढ | जुलै, ऑगस्ट | | |
| | सव्वाल | श्रावण | ऑगस्ट सप्टेंबर | | सेरगड |
| | जिल्काद | भाद्रपद | सप्टेंबर आक्टोबर | | |
| | जिल्हेज | अश्विन | आक्टोबर. नोव्हेंबर | | वृंदावन |
| | मोहरम | कार्तिक | नोव्हें. दिसें. | रामगडचा किल्ला ताब्यांत आला | सेरगड |
| | सफर | मार्गशीर्ष | दिसेंबर. | जैपुरास जाण्याचा विचार झाला. | ,, |
| | रबिलावल | पौष | जानेवारी १७८६ | | |
| | रबिलाखर | माघ | फेब्रुवारी | | डीग |
| | जमादिलावल | फाल्गुन | मार्च | | |
| | जमादिलाखर | चैत्र १७०८ | मार्च, एप्रील | पातशहा व शिंदे मिळून जैपुराकडे | लालसोट (जैपूरनजीक) |
| | रज्जब | वैशाख | एप्रील, मे | | |
| | साबान | ज्येष्ठ | मे, जून | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सया संमानीन | साबान (८) | ज्येष्ठ १७०८ | जून १७८६ | देवजी गवळी घोसगडाजवळ शि-<br>खांशीं लढतो. | डींग |
| | रमजान | आषाढ | जून, जुलै | जैपूरचा मामला संपविला. | |
| | सवाल | श्रावण | जुलै, ऑगस्ट | याकुबगड व रेवाडीचा गोकुळगड<br>यांवर स्वारी.. | मथुरा |
| | जिल्काद | भाद्रपद | आगष्ट सप्टंबर | | ,, |
| | जिल्हेज | अश्विन | सप्टंबर. आक्टोबर | रामगडास मोर्चे लावले. | |
| | मोहरम | कार्तिक | आक्टोबर नोव्हेंबर | नाजर मंजूरअलीखान दिलीस अधि-<br>कारारूढ होतो. | |
| | सफर | मार्गशीर्ष | नोव्हें. दिसेंबर | | |
| | रबिलावल | पौष | दिसें. जाने.१७८७ | | |
| | रबिलाखर | माघ | जाने. फेब्रुआरी | जैपूर जोधपुराशी विघाड. | |
| | जमादिलावल | फाल्गुन | फेब्रु. मार्च | रायाजी पाटील जैपुराकडे गेले. | जैपूर |
| | जमादिलाखर | चैत्र १७०९ | मार्च, एप्रील | | |
| | रजब | वैशाख | एप्रील, मे | | |
| | साबान | ज्येष्ठ | मे, जून | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| समानं संमन्तीन | साबान (१८) | ज्येष्ठ १७०९ | जून १७८७ | | |
| | रमजान | आषाढ | जून, जुलै | दिल्लीस बेबंदशाही माजली. | |
| | सवाल | अधिक श्रावण | जुलै, ऑगस्ट | जुलै २८. जैपूरकरांचा पराभव, हमदानीचा मृत्यु. | लालसोट (जैपूर), डीग |
| | जिल्काद | श्रावण | ऑगस्ट, सप्टंबर | गुलाम कादरखान दिल्लीस गेला. | अलवार (प्रांत जैपुर) |
| | जिल्हेज | भाद्रपद | सप्टंबर. आक्टोबर | | |
| | मोहरम | अश्विन | आक्टोबर. नोव्हेंबर | शिंद्यानें दिल्लीस येऊं नये असे पातशहा म्हणतो. | रेवाडी पटोडी |
| | सफर | कार्तिक | नोव्हेंबर दिसेंबर | | अकबराबाद |
| | रबिलावल | मार्गशीर्ष | दिसें. जाने. १७८८ | इस्माइल बेग व शिंदे यांच्या झटापटी. | कोलची झील, (आग्र्याजवळ) |
| | रबिलाखर | पौष | जानेवारी फेब्रुआरी | | |
| | जमादिलावल | माघ | फेब्रुवारी मार्च | | |
| | जमादिलाखर | फाल्गुन | मार्च, एप्रील | | |
| | रज्जब | चैत्र १७१० | एप्रील, मे | | |
| | साबान | वैशाख | मे, जून | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सल्लास समानीन | जमादिलाखर (२३) | अधि. ज्येष्ठ १७०४ | जून १७८२ | गोविंदराव वकील शिंद्यास भेटण्यास गेला. | |
| | रज्जब | ज्येष्ठ | जून, जुलै | जुलै ९. पाटिलबावा, व मिर्जा सफीची भेट. | |
| | साबान | आषाढ | जुलै, ऑगस्ट | ग्वाल्हेर, गोहद घेण्याचा प्रयत्न. | ग्वाल्हेर |
| | रमजान | श्रावण | ऑगस्ट, सप्टेंबर | अबदुल अहदखानास कैद केलें. | उज्जनी |
| | सव्वाल | भाद्रपद | सप्टें. आक्टोबर | मिर्जा सफी दिल्लीस अधिकारारूढ. | |
| | जिल्काद | अश्वीन | आक्टो. नोव्हेंबर | हेस्तिंग्ज लखनौस जुलूम करतो. | |
| | जिल्हेज | कार्तिक | नोव्हेंबर दिसेंबर | अशेरीचा किल्ला घेतला. | ग्वाल्हेर. गोहद |
| | मोहरम | मार्गशीर्ष | दिसें. जाने. १७८३ | मिर्जा अमानी लखनौ अयोध्या लुटतो. | गोहद व भिंड-भदावर |
| | सफर | पौष | जानेवारी | | |
| | रबिलावल | माघ | फेब्रुआरी. मार्च | फेब्रुआरी २४, सालबाईचा तह. | |
| | रबिलाखर | फाल्गुन | मार्च, एप्रील | | |
| | जमादिलावल | चैत्र १७०५ | एप्रील, मे | शिंद्यांनीं बावनबुरजी गढी घेतली. | |
| | जमादिलाखर | वैशाख | मे | | |
| | रज्जब | ज्येष्ठ | जून | ग्वाल्हेरभोंवतीं शिंद्यांनीं मोर्चेबंदी केली. | |

# मराठी भाषेचा कालनिर्णय

१ मराठीमध्यें जुन्यांत जुने उपलब्ध वाङ्मय म्हणजे ज्ञानेश्वरी होय; म्हणजे 'शके बारोशे बारोत्तरी' अगर इसवीसनाच्या तेराव्या शतकांत तिच्यांत वाङ्मय निर्माण होण्या इतकी मराठी भाषा प्रौढ झाली होती, हें निर्विवाद आहे. तेव्हां, तत्पूर्वी निदान एक दोन शतकें तरी, ती बोलण्यांत असली पाहिजे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

२ पण, सुदैवानें या बाबतीत केवळ अनुमानावर च ही गोष्ट आतां राहिलेली नाहीं. कारण, कोणत्या हि भाषेच्या पूर्वकालीन आस्तित्वा विषयीं जे दोन सबळ पुरावे– १ विदग्ध वाङ्मय व २ शिलालेख ताम्रपट–त्यांपैकीं दुसरा पुरावा हि मराठीचें आस्तित्वा संबंधानें ११ व्या शतकांच्या बऱ्याच आर्धाचा मिळाला आहे.

३ या दोन्ही हि पुराव्यांची योग्यता फार मोठी आहे. पण, पहिल्याच्या योग्यतेंत खालील प्रकारचें वैगुण्य येऊं शकतें. एखादी भाषा आपल्या सौष्ठव प्रौढपणा इत्यादि गुणांनीं अगर ती बोलणारांच्या धार्मिक समजुतीमुळें शिष्टसंमत झालेली असली, तर तिचें रूपांतर झाल्यावर सुद्धां तिच्यामध्यें वाङ्मय निपजूं शकतें. उदाहरणार्थ, संस्कृतची च गोष्ट घ्या. सामान्य जनसमुहाची नित्यव्यवहारांत बोलण्याची भाषा, या दृष्टीनें जरी तिचें अस्तित्व शकापूर्वी निदान सात शतकें नष्ट झालें होतें, तरी पण विदग्धवाङ्मयाची वाहक या दृष्टीनें शक कालानंतर १५।१६ शतकें–नव्हे आजवर देखील–ती जिवंत राहिली आहे. दुसरें असें कीं, वाङ्मयांतलि भाषेचें स्वरूप निर्माणकालीं जसें होतें, तसें च पुढें राहील अशी खात्री कोणास देतां येणें शक्य नाहीं. उदाहरण, ज्ञानेश्वरीचें च पहा. एकनाथांनीं ती आपल्यामतें शुद्ध केली; म्हणजे तिचें जुनें, दुर्बोध वाटणारें स्वरूप बदललें. तुकारामाच्या अभंगांची हि ती च स्थिति. आज वारकऱ्यांच्या तोंडीं त्यांचें जें स्वरूप बनलें आहे, तें तुकारामप्रणीत होतें च असें खात्रीनें सांगतां येत नाहीं. वाङ्मय भाषेला नामशेष होऊं देत नाहीं; पण तें तिच्या खऱ्या स्वरूपाबद्दल ग्वाही हि देऊं शकत नाहीं. शिलालेख, ताम्रपट यांचें मात्र तसें नाहीं. अस्मानी–सुलतानीनें ते स्वतः च नष्ट झाल्यास आग वारापाणी व काळ यांच्या तडाक्यांत सांपडून छिन्नभिन्न झाल्यास इलाज नाहीं. पण हे अपघात वगळले, तर शिलालेख–ताम्रपट हे आपल्या वेळच्या, म्हणजे ते लिहिले गेलेल्या वेळच्या भाषेचें स्वरूप, जसेंचें तसें दाखवतात; हा त्यांच्यांत व ग्रंथवाङ्मयांत मोठा फरक आहे. त्यामुळें, त्यांचें महत्व फार मोठें आहे. म्हणून ज्ञानेश्वरकालीन शिलालेखांत भाषेचें जें स्वरूप सांपडेल, तसें जर ज्ञानेश्वरींत आढळलें नाहीं, तर तिच्यांत त्या त्या गोष्टींपुरती ढवळाढवळ अगर सुधारणा झाली असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं.

४ मराठी भाषेचा काल निर्णय, अर्थात् त्याची वरील मर्यादा ठरविण्याचे कामीं, वाङ्मय ज्ञानेश्वरी पलीकडे जात नाहीं. या च सुमारास म्हणजे ज्ञानेश्वर समकालीन अगर पुढील शें सवा शें वर्षांतला एक गद्य ग्रन्थ उपलब्ध झालेला आहे. त्याचें नांव पंचतंत्र. हा शके १८२९ त म्हणजे १०।११ वर्षांपूर्वी महाराष्ट्रकवि या मासिक पुस्तकांत प्रसिद्ध करण्यांत आला. याचा कालनिर्णय वगैरे करण्याचा प्रयत्न संपादकांनीं अगर इतर कोणीं केला असल्यास तो मला उपलब्ध झाला नाहीं. पण, यांतील भाषा फार जुनी–बहुतेक ज्ञानेश्वर समकालीन–दिसते. ती ज्ञानेश्वरानंतर फार तर शें सवाशें वर्षांतली असावी, असा माझा तर्क आहे. यांतील एक दोन उतारे देतों:

उ. १. पा. ३१. "आणि तो बृहस्फिकु, बोले, म्हणे मियां तुझा आदरु जाणीतिला. तरि मी प्रभातेसि आणिके मठासि जाईन. अरे मठाधिपत्यें गर्वे न देखासि. एणें करि तुं नरकासि जासि. तंव तो चट्टुकर्णु भयभीत जाला. म्हणे मित्रा कोपों नको. म्हणे जेणें कारणें मी दुश्चितु तें आइकें. म्हणे एथें एकु उंदिरु असे. तो हें उरलें अन्न सिंकां ठेविलें असे तें उडोनि नीच खाये. तया कारणें मिं फोडिले वेळवाचे काठिनें तयातें वारितु असे, परि तो न वारे चि. या कारणें मी दुश्चित असे."

उतारा २. पा. ४५ "चिरंजीवी पुसे रक्ताक्षु सांगे. वाल्मिक ऋषेश्वर गंगेस तर्पण करित होता. तंव ससाणेयाचे तोंडी हुनि उंदीरी सुटली. ते वाल्मिकाचे आंजुळीत पडली. तंव त्यास कृपा उपनली. तेणें आपुलें तपोबळें ते कन्या केलि. आश्रमासि नेउनि भार्येसि दिधालि. तिया लेंकी म्हणोनि वाढविली. प्रबुद्ध जालि देखोनि भर्तारातें म्हणें इयेचा विवाह करावा."

५ या उताऱ्यांतील "मियां, आणिके, एणें करि, कोपों, आइकें ( विधि ), उंदिरु ( प्रथमा ), सिंकां ( सप्तमी ), उडोनि ( अव्यय ), नीच, तंव, ससाणे याचे तोंडीहुनि, उपनली, दिधलि, तिया ( तृतीया ), म्हणोनि, देखोनि, इयेचा" इ. शब्द व त्यांचीं रुपें ज्ञानेश्वरींतील शब्द व रुपें यांशीं फार जुळतात. काठिनें वगैरे सारखी थोडीशी रूपें ज्ञानेश्वरींत नाहींत, नंतरचीं आहेत, म्हणून हें गद्य जग पुढचें, पण एकनाथाच्या पुष्कळ च आधींचें आहे यांत शंका नाहीं. प्रभात मासिकाच्या ( शके १८२८ ) एका अंकांत जादू टोणे मंत्र तंत्र इत्यादिकांवर एक जुना गद्यग्रंथ प्रसिद्ध झाला आहे; त्याचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. हा, "योगरत्नमालेचें भाषान्तर असावा, व तिच्या नंतर म्हणजे संवत् १२९६ च्या नंतर दीडशें वर्षांनीं हा ग्रंथ झाला असावा" असें अनुमान केलें आहे, व म्हणून च 'शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांतील एक मराठी गद्य लेख' असें त्या लेखास नांव दिलें आहे ओ. ३. "आदित्याचें मूळ पाणियें वाटून लेपु कीजे वाळों दीजे," ओ. ६४–६५ "जयाचें नांवें देवालयीं गेविजे तो पुरुष वश्य होए." इ. इ. वाक्यांवरुन याची भाषा पुष्कळ च

जुनी आहे असें दिसून येतें. असो. सारांश, ज्ञानेश्वरकाळीं व नंतर मराठींत गद्य-पद्य ग्रन्थ रचना होऊं लागली होती हें निर्विवाद आहे. इ. स. तेराव्या शतकांत मराठींत चांगलें वाङ्मय निर्माण होत होतें.

६ पण, मुद्देवानें शिलालेख मात्र, यापूर्वीं हि मराठी भाषा ही मराठी या रूपानें अस्तित्वांत असल्याचें सिद्ध करून देतात. ते शिलालेख व ताम्रपट—अर्थात् मला ज्यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष माहिती मिळाली असे कालानुक्रमानें—उलट चढत्या कालानुक्रमानें असे आहेत:

येथें मीं शके १६९० तील पालि येथील शिलालेख, १५६५ तील कल्याणचा ताम्रपट व शके १४६३ व १४५२ तील वाई येथील दोन ताम्रपट, यांचा उल्लेख करीत नाहीं. कारण, ज्ञानेश्वराच्या नंतर मराठी संबंधानें वाद नाहीं; शिवाय, हे विशेष अर्वाचीन आहेत. मराठी भाषेची वाढ व इतिहास आणि तिचें ऐतिहासिक व्याकरण या विषयांत मात्र त्यांचें महत्व फार आहे. असो. हे रा. राजवाडे यांनीं प्रभात (वर्ष १) व विश्ववृत्त यांत छापले आहेत.

१ ला. गोवें प्रांतांतील बान्दोरा ( बन्दवाड ) गांवीं नागनाथाच्या देवळाजवळील शिलालेख. हा शके १३३८ तील, म्हणजे ज्ञानेश्वरा नंतर सवाशें वर्षांचा आहे. हा रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबईशाखेच्या पत्रकांत १९०९ सालीं छापलेला आहे. (पुस्तक २३ वें पा. १०७–१०८). ज्ञानेश्वरीच्या नंतरचा हा असल्यानें त्या विषयीं कांहीं विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. यांतील कांहीं वेचक शब्द मात्र देतों. "विजयानगरीं, असते काळीं, प्रतिहस्तु, सुतु, शेणवेयासि, भास, तांबिए, करूनु, गोपाळभटान, याह, दिधलें, शेणवेएं ( तृतीया ), जळूंची (जळावयाची या अर्थी ), तांदुळां ( षष्ठी. अनेक वचन ), निवेदु, येतुक्यासि, भटाचिये, गाए ( गाय ), जाए ( जाय ); मवोसेत" वगैरे "तथा, दिने" असें पांचचार संस्कृत शब्द हि यांत येतात.

२ रा. अलीबाग नजीक नागांव येथील शिलालेख. हा शक १२८९ तील म्हणजे ७७ वर्षांनीं ज्ञानेश्वरानंतरचा आहे. हा यादवांचा आहे. याची भाषा अर्थात च ज्ञानेश्वरीला जवळ आहे. हा प्रभात मासिकांत छापला आहे, पण त्याचा अस्सल विश्वसनीय ठसा सोबत जोडलेला नसल्यामुळें, त्यांतील पाठ शुद्ध व खरे कित-पत आहेत याची मजसारख्या शंकेखोरानें शंका घेतल्यास, त्याजकडे दोष येऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, या शिलालेखांत षष्ठीच्या प्रत्ययाची धरसोड दिसते. कांहीं ठिकाणीं नेहमीप्रमाणें 'चा'न्त षष्ठी आहे, पण एके ठिकाणीं स्पष्ट 'जा'न्त आहे. हा 'जा' मुळांत आहे, अगर वाचणाराची किंवा छापणाराची चूक आहे हें कळण्याला मार्ग नसल्यामुळें, सप्रमाण असें यासंबंधानें कांहीं च सांगतां येत नाहीं.

३ रा. शके ११९५ तील पंढरपूर येथील शिलालेख. हा ज्ञानेश्वरीच्या किंचित् म्हणजे १७ वर्षे आधींचा आहे म्हणून याचें महत्व फार आहे. हा प्रथम पण्डित

भगवानलाल इन्द्रजी यांनीं शोधून काढला, त्याचा उल्लेख रा. राजवाड्यांनीं जरा अशिष्ट पद्धतीनें कां होईना, परंतु केला आहे, एवढें खरें. तथापि एवढ्या महत्वाच्या शिलालेखाचा मुद्दां एक विश्वसनीय ठसा सोयत जोडलेला नाहीं हें आश्चर्य आहे. रा. राजवाड्यांनीं तो बिनचूक वाचला असेल, नाहीं असें नाहीं; परंतु, संशोधनाच्या बाबतींत अशा गोष्टींत इयगय करून चालत नाहीं. जेथें एखाद्या अक्षराच्या, नव्हे एखाद्या कानामात्रेच्या यन्यावाईट वाचण्यावर सर्व गोष्टी अवलंबून असणार, तेथें चार अधिक नज्ञ अगर जिज्ञासूंच्या डोळ्यांखालून तो जावा एतदर्थ ठसा देणें अत्यंत जरूर होतें. विश्वासाची गोष्ट निराळी, संशोधनांत त्याला फार गौण स्थळ आहे व असावें. उदाहरणार्थः–ठसा मजपुढें असतां तर 'फागनिपुर' एक शब्द वाचावयाचा कीं, दोन वाचावयाचे हें कळतें, शक, संवत्सर, यापुढें महिना, पक्ष देण्याची हमेष चाल आहे. ( या च शिलालेखांत पा. १६ पहा. 'शकु ११९८ धाता संवत्सरे माग वदि' ) त्याअन्वयें फागनि म्हणजे फाल्गुन व पर म्हणजे पहिला पक्ष असा अर्थ कदाचित् लावला असता. तिसामिति' या अक्षरांवर टीप देऊन रा. राजवाडे म्हणतात, तीं मला वाचतां आलीं-नाहींत, ठसा असता तर दुसऱ्या कोणीं वाचलीं असतीं नाहीं कोणी म्हणावें! असो.

या शिलालेखांतील खालील शब्द व रूपें ज्ञानेश्वरीशीं ताडून पाहाण्यासारखीं आहेत.

"चालावेआ (चालावया), पैंकाचा (पैक्याचा), रामचन्द्रदेवराएं, देवरायासि, करुनु, सेठि ( श्रेष्ठी )." "कोटारि ठाकवी तेयासि श्रीविठ्ठलाची आण" या वाक्याशीं चान्दोरा मधील "हा केला धर्म जो मोढि तेणें वाराणसि श्रीविश्वेश्वरासन्निधि सूर्यग्रहणीं आपुला माता पिता गाए वदिल्या पापासि जाए" हें वाक्य जुळण्यासारखें आहे. "वाईआ ( वाईनें, पहा ज्ञानेश्वरीः—गोडिया, बुडिया, दिठिया ), येकु, सेणवे" वगैरे.

यांत देवळासाठीं दान दिलेल्या माणसांच्या नांवाची यादी च फक्त असल्यामुळें, मराठी भाषेंतील सुबंत, तिङंत व कारक यांविषयीं यांतून माहिती तुरळक च काढतां येते.[1]

४ था. शके ११२८ तील चाळीसगांवनजीक पाटण येथील शिलालेख. हा ज्ञानेश्वरी पूर्वी ८४ वर्षांचा असल्यामुळें याचें महत्व वाढतें आहे; शिवाय यांत फक्त नांवाच्या यादी च तेवढ्या नसल्यामुळें भाषेचें एकंदर स्वरूप यावरून जरा जास्त दिसतें. प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांच्या स्मरणार्थ त्यांचा नातू चांगदेव यानें एक मठ स्थापला; त्यास निकुंभ वंशीय राजा हेमाड्रिदेव व त्याचा भाऊ सोइदेव यांनीं देणगी दिल्याचा यांत उल्लेख आहे. २२ ओळी संस्कृत असून फक्त ४ च मराठी आहेत. हा

१ शके १२३३ तील पंढरपूरचा शिलालेख फार च त्रोटक व पुसट असल्यामुळें तो जमेस धरला नाहीं.

प्रथम डॉ भाऊदाजी यांनीं रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेंत सन१८६४ त व नंतर डॉ. कील्हॉर्न यांनीं बरा च शुद्ध करून, एपिग्राफिका इन्डियामध्यें १८९२त पुनः छापला.[1] तिसरी आवृत्ति रा. राजवाडे यांनीं १९०६ मध्यें प्रभात मासिकांत छापिली. रा. राजवाडे यांनीं टिप्पणी देऊन अर्थ चांगला लावला आहे.

"इयां पाटणीं, केर्णे, तेह्राचा ( त्याचा ) ब्राह्मणां ( षष्ठी ), दीन्हला, विकतेयापासीं, वीसोवा, जलदाइयां ( जल देणाऱ्यांस ), जेती, तेतियां, मविजे, मवांवं, धामोजीचिआ" इत्यादि शब्द व रूपें मराठीच्या काळनिर्णयाच्या दृष्टीनें महत्वाचीं आहेत. ओळ २४ व २५ यांचा राजवाड्यांनीं लावलेला अर्थ मला संमत नाहीं, माझें म्हणणें एखाद्या पाक्षिक सभेपुढें मांडतां येईल.

या शिलालेखावरील रा. राजवाड्यांचें मराठीच्या कालाविषयींचें विवेचन महत्वाचें आहे, त्याचा परामर्ष पुढें घेतों.

५ वा. शके ११०९ तील परळ येथील शिलालेख. कोंकणाधिपति शिलाहार यानें, षट्षष्टि (साष्टी) बेटांत माहवलि गांवीं भूमिदान दिल्याचा यांत उल्लेख आहे. हा पण्डित भगवानलाल इन्द्रजींनीं रॉयल एशियाटिक सोसायटी मुंबईशाखेंत १८७६ त छापला. हा शके ११०२ मधील आहे असें रा. राजवाडे कां म्हणतात हें कळत नाहीं. पंडितजींनीं घेतलेल्या अस्सल ठशांत ११०९ हा आंकडा स्पष्ट आहे. याच्या शेवटल्या दोन ओळी फक्त मराठींत आहेत.

"कोणुहुवि ( कोणी होऊन ), ए ( हें ), तेच्या, आपडे, तेहाची, हविजें" हीं रूपें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत.

या प्रमाणें मराठीचा पत्ता थेट शके ११०२ पर्यंत लावतां येतो. रा. राजवाडे तिला आणखी पलीकडे नेतात व तें पुढील दोन ताम्रपटांच्या आधारावर. यांचें आतां परीक्षण करूं.

१. चिकुर्डे येथील ताम्रपट. या ताम्रपटांत खालील गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. १ ली. यांत शक अगर संवताचा उल्लेख नाहीं ( पा. १९ ). फक्त संवत्सर, मास, दिन व तिथि हीं दिलीं आहेत. ताम्रपटावर दिलेला संवत्सर, वार, तिथि हीं दोन शकांत येऊं शकतात हें राजवाड्यांनीं सांगितलें आहे. एक शक ६५८ व दुसरा शक ११९६. २ यांतील आरंभीचीं बिरुदें चालुक्य राजांशीं जुळतात, पण पूर्व चालुक्यांतील एकाचें हि यांत नांव नाहीं. (ते पूर्व चालुक्यः जयसिंह, रणरंग, पुलकेशि १ ला, कान्तिवर्मन् १ ला, मंगलीश, पुलकेशी २ रा, विक्रमादित्य १ ला, विजयादित्य, विक्रमादित्य २ रा व कीर्तिवर्मा २ रा असे सन ७४७ पर्यंत राज्य

---

१ ज्ञानेश्वरी प्रस्तावनेंत राजवाडे ११०९ लिहितात.

करते झाले, असें ताम्रपट, चिनी प्रवाशांच्या हकीकती व इतर साधनें यांवरून सिद्ध झालें आहे. (पहा. भांडारकर 'Early History of the Deccan.' पा. ४८ ते ६१. Vincent Smith, Early History of India p. 24-32. 19 14 ed ). ३ शके ६२८ त ज्याची कारकीर्द येईल, असा यांच्यापैकीं विजयादित्य होय. त्याचें नांव या ताम्रपटांत नाहीं असें सांगितलें च. त्याचे जेवढे खरे ताम्रपट अगर शिलालेख सापडले आहेत तेवढ्यांवर त्याचें स्पष्ट नांव आहे. ४ प्रस्तुत ताम्रपटावर " सोमवंसोद्भव परीक्षितसतानिकुसुतु जनमेजय चक्रवर्ति " असें स्पष्ट नांव आहे. ५ हें नांव विजयादित्याचें टोपणनांव असावें असें अनुमान करण्याला एक हि प्रमाण नाहीं. इतर त्याच्या कोणत्या हि ताम्रपटांत त्याला असें म्हटलें नाहीं. त्याचा बाप विनयादित्य व आजा विक्रमादित्य होता, ही गोष्ट हि प्रस्तुत ताम्रपटाच्या विरुद्ध जाते. जनमेजय हें त्याचें पाळण्यांतलें नांव असावें, हें अनुमान ( चिकुर्डे येथील मराठी ताम्रपट पा. ५ ) पुराव्याच्या अभावीं केवळ हास्यास्पद आहे. तें गृहीत धरावें तर पुनः या ताम्रपटांतील या राजाचा बाप, जो ' सतानीक ' त्याचें हि हें पाळण्यांतलें नांव व विनयादित्य हें दुसरें नांव असें अनुमान करीत बसावें लागेल. ६ तेव्हां, प्रथम शक संशयित म्हणून, व नंतर नांव वगैरे डळमळित म्हणून, मराठीच्या कालनिर्णया संबंधानें हा खरा ( खोटा ) ताम्रपट कुचकामाचा ठरतो. ७ Ind. Ant. vol. X. पान ६० या वरील विजयादित्याच्या अपूर्ण शिलालेखांत खालील वाक्य फार महत्वाचें आहे. बिरुदें, नांव, शक, ब्रह्माविष्णुमहेश यांची स्थापना केली वगैरे सांगितल्यावर असें म्हटलें आहेः " अतःपरं प्राकृतभाषया पद्यान्येतानि दत्तानि"-पुढील शब्द दुर्दैवानें नाहींसे झाले आहेत. यांत विजयादित्याचे वेळीं रूढीप्रमाणें प्रथम संस्कृतमध्यें आरंभ केल्यावर प्राकृत पद्यें केलीं गेलीं होतीं,ही गोष्ट महत्त्वाची आहे. प्राकृताचा काळ याच्या वेळीं संपला नव्हता ही हि गोष्ट निर्विवाद आहे. हा शिलालेख शके ६२१ तला आहे. ८ नंतर भाषेसंबंधानें. ही भाषा धेडगुजरी संस्कृत आहे. आपले हल्लीचे भट संकल्प सांगतांना जसलें संस्कृत वापरतात तसलें त्यांत आहे. पण तें संस्कृत म्हणून लेखकानें लिहिलें हें निर्विवाद आहे. उ० ह्रौ ग्रामेन सीमे ( ओ. ५७ ) तथा गिरिमिस्तकं ( ५४ ), तदुतर ( तदुत्तरतः ) आकासतटाककांत्रवपर पाषाणो ( ५१-५२ ) इ. संस्कृतांत जी भेसळ आहे ती ज्ञानेश्वरकालीन मराठीची आहे. उ० धरवुन, करुन, करवुन. इ. इ. ९ एकंदर या हि दृष्टीनें मराठीचे कालनिर्णयाला हा ताम्रपट कुचकामाचा ठरतो. यांतील वादग्रस्त मुद्यांचा निकाल लागण्याच्या पूर्वीं तो प्रमाणभूत मानतां येत नाहीं. १० लिपीचा प्रश्न-या ताम्रपटाचा ठसा सोबत जोडला असता म्हणजे, ७ व्या शतकांतल्या इतर ताम्रपट-शिलालेख वगैरेंच्या प्रत्यंतरांवरून याच्या संबंधानें ढोकळपणें निश्चितस्वरूपाचें असें कांहीं तरी सांगतां आलें असतें. पण, तसा ठसा उपलब्ध नाहीं. तेव्हां मराठीच्या कालनिर्णयासंबंधानें तो अत्यंत अविश्वसनीय आहे

५

हें पुनः पुनः सांगितल्या वांचून इलाज नाहीं. या शिलालेखाचें यापेक्षां विस्तृत विवेचन एखाद्या पाक्षिक समंत करावें असें वाटतें.

येथें च श्रावणबेळगोळा येथील प्रचंड भुजबलि मूर्तीच्या दोन्ही पायांजवळील धोंड्यावरील शिलालेखाचा उल्लेख करावासा वाटतो. यांत फक्त दोन च वाक्यें आहेत व तीं ' श्रीचावु(मु चद्धल)ण्डुराजें करावियलें, ' व ' श्रीगंगराजे सुत्राले करवियलें' हीं आहेत. चामुण्डराज हा राचमल्ल याचा प्रधान होता व तो दहाव्या शतकांत होऊन गेला; आणि गंगराज हा विष्णुवर्धनाचा ( होयसल ) प्रधान १२ व्या शतकांत होऊन गेला. दोन्ही ओळींची लिपि एक च असल्यामुळें त्या १२ व्या शतकांत दोन्ही खोदल्या गेल्या हें निःसंशय आहे; दहाव्यांत नाहीं.

२ रा. शके ४१० तील मंगळवेढें येथील ताम्रपट. यासंबंधानें तर सर्व च स्थिति असमाधामकारक आहे. प्रभातमासिकांत हा छापला गेला. त्याची भाषा कांहीं ठिकाणीं दुर्बोध आहे. ही भेसळीची हि दिसते. प्रकाशकांना किती तरी ठिकाणीं शंका आल्या आहेत. अशा वेळीं त्याचा हुबेहुब ठसा छापावयास पाहिजे होता, तो दिला नाहीं. यामुळें तो वाचावयास कोणीं मदत करणें शक्य नाहीं. दुसरें, त्याच्या शकाविषयीं जबरदस्त शंका येते. ' वरुस च ' याच्या पुढें संवत्सराचा आंकडा पाहिजे तो भलतीकडे च आहे. तिसऱ्या ओळींतील दोन रेघांची दिलेली उपपत्ति पटत नाहीं. तेथें आकडा आणि तो हि एकाचा असावा असा संशय येतो व तो पुढील भाषेच्या वगैरे प्रकारानें दृढतर होत जातो. लिहिणारा अगदीं अशिक्षित व बरा च अलीकडचा असावा असें वाटतें. "लीहील, बादीती, सरावण, त्रुप, आत्रुदा, दोनी, कुलकरणी, समसत आल" वगैरे! यांत नांवें आहेत तीं सुद्धां चांगलीं १३।१४ शेंच्या पुढचीं अशीं भासतात; नारो अगर नारोबा, पवार रवळोजी, जाद्व, भानजी मोरा, गंगाजी राड़ा, भानजी सीद्, पटल, कुलकरणी इत्यादि नांवें व हुद्याचे शब्द इतक्या पुरातन काळीं म्हणजे इ. स. पांचवे शतकाचे शेवटीं असतील कीं नाहीं याची शंका च आहे. निदान, अन्य, सबळ, विश्वसनीय व इतका खरोखर च जुना पुरावा मिळेपर्यंत या एका ताम्रपटावर अविश्वास ठेवणें च सयुक्तिक होईल. कांहीं नांवांतील "जी" हा बहुमानार्थी प्रत्यय हि आधुनिक असावा, निदान इतका जुना खास नाहीं.

'पवार' शब्दावरून हि तें च अनुमान निघतें. पवार शब्द ज्या ऐतिहासिक घराण्यावरून रूढ झाला तें च परमार घराणें जर आठ नऊ शतकांपुढचें (व्हिन्सेन्ट स्मिथ ३९५ पृ.) तर पांचव्या शतकांतील शिलालेखांत पवाराचें नांव यावें कसें ? जाद्व—यादवाचें हि त्याचप्रमाणें होय.

यावरून हा ताम्रपट पुष्कळ पुढचा म्हणजे १५।१६ व्या शतकांतला असावा असें वाटतें, अतएव भाषेच्या दृष्टीनें त्याची किंमत कमी होते. असो.

एकंदरींत पाहतां, मराठींतील जुन्यांत जुना व हल्लीं उपलब्ध असलेला शिलालेख म्हणजे परळ येथील शक ११०९ मधला शिलालेख होय. व त्याच्या आधारानें आपणांस असें म्हणतां येतें कीं, मराठी भाषा, ही मराठी या निश्चित रूपानें तत्पूर्वी शें दीडशें वर्षे तरी निदान प्रचारांत असावी.

दहाव्या शतकाच्या पलीकडे निदान आजच्या स्थितींत तरी जातां येत नाहीं मराठीला कसें तरी करून पुढें ढकलावयाची यांत कोणता हि स्वार्थ अगर मुद्दा साधत नाहीं. हल्लींच्या उपलब्ध साधनांवरून निरपेक्षतेनें तिचा काळ ठरवावयाचा आहे.

हा एका दृष्टीचा महत्त्वाचा ऐतिहासिक पुरावा झाला. या प्रश्नाकडे दुसऱ्या एका दृष्टीनें आपणास पाहतां येतें. ती दृष्टी म्हणजे उलटी, उगमाकडची व ठोकळ मानाची होय. पालि भाषेमध्यें इ. स. पूर्वी ३ पासून पुढें बरें च वाङ्मय झालें हें आपणांस ठाऊक आहे. बुद्ध लोकांच्या परंपरागत विश्वासाप्रमाणें बुद्धवचनावर उभारलेली ही ग्रंथभाषा होय. म्हणजे पालि अगर जुनें प्राकृत, बुद्धापर्यंत जाऊन पोंचतें. शका पूर्वी १५०० त तिला नेऊन पोंचविण्याला पुरावा उपलब्ध नाहीं. अशोकाचे वेळीं तिच्या किंचित् बदलूं लागलेल्या स्वरूपांत शिलालेख लिहिले गेले; ते इ. सना नंतर एक शतका पर्यंत लिहिले गेले. या दोन शतकांमधून च संस्कृत शिलालेख झळकूं लागले. व पुढें ते तसे वाढत च गेले. एक तर अशोकशिलालेखाचे पाली अगर प्राकृत बदलत जाऊन, महाराष्ट्री आदिकरून नव्या भाषा उत्पन्न होऊं लागल्या. त्या नव्या असल्यामुळें त्यांस प्रथम महत्त्व नसणें साहजिक होतें. म्हणून व संस्कृताबद्दल अभिमान व जागृति बुद्ध धर्माच्या चालत्या काळाच्या नंतर जोरानें उत्पन्न झाली म्हणून, संस्कृत ही च शिलालेखांची भाषा बनली. पण, प्राकृतांची वाढ होत होती च व त्यांच्यांत निराळ्या तऱ्हेचें ( म्हणजे धार्मिक, राजकीय नव्हे ) काव्य वाङ्मय होऊं लागलें. पैशाची भाषेंतील, पहिल्या शतकांतली बृहत्कथा, सत्तसई, ५व्या, ६व्या शतकांतील रावणवहो, ७ व्या शतकांतील गउडवहो, १० व्या शतकांतील कर्पूरमञ्जरी इत्यादि काव्यें, प्राकृत भाषा या इ. स. पहिल्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत जोरांत होत्या असें दाखवितात. धार्मिक, शास्त्रीय नव्हे तर काव्यादि ग्रंथ सुद्धां, जरी संस्कृतांत पूर्वी प्रमाणें होत होते, तरी जिवंत प्राकृत भाषांनीं आपली चळवळ सोडली नाहीं, असें यावरून सिद्ध होतें. या नन्तरचा काळ म्हणजे हल्लींच्या देशी भाषांचा काळ. दहा पासून बाराव्या शतकापर्यंत हि प्राकृतांत काव्यें होत होतीं ( याचें उदाहरण हेमचन्द्र ). याचें कारण, आधुनिक भाषा त्या काळांत वाढत होत्या, व वाङ्मयभाषा होण्याची पात्रता त्या आपले अंगांत आणीत होत्या. वर उल्लेखिलेला इ. अ. X ६० वरील विजयादित्याचा शक६२१तील शिलालेख हि ती च साक्ष पटवितो.

७ या नंतर मराठी भाषेच्या आरंभकाळा संबंधानें प्रचलित मतांचा विचार करणें आहे. शके १८२८ मध्यें, प्रभात मासिकांत, पाटणच्या शिलालेखावर टीका कर-

तांना रा. राजवाड्यांनीं या संबंधीं आधुनिक पौराणिकांचें ( Antiquarians चें ) मत खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे ( पृ. ११ ते १८ ). ते म्हणतात " इतकें मात्र निश्चित आहे कीं, शक ६०२ च्या सुमारास हाल, शातवाहन वगैरेंची महाराष्ट्री भाषा, सामान्य लोकांच्या बोलण्यांतून बहुतेक गेली होती आणि तिच्या ऐवजीं मराठी भाषा सुरू झाली होती. शक १००० च्या सुमारास मराठी वगैरे अर्वाचीन भाषा सुरू झाल्या असें डॉ. भाण्डारकर वगैरे कित्येक पौराणिक म्हणतात, तें मत, अर्थात्, ग्राह्य समजण्यास सबळ कारण दिसत नाहीं."

या मताच्या पुष्टीकरणार्थ रा. राजवाडे दोन तऱ्हेचे मुद्दे पुढें आणतात. पैकीं, पहिला जास्त मनोरंजक आहे असें म्हणणें अपरिहार्य आहे. तो त्यांच्या च शब्दांत देतों. (पा. १२ ). "........त्या अर्थी निकुंभांच्या राज्यांत म्हणजे चाळीसगांव ( खानदेश ) प्रांतांत त्या कालीं ( इ. स. च्या तेराव्या शतकांत ) मराठी भाषा प्रचलित होती हें उघड आहे. इतेंक च नव्हे, तर, शक ११२८ च्या पूर्वी सुमारें तीनशें वर्षांपर्यंत मराठी भाषेचा प्रचार महाराष्ट्रांत असावा, असें निश्चयानें म्हणतां येतें. कारण, मठ बांधणारा जो चांगदेव, तो आपल्या पूर्वींच्या आठ पिढ्या येणें-प्रमाणें देतो." यानंतर पिढ्या दिलेल्या आहेत आणि चांगदेव व भास्कराचार्य ( १११४ –११८३ ) यांचा मूळपुरुष जो कविचक्रवर्ती त्रिविक्रम तो शक ८४० किंवा ८३० म्हणजे सन ९१८ च्या सुमारास हयात असावा असें सयुक्तिक मत दिलें आहे. येथवरील विचारसरणी संशोधकाला साजेल अशी च आहे. पण पुढील भागांत मनो-रंजनाला सुरुवात होते; ती अशी. " आणि हें मत जर सयुक्तिक असेल व आठ पिढ्या एका च देशांत अव्याहत राहणाऱ्या एका च कुटुंबाची भाषा ( धर्मांतरादि विपरीत कारणें नसल्यास ) एक च असते हा सिद्धांत गृहीत केला, तर महाराष्ट्रांत राहणाऱ्या त्रिविक्रम भट्टाचें कुटुंब शक ८३० च्या सुमारास मराठी भाषा बोलत असलें पाहिजे, हा हि सिद्धांत ग्रहण करावा लागतो. कीलहार्न म्हणतो कीं, त्रिविक्रम-भट्टानें आपल्या दमयंतीकथा नामक ग्रंथांत, आपला पिता नेमादित्य अथवा देवादित्य व आजा श्रीधर यांचीं नांवें गोविलीं आहेत, व आपलें गोत्र शाण्डिल्य म्हणून सांगितलें आहे. प्रस्तुत शिलालेखाच्या संस्कृत भागांत हि त्रिविक्रमाचें गोत्र शाण्डिल्य म्हणून वर्णिलेलें आहे, व त्याला कविचक्रवर्ति हि म्हटलें आहे. तेव्हां दमयंतीकथाकार जो त्रिविक्रम तो च चांगदेवाचा मूळपुरुष असावा, हें उघड आहे." ( यांत युक्तिवाद कोठें हि खुटला नाहीं, पण दोघे एक च याला जास्त पुरावा दाखवण्याची जरूर रा. राजवाड्यांना भासली नाहीं. ) " हा त्रिविक्रम जर मराठी भाषा बोलत असे तर त्याचा बाप व आजा हे हि ती च भाषा बोलत असले पाहिजेत. दर पिढीस तीस वर्षें धरल्यास त्रिविक्रमाचा आजा श्रीधर, शक ७७० च्या सुमारास महाराष्ट्रांत हयात असून मराठी भाषा बोलत असावा असें अनुमान करणें प्राप्त होतें. अर्थात् चाळीस-गांव प्रांतांत व महाराष्ट्रांत शक ७७० त मराठी — भास्कराचार्य, चांगदेव,

ज्ञानदेव, एकनाथ व रामदास यांची मराठी—भाषा प्रचलित होती, असा सिद्धांत करण्याकडे प्रवृत्ति होते."

८ हा पहिला पुरावा झाला. हा किती सापेक्ष व पोकळ आहे हें सिद्ध करणें अवघड नाहीं. उ० ही च सरणी कडेपर्यंत पोंचविली असतां, निच्यांतली गोम दिसून येते. एका च ठिकाणीं अव्याहत राहणान्या कुटुंबाची भाषा एक हा च सिद्धांत धरून चालल्यास, त्रिविक्रमाचा आजा जर मराठी बोलत होता तर त्या आज्याचा हि आजा ती च भाषा बोलत असला पाहिजे व त्या आज्याचा आजा हि मराठी च बोलत असला पाहिजे हें क्रमप्राप्त होतें. म्हणजे मराठी भाषा पोंचली आणखी १५० वर्षें वर, अथवा शक ६२० पर्यंत। ही शिडी अशी च मनूपर्यंत सुद्धां पोंचवतां येईल. नाहीं कोणीं म्हणावें? पण इ. स. ७।८ व्या शतकांत प्राकृत काव्यें निर्माण होतात त्याची वाट काय?

९ दुसरा पुरावा जरा समंजस तरी आहे, निदान केवळ मनोरंजक तरी खास नाहीं. तो असा. " शक ११२८ पूर्वीच्या संस्कृत ताम्रपटांत जर मराठी शब्द दाखवून देतां आले तर त्या त्या ताम्रपटांचे वेळीं कांहीं तरी स्वरूपांत मराठी ही अस्तित्वांत असली पाहिजे. " या सिद्धांतांत फारसें वावगें कांहीं नाहीं. " मराठी अस्तित्वांत असली पाहिजे " याच्या ऐवजीं जास्त सावधगिरीची व पायाशुद्ध अशी ' मराठी वनत चालली असली पाहिजे ' एवढी दुरुस्ती मी सुचवीन. कारण, या मूठभर नव्हे, बोटावर हि मोजावयाला अपुरे च, अशा शब्दांवरून वरील ठाम विधान करणें जरा जास्त धोक्याचें आहे. तरी हि रा. राजवाड्यांचा सिद्धांत जसाचे तसा च अविकृत स्वरूपांत कबूल केल्यावर हि संस्कृत शिलालेखांत, जे मराठी सारखे शब्द येतात, ते खरोखर च निर्भेळ मराठी च आहेत प्राकृत अगर अपभ्रष्ट किंवा प्राकृत-मराठी यांच्या संधिकाळांतले नाहींत अशी खात्री प्रथम करून घ्यायला पाहिजे.

रा. राजवाड्यांनीं दिलेले हे शब्द शुद्ध मराठी आहेत कीं काय तें आतां पाहूं:—

१ श. १०४९ तील शिलाराच्या ताम्रपटांत खालील शब्द मराठी आहेत असें रा. राजवाडे म्हणतातः– " सकु, संवतु, वडवली, गौंडिमार्ग, घोरपड, मोव्वली, मोर, ऊसर, वावर, छेपाटी. "

यांपैकीं सकु, संवतु, मोर, ऊसर हे अपभ्रंशांत हि तसे च आहेत. मोर, हा तर पालींत ही सांपडतो (गिरनार. शिलालेख- १. द्वे मोरा एको मगो = दोन मोर व एक मृग ). प्रथमेचें एकवचन, अपभ्रंशांत ' उ ' कारान्त असतें हें तज्ज्ञांस सांगावयास नको च. ऊसर हा शब्द मागधी, व्रज कोणत्या हि प्राकृतांत असा च असला पाहिजे. छेपाटी हा हि शब्द प्राकृत नियमानुसार आहे. पण त्याचा अर्थ लागत नाहीं.

२ शक १०१६ तील शिलारांच्या ताम्रपटांत येणारे शब्दः—

"कोंकण, रिपि, छेपाटी, सोमण, संवतु, मामण, धणम, नोर, गय, अनंतदेव."

यांपैकीं 'रिपि' हें रिसीचें संस्कृतानें पुनः विपडविलेलें स्वरूप असून, रिमि हा शब्द प्राकृतांत रूढ आहे. (Pischel ५४ पहा.) अगर कपि शब्द खोदतांना नित्य सहवासानला 'रि' येऊन गेला असें हि संभवतें. 'राय' हें रूप अर्धमागधी व जैन महाराष्ट्रींत सरळ आहे. (Pischel २७९ व उवासगदसाओ, Hoernle §३, ६, ११, ९२ इ.) जैन माहाराष्ट्री हें माहाराष्ट्रीचें च जैन-आगमावरील टीकांतील स्वरूप होय, हें तज्ज्ञास ठाऊक आहे. 'कोंकण' हा शब्द देशवाचक असून देशी आहे, व तेथून प्राकृत-मराठींत आला आहे. त्याला शुद्ध मराठी म्हणावयाचें व त्यावरून मराठीला वर चढवायची, तर दुसऱ्या पुलकेशीच्या शक ५५६ तील शिलालेखांत हि (Ind. Ant. VIII p. 237) तो आला आहे, त्यावरून मराठीला आणखी १।२ शतकांची उडी घ्यायला लावायचें कीं काय! 'अनंतदेन' असें मुक़र करण्यांत रा. राजवाड्यांची चूक आहे. कारण या च शिलालेखांत पुनः 'अनंतदेव' असा स्पष्ट शब्द ६५ व्या ओळींत पुनः आलेला आहे, तेथें 'व' स्पष्ट आहे. ६३ व्या ओळींत किंचित् अस्पष्ट आहे, पण 'व' च आहे. (ओळ ६९ पहा) म्हणजे 'अनंतदेव' हें पूर्ण नांव लेखकास माहीत होतें. तेव्हां 'अनंतदे' वरून मराठी तृतीया करून तो लेखांत घुसडीलें असें संभवत नाहीं. तेलंग म्हणतात त्याप्रमाणें चुकून 'व' चे जागीं 'न' पडला असावा; पण पुढील 'राज्ञा' या पदाशीं त्याशीं समास आहे, हें यांत वैगुण्य आहे. अगर चुकून एक अक्षर 'वे' हें खोदावयाचें राहिलें आहे. खोदावयाला कांहीं शास्त्री पंडीत नसतात. तेव्हां गवंड्यांच्या हातून अशा चुका होतील. अशोकाचे शिलालेख ज्यांनीं काळजीनें वाचले असतील त्यांच्या हें सहज लक्षांत येईल. प्राकृत शब्द संस्कृत शिलालेखांत तुरळक दिसतात ते यामुळें च. शिवाय 'अनंत देव' याचें महाराष्ट्री रूप झालें च तर 'अनंतदेओ' (गउडवहो ५१० देओ.) व अपभ्रंश रूप, 'अनंतदेउ' आणि तें च पुढें मराठींत हि येईल. 'अनंत दे' असें येणार नाहीं. यें, आलें च अशी कल्पना करून चालले तर त्यास रा. राजवाड्यांच्या मराठी कारकांत कोठें जागा च नाहीं; मग त्याची तृतीया कशी करावयाची! (हा. व्या. पा ४९) "पुल्लिंगी शब्दांच्या अंत्यास अ, औ, आ, इ, ई, उ, ऊ, ऐ, ओ असे ९ स्वर येतात."-त्यांत 'ए' ला जागा च नाहीं. ९ हा आकडा जर त्यांनीं आपल्या सूत्रांत घातला नसता, तर अमुक पण उद्दिष्ट म्हणून 'ए' चा हि त्यांत समावेश करतां आला असता. या च शिलालेखांत ७५ व्या ओळींत 'श्रीमदनंतदेवेन' असे स्पष्ट शब्द आहेत, त्यांनीं तर या मराठी 'अनंतदे' च्या शोधाचा भंग च मिटतो. कांहीं तरी पूर्वग्रह मनांत ठेवून लोकांस फुकट नांवें ठेवून नवीन शोध लढवीत बसण्यापेक्षां, त्या च शिलालेखांतील इतर भागाच्या संदर्भानें हा भाग लावण्याचा सारासार विचार व युक्ति यांच्या साह्यानें प्रयत्न केला असतां, सर्व नीट लागण्याचा संभव नेहमीं फार असतो.

" सोमणेय, भामण, धणम" हीं देश्य नावें दिसतात. तीं पूर्वापर चालत आलेलीं असणार; त्यांत विशिष्ट मराठी असें कांहीं आहे, कीं जें प्राकृतांत नाहीं, अशांतला प्रकार मुळीं च नाहीं. त्याचप्रमाणें नोर शब्दाचें. हा जसा मराठींत कोल्यांचा देश्य शब्द म्हणून आला, तसा च मराठी पूर्वी प्राकृतांत नव्हता असें कशावरून ! प्राकृत काळीं म्हणजे रा. राजवाड्यांच्या मताप्रमाणें ६।७ शतकां पूर्वी समुद्रावरील आयात, निर्गत व्यापार व तद्वाचक शब्द नव्हते असें कोणी प्रतिपादन करील असें वाटत नाहीं.

३. असें च शक ९२२ तील 'थोर, करणिक' या शब्दांचें. 'थोर' हा शब्द प्राकृतांत हि आहे; फक्त ऱ्हस्वदीर्घाचा च फरक आहे (गउडवहो १५८,७९७ इत्यादि). 'करणिक' हें स्वरभक्तीचें उदाहरण आहे; आणि स्वरभक्तीचा मक्ता फक्त मराठीनें च घेतला नाहीं हें "भारिआ, सिनाव" इत्यादि प्राकृत शब्दांवरून उघड होतें.

४. शक ९०० तील शिलालेखा मधील 'सांम्राज्य' याचें हि असें च. दोन विशिष्ट व्यंजनांमध्यें-पैकीं एक अनुनासिक असला पाहिजे—अनुनासिकाच्या वर्गां-पैकीं मध्य व्यंजन हें उच्चारसौकर्यार्थ येतें. उ. "आम्र, ताम्र" वरून पुढें "आम्बा, तार्म्बे"; अशिष्ट मराठी "वान्दर, कम्बळ, अम्बळशार्ने" इ. (Pischel२०१. गउडवहो, तम्बिर, ३५,७३८; तम्बिमा ११४०), 'सांम्राज्य' हें पुनः संस्कृतामुळें विकृत झालेलें प्राकृत रूप आहे.

५ पासून १३ अखेर. असें च शक ८१०, ८३२, ७५७, ७२८, ९७९-८०, ६७५, ६२१ आणि ६०२ या शिलालेखांतील "न्हा, पुन्य, जो, सिंघ, शुद्ध, थिति, रिपु, वासावका, वहरि, यश ( खरोखर प्राकृत 'यस अगर जस' पाहिजे ), निशेप, यज्ञ, दोसिराज, खुंक, ह्नि, पन्नास, प्रिथिवी " हे, व आणखी ५ गांवांचे नांववाचक शब्द यांतील एक हि शब्द असा नाहीं कीं, जो प्राकृतांत सांपडणार नाहीं. ( वहरि—मण्डलग्गाण—गउडवहो ९२८; सिंघ—हेमचन्द्र १.२६४ हा घोनुस्वारात्. व Pischel 184. न्हाण मणुव कण्हसुत्र. Jacobi p. ५० ). संस्कृत पुण्य चें प्राकृत पुण्य आणि पुन्न असें होतें. येथें संस्कृत शब्दावर लेखकाचा संस्कार होऊन सरावांत पडलेला 'न' कार संस्कृतांत घुसला. प्राकृतांत हि 'यत्' या सर्वनामाला 'जो' हा आदेश होतो. ( गउडवहो—जो—२, २०, ५१, १०४ इत्यादि ). 'छेपाटी' शब्द मुळांत नाहीं. छेपादीसेन आहे १०१६ तल्या शिलालेखांत ' जो ' शब्द दोनदां आला आहे; तो समासामध्यें आहे. ( ओ. ६७ ) "भाण्डागारे प्रथम छेपादीसेन महाप्रधान श्रीमहादेवेय प्रभुः; द्वितीयच्छेपादी ( ६८ ) सेनप्रधान श्रीसोमणेय प्रभुः" येथें 'छे' मागल्या शब्दावरोवर घेऊन 'पाधीसेन' हें विशेषनाम करून तेलंगांनीं अर्थ केला आहे. "While in the first rank at the treasury is the great minister Padhisena etc". 'छे' मागील शब्दावरोबर घेऊन त्याची

संगति कशी लागते हें त्यांनीं दाखविलेलें नाहीं. रा. राजवाडे छेपाटी ( 'ट' कसा वाचतात ठाऊक नाहीं; दोन्ही ठिकाणीं 'द' स्पष्ट आहे. ) वाचतात व तो मराठी शब्द आहे म्हणतात, पण अर्थ सांगत नाहींत. मला हि त्याचा अर्थ लागत नाहीं. 'गोंडिमार्ग' हें देशी–संस्कृताचें बनलेलें सेवर आहे, द्य व वडवली, घोरपड हे शब्द, शके १०५९ च्या शिलालेखांत, म्हणजे ज्या काळीं मराठी बनत चालली अगर जवळजवळ बनली होती त्याकाळीं आले असल्यानें, त्यांच्यामुळें माझ्या मूळ सिद्धांतास बाध येत नाहीं. असो.

मराठी भाषा फार जुनी, ५।६ शतकांपर्यंत जाऊन पोंचणारी आहे असें दाखविल्यानें तिचें महत्त्व कांहीं वाढतें अशांतला भाग नाहीं. ती ११ व्या शतकापुढची असें म्हटल्यानें, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, यथार्थदीपिका, दासबोध, अभंग, केकावलि इत्यादि तिच्यांतील अमोल्य रत्नांची किंमत कमी होते असें हि नाहीं. संशोधकानें कोणच्या हि तर्हेचा पूर्वग्रह अगर अट्टहास धरून बसतां कामा नये; जी साधनसामग्री, निश्चित निःसंशय स्वरूपाची असेल, ती पद्धतशीर चिकित्सा करून साधकबाधक प्रमाणांनिशी पुढें मांडावी; व त्यांतून युक्तीला धरून व म्हणून च तज्ज्ञसंमत होतील अशीं प्रमेयें काढावीं. पौराणिक संशोधनाचा हा च एक राजमार्ग. त्यानें जातांना कदाचित् स्वतःच्या स्वाभिमानाला अगर देशाभिमानाला अगर भाषाभिमानाला न पटतील अशा गोष्टी कबूल कराव्या लागतील त्याला इलाज नाहीं. शिवाय, आपलीं ठाम मतें, बद्धमूल समजुती सबळ प्रमाणाअंतीं बाजूस ठेवाव्या लागतील, नव्हे, त्यांस मुकावें हि लागेल. उदाहरणार्थ, पुढील काळांत कदाचित् जास्त विश्वसनीय पुरावा उपलब्ध होऊन मराठी ही शकाच्या हि पूर्वी नेऊन बसवावी लागेल; पण तसा तो सबळ, विश्वसनीय पुरावा येई पर्यंत, लेच्यापेच्या, असमाधानकारक व संशयित स्थितींत असलेल्या पुराव्याच्या जोरावर कोणी कोणाच्या डोळ्यांत धूळ टाकूं लागेल तर ती टाकूं देणें खऱ्या संशोधनाच्या दृष्टीनें केव्हां हि इष्ट नाहीं।

पांडुरंग दामोदर गुणे

# चमत्कारिक लोकसमजुती, लोकाचार वगैरे

मुहूर्त, शकुन, वगैरे लोकसमजुती सर्व देशांतून व सर्व लोकांतून आढळून येतात. परंतु कांहीं समजुती, कांहीं प्रांतांत व कांहीं लोकांत च आढळतात. देवांविषयीं जीवांविषयीं, भुतांविषयीं, निर्जीव पदार्थांविषयीं, सजीव पदार्थांविषयीं, अनेक समजुती आढळून येतात; त्यांपैकीं म्यां केलेलीं टाचणें कांहीं येथें देतों.

१ देव अनेक आहेत व ते अनेक गोष्टी करणारे आहेत. त्यां पैकीं, कांहीं असे आहेत कीं आपणास अन्यायानें छळणाऱ्याविषयीं, किंवा वैऱ्याविषयीं, फिर्याद केली असतां व त्याजपुढें नारळ फोडून आपल्या वैऱ्याचा नाश करावयास सांगितलें असतां, त्यास ते अनेक प्रकारच्या पीडा करितात. ह्या प्रकाराविषयीं बोलतांना देव घालणें, देव घातला, देव लागला, ज्यानें देव घातला त्याजकडून लागलेल्या देवाच्या नांवानें आंगारा लावा म्हणजे तुम्हास बरें वाटेल वगैरे प्रकारचीं बोलणीं नेहमीं ऐकावयांत येतात. आपल्या मंडळापुढें ' देवस्की ' विषयीं कागद आलेले आहेत, त्यांत ह्या बाबतींत अधिकाऱ्याकडे फिर्यादी झालेल्याच्या हकीकती आहेत.

२ एकाद्यानें दुसऱ्यास विनाकारण त्रास वगैरे दिला असतां, त्रास पावलेलें माणूस मोठमोठ्यानें ओरडून शिव्याशाप वगैरे देतें, दांत खाऊन संतापानें जमिनीवर हात आपटतें. ह्यास " दांतकिसळी " असें म्हणतात; व एकाद्या माणसाविषयीं अशी समजूत आढळून येते कीं, त्याची दांतकिसळी वैऱ्यास लागते व त्याचा नाश होतो. अशा माणसाशीं लोक तंटाबखेडा करीत नाहींत, व म्हणतात कीं त्याची दांतकिसळी फार वाईट आहे.

३ जैन लोकांच्या देवळांतून त्यांच्या तीर्थकरांच्या मूर्ती असतात. त्या नग्न असतात. त्या नागव्या देवांचें दर्शन घेऊं नये अशी हिंदू लोकांत समजूत आहे. जैन लोकांच्या देवास खवणोबा म्हणजे नागवा देव असें नांव कुणबी वगैरे लोकांत क्वचित् आढळतें. ' खवणा ' म्हणजे नागवा हा शब्द ज्ञानेश्वरींत येतो.

४ सातारा जिल्ह्यांत कराड तालुक्यांत मसूर गांवा शेजारीं ' थोरोबा ' नांवाचा देव आहे, तो ज्या डोंगरांत आहे त्यास थोरोबाचा डोंगर म्हणतात. ह्या देव म्हशींच्या पीडा नाहींसा करणार आहे. म्हैस आजारी झाली किंवा दूध देईनाशी झाली म्हणजे ह्या देवास नवस करितात. म्हैस व्याली म्हणजे तिच्या तुपाचा दिवा त्या देवास लावल्या वांचून, म्हशीचें दुभतें घरांतील मुख्य माणसानें खाऊं नये अशी आसपासच्या शेतकऱ्यांची समजूत आहे. देवापुढें दिव्याकरितां सांठविलेल्या तुपास " दीपत " असें म्हणतात, व सांठविण्याचा क्रियेस " दीपत धरणें " असें म्हणतात.

६

५ आपल्या कुलदेवतेच्या दर्शनास जाण्यास फावलें नाहीं, म्हणजे कुलदेवतेस जाण्याच्या मार्गावर एकाद्या शेतांत, मध्यांत त्या देवतेस नैवेद्य, समाराधना वगैरे करितात, म्हणजे कुलदेवतेच्या दर्शनास गेल्या प्रमाणें होतें. ह्यास " मार्ग, मारग मळणें " असें म्हणतात. हा प्रकार ब्राह्मण मराठे वगैरे सर्वांत आहे.

६ सातारा जिल्ह्यांत म्हसवड म्हणून गांव आहे. त्या गांवच्या बाहेर एक दगडांची खाण आहे. त्या खाणींतून दगड काढतांना, मध्यभागीं, स्तंभाकार असा खडक राखून ठेवला आहे; त्याच्या माथ्यावर थोडी माती आहे, त्यामुळें तेथें एक अगदीं ल्हान वडाचें झाड वाढलें आहे त्या खालीं दोन देवता आहेत; एक खरजाई व दुसरी खोकलाई. त्यांस नवस केला असतां मुलांची खरूज व खोकला जातो अशी लोकांची समजूत आहे.

७ भैरव–देवास ' क्षेत्रपाल ' म्हणतात. काशी क्षेत्रांतील भैरवास काशी क्षेत्राचें रक्षण करणारा कोतवाल किंवा फौजदार समजतात. भूतपिशाच्यापासून तो लोकांचें रक्षण करितो. भैरव देवाला ' नाथ, सिद्ध ' अशी संज्ञा आहे. म्हसवड सिद्ध, खरसुंडसिद्ध वगैरे हे सर्व भैरव देव च आहेत. कोल्हापुरा जवळील रत्नागिरीचा जोतिबा हा हि भैरव च होय. हा काशीचा भैरव देव येथें आला आहे असें समजतात. " उत्तरेचा देव दक्षिणेस आला " असें त्याच्या आरतींत च आहे. ह्याला भांग, गांजा हे पदार्थ फार प्रिय आहेत असें समजतात. रात्रीं देवाची शेजारती झाल्यावर पाण्याचा तांब्या, पंचपात्री ठेवितात, त्याप्रमाणें गांजाची चिलीम हि मध्यें च देव जागा झाला असतां, त्यास ओढतां यावी म्हणून भरून ठेवतात. भैरव देव हा देवांतील कोतवाल किंवा फौजदार आहे, अशी समजूत असल्याचें वर सांगितलें च आहे.

८ प्रत्येक हिंदु मनुष्याचा एकादा देव कुलस्वामी असतो, किंवा एकादी देवता कुलस्वामिनी असते, किंवा एकादें दैवत कुलदैवत असतें. ह्या शिवाय बायकांच्या माहेराकडील दैवतें कारणवशात् देव्हान्यांत येतात. त्यांना पाहुणे देव म्हणतात. मुलाबाळांना कांहीं आजार वगैरे झाला असतां, किंवा बायकांच्या माहेरचा वंश नष्ट झाला असतां, तिकडच्या जिनगीबरोबर किंवा एरवी च एखाद्याच्या घरीं हे पाहुणे येतात अशा समजुतींवर पाहुण्या देवांची ही गर्दी घरच्या देवांपेक्षां हि कधीं कधीं अधिक होते.

९ लोकांच्या देव्हान्यांत देवांचे टांक असतात. टांक ह्या शब्दाचा अर्थ छाप असा आहे. सोनाराच्या घरीं उठावदार असे निरनिराळ्या खंडोबा, जोतिबा, वगैरे देवांचे व तुकाई, यमाई वगैरे देवतांचे ठसे असतात. त्यावर रुप्याचा अगर सोन्याचा पत्रा ठोकून, हे टांक बनवितात. कोणा मराठ्याच्या घरीं लग्न उमें राहिलें म्हणजे, वधूवरांचे आजाआजी ह्यांच्या नांवांचे टांक करून देव्हान्यांत ठेवण्याची चाल

आहे; असें न केल्यास पितरांचा कोप होतो अशी समजूत आहे. एखाद्या मनुष्याच्या घरच्या माणसांच्या दुर्लक्षामुळें हाल होऊन तो मेला, व लागली च घरांतील कोणी माणूस आजारी पडलें, तर किंवा कांहीं संकट ओढवलें तर त्या मेलेल्या माणसाचें पिशाच होऊन त्या पासून हा त्रास होतो असें समजून, त्याच्या नांवाचा एक टांक करून देव्हाऱ्यांत बसवितात व देवांबरोबर त्याची हि पूजा करितात.

१० खंडोबा, मल्हारी, म्हाळसाकांत, मार्तंड इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असणारा देव, ब्राह्मण मराठे वगैरे वरिष्ठ जातींतील लोकांचा कुलस्वामी आहे. ह्या लोकांच्या भावनेहून ह्या देवतेविषयीं निराळी भावना रामोशी, मांग वगैरे लोकांची आहे. त्यांची समजूत हा देव प्रसन्न असला म्हणजे आपल्या चोऱ्यांच्या व दरवड्यांच्या धंद्यांत आपणास बरकत येते. जेजोरी, पाल वगैरे ठिकाणीं, श्री खंडेरायाच्या दर्शनास ह्या लोकांची फार गर्दी झालेली असते. प्रसिद्ध उमाजी नाइकाच्या पोवाड्यांत, तो रचणाऱ्या शाहिरानें, उमाजीस फांशी देण्याचे वेळीं, त्यानें " मल्हार गाजिवला " म्हणजे खंडोबाचें नांव मोठ्यानें घेतलें व त्यामुळें त्याचा फांस वारंवार तुटल्याचें वर्णन केलें आहे. ह्या वर्णनाच्या मुळाशीं वरील समजूत च आहे.

११ कऱ्हाडा शेजारीं एकवीरा नांवाची एक देवी आहे. तिचे भक्तांत मांगरामोशांचा भरणा मोठा आहे. खंडोबाप्रमाणें च ह्या देवीविषयीं हि ह्या लोकांची समजूत आहे.

१२ अमुक वार अमुक देवाचा, अशी त्यांची लोकसमजुतीप्रमाणें वांटणी झाली आहे. रविवार, सूर्य, भैरव, खंडोबादिकांचा; सोमवार महादेवाचा; मंगळवार देवीचा म्ह० पार्वतीचा; बुधवारास कोणी देव अजून मिळाला नाहीं; गुरुवार दत्ताचा, ज्याचा जो गुरु असेल त्या गुरूचा, पिराचा वगैरे; शुक्रवार महालक्ष्मीचा, लक्ष्मीनारायणाचा; शनवार मारुतीचा, नरसोबाचा, शनीचा; इत्यादि प्रकारच्या समजुती आहेत. सोमवार, मंगळवार, शनवार हे वार ज्या ग्रहांवरून त्यांचीं नांवें पडलीं आहेत त्यांच्या दुष्टत्वामुळें हि कित्येक तसें च समजतात. मंगळवारीं दिवसां व शुक्रवारीं रात्रीं कोणता हि चेत करूं नये; केला तर तो सिद्धीस जात नाहीं, ही समजूत सातारा जिल्ह्यांत फार आहे व याचें कारण असें सांगतात कीं, शाहूराजांना ज्योतिष्यानें सांगितल्यावरून ते तसें वागत असत. लोक हि विचार न करितां त्या च समजुतीनें वागूं लागले.

अमुक वारीं न्हाऊं नये, अमुक वारीं मुलगी सासऱ्याहून माहेरास किंवा माहेराहून सासऱ्यास जाऊं नये, शनवारीं लाकडें व तेल आणूं नये अशी समजूत आहे, म्हणून शनवारीं ह्या जिनसांस गिऱ्हाईक अगदीं कमी असावयाचें वगैरे पुष्कळ समजुती प्रसिद्ध आहेत व त्या फलज्योतिष्यांनीं वाढविल्या असें म्हणतात.

१३ सातारा जिल्ह्यांत माण तालुक्यांत शिंगणापूर नांवाचा गांव आहे. तेथें डोंगरावर महादेवाचें प्रसिद्ध स्थान आहे. ह्या गांवास महादेव व शिखर-शिंगणापूर

ह्या नांवांनीं हि ओळखतात. पश्चिमेकडे कृष्णेपासून, उत्तरेकडे नीरेपासून, पूर्वेकडे भीमेपासून व दक्षिणेकडे वारणेपासून चढत चढत जाणाऱ्या भूप्रदेशाची परम उंची म्हणजे हा महादेवाचा म्हणजे शिंगणापूरचा डोंगर आहे. म्हणजे ह्या भूप्रदेशाचें हें शिखर आहे, म्हणून ह्या शिंगणापुरास शिखरशिंगणापूर असें म्हणतात. कोल्हापूराजवळ शिंगणापूर नांवाचें एक क्षेत्र आहे, त्यापासून ह्याचा निराळेपणा हि ह्या नांवानें व्यक्त होतो. येथील महादेव महाराष्ट्रांतील पुष्कळ मराठे लोकांचा कुलस्वामी आहे. ज्यांचा हा कुलस्वामी आहे त्यांच्या घरीं, वडील पुत्राचें लग्न झालें म्हणजे, देवास ओव्हर यात्रा–विवाहित वधुवर देव दर्शनास जाणें–जाते. त्या वेळीं वधूवरांचें वपन करण्याची चाल आहे. वधूच्या डोक्यावरील सर्व केंस काढून टाकतात. ह्या अशा प्रकारचें क्षौर देवाला फार प्रिय आहे, व तें केलें असतां वधूवरांचें कल्याण होतें अशी समजूत आहे.

१४ श्रीरामचंद्राचे पुत्र कुश आणि लव असे दोघे होते हें प्रसिद्ध च आहे. ह्यांपैकीं लवाच्या उत्पत्तीविषयीं कुणबी वगैरे लोकांत चमत्कारिक समजूत आहे. तीविषयीं गोष्ट सांगतात ती अशीः—

श्रीरामचंद्रांनीं सीतेचा त्याग केल्या वर, ती फिरत फिरत तातोबाच्या मठांत आली ( तातोबा हा शब्द वाल्मिकी ऋषीबद्दल आहे ). ती गरोदर असल्यामुळें तिच्या शुद्धतेविषयीं तातोबानें संशय घेतला आणि म्हणाला कीं, तूं शुद्ध असशील तर माझ्या मठांत तूं गंगेचा ओघ आण. सीतेनें गंगेचा धांवा केल्याबरोबर सर्व मठांत गंगोदक भरलें. मग तिनें प्रार्थना करितां च गंगा ओसरून गेली. ह्याप्रमाणें तिचें सत्त्व पाहिल्यावर, तातोबानें आपल्या मठांत तिला आपली मुलगी म्हणून ठेऊन घेतलें. पुढें ती प्रसूत होऊन तिजला एक पुत्र झाला. त्याचें नांव अंकुश ( लवांकुश असा दोघांच्या नांवांचा उल्लेख सामान्य लोक करितात ).

एके दिवशीं सीताबाई अंकुशास पाळण्यांत निजवून धुणें धुण्याकरितां नदीवर गेली. मुलगा पाळण्यांत झोपीं गेला होता, त्याकडे लक्ष ठेवण्याबद्दल तिनें तातोबास सांगितलें. सीता नदीवर धुणें धूत असतां नदीकांठच्या वृक्षांवर वानरस्त्रिया आपापल्या मुलांस पोटीशीं घेऊन ह्या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत आहेत, असें त्यांचें प्रेम पाहून तिला आपल्या मुलाची आठवण होऊन पान्हा फुटला आणि नदीवर धुणें तसें च ठेऊन ती मुलास पाजण्या करितां मठांत आली. पाहते तों मुलास झोंप लागली असून मठांत तातोबा नाहींत. मग मुलास पाजून ती त्यास घेऊन नदीवर गेली. तिला वाटलें कीं, एखादी वानरीण येऊन तिनें जर आपला मुलगा नेला तर काय करावें ! तातोबा तर मठांत नाहींत ! नदीकाठीं मुलास दुपट्यावर निजवून ती धुणें धुऊं लागली. इतक्या अवकाशांत तातोबा जवळपास गेले होते ते परत येऊन पाळण्यांत पाहतात, तों मुलगा नाहीं. तेव्हां ते घाबरले ! सीता नदी वरून धुणें धुऊन परत आल्यावर मुलगा नाहींसा झाला हें पाहून तिला केवढें दुःख होईल व ती

मोठा अनर्थ करील ! असें मनांत आणून, त्यांनीं नदींतील लव्हाळ्याचा एक पिंडा तयार करून तो मुलाच्या जागीं पाळण्यांत ठेऊन, ते पाळणा झुलवीत बसले व आपल्या तपोबलानें त्या लव्हाळ्याच्या पिंड्याचा त्यांनीं मुलगा केला। नदीवर धुणें धुऊन अंकुशास कडेवर घेऊन सीता मठांत आली. तातोबास, मोकळा पाळणा कां झुलवितां, म्हणून तिनें प्रश्न केला. ह्या सर्व प्रकार पाहून तातोबा चकित झाले. तेव्हां त्यांनीं सर्व प्रकार तिला सांगितला आणि म्हटलें कीं, ह्या लव्हाळ्यापासून झाला म्हणून लोक ह्याला "ल्हवू" असें म्हणतील. ह्याप्रमाणें "ल्हवांकुशाची" जोडी आपणास देवानें दिली हें पाहून सीतेस आनंद झाला; त्या मुलास पाहून तिला पान्हा फुटला व तिनें त्याकडून स्तनपान करविलें. लव्हाळ्यापासून लहू झाला अशी लोकांची समजूत आहे.

१५ सातारा जिल्ह्यांत पंत प्रतिनिधींचें औंध म्हणून संस्थानाचें मुख्य ठिकाण आहे. तेथें जी देवी आहे, तिला यमाई असें म्हणतात व तुळजापूरच्या देवीस तुकाई म्हणतात. अशीं नांवें कां पडलीं या विषयीं लोकांत एक चमत्कारिक दंतकथा चालू आहे.

श्रीरामचंद्र अरण्यवासांत असतां, रावणानें सीता नेली, तेव्हां शोक करीत ते अरण्यांतून " सीते सीते " अशा हांका मारीत हिंडूं लागले. तेव्हां रामाची परीक्षा पाहण्याकरितां श्री भवानी देवी, शंकर नको नको म्हणत असतां सीतेचें रूप घेऊन अरण्यांत त्यांच्या समोर आली. परंतु, रामचंद्र अंतरसाक्ष परमेश्वर. ते हंसून भवानीकडे पाहून म्हणाले, कीं " ये माई " असें म्हणून त्यांनीं तीस नमस्कार केला. तेव्हां ती गुप्त झाली; जेथें ती गुप्त झाली, त्या औंधच्या डोंगरावर श्रीरामांनीं तिची स्थापना केली. रामांनीं " ये माई " असें म्हटलें म्हणून "यमाई" असें लोक म्हणतात. पुन्हां एकवेळ रामचंद्रा पुढें सीतेचें रूप घेऊन देवी भवानी आली; तथापि, रामचंद्र सत्त्वास न ढळतां तीस ओळखून म्हणाले कीं, " तूं कां आई " म्हणजे आई पुन्हां तूं कां आलीस ! हें पाहून देवीस आनंद होऊन, तुम्ही व सीतेची भेट लवकर च होईल, असा रामचंद्रास आशीर्वाद देऊन ती अंतर्धान पावली. जेथें रामचंद्रांनीं या देवीची स्थापना केली तें च तुळजापूर होय. अशी लोकांची समजून आहे.

१६ वर सांगितलेल्या देवी, ज्यांच्या घरीं कुलदेवता म्हणून आहेत, ते लोक वेळच्या वेळीं देवीसंबंधाचीं करावयाचीं कृत्यें करण्यास चुकले, तर त्या देवी क्षुब्ध होऊन फार पीडा करितात. विशेषेंकरून घरांतील माणसांस व त्यांत हि मुलांबाळांस सरूज, सवडे, नायटे वगैरे पीडा फार होतात, अशी समजूत आहे.

१७ ह्या देवींच्या भक्तांस, आरादी, भोपी किंवा मुते ( मुत्या हें एकवचन ) अशीं नांवें आहेत. कवड्याच्या माळा, घामट व तेलकट कपडे, ह्यांत देवीचा

पात म्हणजे मशाल घेऊन भीक मागत फिरतांना हे नेहमीं आपणास आढळतात. ह्यांच्या भिक्षेस जोगवा असें म्हणतात. कित्येक लोकांच्या ( ज्यांच्या घरीं ह्या कुलदेवता आहेत त्यांच्या ) घरीं, नवरात्रांत येणाऱ्या मंगळवारीं किंवा शुक्रवारीं घरच्या मालकानें जोगवा मागत गांवांत हिंडावें लागतें. कित्येकांच्या घरीं अशी चाल आहे कीं, घरच्या कर्त्या पुरुषानें म्हारवाड्यांत जोगवा मागितला च पाहिजे.

ह्या देवींच्या भुत्यांनीं मुलाबाळांच्या अंगावरील खरूज चाटली असतां, लवकर बरी होते अशी समजूत आहे. असें काम करणारे कांहीं भुते असतात.

१८ देवीचे मातंगी, बगलामुखी वगैरे कित्येक अवतार आहेत. शाक्त लोक ह्या देवींना मद्यमांसाचा नैवेद्य समर्पण करून, मग ह्या खाद्य-पेयाचा स्वीकार करितात असें म्हणतात. ह्या देवींचा जोगवा मागण्यास गदा मागणें असें म्हणतात.

१९ मल्हारी, मार्तंड किंवा खंडोबा ह्या नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या देवास मलूखान असें नांव पडलें आहे; व त्याच्या नांवानें मागावयाच्या भिक्षेला मलूखानाची वारी किंवा गदा असें हि म्हणतात.

२० धनगर लोकांचे देव बिरोबा, हणगोबा, नागोबा, विठोबा, नागाई, भागाई, म्हाकूबाई, मायाक्का वगैरे नांवांचे आहेत. ह्यांच्या विषयींच्या कथा या लोकांच्या तोंडून ऐकल्या असतां, तीं धनगर लोकांपैकीं च चांगलीं माणसें होतीं असें दिसतें. मेंढजोगी नांवाचे जे लोक आहेत, ते धनगर लोकांचे भाट आहेत. त्यांस धनगर लोकांच्या कुळ्या पाठ असतात. मेंढजोगी हे डवऱ्यासारखे च वागतात. त्यांच्या हातांत डौर असतो, परंतु डवऱ्याप्रमाणें ते भैरवाचे भक्त नसून शिवोपासक दिसतात. मेंढजोगी एखाद्या धनगराच्या वाड्यावर (एका धनगराच्या ताब्यांतील सर्व मेंढरांस मिळून वाडा असें म्हणतात. ) भिक्षेस गेला असतां, त्याला त्या धनगरानें एक मेंढरूं दिलें पाहिजे असा त्यांचा हक्क आहे. मलेकर, झटकर, खुटेकर, कुचेकर वगैरे धनगरांच्या मुख्य कुळ्या व त्यांच्या पोटकुळ्या ह्या मेंढजोग्यांना ठाऊक असतात.

२१ धनगरांच्या देवांचा व आमच्या श्रुतिस्मृतिपुराणेतिहासांचा कांहीं संबंध दिसत नाहीं. ह्यांचा सर्व खाका स्वतंत्र च दिसतो. ह्यांच्यावर ब्राम्हणांचें गुरुत्व नाहीं. ह्यांच्यांत गावडा, गुरव, शिद म्हणजे सिद्ध इत्यादि अधिकारी असतात. ते ह्यांच्या समाजांतील लोकांस आचारविचारांतील चुकांबद्दल दंड करितात. देवापुढें ढोल बडवून निरनिराळ्या पद्धतीनें नाचावें, देवापुढें बकरीं मारून त्यास त्यांच्या मांसाचा नैवेद्य अर्पण करावा, येवढी च ह्यांची भक्ति करण्याची तऱ्हा आहे. हे आपल्या देवास पाणी घालितात तेव्हां, " हराहराहरा " असे शब्द करितात. ढोलाच्या तालावर नाचणाऱ्या लोकांस गजे म्हणतात ( ह्या शब्दाचें एकवचन गजा ). भाविक लोक देवाची जत्रा वगैरे असली म्हणजे ह्या गजास जेवावयास घालतात. मी अमुक बकऱ्याचें ( मेंढ्याचें ) खांड तुला देईन, असे ह्यांचे आपल्या देवास नवस असतात. त्याप्रमाणें जत्रेच्या वेळीं बकऱ्यांचीं खांडें म्हणजे टोल्या आणून देवा पुढें बळी देतात.

धनगर लोकांत विठोबा म्हणून जो एक देव आहे, त्याचे हात हि कमरेवर च ठवलेले असतात. ह्यास लोक धनगरी-विठोबा म्हणतात व पंढरीच्या पांडुरंगास ब्राम्हण विठोबा म्हणतात.

२२ धनगर लोकांत लग्न लावण्यास ब्राम्हणाची गरज नसते. लग्नाचा दिवस असेल त्या दिवशीं, नवरानवरी बहुल्यावर सायंकाळीं बसवावयाचीं व कोंकरें एकदम सोडून द्यावयाचीं. तीं आपापल्या आईस पिऊं लागलीं म्हणजे ती च मुहूर्त वेळ. त्या वेळीं जमलेल्या मंडळींनीं वधूवरांवर तांदूळ दाणे टाकावयाचे म्हणजे लग्न लागलें. ग्रामजोशी वगैरे तेथें जातात, त्यांस ते त्यांचा हक्क म्हणून कांहीं देतात. तरी ब्राम्हणां-वांचून त्यांचें अडत नाहीं.

२३ कित्येक गुजराथी जैन श्रावकांत, वधू-वरांच्या लग्नाचा मुख्य विधि उकिरड्यावर होतो. अलीकडे ही चाल मोडून, बहुलें घालून लग्नें लावण्याची चाल पडूं लागली आहे.

२४ मांगांनीं आपल्या घरापुढें जो मांडव घालावयाचा त्यास तीन च मेढी असाव्या लागतात. ते जर चार मेढ्यांचा मांडव घालतील तर महार लोक जाऊन तो मोडून टाकितात.

२५ तुळशीच्या लग्नाच्या दिवशीं (कार्तिक शु॥ १२) भटजी घराकडे येत असतां व लग्न लावून परत जात असतां, त्याच्या अंगावर आवळे टाकण्याची चाल कुणबी वगैरे लोकांत आहे. पोरेंबाळें तर आवळ्यांचा वर्षाव च करितात. ह्यामुळें कित्येक भटजी त्याकडे लग्न लावण्यास जात च नाहींत. आवळे न मारण्याची कबुली घेऊन मग जातात.

२६ महार, मांग, चांभार ह्यांच्यांतील नवऱ्यास घोड्यावर बसण्याचा हक्क नाहीं. त्यांच्यांतील वधूवरांच्या मिरवणुकी सर्व पायीं च होतात. ते जर घोड्यावरून मिरव-तील तर त्यांस मराठे लोक मार देतील. पूर्वीं सुतार, कासार वगैरे पंचाळ लोकांस हि हा नियम लागू होता. परंतु हल्लींच्या सुधारलेल्या काळांत हे लोक खरे च सुधारक झाल्यामुळें त्यांनीं हा नियम झुगारून दिला आहे.

२७ चालूं सालीं पाऊस कसा पडेल, धारण कशी राहील वगैरे भाकीत सांग-णारे "मेढंगी" म्हणून लोक आहेत. हे रात्रीच्या वेळीं निरभ्र आकाश असतें तेव्हां, नक्षत्रें व तारे यांचें अवलोकन करितात. नक्षत्रें व राशी यांचीं नांवें त्यांस माहीत असून, त्यांच्या आकाशांतील मर्यादा व खुणा ते दाखवूं शकतात. तसें च सर्व ग्रह त्यांस प्रत्यक्ष दाखवितां येतात. अमुक ग्रहाचें अमुक फळ असें ते सांगतात, व शेतकरी धनगर वगैरे लोकांचा त्यांच्यावर विश्वास असतो. ह्यांचें भाकीत खोटें होणार नाहीं अशी त्यांची समजूत असते. कांहीं तारकापुंजांस त्यांचीं नांवें निराळीं आहेत. कृत्तिका नक्षत्राच्या पुंजास ते खाटले म्हणतात. मृग नक्षत्रास ते मांडव म्हण-

मात. मृग नक्षत्रांत जे चार ठळक तारे आहेत जे मृगाचे चार पाय ते, त्या मांडवाच्या चार मेढी समजतात. मृगाच्या पोटांतील तीन तारे, ज्यास मृगाच्या पोटांत घुसलेला बाण असें कोणीं म्हणतात, त्यास हे मांडवांत जेवणारी मंडळी असें म्हणतात; व मृग नक्षत्राच्या पाठीमागें जो ठळक तारा आहे, ज्याला लुब्धक किंवा व्याध असें ज्योतिषी म्हणतात, त्यास हे मांडवांत बसलेल्या वऱ्हाडी लोकांस लुटावयास आलेला चोर असें म्हणतात. मेढंगी लोकांची विद्या गुप्त आहे. ते ती आपल्या विश्वासू मुलास बहुधा शिकवितात. "एक मेढंगी, पावसाचा कांहीं च आगापिच्छा नसतां, उन्हांतून इरलें डोक्यावर घेऊन चालला होता. त्यास दुसऱ्यानें विचारिलें, पाऊस नसतां इरलें कशाला ! मेढंगी म्हणाला, आज पाऊस पडणार आहे. त्या मनुष्यानें त्याची थट्टा केली; परंतु दुपारीं फार मोठा पाऊस आला." इत्यादि प्रकारच्या ह्यांच्या गोष्टी लोक सांगतात. माझा एक मित्र कोकरूड नांवाच्या गांवीं गांवरजिष्टर होता, त्याला ज्योतिषाचा नाद होता. त्या गांवीं एक मेढंगी होता. तो पावसाचें भाकीत बरोबर करी. माझा मित्र त्याच्या नादीं लागला. मेढंगी यास वारंवार मेजवानी करावी, वगैरे प्रकार पुष्कळ केले तथापि, तो प्रसन्न होईना. एके दिवशीं खुषींत असतां त्यानें इतकें च सांगितलें कीं, "आकाशांत एक तारा आहे. त्याजकडे रात्रीं पाहात बसलें असतां त्यांतून ठिणग्या पडतांना कधीं कधीं दिसतात. उन्हाळ्यांत ह्या ठिणग्या जास्ती पडल्या तर, पावसाळ्यांत पाऊस जास्ती पडेल असें समजावें व कमी पडल्या तर कमी पडेल असें समजावें." तो तारा दाखविण्याच्या पूर्वीं च तो मरण पावला.

२८ रात्रीं दिव्याला निरोप देतांना, जुन्या पद्धतीनें वागणाऱ्या बायका, तोंडानें कांहीं पुटपुटतांना आपणास आढळतात. त्या काय बोलतात ह्याची चौकशी आपण करीत नाहीं. एके दिवशीं म्यां हें पुटपुटणें काय आहे ह्याची चौकशी केली, तेव्हां समजलें कीः—दिव्यास दोन बायका आहेत. एक थोरली आहे, ती नावडती आहे. दुसरी धाकटी आहे ती आवडती आहे. नावडत्या बायकोशीं तो बोलत देखील नाहीं. तेव्हां दिव्यास निरोप सांगितला कीं, "तुझ्या थोरल्या बायकोस म्यां विचारिलें आहे म्हणून सांग" जेव्हां हा निरोप सांगण्याच्या निमित्तानें तो आपल्या थोरल्या बायकोकडे जाईल, तेव्हां आपला पती आपल्याशीं बोलला म्हणून तिला फार आनंद होईल. दिव्यास "निरोप" देण्याची चाल सर्वत्र आहे. दिव्यास निरोप द्या, निरोप दिला इत्यादि बोलण्याचा व्यवहार सर्वत्र आहे. त्याचें मूळ ह्या समजुतींत आहे. कदाचित् ही समजूत अत्यंत प्राचीन काळची हि असूं शकेल.

२९ धामण म्हणून एक सर्पाची जात आहे. ह्या धामणीची व म्हशीची दृष्टादृष्ट झाली कीं, म्हैस मरते, अशी शेतकरी लोकांत सर्वत्र समजूत आहे.

३० पाल व विंचू ह्यांची दृष्टादृष्ट झाली म्हणजे, विंचवाची नांगी गळून पडते, अशी कित्येकांची समजूत आहे. तो नांगी खालीं टाकितो व पाल त्यास खाते हें मात्र खरें आहे.

३१ होला ह्या पक्षी एकांतीं बसला म्हणजे "एर्अ उइ॥ एर्अ इउ" ह्या प्रकारचे स्वरोच्चार करून गात असतो. ह्याविषयीं शेतकरी लोकांत चालू असलेल्या समजुतीवरून, त्यांच्यांत एक गोष्ट सांगतात ती अशी. एक भाऊ व एक बहीण अशीं भावंडें होतीं. बहिणीचें नांव कुइ. भावानें आपल्या बायकोस व बहिणीस मोजून सारखे तांदूळ सडावयास दिले. दोघींनीं हि तांदूळ सडून आणिले. बायकोनें चांगले न सडल्यामुळें तिचे तांदूळ अधिक भरले व बहिणीनें चांगले सडल्यामुळें तिचे तांदूळ कमी भरले. तांदूळ कमी भरण्याचें हें कारण भावाच्या लक्षांत न आल्यामुळें, संतापून त्यानें बहिणीस ठार मारिलें, त्यानें प्रथम बायकोनें सडलेल्या तांदुळाचा भात करून खाल्ला व मागून बहिणीच्या तांदळाचा भात करून खाल्ला. तेव्हां बहिणीच्या तांदळाचा भात चांगला रुचकार लागला. त्या वेळीं बहिणीस आपण उगीच मारिलें, असा त्यास पश्चात्ताप झाला; आणि " येगे कुइ ॥ दोघे जिऊं " असें म्हणून रडूं लागला व केलेल्या पापामुळें त्यास होल्याचा जन्म मिळाला. त्याची संतती हे होले आहेत. होला जे स्वरोच्चार करितो त्यावरून ही समजूत व गमतीची गोष्ट निर्माण झाली.

३२ गोमा म्हणून एक काळ्या रंगाचा पक्षी आहे. ह्याच्या पोटावर एक पांढऱ्या रंगाचा टिपका क्वचित् असतो. ह्याचें शेपूट लांब झोंकदार असतें. रानांत चरणाऱ्या गाई इत्यादिकांच्या अंगावर बसलेले लहानमोठे गोमे नेहमीं आढळतात. हा फार धीट आहे. घार, गिधाड, ससाणा वगैरे शिकारी पक्षी याच्या वाटेस जात नाहींत. एकादे वेळीं ह्यांच्या अंड्यांवर किंवा पिलांवर जर एखाद्या शिकारी पक्ष्यानें झडप घातली तर तावडतोब आसपास असलेले पाच चार गोमे त्या शिकारी पक्ष्यावर हल्ला करितात व इतक्या वेगानें, जलदीनें व जोरानें त्यावर आपल्या बारीक व तीक्ष्ण चोंचींनीं वार करितात कीं, तो पक्षी अगदीं घाबरून जातो व मोठ्या कष्टानें आपली सुटका करून घेतो.

ह्या गोम्याच्या मस्तकांत एक मणी असतो व तो आपल्या दंडांत किंवा मनगटांत बांधला असतां, कोणाशीं हि झगडतांना आपणांस मुळीं च भीति वाटत नाहीं अशी महाराष्ट्रांतील मराठे शेतकऱ्यांची समजूत आहे. हें पांखरूं आकारानें लहान व त्याचें धैर्य व साहस फार मोठें. ह्यामुळें च एकाद्या अल्प मनुष्यानें पुढें मोठ्या धारिष्टाचा प्रकार केला असतां "फार गोमा करूं" "नको तुझा गोमा जिरवीन" इत्यादि भाषाप्रयोगांत येणारा "गोमा" शब्द ह्या गोमा पक्ष्यावरून च भाषेंत रूढ झाला आहे.

३३ ऊंस लावण्या करितां शेत तयार झाल्यावर, पूर्वी गाळलेल्या उसांचीं चिपाडें घेऊन, पाठीचा कणा, चार पाय, तोंड, शेपूट वगैरेंच्या खुणा दाखविणारा त्या

७

चिपाडांचा एक आकार तयार करितात, त्यास वाघ म्हणतात. तो एका झाडावर ठेवतात. मग एक इसम वाघ आला वाघ आला अशा प्रकारें ओरडत व सरींत उंसाचीं कांडीं टाकीत शंखध्वनि करीत पळतो व दुसरा मागून त्याच्या अंगावर ढेंकूळ फेकितो. इतकें झाल्यावर, मग उंसाच्या लागणीस सुरुवात होते.

३४ घुबडास कोणीं दगड मारिला असतां, तो तें झेलतें आणि रात्रीं नदी ओढ्यावर जाऊन उगाळीत बसतें, जसजसा तो दगड झिजेल तसतसा दगड मारणारा झिजतो, व झिजून झिजून मरतो अशी पुष्कळांची समजूत आहे.

३५ एकानें दुसऱ्यास देव घातला; व देव घालणारा लबाड माणूस असला तर, देव त्यास च लागतो; व त्याच्या मुलामाणसांचा, घरादारांचा फडशा पाडतो असा समज आहे; असें झालें असतां देव उलटला असें म्हणतात.

३६ शाक्तपंथी लोकांपैकीं कित्येकांच्या घरीं अशी चमत्कारिक चाल आहे कीं, नवरात्रांत नियमित दिवशीं, एका रजस्वला मांगणीस परडी–देवीच्या नांवानें भिक्षा मिळते, ती जींत घेतात ती टोपली–घेऊन बोलावतात. घरचा मालक त्या परडीची पूजा करितो. फल, तांबूल, दक्षिणादिक देऊन, नैवेद्य दाखविला असतो तो तिच्या परडींत टाकतो. इतकें झाल्यावर ती मांगीण आपलें रज त्यास देते. त्याचा टिकला आपल्या कपाळास तो लावतो मग घराबाहेर स्नान करून शुचिर्भूत होऊन घरांत येतो. मातंगी नामक देवीची सुप्रसन्नता अशानें होते अशी समजूत आहे. मातंगीभक्त असतात ते च असें करतात.

३७ चांभार लोकांत अशी समजूत आहे कीं, आपल्या बायका ह्या देवकन्या, गंधर्वकन्या आहेत. ते आपल्या बायकांना राठपणाचीं कोणतीं हि कामें सांगत नाहींत. बायकांस त्यांच्यांत फार मान आहे. जोड्यास रेशीम भरावयाच्या नाजूक कामाखेरीज त्यांस दुसरें काम पडूं नये ह्याविषयीं हे फार जपतात. ह्या चांभार जातीवर धार्मिक अमल चालविणाऱ्या गुरूच्या ठिकाणीं हि स्त्री च असते. तिला सीतादेवी असें नांव आहे. तिच्या स्वारी बरोबर हत्ती, घोडे, उंट वगैरे असतात. चर्मक समाजावर हिचा धार्मिक ताबा आहे. त्या समाजांतील आचार, व्यवहार, प्रायश्चित वगैरे न्याय ती करिते.

३८ जातिवंत मराठे लोकांत बायकांनीं नदी, विहिरी वगैरे सार्वजनिक उघड्या जागीं पाणी आणावयास जावयाचें नाहीं, अशी चाल आहे. ज्यांच्या घरच्या बायका पाणी आणतात त्यांच्या घरची चालरीत बरोबर नाहीं असें समजतात. ह्या लोकांच्या बायका आपल्या शेतांत तयार झालेला माल, भाजीपाला वगैरे, पाटींत घालून बाजारांत विकण्यास कधीं बसत नाहींत व पुरुष हि अशी वागणूक करणें हलकटपणाचें समजतात. रहाट व पाट दोन्ही जातिवंत मराठ्यांत नाहींत. म्हणजे जातिवंत मराठ्यांच्या बायका, रहाटावर सूत काढीत बसत नाहींत व नवरा मेला तर

पाट लावीत नाहींत. घरांत वाकळ वापरणें ही देखील हलकेपणाची चाल आहे असें समजतात. गरिबीमुळें ह्या समजुती क्वचित् बाजूला सारल्या जातात. हलके कुणबी लोक संपन्न झाले असतां, जातिवंत मराठ्यांच्या ह्या चाली घेतात व आपल्या मुली मराठ्यांच्या घरीं पडतील असें करितात; परंतु पुढें ह्या मुली पहिले नवरे टाकून देऊन, दुसरीं लग्नें करितात असें पुष्कळदां होतें.

३९ घोड्यांस पूर्वी पंख होते अशी लोकांची समजूत आहे व घोड्याच्या पुढच्या पायांच्या आंतल्या बाजूस दोन चट्टे असतात तेथें ते होते असें समजतात.

४० शेवग्याचें झाड आंगणांत असूं नये, तसें तें असेल तर घराच्या मालकाचा निर्वंश होतो, अशी पुष्कळ लोकांची समजूत आहे.

४१ कुणबी लोक आपणास बळिराजाचे वंशज असें समजतात.

४२ मांग, मोळाच्या केरसुण्या करितात व ब्राह्मणास मौंजी म्हणजे मोळाची दोरी लागते. ह्यावरून मांग लोक असें अनुमान करितात कीं, आम्ही हि पूर्वी ब्राह्मण च होतों परंतु हीन कर्मानें मांग झालों.

४३ तेली लोकांच्या घरीं शनीची वस्ती नेहमीं असते. तेल्याच्या घरीं बसूं नये, तेल्याचें घर फुकट मिळालें तरी त्यांत राहूं नये व तेल्याच्या गाडींत बसून जाऊं नये, अशी पुष्कळ लोकांची समजूत आहे.

४४ मानभाव लोक न्हावी व तेली ह्यांस आपलें शिष्यत्व देत नाहींत.

४५ मराठे लोक तेल्याच्या व न्हाव्याच्या घरी जेवित नाहींत. परंतु, न्हाव्यास लग्नकार्यादिकांत, स्वयंपाकांत कणिक कुटण्यास बोलावतात व उष्टीं काढावयाचें काम त्यांस सांगतात.

४६ मराठे लोकांत विवाहादि मंगल कार्यांत गांवांतील निरनिराळ्या घराण्यांतील सुवासिनी सांगाव्या लागतात व पुरुष हि मानकरी म्हणून सांगावे लागतात. ह्या मानकऱ्यांस गण म्हणतात. ज्याच्या घरीं "गण–सुवासिणीचें" आमंत्रण येतें त्याचें घराणें गांवांतल्या नामांकितांत मोडतें.

४७ शिंपी, साळी, कोष्टी, सुतार, वाणी, तेली वगैरे ज्या जातींत विधवांशीं पाट लावण्याची चाल आहे, त्यांच्यांत पाट लावणारी स्त्री जशी विधवा असावी लागते, तसा पाट लावणारा पुरुष विधुर असावा लागतो, असा सक्त नियम आहे. त्यांच्यातला विधुर म्हणजे त्याची बायको मेली च पाहिजे असें नाहीं. पूर्वी एक वेळ लग्न होऊन त्या लग्नाच्या बायकोस त्यानें सोडचिट्ठी दिली असली, म्हणजे झालें. ज्याची बायको मेली असेल त्यास " रंडका " म्हणतात व विधवेस " रंडकी " म्हणतात. ज्यांची सोडचिठ्ठी झालेली असते त्या स्त्रीपुरुषांस "लिंग–उतरलेली" व "लिंग–उतर-

लेला" असें म्हणतात. अशा स्त्रीपुरुषांना विधवेचे व विधुराचे पुनर्विवाहाचे हक्क मिळतात. एखाद्या गरिबाचें लग्न होत नसलें, म्हणजे त्याचा कोणी आप्त त्यास आपली मुलगी देतो. ही मुलगी वर्ष दोन वर्षांची किंबहुना ह्याहून लहान असली तरी चालते. अशा तऱ्हेनें लग्न झाल्यावर नवरा नवरीस सोडचिठ्ठी देतो. ह्याप्रमाणें "त्याचा लिंच उतरल्यावर" तो मोठी एखादी विधवा बाई पाहून तिच्याशीं पाट लावतो.

४८ लग्न होतां च जिचा नवरा फार थोड्या दिवसांत मरतो व जिला पतीचा स्पर्श हि माहीत नसतो अशा कन्येस, "हळदीच्या डागाची" नवरी असें म्हणतात. श्रीमान लोक पाट लावीत नाहींत. अविवाहित वधू च पसंत करितात. ते ह्या हळदीच्या डागाच्या नवरीशीं कधीं कधीं पाट लावतात.

४९ जिनें सात वेळ पाट लाविला आहे, तिच्या हातानें हा अंगारा लावा म्हणजे आजारी माणसास लवकर गुण पडेल, असें एखाद्या वेळीं देवरुषी सांगतो, तेव्हां अशी बाई मिळण्याचें लोकांस फार कठीण पडतें.

५० मरिमी म्हणजे पटकीची देवता; हिचें देऊळ बहुधा प्रत्येक गांवांत असतें. हिला भजणारे लोक, म्हणजे हिचे भगत महार लोक असतात. ह्या देवीस कोणीं कोणीं 'लक्ष्मी' असें हि म्हणतात. हिच्या नांवानें पोळ-रेडा सोडतात. हा रेडा मोठा माजला म्हणजे देवीच्या हुकुमानें त्याची जत्रा करितात, म्हणजे त्यास मारून त्याच्या मांसाचा नैवेद्य देवीस दाखऊन तिचा प्रसाद म्हणून सगळा रेडा खाऊन टाकतात. ह्या विधीस पोळजत्रा म्हणतात. पूर्वी ह्या जत्रेची पद्धत कशी होती ती एका वृद्धानें सांगितलेली पुढें देतों. रेडा मारावयाचा तो त्यास गांवाभोंवतीं पिटवून फिरवावयाचा व तो फिरत असतांना त्यावर कुऱ्हाडी, तलवारी व इतर शस्त्रें ह्यांचे वार करून त्यास मारावयाचा. निदान त्याच्या तीन प्रदक्षिणा अशा प्रकारें झाल्या पाहिजेत. मग त्यास मारून पुरा करावयाचा. हा दिवस अमावास्येचा असावयाचा. त्या रेड्याचें डोकें कापून तें वेशींत ठेवावयाचें. त्या शिरावर दोन शिंगांच्या मध्यें पणतीमध्यें दिवा लावून ठेवावयाचा. तो दिवा शेजारच्या गांवांपैकीं कोणीं गांवकऱ्यांनीं जर चोरून नेला तर ती गोष्ट आपल्या गांवास फार अनिष्ट समजून, महारमांग व इतर गांवकरी त्या दिव्याच्या रक्षणाकरितां काठ्या व हत्यारें घेऊन सज्ज असावयाचे. अशा अरिष्टांतून हि दिवा नेण्याचें धारिष्ट शेजारचे कोणीं गांवकरी करीत. तेव्हां दोन्ही गांवच्या लोकांची लढाई च होत असे. भाऊसाहेबांच्या बखरींत हा "पोळजत्रा" शब्द आला आहे. त्याच्या अर्थाचा शोध करीत असतां ही हकीकत समजली.

५१ महार, मांग वगैरे लोक देवीला आपला मुलगा वाहतात. त्याला 'पोतराज' असें म्हणतात. कपाळीं कुंकू लावून हातीं झेंगट, गळ्यांत ढोलगें, खांद्यावर चाबूक, अशा थाटानें हे पोतराज हिंडत असतात.

५२.]

५२ गळ टोंचून घेण्याचा भैरवादि देवास नवस करितात. हल्लीं कोठें कोठें हे गळ टोंचण्याचे नवस आढळतात. हे गळ पाठीच्या कण्याच्या दोहों बाजूंस दोन टोंचतात. हल्लीं गळ टोंचुन, देवास प्रदक्षिणा व नमस्कार करुन, गळाचे आकडे काढून घेतात. पूर्वीची रीत निराळी होती ती अशीः– देवळापुढें एक दगडाचा बाटोळा बुरजासारखा ओटा असून त्यावर एक खांब रोवलेला असे. ह्या खांबांत एक वासा खांबाच्या एका अंगास खिळा मारून बसविलेला असे. हा वासा घट्ट बसविलेला नसून खेळता बसविलेला असे. वाशाच्या एका तोंडास आकड्यांत एका सांखळीस अथवा दोरीस हा गळ अडकविलेला असे. देवाचा नवस पुरविणाऱ्या माणसाच्या पाठींत गळ टोंचतांना वासा ओढून घेऊन गळ टोंचीत. गळ टोंचल्यावर वाशाचा दुसरा भाग खालीं ओढून, त्यास मोठें दगडाचें वजन बांधीत, असें केलें म्हणजे वाशाचें गळाचें तोंड वर जाऊन, नवस पुरविणारा माणूस, त्या वाशाच्या टोंकास लोंबता असा लटकत राही. ह्या खांबास व वाशास बगाड म्हणत असत. कांहीं कांहीं ठिकाणीं, हें बगाड गाड्यावर घालून नवस पुरविणाऱ्या माणसाच्या घरापासून देवाच्या देवळा पर्यंत तो गाडा चालवीत नेत. ह्या बगाडास गाडेबगाड म्हणत असत. ब्रिटिश राज्य झाल्यावर सती जाण्याच्या चालीप्रमाणें च ही बगाडाची चाल सरकारी हुकुमानें बंद पाडण्यांत आली.

५३ आपण सकाळीं उठल्या पासून रात्रीं झोंपीं जाईपर्यंत बहुतेक आपल्या सर्व क्रिया आपल्या समजुतीप्रमाणें च होत असतात. सकाळीं उठल्या बरोबर देवाची तसबीर, किंवा तुलसीवृंदावना सारख्या वस्तूंचें दर्शन घ्यावयाचें, अमक्याचें तोंड पाहिलें असतां सर्व दिवस वाईट जातो, अशा समजुतीनें एखाद्या शेजाऱ्याचें तोंड पाहण्याचें टाळणें. निजतांना दक्षिणेकडे पाय करून न निजणें वगैरे गोष्टी, आमच्या एक प्रकारच्या समजुतीमुळें च घडत असतात. गरुडपुराणा सारखें पुराण, हें आपल्या शेंकडों समजुतींचें च एक भांडार आहे.

५४ कांहीं जुने ब्राह्मण लोक जेवण झाल्यावर—

अगस्तिं कुंभकर्णं च शनिं च वडवानलं ।
आहारपरिपाकार्थं स्मरामि च वृकोदरम् ॥ १ ॥

ह्या मंत्र म्हणून पोटावरून हात फिरवीत असतात. अशानें अन्नपचन होतें असें समजतात.

कोणत्या हि अनुष्ठानाच्या शेवटीं, ब्राह्मणभोजनानें सांगता होते. म्हणून मी ह्या "समजुती व लोकाचार" निबंधाची सांगता, ह्या ब्राह्मणभोजनाच्या समजुतीच्या लेखनानें करितों !

क. वि. आचार्य कालगांवकर

# शके १३७६ च्या सुमाराचें मोडी पत्र

हा कागद मिया शिकंदरलाल आतार यांना भिलवडी येथें मदनशाहाच्या दर्ग्यामध्यें मिळाला. त्यांत प्रारंभीं फारशी मजकूर असून नंतर खालीं मोडींत त्याचा उतारा दिला आहे. अक्षराचें वळण व भाषापद्धती हीं आंतील सनास जमती आहे. हा कागद खमस खमसेन समान (मया) म्हणजे, शके १३७६ च्या सुमाराचा आहे. यांत 'येकुन' व 'पश्चिम' 'दक्षिण' वगैरे दिशांचीं नांवें खेरीजकरून मराठी शब्द नाहीं. शिवकालीन पत्रांतून मुसलमानी सनदांतील मोडी मजकुरांत कांहीं तरी मराठी शब्द असतात. त्या मानानें यांत मराठी शब्दांचें प्रमाण अगदीं च थोडें आहे. त्याच्या प्राचीनत्वाची साक्ष पटविणारी ही एक गोष्ट आहे. मोडी व फारशी मजकूर साधारणपणें ताडून पाहिल्यावरून, कांहीं ठिकाणीं फेर आहे. अगदीं च फारशींतील शब्दास शब्द मोडींत उतरला नाहीं असें दिसून आलें. यांत फारशी मजकुराच्या प्रारंभीं, उजव्या कोपऱ्यांत थोडा आरबी मजकूर आहे. त्यावरून, ही मूळ सनदेची काजीनें दिलेली नकल असावी असा संशय येतो. तथापि ही नकल देखील फार प्राचीन काळची च असली पाहिजे हें अक्षरांच्या व भाषेच्या प्रमाणावरून ठरतें. पण नकलेचा काल निश्चित करतां येत नाहीं. * ओळींना आंकडे मी घालून दिले आहेत.

दत्तात्रेय विष्णु आपटे

* १ माहादूदनामा जमीन चावर २ दोनी पोळिज वा उ
२ खोळि बाफासाळि पेहिंम दरवज इनामा मुस-
३ ळमु दर सवाद कसबा मामले कसबे मुबारकाबाद
४ बिमोजीबु मिसळी खोदायवद मसनद अळि मा-
५ ळिक मुस्तुक सेर्क वसिन उवळिग अजम इमाद ना-
६ माळिकु साहेबु मोकासा कसबे मजकुरु मुरखा
७ जिल्हेजु तेरीख ४ सन खमस खमसिन वा समान
८ मया बेस्मी काजी याकुब बिन इस्माइळ नेया-
९ बु हाकीम सेराहा मामले मजकुरु बादेहु बिनाम
१० ऐवळाद वा अफळाद वो मुतेन अस्तु वा मिसेळि
११ खोदायवद मसनद अळि मजकुरु बिजेनेबु मळि-
१२ क सर्क अळाय दस्तुरु वा मुजकी वा कारकुनानि हाळ
१३ वा इस्तकबाळ मामले मजकुरु सादिर सूद कीं जमी-
१४ न मजकुरु माहादूदू कार्दे काजी याकूब बादी
१५ वो बिनामु अैळाद वा अफळाद वो बिदेहंद बिंना-

१६ बरा मलिक सर्क अळाय दस्तुरु ठाणादार वा मुज-

१७ की मामळे मजकुरु जमीन मजकुरु बरहुकुमा मि-

१८ साळि खोदायवंद मसनद आलि मजकुरु अज हुदे-

१९ दारानि वा रया कसबे मजकुरु देहानीदा आदा

२० मजकुरीन चिदि असामि

२१ गोविद् यळदेउ मुश्रीफ    बाळो चागदेउ निसिद्

२२ कसबा मजकुरु    कसबा मजकुरु

२३ खुमगोड डोमगोड मो    रामगोंडा चाहिदेवो

२४ कादम

२५ संखगोडा देवगोड    खोपगोड नेमगोड

२६ नागदेवो डोयगोडा    जमाळ कमाळ मेहतर ता

२७    बोळि

२८ मेंगो देवगोंड बंणिगरु

२९ जमीन मजकुरु बरहुकुमा खोदावंद मसनद

३० अलि मजकुरु मुबारद तेरीख ४ माहे जिल्हेजु सन

३१ खमस वा खमसिन समान मया वि काजी याकुबा

३२ मजकुरु विहुजुरु अका बिरा वा रया वा मोहतर्फा

३३ वा कंनुनु गोसपा मामळे मजकुरु विदि असामि

३४ काजी माहामुद् अहामद्    अळाय माह्मद्

३५ मोनसिबु

३६ सिकंदर सेमस खोतवाळा    माहामुद सेखा

३७ मोलाना सफी माहामद्    मोळाना ताज अहामद्

३८ मुतवाळि

३९ मोलान हसन माहामुद्    छजो जंबुरु

४० माह्मद् अहामद्    मुळ रमजान हसन मोळाना

४१ अळाय स्याहबु मु    नुरु जेबीर मुळाना

४२ ळाना

४३ मुळाना राजया माहा    मिरा हासिफा

४४ मद्

४५ वोइदेउ माळि महतरी    पाइदेउ माळि

४६ होनु माळि    रेइदेवो माळि

४७ जाइदेवो माळि

४८ माह्मदूद कर्दा बाद अदू

४९ पोळिज बावर १ येकुन    उखोळि बावर १ येकुनु

५० बिघा १२० — बिघे १२०

५१ तुळ अर्ज — तुळ अर्ज

११ १०।।।॰ — १३ ऽ २ ९ ऽ २

५२ माहाहुद्द चिछबार — हद्द बिदि तपसिळि

५३ १०।।।॰ — ४ ऽ ४

५४ दक्षिण | पास्चिम हद्द नि | उत्तर बाजु — दक्षिण हद्द | पास्चिम हाद नि | उत्तर हद्द बाज अहिराव १४

५५ ळज — ळजी

५६ पोळिज — उसेळि

५७ सेर मि से याणा — फुर्व हद्द सेत छजोंजं

५८ चे सेरु १०।।। — घुरु १४

५९ तेरीख १२ माहे रबिलोवलु सन समस वा समसीन

६० समान मया

# श्रीशिवाजीमहाराज यांचें स्वरूप

आज पर्यंत महाराजांची अस्सल तसबीर, कीं जिच्या वरून त्यांचें खरें स्वरूप दृष्टोत्पत्तीस येईल, अशी आपल्याला उपलब्ध झालेली नव्हती. सध्यां त्यांच्या ज्या तसबिरी प्रचारांत आहेत, त्या दोन आहेत. एक घोड्यावरची व दुसरी ऊर्ध्वांगा (Bust)-ची. पैकीं घोड्यावरची सायुध असून, ती एका फ्रेंच गृहस्थानें दिल्लीस इ. स. १७२० च्या सुमारास मिळवून ' De Gancigny and X. Raymond's Inde' या पुस्तकांत छापिली, आणि दुसरी ऊर्ध्वांगाची, आर्मनें आपल्या Fragments of the Moghal Empire या पुस्तकांत प्रसिद्ध केली. या २ दृश्यचित्रां शिवाय, कांहीं श्राव्यचित्रांच्या साह्यानें हि महाराजांचें स्वरूप लक्ष्यांत येतें; तीं श्राव्यचित्रें म्हणजे, मराठी बखरी व कांहीं युरोपीय गृहस्थ यांनीं दिलेलें वर्णन होय. वरील दृश्यचित्रांच्या जोडीला च, मालवण येथील सिंधुदुर्गांतील प्रतिमा हि ठेविली पाहिजे. आनुसत्या ऐकीव वर्णना पेक्षां, स्वतः पाहून दिलेलें वर्णन केव्हां हि श्रेष्ठ च होय, आणि त्याची किंमत पहिल्या प्रतीची असणार हें उघड च आहे. या दृष्टीनें पाहिलें असतां हल्लीं प्रसिद्ध असलेल्या मराठी बखरींत, फक्त २ च बखरी काय त्या विचारांत घ्याव्या लागतील; त्या म्हणजे, प्रभातांत प्रसिद्ध झालेली नव्वदकलमी बखर व काव्येतिहाससंग्रहांतली सभासदी बखर. पैकीं, सभासदानें महाराजांचें वर्णन चुकून सुद्धां कोठें दिलेलें नाहीं. सारांश, मराठी बखरीं पैकीं, जिच्या कर्त्यानें, प्रत्यक्ष महाराजांना पाहून त्यांचें स्वरूपवर्णन करून ठेविलें आहे अशी काय ती सारी एक च बखर शिल्लक राहते; आणि ती तशी खरोखर च अगदीं विश्वसनीय पण आहे. या नव्वदकलमीचे कर्ते महाराजांचे खास वांकानवीस राजश्री दत्ताजी त्रिमल हे होत. हे साधारणतः शके १५८६ ते १६३५ पर्यंत छत्रपतींचे वांकनवीस होते. वांकनवीसाकडे खाजगी दफ्तर व पत्रव्यवहार असून, राजपत्रांवर " संमत मंत्री " व " बार " हीं निशाणें त्यांनीं च करावयाचीं असत. वांकानवीस म्हणजे च मंत्री. तेव्हां दत्ताजी त्रिमल यांना आपली बखर लिहितांना सरकारी कागदपत्रांचा उपयोग सहज करता आला असेल. ही बखर, संभाजीमहाराज गादीवर बसल्या नंतरच्या थोडे च दिवसांतील आहे; त्यामुळें महाराजांच्या चरित्र ग्रंथांत हिची किंमत फार आहे. तेव्हां, अशा बखरीच्या कर्त्यानें केलेलें महाराजांचें स्वरूपवर्णन चुकीचें असणें अगदीं अशक्य होय. ज्याच्या पुढें सतत १६ वर्षें महाराजांची मूर्ति प्रत्यक्ष वावरत होती व ज्या मूर्तीच्या संरक्षणाकरितां दत्तो त्रिमलानें आग्र्याचा बंदिवास हि सहन केला, तो दत्तो त्रिमल त्या परमपूज्य व्यक्तीचें स्वरूपवर्णन अन्यथा कसें करील ! असो. तुळशीदास शाहीर हा महाराजांच्या वेळीं हयात होता असा समज आहे. त्यानें तानाजी मालुसऱ्याच्या सिंहगडच्या पोवाड्यांत, ओघानें महाराजांच्या पोषाकाचें वर्णन केलें आहे. प्रत्यक्ष

पाहून वर्णन करणाऱ्या स्वदेशीय व्यक्ती आटोपल्या. आतां परकीय व्यक्तींची संख्या व नांवें देऊं. ही संख्या हि दोन च असून, त्या दोघांचीं नांवें हेन्री आक्सेंडन व अँनथोनी स्मिथ हीं असून, त्यांपैकीं पहिल्यानें महाराजानां रायगडावर राज्याभिषेकाच्या वेळीं, इंग्रजाच्या वकील या नात्यानें गेला असतां प्रत्यक्ष पाहिलें आहे; आणि दुसऱ्याला शके १५८६ त सुरतेच्या पहिल्या लुटींत, महाराजांच्या सैनिकांनीं २ दिवस अटकेंत ठेविलें असतां, त्यांचें प्रत्यक्ष दर्शन झालें आहे. सदरचा स्मिथ हा तेथील ईस्ट इंडिया कंपनीचा एक नोकर होता. दोन दिवसांनीं सुटल्यावर त्यानें जें महाराजांचें वर्णन केलें होतें तें सुरतेचा पाद्री रे० एस्कालिअट ( Escaliot ) यानें नमूद करून ठेविलें आहे. याप्रमाणें, स्वदेशीय २ व परकीय २ मिळून चोघा जणांनीं केलेलें वर्णन, आज आपल्या पुढें आहे. या शिवाय, बसातिन-ई-सलातिन, मासीर-ई-अलमगिरी, हफ्त अजुमान, मनुची व बर्नीअर यांच्या बखरींत महाराजांचें स्वरूप-वर्णन असावें. कारण, यांच्या कर्त्यांपैकीं बहुतेकांनीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलेलें आहे. पण, सदर पुस्तकें मला या वेळीं न मिळाल्यानें, त्यांबद्दल कांहीं च लिहितां येत नाहीं. असो. चित्रगुप्तानें* जरी महाराजांचें प्रत्यक्ष दर्शन घेतलें नव्हतें, तरी त्याच्या बखरीला गु० राजवाडे हे दुय्यम प्रतीचें महत्व देत असल्यानें, त्याचें म्हणणें हि या बाबतींत अगदीं च अग्राह्य होईल असें वाटत नाहीं. सारांश, या पांच जणांचें महाराजांच्या पोषाका बद्दल व स्वरूपा बद्दल म्हणणें काय त्याचा थोडक्यांत गोषवारा खालीं देऊंः—

१. **दत्तो त्रिमलः**— (नव्वद कलमी) "दाढी, लहान बाल छाटून केली (कलम ३१)." त्याउप्पर, दाढ्या चोडून, चैरागीवेष घेतला" (कलम ५४) "चिरा व तुरा मोत्याचा घालून निद्रा केली......... चिरा व तुरा पलंगावर ठेऊन बाहीर निघाले" (कलम ५३).

२ **तुळशीदास शाहीर** ( सिंहगड पवाडा ):— "शिवाजीमहाराज पांच पोषाक नटला। पाई तुमान सुरवारी चढविल्या ॥ अंगीं किनखाप घातले। शिरीं जिरीटोप घातला ॥ हातीं वाघनखें घालून। कृष्णाघोडीला जिन केला ॥ ढाल पाठिवरी टाकिता झाला। सोनसळी पट्टा हातांत घेतला ॥"

३ **रघुनाथ यादव चित्रे** (चित्रगुप्त):— [काव्यांत वर्णन असल्यानें त्याचा सारांश गद्यांत देतों.] "डोक्यास जिरेटोप, कमरेस पेटी, अंगांत बख्तर, वर झगा, कानांत मोत्यांचीं कुंडलें, गळ्यांत जडावाचीं पदकें, डोक्याला भरजरी मंदील, त्याला मोत्यांचा तुरा व कलगी, कमरेला पटका, पायीं चोळणा." [याप्रमाणें पोषाकाचें व अलंकारांचें वर्णन देऊन, स्वरूपाचें वर्णन चित्रगुप्त खालील प्रमाणें करीत आहे.] "महाराज परम

---

* चित्रगुप्ताच्या बखरीचा रचनाशक १६८२ ते १६९२च्या दुरम्यानचा धरतात.

सौंदर्य सुकुमार, द्वितीय प्रभाकर च...बत्तीस लक्षणी...गौरवर्ण...भाल उत्थान, भृकुटी धनुष्याकृति, सुरेख सलंब चक्षु...आनन वर्तुळ...ओष्ठ आरक्त...कर्ण...सलंब...हृदयस्थान प्रशस्त...बाहुदंड गजशुंडप्राय... ऐसें महाराजाचें शरीर." [पुढें एके ठिकाणीं पोषाकाचें वर्णन मागील प्रमाणें च, म्हणजे ] "भरजरी बादली मंदील, अंगशेल हि बादली व चादर हि भरगर्च्ची बादली व पटका बुट्टेदार व बुरवार किनखापी व अलंकार, मस्तकीं कलगी सलंच व मुक्ताफलांचा तुरा, शिरोपेंच जडितवैडूर्यांचा, कर्णमात्रा हुरमुजी मुक्ताफलांच्या ......कंठीं मुक्ताफळांच्या माळा... ...भाळीं केशरी अर्डवें गंध...गंधा तलवटीं शाम टिकली" [ असें केलें आहे ].

४ हेन्री ऑक्झेंडनः—"चेहरा सुंदर व पाणीदार,इतर मराठ्यांच्या मानानें वर्ण गोरा, डोळे तीक्ष्ण, नाक लांब, बांकदार व जरासें खालीं आलेलें, दाढी कापून हनुवटीचे खालीं टोंकदार केलेली; मिशी बारीक असून, मुद्रेंत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरुकता हे गुण स्पष्ट दिसतात."

५ रे० एस्कालिअटः—"His person is described by them, who have seen him, to be of *mean stature* ( *i. e*, medium height ), lower some what than I am ( when ) erect, and of an *excellent proportion*. Actual ( *i. e.* active ) in exercise and whenever he speaks, ( he ) seems to *smile*, a quick and piercing eye and *whiter than any of his people* " ( Indian. Ant. Vol. VIII. 379 ).

[ म्हणजे, "महाराजांची मूर्ति मध्यम उंचीची रेखीव बांध्याची असून चपळ आहे; ज्या वेळीं महाराज बोलतात त्या वेळीं जणूं काय ते मंदस्मित करीत आहेत असें वाटतें; दृष्टि तीक्ष्ण व भेदक आहे; महाराजांचा वर्ण, त्यांच्या लोकांपेक्षां जास्त गौर आहे"; असा याचा सारांश आहे. ]

या प्रमाणें श्राव्यचित्रें आपण वर दिलीं; आतां जीं तीन दृश्य चित्रें आहेत त्यांचें निरनिराळें वर्णन देण्या पेक्षां, तिन्ही चित्रें जवळ जवळ ठेवून, त्यांच्यांत कितपत साम्य आहे हें पाहिलें म्हणजे काम झालें. आर्मे व डी गान्सिमी यांच्या दोन्ही हि तस-विरींत, डोइस बादलीचा पटका, मोत्यांचा तुरा, अंगांत एका च जातीच्या नकशीचा किनखाबाचा अंगरखा, गळ्यांतील मोत्यांच्या माळा वगैरे एक च असून, चेहेऱ्यांतील साम्य हि बहुतेक जुळत आहे. लांब नाक, टोंकदार दाढी, भरीव गर्दन, मजबूत बांधा इत्यादि लक्षणें, दोहोंत हि सारखीं च आहेत. गान्सिमी चित्रांत, मंदिलांत एक

पीस आहे; आर्मी चित्रांत तें नाहीं; तर, उलट गान्सिमींत कानांतलीं मोत्यांचीं कुंडलें नाहींत. गान्सिमीच्या चित्रांत हातांत पट्टा असून कमरेस कट्यार आहे. चित्रगुप्तानें व तुळशीदासानें केलेलें वर्णन बहुतेक या चित्राला लागू पडतें. असो. मालवणच्या सिंधु-दुर्गांतील प्रतिमेच्या चित्राची, या दोन चित्रांशीं तुलना केल्यास मात्र बरा च फरक दृष्टीस येतो. मालवणीला दाढी मुळीं च नाहीं. कमरेस धोतर असून, वरचें अंग उघडें च आहे. अंगावरील भूषणें व डोक्याचा मुकुट ( नावाड्यांची टोपी नव्हे ) सोडून दिल्यास, आणि दाढीची बाब लक्ष्यांत न घेतां फक्त चेहेऱ्या कडे सूक्ष्म दृष्टीनें पाहि-ल्यास, आर्मी व ही सारख्या च होत असें लक्ष्यांत येईल. मालवणीचें नाक व विशे-षतः मिशी, या आर्मीच्या नाक व मिशीशीं तंतोतंत जुळतात. आतां, एक समोरची तर दुसरी एकांगाची असल्यानें, चेहेऱ्यांत थोडाफार फरक दिसेल, पण तो विशेष महत्वाचा नाहीं. सारांश, या तिन्ही तसबीरी पुष्कळ बाबतींत एकमेकांशीं जुळ-तात. असो.

आज, हा लेख लिहिण्याचें कारण, आपल्या पुढें मी आतां जी ही तसबीर ठेवीत आहे हें होय. ही तसबीर, गेल्या वर्षी मला वांई येथें रा. नानासाहेब वैद्य यांच्या घरीं सांपडली. त्यांच्या घरच्या माळ्यावर ४१५ पोतीं रद्दी पडली होती. त्यांपैकीं, एका पोत्यांत कागदांचीं जाळीचीं चित्रें, फुटलेल्या कांचेवरील तसबिरींचे तुकडे वगैरे गळाठा होता. त्यांत एक फडक्याचें दफ्तर होतें, तें सोडून पाहतां, २ जाड पुष्टिपत्रांच्या मध्यें ही व आणखी गेल्या २ दिवसांत आपल्यापुढें ठेविलेल्यांपैकीं कांहीं २।३ तसबिरी असलेल्या आढळल्या. हिच्याकडे पाहतां क्षणीं च वाटलें कीं, ही महाराजांची च तसबीर खास ! असें वाटल्या बरोबर, मला ही सांपडली म्हणून आनंद हि झाला. नंतर दोन चार स्नेह्यांना दाखविली; त्यांचें हि म्हणणें असें च पडलें. पुढें ही व वरील दोन (आर्मची व गान्सिमीची ) तसबीरी एकत्र ठेवून पाहिल्या, तेव्हां तिन्हींत हि पुष्कळ साम्य आढळलें. गान्सिमीप्रमाणें ही घोड्यावरील च आहे. दोहोंच्या चेहेऱ्यांत विलक्षण साम्य आहे. लांब नाक, कपाळ, हनुवटीशीं टोंकदार केलेली दाढी, पुढें आलेली हनु टी, मिशी, मजबुत व बांधेसुत देहयष्टी वगैरे शारीर-साम्य असून पोषाक हि जुळत आहे. डोईचा मंदील व त्याला असलेलें पीस, अंगरखा, तुमान, चढाऊ जोडा इत्यादि पोषाक हि गान्सिमीप्रमाणें च आहे. या तसबिरींत घोड्याच्या मागें अंग झांकलें गेल्यामुळें मोत्याचा तुरा व कानांतील मोत्यांचीं कुंडलें ऊर्फ चौकडा दिसणें शक्य नाहीं. अंगरख्या वरील नकशी हि वरील २ चित्रांप्रमाणें अगदीं एक आहे. असो. चित्रकारानें हि महाराजांच्या शौर्याला अनुसरून च वीररसाचें चित्र चितारलेलें आहे ! रायगडच्या पाठी मागील जंगलांत सिंहाची शिकार, हा प्रसंग घेतला आहे ! घोड्यावर बसून, डाव्या हातानें बेफाम झालेल्या घोड्याचा लगाम जोरानें खेचून धरून, त्याला स्थीर करीत, आणि उजव्या हातांतील तरवारीनें, जखमी होऊन जखमांतून रक्त गळत

असल्यानें खवळलेल्या व आ वासून किरण साफून अंगावर उडी मारणाऱ्या सिंहाव घोड्यावरून उठून महाराज शेवटचा वार करीत आहेत अशा प्रसंगाचें हें चित्र आहे।

यांत, महाराजांचा घोडा तांबडा असून, त्याच्या वरील जीन हि तांबडें च आहे व त्याचा बंद निळ्या रंगाचा आहे. महाराजांचा मंदील, अंजिरी रंगाचा जरीच्या मुख्याचा असून, त्यावरील आडवे तीन पट्टे जरीचे च आहेत, मंदिलाला एक पीस आहे. अंगांतला अंगरखा, हिरव्या मखमलीचा असून त्यावर जरीचीं ++ ++ अशीं वेलपत्ती आहे ( ही च वेलपत्ती आर्मी व गान्सिमी यांच्या चित्रांच्या अंगरख्या वर हि आहे). पायांतील तुमान, पिंवळ्या सार्टिणीची असून, हल्लींच्या लष्करी पद्धती-प्रमाणें तिच्या मधोमध एक तांबडा आहे व त्यांत हि वरील च वेलपत्ती आहे. पायांतील चढाऊ जोड्याचा हि रंग पिवळा आहे आणि त्याच्या हि तांबड्याच आहेत. उजव्या हातांत उपसलेली तरवार असून, डाव्या हातांत लगाम आहे; कंबरेस शेला व तांबडा च कमरबंद बांधला आहे; कमरबंदांत डावी-कडे तलवारीचें म्यान अडकविलेलें असून त्याचें वरील कापड हि तांबडें आहे; आणि टोकाचें मेडें सोन्याचें आहे. उजवीकडे बाणांचा भाता आहे. शिवाय, डावी कडे कांहीं लांब शस्त्र सारखें दिसत आहे, पण त्याचा स्पष्ट बोध होत नाहीं. तें धनुष्य असावें काय ! समोर, आयाळ पसरलेला व उडी मारण्याच्या अगदीं बेतांत आहे असा सिंह असून, वारानें झालेल्या त्याच्या जख-मेंतून खालीं रक्त सांडत आहे.*

मागच्या बाजूस एक नदी ( गांधारी ! ) टेकड्याच्या मागून वहात असलेली दिसते. तिचे च कांहीं फांटे टेकडीच्या अलीकडे आले असून, त्यांत विकसलेलीं तांबडीं कमळें दाखविलीं आहेत व एक हंसाचें जोडपें हि विहार करतांना दृष्टीस पडत आहे. नदीपलीकडे झाडी असून, तिच्या मार्गे एक अवाढव्य किल्ला आहे. किल्ल्याचा तट बुरुज मुख्य दरवाजा वगैरे सर्व स्पष्ट दिसत आहेत. हा किल्ला म्हणजे रायगड होय. रायगड च हें त्याच्या आंत असलेल्या व बाहेर स्पष्ट दिसणाऱ्या मनोऱ्या वरून सिद्ध

---

* या तसबिरींत, शंकित स्थान जर कोणचें असेल तर तें हें च होय. महा-राष्ट्रांत- रायगडच्या जंगलांत- सिंह कसा आला ! ही शंका मला हि आली होती व ज्या कांहीं इतिहाससंशोधकांना मीं ही तसबीर दाखविली होती व ज्यांनी ती शिवाजी-महाराजांची च असें मत दिलें, त्यांच्या पुढें ती मांडली हि होती. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, तें एक चित्रकाराचें लाघव होय. आणि तें खरें हि असावें, नाहीं कशा वरून ! शौर्य, धैर्य, मानीपणा इत्यादि गुणांत, महाराज सिंहा सारखेच होते आणि त्यामुळें च बखरींतून व शिवराजभूषण काव्यांतून पुष्कळ ठिकाणीं " सरजा " ( सिंह ) असें त्यांना सार्थ विशेषण दिलें आहे. तेव्हां, असला हा नरसिंह, पशुसिंहाची शिकार करीत आहे, असें चित्र चितारण्यांत, चित्रकाराचें औचित्य च दृष्टीस पडत आहे ।

ज्ञान आहे. मीं स्वतः अद्याप रायगड पाहिला नाहीं पण ज्यांनीं पाहिला ते सांगतात कीं, रायगडास मनोरे आहेत. "रायगड किल्ल्याचें वर्णन" रा. गोविंदराव बाबाजी जोशी यांनीं सन १८८५ त छापलें आहे, त्यांत "गंगासागरचे पश्चिमेस अगदीं कांठावर दोन मनोरे असलेलू आकृतीचे आहेत" (पृ. ३७) असा उल्लेख आहे. दुसरा मनोरा या दिसणाऱ्याच्या मागें आला असेल, म्हणून तो येथें दाखविला नसावा. असो.

चित्रकारानें हें चित्र रेखाटण्यांत अप्रतिम कौशल्य खर्च केलें आहे. महाराजांची मूर्ती, अंगुष्ठमात्र—कदाचित् त्याहून हि लहान—आहे, पण त्यांत च त्यानें आपलें कला-सर्वस्व ओतलें आहे. मूर्ती अगदी प्रमाणबद्ध आहे. बारीक सारीक गोष्टी सुद्धां अगदीं स्पष्ट काढलेल्या आहेत. चित्राच्या भोंवतालच्या चौकटींतील वेलपत्ती हि प्रमाणबद्ध आहे. असो.

मीं माझ्या संशोधनवृत्तांत म्हटल्या प्रमाणें, या तसबिरीची प्राप्ती, म्हणजे एका अमूल्य रत्नाची प्राप्ती होय ! ज्याच्या प्राप्ती साठीं आज पर्यंत संशोधकांनीं व विद्वानांनीं पुष्कळ प्रयत्न केला, पण जें त्यांना लाभलें नाहीं तें अपूर्व रत्न—क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर श्रीराजे श्रीशिवछत्रपति यांची तसबीर,— आपल्या या भारतइतिहास-मंडळाच्या रत्नभांडारांत—संग्रहालयांत—मांडण्याचें भाग्य श्रीसमर्थकृपेनें माझ्या वाट्यास आलें याबद्दल मला खरोखर च फार आनंद होत आहे ! या रत्नानें आपल्या भारते-तिहास मंडळाची कीर्ति साऱ्या भारतांत पसरून, त्याच्या दर्शनास भारतपुत्रांची गर्दी लोटो एवढी च इच्छा आहे ॥

पांडुरंग मार्तंड चांदोरकर

# विभुराज राष्ट्रकूटाचें सातव्या शतकांतील एक ताम्रशासन.

सदरचें ताम्रशासन रा. दत्तोपंत पोतदार यांनी माझ्या हवालीं नुकें च केलें. हें "विभुराज " नांवाच्या राष्ट्रकूटाचें आहे. हें नांव राष्ट्रकूटांच्या प्रसिद्ध असलेल्या वंशावळींत कोठें हि सांपडत नाहीं. तसें च राष्ट्रकूटांची "परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर, पृथ्वीवल्लभ " इत्यादि प्रशस्ति हि यांत नाहीं. शिवाय, राष्ट्रकूटांची मुद्रा जी शिव किंवा विष्णू अथवा कमलास्थित लक्ष्मी ती याच्या कडीवर नसून एक माळ एक कमंडलू व एक दंड हीं चिन्हें कोरलेलीं आहेत. या एकंदर स्वरूपा वरून हें ताम्रशासन खुद्द कृष्णराजाच्या वंशांतील राजाचें नसून त्याच्या एकाद्या शाखेंतील पुरुषाचें असावें असें दिसतें. येथें राष्ट्रकूट वंशाला राणा हा शब्द लाविलेला आहे. राजानें दान दिलेल्या गांवाचें नांव " थुगांव " असून ब्राह्मणाचें " यज्ञ " अथवा " नेज्ञ स्वामी " असें नांव आहे. काला बद्दल स्पष्ट उल्लेख नसून " तृतीय संवत्सर वैशाख शुद्ध पौर्णिमा " असा उल्लेख आहे. तृतीय म्हणजे काय ! तृतीय शतक असा अर्थ होणें शक्य नाहीं. तेव्हां, विभुराजाचें स्वतःच्या राज्यारोहणाचें तिसरें वर्ष असा अर्थ ग्राह्य दिसतो. पण एवढ्यानें खऱ्या कालाचा बोध होत नाहीं; आणि तो तसा होण्या जोगें गमक हि यांत नाहीं. शिवाय, संदर्भ ग्रंथ येथें जवळ नसल्यानें एकंदर ताम्रशासनाच्या स्वरूपाबद्दल निर्णायक मत देतां येत नाहीं. मात्र अक्षरवटिकेवरून पिंपरीच्या शक ६९७ च्या किंवा तत्पूर्वींच्या शक ६९० च्या कृष्णराजाच्या ताम्रशासनाच्या च वेळचें आहे हें अगदीं स्पष्ट आहे. म्हणजे हें साडे अकराशें वर्षां पूर्वीं चें आहे. ताम्रपट खोदणाऱ्यानें खोदण्यांत संस्कृताच्या फार चुक्या केल्या आहेत. त्यामुळें कांहीं कांहीं ठिकाणीं त्याचा अर्थ स्पष्ट लागत नाहीं. असो.

हा ताम्रपट पूर्वीं हिंगणी बेरडीच्या एका ब्राह्मणाच्या घरीं होता. तेथून कांहीं काला नंतर दौंडा जवळील अलेगांव येथील रा. भाऊ पाटिलाकडे आला. त्यांच्याकडून आपले सभासद रा. पंढरीनाथ रामकृष्ण अलेगांवकर यांनी रा. पोतदार यांस दिला आणि त्यांनीं तो (या संमेलनाच्या गडबडींत च परवां) माझ्या स्वाधीन केला. मालकानें तो वाचण्या साठीं, आपल्या येथील कांहीं पुराणेतिहाससंशोधक व ताम्रपट वाचणाऱ्या तज्ज्ञांकडे थोडे दिवसां पूर्वीं पाठविला होता, पण त्यांच्या कडून तो तसा च परत आला. ताम्रपट लावण्याचा माझा हा प्रथम च प्रयत्न असल्यानें यांतील कांहीं मजकूर मला लागला नाहीं; आणि त्याला, कोरणाऱ्याचें अज्ञान, अशुद्ध संस्कृत, संदर्भग्रंथांचा अभाव हीं हि कारणें आहेत; असें असतां हि हा आपल्या पुढें माझ्याकडून मांडण्याचा दत्तोपंतांचा हेतु, ज्यांना या विषयाचें ज्ञान असेल, त्यांनीं तो बरोबर लावून यांतील चुक्या दुरुस्त कराव्यात हा च असेल असें मला वाटतें. असो.

ताम्रपटाचे पत्रे २ असून १ ल्या पत्र्याच्या पोटावर व दुसऱ्या पत्र्याच्या पोटावर आणि पाटीवर हि मजकूर आहे पत्र्यांची लांबी ७ ॉटें, रुंदी ३॥ बोटें व जाडी अर्धा यव आहे. पहिल्या पत्र्यांत ९, दुसऱ्यांन १३ ( पोटांत १० व मागें ३) मिळून एकंदर २२ ओळी आहेत. पत्र्यांना कडेला २ भोकें असून त्यांतून एक कडी ओंविली आहे, व तिच्यावर विभुराजाची मुद्रा आहे. मुद्रा कशाची तें वर आलें च आहे. पत्र्याच्या कडा वळविलेल्या आहेत. ताम्रपट शुद्धाशुद्ध न करितां मुळांत ज्या स्वरूपांत आहे त्याचप्रमाणें तो आपल्या पुढें माडतों:—

[ पत्रा १ ला. पोट ]

[ १ ] ॐ स्वस्ति श्रीमता त्वालित शत्रुहवना राष्ट्रकूटेण

[ २ ] राणमन्वयाय श्रीयोलंकारेणश्रीमतां महाराज

[ ३ ] विभुराजानुज्ञया स्वकुशल नभस्तलालंकार स्व—

[ ४ ] श्यावलम्र महादेव्या मातापित्रोः पुण्याभिवृद्धये आ—

[ ५ ] त्मनश्य बलिचरुवैश्वदेवाग्नीहोत्र क्रियोत्सर्ग्येणा—

[ ६ ] र्थम चन्द्रार्क्कार्णवक्षितिस्थिति समकालीनः पुत्रपो—

[ ७ ] त्र स्वामिभिकामि + हृदयत्नादभिमूल समराभिरये- -

[ ८ ] दं श्रीमाहाराजष्य मात्रा सती स्वास्योभय व—

[ ९ ] र्गान्तर्गत धुयामश्या + या श्रीमतो राष्ट्रे देवरा—

---

[ पत्रा २ . पोट ]

[ १ ] जस्य पत्न्या राज्न्येन्वय + र्थं स्सर्व्वादेश्य विषेषरिव

[ २ ] + ( य ) तो ( गो ! ) चारभय ( उ ! ) चक्षुवेश्ये भूमिछिद्रन्यायेन

[ ३ ] अंगीरस गोत्र ब्राम्हणाय ने ( ये ) ङ्ग स्वामिने स (स्व) हस्त

[ ४ ] व्रतक्रतुरकोरनेकदलीतरुहकाम्राह्मरस्य रक्ष

[ ५ ] णे सुवर्ण शलाकायः प ह्रेशा त्ताम्रशासन न च

[ ६ ] ज्व वर्त्तमाने तृतये संवत्सरे वैशाख सुक्क पोर्णि—

[ ७ ] मास्य राष्ट्रकूटेन मजरराज विभुराजस्य य श्रै धु

[ ८ ] प य व्य त स पर्वे महापातक स मु को ग व प त प—

[ ९ ] ष्टिं वर्षसहस्राणि स्वर्गमदति भूमिदः आछेत्ताचा—

[ १० ] नुमन्ताच

[ पत्रा २ रा. पाठ ]

[ १ ] तान्येव नरके वसेत् बहुभिर्व्वसुधा भुक्ता रा—

[ २ ] जभि स्सगरादिवि यस्यमस्य यदा भूमि त्तस्य

[ ३ ] तदा फलं र व लि वि ( व )

---

सारांश मजरराज (!) विभुराज राष्ट्रकूट यानें आपल्या राज्याभिषेक शकाच्या तिसऱ्या वर्षी वैशाखी पौर्णिमेला धुगांव* हें गांव नेन्नस्वामी नांवाच्या ब्राह्मणास दान दिलें, एवढें यावरून स्पष्ट होत आहे.

पां. मा. चांदोरकर

---

* हें गांव नाशीक जिल्ह्यांत आहे, रेल्वेचें स्टेशन आहे.

# चालू भाषेंतले ऐतिहासिक शब्द.

" बारा वर्षांनीं आणि बारा कोसांनीं भाषा बदलते " अशी म्हण आहे. इंग्रजी अमदानी सुरू होऊन शंभर वर्षें झालीं, तेव्हां अर्थात् पूर्वींची भाषा जशीच्या तशी च आज पर्यंत राहणें अशक्य आहे. शंभर वर्षां पूर्वींच्या भाषेंत कालगतीनें नवीन शब्दांची भर पडून तिचें रूप पालटणें अपरिहार्य आहे. मात्र, हल्लीं मराठीचें जें दिवसानुदिवस रूपांतर होत चाललें आहे तें निदान इतिहासाच्या दृष्टीनें तरी स्पृहणीय नाहीं असें मला वाटतें. समाजांत शिक्षणाचा फैलावा जोरानें होत असल्यामुळें लोकांत पोरासोरांच्या तोंडींसुद्धां पुस्तकी व वर्तमानपत्री भाषेचा प्रचार जारीनें सुरू होऊं पहात आहे. पुणें मुंबईसारख्या शहरांत तर ही गोष्ट विशेषेंकरून नजरेस येतें. पुस्तकें व वर्तमानपत्रें लिहिणारे लोक इंग्रजींत निष्णात असतात व प्रायः ते जें लिहितात तें प्रथम त्यांस इंग्रजींतल्या वाचनावरून सुचत असतें. इंग्रजींतले विचार इंग्रजी धर्तीवर मराठींत उतरणें अवघड जाऊं लागलें म्हणजे लेखक व संपादक संस्कृताचा आश्रय करितात; आणि पुष्कळ वेळां असली वाक्यरचना धड ना संस्कृत, ना इंग्रजी, ना मराठी अशी च मनाला भासूं लागते. खेड्यापाड्यांतून चालू असलेल्या मराठीचें रूप जरी अजून बरें च शुद्ध आहे तरी तीवर सुद्धां इंग्रजीचा परंपरेनें आघात झाल्याशिवाय राहिलेला नाहीं.

राज्यक्रांति झाल्यामुळें, समाजाला जें स्थित्यंतर प्राप्त झालें त्यामुळें पूर्वींच्या अमदानीचे द्योतक शब्द गतार्थ होऊन लुप्त झाले. कांहीं शब्द कालगतीमुळें साहाजिकपणें नष्ट झाले आणि कांहीं पुस्तकी भाषेमुळें मागें पडून नाहींसे झाले. अशा दोन्ही तिन्ही कारणांमुळें मराठींत जो जबरदस्त फेरफार झाला आहे, तो सांप्रतच्या पिढीच्या लक्ष्यांत सहसा येत नाहीं. परंतु वृद्ध मनुष्यास तो पदोपदीं जाणवतो व पन्नास वर्षांपूर्वीं घरींदारीं नेहमीं ऐकण्यांत येणारे शब्द आतां नाहींसे झाले हें त्याला सहज सांगतां येतें. इति + ह + आस = म्हणजे असें घडलें, अथवा असें होतें. अर्थात् पूर्वकाळच्या स्थितीचे द्योतक असे मराठींतले सर्व शब्द ऐतिहासिक होत. अशा असंख्य शब्दांचा लोप झाल्यामुळें इतिहासाचा मार्ग बरा च कुंठित झालेला आहे. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट एवढी च कीं, अजून सुद्धां शेंकडों ऐतिहासिक शब्द चालू भाषेंत लपून छपून वावरत आहेत. लपूनछपून म्हणण्याचें कारण इतकें च कीं, त्या शब्दांचा मूळ अर्थ व उद्देश बाजूला राहून त्यांचा उपयोग केवळ गौणार्थानें अथवा भलत्या च अर्थानें व्यवहारांत होत असतो. अशा कांहीं ऐतिहासिक शब्दांची फोड या लेखांत करण्याचें मीं मनांत आणिलें आहे.

हिंदुस्थानांतल्या इतर प्रांताप्रमाणें महाराष्ट्र सुद्धां शेतकरी लोकांचा देश आहे. अशा लोकांच्या संसारांत चतुष्पादांपैकीं गुराढोरांना च प्राधान्य दिलेलें आढळावें व तसें च तें हल्लींच्या काळांत दिलेलें आढळतें हि. पण, पूर्वीच्या कारकीर्दीतल्या लोकांच्या संसारांत, गुराढोरांपेक्षां घोडें या जनावराची च मातब्बरी अधिक समजली जात होती, हा एक मराठे लोकांचा विशेष आहे. पूर्वी सडका व हल्लींच्या बैलगाड्या नव्हत्या, त्यामुळें स्थलांतर करण्याला घोडें हें च वाहन होतें, हें त्याला प्राधान्य येण्याला कांहींसें कारण आहे च; परंतु मुख्य कारण असें आहे कीं, पूर्वीचा महाराष्ट्र हा घोडे-स्वारांचा देश होता. पांचपन्नास हजार मराठी स्वारांची धाड एखाद्या प्रांतावर जाऊन पडली म्हणजे, इंग्रज, फ्रेंच वगैरे परद्वीपस्थ लोकांस पराकाष्ठेचा अचंबा वाटे. ते म्हणत कीं, इनकीं हीं घोडीं येतात तरी कुठून ! परद्वीपस्थांच्या फौजांत घोडेस्वार फार थोडे असतात; व शिलेदारी पद्धत ते कधीं अमलांत आणीत नाहींत. त्यामुळें, इतके अपरंपार घोडेस्वार पाहून त्यांना आश्चर्य वाटावें हें साहाजिक आहे. पण महा-राष्ट्रांतला त्या काळचा परिपाठ ज्यांना माहीत आहे, त्यांना या गोष्टीचें कांहीं च आश्चर्य वाटत नाहीं ! जातिवंत, मूल्यवान व लढाईच्या उपयोगाचे लक्षावधि घोडे, केवळ दहा पांच वर्षांच्या तरतुदीनें कोणा हि सरकारास मिळणार नाहींत. निदान त्या वेळीं तरी मिळाले नसते. असल्या घोड्यांची निपज करण्याचा धंदा देशांत सार्वत्रिक असावा, व तो शेंकडों वर्षांपासून चालत आला असावा, तेव्हां च एवढा प्रचंड अश्वसमुदाय वाटेल तेव्हां गोळा करितां येतो; आणि महाराष्ट्रांत या च प्रमाणें स्थिति होती. शिलेदार लोक आपापल्या मालकीचे घोडे उत्तम रीतीनें राखून त्यांची संख्या वाढविण्यांत लक्ष्य घालीत होते. हें तर राहो च; पण लष्करी पेशाशीं संबंध नसणारे खासगी लोक सुद्धां, लढाऊ घोड्यांची पैदास व जोपासना करून तीं घोडीं अर्धेली–तिर्धेलीनें शिलेदारास देत असत. सर्व बडे लोकांनीं खासगी पागा राख-लेल्या होत्या. त्यांचा निर्वाह दरवर्षी होणाऱ्या मोहिमांवर च अवलंबून असे. सारांश, त्या काळांत घोडा हें निर्वाहाचें साधन व उत्तम धन अशी च सार्वत्रिक समजूत होती ती च मराठींतल्या शेंकडों शब्दांत प्रतिबिंबित झालेली दिसते. आतां, वाहनाच्या अथवा निर्वाहाच्या दृष्टीनें घोड्याचा उपयोग जरी आम्हांस कांहीं च राहिलेला नाहीं, तरी असले हे अश्ववाचक शब्द भाषेंत अजून राहिले ते राहिले च आहेत ! मात्र, त्यांचा वास्तविक अर्थ लुप्त होऊन, फक्त गौणार्थानें त्यांचा प्रयोग होत असतो, हें पुढील उदाहरणांवरून दिसून येईल.

(१) **'त्यानें तुझें कोणचें घोडें मारिलें ?'** यांत मारणें म्हणजे लुटणें असा अर्थ आहे. गांव मारिला, देश मारिला, याचा अर्थ गांव लुटला, देश लुटला, असा च आहे. घोडें हें शिलेदाराचें सर्वस्व असल्यामुळें, तें गेलें म्हणजे त्याच्या सर्वस्वाची च हानि झाली ! तात्पर्य, त्यानें तुझें कोणतें जबरदस्त नुकसान केलें असा च विचारणाऱ्याचा अभिप्राय असतो.

(२) 'इथें च घोडें पेंड खातें !' घोडें पेंड मुळीं च खात नाहीं. तर मग या वाक्याचा अर्थ काय ? बिगार या अर्थी पेंड शब्द आहे च. 'पेंड पोंचविला' हा चालूं मार्येत प्रयोग हि आहे. पेंड याचा दुसरा अर्थ वेठ पोंचविण्याचा टप्पा, असा हि आहे. समजा, पुण्याहून ब्रम्हाणपुरापर्यंत घोड्याचे वीस टप्पे असले, आणि त्यानें तितका मार्ग चालण्यास एकवीस दिवस लावले, तर त्यानें कोठें तरी एका टप्प्यावर विसावा घेतला म्हणजे एक पेंड खाल्ला ! पेंड म्हणजे टप्पा असा अर्थ दाखविणारें पेंडगांव हें एका गांवाचें नांव प्रसिद्ध आहे च. शिवाय, पेणें म्हणजे टप्पा असा हि एक शब्द आहे. त्या च शब्दाचें उच्चार–सौकर्यार्थ पेण असें रूप झालेलें आहे. पेंड, पेणें, पेण हीं मूळचीं एक च होत.

(३) 'गंगेस घोडे न्हाले' या ठिकाणीं, गंगा म्हणजे गोदावरी असा अर्थ घेतला, व महाराष्ट्रांत हा च अर्थ योग्य आहे, तर ही म्हण शिवाजीच्या कारकीर्दींत उत्पन्न झाली असें होतें. आणि भागीरथी असा अर्थ घेतला, तर बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत ही म्हण पडली असली पाहिजे असें निष्पन्न होतें.

(४) 'आपलें च घोडें पुढें दामटूं नकोस.–

(५) 'त्याचें घोडें थकलें.'–

(६) 'आपलें झालें थोडें व्याह्याला धाडलें घोडें.'–

(७) 'घोडा मैदान जवळ च आहे.'–

(८) 'अरे! जरा तुझा घोडा उभा , घाई करूं नकोस.'–

(९) 'हे राव आतां घोड्यावर बसले. हे कुठले शुद्धीवर बोलायला–या वाक्यांचा अर्थ स्पष्ट च आहे.

(१०) 'घोड नवरी' (११) 'घोड मुंजा' (१२) 'घोड जावई'— मुलगी लग्नाला फार च मोठी झाली तर तिला उपहासानें 'घोड नवरी' म्हणत. ( आतां कोणी म्हणत नाहींत ! ) मुलगा मुंजीला मोठा झाला म्हणजे तो च 'घोड-मुंजा'। मोठ्या वयाचा जांवई सासुरवाडीचा सोहळा भोगण्यास गेला तर तो घोडजावई।

(१३) 'घोडीवर बसविणें' पंतोजी मुलांस शिक्षा करितांना, त्याला घोडीवर बसवीत असे. पण आतां शिष्याला घोडीऐवजीं खुर्ची मिळते !

(१४) 'घोड्याची मुंज.'– कोणाच्या घरीं कांहीं विशेष गडबड दिसली म्हणजे परस्थ विचारतो कीं, आज तुमच्या घरीं काय आहे हो ! मालकाच्या मनांत सांगायचें नसलें म्हणजे तो म्हणतो–कीं घोड्याची मुंज आहे.

(१५) कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तटाणी–

तुलनात्मक उपहास करावयाचा असला म्हणजे हें वाक्य उपयोगांत येतें. भट्टाच्या तट्टाची टर कोणीं पुढें दिलेल्या श्लोकांत केली आहे.

गलच्चक्षुर्मिलज्जानुः प्रस्खलंश्च पदे पदे ।
मक्षिकालक्षसंयुक्तो भट्टतट्टुर्विराजते ॥ १ ॥

मराठींतला:—

· ह्यां ह्यां करतां प्राण कंठास आले । इत्यादि

घोड्याचीं अशुभ लक्षणें अथवा खोड्या बहात्तर धरल्या आहेत. पण या बहात्तर खोड्यांचा हि उपयोग भलत्या च ठिकाणीं होत असतो ।

(१६) **'त्या पोरांत बहात्तर खोड्या भरल्या आहेत'**—अहो, मुलगी कशी कां असेना ! ती गोरी असली म्हणजे झालें;—

(१७) **'गोरी, बहात्तर खोड्या चोरी ।'**—या खोड्यांच्या यादींत **गोम** व **'पठाडी गोम'** वगैरे शब्द वेलाशक माणसांना हि लावण्यांत येतात ।

(१८) **दौड**—हा शब्द अश्वगतिवाचक असतां, आम्ही म्हणतो कीं, त्या माण सानें दौड मारली ।

(१९) **'हिरिरी'**—म्हणजे फौजेचा हल्ला असा अर्थ असतां, नेहमींच्या व्यवहारांत सुद्धां हा शब्द आपण ˜. जसें ' मीं पहिल्या हिरिरीसरसें पोतीं उचलण्याचें काम करून टाकलें ।

(२०) **स्वारी**—शब्दाच्या अपप्रयोगाबद्दल सांगायला नको च ।

(२१) **'संकटांत उडी घालणें'**—यांत 'उडी घालणें' हे शब्द तुमुल युद्धांतल्या प्रसंगाचे दर्शक आहेत. एखादा घोडेस्वार भर लढाईंत जखम लागून, घोड्याखालीं येतो. त्यास तसें च राहूं दिलें तर तो मारला जाईल, म्हणून त्याचे सोबती आपापल्या घोड्यांवरून खालीं उतरतात व आपल्या जखमी मित्रास हाणामारीच्या गर्दींतून सोडवितात. असा पराक्रम करणें हें मोठ्या छातीचें आणि धोक्याचें काम आहे. 'उडी घालितो संकटीं स्वामि तैसा' या चरणांत या च अर्थाची छाया आहे. केव्हां केव्हां फौज पळून जाण्याच्या बेतांत आली असतां, तिनें तसें न करावें म्हणून मालक घोड्यावरून उडी टाकून उभा राहात असे. आपल्या मालकाची, जिवाविषयीं बेपर्वा व लढण्याचा निश्चय पाहून त्याच्या बचावासाठीं त्याची फौज हि चिकाटीनें लढत असे. अशा प्रसंगीं हि **उडी घालणें** या शब्दांचा प्रयोग केलेला आढळतो; पण तो प्रस्तुतच्या वाक्याला लागू नाहीं. घोडेस्वारांचे निंदावाचक शब्द—

(२२) **'रडधा राऊत'**, पंक्ति **'बारगीर'** **'पंक्तिपठाण'** **'अरेराव'** हे आहेत. व प्रशंसावाचक;—

(२३) 'धारराव', 'मालेराव' 'राव' हे आहेत. तरी पुष्कळ वेळां प्रशंसापर शब्दांचा हि उपयोग उपहासाच्या प्रसंगानें होत असतो. मालेरावाच्या करामतीला 'मालेराई' हें नांव हि चालू भाषेंत आहे च.

(२४) मालाभर पाणी या शब्दांत मराठ्यांच्या भाला या आवडत्या हत्याराचा उल्लेख आहे.

(२५) 'जंग' म्हणजे लढाई. अर्थात् जंगी म्हणजे लढाऊ. पण आम्ही म्हणतों जंगी मेजवानी ! जंगी समारंभ, जंगी सामान ! खड्डाजंगी म्हणजे खडे समोरासमोर उभें राहून जिवाच्या बेपर्वाईनें लढणें. या हि शब्दांचा प्रयोग अ-स्थानीं होत असतो हें सांगायला नको च !

(२६) 'खोगीरभरती' याचा अर्थ कसल्या तरी स्वारांचा भरणा असा आहे.

(२७) करोल–' आज वाड्यांचा तुटवडा पडणार नाहीं. पंचवीस असामी करोल तयार ठेवले आहेत,' असें आपण म्हणतों. पण करोल शब्दाचा मूळ अर्थ बंदुकस्वार असा आहे !

(२८) कजाख म्हणजे शूर, लढवय्या. पण सांप्रत एखाद्या भांडखोर बाय-कोचा वाचक म्हणून कजाग हा शब्द आपण योजितों. हा शब्द मूळचा तुर्की भाषें-तला आहे व कोशांत याचें दुसरें रूप 'कोसॅक' असें दिलें आहे ! कजाग व कोसाक यांमधलें हें बहीणभावाचें नातें कोणाच्या स्वप्नांत सुद्धां येणार नाहीं !

(२९) 'ढालगज' अमुक बाई ढालगज आहे असें म्हणण्यांत येतें. पण मूळ अर्थ पाहूं जातां, ढाल म्हणजे मुख्य निशाण आणि गज म्हणजे हत्ती, ढालगज म्हणजे निशाणाचा हत्ती !

(३०) शस्त्रवाचक शब्दांत फिरंग या शब्दाचा अर्थ एक जातीची तरवार असा आहे. हीं शस्त्रें फिरंगी म्हणजे पोर्तुगीज लोकांकडून मिळत. हल्लींच्या प्रचारांत फिरंगी शब्द आहे. फिरंग नाहीं.

(३१) 'पूर्तकाल' पोर्तुगालचा कागद इकडे येत असे, त्याला पूर्तकाली कागद म्हणत. तो हि हल्लीं प्रचारांतून गेला आहे.

(३२) पंचहत्यारी म्हणजे पांच हत्यारें बाळगणारा लढवय्या माणूस. तीं पांच हत्यारें:- बंदूक, भाला, तरवार, जंबिया, आणि तीरकमान हीं होत.

(३३) चढती कमान म्हणजे अधिज्य केलेलें धनुष्य. हल्लीं, कोणीं बिन्धाड-करूनें घरवाल्याला म्हणावें कीं, बाबा तूं सांगशील तें भाडें मला कबूल केलें पाहिजे. तुझी चढती कमान आहे ! घरवाल्याला कमान म्हणजे काय असें विचारिलें तर तो घरांतली च एखादी कमान दाखवील !

(३४) पट्टा– पट्टा म्हणजे दुधारी तरवार. त्या शस्त्राच्या उपयोगांत जो निष्णात असतो तो पटाईत. तो पळण्यांत पटाईत आहे हें वाक्य हल्लींच्या मार्गेतलें आहे.

(३४) [illegible]—महाराष्ट्र ही शिपाई लोकांची विलायत म्हणून नांवाजलेली असल्यामुळें घोडा व शस्त्रें यांचे वाचक शब्द सांप्रतच्या मराठींत सुद्धां पुष्कळ सांपडावे यांत नवल नाहीं. तरी तत्कालीन इतर व्यवहाराचे वाचक शब्द हल्लींच्या प्रचारांत पुष्कळ आहेत. जसें 'काय हा बेदा केलास ! या वाक्यांत बेदा शब्दाचें मूळ बेद या शब्दांत आहे. बेद म्हणजे कर्नाटकी पेंढारी.

(३५) काटक– 'तो माणूस काटक आहे.' या वाक्यांत काटक म्हणजे सोशीक असा हल्लींचा अर्थ. पण मूळ अर्थ काटक म्हणजे कानडे दंगेखोर, बेरड, बेद वगैरे । त्यांच्या काटकांच्या दंग्याला नांव काटकाई.

(३६) काफर 'तो काफर आहे.' या वाक्यांतला काफर शब्द खरें म्हटलें तर, हिंदू लोकांच्या व्यवहारांत येऊं नये. मग काफर म्हणजे आफ्रिकन असा अर्थ असल्यास न कळे. बहुधा तो च अर्थ समर्पक दिसतो.

(३७) सोदा–सोदेगिरी. सोदे ही एक लुटारू लोकांची जात होती. प्रत्येक लष्कराबरोबर हे बाळगलेले असत, व लूट चोऱ्यामाऱ्या करून ते पोट भरीत. लष्करचें काम यांजकडे चर खणणें, धमधमे बांधणें वगैरे असे. उकाल म्हणजे नेम चुकून फुकट गेलेले तोफेचे गोळे हे गोळा करीत व त्याबद्दल त्यांस मजुरी म्हणून कांहीं मिळे.

(३८) काशीकर–पूर्वीच्या काळांत काशीयात्रा पायीं चालून करावी लागे व तिला चार चार सहा सहा महिने लागत, आणि यात्रेकरूंवर नाना प्रकारचीं संकटें ओढवत. तेव्हां, अशी कष्टमय यात्रा करून आलेला माणूस असामान्य आदराला पात्र व्हावा हें योग्य आहे. पण व्यवहारांतला अर्थ, काशीकर म्हणजे लुच्चा ! 'शंभर काशीकर, एक नासिककर' हें कोष्टक तर नाशीकच्या लोकांची विनाकारण बदनामी करणारें आहे !

(३९) धोशा–काय हा धडा घोकण्याचा धोशा लावला आहेस ! या वाक्यांतल्या धोशा शब्दाचा मूळ अर्थ 'आरबांचें निशाण' असा आहे. आरबांनीं किल्ला घेतला तर त्यावर ते प्रथम आपला धोशा लावीत,आणि मागून सरकारचें निशाण लावीत. धोशा शब्दाचा दुसरा अर्थ ' नौबत', साहेबनौबत' असा हि आहे. निजाम अल्लीनें इब्राहीमखान नांवाच्या सरदाराला बहुमानार्थ ही नौबत दिली होती. सबब त्या सरदाराचें हि आडनांव धोशा अगर धोंशा असें पडलें होतें. प्रस्तुतच्या वाक्यांत निरनिराळ्या प्रकारें दोन्ही अर्थ होऊं शकतील.

(४०) हर हर महादेव–लढाईंत निकराच्या हल्ल्याच्या वेळीं हर हर महादेव

ही मराठ्यांची गर्जना होती. सांप्रत ती गावभोजनाच्या मुल्खानीस होत असते हें कालानुरूप च आहे।

(४१) 'उठणं' या शब्दाचा अर्थ हल्ला करणं असा होता तो आतां प्रायः लुप्त झाला आहे. 'तूं त्याच्या जिवावर अगर अन्नावर कां उठलास?' असल्या वाक्यांत मात्र तो दिसून येतो.

(४२) मुलूख मोडणें–'दोन प्रहरच्या जेवणानंतर नाहींसा झालास तो आतां उगवतो आहेस, कुणीकडे मुलूख मोडायला गेला होतास ? या वाक्यांतल्या मुलुख मोडणें या शब्दांचा अर्थ सेडीं व शहरें जाळून व लुटून उध्वस्त करणें असा आहे !

४३ धाड–'तुला काय धाड बडवली !' या वाक्यांत धाड शब्दाचा मूळ अर्थ गांवावर अगर देशावर शत्रूचा हल्ला. नेहमींचें वाक्य ' तुला काय धाड झाली!' असें आहे तें अगदीं च निरर्थक होय।

(४४) पिच्छा–' मीं त्या कामाचा पिच्छा पुरवला' यांतल्या पिच्छा शब्दाचा अर्थ शत्रूचा पाठलाग असा आहे. दुसरा अर्थ छावणीची पिछाडी असा आहे. आगा म्हणजे छावणीची अघाडी आणि पिछा म्हणजे पिछाडी. 'त्या इसमाचा आगापिछा तुला माहीत आहे काय?' हें वाक्य बोलतांना लष्कराची छावणी कोणाच्या हि मनांत नसते।

(४५)फौज धरणें याचा अर्थ फौज गोळा करणें व चाकरीस ठेवणें.शाहू महाराजानीं मरतेवेळीं नानासाहेबांस चिठी लिहून दिली, तींत ' तुम्ही फौज धरनें ' असें वाक्य आहे 'यंदां तूं इतकी जमीन कशाला धरलीस ? ' या वाक्यांतल्या धरणें या शब्दाचा अर्थ तो च आहे.

(४६) 'हूल'–आपण अमुक गोष्टीची हूल उठली असें म्हणतों. त्या वेळीं हूल उठणं या शब्दाच्या मूळ अर्थाचा मागमूस देखील आपणास नसतो। 'हूल' म्हणजे घिनीची घिनी. अथवा लष्करच्या अघाडीची अघाडी. हुलीचे स्वार महार जातीचे असत. अजून सुद्धां संस्थानांतून हुलसार हा शब्द ऐकण्यांत येतो. हूल उठली म्हणजे गांवावर अगर परगण्यावर लष्करच्या अघाडीनें हल्ला केला, असा वास्तविक अर्थ आहे.

४७ 'घरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजणं ' लष्करचे अधिकारी, तळाच्या आसपास गांव असतील त्यांतून, भाकरी भाजणें, पीठ दळणें, वगैरे कामाकरितां लोक धरून नेत. पदरचें खाऊन लष्कराचीं असलीं कामें करावीं लागलीं, तर लोकांस तो साहजिकपणें च जुलूम वाटे. स्वार्थविरहित लोकसेवा करणें अप्रयोजक आहे, अशा बुद्धीनें या वाक्याचा हल्लीं प्रयोग होत असतो व तो सार्वजनिक कार्यांविषयीं आमच्या लोकांची किती अनास्था आहे याची साक्ष पटवितो. 'घरचें खाऊन' या शब्दां विषयीं आणखी असें सांगावयाचें कीं, पूर्वी तुरुंगांतल्या बंदि-

थानां पैकीं कित्येकांस, घरची पोटगी द्यावी लागे व त्यांस सरकारी पोटगी मिळे, त्यांची मुक्तता होते वेळीं शक्य असल्यास पोटगीचा वसूल सरकार करून घेई।

(४८) **गाशा गुंडाळणें**–गाशा म्हणजे काय हें आम्हांस माहीत आहे. परंतु गाशा हा जिन्नस कोणाच्या हि घरीं आतां सांपडणार नाहीं. घोड्या वरचें सव सामान घालून झालें म्हणजे शेवटीं गाशाची गुंडाळी करून ती जिनावर बांधावयाची असे. घोड्यास किंवा स्वतःस विश्रांति देण्या करितां स्वार खालीं उतरला, म्हणजे बसण्याकरितां त्याला या गाशाचा उपयोग होई. कांहीं भय दृष्टीस पडलें, तर तो घाईघाईनें गाशा गुंडाळून घोड्यावर बसून पार होई.

( ४९ ) ' **पागेस लावणें** ' म्हणजे संग्रह करून **वहिवाटींत आणणें.** गाणें शिकणारा म्हणतो कीं, ही चीज मीं पागेस लावली, आतां दुसरी शिकेन. पूर्वी, लुटींत घोडीं सांपडलीं, म्हणजे सरदार कांहीं घोडीं शिलेदारांस वांटी व कांहीं सरका-रच्या पागेस जमा करी. पाग्या म्हणजे पागेवरचा अंमलदार. ' आधीं होता बाग्या त्याचा झाला पाग्या ' इ० म्हण आहे च. ग्यानू हवालदार हें केवळ **पागेचें तट्टू !** तो कोणाला बधायचा नाहीं ! सरकारी **पागेचीं तट्टें** ( घोडे नव्हेत ) खोडकरपणा-विषयीं पूर्वी प्रसिद्ध होतीं व अजून हि आहेत.

( ५० ) **गुळें**–' गोमाजीपंताच्या व्यापाराचें गुळें झालें.' शत्रूची धाड आली म्हणजे गांवकरी गांव सोडून पळत. असा गांवकऱ्यांचा पळ कोठें आश्रयार्थ गेला असतां, त्याला गुळें म्हणत. ' तुम्ही कांहीं च तरतूद नाहीं; असा काय **गुळेंकऱ्या-सारखा** वागतोस ! हें हि वाक्य हल्लीं प्रचारांत आहे. गुळें याचें दुसरें रूप गुडें असें हि आहे.

( ५१ ) ' **कावाडकष्ट** '–कावाड अथवा कवाड म्हणजे बैलाच्या अथवा तट्टाच्या पाठीवरचें वैरणीचें ओझें.

( ५२ ) **पूर्वीच्या कांहीं प्रसिद्ध लोकांचीं नांवें** कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानें अद्यापि प्रचारांत आहेत. जसें– ' **शिंदेशाही तोडे**', ' **बाजीरावकांठी** धोतरजोडा ', ' वेत **बाजीरावाचें** आणि वागणूक कंका-ड्याची ' अथवा ' उजेड सनकाड्यांचे.', ' **नारो शंकरी** घांट ' प्रसिद्ध च आहे. '**कमालखानी हार** ' हा कमालखान कोण होता हें ठाऊक नाहीं. मिजासीविषयीं व नाजुकपणाविषयीं पन्नास वर्षांपूर्वी **दाजीबा फडक्यांचें** नांव निघत होतें. आतां तें कोणास ठाऊक नाहीं. हे दाजीबा, हरिपंत तात्यांचे चिरंजीव व दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे श्वशुर होते. कजाग बायकोला ' **बायजाबाई** ' हें नांव देण्यांत येतें, ती **बायजाबाई** दौलतराव शिंद्याची स्त्री व सर्जेराव घाटग्याची कन्या होय. ' तूं कोण मोठा **तिरशिंगराव** अथवा **तिस्मारखान** लागला आहेस.' या वाक्यांतले हे तीन शिंगाचे राव अथवा तीस योद्ध्यांना मारणारे खान कोण होते हें माहीत नाहीं. बहुधा हे

दोन्ही पुरुष काल्पनिक असावेत. ' मेठे आले **शेखोजी आंगरे** आणि **गोमाजी कापशी** । ' या वाक्यांतलीं आंगरे व कापशे हीं नांवें खरोखरीचीं असून तीं मराठी आरमाराच्या सरदारांचीं होतीं.

(५३) **' कडेकोट बंदोबस्त '** म्हणजे एखाद्या स्थळाभोंवतीं तटबंदी करून केलेला बंदोबस्त.

(५४) **स्वामीभक्तीचा ' कडेलोट '**– अपराध्यांना किल्ल्याच्या भिंती" वरून खालीं लोटून देत, त्याला कडेलोट असें म्हणत. जेथून लोटून यावयाचें त्या जाग्याला टकमक असें नांव होतें.

(५५) **' अकलेचा खंदक '** म्हणजे मूर्ख. ' अकलेचा गाभा ', ' अकलेचा कांदा ' हे शब्द ठीक आहेत. अकलेचा खंदक काय तो नीटसा लक्ष्यांत येत नाहीं.

(५६) **' मेटें ', ' मेढें ', ' मेढेकोट '– मेढें** हें सातारा जिल्ह्यांतल्या एका गांवाचें नांव आहे. ' मेटें' हें रत्नागिरी जिल्ह्यांतल्या एका गांवाचें नांव आहे. मेढें आणि मेटें एकच. मेटें म्हणजे किल्ल्यास जाणाऱ्या मार्गावरील नाक्यावरची अथवा वाटेंतली चौकी.

(५७) **ताटाखालचें मांजर**– किल्ल्या खालचीं खेडीं असत त्यांस घेऱ्यांतलीं खेडीं म्हणत. तीं संरक्षणाच्या बाबतींत सर्वस्वीं किल्ल्यावर अवलंबून असत. किल्ला सुरक्षित, तोंपर्यंत त्याखालचीं खेडीं सुरक्षित. अन्नाकरितां ज्याच्या ताटावर अवलंबून जें मांजर राहतें तें त्याच्या ताटाखालचें मांजर.

(५८) **माग काढणें अगर लावणें.**– माग काढण्याची विद्या आपल्यां" तून आतां गेली आहे. हा माग चोराच्या पावलांवर गांवचे महार, बेरड, वगैरे रखवालदार लावीत असत. जेथें चोरी झाली असेल, तेथल्या गांवकऱ्यांनीं पुढच्या गांवापर्यंत चोरांच्या पावलांचा माग लावून द्यावा. त्या गांवकऱ्यांनीं तो च माग पदरांत घेऊन पुढच्या गांवापर्यंत दाखवून द्यावा, म्हणजे ते गांवकरी सुटले, आणि चोरीचें जोखीम या तिसऱ्या गांवकऱ्यांवर पडलें. त्यांनीं एक तर पुढच्या गांवाला माग दाखवून द्यावा अगर चोरी भरून द्यावी. माग काढणारे गांवचे रखवालदार हे स्वतः चोर असल्यामुळें ' चोराचीं पावलें चोराला माहीत ' ही म्हण पडली आहे.

(५९) **' धांवणें '** म्हणजे पळणें हा अर्थ आहे च. शिवाय, मदतीकरितां अगर बचावाकरितां धावणें असा हि अर्थ आहे. तो सांप्रतच्या धांवा, धांवा, ' खून, खून । ' इत्यादि वाक्यांत मात्र दिसून येतो. ' धांवा ' नांवाचें गीत प्रसिद्ध च आहे. कोशांत 'धणी धांवणा ' असा शब्द दिला आहे. त्याचा अर्थ संकटांतून बचाव करणारा धनी, असा होय. ' चोरांनीं गांठलें होतें पण किल्ल्यावरून धांवणें आलें, तेव्हां चोर पळाले ', हें जुन्या मासिंतलें वाक्य.

( ६० ) **गलबत** हा शब्द Galivat या पोर्तुगीज शब्दावरून निघाला आहे golly boat, gally हे गलबतांचे भाऊबंद होत.

( ६१ ) **माखजन**–संगमेश्वरा जवळच्या एका गांवाचें नांव माखजन आहे. तो शब्द आरबी असून त्याचा अर्थ खजिन्याची अगर कोठीची जागा असा आहे. **खजाना, खजिना** वगैरे शब्द प्रसिद्ध च आहेत. **माखजन** व इंग्रजीतलें Magazine हे एक च आहेत।

( ६२ ) **कमाल**– 'खांसाहेबांनीं गाण्याची **कमाल** केली.' कमाल शब्दाचा मूळ अर्थ जमीन-महसुलाची भर आकारणी हा होय. जमीन · पडित अगर पिकाऊ हा विचार न करितां गांवावर सर्व जमिनीची आकारणी करणें तीं **कमाल** आकारणी होय.

( ६३ ) **उपहासात्मक विशेषणें**– यांत केव्हां केव्हां, पूर्वीच्या मुलकी अधिकाऱ्यांचा व त्यांच्या वैभवाचा उल्लेख होत असतो. जसें–'**घागरगडचे सुभेदार,**' '**उलटी अंबारी**', '**चारी खुंटांची** जहागीर.', 'कुळकर्णी वतनाची झाली **चांदरात**' महिन्यांतल्या पहिल्या चंद्राचें दर्शन झालें म्हणजे मुसलमानी महिन्याची पहिली तारीख सुरू झाली. त्या दिवशीं नोकर लोकांचे पगार मिळत असत. वास्तविक चांदरात हा शब्द शुभ, लाभ व उत्कर्ष यांचा द्योतक आहे. तरी उपरोधानें त्याचा प्रयोग प्रस्तुत वरच्या वाक्यांतल्या सारखा नाश अशा अर्थानें केला आहे 'चांदरात झडते आहे तोंपर्यंत गमजे चालले आहेत.' या वाक्यांतला अर्थ उपरोधात्मक नसून सरळ च आहे.

( ६४ ) **जामानिमा**– 'कुठं **जामानिमा** करून चाललात!' **जामा** म्हणजे पायघोळ झगा व **निमा** म्हणजे कोपरापर्यंत व मांड्यापर्यंत पोंचणारा एक प्रकारचा अंगरखा. दोन्ही वस्त्रें मुसलमानी पेहेरावापैकीं आहेत.

( ६५ ) **गुलाम**– 'तो माणूस **गुलाम**'– आहे. गुलाम व बटकी आपल्या समाजांत बाळगण्याची चाल होती. त्यावरून हा गुलाम म्हणजे लुच्चा लबाड असा उपरोधिक अर्थ.

( ६६ ) **धरणें पारणें**– '**धरण्यापारण्याशीं** गांठ पडली आहे' –पेशवाईत धनकोनें ऋणकोच्या दाराशीं **धरणें** दिलें म्हणजे तो ऋणकोला सहकुटुंब उपास घाली. ऋणको धरण्यांतून सुटला म्हणजे त्याला जेवण मिळे.

( ६७ ) **आटापीठ**–सर्व काम उरकून घेण्यास मला इतकी **आटापीट** करावी लागली.' – धनकोकडून किंवा सरकारांतून तगाद्या करितां आलेले शिपाई परदेशी असले तर **आटा** मागत व देशी असले तर **पीठ** मागत व त्या शिपायांची मिजास संभाळतां संभाळतां ऋणकोची त्रेधा उडे.

( ६८ ) **पंचाईत** – 'आज जेवायला कसें मिळतें ही च पंचाईत पडली आहे'. पंचाईत ही आपल्या देशांतील अनादिकालची संस्था, आपला आयुष्यक्रम सुरळीत

ध्यापून बसली होती कीं, कांहीं अडचण पडली असतां पंचाईत शब्दाचा उच्चार आपो-आप होत असतो !

( ६९ ) **वाद** – '**वादा**' अथवा '**वाद्या**' – म्हणजे शत्रु. पूर्वीच्या अमदानींत वतनाच्या वादाचा अखेरचा निकाल कधीं च होत नसे. बहुधा प्रत्येक वतनाबद्दल हे वाद चालू असत. असे वाद पुन्हां पुन्हां उकरले गेल्यामुळें शेंदीडशें वर्षें पर्यंत सुद्धां चाललेले माहित आहेत. वतनदाराला त्याचा वाद्या हा कालाप्रमाणें शत्रु भासे. कोंकणांत भाताच्या लावणीच्या वेळीं म्हटलें जाणारें गीतः – 'भले रे दादा, कोंबड्यांवर **वाद्या**'.

( ७० ) **दावा** – '**दावेदारी** ' **दावा** उगवणें.' सांप्रत प्रत्येक कोर्टांत दावा लावून वादाचा निकाल करून घेतां येतो. त्यामुळें दाव्याचें काम सर्वांस सुलभ झालें आहे. परंतु पूर्वींचें दाव्याचें स्वरूप फार उग्र होतें. सरकारांत आपली दाद लागत नाहीं, किंवा वादाचा निकाल अन्यायानें झाला आहे, अशी समजूत झाली म्हणजे, वादी परहद्दींतल्या एखाद्या शेजार गांवच्या पाटलाचा आश्रय करून आपल्या विरुद्ध फेसला देणाऱ्या सरकारच्या रयतेवर घाले घाली; आणि लूट व जाळपोळ करून नुकसान करी, व माझ्या म्हणण्या-प्रमाणें **निकाल** होई पर्यंत मी असा च दावा चालवणार, अशी त्या सरकारच्या गांवच्या वेशीस चिठी बांधीत असे. मग सरकारानें स्वारी करून त्यास धरून तरी आणावें, किंवा मध्यस्था मार्फत त्याची समजूत काढावी.

( ७१ ) **खेळेल तो पोळेल**.–पूर्वीं जळतीं लांकडें हातीं घेऊन एक-मेकांस मारण्याचा खेळ, शिमग्याच्या सणांत, कोंकणांत कोठें कोठें होत असे. इंग्रज सरकारची अमदानी झाल्यावर बगाडा प्रमाणें हा हि खेळ सक्तीनें बंद करण्यांत आला. त्या दुष्ट खेळाची सूचक ही म्हण आहे.

( ७२ ) '**आतां चक्र फिरलें आहे**, पूर्वींचे खेळ आतां चालायचे नाहींत.' या वाक्यांत चक्र म्हणजे राजमंडळ. चक्र फिरलें म्हणजे राज्यक्रांति झाली.

( ७३ ) **चकती**– ' कमीशनर साहेबांची **चकती** घेऊन चपराशी आले, तेव्हां देसाई घाबरला.' चकती म्हणजे कंपनी सरकारची शिक्का केलेली चिठी ( Note ). हा इंग्रजी कारकीर्दीच्या पहिल्या पंचवीस वर्षांतला शब्द आहे.

( ७४ ) **भेटणें** – ' पेशवे व नबाब यांच्या भेटी झाल्या.' – भेटणें म्हणजे गांठ घेणें हा अर्थ विद्यमान आहे; परंतु भेटणें म्हणजे आलिंगन देणें, हा अर्थ आतां लुप्तप्राय आहे. वर्षांतून एकदां दसऱ्याचे दिवशीं तरी आप्तइष्ट एकमेकांस भेटत असत. तो हि प्रकार आतां कोठें पाहण्यांत नाहीं. पेशवे व नबाब यांच्या भेटी झाल्या म्हणजे या बरोबरीच्या च तीनदां झालेल्या भेटी होत्या. अशा भेटीच्या प्रसंगानें च अफजल खानाचा वध झाला हें प्रसिध्द च आहे.

(७५) डोक्या वर धोंडा–'कुणी तुझ्या डोक्यावर धोंडा दिला होता!'–सारा देणाऱ्या रयतेच्या डोक्यावर धोंडा देऊन त्यास उन्हांत उभे करण्यांत येई. त्या प्रघाताचा उल्लेख या म्हणींत आहे.

(७६) 'अति शहाण्याचा बैल रिकामा.' – व्यापारी मालाची ने-आण करण्याला जेव्हां बैलाखेरीज दुसरें साधन नव्हतें त्या वेळची ही म्हण आहे. तिचा अभिप्राय असा की, राजापूर, पनवेल, सुरत या सारख्या ठिकाणीं मालाची खरेदी व्यापाऱ्यांनीं केली. पण त्यांतला एक अति शहाणा होता तो नफानुकसानीची विवेचना करितां करितां बैल रिकामा च घेऊन परत आला.

(७७) 'पालखीपदस्थ' – अमक्याचे पूर्वज पालखीपदस्थ होते, असें कोणीं म्हटलें तर त्यावरून अपार संपत्तीचा बोध होतो. पण पालखी ही वाच संपत्तीची दर्शक नसून, विशेष कामगिरी केल्या बद्दल सरकारांतून झालेल्या गौरवाची सूचक आहे. पालखी, हत्ती व चौघडा यांचा खर्च सालिना बाराशें रुपयांचा आहे. पण, ज्या मातब्बर गृहस्थाजवळ सालिना तितका पैका खर्च करण्याची ऐपत असेल, तो पालखींत बसून जाऊं म्हणेल तर चालावयाचें नाहीं. कारण, पालखींत बसण्याचा त्याला अधिकार नसल्यामुळें, ती पालखी लोक मोडून टाकतील. ती पालखी त्याला सरकारांतून च मिळाली पाहिजे, व तिचा खर्च हि सरकारांतून च चालला पाहिजे. तर च त्याला पालखीपदस्थ म्हणतां येईल.

(७८) पाहुणारावळा, पैपाहुणा—राऊळ=राजकुल, राजवाडा. रावळा म्हणजे राजवाड्यांतून अर्थात् खुद्द राजाकडून आलेला अधिकारी. असा अधिकारी कोणाच्या हि घरीं उतरला असतां, मालकास त्या पाहुण्याची बरदास्त ठेवावी लागे. पै–पाहुणा या शब्दांतल्या पै शब्दाचा अर्थ, एकापेक्षां अधिक दिवस राहणारा असा असून, तो शब्द गुजराथेकडून आला असें कोणीं म्हटलें आहे. अतीत अभ्यागत या शब्दयुग्माच्या अर्थावरून, आतां सांगितलेल्या अर्थाला बळकटी येते हें खरें, परंतु माझ्या मतें पै हा शब्द राजपुरुषवाचक अथवा वतनदार, हक्कदार यांचा वाचक असावा. सारस्वतांत पै हें आडनांव आहे. तात्पर्य, पैपाहुणा व पाहुणारावळा या दोन्ही शब्दांचा अर्थ एक च असावा.

(७९) 'फड मारणें – संपादणें.' – फड म्हणजे सभा अथवा चार चौघे गोष्टी बोलत बसण्याची जागा. शिवाय फड म्हणजे हिशेबी खात्याची मुख्य कचेरी. तीवरचे मुख्य अंमलदार फडणीस.

(८०) 'फत्ते लष्कर' – एखाद्या बेमुर्वत शिवराळ बायकोला हें नांव देण्यात येतें. वास्तविक अर्थ उघड च आहे. फत्ते मिळविणारें लष्कर तें फत्ते लष्कर.

(८१) फरमाश – 'पुन्हां असें करशील तर फरमाशी मार मिळेल.' – फरमास म्हणजे आज्ञा. शी मार म्हणजे हुजूरच्या हुकुमानें दिलेला मार. हल्लींचा अर्थ निराळा आहे.

( ८२ ) **'पांचावर धारण.'**– ती यंदा बाजारांत बरोबर च बसली आहे. परंतु लोकांची मात्र अद्यापि बसलेली नाही हें मोठें आश्चर्य आहे! पूर्वी कधीं काळीं भयंकर दुष्काळ पडला होता तेव्हां रुपयास पांच शेर धारण झाली व तिचें स्मारक म्हणून ही म्हण भाषेंत राहिली.

( ८३ ) **कोन**– 'ती बाई कोनीं निघाली' 'तिनें कोन पालटला'–पूर्वीच्या धामधुमीच्या काळांत सर्व माणसें एकत्र रहावीं अशा सोईचीं घरें बांधावीं लागत. कोनी निघाली म्हणजे बाळांत झाली. बाळंतिणीला निराळी खोली मिळत नसून, तिला माजघराचा एक कोन मिळत असे.

( ८४ ) **दाम, छत्रपति, शिवराई**, वगैरे– पूर्वीचीं नाणीं आतां पाहण्यास मिळणें सुद्धां मुष्किलीचें झालें आहे, तरी ते शब्द अजूनसुद्धां भाषेला सोडीत नाहीत.

( ८५ ) **अठरा विश्वे दारिद्र्य** – रुका म्हणजे पै. रुक्याचे विश्वे वीस. पण कोणा एका अति दरिद्री माणसाच्या घरांत पैचा सुद्धां गोळा करितां करितां, शेवटीं तो अठरा विश्वे च भरला. पुरता वीस विश्वे हि भरला नाहीं! त्यावरून त्याच्या दारिद्र्याचें वर्णन अठरा विश्वे.

(८६) **तीस चाम चामड्याचे** – अल्लाउद्दीन खिलजीनें नाणें सुरू केलें होतें म्हणतात; तें अर्थात् च कोठें उपलब्ध नाहीं; परंतु त्याचें स्मरण देणारी **'एका आण्याचे तीस दाम; व एका दामाचे तीस चाम,'** अशी एक म्हण अस्तित्वांत आहे!

असो. चालू भाषेंतले हे ऐतिहासिक शब्द सहजासहजी सुचले त्यांचें हें टिपण केलें आहे. अशा ऐतिहासिक शब्दांची, अर्थ व व्युत्पत्ती सह एखादी यादी होणें आवश्यक आहे व आस्थेनें शोध करणारास असे आणखी हजारों शब्द सांपडतील अशी मला खात्री वाटते. मराठींतल्या नामांच्या व क्रियापदांच्या व्युत्पत्तीचा छडा लावल्यास त्यांतून पुष्कळ इतिहास निघण्याजोगा आहे. मात्र, शोधकानें चिकाटी सोडतां कामा नये. आजपर्यंत हा उद्योग कोणीं केला नाहीं. तो करण्याची शोधकास प्रेरणा व्हावी हा च या दिग्दर्शनात्मक निबंधाचा उद्देश आहे!

वासुदेव वामन खरे

# माझें संशोधनवृत्त

(शाके १८३९ बद्दल)

सर सालांत ज्या ज्या ठिकाणीं संशोधनार्थ हिंडलों त्या गावांची यादी, जेथें तेथें मदत करणाऱ्या सद्गृहस्थांची नामावळी, व त्या त्या ठिकाणीं पहाण्या सारखे काय काय आहे यांचें सविस्तर वर्णन वगैरे न देतां इतिहासदृष्ट्या आपल्या माहितींत काय नवीन भर पडते अगर पडली, याचा उल्लेख मी करणार आहें.

गतवर्षीप्रमाणें यंदां हि शरीरदौर्बल्यामुळें, सारखें फिरतां आलें नाहीं; दक्षिणेंत सांगली, व उत्तरेकडे ब्रह्मणपूर या दोन दक्षिणोत्तर गांवांतील टापूंपैकीं सुमारें २५ । ३० गांवीं च काय तें जातां आलें. शिवाय, खुद्द पुणें व आसपासचा भाग या भागांतून हि थोडी बहुत सामुग्री मिळाली. तृतीय संमेलन प्रसंगीं, बाळाजी विश्वनाथ सर सुभेदार यांचीं दोन असल पत्रें मंडळापुढें ठेविलीं. त्या वेळीं "हे बाळाजी विश्वनाथ" म्हणजे बाळाजी विश्वनाथ भट पेशवे हें कशावरून ! अशी रा. शास्त्री बुवा खरे, व रा. ब. बावा साहेब साने प्रभृति मंडळींनीं शंका घेतली, हें आपणांस ठाऊक असेल च. गतवर्षींच्या संमेलनानंतर वीरगांवच्या थोरातांकडून बाळाजी विश्वनाथ सेनाकर्ते असल्या वेळचें व बाळाजीपंत नानाऱ्या सरसुभेदारीचा शिक्का असलेलें असल पत्र मिळालें. यावरून बाळाजीपंत पेशवे हे पूर्वी सरसुभेदार होते, हें निश्चयानें सिद्ध झालें. अशा रीतीनें बाळाजीच्या पूर्व चरित्रावर अचानक अपूर्व असा उजेड पडला. हें पत्र मंडळाच्या पाक्षिक सभेपुढें ठेविलें असून, तें असल बरहुकूम मंडळाच्या अहवालांत यथाकाल प्रसिद्ध होईल. दुसरें, शिवछत्रपतींचे पहिले पेशवे, सामराज नीळकंठ रोझेकर —रांझेकर नव्हे— यांचे नुकते च कैलासवासी झालेले वंशज, रा. शंकरराव यांच्या दफ्तरखान्याची चाळना करीत असतां, सामराज नीळकंठा पासून पुढें महादजी, त्याचा सामराज व त्याचा विश्वंभर अशी वांशिक परंपरा निष्पन्न झाली. यांतील महादजी सामराज हा शिवराजाच्या कारकीर्दींत मोठा अमलदार होता, व तो पुढें बाळापडच्या लढाईत मारला गेला अशी माहिती आहे. "सामराज रोझेकर मतिमंतप्रधान" यांचे माझे संग्रहीं जे दोन कागद आहेत त्यांत, व रा० दत्तोपंत पोतदार यांस उरवडे गांवीं मिळालेल्या पत्रांत, 'सामराज निळकंठ साकिन हिवरें नागेश' असें लिहिलेलें आहे. शोधा अंतीं हें हिवरें गांव सोलापूर जिल्हा व मोंगलाई यांचे सरहद्दीवर रोपळे पोस्टाचे हद्दींत आहे असें ठरून, सामराज नीळकंठ हा मूळ हिवरें—नागेश येथील राहणारा असें म्हणतां येतें. पळसदेव येथील कै० शंकराव व त्यांचे भाऊबंद यांचे घरीं अद्यापि हि नागे-

शाची पूजा करितात. 'मतिमत्प्रधान' या संज्ञेपैकीं मतिमत् म्हणजे बुद्धिवान् असा अर्थ घ्यावयाचा, अगर कोणी सुचवितात त्याप्रमाणें मतिमत् हें आडनांव घ्यावयाचें याचा निर्णय, याहून जास्त कागद् हातीं लागल्याशिवाय करितां येत नाहीं. पळसदेव येथें शके १०७५ चा मराठी शिलालेख तेथील देवळावर आहे. त्याचें महत्व त्यांत 'निफनलें' ( निष्पन्नलें ) या पदावरून ठरणारें आहे. या लेखाचा ठसा रा० विश्वनाथपंत राजवाडे यांनीं घेतलेला आहे. खेड ( जि० पुणें ) येथें दिलावरखान याचें थडगें व मशीद् असून, तेथें इकडील भागांत प्रसिद्ध असलेला चंडिराम महाराजांचा मठ आहे. दिलावरखानाच्या मशीदीवर हिजरी सन १०२२ ( १६१३ इ० स. ) चा लेख आहे, तो पुढें मागें प्रसिद्ध करूं. चंडिराम महाराजकृत दोन ग्रंथांपैकीं एकास मुद्रण संस्कार मिळाला असून, दुसरा अद्याप अमुद्रित आहे. चाकण येथें कडू देशमुख व देशपांडे यांचे पैकीं एकेका शाखेचे कागदपत्र पहाण्यास मिळाले. देशमुखां पैकीं शिकेकऱ्याच्या घराण्याचे कागद मिळण्याचा संभव आहे. ते मिळाले म्हणजे चाकणच्या संबंधानें व तत्कालीन राजकीय प्रसंगा संबंधानें नवीन माहितींत भर पडेल. या कागदांचें ऐतिहासिक महत्व कितपत आहे, हें मीं शके १८३५ सालच्या अहवालांत जीं पत्रें छापिलीं आहेत, त्यांवरून सहज लक्षांत येण्या सारखें आहे. चाकणचे ब्रह्मे यांचे कांहीं कागद रा० राजवाडे यांनीं खंड १५ त छापिले असून, शके १८३५ च्या अहवालांत, कचेश्वर ब्रह्मयांचे कांहीं कागद मीं छापिले आहेत. यंदां हि चार दोन कागद मिळाले. तेथील दामु मुंजाची हकीकत अद्यापि मिळावी तशी मिळाली नाहीं. दामु हा ब्रह्मे घराण्यांतिल होय, व हल्लींचा मुंजा जो आहे तो त्यांच्या च नांवानें प्रसिद्ध आहे. तेथील नाइकवाडी यांचे संग्रहांत एक ताम्रपट आहे. परंतु तो मिळेपर्यंत वाट पहावी लागणार आहे. वाफगांव हा होळकरांचा गांव खेड तालुक्यांत आहे; तेथें पाठक घराण्यांत दोन फटके बंद मिळाले, यांत तालीकोटच्या स्वारीचें त्रुटित वर्णन आहे. विजयनगरची आपण बखर छापिली आहे, तिच्यांतील मजकुराशीं यांचा पडताळ घ्यावयाचा आहे. वाफगांव येथील होळकरांचा वाडा प्रचंड आहे. हा हल्लीं मोडक्या स्थितींत आहे. तो व्यवस्थित व सुरक्षित राहील अशी कांहीं तजवीज होणें अगत्याचें आहे. होळकर सरकारचें लक्ष्य इकडे वेधलें पाहिजे. पाबळ येथील गांवाबाहेरील तक्यांतील तुरबत मेहरमबीची अगर मस्तानीची याचा निर्णय करितां आला. तेथें ९६ वर्षांवरील एक वृद्ध गृहस्थ अद्याप हयात आहे, त्याची जबानी उतरून घेतली आहे, त्यावरून या निर्णयास मदत झाली. पाबळास व जवळ च थानोरें म्हणून गांव आहे, तेथें हंडे देशमुख आहेत; यांचे कागद अद्याप मिळावयाचे आहेत. पाबळ गांव १८६७ पर्यंत तालुक्याचें ठाणें होतें, तेथें व आसपास पुष्कळ च प्रयत्न झाला पाहिजे. गणपतीच्या रांजणगांवास मिळालेल्या माधवराव साहेब पेशव्यांच्या सनदेचा संग्रह केला आहे. पुरंधर तालुक्यापैकीं सोनोरी येथें पानसी घराण्याकडे कागदांचा शोध केला. तेथें फक्त एक चिलखत व हंबलकर


देसायांच्या बाबतींत पानशांनीं केलेल्या कामगिरी बद्दल पेशवेसरकार कडून त्यांस गंगापूर गांव इनाम मिळालें त्याची सनद्, अशी सामुग्री मिळाली. तेथील मल्हारगड मोडकळीस आलेला आहे. सासवडांतील कै. श्री. नानासाहेब पुरंधरे यांचे कडे अतोनात कागद् आहेत. ते पहाण्यास मिळण्याविषयीं पेगम बांधला आहे. खुद्द पुण्यांत मागें सांगितल्या प्रमाणें बरे च कागद् मिळाले, व त्या मुळें पुण्याच्या माहितींत भर घालतां आली. येथील कसब्याच्या गणपतीचे पुजारी वे. रा. गणेश रघुनाथ ठकार यांजकडून चार कागद् मिळाले. पैकीं, एक शिवाजीनें दिलेलें व दुसरें जिजाबाईनें दिलेलें अशीं दोन आज्ञापत्रें आहेत. त्यांचा विशेष हा कीं, त्यांत जिजापूर गांवचा उल्लेख आहे, तो मननीय आहे. जिजापूर नांव जिजाबाईसाहेब यांवरून पडलें असावें. कसबा पेठेंतील गणपतीचें पुजाऱ्यास शिवछत्रपती व जिजाबाईसाहेब यांच्या देणग्या असल्यामुळें, गणपतीचें पुरातनत्व सिद्ध होतें. हें देऊळ जिजाबाईनें च बांधलें किंवा कसें याचा निकाल आणखी पत्रें हातीं लागल्यावर होईल. कसबा पेठेंत एक पुरंधरे आडनांवाचें घराणें आहे. ( सासवडकर पुरंधऱ्यांचे हे फार दूरचे आप्तसंबंधी आहेत. ) यांज कडून जे पांच कागद् मिळाले, त्यां वरून हे पुरंधरे घराणें शके १५५५ पासून इकडच्या भागांत आहे असें निर्णित झालें. पुणें येथील हिराबाग हल्लीं ज्या ठिकाणीं आहे, त्या जमिनीपैकीं निमे जमीन, या पुरंधऱ्यांकडून पेशवेसरकारांनीं सोयी करितां घेऊन, त्यांस मोबदला दुसरी जमीन दिली असें पुरंधऱ्यांकडील एका पत्रावरून ठरतें. इब्राईमखान गारदी याचे भावाचा वंश पुण्यांत, आळ्याचे नबाब या नांवानें अद्याप नांदत आहे, त्यांजकडे हि थोडा शोध करितां आला. पुण्याचे शनवारांतील गोळे घराण्यापैकीं, रा० माधव नारायण गोळे यांनीं ४१५ पोतीं गळाठा माझे स्वाधीन केला. यांत ५१६ कागद् इतिहासोपयोगी आढळले. हे गोळे घराणें, थोरले नानासाहेब पेशवे यांचे वेळे पासून प्रसिद्ध आहे. यांचा पूर्वज विठल मोरेश्वर हा, नानासाहेबांच्या कारकीर्दींत अहमदाबादेकडे सुभा असून, तिकडील मुजमदारीचा कारक हि त्यांजकडे होता. पुण्याचे कै. डॉ. आण्णासाहेब पटवर्धन यांची त्यांचे चिरंजीव रा. बाबासाहेब यांचे रूपेनें मुद्दाम भेट घेतली, त्या वेळीं त्यांनीं पुणेंशहरासंबंधीं व विशेषतः इ. स. १८१८ चे सुमारचे कारख्यानासंबंधीं मिळालेली बिनमोल माहिती उतरून ठेविली आहे, ती मिळाली. भाजें येथील चितळ्यांकडे चालना केली. हे चितळे म्हणजे, पेशव्यांचे राजवटींत उद्धव विश्वेश्वर म्हणून जुन्नरास जो सुभेदार होता त्याचे वंशज, एवढी च माहिती तूर्त मिळाली आहे. जुन्नरच्या लोलिंबराज कवी संबंधानें रा पोतदार यांनीं मंडळा पुढें वाचलेलें एक टांचण छापलें आहे. वंशज रा. बापु जोशी. त्याचे कागद् मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. सखाराम बापूंचे पुणें येथील वंशजां कडील दफ्तरें तपासिलीं. त्यांत सखाराम बापू संबंधानें नवीन माहिती मिळूं शकली नाहीं. शिवकालीन पंताजी गोपिनाथ हा भोळी गांवचा रहाणारा, त्याचा व सखाराम बापूंचा संबंध आहे, एवढी माहिती मिळाली. येथील चित्राव घराणें जुनें असल्यामुळें तेथें शोध केला. या

चित्रावांचा एक पूर्वज, शके १५५५ मध्यें मुरार जगदेवानें कोरेगांवानजीक नागरगांवीं तुळा करून नागरगांवास तन्निमित्त तुळापूर हें नांव दिलें त्यावेळीं, हजर होता एवढी माहिती मिळाली. वाडेकराकडील दोन प्रेक्षणीय पोथ्या, रा. गणेश सदाशिव मराठे एम. ए. (आक्चुअरी) यांज कडून दोन दुर्मीळ, महत्वाचे व इतिहासोपयोगी असे इ. स. १८१६ तील छापिल नकाशे, श्री. दादासाहेब ओंकार यांजकडून एक गुरगुज अशी सामग्री मिळाली. ओंकारांचें पूर्वीचें आडनांव ओक होतें, व चिमाजी आप्पांची मुलगी बयाबाई, ही त्यांचे घराण्यांत पडल्या नंतर तें ओंकार झालें, असें दाखविणारीं व चिमाजी अप्पांचा हा जांवई पानपताच्या युद्धांत पडल्याची माहिती देणारीं पत्रें देण्याचें श्री. दादासाहेब यांनीं कबूल केलें आहे, पण तीं अद्याप हातीं आलीं नाहींत. कै. बंडु नाना रानडे यांची हस्ताक्षराबद्दल प्रख्याति आहे. त्यांचे चिरंजीव रा. सदाशिव विष्णु रानडे यांजकडून बंडुनाना यांनी लिहिलेली भागवताची बखर मिळाली, ती पहाण्यासारखी आहे. बंडुनानांच्या संग्रहीं हस्तलिखित फारसी पुस्तकें पुष्कळ आहेत तीं दाखविण्याचें त्यांनीं कबूल केलें आहे. बंडुनानांचें वडील शामजीपंत रानडे हे दुसरे बाजीराव साहेब यांचे कारकीर्दींतील असून, ते च पुढें एलफिस्टनाचे शिरस्तेदार झाले. यांचे कडील सर्व कागद मिळाल्यास—ते मिळतील अशी खात्री आहे— या संधिकालांतील कारस्थानावर उजेड पडेल. कसबा पेठेंतील कोन्हेर त्र्यंबक (एकबोटे) यांचे वंशज शितोळे देशमुख व धडफळे यांकडे हि शोध केला. कबुतरखान्या नजीक एक मेहेंदळे उपनामक घराणें आहे. या घराण्यांतून जे कागद मिळाले, त्यांवरून या घराण्याचा संपादक इ. स. १७९० चे टिपूचे लढाईचे वेळीं, परशुरामपंत भाऊ यांचेबरोबर होता, हें सिद्ध झालें. यांचेकडील रागरागिण्यांचें प्रेक्षणीय चित्रप्रदर्शन एकदां मंडळापुढें पाक्षिक सभेचे बैठकींत केलेलें आहे. हसबनीस (फडके), ढमढेरे (देवधर), व खासगीवाले (लिमये) या घराण्यांपैकीं एकेका शाखेचे कागद पाहिले. पुण्यांतील दुसरें इतिहासप्रसिद्ध घराणें म्हणजे चिनीवाले यांचें. येथील त्यांच्या दोन शाखांपैकीं एका शाखेकडे कांहीं कागद उरले नाहींत. दुसऱ्या शाखेचें दफ्तर कीर्तने यांच्यामार्फतीनें मिळण्यासारखें आहे, तें कोणीं मिळविल्यास विसाजी कृष्ण चिनीवाल्यासंबंधीं कागद पुढें येतील. विसाजी कृष्ण यांचें मूळ आडनांव चिंचाळकर होते व तो राजापुराकडील होता एवढी नवीन माहिती येथें नमूद करून ठेवीत आहे. मोरोबादादा यांच्या वेळच्या कारस्थानांत नरसिंह जनार्दन यांचें नांव येतें. यांचें मूळचें आडनांव वाघ असून तें पुढें भायगुडे पडलें, असें त्यांच्या घराण्यापैकीं एका गृहस्थाच्या संग्रहीं असलेल्या सनदेवरून दिसून आलें. यांचें घराणें लोणंद जवळ मोरव्यास नांदत आहे. तेथें शोध घ्यावयाचा आहे. हे वाघ भायगुडे देशस्थ कर्मेंद्री. भोरकरांचे हद्दींत, देशमुख भायगुडे या नांवानें प्रसिद्ध असलेलें एक यजुःशाखी घराणें आहे. त्यापैकीं एका वंशजाजवळ तपास करितां यांचें मूळ आडनांव पोडके असें होतें, व या घराण्याचा वृत्तिसंपादक हा बाळाजी विश्वनाथकालीन होता, असें लोणी म्हणून भोर हद्दींत

गांव आहे, तेथील मिळालेल्या कागदांवरून नवीन कळलें. पुण्यास नेने घाटावर, गोपीनाथ दीक्षित ओक यांचें घराणें, साकुर्डीकर दीक्षित या नांवानें ओळखिलें जातें. यांजकडील संग्रह प्रो. आण्णाभाऊ साकुर्डीकर यांचेकडून मिळण्यासारखा आहे. घोटवडेकर (शेतकरी छापखान्याचे मालक) यांचे भाऊचंद्राकडून एक पत्र मिळालें, त्या पत्राची नकल आपले मंडळाच्या चतुर्थ संमेलनवृत्तांत रा. पोतदार यांनी दिली आहे. मजला आतां हें असल पत्र मिळाल्यामुळें, त्या नकलेच्या खरेपणाविषयीं शंका उरत नाहीं. या घोटवडेकरांचा मूळ पुरुष, प्रसिद्ध गणेश दैवज्ञ होय, असें ऐकण्यांत आहे. परंतु, त्या घराण्यांतील पुरुषांना याबद्दल कांहीं माहिती नाहीं, व त्यांचे जवळील कागदपत्रावरून ही गोष्ट अद्यापि स्थापित झालेली नाहीं. मागें बंडुनाना रानडे यांच्या हस्तलेखन कौशल्याबद्दल उल्लेख आला आहे. दुसरें एक बिवलकरी वळण म्हणून प्रसिद्ध आहे. हे बिवलकर पुढें स्वामी झाले व यांचें घर शुक्रवारांत सचीवपंताचे वाड्याचे पिछाडीस आहे, अशी नवीन माहिती मिळाली. या बिवलकरांच्या बद्दलचें एक पत्र चंद्रचूड संग्रहांत आहे. नाना फडणिसांचा विश्वासू अरब साऊस सय्यद जान याचे घराण्यांतील कांहीं कागद प्रो. अबदुल कादर सरफराज व श्री. आबासाहेब मुजुमदार यांचे द्वारां पहाण्याचा योग आला. मुंबईचे माझे स्नेही रा. पांडुरंगराव सहस्रबुद्धे यांचे द्वारां, खुशु मोदी याचे चित्राचा फोटो मिळाला. या खुशु मोदीची ८८ वर्षे वरील पुतणी अद्याप हयात आहे. तिजला वृद्धावस्थेमुळें माहिती सांगतां येत नाहीं. या खुशु मोदीसंबंधानें कांहीं माहिती आपल्या मंडळानें पूर्वीच प्रसिद्ध केली आहे. नगर येथें औरंगजेबाचा मकबरा दर्गा इ० बाबीसंबंधानें शोध केला. तेथें ४१ फारसी शिलालेख आहेत त्यांवर एक निबंध, तेथील जमशीदखां इनामदार यांचे मदतीनें पुढें मागें मी मांडणार आहें. पुण्यास सरदार राजमाचीकर यांचें घराण आहे. यांचें आडनांव भट असून, ते पेशव्यांचे दूरचे आप्त आहेत. त्या च प्रमाणें पेशव्यांचे कुलोपाध्ये कर्वे, यांपैकीं माझे स्नेही रा. नारायणराव कर्वे यांनीं आपलेकडील कागदपत्र मोठ्या आनंदानें दाखविले. या कर्वे मंडळीस जी पहिली सनद पेशव्यांकडून मिळाली, ती थोरले बाजीरावसाहेब यांनीं १७२९।३० सालीं दिली आहे. ती पाहतां त्यांतील मजकुरावरून, बाळाजी विश्वनाथाची गरीबीमुळें मुंज होत नव्हती, ती यांनीं केल्यामुळें पुढें पेशव्यांचे उपाध्येपण यांज कडे आलें, अशी जी आख्या सांगण्यांत येते तींत बिलकुल अर्थ दिसत नाहीं. कर्व्यांकडून मिळालेल्या पत्रांत, शेवटचे रावबाजी ब्रह्मावर्तास आपला काल कसा घालवीत, दानधर्म कसा करीत, एका च वर्षांत लागोपाठ आपलीं दोन तीन लग्नें कशीं उरकीत हें दिसून येतें. उपाध्येपणाच्या बाबतींतें पत्र मिळालें आहे त्यांत नानासाहेब पेशवे यांच्या ब्रम्हवर्ती झालेल्या सोडमुंजीचा उल्लेख आहे. नाशीक जिल्ह्यापैकीं दिंडोरी मनमाड नजीकचा अत्यल्प भाग व नाशकाजवळचीं दोन खेडीं हीं पाहिलीं. गोपिकाबाईसाहेब पेशवे या गंगापुरी राहात. त्या संबंधांत जगदीशपूर असे उल्लेख कागदपत्रांतून सांपडतात, हें जगदीशपुर

कोणतें ! अशी इतिहाससंग्रहकारांनीं एके ठिकाणीं पृच्छा केली आहे. जगदीशपूर म्हणजेच हल्लींचें जलालपूर होय. सिन्नर तालुक्यांतील डुबेरे येथील बर्व्यांपैकीं श्री. कृष्णराव गोपाळ बर्वे यांजकडे कांहीं कागद व तीन ताम्रपट आहेत. खानदेशांत धुळेंपारोळें, अमळनेर, चाळीसगांव या ठिकाणीं गेलों. पारोळ हें गांव झांशीच्या लक्ष्मीबाईसाहेब, यांचा म्हणून प्रसिद्ध आहे. बऱ्हाणपूर येथें तेथील भुस्कुटे ( मूळ आडनांव गाडगीळ ) घराण्याचे कागद मिळतील म्हणून जाऊन आलों. या भुस्कुट्यांपैकीं श्री. अण्णासाहेब भुसकुटे यांनीं आपल्या घरचें दप्तर चाळल्यास उपकार होतील. तेथील मशीदीवरील फारुकीवंशवर्णनपर संस्कृत शिलालेख, अशीरगड किल्यावरील अकबरानें फारुकीवंश बुडवला त्याची नोंद असलेला शिलालेख, मिर्झा राजा जयसिंग याचे छत्रीवरील लेख, व भुस्कुटे घराण्यास इ. स. १७५१ त मिळालेलें पत्र वगैरेंवर टांचणें लिहून तीं मंडळापुढें पूर्वींच ठेविलीं आहेत. सातारा, वाई व परळी खालील खेडीं पाहिलीं. परळी वरील दोन फारसी लेखांपैकीं एका लेखाचा फोटो घेतला, तो अद्याप लावावयाचा आहे. वाईस थिटे घराण्यांत जुनीं हस्तलिखित पंचांगें आहेत, तीं मिळविलीं पाहिजेत. साताऱ्याकडे प्रतापगडच्या सोनावणे हवालदारांच्या वंशजाकडून राजारामकालीन एक अस्सल पत्र उपलब्ध झालें. साताऱ्यास औरंगजेब यानें शिवाजी व शाहु महाराजांस लिहिलेली असल फारसी पत्रें आहेत, त्याचकरितां फार धडपड केली, परंतु अद्याप तीं हातीं येत नाहींत. साताऱ्याकडे रा. आबा चांदोरकर व रा. वा. चि. जोशी यांनीं आपलें काम दांडग्या प्रमाणावर चालविल्यामुळें तेथें आपली डाळ शिजत नाहीं, असें पाहून सांगलीस गेलों. तेथें आपल्या मंडळाचे चिटणीस श्री. तात्यासाहेब मेहेंदळे धारेपालटाकरितां पूर्वींच गेले होते. त्यांच्या वशिल्यानें श्री. सांगलीकर यांच्या संग्रहांतील पुण्यपुरुष हरिभटबावा पटवर्धन यांचा आंगरखा, पायजमा वगैरे वस्तू पाहतां आल्या. तसेंच येथें इतिहासभक्त शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी यांचा हिंदुस्थानविषयक इतिहास (साधन व संदर्भ ) ग्रंथांचा अमोल पुस्तकसंग्रह पहाण्याचा हि योग आला. औचित्य व उपयुक्तता या दृष्टींनीं पाहतां, हा संग्रह आपले मंडळास उपयोगार्थ बहाल करण्याची सद्बुद्धि गुणज्ञ व दानशूर सांगली संस्थानाधिपति श्री. चिंतामणराव आप्पासाहेब यांस झाल्यास सत्पात्रीं दानाचें श्रेय त्यांस सहज मिळेल. येथील मिनीवाले यांचें दप्तर तपासतां, श्री. थोरले आप्पासाहेब सांगलीकर यांच्या दिनचर्येचीं पानें हातांशीं लागलीं. सरदार मास्तासाहेब यांचे बरोबर, श्री. बाबासाहेब मळेकर यांचे कडे त्यांचा चित्रसंग्रह पाहण्यास मुद्दाम गेलों असतां, आम्हांस श्री. थोरले बाजीरावसाहेब व सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या प्रेक्षणीय व नामी अशा तसबिरींचा अकल्पितरीत्या दर्शनलाभ झाला ! श्री. बाबासाहेबांनीं ही मेजवानी च दिली, असें

वाटलें। सांगलीस रा. दत्तोपंत देवधर यांचें दप्तर पाहिलें. त्यांचे आजें आबा देवधर यांस, १८५७ च्या बंडाचे सुमारास, श्री. जमखिंडीकराबरोबर फार त्रास झाला हें प्रसिद्ध आहे. यांजकडील एक दोन पत्रें संग्रह करण्या सारखीं आहेत. पुणें जिल्ह्यांत शोध करून मिळविलेल्या दोन बाबींचा, येथें मुद्दाम उल्लेख करण्यासारखा आहे. पहिली बाब म्हणजे, तुकाराममहाराज यांच्या संस्थानांतील कागदपत्रांची व दुसरी बाब नेताजी पालकर या ऐतिहासिक व्यक्तीच्या घराण्याची. तुकाराम संस्थानांत तुकाराममहाराजाचे वेळचें अगर शिवकालीन असें एक हि चिटोरें नाहीं। संस्थानास मिळालेल्या गांवच्या सनदा या पूर्वी च छापून प्रसिद्ध असल्यामुळें, त्यांत नाविन्य उरलेलें नाहीं. येथें फक्त तुकाराममहाराजाचे गादीवरील पुरुषांचा आज पर्यंतचा वंशवेल नमूद करून ठेवितों. तो संग्राह्य वाटेल यांत शंका नाहीं. वंशवेल असा:–



दुसरी बाब नेताजी पालकर सरनौबत याचे घराण्या संबंधींची होय. शिरूर तालुक्यांत, तांदळी गांवाच्या पाटिल घराण्यांतून मला जे कागद मिळाले, त्यांवरून त्या उभयता घराण्यांचा संबंध होता असें दिसतें. नेताजी पालकर हा शिवछत्रपतींचा आप्त, कदाचित् जांवई. याचें धर्मांतर व परावर्तन या गोष्टी आतां सिद्ध झाल्या कारणानें या घराण्याचा शोध लागल्यास शिवकालीन इतिहासरचनेंत फार भर पडणार आहे. या घराण्याचा शोध लागावा, या हेतूनें ही पृच्छा नमूद करून ठेवितों. या शिवाय बारीक सारीक ऐतिहासिक व्यक्तींचा हि थोडा फार शोध चालविला आहे. त्या संबंधाचें विवेचन पुढें मागें करितां येण्यासारखें आहे.

पां. म. पटवर्धन

# मालोजी वगैरेंचीं शिवपूर्वकालीन अस्सल तीन पत्रें.

१ सदरहू अस्सल तीन पत्रें मु. पांडे पेडगाव ऊर्फ बहादुरगड जि. अहमदनगर या जुनाट गांवीं रा. बडवे यांजकडे मिळालीं. याच प्रकरणाचीं इतर कांहीं महत्त्वाचीं पत्रें रा. बडवे यांजजवळ आहेत. त्यांत एक मलकंबरानें दिलेली अस्सल फारसी सनद आहे. रा. बडवे यांचें विठोबाचें देऊळ हल्लीं पुनः दुरुस्त केलें आहे व तेथें च ते राहतात. कागदांवरून पाहतां सदर देऊळ व घराणें फार जुनें आहे. मलकंबरी सनद पाहून पुनः पुढें सनदा करून दिल्याबद्दल पुढील सनदांतून उल्लेख आहे. 'चिकलठाणे' अद्याप गांवीं आहेत असें रा. बडवे यांनीं सांगितलें. सदर पत्रांपैकीं तीन येथें तूर्त देतों:--

१ शके १५२६ तील निजामशाही अस्सल हुकुम पत्र आहे. पत्र मोडी. शिका फारसी. जुनीं रूपें, शब्द व वळणें बघण्यासारखीं आहेत.

२ शके १५१८ तील हें अस्सल पत्र श्री शिवाजी महाराज यांचे आजे मालोजी राजे भोसले यांचें आहे. या पत्रावरील फारसी शिक्का लागला नाहीं. भोसल्यांची पाटिलकीचीं गांवें हिंगणीबेरडी, देऊळ गांव वगैरे नजीक च आहेत. तेव्हां मालोजी म्हणजे भोसले च यांत शंका नाहीं.

३ शके १५२१ तील हें पत्र राजेश्री परसोजी राजे यांचे आहे. राजे असे शब्द कागदांत परसोजी व मालोजी वगैरे भोसले कुलीन पुरुषांना लाविलेले लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. शिवकालीन खंड १५ मध्यें असलीं पत्रें आहेत च. शिवपूर्वकालीन अस्सल पत्रें आपणांस मिळूं लागलीं हें सुचिन्ह होय.

हीं पत्रें मिळविण्याचे कामीं माझे मित्र रा. पं. रा भाळेगांवकर यांनीं मला मदत केली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

ले. १

हजरती बुऱ्हान निजाम

शाहा मासाहेब

चार ओळी
फारसी
सीका

अज माहाल मो अजम अकरान हजरत ------ दाम हेसमत हू व जी

१. वैभव २. १०१५ ( शके १५२६ ) [ पृ. ८८ पहा. ]

दौलत हु ताा कारकुनानी हाल व इस्तकाबाल व मोकदमानि कसबे पेडगा पाा पाडिया पेडगौ बिदानद की सुाा सेन खमस असर अलफ दरवक्षे बदल साद बालमुर (?) हजरत खिलफत व खुलीदत व खिलफत ——— कुलीद खिलफत हु बेस्मी गोपाल विठल ती मौलादाद यासी जमीन चावर नीम गज शराई •॥० मुजेरदा ( ? ) ——— व बाहामुल व देखील नख्तयार्ती

तालुके ठाणा व तालुके देहाये व पटिया हाली व पेस्तर कुलखाव कुलकानु- इनमा अजमन्हामती केले असे दुवाल कीजे आवलाद व आफलाद चालाविजे नालत नामेषी दिधले असे दरहर साला ( ? ) उजुर न कीजे तालीक लीहुन घेऊनु असल खुर्द खत फिरुन दीजे बाा खुर्दखत . . .

शिक्का

* तेरीख १५ माहे रजब

पाा हुजुरु

ले. २

फारसी
सिका

अज रख्तखाने राजेश्री मालोजी राजे दामदौलत (फारसी सिका) हु बजानी

हुदेदारानि हाल व इस्तकबाल व मोकदमानि कसबे पेडिगाऊ पाा मजकुर बिदानद सुाा सबो तिसैन व तिसा मैया अकोबा गोसावी बिन गोदोबा गोसावी वडवे पुजारे श्री विठलदेऊ कसबे मजकुर हुजुर येऊनु मालुम केले जें आपणास इनामबदल सदकोबाची

---

* अक्षर निराळें.

१ सु० सुन ९९७ शके १५१८


अमीन चावर येक १८ गज सरायेनी प्रजा —— बाबाजी चिकलठाणा नामाजी चिकलठाणा चावर निम ——— ·॥· चावर निम ——— ·॥·

छ. नल्तयाती ता। ठाणे व ता। देहाये कुलबाब कुलकानु व बाजे पटिया बेठी व बेगारी ......... व सिके खास व भोगवटे व तसरुफाती कारकीर्द दरकारकीर्द दर सवाद कसबे मजकूर ता। सनं सीत चालिले आहे सन सीता मधे वणगोजी ......... आपलिया कदीम हुजती फर्मान व भोगवटे गेले आहेती साहेबी सदरहू इनाम चालवावे या खुर्द खत होये मालुम जाले अकोवा गोसावी बिन गोदोबा गोसावी बडवे पुजारे श्रीविठलदेऊ कसबे मजकूर यास इनाम बदल सदका चावर येक गज सरायेनी प्रजा २ ता॰

बाबाजी चिकलठाणा
चावर निम ·॥·

नामाजी चिकलठाणा
चावर निम ·॥·

छ. नल्तयाती ता। ठाणे व ता। देहाये कुलबाब कुलकानु व बाजे पटिया व बेठी बेगारी ......... व सिके खास व भोगवटे व तसरफाती दर सवाद कसबे मजकूर कारकीर्द दर कारकीर्द ता। सन सति चालिले असेलि ......... प्रमाणे चालविजे दरम्यान सालगु। हुजती व भोगवटे फितरते ( ? ) .........करिता गे ( ? ) ले ये बाबेचा उजुर न कीजे औलाद व अफलाद चालविजे दर हर साल ताजे खुर्द खताचा उजूर न कीजे तालिक घेउनु असलि खुर्द खत इनामदार मजकुरापासी दीजे







---

१ सन ९९६. २ तपशील.

* कागदाचे मागील बाजूस—तेरीख २ माहे जमादिलौवल—असा शेरा आहे. भिन्न वळणाचा असावा.

१२

अज रस्तखाने राजेश्री परसोजी राजे साहेब तुलीददामदौलत हु ता[1] हुदेदारांनि कसबे पेडगी पौं[2] पाडिया पेडगौ सुौं[3] अलफ विदानद देवस्थाने विठोजी व नरसिंह जे देवस्थाणे असतील तेथील दीपवाते व विठोजीचा भक्त अकोवा गोसावी त्याची अडसेरी दरोज चालविजे व दीपवातीस तेल दरोज ऽऽ४ व अडसेरी रोजाचा रोज देत आइजे मेतिब

| |
|---|
| फारसी<br>सिका |

तेरीख २१ माहे अमा*- जमादिलावल

दिलावल

द. वा. पोतदार

## जुना दगडी नळ

शिक्षणप्रसारकमंडळीच्या नूतन मराठी विद्यालयादि संस्था हल्लीं ज्या जागेंत आहेत तो पूर्वीचा खाजगीवाले यांचा वाडा, नुकता च बाजूला नवीन इमारतीचा पाया भरण्यासाठीं उकरण्याचें काम चालू असतां, तेथें एक जुना दगडी नळ आढळला. साधारण नळ ५० फूट लांब असावा. नळाची रचना फार कौतुक करण्यासारखी वाटली. सुमारें एक हात लांबीच्या व वीत दोन वीत रुंदीच्या दगडाला, मध्यें गोल भोक अवळ अवळ तीन चार इंच घेराचें पाडलें असून, असे दोन दगड एकमेकांस जोडतां येतील अशा प्रशस्त खोबणी त्यांस पाडल्या आहेत. असे दगडी नळ टाकल्यावर दर आठ दहा हातांवर एक सुमारें दीड फूट व्यासाची दगडी कुंडी व तिजवर तशी च एक टोपी व या टोपीला मध्यें एक दोन इंचाचें छिद्र, अशी व्यवस्था नळांतून वाहून येणाऱ्या पाण्यांतला गाळ वगैरे तळीं सांठण्यासाठीं केलेली आढळली. वळणाला नळ बसवितांना त्यांना पाडावयाचीं भोकें वांकडीं पाडीत. हे सर्व दगडी नळ पक्क्या चुन्यांत भक्कम बसविलेले होते. या अशा नळांतून आलेलें पाणी किती शुद्ध असेल बरें ! यावरून शुद्ध पाण्यासाठीं केवढा खटाटोप पूर्वी करीत त्याचा तर्क होतो. कुंडीच्या टोपी वरील छिद्र हवा येण्याजाण्यासाठीं असावें कीं काय न कळे ?

या नळाचा एक नमुना आजच्या प्रदर्शनांत मंडळासमोर मांडीत आहें. दोन तीन दगडी खोबणीच्या नळ्या, एक कुंडी टोपीसुद्धां, इतके नग आहेत.

द. वा. पोतदार.

---

१ ताहां. २ परगणा. ३ सन १००० शके १५२१.

* अक्षरें भिन्न असावीं.

# श्रीशिवाजी महाराजांचा दुसरा होन.

गेल्या सालीं संमेलनांत रा. विनायकराव भावे यांनीं या दुष्प्राप्य वस्तूचें दर्शन आपणां सर्वांस घडविलें. भाग्याचा योग असा, कीं त्यानंतर अवघ्या १५ दिवसांनीं माझे हातीं माझ्या एका बीडकर मित्रांकरवीं तसला च एक होन मिळाला। फरक एवढा च कीं, मला मिळालेला सदर होन अगदीं कोरा–करकरीत आहे. म्हणजे याचा अर्थ असा कीं, तो टांकसाळींतून बाहेर पडल्यावर धरणीमातेच्या पोटांत अगर कृपणमंजूषेंत जो गेला तो वर्षांपूर्वीं बाहेर आला व माझ्या हातीं पडला। 'पंचम संमेलनवृत्त' (भा. इ. सं. मं. ग्रं. क्र. २०) त जें होनाचें चित्र आहे तें ह्या माझ्या होनाचें आहे. याचें वजन ३ मासे ४ गुंजा आहे. आपल्या कुळदेवता (१) शिखर–शिंगणापूरचा महादेव व (२) तुळजाभवानी या च शिवाजीनें त्यावर काढविल्या असाव्या असा माझा तर्क अद्याप वाहतो. प्रतिमा ताडून पाहिल्यावर याचा निर्णय होईल. दुसऱ्या एकाद्याच्या होनावर तशीं च चित्रें असलीं तर अर्थ एवढा च कीं सदर मूर्ती छापविणारा सजा शिव-भवानीभक्त ठरतो.

दत्तो वामन पोतदार

# मालोजी राजे यांचें एक अस्सल पत्र.

मालोजी राजे यांचें आपल्यापुढें असलेलें हें अस्सल पत्र श्री. स. रामचंद्रराव रघुनाथराव पंडितराव, सातारा येथील रहिवासी व आपल्या मंडळाचे एक सभासद यांच्या येथें सांपडलें. पंडितरावांचे पूर्वज हे, भोसल्यांचे कुलोपाध्ये असून हिंगणी, बेरडी, देऊळगांव या भोसल्यांच्या पाटिलकीच्या गांवांचे कुलकर्णी व जोशी होत. त्यांचा व भोसल्यांचा वरील कारणामुळें घरोबा असे. भोसल्यांचा विश्वास त्यांच्यावर असल्यानें ते त्यांच्या जवळ ठेवी ठेवीत असत असें दिसतें. या पत्रांत असली च एक ठेव ताबाई आवानें ठेवलेली आपण घेऊन भरून पावलों म्हणून मालोजी राजे पावती देत आहेत. पत्र येणेंप्रमाणें:–

* सके १५४४ दुंदमी नाम संवतछरे फालगूण सुध अस्टमी ८ वार गुरुवासर

फारसी सिका

सु॥ सलास ईसरीन अलफ तेरीख ७ माहे जमादिलावल ते दिवसी राजश्री रामेशभट व राजश्री चिंतामणी भट गोसावी यासी राजश्री मालोजी राजे लेहोनु दीधले येसे जे तुम्हा पासी राजश्री ताबाई आवाने ठेवणे ठेविले होते बि॥—

नस्त दोनी हजार येकसे होनु तोले सोने येकसे आठ रास

२१००८. १०८

हे तुम्ही सेंडिकीस आणोनु राजश्री सेलोजी राजे व अवघीया भावांचा वाटा दीधला पैकी आमची तकसेमेसे दिधले बीता॥——————

नस्त होनु तीनसे रास—————— सोने तोले पधरा रास——————

३००८. १५८.

येणें प्रमाणे आपणा पावले तुम्हासी व आपणासी अर्थअर्थे संमध नाहीं

गोही

मोर्तब[4] फारसी

* वर श्रीकार नाहीं. १ अनुस्वार नाहीं. २ 'ह' पाहिजे. सडकां = औरंगाबाद. ३ 'सी' पाहिजे. ४ मोर्तब 'अर्थअर्थे' या अक्षरावर उठविलेलें आहे.

बाळाजी कोनेरी पत्र प्रमाणे साक्ष ——————

पेत्र प्रमाणे साक्षी अनं त जोसी

विठोजी मोईते

यांत मालोजी राजांनीं ज्या " खेलोजी राजे व अवघीया भावाचा " उल्लेख केला आहे त्याचें असलें च पावतीचें पत्र १५ व्या खंडांत ( पृ. ४२५ लेखांक ३९५ वें ) आलें आहे. त्यांत तंतोतंत असा च मजकूर आहे. " राजश्री खेलोजीराजे व राजश्री मंबाजीराजे व राजश्री नागोजी राजे व राजश्री परसोजीराजे व राजश्री त्रिंबकजीराजे व राजश्री ककाजीराजे* " यांनीं मशारनिल्हे भटद्वयांस " मालबारायाचा वाटा मालबासी देउनु वाटे सा आमचे आम्हांसी पावले वितपसील नक्त आठरासे १८०० सोने तोळे नऊ १०८ " अशी पावती दिली आहे. २१०० होनांत व १०८ तोळ्यांत वरील ६ भाऊ व मालबा किंवा मालबाराय म्हणजे मालोजी राजे१ मिळून ७ बंधूंचे हिस्से पाडावयाचे म्हणजे प्रत्येक हिस्सा ३०० होनांचा व १५ तोळ्यांचा ( साधारण ) येतो, आणि त्याचप्रमाणें वरील रकमेची वांटणीहि झाली आहे. असो.

आतां एक सांगावयाचें राहिलें आहे, तें हें कीं, सदरच्या पत्रांतील मालोजी राजे म्हणजे बाबाजी राजाचे पुत्र किंवा शहाजीराजाचे वडील मालोजी राजे नसून त्यांचे धाकटे सख्खे बंधू जे विठोजी राजे त्यांचे पुत्र म्हणजे थोरल्या मालोजीचे पुतणे होत. विठोजी राजे यांना एकंदर ८ पुत्र होते. बखरींमधून ही संख्या कमी अधिक आहे. नवीन आवृत्तीच्या मराठी रियासतीच्या शेवटीं भोसले घराण्याची जी वंशावळ दिली आहे तींत हे ८ पुत्र व त्यांचीं नांवें आलीं आहेत; तीं अशीं:— १ संभाजी २ खेलोजी ३ मालोजी ४ मंबाजी ५ नागोजी ६ परसोजी ७ त्रिंबकजी ८ मकाजी. रा. पांडोबा पटवर्धन यांनीं संपादित केलेल्या व मराठी दप्तरानें प्रकाशित केलेल्या भोसल्यांच्या बखरींत विठोजीस ८ पुत्र होते असें म्हटलें आहे; आणि विठोजी राजे हे शके १५४५ रुधिरोद्गारी संवत्सरीं वारले असें लिहिलें आहे. पण विठोजीराजांचा हा मृत्यूचा शक चुकीचा असावा. कारण माझें हें पत्र व १५ व्या खंडांतलें लेखांक ३९५ वें पत्र हीं दोन्हीं एकदम वाचलीं असतां सहज ध्यानांत येईल कीं, या सात भावांचीं ( पहिला संभाजी हा लहानपणीं च वारला असावा, कारण वंशावळींत त्याचा वंश पुढें मुळीं च नाहीं ) हीं वाटणीपत्रें होत. विठोजी राजे यांनीं मरतांना आपल्या ताबाई आवा नांवाच्या बायको जवळ आपली संपत्ति ठेविली असेल व तिनें कदाचित् त्या मृत्यूच्या वेळीं ती रामेश्वरभट व चिंतामणीभट कुलोपाध्ये यांचे जवळ विश्वा-[सानें] दिली असेल. ती तिच्या पश्चात् तिच्या वरील ७ मुलांच्या हवालीं मशारनिल्हे भटांनीं

---

* मकाजी पाहिजे. १ बाळबोध.

केली असावी आणि त्याबद्दलच्या या दोन पावत्या घेतल्या असाव्या असें वाटतें. हे सात भाऊ हि या वेळीं एकत्र राहात नसावे असें दिसतें. सातापैकीं मालोजी राजे हे स्वतंत्र राहिलेले दिसतात व त्यामुळें च त्यांनीं आपल्या मातोश्रीच्या ( हें नांव मला बरोबर लागत नाहीं ) ठेविलेल्या ठेवण्यापैकीं आपल्या तक्षिमेचें तेवढें ठेवणें घेतलें. बाकीचे सहा बंधु एकत्र असावेत–निदान या तिथीपर्यंत तरी होते–हें हि या च पत्रावरून उघड दिसतें. असो. या विठोजीपुत्र मालोजीराजांचें हें पहिलें च पत्र आज प्रसिद्ध होत आहे, एवढें मात्र खरें.

पां. मा. चांदोरकर

# मलिक अंबरचें एक अस्सल पत्र

काल, सातारा येथील रा. पंडितरावांच्या रामेश्वरभट व चिंतामणीभट या पूर्वजांना, मालोजी राजे यांनी शक १५३४ मध्यें लिहिलेल्या एका अस्सल पत्राचें दर्शन व वाचन आपल्या पुढें झालें. त्या च रामेश्वरभटाच्या भावाला सुहुर सन १००८ त मिळालेलें दुसरें एक अस्सल पत्र, आज पुढें मांडीत आहे. हें पत्र प्रख्यात मुत्सद्दी मलिक अंबर याचें आहे. दामोदर भट बिन नारायण भट व त्याचा चुलता गोविंदभट, यांचे पूर्वापार चालत आलेलें एक इनाम बिनशर्त पुढें चालविण्याबद्दल, समत जुनेर येथील हुदेदार व अजहत मोकासाई यांना यात हुकूम केला आहे. पत्र येणेंप्रमाणें:—

१

२

अर्जे रस्तखाने सुदायेवंद मलिक साई मलिक अंबर खुली दयामदौलतहू बिजानेबे

*+ + + +
++ जोहर + अकबर
म तेशा मुहंमद ख्वाजा
+ + + +

कारकुनानि समतजुनेर व हुदेदारानि अजहत मुकासा ई हाले व इस्तकबाल व मोकदमानि मौजे + आ ++ (रवी) समत मजकुर बिदानंद सु॥ सन समान अलफ फर्जंद व बिरादर नारायणभट बिन अलैभट नाौ———

२

दामोधरभट फर्जंद नारायेण भट

गोविंदभट बिन अलैभट बिराजर

हुजूर मालुम केले जे आपणासी इनाम हक धर्मादाऊ जमीन चावर येक १४ दर सर्वाद

---

* फारसी सिका. सर्व लागत नाहीं. थोडासा लागला तो ना. केशवराव यांनी लाविला. १ अलीफ अगर श्रीकार नाहीं. २ सिका फारसी लागत नाहीं ३ पासून, हून. ४ रस्तखाना + इ = चा फरासखाना ५ राजश्री. ६ श्रीमंत. ७ स, प्रति. ८ कारकून् या शब्दाचें अनेकवचन कारकुनान् + इ = चे कारकुन. ९ वर्तमान. १० भावी. ११ हुकूम दिला जातो. १२ पुत्र. १३ भाऊ १४ नफर = नग. १५ मध्यें. १६ सिवार.

मौजे मजकूर देसील नस्तैयाती कुर्ळबाब कुलकानु या हुजेती व सिके[20] सास व भोगवटे वजिरौंनी व मुकासाई कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद चालीले आहे हाली साहेयाचे सुर्दसंते होये मालुम जाले बराये मालुमाती सातिरेसी आणौनु भटजी ना। २

दामोधर भट फर्जंद नारायेण भट गोविंदभट बिराजर नारायेणभट

यासी इनाम जमीन चावर येक १४ दर सवाद मौजे मजकुर देसील नस्तयाती व कुलबाब कुलकानु या हुजती व सिके सास व भोगवटे वजिरानी व मुकासाई कारकीर्दी सालाबाद तसरुफाती चालीले असेली तेणे प्रमाणे चालवीजे दरहरै साल खुर्द सर्तौचा उर्जुर न कीजे तुम्ही तालीकै घेउनु असेलो फिराउनु दीजे मोर्तब सुर्द


३१

रजु सुरुनीस

( मार्गे मजकूर )

तेरीस ७ माहे रबिलासर

रजुसुद चारसुद सुरुसुद

सदरहू दस्त ऐवजाची नकल इनाम कमेटीकडे कैफीयत घेते समयीं घेतली असे तारीख १ सपटंबर सन १८५६

दस्तूर गणेश सखाराम पोतदार सही परशाराम + + +

असें हें पत्र आहे. श्रीशिवकालीन पत्रें आताशीं कोठें थोडीं थोडीं मिळूं लागलीं आहेत; श्रीशिवपश्चात्कालीन तर दुर्मीळ आहेत, अशा दुर्मीळ पत्रांपैकीं च हें पत्र होय. आणि हें पुढें ठेवण्यांत हि एवढा च उद्देश आहे. सन १००८ रबिलासर ७ म्हणजे शके १५२९ श्रावण शुद्ध ९ होय; अर्थात् हें पत्र आज ३१० वर्षांचें जुनें आहे !

**पांडुरंग मार्तंड चांदोरकर.**

---

१७ नस्त. १८ एकंदर बाबी. १९ एक बाब. २० सास शिक्याचा. २१ वजिराचे. २२ मोकाशाचे २३ अस्सल पत्र २४ वार्षिक चालीचा भोगवटा. २५ प्रत्येक वर्षी. २६ अस्सल पत्र. २७ आक्षेप. २८ नक्कल. २९ अस्सल. ३० ( मोर्तब ) मुद्रा ( सुद ) झाली. ३१ फारसीलागला नाहीं.

# देवी अहिल्याबाई.

देवी अहिल्याबाई होळकर हें नांव देवी सीतेप्रमाणें पवित्र आहे. धन्य तें कुळ, कीं ज्यांत हें अपूर्व सद्गुणीरत्न पैदा झालें; धन्य तो वंश, कीं ज्यामध्यें ह्या पवित्र देवीनें आपलीं अवतारचरित्रें परिणत केलीं. व्यक्तिदृष्टीनें पाहिलें असतां अशी प्रतिज्ञा करण्यास हरकत नाहीं कीं, देवी अहिल्येसारखें सुशील मानवरत्न आजपर्यंतच्या कोणत्या हि ऐतिहासिक राजकुलांत चमकलें नाहीं. स्त्री आणि स्थैर्य, सत्ता आणि न्यायप्रियता, संपत्ति आणि उदारता यांचा नयनमनोहर व लोकहितकारी संगम फार च क्वचित् दृष्टीस पडतो; आणि चमत्कार हा कीं, तो महायोजक परमेश्वर असल्या सद्गुणी मानवांस कठिण कसास लावून तीं शुद्ध निघालीं, तर मात्र प्रसन्न होतो. सुभेदार मल्हारराबांचा मुलगा खंडेराव हा बापासारखा च शूर परंतु व्यसनानें बेहोष असे. असल्या कठोर व व्यसनी नवऱ्याची मर्जी संभाळून तो जिवंत असे तों पर्यंत व तो कुंभेरीच्या वेढ्यांत ठार झाल्यानंतर देवी अहिल्या विद्यमान असे तों पर्यंत तिनें आपलें सर्व आयुष्य उग्र तपश्चर्येंत घालविलें. येवढा शूर व जहांबाज मल्हारराव पण तो आपल्या सुनेच्या अर्ध्या वचनांत असे। दैवानें तिला एक मुलगा झाला; पण त्या च अनिर्वचनीय दैवानें त्याला क्रूर वेडा केलें. होळकरांची कैफियत वाचली असतां इंदूरच्या राज्यांतील सर्व लोक या जनकमातुश्रीप्रमाणें सर्वांवर प्रेम करणाऱ्या देवी अहिल्येस किती पूज्य मानीत असत याची कांहीं खरी कल्पना येईल. याचप्रमाणें मराठ्यांस राजकारणांत व युद्धांत तसें च राजकारणी युद्धांत आणि युद्धाच्या राजकारणांत पराभूत करणाऱ्या इंग्लिश लोकांचे, स्वभावतः मानी इंग्लिश लोकांचे एक नायक सर जान मालकमसाहेब, यांचा देवी अहिल्येविषयींचा अभिप्राय वाचून हि देवी अहिल्येच्या सच्छीलतेची, औदार्याची व न्यायप्रियतेची उत्कृष्ट साक्ष पटेल. पेशव्यांचे वकील केसो भिकाजी दातार हे कांहीं कारणांनीं देवी अहिल्येविरुद्ध लिहिणारे ना, पण त्यांचीं पत्रें वरवर वाचिलीं असतां हि देवी अहिल्याबाईची उग्र तपश्चर्या स्पष्ट नजरेस येते. या देवीचीं अनेक चरित्रें अनेक भक्तांनीं लिहिलीं आहेत. तेव्हां हीं चरित्रें, तसें च प्रसंगोपात्त मूर्तस्वरूपास आलेले मोरोपंतादि काव्यकुशल कवींचे उद्गार सर्वांच्या परिचयाचे आहेत; निदान ते असले पाहिजेत असें समजून मी आपल्या इष्ट विषयाकडे वळतों. माझा विषय 'मराठी साम्राज्यांत देवी अहिल्याबाईची योग्यता' हा आहे. परंतु ह्या योग्यतेचें परीक्षण करण्याचे अगोदर पुनः एकवार म्हणावयाचें कीं, या देवीच्या अवतारानें आमचें महाराष्ट्र च काय परंतु सर्व भारतवर्ष, किंबहुना सर्व जुनें आणि नवें जगत् पवित्र झालें आहे. क्षणैक सुख देणारे हजारों मोह मोठ्या जोरानें सर्वत्र व सर्वदां वावरत असतां या महासाध्वीनें देवी दमयंतीप्रमाणें आपल्या शीलाच्या होकायंत्राचा कांटा यत्किंचित् हि ढळू दिला

नाहीं; आणि संपत्तींत व विपत्तींत ईश्वराच्या अस्तित्वासंबंधानें किंवा त्याच्या दयाघनत्वासंबंधानें तिनें आपलें मन केव्हां हि भ्रष्ट होऊं दिलें नाहीं.

अहिल्याबाईसंबंधानें जे कांहीं लेख अनेक ठिकाणीं प्रसिद्ध झाले आहेत त्यांपैकीं बऱ्या च लेखांचें अवलोकन इतरांप्रमाणें मीं हि केलें आहे. सुदैवानें श्री. चंद्रचुड यांच्या संग्रहांत लाखों लिखितें अद्यापि हि जिवंत राहिलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं लिखितें मीं पाहिलीं आहेत. अद्यापि हि बरे च कागदपत्र पत्रशीकरांच्या, फडणिसांच्या, कणशांच्या वगैरे घरीं असण्याचा संभव आहे. होळकरांचें दप्तरखान्यास आग लागून बरे च महत्त्वाचे कागद 'अग्नये स्वाहा' झाले म्हणतात। तथापि महेश्वरचें दप्तर अद्यापि सुरक्षित आहे, असें कर्णोपकर्णी ऐकिलें आहे. तेव्हां सांपडतील तीं दप्तरें शोधून तपासून प्रकाशांत आणण्याचें, निदान त्यांतील महत्त्वाच्या कागदांचा संग्रह करण्याचें पुण्य, आमचे सरदार किबेसाहेबांसारखे ऐतिहासिक संशोधक घेतील तर अहिल्याबाईसारख्या दिव्य रत्नावर हि जास्त प्रकाश पडेल यांत काहीमात्र शंका नाहीं.

असो, आतां विषयाकडे वळूं. धर्मानें गांजलेल्या मराठ्यांस धर्मानें चालतां यावें म्हणून स्वराज्याची स्थापना समर्थ रामदासांनीं, शिवाजी महाराजांनीं केली ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली च पाहिजे. ही गोष्ट नाकारण्यांत आतां अर्थ नाहीं. भोसल्यांच्या मूळ पुरुषाची हकीकत, 'हें धर्मराज्य आहे' अशा प्रकारचे राजाराम महाराजांचे उद्गार, वसईच्या राजकारणासाठीं आलेल्या आणजोरकरादिकांचें म्हणणें, वगैरे गोष्टींच्या साक्षी इतक्या पुष्कळ व भरभक्कम आहेत कीं, कोणी हि लेखक अथवा परीक्षक असो त्याला ही गोष्ट मान्य केली च पाहिजे. 'नित्यसुखाला उपकारक होईल असें वर्तन, अशी वाणी आणि असा विचारक्रम असूं द्या' हें आमच्या श्रुतिस्मृतींचें सांगणें आहे. असो, हें सांगणें आहे म्हणून च शिवाजी महाराजांनीं अष्ट प्रधानांचें मंडळ नेमून मराठी साम्राज्याची प्राणप्रतिष्ठा, निदान त्या साम्राज्याची गर्भस्थापना केली. साम्राज्याचें नायकत्व शिवाजीकडे आलें, हें योग्य च होय. पुढें अस्मानी सुलतानी होऊन राजाराम महाराजांस हल्लींच्या बेल्ज्यम किंवा सर्व्हियन राजांप्रमाणें देशत्याग करण्याची पाळी आली. संकट तर मोठें खरें च. पण या च संकटानें मराठ्यांचा स्वाभिमान, स्वधर्माभिमान, स्वराज्याभिमान दुणावला, नव्हे दशगुणित झाला. अर्थात् संताजी, धनाजी, रामचंद्र निळकंठ, परशुराम त्रिंबक, शंकराजीपंत इत्यादि नवे व जुने लोकनायक कुळानें नसेत पण इभ्रतीनें, शौर्यानें, बुद्धीनें व स्वराज्याभिमानानें राजारामाच्या बरोबरीचे झाले. ही च मराठी साम्राज्याची खरी प्राणप्रतिष्ठा होय. स्वतःसाठीं नव्हे, कुलासाठीं नव्हे, प्रत्यक्ष राजाराममहाराजांसाठीं सुद्धां नव्हे, तर महाराष्ट्रधर्मासाठीं, सर्व हिंदुस्थानभर मराठी साम्राज्य उभारून प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या धर्माप्रमाणें वागण्याची मोकळीक देण्यासाठीं आणि साम्राज्याला

उपकारक अशीं महत्कार्य करणाचा संधि सर्वांस सारखी देण्यासाठीं आमच्या धनाजीनें, आमच्या संताजीनें, औरंगझेबासमक्ष त्याच्या तंबूचे कळस जबरदस्तीनें आणून सर्वांच्या हें निदर्शनास आणिलें कीं, साम्राज्याला अवश्य असणारें धाडस, अवश्य हवें असलेलें सच्छील व कार्यक्षमता मराठ्यांच्या अंगांत आहे. राजाराममहाराज निजधामाला गेले तरी साम्राज्याचा झंझावात थांबला नाहीं. तो प्रतिक्षणीं वाढत व चालला होता. ताराबाई आली. धाकटा शिवाजी गादीवर बसला, तो वेडा झाला, संभाजी गादीवर आला, मागाहून शाहुमहाराज येऊन त्यांस राज्याभिषेक झाला, म्हणून वरील वाऱ्यामध्यें कांहीं कमजास्त झालें, असा भाग नाहीं. वारा तो च, मात्र मधील क्षणभंगुर यादवीनें १०१५ वर्षें महाराष्ट्रांत च वावटळी फिरत राहिला इतकें च. शाहूनें वाऱ्याची दिशा ठरविली आणि बाळाजी विश्वनाथ यानें त्याचें प्रमाण ठरविलें. शाहू मराठी साम्राज्याच्या रंगमंडळावर आला नसता, किंवा बादशाही सनदे शिवाय तो आला असता, तर काय झालें असतें, हा मनोरंजक पण क्लिष्ट प्रश्न आहे. या प्रश्नाचा विचार आज करावयाचा नाहीं, असें ठरवून मी चालता होतों. साम्राज्याची मुग्धावस्था राजारामाच्या वेळीं होती तिला शाहूच्या साह्यानें बाळाजीला प्रकट स्वरूप देतां आलें. त्यानें ठरविलें कीं, जोंपर्यंत नायकाचें सामर्थ्य आहे, तोंपर्यंत साताराची गादी हें साम्राज्याचें केंद्र आणि वर्तमान व भावी सरदार व प्रधान हे या साम्राज्यचक्राचे आरे अथवा साम्राज्यमंदिराचे स्तंभ होत. केंद्राज्ञा घेऊन या आऱ्यांनीं ' मराठा तितुका मेळवावा । ..... महाराष्ट्र धर्म पसरावा जिकडे तिकडे ॥ ' हा समर्थ रामदासी मंत्राचा जप करावा; आणि साम्राज्याची वृद्धि करावी ( Rise of the Maratha Power पहा ). तात्पर्य, तीन राक्षसांच्या गोष्टींतील मारुत नव्हे, तर मराठ्यांचा उत्कर्ष करणारा वरील वारा हा विशिष्ट गतिप्रधान आणि विशिष्ट हेतुप्रधान झाला. हा डफ साहेबांचा ' वणवा ' नव्हे, माल्कम साहेबांचें ' कौर्यप्रदर्शन ' नव्हे; हा वारा म्हणजे श्रीरामचंद्राची आज्ञा एकनिष्ठेनें पाळणारा मारुती होता. या मारुतव्यापी मारुतींत दोष नव्हते, असें नाहीं. सर्वथा निर्दोष असें या विश्वामध्यें कांहीं असणें शक्य च नाहीं. एक ब्रह्म मात्र निर्दुष्ट आहे, पण तें निर्गुण आहे. असो; सांगावयाचें इतकें च कीं, एकदम सवळलेल्या या झंझावातीं मरुतीमध्यें कांहीं दोष होते तथापि त्याचें बळ, त्याचें बुद्धिसामर्थ्य तत्कालीन रावणकुंभकर्णादिकांस पुरून उरेसें होतें.

असो; बाळाजी विश्वनाथानें मराठ्यांच्या नैसर्गिक स्वातंत्र्यप्रीतीला साम्राज्यस्थापनेचें वळण दिलें; आणि बाजीरावाच्या अनिंद्य नेतृत्वानें हें वळण चांगलें च घटविलें. प्रथम प्रथम प्रतिनिधि, दाभाडे वगैरेंनीं बाजी-चिमणाजींच्या, राणोजी-मल्हारजींच्या, पुरोगामित्वाला थोडासा प्रतिबंध केला. परंतु मराठी साम्राज्याची दिशा धर्मपुरःसर असून प्रजेचें अखंड कल्याण करणारी आहे, असें कळतां च हा प्रतिबंध निमजोर झाला माल्कम साहेब मोठ्या गौरवानें सांगतात कीं, मराठ्यांनीं शत्रु उप-

नव्हे. होतें, तें स्वप्रजा अथवा परप्रजा नागविण्यासाठीं नव्हे. तर तें शस्त्र तत्कालीन सरकारच्या अव्यवस्थेविरुद्ध आणि अव्यवस्थित सरकाराविरुद्ध होतें. डफ साहेबांनीं गवयाजींची ठेंगळेगिरी पाहिली होती. मुसलमानी इतिहासकारांस मोगलांचा पराभव करणारे मराठे दुःसह झाले होते, म्हणून या लेखकांनीं मराठ्यांविरुद्ध आपली लेखणी करडी केली आहे. पण खरा प्रकार निराळा होता, हें मराठ्यांनीं मोगल सत्तेविरुद्ध लीलेनें जय मिळविले यावरून सिद्ध होतें. बाजीरावास व त्याच्या पुत्रपौत्रांस मराठी साम्राज्य स्थापावयाचें आणि धर्मस्वातंत्र्यासाठीं हिंदूंस राजकीय, सामाजिक व नैतिक स्वातंत्र्य द्यावयाचें होतें. कांहीं परकीय लेखक व परीक्षक ह्या गोष्टी विसरतात हें दुर्दैव होय. असो, बाजीरावानें उत्तरेकडे, दक्षिणेकडे, पश्चिमेकडे व पूर्वेकडे स्वाऱ्या करून व करवून मोगली सत्तेची इमारत खिळखिळी करून सोडली. 'सा सुभे दक्षिण सोडवावी' हा तर बाळाजी बाजीरावाचा मुख्य मंत्र होता. या थोर पुरुषाच्या अमदानींत च बाजीरावानें खिळखिळी करून सोडलेली इमारत ढांसळून पडण्याच्या बेतांत आली; स्वराज्याच्या बाहेर कर्नाटक, मराठवाडी, वऱ्हाड, नागपूर, माळवा, गुजराथ, काठेवाड, अंतर्वेदी इत्यादि प्रांत मराठी साम्राज्याच्या कक्षेंत व कांहीं मराठी साम्राज्याच्या छायेखालीं आले. अंग, वंग प्रांतांस वेध लागणार होता, कलिंग प्रांत तर नागपूरच्या भोसल्यांनीं आक्रमून टाकला होता. हिंदुस्थानची पश्चिम सरहद्द हि मराठ्यांनीं आपल्या ताब्यांत घेतल्यासारखें केलें होतें. बाळाजीच्या अमदानींत खुद्द स्वराज्यांतील प्रजा तर आनंदांत च डुलत होती. कालमानाप्रमाणें शेतकीला, व्यापाराला, विद्येला, वैद्यक, ज्योतिष इत्यादि शास्त्रांस उत्तेजन मिळत होतें, गोतांच्या साह्यानें, पंचमुखानें आणि रामशास्त्र्यांसारख्यांच्या न्यायनिपुण न्यायपद्धतीनें प्रजेची दाद लागण्यास हरकत पडत नव्हती. राज्यांतील छिद्रेशाची पद्धति हळुहळू सुधारत होती. साम्राज्यवृद्धीसाठीं ठिकठिकाणीं स्थापन केलेले जहागिरदार यद्यपि स्वतंत्र होते तथापि साम्राज्यसंरक्षणाला व साम्राज्यसंवर्धनाला उपकारक होईल असें स्वातंत्र्य नियमित करणाऱ्या योग्य उपायांची योजना अमलांत आणण्याचा बाळाजीचा प्रयत्न होता. जीर्ण झालेलीं सामाजिक व धार्मिक बंधनें या प्रगतीच्या काळीं शिथिल होण्याच्या मार्गांत होतीं, हें प्रभुलोकांच्या व सोनार ( हे आपल्यास दैवज्ञ ब्राह्मण म्हणवितात ) वगैरेंच्या खटपटींवरून स्पष्ट दिसतें. तात्पर्य, आधुनिक काळास सुरुवात होणार, पुराणव्यवस्थेचें पुनःसंस्करण होणार, असा रंग दिसूं लागला होता. पटवर्धन जहागिरदारांचें बारगीरपत्रक ( हें सवाई माधवरावांच्या अमदानींतील आहे ) पाहिल्यास लष्करी खात्यांत तरी ब्राह्मण-अब्राह्मण, हिंदु-मुसलमान, हा भेदाभेद नव्हता, गुणकर्मानुसार अधिकार मिळत, असें स्पष्ट दिसतें. तात्पर्य, मराठी साम्राज्य प्रगतीचें दर्शक होतें. आतां लोकांस ( सर्व प्रजेला ) साक्षर करणें, प्रकृतीच्या गुणांचें ज्ञान करून घेऊन प्रकृतीला च मनुष्यांचीं कामें करावयास लावणें, समुद्रावर जय्यत फिरतें आरमार ठेऊन हिंदुस्थानचा व्यापार आपल्या ताब्यांत ठेवणें, नवीन शोध लावणें, सैन्याची पाइकापासून तों सेनापतीपर्य-

तची व्यवस्था लावून सेनायंत्र तयार करणें इत्यादि अनेक कामें मराठ्यांच्या नायकांनीं केलीं नाहींत, हें खरें आहे. पण हा अकारणदोष पेशव्यांच्या अथवा तत्कालीन मुत्सद्यांच्या माथीं लादण्यापूर्वी ते ज्या काळांत जन्मले व वाढले त्या काळाचा हि विचार केला पाहिजे. शिवाय, कालप्राप्त पद्धतीस हि धरून न राहतां १८ व्या शतकांतील मुत्सद्यांनीं प्रगतीचें व साम्राज्याचें होकायंत्र दृष्टीवेगळें केलें होतें कीं काय, हें हि पाहिलें पाहिजे. या दृष्टीनें विचार केला असतां फ्रान्सचा १४ वा लुई, स्वीडनचा गस्टेव्हस अडॉल्फस यांपेक्षां पेशव्यांचा अमल जास्त सुसह्य आणि सौख्यद होता, असें म्हणण्यास मला यत्किंचित् हि दिक्कत वाटत नाहीं.

सातारचें महत्त्व कमी केल्याबद्दल आणि जहागिरदारी पद्धतीचा विस्तार केल्याबद्दल कित्येक शिवाजीभक्तांनीं बाळाजी बाजीरावावर कृतघ्नतेचा व अदूरदर्शीपणाचा, असे आरोप केले आहेत. हा विषय फार मोठा आहे, अप्रस्तुत आहे, म्हणून या विषयाची येथें च रजा घेतों. मात्र बाळाजीनें केलेल्या या गोष्टी स्वराज्याच्या वर्धनाला व संरक्षणाला अवश्य होत्या, इतकें मात्र नमूद करून ठेवितों.

धर्माची व शीलाची स्वतंत्रता देऊन मोठमोठालीं सार्वजनिक व राष्ट्रीय कामें उठविण्याचें सामर्थ्य व स्वातंत्र्य देऊन परस्परांत बंधुभाव वाढविणारें स्वराज्य स्थापन करणें, प्रजेस साक्षात् जबाबदार नसलें तरी वेदांती धर्माला पोषक असणाऱ्या व प्रजेची दाद घेणाऱ्या नायकाची स्थापना करून सर्व भारतवर्ष एकजीव, स्वतंत्र आणि संपन्न करणें हें साम्राज्याचें अंतिम ध्येय होतें, या ध्येयाचा यद्यपि स्पष्टपणें उच्चार झाला नव्हता, तथापि शिवाजी, राजाराम व त्याचें मंडळ, शाहुपेशव्यांपैकीं थोरल्या माधवराव पर्यंतचे चार पेशवे हे बव्हंशानें आणि नाना फडणीस कांहीं अंशानें पूर्वोक्त राष्ट्रीय ध्येयास उपकारक होते, असें माझें मत आहे. या दृष्टीनें म्हणजे साम्राज्याच्या दृष्टीनें साम्राज्यास उपकारक पद्धति काढणारा व अनुसरणारा तो मुत्सद्दी राष्ट्रीय दृष्टीनें चिरस्मरणीय आहे, तदितर नाहीं. हें मत खरें ठरलें तर उत्तम च झालें. असो, हें मत खरें आहे असें समजून मी देवी अहिल्याबाईच्या चरित्रपरीक्षणाकडे वळतों.

मल्हारराव सुभेदार १६८७ च्या वैशाख वद्य ११ ला म्हणजे १७६५ च्या १५ व्या मे दिवशीं इहलोक सोडून गेले. थोरले माधवराव साहेबांनीं साम्राज्याचें सुकाणू १७६१ च्या जून नंतर हातीं घेतलें. पानीपत झालें नसतें तर– पण हा विचार च नको. वस्तुस्थिति घेऊन चालणें हा च श्रेयस्कर पंथ आहे. पानीपत बिघडलें, एक लाख बांगडी फुटली, धाकट्या पिटप्रमाणें नानासाहेब पेशवे 'हाय' घेऊन मरण पावले आणि पेशवाई, मराठेशाही, मराठी साम्राज्य डगमगणार असें धूर्त म्हणवून घेणाऱ्या भेकडांस वाटूं लागलें. परंतु मराठ्यांच्या डोक्यांत व त्यांच्या हातांत विलक्षण पाणी होतें तें ह्या भेकडांस उमगलें नव्हतें. थोरले माधवराव वयानें लहान पण बुद्धीनें मोठे. यांनीं धुरीणत्व पत्करिलें आणि पानीपतामुळें शेफारलेला हैदरखान आणि दिल्लीकडील नजीबखान यांचा त्यांनीं ५।१० वर्षांत च सरपूस समाचार घेऊन ' मराठेपणा ' हा

बीज अति चिवट आहे, मल्या माणसानें हिला चिडवूं नये, असें लोकांच्या निदर्शनास आणून दिलें. माधवरावांनीं भ्रष्ट मार्गानें जाणार राघोबा, जानोजी भोसले यांस शिक्षा लाविली, निजामचा दिवाण आरत्या हातांतील बाहुलें करून ठेविला आणि खुद्द सरकारी कामाकाजांत उत्तम प्रकारची शिस्त लाविली. असो. या कारकीर्दीत देवी अहिल्याबाईचा मुलगा मालेराव हयात होता. तरी इंदूर संस्थानाची व सरदारीचीं व्यवस्थासूत्रें बाईच्या हातांत आलीं. बाईच्या मुलाच्या आकस्मिक मृत्यूनंतर म्हणजे १७६७ सालीं गंगाधर यशवंत चंद्रचूड, होळकरशाहीचे दिवाण, यांच्या फुसलावणीनें राघोबाच्या तोंडाला पाणी सुटून ते होळकरी सरदारी आपल्या ताब्यांत घेण्याला तयार झाले, असा एक सार्वत्रिक लोकप्रवाद आहे. या पुत्रविरहाच्या उद्वेगजनक प्रसंगीं लांडेकारभार करणाऱ्या राघोबादादाला मानी बाईसाहेबांनीं जें उत्तर पाठविलें म्हणून म्हणतात तें बाणेदारपणाचें, मल्हाररावाच्या सुनेला साजणारें आणि कसल्या हि नेभळ्या व भेकडी अंतः-करणांत वीर्य उत्पन्न करणारें आहे, यांत शंका नाहीं. तथापि तें उत्तर कायदेशीर नव्हतें. भोसले, गायकवाड, पटवर्धन, भावे, शिंदे या घराण्यांत वारस नेमण्याचा प्रसंग ज्या ज्या वेळीं आला त्या त्या वेळीं, सातारचें नायकत्व प्रबल होतें तोंपर्यंत सातारच्या महाराजांची व १७५० नंतर मुख्यतः पेशव्यांची संमति घेऊन वारसाची अथवा दत्तकाची निवडणूक कायदेशीर समजली जावी, असा साम्राज्याचा दस्तूर होता. असो; या दस्तुराला या प्रसंगीं हरताळ लागण्याचा प्रसंग येणार होता, तो थोरल्या माधवरावसाहेबांनीं देवी अहिल्याबाईची योग्यता लक्ष्यांत आणून टाळला आणि अहल्याबाईनीं केलेली व मल्हार-रावसुभेदारांच्या मनांत असलेली व्यवस्था मान्य केली. माधवरावांनीं व माधवरावसा-हेबांचे हस्तक अथवा बहिश्चर प्राण जेनाना यांनीं जी मान्यता या वेळीं दिली तिचें स्मरण बाईस व तुकोजीस १७७९, १७८१, १७८५–८६, १७९१–९२ सालीं असतें तर कित्येक अनर्थ टळते. असो; हा विचार आपल्यास आतां इतक्यांत च करावयाचा आहे म्हणून त्याची चर्चा येथें नको. या व्यवस्थेनें संस्थानचा कारभार अहल्याबाईनीं करावा आणि सरदारीचा म्हणजे विशेषतः लष्कर खात्याचा भार तुकोजीनें आपल्या माथीं घ्यावा असें ठरलें; आणि संस्थानचा गाडा सुरळीत चालू झाला. १७६८–७२ महादजी शिंद्यांप्रमाणें च तुकोजी होळकरांनीं दिल्लीकडे फार चांगली कामगिरी केली आणि मराठ्यांच्या हातीं १७६१ पूर्वीं जितका मुलूख होता तितका सुटला; इतकें च नव्हे, तर १७७१–७२ मध्यें त्यांचा दरारा आसेतुहिमाचल अव्यवहित रीतीनें स्थापित झाला. या वेळीं तुकोजीचा हट्ट साम्राज्यमुत्सद्यांच्या लक्ष्यांत आला.

अहिल्याबाईचा कारभार सुतर्ह आणि लोकप्रिय होता असा माल्कम प्रभृति इंग्लिश लेखकांचा व मराठी लेखकांचा अभिप्राय आहे. बाईच्या कारभारांत न्याय, औदार्य, चटपटीतपणा असे. अर्थात् हीं शिफारसपत्रें फार मोठ्या योग्यतेचीं आहेत. शिवाजी महाराजांची आई जिजाऊबाईसाहेब, थोरले बाजीरावाची आई राधाबाईसाहेब, यांची दक्षता अहिल्याबाईनीं दाखविली आणि प्रसंग पडला असतां शिवाजी महाराजां-

सारखे अपूर्व बुद्धिविशालतेचे, संताजी धनाजीच्या निर्भेळ शूरतेचे, पेशव्यांसारख्या चतुरस्त्र मुत्सद्दीगिरीचे पुरुष च महाराष्ट्रांत अवतीर्ण होतात असें नाहीं, तर गोषांत राहणाऱ्या पण गोषास फेंकून देऊन स्वशीलानें, स्वचारित्र्यानें पृथ्वीला ललामभूत होऊन राजकारणांत हि राणी इलिझाबेथशीं बरोबरीनें टक्कर देणाऱ्या साध्वी स्त्रिया महाराष्ट्रांत निर्माण होतात, असें स्पष्ट सिद्ध केलें. येथपर्यंतचा प्रकार ठीक झाला.

१७८२ मध्यें श्रीमंत माधवराव नारायण पेशवे यांच्या वतीनें होळकर दरबारांत केसो भिकाजी दातार या नांवाचे एक निस्पृह व स्पष्टवक्ता गृहस्थ राहूं लागले. शिंद्यांच्या दरबारांत जसे नारो शिवदेव त्याचप्रमाणें होळकरदरबारांत हे केसो भिकाजी काम करीत. होळकरदरबारांत यांनीं १७८२ पासून १७९४ पर्यंत वकिली करून पेशव्यांस अथवा खरें म्हटलें म्हणजे नाना फडणविसांस वेळोवेळीं सरकारी व इतर बातमी दिली आहे. केसोपंतांचें अवलोकन सूक्ष्म व बारकाईचें असून गुप्त बातम्या काढण्यांत त्यांचा हातखंडा असे, असें दिसतें. असो. किती हि सत्यनिष्ठ वक्ता बातमी देणारा असला, तरी त्याच्या अंतःकरणाला व्यक्तिनिष्ठ असा कांहीं तरी आग्रह अथवा दुराग्रह असावयाचाच. तेव्हां केसोपंतांच्या व्यक्तिनिष्ठ म्हणण्यास दुजोरा मिळतो किंवा तें निजोरी होतें, हें पहाण्यासाठीं या सभेच्या संग्रहांत असलेले श्री. चंद्रचूड यांचे कागदपत्र पहाण्याची माझी इच्छा होती. परंतु माझ्या च कांहीं चमत्कारिक शारीरदौर्बल्यानें मला तें आवश्यक काम करितां आलें नाहीं. अर्थात् माझ्या पुढील विधानांची सत्यासत्यता या व्यंगामुळें कमी दर्जाची होते. तथापि केसो भिकाजीस १२।१३ वर्षें नानासारख्या दूरदर्शी मुत्सद्यांनीं राहूं दिले. त्यांच्या १७९३–९४ सालांतील पत्रांस देवराव तात्या हिंगणें, यांच्या पत्रांचा दुजोरा मिळतो, जीं कांहीं थोडीं पत्रें चंद्रचूड दप्तरांत मीं पाहिलीं तीं केसोपंतांच्या म्हणण्याचा अनुवाद करितात, होळकरशाहीचा वचक दिवसानुदिवस कमी होत गेला; आणि काव्येतिहास संग्रहांत सालबाईच्या तहासंबंधाचा म्हणून जो पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे, त्यांतील १९३, २१२, २२१, २५१, २६०, २६९, २७१, वगैरे पत्रें पाहिलीं असतां केसोपंतांचें म्हणणें वावगें नव्हतें अशी माझी समजूत झाली आहे. असो, केसोपंतांनीं लिहिलेल्या २७६ पत्रांवरून (महेश्वर दरबारचीं पत्रें भाग दुसरा. इ. सं.) काय निष्कर्ष निघतो, तो आतां पहावयाला लागतों.

(१) देवी अहिल्याबाईसाहेब धर्मनिष्ठ असून देवब्राह्मणांची सेवा उत्तमप्रकारें करीत, याबद्दल केसोपंतानें हि अनेक पत्रांत आपली कबुली दिली आहे. पेशव्यांच्या गादीविषयीं देवीस सकौतुक अभिमान होता याची साक्ष लेखांक ८ वगैरेमध्यें, बाईचें वजन सर्वमान्य असे याची साक्ष २६५ वगैरे लेखांक देतात. परंतु बाईच्या स्वभावाचा हट्टीपणा, व्यवहारांत कंजूषपणा, राजकारण दृष्टीनें मनाचा कोतेपणा इत्यादि सरदारकीला व मुत्सद्दीगिरीला कमीपणा आणणारे दोष हि उघड करणारे नंबर

७, ९, १३, ३८, ६६, २१३, २२२, २३२, २६५, २७३ वगैरे पत्रें देतात, हें दुर्दैव होय. इंग्लंडची राणी एलिझाबेथ शीलानें यद्यपि देवी अहिल्याबाईच्या तोलाची नव्हती, तथापि राजकारणी दृष्टीनें तिची योग्यता फार च मोठी आहे, असें विचाराअंतीं म्हणावें लागतें. देवी अहिल्याबाईचें औदार्य मातुश्री जिजाईच्या किंवा राधाबाई, गोपिकाबाई पेशवे यांच्या उपलब्ध चारित्र्यांत दिसून येत नाहीं. परंतु राजकारणांत त्यांचा दर्जा अहिल्याबाईपेक्षां खचित खचित मोठा आहे मातुश्री जिजाऊनें किंवा गोपिकाबाईनें आपल्या मुलांचे भिकारचाळे कधीं हि चालूं दिले नाहींत आणि केसोपंतांचीं १७६–२६५ पर्यंत पत्रें चाळलीं तर देवी अहिल्याबाईनें आडदांड मल्हेरावाचे कसे भिकारी लाड पुरविले, याचा थोडासा प्रत्यय येणार आहे.

• ( २ ) सतराव्या आणि अठराव्या शतकांत तरी मराठ्यांची राजकीय शासनपद्धति उग्र नसे. आमची हिंदु प्रजा सामान्यतः गरीब तर खरी च; तथापि जुलमाचा कहर च झाला किंवा धर्मावर धाड आली तर ही प्रजा बिथरल्याशिवाय राहात नाहीं. देवी अहिल्याबाईचा अमल पुष्कळ सौम्य होता, असें माल्कम साहेब म्हणतात. नीट च आहे. येथूनतेथून सर्व मराठेशाहीचा स्वराज्यांतील अमल च जर शास्त्रोक्त असे, तर देवी तरी ह्या सामान्य नियमाला कसा अपवाद होणार ? तथापि कारभार ठाकसे ठाक च चालत होता, असें मानण्याला, आहे यापेक्षां जास्त पुरावा उपलब्ध होणें अवश्य आहे. इंदूरची १० । १२ वर्षें ज्या अमलदारांकडे सुभेदारी असे, त्याच्या संबंधानें माल्कमसाहेब गोडवे गातात. पण त्याच्या च संबंधानें आक्षेप घेणारीं कित्येक पत्रें प्रस्तुत पुस्तकांत उपलब्ध होत आहेत. ले. १५६ मध्यें केसोपंत लिहितो " पदरीं माणूस शहाणा कोणी नाहीं. ... प्रसंग राखी असे कोणी नाहींत. जे आहेत ते स्वस्थ तीन प्रहर घरीं असतात. प्रहर दिवस उरला म्हणजे दरबार करितात. तितक्यांत काय जायसाल होतील ते. असें प्रतिदिवशीं. ... पैसा मिळतो. कारभार कोणाचे ध्यानीं नाहीं." ले. ६ व ले० ९ मध्यें बाईच्या हट्टी व गर्विष्ठ स्वभावाचें चित्र आहे. देवी अहिल्याबाईचे चरित्रकार 'पुरुषोत्तम' यांनीं केसो भिकाजीला आधुनिक वर्तमानपत्राचा बातमीदार मानून त्याचे बोल कुचाक्रिमतीचे होत असें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे; पण हा प्रकार शुद्ध वकिलीचा नसला तरी कृतज्ञतेचा, प्रेमगर्भ पूज्य भावनेचा होय, असें म्हटल्याविना माझ्यानें राहवत नाहीं. त्याच्या इतर पत्रांस जर चंद्रचूडांचे दप्तराचा, काव्येतिहासांतील पत्रांचा मुकाबला मिळतो, तर कारभाराच्या ढिलाईसंबंधानें केसोपंतांचे आक्षेप मात्र दुराग्रहप्रेरित आहेत असें कसें मानावें ! इंदूरच्या राज्यांत दरवडे पडत याचें समाधान 'पुरुषोत्तम' करितात कीं, असे दरवडे सर्व मराठेशाहीभर पडत असत. चोरासंबंधानें नानासाहेब पेशव्यांचा किती बंदोबस्त असे, हें इतिहाससंशोधनाचे रामदास राजवाडे यांनीं नानासाहेबांचें नानाफडणिसास १७५९ सालीं लिहिलेलें आज्ञापत्र छापिलें आहे त्यावरून व रा. ब. गुप्ते यांनीं कांहीं पवाडे प्रसिद्ध केले आहेत, त्यांतील एका पोवाड्यावरून निदर्शनास येण्यासारखें आहे. असो;

बाईंचा कारभार कसा सैल होता, याचें प्रत्यंतर नंबर ९, ४३, ६३, ६८, ९२ १०७, १५६, १६४, १७४, २१४, २२१, २३३, २४३, २७३, २७४ वगैरे पत्रांवरून येणार आहे. २७४ मध्यें तर 'इंदूरची रयत बेदील आहे' असें उद्वेगजनक वाक्य आहे.

( ३ ) बाईंस आपल्या संस्थानचा मोठा अभिमान असे. त्याचप्रमाणें 'मल्हार आया!' असें ऐकतां च शत्रूंच्या अंतःकरणाचें पाणी करणारा मल्हारराव सुभेदार यांच्या अमदानींत होळकर घराण्याची जी इभ्रत असे, जो दरारा असे, पेशवाईंत मल्हाररावास जो मान असे तो मान, ती इभ्रत, तो दरारा आपल्या वेळीं हि असावा, अशी बाईंची प्रशस्य इच्छा हि असे. परंतु मल्हाररावाच्या तरवारीचें पाणी निराळें, बाईंच्या सदिच्छचें पाणी निराळें. नुसती इच्छा असून काय उपयोगी? 'नवसें जरी पोरें होतीं। तरी कासया करणें लागे पती' असें, श्री तुकोबा महाराज म्हणतात, तें अक्षरशः खरें आहे. बाईंच्या इच्छेला कर्तेपणाची जोड मिळाली नाहीं. म्हणून १७६७ पासून होळकरशाहीला जी उतरती कळा लागली, तिचा १७९५ सालीं बहुतेक 'कळस' झाला. म्हणजे होळकरांचें स्वातंत्र्य रसातळास जाऊन ते शिंद्यांचे केवळ हस्तक बनले! हा चमत्कारिक दैवयोग! मल्हाररावांच्या हाताखालीं वाघासारखीं कामें उठवणारा तुकोजी, नारो गणेश, पारनेरकर मंडळी यांच्या हातांतील बाहुलें झाला. वृद्धपणीं तो दारूच्या आधीन झाला तो इतका बेसुमार, कीं स्नानपानादि विधीसुद्धां मयानें होऊं लागले! तरवारीचा खंबीर पण मनाचा ढिला तुकोजी, आपमतलबी कारभारी सांगतील, तसें नाचणारें मांजर झाला. बाईंची इच्छा मोठी पण तुकोजी सारखा भोळा हस्तक मिळाल्यामुळें बाईंच्या सर्व इच्छा मनच्या मनीं जिरून गेल्या. परंतु माल्कम साहेब तर तुकोजीच्या निवडणुकीवर अगदीं खुष आहेत. ते जोरानें विधान करितात कीं, १७६७ पासून १७९६ पर्यंत म्हणजे बाईसाहेबांचा जीवमान होता तोंपर्यंत बाईसाहेब आणि तुकोजी यांच्यामध्यें बेबनाव म्हणून झाला नाहीं. कदाचित् व्यक्तिदृष्टीनें बाईंचा व तुकोजीचा संबंध प्रेमळ मातापुत्रांचा असेल. हें हि आश्चर्य च होय. आमच्या सारख्यांच्या सामान्य घराण्यांत सुद्धां दत्तक मातापुत्रांचे संबंध फारसे अभिनंदनीय नसतात. मग होळकरासारख्या राजघराण्यांत काय विचारावें! तेव्हां बाईंचा व तुकोजीचा स्वभाव जमत असेल तर मोठें च आश्चर्य म्हणावयाचें. अर्थात् हा प्रसंग उभयतांस हि भूषणास्पद होय. परंतु राजकीय कारभारांत उभयतांचें ऐकमत्य होतें, असें दिसून येण्याला फार निराळ्या प्रकारचा पुरावा उपलब्ध व्हावयास पाहिजे आहे. वरती काव्येतिहासांतील पत्रांचे आंकडे दिले आहेत. ते व प्रस्तुत महेश्वरी पत्रांतील ( भाग २ ) ६२,७७,१०३,११६,११७,१२४, १२५, १२८,१४८, १६८, १७१, १७९, २०५, २२२, २४३ नंबरचे लेखांक चाळले, तर तुकोजीचें व त्याच्या दत्तक मातुश्रीचें फारसें जुळत नसे असें स्पष्ट दिसेल. स्वारीशिकारी करण्याला पैसे लागत. सरदारीसाठीं कांहीं महाल अहिल्याबाईंनें तोडून दिले होते.

१४

परंतु तेवढ्यानें काम भागत नसे म्हणून तुकोजी पैसे मागत आणि देवी अहिल्येचा हात 'मह' असल्यामुळें वेळेवर द्रव्याचा पुरवठा होत नसे. इंग्रजांशीं पहिली लढाई चालली असतां शेवटचीं दोन वर्षे निदान शेवटचें १७८२ हें वर्ष तुकोजींनीं घरीं बसून काढलें. आमचे स्नेही 'पुरुषोत्तम' म्हणतात कीं 'war must pay itself' लढाईचा खर्च बाहेरून च निघाला पाहिजे.' हें शिवकालीन व मल्हारराव सुभेदारांचें मत तुकोजीनें पाळावें, अशी बाईची इच्छा असे. ही इच्छा चांगली किंवा वाईट हा सध्यांचा प्रश्न नाहीं. प्रश्न हा आहे कीं, मोहिमांचा हा बिनभांडवली व्यापार १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत चालविणें शक्य होतें कीं काय ! मराठ्यांचा संदा व अजिंक्य वीर शिवाजी महाराज, तसें च पुढें संताजी, धनाजी यांनीं हा व्यापार चालविला व त्यांस चांगलें यश हि आलें. परंतु धनाजी, संताजीच्या बरोबरीचा वीर बाजीराव ना ! वेळ पडल्यास घितार्मावर शिजलेला भात खाणारा आणि हुरड्याची कणसें फाकणारा बाजीराव तर डौली नव्हता ना ! पण कर्जानें त्याची कोण पाठ पुरविली होती ! धनकोंच्या पुढें कपाळ घांसतां घांसतां त्या बिचाऱ्याचें कपाळ च नाहींसें होण्यापर्यंत मजल आली होती, हें प्रत्येक इतिहासभक्ताला ठावें असलें पाहिजे. बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब, त्यांची ही च दशा ! 'कर्जमुक्त झालात' असें ऐकल्याशिवाय थोरल्या माधवरावांचा प्राण कुडींतून बाहेर जाईना. गुत्तीकर मुरारावाचा दुःखद मृत्यु, १७७४-७९ पर्यंतच्या हैदरविरुद्ध केलेल्या मराठ्यांच्या मोहिमा, परशुरामभाऊसाहेबांचे व हरिपंत तात्यांचे कानांनीं ऐकवत नाहींत असे हाल इत्यादि प्रसंग पहावे म्हणजे 'लढाईनें लढाईचा खर्च चालवावा' हें सूत्र १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत कुचकामाचें झालें होतें, असें स्पष्ट दिसेल. मराठ्यांचें साम्राज्य बुडविण्याला जीं अनेक बलवत्तर कारणें झालीं त्यांत द्रव्याच्या पुरवठ्याचा अभाव हें एक मुख्य कारण आहे. मराठ्यांच्या समशेरींचें पाणी शिवकालीन पाण्याइतकें च तेजस्वी होतें. शिवाजींचें युद्धचातुर्य व मुत्सद्दीपणा कांहीं 'और' होता, हें खरें. परंतु १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत हि महादजी शिंदे ऊर्फ पाटिलबोआ, हरिपंत फडके, पटवर्धन मंडळी, जिवबादादा, सखाराम हरी, मानाजी फाकडे, मालोजी घोरपडे, मुधोळकर इ. मंडळी युद्धकलेंत कमी पारंगत होती असें नाहीं. आमचे 'दादा' भोळे सांब ना ! फौजेचीं सूत्रें हालविण्यांत ते सुभेदार मल्हाररावाहून रतीभर हि कमी नव्हते. पण पैसा नाहीं म्हणून मनगटांतील बळकटपणा व मस्तकांतील चिवटपणा व्यर्थ गेला. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं गंगाजळींत लाखों रुपये टाकणाऱ्या देवी अहिल्याबाईनें वेळेवर च जर आपल्या द्रव्याच्या पिशव्या सैल केल्या असत्या, तर तुकोजी होळकरांच्या हातून सुद्धां बळरामाचे पराक्रम झाले असते, त्यांच्यामध्यें व बाईमध्यें वितुष्ट येतें ना आणि साम्राज्याला जोर मिळून होळकरशाही हि प्रबल राहिली असती. पण हे दुःखी समाधान देणारे विचार आतां काय उपयोगी ! भावी तसें झालें. आश्चर्याची गोष्ट ही कीं, या सरदारकी-

मुळें १७८२ पासून तुकोजींचे व बाईंचे राजकीय वैमनस्याला सुरुवात झाली असून या वैमनस्याचा गंध हि माल्कम साहेबांस नाहीं. ते स्वच्छ लिहितात कीं, आपण ह्या कामीं पुष्कळ शोध केला, म्हातान्या म्हातान्या माणसांच्या जबान्या घेतल्या पण एकाच्या हि तोंडून बाईतुकोजींच्या सौरस्याविरुद्ध 'ब्र' निघाला नाहीं. बरोबर देवबान माल्कम साहेब आणि तात्या जोगादि त्यांचे साक्षीदार ! ! खरें झालें. यांच्या कोर्टांत साक्ष देण्याचा प्रसंग नाना फडणिसांस, महादजीराव शिंद्यांस, प्रत्यक्ष तुकोजीरावांस आला नाहीं ! खरें. ज्या बाईंनीं 'मैल' गेल्यावर 'झोपा' करण्यासाठीं द्रव्य बाहेर काढिलें, त्या बाईंस च पुरशीस घालण्याचा प्रसंग माल्कम साहेबांस आला असता, तर त्यांच्या कानांस काय ऐकावें लागलें असतें व लेखणीस काय लिहावें लागतें खरें ! तात्पर्य, राजकीय व सरदारी कामांत बाईचें व तुकोजींचें 'बहुत बरें' नव्हतें. माल्कम साहेबांस तें समजण्याचा मार्ग नव्हता. कारण यशवंतरावा सारख्या 'अव्यवस्थित' राजपद्धतींत राहिलेल्या लोकांचे बोल त्यांच्या कानीं आले. यशवंतरावी जाळपोळीनें तळमळलेल्या लोकांस देवी अहिल्याबाईचें राज्य म्हणजे 'रामराज्य' वाटलें, यांत आश्चर्य च नाहीं. अर्थात् बाईचें व तुकोजींचें सौमनस्य असल्या सेरीज हें रामराज्य अवतीर्ण झालें नसलें पाहिजे, हें अनुमान ओघप्राप्त च येतें. मात्र दुःखाची गोष्ट ही कीं, वस्तुस्थिति तशी नव्हती. याचप्रमाणें दुसऱ्या एका अप्रयोजक अनुमानाचा उल्लेख प्रसंग नसतां हि मी करीत आहें याची आपण क्षमा करावी. एकादा डागल्लेला आंबा अढींत असला म्हणजे सगळी अढीच्या अढी कुजून जाते, त्याप्रमाणें एका रावबाजीनें आपले भिकारी गुण पाघळून आणि दुर्व्यसनाच्या दिवट्या लावून सगळ्या पेशवाईला, नानासाहेब, माधवरावसाहेब, नाना फडणीस यांच्या कारभाराला काजळ फासलें आहे, नव्हे ? याचा परिणाम काय झाला ? सगळी पेशवाई म्हणजे अव्यवस्थेचें, खुळेपणाचें जुलमाचें माहेरघर, असा शेरा परकीयांनीं अनुमानून लिहिला ! ब्राह्मण तेथून स्वार्थी व कपटी; मराठा म्हणजे अज्ञानाचा अवतार, हीं अनुमानें नानासाहेबांच्या, माधवरावसाहेबांच्या नाना फडणीसांच्या अमदानींत कोण काढूं धजला असता ? कोणाची अशी छाती झाली असती ? पण एका रावबाजीच्या लीलांनीं आम्हांस आमच्या पूर्वजांची निंदा ऐकण्याचें दुर्भाग्य प्राप्त झालें आहे ! असो; हें अनुमान जसें चुकलें, त्याचप्रमाणें माल्कम साहेबांचें अनुमान फसलें. पहिलें अनुमान विषाद उत्पन्न करितें, दुसरें अनुमान हर्ष देतें. अर्थात् हे दोन्ही हर्ष विषाद निष्कारण होत आणि म्हणून उपेक्षणीय होत.

(आ) एवंच देवी अहिल्याबाई स्वभावतः धर्मशील आणि कर्मनिष्ठ होतीं. सर्व प्रकारचें ऐश्वर्य घरीं पाणी भरीत असून व सर्व प्रकारची निग्रहानुग्रही सत्ता हातीं असून हि ज्या माउलीनें आमरण उग्र व्रतें स्वीकारून देवब्राह्मणांची सेवा केली, अनेक अन्नछत्रें घातलीं, अनेक देवालयें बांधिलीं, कित्येकांचा जीर्णोद्धार केला, रामेश्वराला दररोज गंगाजलाचें स्नान होईल, अशी व्यवस्था केली, घाट बांधिले, 'अतिताभ्यागताचा' योग्य समाचार घेतला, काशीरामेश्वरास जाणाऱ्या यात्रेकरूंस

मिष्टान्न पातलें, ती माउली ' धन्य ' नव्हे असें कोणता नतद्रष्ट म्हणेल ? या देवीचे उपासतापास, तिचें कडकडीत सोंवळें, अब्राह्मण असून हि ब्राह्मणी आचारविचार, तिचें मौनव्रत, इत्यादि पाहून त्या वेळची मंडळी हि थक्क होत व या देवीला 'अवतार ' समजत. आम्हांसारख्या धर्मविरक्तांस तर हें नैष्ठिक ब्रह्मचर्य अशक्य कोटींतलें दिसतें. कांहीं कांहीं तर याच्या हि पुढें जाऊन या " नेमधर्मास ' ' खुळसटपणाच्या ' सदरांत ओढून आणून विषण्ण वदनांतील आपली असित दंतपंक्ति व्यक्त करितात। मला स्वतःला ही देवी अहिल्या परमपूज्य वाटते आणि म्हणून शीलसंस्करणार्थ प्रत्येक मुमुक्षूनें या देवीच्या नावाचा सार्थ उच्चार प्रत्यहीं भक्तिपुरःसर करून हें त्या देवीचें मंगलकारी चारित्र्य आचरणांत व्यक्त करण्याचा प्रयत्न करावा, अशी माझ्या सर्व महाराष्ट्रीय बंधूंस मी प्रार्थना करितों.

हा स्वतःच्या व्यक्तिविषयक चारित्र्याचा भाग झाला. पण प्रश्न हा आहे कीं, होळकरी संस्थानाच्या आणि मराठी साम्राज्याच्या संस्थांस व त्यांतील घटकावयवांस उपयोगी पडणारे सद्गुण देवी अहिल्याबाईच्या चारित्र्यांत होते कीं नाहीं व त्यांचा उपयोग संस्थानाला व साम्राज्याला झाला कीं नाहीं ?

( १ ) देवी अहिल्येच्या प्रत्यक्ष उदाहरणानें इंदूरची व इंदूरसंस्थानची प्रजा बरी च सात्विक झाली. 'राजा कालस्य कारणं ' या न्यायानें अहिल्याबाईच्या धार्मिक तेजस्वितेनें माळव्यांतील रांगडी लोक बरे च सुसंस्कृत झाले. देवीस सच्छील आवडतें म्हणून हि गोविंदपंत गानूसारखे कित्येक अधिकारी, इमानी व स्वकार्यदक्ष झाले. तिचा दानधर्म पाहून हि तेथील प्रजेंत सामान्यतः देवालयें, धर्मशाळा वगैरे इष्टापूर्तींचीं परोपकारी सत्कृत्यें करण्याची प्रेरणा झाली. विद्वानांस भरपूर दक्षिणा श्रावणमासांत मिळे म्हणून च कीं काय कोण जाणें देशोदेशींचे विद्वान ब्राह्मण संस्थानच्या आश्रयास येऊन राहिले. ओंकारमांधाता, महेश्वर इत्यादि पवित्र क्षेत्रांचें दर्शन घ्यावें अशी पुष्कळांस प्रेरणा झाली. अशा तऱ्हेचा बरा च सत्परिणाम झाला यांत शंका नाहीं.

( २ ) अहिल्याबाईचा स्वभाव प्रेमळ असे. तसें च ती एक तेजस्वी साध्वी होती. शिंद्यांच्या सखूबाईप्रमाणें ती लोकांच्या ओंजळीनें पाणी पिणारी नव्हती. तिला सुभेदार मल्हाररावांचा मोठा अभिमान असे. राघोबादादा पेशव्यांस या बाईनें चांगलें च चमकाविलें व गंगाधर यशवंत चंद्रचूडाचें अपमानकारी कारस्थान बाईनें ओळखिलें, इत्यादि लोकप्रसिद्ध प्रवाद खरे असोत, नसोत, नाना व महादजी बाईला वचकत असत, हें खरें आहे. ती बाई संपुटांत येणारी नव्हे, इत्यादि प्रकारचे महादजीबाव शिंद्यांचे उद्गार काव्येतिहासांतील पत्रांत स्पष्ट उल्लेखिलेले आहेत. असो; ही तेजस्विता, देवी अहिल्येची व्यक्तिविषयक इभ्रत वाढविण्याला कारण झाली, हें विसरतां यावयाचें नाहीं. इंदूर संस्थानची व्यवस्था आपल्या मर्जीनें च चालली पाहिजे, तेथें इतरांनीं ढवळाढवळ करितां उपयोगी नाहीं. हा बाईचा कटाक्ष

शेवटपर्यंत बहुतेक निराबाध राहिला. मात्र यायोगें व्यक्तिमाहात्म्य वाढलें; पण संस्थानचें अथवा साम्राज्याचें हित न होतां अहित मात्र पुष्कळसें झालें. एका व्यक्तीच्या प्रभावानें समाज उन्नत अथवा अवनत होत नाहीं, असा सर्वसाधारण नियम करण्याचें धाडस, मला वाटतें 'पुरुषोत्तम' करितात. हा सिद्धांत सर्वथा खरा हि नाहीं व खोटा हि नाहीं राष्ट्राला किंवा समाजाला राजा किंवा लोकनायक उत्कर्ष अथवा अपकर्ष शकतो कीं नाहीं, हा ग..ल क्लिष्ट वाद आहे. ' पुरुषोत्तम ' हे स्पेन्सरादि तत्त्वज्ञांच्या पंथांतील आहेत. कार्लाइल नामक सामाजिक तत्त्वज्ञाचा पंथ स्पेन्सरविरोधी आहे. आपल्याला या वादाशीं सध्यां इतकें च करावयाचें आहे, कीं देवी अहिल्याबाईचा स्वविषयक व स्वसंस्थानविषयक अभिनिवेश इंदूर संस्थानाला व मराठी साम्राज्याला अपकर्षक झाला कीं नाहीं, हें पहावयाचें आहे. इतिहाससंग्रह वर्ष ७ अंक १–२ यांमध्यें फौजसरंजाम संबंधीं माहिती दिली आहे. १७७२–७३ सालीं होळकरांस फौजेसाठीं ७३८२ हजारांचा, १७७५–७६ सालीं ७८३८ हजारांचा आणि १७८१–८२ सालीं ८३५६ हजारांचा सरंजाम तोडून दिलेला होता. हा फौजसरंजाम १५००० स्वार बाळगावे एतदर्थ होता. सरंजाम ७३ लक्षांचा असो, वा ८३ लक्षांचा असो, देवी अहिल्याबाईचें म्हणणें असें कीं, स्वारीशिकारीचा सर्व खर्च यांतूनच्याबाहेर निघावा; आणि आपल्यास मिळालेल्या सरंजामाची बचत व्हावी. मला वाटतें, 'पुरुषोत्तमास ' हें म्हणणें मान्य आहे. पृ. १६२ मध्यें 'पुरुषोत्तम' म्हणतात '**प्रजेच्या हितास्तव** ... तुकोजींच्या द्रव्यमागणीचा ' प्रतिकार ( बाईला ) करावा लागे. ' या वाक्याचा अर्थ कळणें अमळसें जड च आहे. तुकोजीराव पैसे मागत, तेव्हां त्यांचा पुरवठा करण्यासाठीं संस्थानच्या प्रजेवर जास्त कर बसवावा लागला असता, अशी जर ' पुरुषोत्तमा'ची विचारसरणी असेल, तर ती दूषित आहे, असें मला कष्टानें म्हणावें लागतें. ७३ किंवा ८३ लक्षांची जहागीर १५००० फौज बाळगण्यासाठीं दिली होती, संचय करण्यासाठीं किंवा दानधर्म करण्यासाठीं नव्हे. पाऊण कोटीची जहागीर असतां फौजेच्या खर्चासाठीं प्रजेवर जादा कर आकारण्याचें कारण च नव्हतें. हें कारण पुढें करणें म्हणजे पाऊण कोट रुपये आपल्या मालकीचे आहेत, यांचा संचय करावा किंवा दानधर्म करावा, आपण सर्वथा स्वतंत्र आहोंत, असें मानणें आहे. नानांचें किंवा महादजींचें म्हणणें हें कीं, होळकरांनीं १५००० फौज नित्य ताजी ठेविली पाहिजे; आणि हें म्हणणें रास्त होतें. ८००० फौज ठेवण्याबद्दल पटवर्धनास २४ लक्षांची जहागिर होती. म्हणजे सगसगीनें दर स्वारास सालीना ३०० रु. मिळावे अशी योजना होती. होळकरांस स्वारामागें सालीना ५०० रुपयांच्या आंतबाहेर मुशाहिरा अथवा शेरा मिळे. मग तक्रार कां असावी ! पत्र नंबर ९२ मध्यें केसोपंत बाईस स्पष्ट म्हणाले " **आपला भर दौलतविर नाहीं, दानधर्म, ब्राह्मणभोजन, शिवालय, हें च करितां** " हा खरा प्रकार आहे. सरदारीसाठीं कांहीं महालांची व्यवस्था तुकोजीरावांनी करावी व त्यांतून फौजेचा खर्च

भागवावा अशी व्यवस्था उभयतांच्या संमतीनें झाली होती. म्हणून काय झालें ! स्वारीशिकारीला एखादे वेळीं जास्त खर्च होऊं लागला, तर त्याचा विचार च करावयाचा नाहीं आणि दानधर्मादि रूपानें कमी पडूं द्यावयाचें नाहीं, असा देवींचा विचार ' मूले कुठारः ' या न्यायानें दूषित होता. देवींनीं दानधर्म मोठा केला, याबद्दल त्या स्तुतीला पात्र आहेत. या दानधर्मानें कदाचित् देवींना स्वर्गलोकीं व क्वचित क्वचित या लोकीं धन्यवाद होण्याचा संभव होता. पण या धन्यवादाच्या मुळाशीं जो दानधर्म तो मराठी साम्राज्य बुडविणाऱ्या कारणांपैकीं एक कारण आहे हें विसरतां यावयाचें नाहीं. नानांचें काय, त्यांच्या हस्तकाचें काय. १७८२ पर्यंत पाटिलबोवांचें काय, अंतःकरण मराठी साम्राज्यासाठीं तिळतिळ तुटे. ते आपलें सर्वस्व साम्राज्यसंरक्षणार्थ कराव्या लागणाऱ्या युद्धाग्निहोत्रांत–ते ते लोक आपलें सर्वस्व–होमिण्यास तयार होते आणि इंदूरचें संस्थान हें आपल्या मालकीचें आहे, संस्थानांतून बाहेर जाणारा प्रत्येक पैसा अनाठायीं जातो, अशी बाईंची समजूत होती। ही समजून व तदनुसार बाईंचें वागणें हें साम्राज्याला विघातक झालें, हें मला विशेषतः सांगावयाचें आहे.

( ३ ) १८ व्या शतकांत मराठ्यांचें साम्राज्य होणें शक्य होतें किंवा नव्हतें, हा प्रश्न अगदीं स्वतंत्र आहे. साम्राज्याची संघटना होण्याला सरदारांची, फौजेची, अधिकाऱ्यांची व प्रजेची जी मनःसंस्कृति असणें व होणें अत्यंत अवश्य होतें, ती संस्कृति १८ व्या शतकांत होती कां नाहीं किंवा झाली असती कीं नाहीं, हा हि प्रश्न अगदीं वेगळा आहे. येथें सामग्र्यानें या प्रश्नाचा ऊहापोह करण्याचें धाडस मी करीत नाहीं. तथापि, एकदोन गोष्टी मला उल्लिखित कराव्याशा वाटतात, त्यांचा कमी अधिक विस्तारानें मी येथें विचार करीत आहें.

(अ) मराठे हे स्वभावतः सालस, राजनिष्ठ व धर्मनिष्ठ आहेत. ज्या पुरुषावर अथवा ज्या पद्धतीवर त्यांची निष्ठा असते, त्या पुरुषाचें अथवा पद्धतीचें अनुवर्तन करण्यास ते बहुधा तयार असतात. शिवाजी, रामदास, राजाराम–प्रभृति १७ व्या शतकाच्या उत्तरार्धांतील नायक, बाळाजी विश्वनाथ प्रभृति पहिले चार पेशवे यांनीं जेव्हां जेव्हां साम्राज्यासाठीं स्वार्थत्याग करावयास सांगितला, त्या त्या वेळीं मराठ्यांच्या बहुतेक सरदारांनीं व मराठी प्रजेनें तो तो स्वार्थत्याग साम्राज्यप्रीत्यर्थ केला आहे. साम्राज्याचें रहस्य लक्ष्यांत आलें नव्हतें, तेव्हां प्रथम प्रथम श्रीपतरावप्रतिनिधीसारख्या विचारी पुरुषांनीं विरोध केला. परंतु त्यांची खात्री पटतांक्षणीं प्रतिनिधींनीं कोंकणांतील मसलतीचा पुढाकार घेतला व शूर रघोजी भोसल्यानें बाळाजी बाजीरावाचें उत्कृष्ट साह्य केलें. शिंदे होळकरांची दुक्कल म्हणजे ते उत्तर हिंदुस्थानांत क्षणशः व कणशः वाढत जाणाऱ्या मराठी साम्राज्यमंदीराचे आधारस्तंभ होते. यांनीं उत्तरेकडे जी पराक्रमी कामगिरी केली आहे, तिचें कौतुक करावें, तेवढें थोडें च आहे. वीरशिरोमणी थोरले मल्हारराव सुभेदार लढरी,

दनावळे आणि आडमुठे ना, फौजेसाठीं व दरबारच्या डौलासाठीं लागणारें द्रव्य वजा करून बाकीपैकीं कांहीं लाख रुपये साम्राज्याच्या केंद्रस्थानीं असणाऱ्या पेशव्याकडे पाठविण्याच्या कामीं जड हाताचे मल्हारराव दुर्लक्ष्य करीत ना ! पण पेशव्यांची खर्चाच्या संबंधानें तारांबळ झाली आहे, असें पाहतां च विष्णु महादेव गद्रे यांच्या करवी ३० लाख रुपये त्यांनीं पेशव्यांच्या पदरांत टाकिले. होळकर, शिंदे नर पहिल्या तीन पिढ्या 'अर्थेन प्राणेन च' मराठी साम्राज्यासाठीं मेहनत करीत होते. स्वतःला कर्जबाम करून हि पटवर्धनांनीं पेशवाई अखेरपर्यंत साम्राज्याची सेवा एकनिष्ठपणें केली आहे. आमची मराठी प्रजा आडमुठी ना ! हल्लींच्या जर्मन कायसरनें विश्वस्वातंत्र्याच्या मानेवर सुरी ठेवून चालविलेल्या घनघोर युद्धांत इंग्लिश, फ्रेंच, बेल्ज्यमस, अमेरिकन यांच्या स्वार्थत्यागाचें आपण कौतुक करितों नव्हे ! पण शकाराप्रमाणें भोंदया व स्वार्थी, आपमतलबी पण चाइलबुद्धया राघोबादादानें प्रत्यक्ष आपल्या पुतण्याचा खून करून व करवून महाराष्ट्रधर्माला आणि विश्वनीतीला आणि शिष्टत्वाला तिलांजली दिली; आणि स्वोपभोगाच्या दुष्ट लालसेप्रीत्यर्थ मराठी साम्राज्याला दिगंबर करण्याचा दुष्ट प्रयत्न केला, त्या वेळीं दरखदार व मराठी प्रजा यांनीं एकमत करून पहिले वर्षी आपलें वार्षिक उत्पन्न व नंतर आपल्या उत्पन्नाचा १/२ कित्येक वर्षेपर्यंत साम्राज्याला अर्पण केला आणि मराठी फौज उपाशी पोटानें कित्येक वर्षेपर्यंत लढली, या हि गोष्टी विसरण्यासारख्या नाहींत. अंताजीपंतासारखे, सखारामबापूसारखे कांहीं दुटप्पी पथके व मुत्सद्दी असत. कबूल आहे. तथापि 'महाराष्ट्रधर्म वाढवावा । जिकडे तिकडे ॥' ही रामदाससमर्थांची वाणी आणि 'सा सुमे दक्षिण सोडवावी,' हा गर्भस्थ साम्राज्याचा नानासाहेबोक्त मंत्र जोपर्यंत मराठ्यांच्या कर्णरंध्रांत घुमत होता, तोंपर्यंत किरकोळ पथक्यांस व प्रसिद्ध मुत्सद्यांस न जुमानतां मराठ्यांनीं आपल्या विचारांचें, भावनांचें व कर्तबगारीचें सुकाणु साम्राज्यमंदिराकडे एकनिष्ठेनें लाविलें होतें, यांत शंका नाहीं. येथें १८ व्या शतकांतील मराठी साम्राज्यांत व २० व्या शतकांत पूर्णत्व पावणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यांत थोडें फार साम्य मला दिसतें, त्याचा निर्देश करितों. पोट भरण्यासाठीं, व्यापार वाढविण्यासाठीं, देश पाहण्यासाठीं १६ व्या शतकापासून आज-पर्यंत ग्रेटब्रिटन व आयर्लंड येथील लोकांनीं देशत्याग करण्याचा प्रघात सुरू ठेविला आहे. या लोकांस 'अटक' अशी कोठें च नाहीं. हे लोक नऊ खंडांस पुरून उरले आहेत. श्रेष्ठ संस्कृतीचे असल्यामुळें आणि ब्रिटिश सरकारचा त्यांस आश्रय असल्यामुळें ते जातात तेथें आपला वचक बसवितात. व्यापाराच्या सोयीसाठीं आणि जीवजीवनाच्या रक्षणासाठीं त्या त्या वसाहतवाल्यांस शस्त्र धारण करावें लागतें. शेवटीं ते जेथें जेथें गेले आहेत, तेथें तेथें त्यांनीं तत्रस्थ लोकांस जिंकून अथवा वठवून आपलें स्वराज्य स्थापिलें आहे. प्रथम प्रथम ब्रिटिश सरकारनें या वसाहती-कडे फारसें लक्ष्य दिलें नाहीं. परंतु हीं स्वराज्यें भरभराटीला येऊं लागलीं, तसतसा

ब्रिटिश राज्य व हीं स्वराज्यें, यांमध्यें कोणता संबंध असावा, अशी वाटाघाट झाली. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत या वाटाघाटीला विपरीत स्वरूप येऊन अमेरिकेंतील वसाहतवाल्यांनीं इंग्लिश प्रधानमंडळाचा व तिसऱ्या जार्जाचा कटाक्ष पाहिला आणि १८ व्या शतकाचा तिसरा प्रहर लोटला न लोटला तों लढाई करून आपलें स्वातंत्र्य सिद्ध करून घेतलें. पुढें १९ व्या शतकांत इंग्लिश सरकार शहाणें झालें आणि बोअरवारचा अनुभव आल्यानंतर अखिल ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणासाठीं ठराविक नियम करण्याचा विचार सध्यां इंग्लंडांत चालू आहे. इंग्लंडच्या वसाहती ह्या कन्या आणि इंग्लंड ही माता हा संबंध आहे व तो चिरस्थायी व्हावा असा प्रयत्न सुरू आहे.

मोगल बादशाहीची सत्ता दक्षिणेंतून उखणून काढावयाची ही राजाराम-कालीन मसलत म्हणजे शिवराजाच्या स्वराज्याची सुधारून वाढविलेली आवृत्ति होय. धनाजीसंताजीनंतर बाजीराव पेशवे मराठ्यांचे कर्ते नायक झाले. कायदेशीर नायक शाहू महाराज आणि कर्ते नायक बाजीराव असा विभाग झाला. सिंहाच्या दरींत शिरून तेथें च त्याला नेस्तनाबूद करण्याची अथवा मोगली सत्तावृक्षाच्या मुळावर कुऱ्हाड चालविण्याची कल्पना प्रथम व्यवस्थित रीतीनें उच्चारणारा बाजीराव होय. यानें शिंदेहोळकरांस हातांशीं धरून हिंदुस्थानांत म्हणजे नर्मदेच्या उत्तरेस असणाऱ्या प्रांतांत मराठ्यांचीं ठाणीं बसविण्यास आरंभ केला. या च मराठ्यांच्या वसाहती होत. शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, नागपूरकर भोसले वगैरे घराणीं हिंदुस्थानांत शिरलीं तीं वस्तुतः कायमचीं च झालीं. शिवाय, नारो शंकर राजे बहादूर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, गोविंद बल्लाळ बुंदेले, रघुनाथ हरी झांशीकर वगैरे जहागिरदारवजा सुभेदार, मुसकुद्यांसारखे अमलदार उत्तर हिंदुस्थानांत साम्राज्यसत्ता वाढवीत च होते. असो, या वसाहतींच्या नायकांचे व मुख्य सत्तेचे संबंध प्रथमपासून च ठरलेले असत. त्यांत आपआपल्या प्रांतांचें संरक्षण करून सातारचे राजे अथवा पुण्याचे पेशवे म्हणजे केंद्रस्थानी असणारी मुख्य सत्ता जिकडे आज्ञापील, तिकडे फौजा घेऊन जावें आणि केंद्रसत्तेच्या संरक्षणार्थ कांहीं ठराविक रकम दरसाल पाठवीत जावी, असा एक नियम असे. परराज्यांशीं व्यवहार करणें तो मुख्य सत्तेला दखल देऊन तिच्या परवानगीनें करावा, हिशेबाचे सालझाडे दरसाल हुजूर पाठवावे आणि वसाहतीचे कारभारी व फडणीस, चिटणीस मुख्य सत्तेच्या शिफारशीस अनुसरून नेमावे अशीं हि कांहीं कलमें होतीं. तात्पर्य, हल्लीं ब्रिटिश सरकार जे नियम ठरवूं पहात आहे, त्यांपैकीं कांहीं नियमांचें धोरण बाजीरावांनीं, बाळाजी बाजीरावांनीं व थोरल्या माधवरावांनीं ठरविलें होतें. तसें च वसाहतीवर परचक्र आल्यास साम्राज्यानें त्याचें निवारण करावें हा हि नियम १७८७–८९ सालीं प्रत्ययांत आला.

ह्या प्रश्नाची भवति न भवति येथें करण्याचें स्थळ नव्हे. उल्लेख येवढ्याकरितां च केला कीं देवी अहिल्याबाई व इतर साम्राज्यघटक यांस साम्राज्याचा अभिमान होता, गादीविषयीं प्रेम होतें, तरी १८ व्या शतकाच्या परिस्थितींत च अशा कांहीं गोष्टी

हीत होत्या कीं, त्यांनीं मराठ्यांच्या साम्राज्यघटनेचा प्रतिरोध करून ती नामशेष करावी. या मीमांसेच्या दृष्टीनें प्रत्येक इतिहासभक्त महेश्वरचीं पत्रें, भाग २ मधील सर्व पत्रें व विशेषतः लेखांक १२, ३८, ६६, ७७, ९२, ११६, ११७, १२८, १३१, १७१, १८२ हे वाचील, तर साम्राज्याच्या मार्गांत कोणत्या बलवत्तर अडचणी होत्या, हें त्यास समजेल. ( १ ) मुख्य गोष्ट ही कीं, राघोबाच्या आगलाव्या बंडापासून, पेशवे घराण्या संबंधें जो कांहीं एक अपूर्व पूज्य भाव होता, तो कमी होत चालला. पेशवे म्हणजे देव ही भावना १७७४ सालीं नष्टप्राय झाली. ( २ ) प्रत्येक सरदाराला व सेनापतीला आपण स्वतंत्र व्हावें अशी अवेदांनी इच्छा उत्पन्न झाली. हवा तसा धर्मासाठीं पैसा खर्च करणारी देवी अहिल्याबाई जेव्हां पेशव्यांच्या जासुदास योग्य शिधापाणी देईनाशी झाली, पेशव्यांच्या सरकारी वकिलास व बातमी-दारास उपेक्षेनें वागवूं लागली, तेव्हां च स्वार्थ बळावल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. ( ३ ) घटकांमध्यें परस्परांविषयीं मत्सर उत्पन्न झाला. शिंदेहोळकरांमध्यें फूट पड-ण्याला १७५२।५३ मध्यें सुरुवात झाली होती. इतिहास–समर्थ राजवाड्यांनीं जे कित्येक खंड छापले आहेत त्यांतील राघोबाचीं व गोविंदपंताचीं पत्रें पाहावीं, म्हणजे ही फूट १७५२ पासून च पडूं लागली होती, असें दिसेल. कुंभेरीच्या वेढ्याच्या प्रसंगीं च सटका उडण्याची वेळ आली होती. तथापि बाळाजी चतुरस्र, त्यानें हा प्रसंग निभा-वून नेला. १७७८–७९ मध्यें तुकोजी होळकरांनीं राघोबाच्या असत्पक्षाचें मंडन करून आपली शोभा करून घेतली. शिंद्यांनीं सत्पक्षाला आपला पाठिंबा देऊन आपलें वर्चस्व स्थापिलें; आणि या वेळीं च होळकरांचें अग्रेसरत्व नाहींसें झालें, ही गोष्ट देवी अहि-ल्याबाईस सहन होईना. तिच्या सात्विक अंतःकरणांतील साम्राज्याच्या संरक्षक अभि-मानाचें बीज होळकरशाहीच्या स्वार्थी उष्णतेनें बहुतेक करपून गेलें; आणि राघो-बाच्या बंडाचा बीमोड करितांना महादजीनें सत्पक्षाचें साह्य करून जो सन्मान मिळ-विला, तद्विरुद्ध तिच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला. रा. ब. पारसनीस यांनीं आपल्या ऐतिहासिक टिपणांच्या तिसऱ्या भागांतील नवव्या पृष्ठावर नाना फडणीसांचें नागो शिवदेवास लिहिलेलें पत्र छापिलें आहे. त्या पत्रांत पटवर्धन, रास्ते आदि सरदारांनीं ' अर्थप्राणें करून ' मराठी साम्राज्यावर राघोबानें फेंकलेल्या वज्राचा प्रतिकार करण्यासाठीं कसे श्रम केले, हें स्पष्ट झालें आहे. एक शिंदे आणि होळकर यांनीं मात्र टाळाटाळ केली, असें पत्रांतील शब्दार्थांच्या झोंकावरून दिसतें. तसें च वरती ज्या पत्रांचा उल्लेख केला आहे, त्यांत देवी अहिल्याबाईचा मत्सर आणि इंदूर संस्थानची मातब्बरी यांचें प्रदर्शन पदोपदीं होत आहे. नानांच्या प्रेरणेनें व संमतीनें पाटिलबोआंनीं दिल्ली प्रकरणांत हात घालून अनाथ झालेल्या बादशहाला आश्रय देऊन गुलामकादराचा व रजपुतांचा खरपूस समाचार घेतला आणि साम्राज्याची इभ्रत वाढवितांना शिंदेशाहीचें प्रस्थ वाढविलें, ही गोष्ट बाईस फारशी पसंत पडली नाहीं, इतकें च नव्हे; तर उलटपक्षीं या प्रतिकाराचा प्रतिरोध करण्याचा प्रयत्न करण्याची हि त्यांची तयारी होती, हें उघड दिसत आहे. ' पुरुषोत्तमाच्या अजमासाप्रमाणें बाईजवळ ३०।३५ लाख रुपये शिल्लक असतां,

१५

होळकर पाऊण कोटीची जहागीर खात असतां हि सवाई माधवरावांच्या लग्नमंगल-प्रसंगीं दोन लाख रुपयांची वाटणी देण्याला बाईनीं ६।७ महिने लाविले, तुकोजी महाराज पेशवाईसाठीं टिपूशीं लढत असतां त्याला बाईनीं योग्य वेळीं मदत केली नाहीं, दानधर्म करण्याला बाईजवळ मुबलग पैसा असून हि दिल्ली प्रकरणीं तुकोजीला बाईनीं साह्य केलें नाहीं इत्यादि कित्येक अनेक गोष्टींवरून मला असें च अनुमान काढणें भाग पडतें कीं, स्वशुर मल्हारराव सुभेदारांप्रमाणें च ( देवी अहिल्याबाई च. पृ. ६९ ) बाईचा हात भारी जड असे. तात्पर्य, शिंद्यांप्रमाणें च देवी अहिल्याबाईची साम्राज्यप्रीति मंदावली होती; आणि साम्राज्याच्या मंदिराला जमीनदोस्त करण्याचें अपयश ज्यांच्या माथीं मारण्याचें दुर्दैव ऐतिहासिक लेखकांच्या कपाळीं येतें, त्यांच्या यादींत देवी अहिल्याबाईचें नांव अत्यंत कष्टानें घालावें लागतें.

१८ व्या शतकांत जहागिरींचा सुळसुळाट झाला म्हणून साम्राज्य बुडालें, मराठ्यांची राजकीय संस्कृति कमी दर्जाची, म्हणून हा प्रसंग ओढवला, वगैरे मराठी साम्राज्याच्या अधःपाताचीं कारणें देण्यांत येतात. पूर्वकालांतील अलेक्झांडरनें स्थापिलेल्या साम्राज्याचा अधःपात कां झाला ! त्या वेळीं तर जहागिरी नव्हत्या ना ! ख्रिस्ती शकाच्या पूर्वीच्या व नंतरच्या रोमन बादशाहीचे धिंडवडे कां निघाले ! अकबर बादशाहीचा अंमल सुरळ होता ना ! मग १६५६ पासून १६९२ पर्यंत अकबराला सैन्य घेऊन सर्व हिंदुस्थानभर वणावणा करीत कां हिंडावें लागलें ? या सर्व ठिकाणीं जहागिरी, वंशपरंपरेच्या जहागिरी नव्हत्या. तेव्हां जहागिरींनीं मराठी साम्राज्य बुडविलें, असें ठासून विधान करण्यापूर्वी या पद्धतीविरुद्ध खासा पुरावा मिळाला पाहिजे. जहागिरी असून हि कालस्थलांचें अंतर कमी करणारीं तारायंत्रें व आगगाड्या असत्या तर व मुख्य सरकारची देखरेख चांगली कसोशीची असती तर, १८ व्या शतकांतील जहागिरींनीं घटित असलेलें हि मराठी साम्राज्य चिरकाल राहिलें असतें. (१) देखरेख चांगली ठेवणें हें स्वाधीनचें काम होतें. पण १९ व्या शतकांत जन्म पावलेलीं कालस्थलनियामक साधनें १८ व्या शतकांत असलीं पाहिजे होतीं, असें म्हणणें अमळसें चमत्कारिक च होय. (२) १८ व्या शतकांतील मराठ्यांची राजकीय संस्कृति, हिंदुस्थानांत प्रकट झालेल्या तत्कालीन इंग्लिशांच्या संस्कृतीहून फारशी कमी दर्जाची नव्हती. लॉर्ड क्लाइव्हच्या व वारन हेस्टिंग्सच्या वेळीं द्रव्यार्थी इंग्लिश व्यापारी अधिकारी झाले तेव्हां, १७७५–७६ सालीं कलकत्ता–सरकाराविरुद्ध मुंबई सरकारानें बरी च खळबळ केली तेव्हां, मुख्य सरकारचा अमल झुगारून देणाऱ्या मद्रासी गव्हर्नराला कैद करण्याचा प्रसंग आला तेव्हां, कित्येक इंग्लिशांनीं आपल्या राजकीय संस्कृतीचें जें प्रदर्शन केलें, तें पाहिलें असतां आमचे रघोजी भोसले, दमाजी गायकवाड, महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, देवी अहिल्याबाई वगैरे फार उच्च दर्जाचीं मानवरत्नें होतीं, असें च म्हटलें पाहिजे. त्या वेळीं कित्येक इंग्लिशांत जो स्वार्थाचा अभिनिवेश दिसे तो आमच्या या पूर्वोक्त मंडळींत फारसा व पदोपदीं दृग्गोचर झाला नाहीं. साम्रा-

ज्याचा कानमंत्र सांगतां च वरील बहुतेक मंडळी मुत्सद्देगिरीच्या कल्पनेत येऊन दाखल झाली. तथापि ज्या स्वराज्याच्या अभिनिवेशानें शिवाजी महाराज प्रेरित झाले तो स्वराज्याभिनिवेश व ज्या साम्राज्याच्या अभिनिवेशानें धनाजी पासून तों नाना फडणीसापर्यंतचे वीर व मुत्सद्दी प्रेरित झाले तो साम्राज्याचा अभिनिवेश जर रघोजी प्रभृति वीर मुत्सद्यांस व मुत्सद्दी वीरांस स्ववश करिता, तर मराठी साम्राज्याचा विध्वंस करण्याला इंग्लिश सरकारला हि भगीरथ प्रयत्न करावे लागले असते. असो; साम्राज्य बुडविण्याला मराठेतर हिंदूंची असंस्कृति पुष्कळ अंशीं कारण झाली आहे.

सामान्यतः पाहिलें असतां मराठ्यांमध्यें शिस्तीचा भाग अमळसा कमी म्हटला तरी चालेल. शिवकालीन म्हणून जो पत्रव्यवहार रा. राजवाड्यांच्या अश्रांत परिश्रमानें मिळत आहे व प्रसिद्ध होत आहे, तो पाहिला असतां वतन मिळविण्यासाठीं व मिळालेलें वतन राखण्यासाठीं भांडतांना कित्येक कुटुंबें तें वतन च गमवून बसलीं आहेत असें दिसतें. कुटुंबाकरितां व्यक्ति, ग्रामाकरितां कुटुंब, सोडिलें पाहिजे, हा आमच्या मर्दांनी वेदांताचा कानमंत्र, वेदांत बोलणाऱ्या व भक्तीचे अभंग आणि स्तोत्रें म्हणणाऱ्या महाराष्ट्रांत फारसा रुजला नाहीं आणि म्हणून समाजानें राजाचे, कुटुंबानें समाजाचे आणि व्यक्तीनें कुटुंबाचे युक्तिसिद्ध बोल ऐकले पाहिजेत, हा जो शिस्तीचा नियम तो फारसा पाळला गेला अथवा अद्यापि हि पाळला जातो असें दृग्गोचरत्तीला येत नाहीं. अर्थात च शिवाजी महाराज, श्रीरामदास समर्थ, धनाजी संताजी, बाळाजी विश्वनाथ आणि त्याचे पुत्र, पौत्र व प्रपौत्र यांच्या नेतृत्वाला तो तो मराठी समाज मान्य झाला, हें एक आश्चर्य च आहे. मराठ्यांच्या भाल्याचें पाणी तिखट, पण पुष्कळ वेळां तें पाणी, बाजीरावाच्या अभावीं स्वतःची इभ्रत व ऐश्वर्य वाढविण्याकडे खर्च होई. उंबजचे जाधव, बाजी घोरपडे, उदोजी चव्हाण, त्र्यंबकराव दाभाडे, पिलाजी गायकवाड, मुधोजी भोसले, सर्जेराव घाटगे, यशवंतराव होळकर यांपैकीं प्रत्येक मराठा नामांकित वीर होता व मराठ्यांचा नायक होण्याच्या योग्यतेचा होता. परंतु केवळ शिस्तीचा अभाव म्हणून, इतिहास या वीरशिरोमणींचा बोलबाला करीत नाहीं. कृष्णराव खटावकर, श्रीपतराव प्रतिनिधि, रघुनाथरावदादा, सखाराम बापु, मोरोबादादा फडणीस, नारो गणेश, बाळोबा तात्या पागनीस या मुत्सद्यांपैकीं प्रत्येक पुरुष राजकार्यधुरंधर होता. वेदांताचें, भक्तीचें, साम्राज्याच्या शिस्तीचें रहस्य यांपैकीं प्रत्येकाला कळत होतें. परंतु दुर्दैवाची गोष्ट कीं तें सूत्र वळलें नाहीं आणि हीं मानवरत्नें देवांच्या पंक्तीस बसावयाचीं तीं शुक्रशिष्यांच्या म्हणजे दानवांच्या पंक्तीला जाऊन बसलीं! आमचा बाकीचा मराठा समाज स्वाभिमानी, पण भोळा, सालस आणि शूर. जोंपर्यंत शिवाजीची भवानी तलवार, रामदासाची

समर्थाचिया सेवका वक्र पाहे
अत्ता सर्व भूमंडळीं कोण आहे ।

ही भीषण गर्जना, धनाजीसंताजींचा माला, रामचंद्र नीळकंठाचा कारभार, बाळाजी प्रभृतींचें राजनीतिचातुर्य हीं सर्वकष असत, तोंपर्यंत नेनाजी प्रभृतींची, परशुराम त्र्यंबकाची, पिलाजी जाधवरावाची, पुरंदऱ्यांची, पटवर्धनांची काळ्यांची, राजनिष्ठा, स्वामिनिष्ठा स्वराज्याला, साम्राज्याला उपकारक होई; आणि चंद्रराव मोरे, कचजी, ताराबाई, नाईक, मानाजी फाकडे, सखाराम वगैरेंची सरशी झाली म्हणजे साम्राज्याचें तारूं स्वार्थाच्या खडकावर आपटून त्याच्या चिंधड्या होण्याचा प्रसंग ओढवे. हे प्रसंग टाळण्यासाठीं च शिस्तीचें राज्य हवें होतें. स्वराज्याच्या प्राप्तीसाठीं राजनिष्ठा आणि साम्राज्यघटना प्रसंगीं स्वामिनिष्ठा व नायकनिष्ठा अव्यंग असती, तर 'ऐसीं पत्रें (साम्राज्याच्या मसलतीचीं) हजारों येतात' (ले. १२) हे बोल; 'श्रीमंतांचे (साम्राज्याचे) दौलतींत यांची (होळकरांची) दौलत या महावाक्याचा विसर' (ले. ३८); 'सरकार चाकरी न घडतां विदेहीपणाच्या गोष्टी' (ले. ६२); 'खर्चाची (तुकोजीला ऐवज पुरविण्याची) सोय आजची उद्यांवर' (ले. १८२); असा प्रकार धर्मनिष्ठ देवी अहिल्याबाईच्या हातून झाला च नसता. १७७५–१७८० पर्यंत साम्राज्यासाठीं हाडांचीं काडें करणारे धीरमणी, राजकार्यधुरंधर पाटीलबोआ १७८१ सालापासून विक्षेपाचीं व 'अन्यच्छायेस' जाण्याचीं (काव्येतिहाससंग्रह, साल्बाई प्रकरण) बोलणीं बोलूं लागले नसते, तर १७८२–१७८३ मध्यें जो साल्बाईचा तह झाला, त्याचें स्वरूप फार निराळें झालें असतें. देवी अहिल्याबाई व पाटीलबोआ हे मराठी साम्राज्याचे आधारस्तंभ. हे जर साम्राज्यकार्यदक्ष असते, तर मॅकफरसन साहेबांचा अपमानी म्हणजे मराठ्यांच्या सर्वव्यापी चौथाईचा व सरदेशमुखीचा उपमर्द करणारा संदेश पाटिलबोआंस ऐकावा लागता ना. असो; तात्पर्य हें आहे कीं,

राया! कुलार्थ पुरुष, ग्रामार्थ कुल, समस्त सोडावें ।
ग्राम हि देशार्थ, मही आत्मार्थ, बुधें भलेंचि जोडावें ॥

हा राजकार्यधुरंधर वेदांती विदुरानें राजा धृतराष्ट्रास उपदेश केला, तो शिस्तीचा उपदेश आम्हा मराठ्यांतील कांहीं वीरांनीं व मुत्सद्यांनीं ऐकिला नाहीं व अद्यापि हि ऐकत नाहींत. आमच्यासारख्या सामान्य मराठ्यांत जो शिस्तीचा भाग अंतःकरणामध्यें गूढ आहे, तो बाहेर काढणारे व आपण स्वतः शिस्तीचे नियम पाळणारे दादाजी कोंडदेव, रामशास्त्री प्रभुणे हे कमी आणि पाटिलबोवांसारखे, देवी अहिल्याबाईसारखे स्वतःचा च हेका व्यावहारिक कार्यांत चालविणारे जास्त झाले व होत आहेत, हें आपण सर्वांनीं पाहावयाचें आणि या बेशिस्तीचा प्रतिकार करावयाचा, हें आपलें कर्तव्य होय असें मला वाटतें.

साम्राज्य चालविण्यास व वाढविण्यास अवश्य असणारें द्रव्य साम्राज्यचालकांजवळ नव्हतें म्हणून व नायकांच्या धर्मनिष्ठेचा उपयोग साम्राज्याला झाला नाहीं

म्हणून शूर, धाडसी, धर्मनिष्ठ, प्रागतिक मराठ्यांचें साम्राज्य सांगोपांग पसरलें नाहीं व जी कांहीं इमारत झाली होती, ती टिकली नाहीं, असें मला वाटतें. मराठ्यांची युद्धपद्धति शत्रूंस जाचक असे, प्रजेला ती उपकारक होई. त्यांची राज्यपद्धति सुसह्य असे. राजसत्तेच्या अभावी किंवा सुराजसत्ता नसेल तर मराठे अनिवार होतात. परंतु जोरदार राजसत्ता असेल, तर अंतःकरणपूर्वक राजनिष्ठा बाळगणारे मराठे इतर कोणत्या हि राष्ट्राला हार जाणारे नाहींत. हे स्वभावतः च प्रागतिक आहेत. सामान्यतः ते लोक आपलें शील विकृत होऊं देत नाहींत. यद्यपि त्यांची धर्मश्रद्धा उज्ज्वल स्वरूपाची आहे, तथापि राजकीय अथवा सामाजिक अन्याय दुःसह झाले च, तर ते अन्याय्य धर्म व जुलमी सत्ता यांचा प्रतिरोध करण्यास ते लवकर सिद्ध होतात. अफजलखानाचा वध आणि राघोबाच्या बंडाचा प्रतिकार, हीं मराठ्यांचें शील दाखविणारीं उत्तम उदाहरणें आहेत. मात्र या मराठ्यांस नायक अथवा सूत्रधार चांगले जोरदार, स्वतः शिस्त पाळणारे असावे, अशी अपेक्षा असते. नायक चांगले असतील तर हे मराठे तानाजीचें, बाजी देशपांड्याचें, गणोजी शिर्क्यांचें, पिलाजी जाधवरावाचें, जनकोजी शिंद्याचें, नीळकंठराव सुभेदाराचें अनुकरण आनंदानें करतील; आणि दुर्दैवानें दुर्नायकांची गांठ पडली, तर स्वतःची धर्मनिष्ठा व राजनिष्ठा एकीकडे ठेऊन श्रद्धातिरेकानें हे च मराठे निंबाळकराचें, म्हस-वडकराचें, नायकाचें, बापूचें, दामोदराचें अनुकरण करतील. असो; आमच्या मराठ्यांची उन्नति करणें आहे, तर आमच्या श्रद्धातिरेकाला आळा घालून आमची श्रद्धा गीताकाराच्या म्हणण्याप्रमाणें 'युक्त' केली पाहिजे. अर्थात् आमचा नेता प्रागतिक असून कार्याकार्यविवेकी असला पाहिजे. हें अशा प्रकारचें नेतृत्त्व सुशील, तपस्वी, दयाळु, धर्मजागरूक देवी अहिल्याबाईकडे 'स्वराज्य जगा-वयाचें किंवा मरावयाचें !' अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आलें असतां हि हें नेतृत्त्व मला दिसत नाहीं, हा माझा किंवा केसो भिकाजीचा किंवा नाना फडणिसांचा दोष नसेल, तर मराठ्यांच्या इतिहासांत साम्राज्यदृष्टीनें अहिल्याबाईचें राज्यावरील असणें ही अनिष्ट गोष्ट झाली, हें मला कष्टानें म्हणावें लागतें. त्यातल्या त्यांत ही दुःखकारी आनंदाची एक गोष्ट विसरतां कामा नये कीं, देवी अहिल्याबाई पाटिलबोवाप्रमाणें हट्टी व आपला च हेका शेवटपर्यंत चालविणाऱ्या नव्हत्या. वेळेवर मदत न होवो,पण योग्य विचारा अंतीं त्यांची समजूत पटली म्हणजे त्या, तुकोजीला च काय पण साम्राज्यचालकांस हि मनोभावें सहाय करीत. स्वराज्याच्या दृष्टीनें इंदूरच्या इतिहासांत देवी अहिल्याबाईचें नांव अजरामर राहील, यांत मला शंका नाहीं. धर्मनिष्ठेच्या, धार्मिक औदार्याच्या, शीलाच्या, उपजीवि कठोर तपश्चर्येच्या दृष्टीनें तर त्यांची कीर्ति हिंदुस्थानच्या च नव्हे, तर सर्व जगताच्या इतिहासांत दुमदुमून राहिली पाहिजे, हें सर्व मला कबूल आहे. व्यक्तिदृष्टीनें व संस्थान-सत्ताधारी ह्या दृष्टीनें देवी अहिल्याबाईचें जीवन अमृतासारखें पथ्यकर व हितकर आहे,

यांत बिलकुल शंका नाहीं. या त्यांच्या स्वभावाला जर साम्राज्याच्या घटनेची दूरदेशी दृष्टि संगत झाली असती, तर त्यांचें नांव कर्त्या साम्राज्यसुधारकांच्या मालिकेंत गोंविलें जाऊन देवी अहिल्याबाई सर्वतोपरी सर्वमान्य झाल्या असत्या. असो; हा मानव लोक आहे. येथें शिवाजीसारखा शीलवंत, स्वराज्यसंस्थापक किंवा बाळाजी विश्वनाथा-सारखा विजयशील साम्राज्यसंस्थापक पांच चारशें वर्षांनीं एखादे वेळीं अवतीर्ण होतो," म्हणून देवी अहिल्याबाईच्या अंतःकरणांत साम्राज्य देवी सांग आणि सपरिवार प्रकट झाली नाहीं, एतदर्थ देवी अहिल्याबाईला सर्वथा जबाबदार धरणें योग्य होणार नाहीं.

'अनृतं साहसं माया...' या अन्यायमूलक पद्याला हि सार्थ करणारी आनंदी-बाई पेशवीण त्रिभुवनसुंदरी होती म्हणतात, तशी देवी अहिल्याबाई नव्हती, हा तिचा दोष नव्हे. तद्वत च साम्राज्यभावनेचा लखलखित प्रकाश देवी अहिल्येच्या अंतःकर-णांत प्रकट झाला नाहीं, म्हणून हि देवीला दोष देणें योग्य नव्हे. तथापि मला साम्राज्य-दृष्टीनें अहिल्याबाईची योग्यता ठरवावयाची आहे. येथें गुणदोषाचा प्रश्न नाहीं. योग्य-तेचा शास्त्रोक्त प्रश्न आहे. तेव्हां मला मोठ्या कष्टानें, जी माहिती उपलब्ध झाली आहे तीजवरून पाहतां असें म्हणणें भाग पडतें कीं, साम्राज्य-संघटनेच्या व तत्संरक्षणाच्या दृष्टीनें पाहिल्यास साध्वी, उदार, तपस्वी, व्रतस्थ व स्वराज्यानिष्ठ देवी अहिल्याबाई यद्यपि व्यक्तिदृष्टीनें वंद्य आणि पूज्य आहे. तथापि महाराष्ट्रविधात्यांच्या ( Makers of Maharastra ) मालिकेंत देवी अहिल्येचें नांव मोठ्या कष्टानें हि दिसणाऱ्या दूधणुका इतकें लहान राहील. झालें. माझें म्हणणें आटोपलें. मीं घेतलेला विषय वादग्रस्त आहे. इतिहास–संशोधक मंडळीनें व मंडळाच्या चिटणीसांनीं मला सर्वतोपरी साह्य देण्याचें अभिवचन दिलें, तथापि माझ्या चमत्कारिक अंगदौर्बल्यानें मला माहितीचा उपयोग करून घेतां आला नाहीं, म्हणून माझी माहिती एकांगी आहे. तथापि, साम्राज्यदृष्टीनें हि महाराष्ट्रांत अवतीर्ण झालेल्या विभूतींचा विचार व्हावा या हेतूनें मात्र प्रेरित झाल्यामुळें मीं हा छोटासा लेख लिहिण्याचें धाडस केलें आहे. परमेश्वर करो आणि जास्त माहिती उपलब्ध होऊन देवी अहिल्याबाईसारखें मानवरत्न चिरकालीन कीर्तिमंदिराच्या श्रेष्ठ स्थानीं बसविण्याची प्रेरणा इतिहाससेवकांमध्यें होवो अशी प्रार्थना करून मी लेखणी खालीं ठेवितों.

चिं. गं. भानू

# कांहीं जुनीं पंचांगें.

आमचे उत्साही चिटणीस रा. पोतदार यांनीं बरीं च जुनीं पंचांगें मिळविलीं आहेत. त्यांबद्दल दोन शब्द लिहीत आहें.

या पंचांगांचा उपयोग रा. बा. प्र. मोडक यांची जंत्री तपासण्याचे कामीं होईल. शके १७०५ चें पंचांग, आंकड्यांत लिहिलेलें असून, त्यांत फक्त तिथि, नक्षत्र, योग, यांच्या घटका दिलेल्या आहेत. पंचांगांतील क्षयवृद्धि जंत्रींतील क्षयवृद्धींशीं बरोबर मिळतात. पंचांगांतील तिथि, नक्षत्रें नेहमींसारखीं उभ्या ओळींत लिहिलेलीं नसून, आडव्या ओळींत लिहिलेलीं आहेत. तिथींच्या घटका, पळें तिथिचिंतामणीवरून काढिलेलीं आहेत. शके १७१२ चें पंचांग उभें लिहिलेलें व वार आंकड्यांत जंत्रीशीं बरोबर, असें आहे. शके १७२३ चें पंचांग जंत्रीशीं बरोबर आहे. शके १७२४ चें पंचांग जंत्रीशीं बरोबर आहे. शके १७२७ चे पंचांगांत, क्षय तिथि जेष्ठ शु० ९ आहे, तर जंत्रींत जेष्ठ शु० ८ आहे, बाकी बरोबर. शके १७२८ चैत्र शु० ७ चा पंचांगांत क्षय, जंत्रींत ८ चा क्षय आहे. श्रावण शु० ३ चा पंचांगांत क्षय व १४ ची वृद्धि आहे, हीं जंत्रींत दिलेलीं नाहींत. माघ कृष्ण ११ ची वृद्धि पंचांगांत तर १२ ची वृद्धि जंत्रींत दिलेली आहे. पंचांगांत फाल्गून महिन्याचें पान नाहीं. कुरुंदवाडास जीं पंचांगें मिळालीं आहेत तीं ह्मनीं आल्यास पाठवितों. (त्यांजबद्दल–) कुरुंदवाड येथील पंचांगांशीं पंचांग जुळतें, जंत्रीशीं जुळत नाहीं. शके १७३३ आश्वीन पासून उपलब्ध (अपुरें).

सुबक लिहिलेलें आहे. जंत्रींशीं बरोबर आहे.

शके १७३७ चैत्र कृ० अष्टमी वृद्धि पंचांगांत ९ मीची वृद्धि जंत्रींत.

जेष्ठ शु॥ ७ चा क्षय पंचांगांत, ११ चा क्षय जंत्रींत.

जेष्ट कृ० ३० चा क्षय पं० त, आषाढ शु॥ १ चा जंत्रींत.

श्रावण कृ० १ ची वृद्धि पं०त, २ ची जंत्रींत. आश्वीन शु० ११ ची वृद्धि पं०त, १२ ची जंत्रींत. मार्गशीर्ष कृ० ६ चा क्षय पंचांगांत, ७ चा क्षय जंत्रींत. पौष शु० ७ ची वृद्धि व १५ चा क्षय पंचांगांत, जंत्रींत दोन्ही हि नाहींत. माघ कृ० ५ चा क्षय पं० त, ६ चा क्षय जंत्रीत. (कुरुंदवाडचीं दोन पंचांगें पुण्याच्या पंचांगांशीं मिळतात; जंत्रीशीं मिळत नाहींत.)

शके १७४१ फाल्गुन कृ० १० चा क्षय पंचांगांत ११ चा क्षय जंत्रींत; बाकी जंत्रीशीं बरोबर.

शके १७५१ मार्गशीर्ष शु० १० चा क्षय पंचांगांत— ९ चा क्षय जंत्रींत फाल्गुन कृ० ८ मीची वृद्धि व ९ चा क्षय पंचांगांत, जंत्रींत नाहींत.

शके १७५५, आश्वीन शु० ५ चा क्षय व ६ ची वृद्धि पंचांगांत असून जंत्रींत नाहींत.

शके १७५८–आश्वीनपासून सुरू (अपुरें).

पंचांगांत इंग्रजी तारीख दिली आहे डिसेंबरपर्यंत. मार्गशीर्ष कृ० १ ची वृद्धि पंचांगांत दिली असून जंत्रींत कृ. १ ची वृद्धि आहे.

शके १७५९ च्या वैशाख महिन्याचें एक पान जंत्रीशीं बरोबर, इंग्रजी तारीख आहे. मेची ३१ तारीख न धरल्यानें अमावास्येची तारीख जुळली नाहीं.

शके १७६२ जंत्रीशीं बरोबर, इंग्रजी तारखा नाहींत.

शके १७६३ जंत्रींत पौष हा क्षयमास धरला असून पंचांगांत दिलेला नाहीं. अधिक चैत्रास फाल्गुन म्हटला आहे. या सालचीं दुसरीं पंचांगें मिळविणें जरूर आहे. इंग्रजी तारखा नाहींत. क्षय व वृद्धि जंत्रीशीं मिळतात. ( कुरुंदवाडच्या पंचांगांत हा क्षयमास नाहीं. )

शके १७६४ सालचे पंचांगांत चैत्र अधिक नाहीं. ( कुरुंदवाडच्या पंचांगांत )

शके १७६६ वैशाख नाहीं. चैत्र फाटका.

(अपुरें.) इंग्रजी तारखा दिलेल्या आहेत. पंचांगांत श्रावण कृ० ३ ची वृद्धि आहे. जंत्रींत ४ ची वृद्धि आहे. फाल्गुन मास नाहीं.

शके १७६७ अपुरें, अक्षर फार वाईट.

शके १७६८ पंचांग फार अशुद्ध.

शके १७६९ अधिक ज्येष्ठ कृ० ३ चा क्षय पंचांगांत. ४ चा क्षय जंत्रींत. भाद्रपद कृष्ण ११ वृद्धि पंचांगांत. १२ ची वृद्धि जंत्रींत.

शके १७७० ज्येष्ठ कृ० ३० चा क्षय पंचांगांत, १४ चा क्षय जंत्रींत. माघ कृ० १४ ची वृद्धि पंचांगांत, १३ ची वृद्धि जंत्रींत. पंचांगांत फेब्रुवारीच्या तारखा ३० लिहिल्या गेल्या.

ग. स. खरे

---

## सुरतेची घालमेल.

श्री

सुरतेच्या नबाबपदाच्या घालमेलीसंबंधांचीं सात पत्रें पांडुरलीस बर्वे यांजकडे मिळालीं. त्यांच्या नकला मंडळाकडे दिल्या आहेत. सुरतेचा नबाब तेगबख्तखान वारल्यानंतर, त्याचा जांवई अछन ( मिया अछन ) यानें पेशव्यांशीं सूत्र बांधिलें; व आपला प्रतिस्पर्धी अलीनवाजखान यास हाकलून लावण्याचा प्रयत्न केला. सुरतेच्या हकीकती प्रसिद्ध आहेत, त्यांत या प्रकरणाचा उल्लेख दिला आहे. रा. शास्त्रीबोवा खरे यांनीं ऐतिहासिक लेखसंग्रहांत या बाबतींतील एक पत्र दिलें आहे. आजचीं पत्रें या च बाबतींतील असून तीं, अछनास सुरतेंतून घालवून देण्याविषयीं व अछनच्या मदतीस दिलेल्या लोकांस अछनास सोडण्याविषयीं जरबेचीं दिसतात. या स्वारीसंबंधानें आणखी पत्रें मिळण्याचा संभव आहे. तीं मिळाल्यावर त्या पत्रांच्या व त्याप्रमाणें उपलब्ध साधनांच्या मदतीनें या प्रकरणाचा परामर्ष घेतां येईल.

स. म. दिवेकर

# कांचीचे पल्लव.

हिंदुस्थानच्या प्राचीन म्हणजे मुसलमानपूर्व इतिहासांत कांचीचे पल्लव कोण होते हा एक गूढ प्रश्न आहे. हे पल्लव द्राविडी जातीचे नव्हते हा निश्चय आहे. दक्षिणेतील प्राचीन द्राविडी राज्यें म्हटलीं म्हणजे पाण्ड्य, चोल, चेर. चेरांपैकीं च केरळ होत सर व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो "The origin of the Pallava clan which supplied Royal families to Kanchi, Vengi and Palakkad is obscure." कांची, वेंगी व पलक्कड येथील राजवंशाचें मूळ अज्ञातप्राय आहे. पल्लवांच्या लेखांवरून व इतर साधनांवरून जो त्यांचा इतिहास उपलब्ध झाला आहे, तो थोडक्यांत असा आहे. इ. स. १५० च्या सुमाराचा शिवस्कंदवर्मा या प्रथम पल्लव राजाचा लेख सांपडला असून त्यानें अश्वमेध केला असें वर्णन आहे. यावरून त्याची सत्ता इ. स. १५० च्या पूर्वी सुरू झाली असावी. पुढें कांचीच्या पल्लवांचा उल्लेख समुद्रगुप्ताच्या लेखांत इ. स. ३४० च्या सुमारास सांपडतो. यापुढें पुल्केशि चालुक्य व ह्युएनसिंग यांचा समकालीन जो नरसिंहवर्मा त्याचा प्रसिद्ध पराक्रम उल्लेखिला पाहिजे; आणि यानंतर चालुक्यांचे व पल्लवांचे पिढ्यानुपिढ्या तंटे चालले हें हि प्रसिद्ध आहे. पल्लवांचा लोप राजराज चोल यानें इ. स. ९०० च्या नंतर केला, तेव्हांपासून त्यांचा इतिहासांत उल्लेख नाहीं. या पल्लवांचे वंशज आम्ही आहों असें हल्लींचे पुडुकोट्टा येथील राजे म्हणतात. सारांश, पल्लवांचें वैभव इ. स. १५० पासून ९०० पर्यंत सुमारें ८०० वर्षे होतें. हे पल्लव कोण होते, हें प्राचीन इतिहाससंशोधकांस गूढ आहे; कारण ते चोल, पांड्य, चेर यांपैकीं नव्हत हें निश्चित आहे.

पल्लव व पल्हव या नामसादृश्यावरून पाश्चात्य इतिहासज्ञांनीं असा तर्क केला आहे कीं, हे पल्लव शक, पल्हव वगैरे संस्कृत ग्रंथांत सांगितलेल्या म्लेंच्छांपैकीं पल्हव होत. पल्हवांचें मूळ ठिकाण पार्शिया हें प्रसिद्ध च आहे. पार्शि जुने ग्रंथ पल्हवी भाषेंत असल्याचें सर्वांस माहीत आहे. या वायव्य दिशेस राहणाऱ्या शक, यवन, पल्हवांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या आणि महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत किंबहुना नाशकापर्यंत त्यांची प्रगति झाली होती. यांचा पराभव पैठणचा आंध्रभृत्य विलिवायकुर (दुसरा) यानें केला व त्यांस हांकून लाविलें, असा त्याच्या शिलालेखांत दाखला आहे. हा विलिवायकुर इ. स. ११३ पासून १३८ पर्यंत राज्य करीत होता असें इतिहासज्ञांनीं ठरविलें आहे. शक लोक महाराष्ट्रांतून हटवले गेले ते सौराष्ट्र, माळवा (उज्जेन) या ठिकाणीं दोनतीनशें वर्षे राज्य करीत होते. सर व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो: "कोणा पल्हवाचें राज्य पश्चिमेस झालेलें दिसत नाहीं. तेव्हां ते दक्षिणेकडे घुसून त्यांनीं मद्रासपर्यंत जाऊन कांची येथें राज्य स्थापिलें असावें." "It is quite credible that the Pahlavas may have sought their fortune in the South." तसें च तो पुढें म्हणतो–" On the whole though positive

evidence of this supposed migration is wanting, it is highly probable that the Pallavas were really identical with Pahlavas and were a foreign tribe which sought its way into India " अर्थ असा की, "सर्वतोपरी विचार करतां या कल्पित पराक्रमाचा जरी आस्तिपक्षी पुरावा उपलब्ध नाही तथापि हें फार च संभवनीय आहे कीं, पल्लव आणि पल्हव एक च असून ते परकी लोक होते; व त्यांनीं आपला रस्ता युद्ध करीत करीत मद्रासच्या दक्षिणेपर्यंत काढला. " तात्पर्य, पल्लव हे म्लेंछ असून त्यांचें राज्य इ. स. १५० पासून दक्षिणेंत कांची येथें होते, असा पाश्चात्यांचा तर्क आहे.

माझ्या मतें हा तर्क चुकीचा आहे. पल्लव हे कोण होते याचा नास्तिपक्षी केवळ सिद्धान्त न ठरवितां आस्तिपक्षी सिद्धान्त काय होऊं शकतो याचा विचार करतां, पल्लव हे मराठे होते; म्हणजे तत्कालीन भाषेंत बोलावयाचें तर ते महाराष्ट्रांतील आर्य होते, असें माझें मत आहे. ही कल्पना सर व्हिन्सेंट स्मिथच्या च विधानावरून सुचली हें मला सांगितलें पाहिजे. ती अशी–" The home territories directly administered by the Pallavas do not appear to have been extensive. The Palava power was superimposed upon the ancient territorial states, much in the same way as the Maratha power in later days. " पल्लवांचें स्वतःचें राज्य फार मोठें नव्हतें. त्यांची सत्ता अलीकडच्या काळांतील मराठयांच्या सत्तेप्रमाणें तद्देशीय भूमिच्या संस्थानांवर स्थापित झाली होती. " जसें मराठयांनीं सतराव्या शतकांत तंजावरचें राज्य स्थापिलें व तद्देशीय संस्थानिकांवर अंमल चालविला, त्याप्रमाणें इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत महाराष्ट्रीय आर्यांनीं कांचीचें राज्य स्थापून तद्देशीयांवर सत्ता चालविली, असा माझा सिद्धांत आहे. या सिद्धान्ताची कारणें या लेखांत मी सभेपुढें मांडणार आहें.

प्रथम आपण नास्तिपक्षी कारणें पाहूं. पल्लव हे पल्हव नव्हत असें सिद्ध करण्यास फार प्रयास पडणार नाहींत. शक, यवन, पल्हवांचा विलिवायकुरानें पराभव केला तेव्हां शक मागें हटले आणि पल्हव पुढें घुसले हें म्हणणें बरोबर नाहीं. आंध्रभृत्यांच्या महाराष्ट्रांतून पुढें घुसून मद्रासेपर्यंत त्यांचें जाणें शक्य नाहीं. शकांचें राज्य सौराष्ट्रांत कायम झालें. त्यांत च पल्हव लुप्त झाले असें मानलें पाहिजे. शक, यवन, पल्हव यांचा एकजुटीचा हा प्रयत्न होता. त्यांची निरानिराळीं राज्यें स्थापन होण्याची आवश्यकता नाहीं. यवनांचें हि निराळें राज्य स्थापन झालेलें दिसत नाहीं. तात्पर्य, पराभव झाल्यावर पल्हव पुढें घुसले हें संभवनीय नाहीं आणि त्यांचें निराळें राज्य पाहिजे अशी आवश्यकता नाही. दुसरें, पल्लव आणि पल्हव हा गोंधळ होणें शक्य नाहीं. संस्कृत व प्राकृत भाषांच्या लिपींत असा घोंटाळा होणें अशक्य आहे. मनुस्मृति, महाभारत वगैरे ग्रंथांत पल्हव असें स्पष्ट आहे. मनुस्मृतींत आर्येतर मेंच्छ दिले आहेत (त्यांस क्रियालोप झालेले

क्षत्रिय म्हटलें आहे. यांत आश्चर्य नाहीं. ) ते असे:- "पौंड्रकाश्चौड्रद्रविडाः काम्बोजा यवनाः शकाः । पारदाः पल्हवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥" मनुः १०-४४. पल्हव शब्द इतर महाभारतादि ग्रंथांत हि येतो; त्यांत हकार स्पष्ट आहे. मूळच्या पर्शियन नांवांत हि हकार Pehlavi असा स्पष्ट आहे आणि त्याचा लोप होऊन पल्लव होणें शक्य नाहीं. पल्लवांचे बहुतेक सर्व लेख संस्कृतांत आहेत. तेव्हां ते पल्हव असते तर आपल्यास पल्लव कधीं च बनवतेना. ते क्षत्रिय होते. पण मनुस्मृतीनें पल्हवांना हि क्रियालोप झालेले क्षत्रिय च म्हटलें आहे, अर्थात् त्यांना आपलें नांव चोरून ठेवण्याचें किंवा बदलण्याचें कारण नव्हतें. शकांनीं किंवा यवनांनीं आपलें नांव बदलेलें नाहीं. तेव्हां पल्हवांचें पल्लव होणें शक्य नाहीं.

आतां तिसरें प्रमाण भाषेच्या महत्वाचें आहे व त्याचा नास्तिपक्षीं आणि अस्तिपक्षीं हि उपयोग होतो. याचा जरा विस्तृत रीतीनें विचार केला पाहिजे. हिंदुस्थानचे भाषेच्या दृष्टीनें दोन भाग पडतात. द्राविडी भाषा बोलणारांचा मुलूख आणि संस्कृतोत्पन्न भाषा बोलणारांचा मुलूख. या मुलुखांची मर्यादा कृष्णा नदी स्थूलमानानें आहे आणि देशभेदानें किंवा लोकांच्या स्वरूपभेदानें हि ही च मर्यादा स्थूलत्वानें दिसते. हल्लींचा मद्रास इलाखा हि मुख्य द्राविडांचा च देश आहे, असें म्हणतां येईल आणि मुंबई इलाखा; जर कृष्णेच्या दक्षिणेकडील कर्णाटकाचा भाग वगळला तर, आर्यभाषांचा प्रांत दिसतो. या विस्तीर्ण आर्य प्रदेशांत हि दोन भाग करतां येतील. नर्मदोत्तर हिंदुस्थान आणि नर्मदा व कृष्णा यांच्यामधील गोदावरीमध्य असलेला प्रांत. हा दुसरा भाग म्हणजे महाराष्ट्र होय असें म्हणतां येईल. यांत पूर्वेकडे तेलंगण अथवा आंध्र भाग आहे तो—द्राविड भाषापैकीं कृष्णोत्तर थोडासा भाग आहे तो—आपण वगळला तर, मुख्य भाग महाराष्ट्राचा. निजामचे जिल्हे, वर्धा, नागपूर, वऱ्हाड, खानदेश वगैरे सर्व महाराष्ट्र च होय. ज्या देशांत आर्यांची वसति झाली म्हणजे प्रामुख्यानें वसति झाली त्या देशांतील द्राविडी मूळ प्रजा कमी होती म्हणा किंवा ती हटत हटत कृष्णेपलीकडे गेली म्हणा, तेथें आर्यसंस्कृतोत्पन्न भाषा च लोकांत एकंदर रूढ झाल्या व कृष्णेच्या दक्षिणेस द्राविडी भाषा म्हणजे तामीळ, कानडी, मल्याळी, या भाषा सर्व लोकांच्या झाल्या. या भाषांच्या पुराव्यावरून साधारणतः आर्यलोकांची हिंदुस्थानांतील प्रगति निश्चित करतां येते. दुसरी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे ती, या सर्व आर्यभाषा बोलणाऱ्या भागांत मूळच्या रहिवाशांत मुख्य लोक नागलोक होते असें दिसतें. हे नागलोक द्राविडी जातीचे होते किंवा कसे हें सांगतां येत नाहीं. नागलोक द्राविडी देशांत म्हणजे मद्रास इलाख्यांत असल्याचा दाखला सांपडत नाहीं असें मला वाटतें. पंजाब, कुरुक्षेत्रापासून तों थेट महाराष्ट्रापर्यंत नागलोकांचा दाखला महाभारतांत सांपडतो आणि या नागांचें आणि आर्यांचें मिश्रण झालें असें दिसतें. महाराष्ट्रांत करवीरचें राज्य नागकन्येपासून झालेल्या यदूच्या एका पुत्रानें स्थापिलें असें हरिवंश पर्व २ अ. ३८ यांत सांगितलें आहे. असो; या नागांची मूळ भाषा कांहीं असली तरी त्यांनीं व एकंदर या

आर्यनागमिश्र संततीनें संस्कृतोत्पन्न प्राकृत भाषा सुरू केल्या आणि त्या च भाषा हल्लीं या प्रांतांत येथ्याशा बदललेल्या स्वरूपानें म्हणजे हिंदी, बंगाली, गुजराथी व मराठी रूपानें बोलल्या जात आहेत. या प्राकृत भाषा इ. स. पूर्व ५०० पासून म्हणजे बुद्धपूर्वपासून चालू आहेत. जनभाषा संस्कृत तेव्हांपासून च नाहीं हें उघड आहे. संस्कृत भाषा केवळ पंडित च या प्रांतांत बोलत असा इतिहास दिसतो.

आतां आपण आपल्या मुख्य मुद्याकडे वळूं चिनी प्रवासी ह्युएनसींग यानें असें लिहून ठेवलें आहे कीं, "कांची येथील लोकांची भाषा व लिपी मध्यदेशांतील भाषे-हून व लिपीहून फार च थोडी भिन्न आहे." हें विधान मोठें घोंटाळ्याचें आहे असें सर व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो ( प्राचीन इतिहास पान ४३५ टीप पहिली आवृत्ति ). याचा खुलासा त्यानें असा केला आहे की, ह्युएनसींग याजला कांची येथील बौद्धमठांत संस्कृत बोलणारे व लिहिणारे भिक्षु भेटले असावे. पण हें म्हणणें समाधानकारक नाहीं. सर्व च देशांत पंडित संस्कृत बोलत व लिहीत. तर हें विधान सामान्य जनतेनें आहे. बंगाल्यांतून द्राविडी देशांत म्हणजे कलिंगांत आल्यावरोबर भाषा बदलली असें त्यानें स्पष्ट लिहिलें आहे. तेव्हां सर्व बाजूला द्राविडी भाषा बोलत असून कांचींत त्यास मध्य-देशाचे भाषेसारखी भाषा भेटली याचें त्यास आश्चर्य वाटलें. ह्युएनसींग संस्कृत शिकला होता. तेव्हां हें विधान त्यानें संस्कृतासंबंधानें केलेलें नाहीं हें निर्विवाद आहे. या गोष्टीवरून हें स्पष्ट आहे कीं, कांची येथील लोक विशेषतः वरिष्ठ वर्गाचे लोक आर्योत्पन्न भाषा बोलत. असला चमत्कार हल्लीं हि दृष्टीस पडतो मराठ्यांच्या बरोबर गेलेले ब्राह्मण मराठे तंजावराकडे अजून मराठी बोलतात. असो; तर या पुराव्यावरून हे कांचीचे पल्लव द्राविडी मुलुखांतील मूळचे नसून बाहेरचे होते हा निश्चय ठरतो. लोकांच्या दंतकथांत हि पांड्य, चोळ, केरलांत पल्लवांचा शिरकाव नाहीं. हा मुद्दा भाषेनें आणखी पक्का ठरतो आणि पल्लव हे बाहेरचे होते असें निर्विवाद दिसतें. पण माझ्या मतें या गोष्टीनें पल्लव हे पल्हव नव्हते हें हि नास्तिपक्षीं निर्विवाद ठरतें. कारण, शक, पल्हव हे मूळचे आर्यभाषा बोलणारे नव्हते. ते हिंदुस्थानांत येऊन अनेक वर्षे राहिल्यानें त्यांची आर्यभाषा मातृभाषा झाली होती असें हि नाहीं. ते इ. स. १०० च्या सुमारास स्वारी करून आले. इ. स. १३० च्या सुमारास महाराष्ट्रापर्यंत पुढें येऊन तेथें पराभव पावून मागें हटले, त्यांतील पल्हव पुढें निसटले असें मानले आणि ते कांचीस येऊन राज्य करून राहिले असें कल्पिलें तर त्यांची भाषा मध्यदेशांतील ( आर्य ) भाषा होणें शक्य नाहीं. ते राजे म्हणून आपली च म्लेंच्छ भाषा बोलते; किंवा संख्येनें कमी म्हणून लोकांची द्राविडी भाषा उचलते. तात्पर्य, हा पुरावा हे पल्लव लोक म्लेंच्छ नव्हत हें सिद्ध करण्यास पुरे आहे. ह्युएनसींग हा अतिशय बुद्धिवान असून हिंदुस्थानांत २७ वर्षे होता. लोकांत तो फार वागला होता. श्री हर्षाच्या दरबारीं तो कित्येक वर्षे होता. तो संस्कृत शिकला होता. या सर्व गोष्टींवरून मध्यदेशांतील लोकांची भाषा म्हणजे संस्कृत

नव्हे. संस्कृत भाषा सर्व देशाची आणि फक्त पंडितांची होती हें त्यास ठाऊक असलें च पाहिजे. तात्पर्य, ह्युएनत्सिंगाच्या वरील विधानाची वासलात दुसऱ्या रीतीनें लावतां च येत नाहीं. पल्हव हे म्लेंच्छ असून मध्यदेशांतील आर्य भाषा बोलू शकत नाहींत हें निश्चित. आणि अर्थात् पल्लव हे पल्हव नव्हत.

पल्लव पल्हव नव्हेत तर कोण होते, हा प्रश्न या भाषेवरून च सुटण्यासारखा आहे. मध्यदेशांतील आर्य क्षत्रिय इतके लांब वसाहत करावयास येणें अशक्य नसलें तरी असंभवनीय होय. समुद्रगुप्तानें उत्तरेकडून येऊन कांचीपर्यंतचा मुलूख जिंकला हें ऐतिहासिक तथ्य आहे. पण त्यापूर्वी इ. स. १५० च्या सुमारास कोणी उत्तरेकडील आर्य इतके प्रबल असलेले दिसत नाहींत. किंबहुना या वेळीं दक्षिणेकडील आंध्र-भृत्यांनीं उत्तर ( पाटली पुत्र ) साम्राज्य जिंकलें होतें. तेव्हां या सुमारास कांचीकडे कोणी परस्थ आर्यभाषा बोलणारे आले असतील तर ते महाराष्ट्रांतील च आर्य होत. कांचीच्या उत्तरेला चोल, आंध्र, कलिंग वगैरे द्राविडी भाषा बोलणारे च अनार्य होते. कांचीला जवळ आर्यभाषा बोलणारा मुलूख म्हणजे महाराष्ट्र च होता आणि तेथच्या लोकांनीं च कांचीवर स्वारी करून राज्य स्थापन केलें असलें पाहिजे. आतां " मध्य देशांतील भाषेसारखी भाषा हे लोक बोलत होते " या विधानानें महाराष्ट्रांतील लोक येऊं शकत नाहींत असें म्हणतां येत नाहीं. हल्लीं मराठी आणि हिंदी यांत बरें च अंतर आहे. पण ह्युएनत्सींगाच्या वेळीं इतकें अंतर नव्हतें. इ. स. ६४० च्या सुमारास मध्यदेशांत बोलली जाणारी भाषा आणि महाराष्ट्रांत बोलली जाणारी भाषा पुष्कळ जवळ-जवळ असली पाहिजे; आणि यावरून हे कांची येथील पल्लव महाराष्ट्रांतील आर्य असावे असा अस्तिपक्षी पहिला पुरावा या चिनी प्रवाशाच्या विधानावरून मिळतो.

दुसरी गोष्ट आर्यांची प्रगति हिंदुस्थानांत अशी च झाली असावी असें अनुमान आहे. उत्तरेकडून प्रथम महाराष्ट्रांत आर्यांची वसति झाली. आणि महाराष्ट्रांतून कांहीं आर्य क्षत्रिय व ब्राह्मण दक्षिणेंत म्हणजे द्राविडदेशांत गेले असावे. प्रथम ब्राह्मण गेले. त्यांचे परराज्यांत वास्तव्य असल्यानें द्राविडांतील ब्राह्मणांनीं तेथील भाषा उचलली असें मानतां येईल. पल्लव क्षत्रिय राजे असल्यानें त्यांच्या राजधानींत व दरबारांत राजभाषा पल्लवांची च चालू राहिली. दक्षिणेकडील आंध्र, द्राविड, केरल प्रांतांतील ब्राह्मण आर्य असून तेथील भाषा कां बोलतात याचें हें कारण दिसतें. असो; दक्षिणेकडे महा-राष्ट्रांत आर्यांची वसति यापूर्वी च झाली होती. याचा पुरावा महाभारत व मनुस्मृतीवरून देतां येईल. मनुस्मृतींत अध्याय २ मध्यें प्रथम सरस्वती–दृषद्वतीमध्यें ब्रह्मावर्त हें आर्यांचें केन्द्र सांगितलें; नंतर ब्रह्मर्षिदेश कुरुक्षेत्र, मत्स्य, पांचाल, शूरसेन हा सांगितला; नंतर मध्यदेश सरस्वतीपासून प्रयागापर्यंत व हिमालयापासून विन्ध्यापर्यंत सांगितला; नंतर पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत हिमालय–विन्ध्यापर्यंत आर्यावर्त सांगितला; आणि शेवटीं यज्ञिय देश कृष्णसार मृग जेथें चरतो तो सांगितला. याप्रमाणें उत्तरोत्तर

१ ब्रह्मावर्त, २ ब्रह्मर्षिदेश, ३ मध्यदेश. ४ आर्यावर्त, ५ यज्ञिय देश, याप्रमाणें आर्यांची वसति कशी फैलावत गेली याचें आपल्यास येथें स्पष्ट प्रतीक मिळतें (श्लोक–१८–२४ ). अर्थात् आर्यावर्ताच्या पुढें वऱ्हाड (विदर्भ) महाराष्ट्र; हें तेथें कृष्णसारमृग चरतांना दिसतात म्हणून आर्य देशांत मोडलें. महाभारतांत भीष्मपर्वांत देशांच्या यादींत भरतखण्डाचे देश सांगितले आहेत. ते परान्त, अपरान्त, मल्लराष्ट्र, गोपराष्ट्र, अश्मक इत्यादि महाराष्ट्राच्या खालच्या मर्यादेपर्यंत सांगितले आहेत. आणि चोल, केरल वगैरे देश दक्षिणेकडील म्हणून निराळे सांगितले आहेत. याला प्रत्यन्तर पहिल्या शतकांतील पेरिप्लस यांत हि मिळतें. त्यांत महाराष्ट्र व अपरान्त यांस आरियाके म्हणजे आर्यदेश म्हटलें आहे; आणि कानडी भाषेंत मराठीला आर्यभात अशी संज्ञा आहे. तात्पर्य, महाराष्ट्रांत या वेळपर्यंत आर्यांची पूर्ण वसति झाली होती आणि कांची येथें कोठून आर्यभाषा बोलणारे राजे व लोक इ. स. १५० च्या सुमारें आले असतील तर ते महाराष्ट्रांतून च आले होते हें निःसंशय वाटतें.

शेवटचा पुरावा प्रत्यक्ष अस्तिपक्षी म्हटला म्हणजे पल्लव हें नांव मराठ्यांत अजून आहे. पल्लव याचें प्राकृत रूप पालव होय आणि पालवे हें मराठ्यांत अजून आडनांव आहे. सेंद्रक म्हणजे शिंदे, कदम्ब म्हणजे कदम, चालुक्य म्हणजे चाळके, राष्ट्रकूट म्हणजे रठ्ठकूट, हीं नांवें प्राचीन म्हणजे इ. स. ६०० च्या सुमारास प्रसिद्ध असलेल्या राजवंशाचीं नांवें मराठ्यांत अद्याप आहेत. मराठे हे बहुधा शिवभक्त आहेत. कांचीचे पल्लव शिवभक्त होते. त्यांनीं तयार केलेलीं वेरुळासारखीं कोरलेलीं शिवमंदिरें अद्याप तिकडे आहेत. पल्लव हे पक्के क्षत्रिय होते असें दिसतें. त्यांच्या राजांचीं नांवें नेहमीं वर्मेंत असतात. त्या काळीं शर्मा, वर्मा इत्यादि नांवांचीं उपपदें सार्थ व महत्वाचीं होतीं. ह्युएनसीगनें प्रत्येक ठिकाणचा राजा क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र किंवा ब्राह्मण होता हें मोठ्या काळजीनें सांगितलें आहे. त्यांत प्रतारणा केली नाहीं. प्रत्यक्ष श्रीहर्ष त्याचा आश्रयदाता वैश्य होता असें स्पष्ट म्हटलें आहे कांचीचा नरसिंहवर्मा व महाराष्ट्राचा पुलकेशि चालुक्य हे क्षत्रिय होते असें स्पष्ट सांगितलें आहे. या दोघांच्या पूर्वजांनीं अश्वमेध केला असल्याचें त्यांच्या लेखांत आहे. अर्थात् हे पक्के क्षत्रिय होते. यांनीं अनार्य म्हणजे नागवंशी किंवा द्रविडवंशी स्त्रिया केल्या असतील, पण त्या वेळीं वर्ण बापांवर अवलंबून होता. यामुळें हे महाराष्ट्रीय राजे क्षत्रिय च होते असें दिसतें. यांनीं आपल्या लेखांत आपलीं गोत्रें हि दिलीं आहेत. पल्लवांचें गोत्र भारद्वाज आहे. चालुक्यांचें मानव्य दिलेलें आढळतें. पालवे व चाळके यांची हल्लीं मराठ्यांच्या कुळांच्या यादींत काय गोत्रें दिलीं आहेत हें पाहण्यासारखें आहे. तथापि, हल्लींच्या या गोत्रावळीच्या यादी भरवंशालायक नाहींत हें सांगावयास नको. गोत्रांचें स्मरण राहणें शक्य नाहीं. आडनांव महत्वाचें आणि न विसरणारें आहे. यासाठीं पालवे या नांवाचा पुरावा महत्वाचा आहे. पहिला पल्लव राजा शिवस्कंदस्वामी यांच्या लेखांत त्याच्या बापाचें किंवा पूर्वजाचें नांव बप्प

दिलें आहे ( स्मिथ ). हा शब्द हि आर्यांचा आहे. 'बाप्पा मोरया' यांत तो मराठ्यांचा आहे. 'बाप्पा रावळ' या शब्दांत रजपुतांचा हि दिसतो. हा शब्द द्रविडांचा नाहीं. असो. तर या पल्लवांच्या अनेकविध उपलब्ध वर्णनावरून ते महाराष्ट्रीय आर्य दिसतात. त्यांची आर्य भाषा त्यांचें राज्य नाहींसें झाल्यानें लुप्त झाली. ती द्राविड देशांत शहाजी-शिवाजी, व्यंकोजींनीं पुन्हां नेली. मराठ्यांची ही दाक्षिण सत्ता या हकीकतीवरून पूर्वीच्या मराठी सत्तेची पुनरावृत्ति होय, असें पाहून इतिहासाची पुनरावृत्ति होते या सिद्धांताची सत्यता आपल्या मनावर ठसते. इति शम्

**ताजाकलम**–वरील लेख लिहिल्यावर अशी कल्पना आली कीं, स्मिथच्या Early History of India या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीच्या वेळीं कदाचित् पूर्वीचें मत बदललें असेल. या समजुतीनें द्वितीय आवृत्ति आणून पाहतां हें अनुमान खरें ठरलें. पल्लव आणि पल्हव एक आणि पल्लव म्हणजे बाहेरचे पल्हव म्लेंच्छ ही कल्पना पाश्चात्य विद्वानांनीं आतां सोडली आहे. तथापि पल्लव हे कोण होते व कोठून आले हें गूढ अद्याप बाकी आहे. किंबहुना तें अधिक गूढ सहज च झालें आहे. तसें च पहिला पल्लव-लेख दुसऱ्या शतकाइतका जुना नाहीं असें मत आतां झालें आहे. तथापि, समुद्रगुप्ताच्या वेळीं पल्लव कांची येथें होते (इ. स.३४०) हें निश्चित व मान्य झालें आहे. असो. हे पल्लव वेंगीराष्ट्रामधून म्हणजे गोदा व कृष्णा यांच्या मुखांच्या दरम्यान असलेल्या भागांतून आले असावे, असा आतां स्मिथनें तर्क असल्याचें लिहिलें आहे. पण हा हि तर्क अपुरा च आहे. कारण मुख्य गोष्ट म्हणजे या कांचीच्या पल्लवांची भाषा मध्यहिंदुस्थानांतील ( आर्य ) भाषेसारखी होती, या ह्यूएनसिंगाच्या विधानाचा उलगडा होत नाहीं. हें विधान या दुसऱ्या आवृत्तींत सहज च उल्लेखिलें नाहीं. तथापि तें मूळ ह्यूएनसिंगच्या लेखांत आहे च. वेंगी हा मुलूख हि द्राविडी भाषांचा आहे, तामिल भाषेचा नसला तरी तेलगू भाषेचा–आन्ध्र भाषेचा आहे. अर्थात् पल्लव हे तेथील नव्हत. ते त्या रस्त्यानें महाराष्ट्रांतून च आले असले पाहिजेत. शिवाय, पाल्वे हें नांव महाराष्ट्रांत अद्याप कायम आहे. याशिवाय वेंगीराष्ट्र यांतील राष्ट्र शब्द हि बऱ्या च महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रांतील लोकांनीं च राष्ट्र शब्द मुख्यतः उपयोजिला आहे. या लोकांस च राष्ट्रिक अशी संज्ञा अशोकाच्या लेखांत आहे. मल्लराष्ट्र, गोपराष्ट्र, पांडुराष्ट्र, इ० नांवें महाभारतांत या च देशांतील प्रांतांचीं आहेत. समुद्रगुप्ताच्या लेखांत देवराष्ट्र असें नांव या च लोकांच्या प्रांतास लागू आहे. तात्पर्य, पल्लव कांची येथें महाराष्ट्रांतून गेले, असें मी जें अनुमान केलें आहे तें च बळकट आहे. पल्लवांचें व मराठ्यांचें साम्य स्मिथ वगैरे इतिहासकारांस मान्य आहे. पाल्वे हें मराठ्यांचें नांव त्यास माहित असतें तर बहुधा त्यानें हि वरील अनुमान काढलें असतें. इति शम्

चिं. वि. वैद्य

# सातारा येथील छत्रपतींचे व त्यांचे अधिकारी ह्यांचे शिक्के.

—०००००—

एक छत्रपती परलोकवासी झाल्यावर, मागाहून येणाऱ्या छत्रपतींचें राज्यारोहण होऊन, त्याचे नांवाचा शिक्का तयार होत असे. त्या च प्रमाणें पंतप्रधान वगैरे वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यास त्याचे पदाचीं वस्त्रें मिळत असत त्या वेळीं, त्याचे नांवाचा शिक्का सरकारांतून मिळत असे. हे मिळणारे शिक्के कोठें तयार होत असत व ते कोणाकडून तयार करविले जात असत याबद्दलची माहिती आजपर्यंत उपलब्ध नव्हती. सातारा येथील माझ्या संशोधनांत, या संबंधानें जी माहिती मला मिळाली आहे, ती मी मंडळापुढें सादर करितों. सातारा येथें भुरके उपनांवाचें थोरले शाहू महाराजांचे वेळेपासून राजाश्रित सोनार घराणें आहे. यांचें कोकणांतील मूळ गांव संगमेश्वर होय. तेथें असतांना यांचे पूर्वजांपैकीं ' वीठसेटी बिन बादसेटी ' व ' हरसेटी बिन गणसेटी ' याला, सु॥ इसने खमसैन अलफ ( इ. स. १६५२ ) या सालीं, अदिलशाहींतील अमलांत संगमेश्वर येथील टंकसाळींत रुपये व खुर्दा पाडण्याचा कौलनामा मिळाला आहे. या च घराण्यांतील तानसेट बिन सुडकसेट भुरके संगमेश्वरकर याला, शाहुमहाराज यांनीं सातारा येथें टंकशाळेचा अधिकार दिला होता. टंकसाळींत जे रुपये व इतर नाणीं तयार होत त्यांचे कोरीव ठसे तानसेट यांचेकडून तयार होत असत. नाण्याचा कोरीव ठसा व नांवाचा शिक्का तयार करण्याचें काम हीं एका च स्वरूपाचीं कामें असल्यामुळें, शिक्के तयार करण्याचें काम तानसेट यांचे च कडे असे. तानसेटचा मुलगा महादसेट व महादसेटचा मुलगा बाळसेट यांचेकडे हें शिक्याचें काम परंपरेनें चालू होतें. आज मंडळापुढें सादर केलेल्या २९ शिक्यांपैकीं कांहीं शिक्के बाळसेटचा मुलगा रामसेट यानें तयार केलेले आहेत. रामसेट हे गेल्या सालीं ( ता ११ फे० १९१७ ) सातारा येथें मरण पावले. यांचे च कडून सादर केलेल्या शिक्यासंबंधानें माहिती मिळाली आहे. सातारा येथील राज्य खालसा होऊन आज ७० वर्षांचा काल लोटला आहे. ही गोष्ट जमेस धरली म्हणजे आज मंडळापुढें ठेविलेल्या शिक्यांपैकीं कांहीं शिक्के रामसेट यांनीं तयार केले आहेत, हें विधान शंकास्पद वाटण्याचा संभव आहे. परंतु रामसेट यांचा हयातीचा काल लक्षांत घेतला म्हणजे, माझे विधानाची सत्यता पटेल. सातारा येथील राज्य खालसा झाल्यापासून रामसेट यांना पोलिटिकल पेनशन मिळत असे. त्यांचे पेनशनशीटमध्यें त्यांची जन्म तारीख १८ नोवेंबर १८१२ दिली आहे. या तारखेवरून रामसेट यांचें वय मरणकालीं एकशें चार वर्षें दोन महिने आणि तेवीस दिवसांचें होतें. रामसेट यांना छत्रपती शहाजी महाराज यांनीं, त्यांच्या जवाहिरजडण्यांतील हस्तकौशल्याबद्दल, राजशक १६९ शोभकृत नाम संवत्सरे

चैत्र शु॥१ रोजीं इनाम जमीन दिली आहे. या कालानंतर पाऊण शतक रामसेट हयात होते.

छत्रपतींच्या आज्ञेनें जे शिक्के तयार होत असत, ते दरबारांत गुदरण्यापूर्वी प्रत्येक शिक्का चांगला तयार झाला आहे किंवा नाहीं हें पाहण्याचे हेतुनें, तो निराळ्या कागदावर उठवून पाहण्याचा मुरके यांचा क्रम असे. रा. वासुदेव रामचंद्र मुरके यांचे घरीं असे शिक्के उठवून पाहिलेले जे कागद होते, ते च कागद आज मंडळाचे अवलोकनार्थ सादर केले आहेत. या कागदांवरील प्रत्येक शिक्का अगदीं निर्मळ असून त्यांतील प्रत्येक अक्षर वाचण्यास सुगम आहे. यावरून प्रत्येक शिक्का कोरा असतांना च तो या कागदावर उठवून पाहिला आहे, ही गोष्ट सहज लक्ष्यांत येणारी आहे.


तानसेट मुरके संगमेश्वरकर हे शाहूचे कारकीर्दींत राजशक ६७ रौद्रनाम संवत्सरांत, राजाश्रित झाले असल्यामुळें या कालाच्या मागील कालांतील, म्हणजे बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ व बाळाजी बाजीराव यांच्या शिक्याचे कागद, रा. मुरके यांचे संग्रहीं असणें शक्य नाहीं. माधवराव बल्लाळ व माधवराव नारायण या उभयतां पंत प्रधानांचे शिक्यांचे कागद रा. मुरके यांचे संग्रहीं असणें शक्य होते. परंतु ते गहाळ झाले असावेत.

आज मंडळापुढें ठेविलेल्या २९ शिक्यांपैकीं चार शिक्के दुबार उठविले आहेत. बाकी २५ शिक्के आहेत, ते असेः—

१




२ ( अष्टकोनी )



( अष्टकोनी )

३

• श्री : ⌣
स्वस्ति श्री शिवस
माता श्रियः श्रीशा
जन्मनः ॥ श्रीमच्छा
हाजिराजस्य श्रीमु
द्रेयं विराजते

४

० श्री ⌣
श्री आई आदिपुरु
ष श्रीराजा शाहाजि छ
त्रपति स्वामि कृपानिधि
तस्य परशराम श्रीनि
वास प्रतिनिधि

अ ष्ट को नी

५

मर्यादेयं
राजते

६

राजते
लेखन
। वधि

७

राजते
लेखना
वधी


८

⌣ श्री ०
श्रीराजाराम न
रपति हर्ष निधान
नारायणराव बल्ला
ळ मुख्य प्रधा


९

०श्री ⌣
राजाशाहु नरप
ती हर्षनीधान बाजी
राव रघुनाथ मु
ख्य प्रधा


१०


श्री
राजा शाहु न
रपती हर्ष निधा
न चीमणाजी
माधवराव प्र
धान


११


श्री
श्री भवानी
प्रतापगड चरण
राजा प्रतापसिंह
छत्रपती सेवक विठ्ठ
राव सोनवणी हवा
लदार निरंतर

१२


श्री
राजा शाहु नरप-
ती हर्ष निधान चीम
णाजी माधवराव
मुख्य प्रधान

१३


श्री :
रामलिंग श्री
राजा श्री शहाजी
छत्रपती चरणा तत्पर
अमृतराव डफले देश
मुख परगणे जत क
रजी निरंतर

१४

श्रीः
श्री राजा शा
हाजि छत्रपती च
रणी तत्पर चिमणा
जी रघुनाथ सचि
व निरंतर

१५

श्रीः
श्री राजा शाहा
जी छत्रपती स्वामी
चरणी तत्पर बळवं
तराव राजकुवर उ
मराव बाहादुर
निरंतर

१६

श्री.
श्री भवानी प्र
तापगड चरण रज
राजा श्रीशाहाजी छत्र
पती शेवक नारायण
राव सोनवणी हवाल
दार निरंतर

१७

श्रीः
श्री मलीशाहा
जी चरणी तत्पर
जानराव सुत मुधो
जी नाईक निंबाल
कर निरंतर

१८

श्रीआबा
बाई

१९

श्री
मोर्तब
सुद

२०

मोर्तब
सुद

२१

श्री

जीवाजी प्रभु
पुत्रस्य रामरायस्य
धीमताः मुद्रा सर्व गु
णोपेता राजसभा
न वर्धिनी

२२

श्री

गोविंद प्रभु पुत्र
स्य लक्ष्मणरावस्य
धीमत। मुद्रा सर्वगु
णोपेता राज्यस
भ्मान वर्धिनि

२३

श्री

श्री प्रतापसि
ह चरणी तत्पर आ
नराव सुत बजाजी
नाईक निंबाळक
र निरंतर

२४

दौलतराव
नाटे देशमुख
प्रगणे कासेगा।
व ब्रह्मपुरि

२५

श्री

भवानी शंक
र चरणि तत्पर रु
ख्मराव नाराय
ण निरंतर

या शिक्यांपैकीं '१।।५नगर छापा' या अक्षरांचा शिक्का सर्वांत जुना आहे. सातारा येथील राजधानींत जो कापडविक्रीचा माल येत असे, त्या मालावर हा शिक्का होत असे. 'नानाजी बिन कृष्णाजी नाईक जोशी यांना ताराबाईचें वतनपत्र' या शिरोलेखाचें टिपण मीं मंडळाकडे पाठविलें आहे, त्यांत या उत्पन्नाच्या बाबीचा उल्लेख आहे. नारायणराव पेशव्यांचे शिक्यांतील 'ण' हें अक्षर मोडी आहे. चिमणाजी माधवराव पेशव्यांची कारकीर्द केवळ नामनिर्देशात्मक असल्यामुळें, या पेशव्यांच्या शिक्यांचे कागद उपलब्ध होणें शक्य नाहीं. तथापि चिमणाजी माधवराव यांचे नांवाचा शिक्का तयार झाला होता, ही गोष्ट मंडळापुढें ठेविलेल्या दोन शिक्यांवरून स्पष्ट आहे. या पेशव्यांचें दत्तविधान व अधिकारप्राप्ती हा सर्व च प्रकार जसा आतुरतेचा झाला; तसा च प्रकार शिक्का तयार करण्याचे कामीं झाला असावा. या पेशव्यांचे दोन शिक्के असून, एक पिंपळपानी आहे व दुसरा गोलाकृति आहे. पहिल्या शिक्यांत 'प्रधान' या शब्द मागें 'मुख्य' हें विशेषण कोरण्याचें राहिल्यामुळें दुसऱ्या शिक्यांत 'मुख्य प्रधान' असे शब्द कोरले आहेत. पहिल्या शिक्यांतील शेवटचें अक्षर 'न' हें सुलटें आहे व दुसऱ्या शिक्यांतील 'न' हें अक्षर इतर पेशव्यांच्या शिक्यांतलि 'न' या अक्षराप्रमाणें उलटें आहे.

नमूद असलेल्या २५ शिक्यांत प्रभु चिटणिसांचे दोन शिक्के आहेत. पैकीं एक रामराव जिवाजी याचा व दुसरा लक्ष्मण गोविंद याचा. लक्ष्मण गोविंद हा खंडो बल्लाळ याचा नातु असावा. रा. सरदेसाई यांनीं दिलेल्या वंशावळींत हें नांव नाहीं.

छत्रपति शहाजीमहाराज यांचे कारकीर्दींतील 'बळवंतराव राजकुवर उमराव बहाद्दर' या नांवाचा शिक्का आहे. हे बळवंतराव ऊर्फ बाळासाहेब, शहाजीमहाराज यांचे मानलेले पुत्र होत. यांचा, महाराज यांचे कारकीर्दींत फार बोलबाला असे. यांना महाराज यांनीं 'राजाज्ञा' हें पद दिलें होतें व यांचे लग्नास एक लाख रुपये खर्च झाले होते. या लग्नांतील देकारांत रामसेट मुरके यांना त्यांचे जवाहिरजडण्याचे कसबाबद्दल शंभर तोळे सोनें बक्षीस मिळालें होतें.

शहाजी महाराज यांचे कारकीर्दींतील 'अमृतराव डफळे देशमुख' यांचा जो शिक्का आहे, त्या शिक्यांतील 'जी' या अक्षरानें कांहीं अर्थबोध होत नाहीं. तेथें 'जत' व 'करजगी' अशा दोन ग्रामनाम्यांचा उल्लेख आहे, असें समजावयाचें.

वासुदेव विष्णु जोशी.

---

फारसी
शिका

७ कौलनामे अजदिवाण* तपे बंदर माहामदाबाद वा बंदर तपे संगमेस्वर मामले मुजाफराबाद सुहूरसन इसने खमसैन अलफ ताहारीर याफ्त बेस्मी वीरसेटी बिन दादसेटी व हरसेटी बिन गणसेटी सोनारान टकसाली बंदर मजकूर दीला कौलनामा ऐसा जे दरीविला तुम्ही हुजूर एऊनु अर्ज केले जे बंदरमजकुरी टकसाल लाहारीया+ वा खुर्दा नौ× करावेयाचे उमेद धरितो दरी बाब हुजूरून फर्मान हुमायून सादीर आहे वा परवाना किबलगाहीखान अलीशान बुलंदमकान‡ साहेब सादीर आहे बमोजीब साहेबी सबणी करून टकसाल नौ घालावेया कौल मन्हामती करणे वा हाशीलबाबे टकसाल माहाजूर होऐ[1] तहअसान करणे दरीबाब देसाईयानी व मोकदमान तपे मजकूर इल्तीमास केले अहवाल खातीरेसी आले तरी टकसाल नौ बदर मजकुरी घालावेयासी तुम्हासी कौल मन्हामती केले असे तुम्ही उमेदवार होऊनु रुपे आणुन रासकर्दन लाहारिया कीजे वा नाबे आणून खुर्दा खुरसी कीजे तुम्हासी हासील लाहारीया रासकर्दन कराल दरसदे लारी १ वा खुर्दा दर मणे लारी २ मोकरर केले असे मुदती ५ साला टकसाल माहामूर होये तव [2]हेणे प्रमाणे देत जाणे दीवाणचे हाशील व उजरती सोनारा जी ++ ल ते अज ठसा होईल त्याकी (सी!) दुमले दीजे त्यासी हासील नाहीं बाजद ठसा येरीज लाहारीया वा खुर्दा वजन होईल त्यास सदरहूप्रमाणे हाशील देत जाणे पेस्तर टकसाल माहामूर जाहाले दर हाशील दर नीसबत बंदर हशील देत जाणे रासकर्दन लाहारीया रुपा खुर्द हमोली देऊनु

* मोडी लिपींत ' दी ' हें अक्षर नेहमीं दीर्घ असतें. असल कागदांत ' दि ' ऱ्हस्व असून 'दि'तील 'द'कार मोडी आहे.

+लाहारी शब्दाचें हें अनेकवचन. लाहारी हें चांदीचें नाणें असून त्याची किंमत सुमारे पांच आणे. ×नौ म्ह. नवें. ‡ 'कान' शब्दापुढें आदरदर्शक कोरी जागा आहे.

१ ' होए ' भाषेच्या दृष्टीनें हें रूप चिंतनीय आहे. २ असल पत्रांत ' येणे ' असें रूप नसून ' हेणे ' असा च शब्द आहे. भाषेच्या दृष्टीनें हा मननीय आहे.

एक कस्फजील कीजे बा खुर्दा दुने खुर्दे देऊनु खुर्दी+ पाडीत जाणे चाली बाबे येह तमाम होईल जाणिजे ×




अर्थशास्त्राच्या दृष्टीनें हें पत्र मननीय आहे. लाहारी व पैसे पाडतांना त्यांत ( अलाय ) इतर धातूचें मिश्रण होत नसे, हें या पत्रानें व्यक्त होतें. या पत्राचे आरंभीं श्रीकार किंवा अलीफ नाहीं. पत्राचा कागद दौलताबादी आहे. हस्ताक्षर शिवकालीन आहे. हें पत्र सातारा येथील सावकार रा. वासुदेव रामसेट भुरके यांचेजवळ असून तें त्यांचे पूर्वजांचे नांवें लिहिलेलें आहे.

**वा. वि. जोशी**

---

\+ असल पत्रांत 'दा' वर रेफ नाहीं. 'दा' चे ऐवजीं 'द' असूं शकेल.

× या पत्रांत छ व महिना नाहीं.

# हजरत वली मदन-शहांच्या संस्थानसंबंधीं एक निवाड पत्र.

—○—

( ले०-मिया शिकंदर लाल आतार. )

( १ ) महाराष्ट्रांत मुसलमानी राज्याची संस्थापना झाल्यानंतर, इकडे मुसलमानी मठ, दर्गा, घुमट, मशिदी, निमजगे, तकिये वगैरेंची स्थापना झाली व मुसलमानांच्या वसाहती झाल्या. त्या वसाहती राजकर्ते व राजकर्मचारी यांच्या च झाल्या असें नाहीं, तर मुसलमान साधु, फकीर, मलंग फकीर, काजी, मौलवी, मुल्ला, मुजावर वगैरे इतरे-जनांच्या हि वसाहती झाल्या. तेव्हां त्या लोकांच्या उपजीविकेकरितां पादशहांनीं जमिनी बहाल केल्या आणि त्या वंशपरंपरा चालणें आवश्यक जाणून सनदा-पत्रें करून दिलीं. हीं जीं तत्कालीन मुसलमानी घराणीं महाराष्ट्रांत स्थायी झालीं त्यांचा तत्कालीन राज-कीय परिस्थितीशीं हि थोडा-फार संबंध असे. न्यायमनसुब्याचीं कामें बहुधा या च वर्गाकडे असत. महाराष्ट्राच्या इतिहासाचें संशोधन करावयाचें म्हणजे अशा जुन्या मुसलमानी घराण्यांतील कागदपत्रांचें हि संशोधन केलें पाहिजे. ह्या घराण्यांतील कागद-पत्रें पुढें आणून मुसलमानी-इतिहास-संशोधन झाल्याविना महाराष्ट्रेतिहास-संशोधन सांगोपांग झालें असें म्हणतां येणार नाहीं. प्रस्तुत अशा च एका जुन्या घराण्यांतील, एका साधुपुरुषाच्या संस्थानसंबंधीं कजियाचें निवाड-पत्र मंडळापुढें ठेवीत आहें. त्यावरून त्या पिराचा पूर्वेतिहास, त्याच्या संस्थानची संपूर्ण हकीकत वगैरे माहिती ज्ञात होत असून, महाराष्ट्र-व्यवहार-निर्णयाचे कामीं हि या निवाडपत्राचा चांगला उपयोग होणार आहे.

( २ ) हजरत मदनशहांचा घुमट व दर्गा कसबे भिलवडी ( जि० सातारा ) येथें गांवाचे पश्चिमेस नदीकांठीं प्रशांतस्थळीं आहे. स्थान रम्य व पवित्र आहे. दर्ग्यास बादशाही इनामें असून हें संस्थान अद्यापि चालत आहे. या संस्थानसंबंधीं कागदपत्रें मला दिल्याबद्दल संस्थानचे विद्यमान अधिपति मे० हजरत सय्यद इस्मा-इलशा कमरबस्ते ऊर्फ लालशा बुवा फकीर यांचा मी आभारी आहें.

( ३ ) या दर्ग्याच्या गादीची पूर्वपरंपरा हजरत महंमद पैगंबरापर्यंत जाऊन पोहों-चते. तावत्कालपासून शिष्य-परंपरा अशी:—

इलाही व हुर्मत राजुनियाद— ( २ ) हजरत मोहंमद मुस्तफा रसूले खुदा स्वल्ललाहे अल्लाह व स्वल्लम— ( ३ ) हजरत आली करमल्ला वजहो कर्का सलापत इनायतशुद कद सल्लाह वो— ( ४ ) हजरत अमीनुद्दिन शामी— ( ५ ) हजरत ऐनुद्दिन शामी— ( ६ ) हजरत सैफुद्दिन शामी— ( ७ ) सुलतान ऑरी-फीन बायजिद बोस्तामी— ( ८ ) हजरत सय्यद वीदउद्दिन पीर जिंदाशा मदार— ( ९ ) हजरत सय्यद काजी मुताहेर जाहेर— ( १० ) हजरत काजी अमीद—

१८

(११) हजरत सय्यद दादाकपूर— (१२) सय्यद हाजी आबदूल वाहाब— (१३) सय्यद दादा सैलानी— (१४) सय्यद मिरां शाहयांज कमरबस्ता— (१५) सय्यद मोहयद कमरबस्ता— (१६) सय्यदशा चांद सुलतान कमरबस्ता– (१७) सय्यद करम आलीशा कमरबस्ता (मृत्यु छ० १५ रमजान)—(१८) सय्यद मुदनशा कमरबस्ता (मृत्यु छ० १९ रज्जब)— (१९) सय्यद बाहार आलीशा कमरबस्ता— (२०) सय्यद इसहाकशा कमरबस्ता— (२१) सय्यद मोहिद्दीनशा कमरबस्ता— (२२) सय्यद आलीशा कमरबस्ता — (२३) सय्यद इब्राहिमशा कमरबस्ता— (२४) सय्यद इस्माईलशा कमरबस्ता ऊर्फ लालशाबुवा फकीर (विद्यमान)

निवाड पत्र इब्रामंशा वल्द आलीशा फकीर कमर बस्ते मट तसीया कसबे भिलवडी व इसमाल वा। मिरा फकीर या उभयेतात मदनशा बावा याच्या स्वस्थाना-बदल खटला होऊन उभयेता सरकारात गेले सरकारातून आज्ञा जाहली की कसबे मारचे पाडरीत बोलून घेणे त्याजवरून उभयेता कसबे मारचे पाढरीस मान्ये होऊन राजी नामे व करीणे व जामीन दिल्हे त्याजवरून कसबा मारचे पाडरीनी चवकसी पाहून उभयेताचा निवाडा केला सुा। आर्बा मया तैन व आलफ सके १७६१ विकारिनाम सवछरे आशाड शु॥ ७ दर जागा चावडी हाजर मज्यालस पाडर सन १२४९

जबानी बो। मोहिद्दीनशा वा। इसकशा फकीर कमर बस्ते तसीया कसबे भिलवडी सुा। समस आशरीन मया तैन व आलफ लिा। दिल्हा जबानी ऐसी जे आम्हात व मिरा वा। कासीम यात व आम्हात खटला होऊन सरकारात तासगावी गेलो सरकारातून आज्ञापत्र मोकदमाचे नावे दिल्हे जे खटला समजोन घेऊन ताडून सरकारात समजावावे आसे पत्र घेऊन तुम्हापासी गावी आलो त्याजवरून तुम्ही आम्हास आज्ञा केली जे आपापली हाकीकत जी आसेल ती लिा। देणे म्हणोन सांगितले त्यास आमचा मुल पुरुष करम आली साहेब कमरबस्ते हे हिंदुस्थानात धर्मपुर इमाम नगर व आगरे येथे होते त्याचे गुरु चांदबावा याजबरोबर रमते फिरते बंगालेस गटीया रसुलपुरास गेले तेथे गुरूचा काल जाहला आपले च्यार सिसे घेऊन निघाले त्याची नाव

| | |
|---|---|
| १ मुदनशा कमरबस्ते | १ आबदालशा कमरबस्ते |
| १ आबुलशा कमरबस्ते | १ इतीमशा कमरबस्ते |
| २ | २ |

४

ऐसे च्यार सिशे घेऊन रमते फिरत मिरजस आले तेथे सेमना मीर साहेब याचा उरूस करून माघारे जाताना कवलापुरचे मुकामी आले तेथे शरीरास आजार होऊन काल व्हावयाचा समये आला तेव्हां च्यार सिशापैा। मुदन

साहेब तिघा शिशाच्या गुजारनीने जेवल बोलावून आपली वडीलकी निशानी जी होती ती दिल्ही आणि सांगितले आम्हास समाधी दे(णे) ती गावापासून लांब वाहते पाणी पाहून यावी असे मुदनशा साहेब कमर बस्ते यासी सांगुन आपण देह ठेविला नंतर शाह मुदन साहेब यानी लाकडाचा सदुक करून त्यात गुरूस घालून कवलापुरात जमीनीस वायेदा करून जमिनींत ठेविला नंतर त्रीवर्ग निघुन गेले मग मुदन साहेब गुरूचे आज्ञे प्रमाणे जागा पाहून नाद्रेस आले तेथे रानात बेरला नदीचे काठी जाऊन बसले तेथे गावचा पाटील आपले सेतास आला त्याने बाबास पाहून नाद्रेस जाऊन गावकरी लाहानथोर घेऊन आला आणि आर्ज केला की आपण या आरण्यात आमचे रानात कशा करीता बसला ते सागावे त्याजवरून बावानी त्यास सांगितले जे आमच्या गुरूचा काल जाहला त्यास समाधीस जागा पाहिजे त्याज वरून गावकरी याणी बावाचे मनास आली ती जागा दाखविली आणि बावास घेऊन गावापासी गेले गावात राहावेयासी चलावे म्हणोन आर्ज केला त्यास सांगितले जे आम्ही गावात याव-याचे नाही नंतर काजी कबीर पिराचे दरम्यान वोटा होता तेथे गावकरानी बसविले त्या वोटवर आम्ही दरसाल काजी कबीर साहेब याचे उरूसास जात असतो तो वोटा त्याजवर होते फुड कवलापुरास जमीनीनीचा वायदा जाहला मग दाहा बीस माणसे घेऊन जाऊन आपली गुरूची पेटी काढुन नाद्रेस घेऊन आले आणि समाधी दिल्ही तुरबत बांधिली तेथे त्या वेलेस गुरूचे नावे त्या जमिनीची सनद इनाम बीस बिघे करून घेतली फुडे फिरत मिरजस गेले तेथे गावचे बाहीर तल्यामधे देवीचे देऊल होते त्या समोर देवला बाहीर दोन दिवस बसले तिसरे दिवसी देवीची मुहुर्त गुप्त जाहली नंतर गुरवानी पाहून गावात जाऊन गावकरी आणि हाकीमास सांगितले जे देवीची मुहुर्त देवलात नाही गावकरी व हकीम येऊन शा मुदन साहेबास विचारले की या देवला-तील देवीची मुहुर्त काय जाहली ती सागणे त्यास त्याणी विचारले की तुमचा हिंदूचा देव तुम्ही पाहून घ्यावा त्याजवरून सारे हिंदू मिलोन देवीस आराधुन आरती धुपारती केली परंतु देवी आपले आसनावर येईना तेव्हा बावास आर्ज करून सागि-तले की देवी आम्हास दाखविली असता देवीची स्थापना गावात करून ही जागा आपणास देऊ असे सांगितले नंतर बावानी आणीखी आरती धुपारती करून दार लाकून उघडविले तो देवी आपले आसनावर आहे असा चेमतकार पाहून हाकीमानी व गावकरानी देवीची स्थापना गावात केली त्या जागेवर मसूद बावानी बांधली आणि त्या जागवरील जमीन दान बिघेची सनद करून घेतली फुडे आणीखी मला जमीन साडे सात बिघे करून घेतली फुडे आणीखी मिरजेस व नाद्रेस जमीन मिलीवली काही दिवस तेथे होते फुडे कसबे मिलवडी येथ आले आणि मोकदमास भेटुन श्री कृष्णासनिध गावाचे पूर्वेस मट बाधुन राहीले फुडे पश्चिमेस राहीले आहेत गावकरानी जमीन स्वस्था करून दिल्ही ती आनभऊन राहीले मिरज नाद्रेचा माह-सूल आणून येथेच होते फुडे फते फकीर येथे आले त्याची व बावाची मिलाफत

जाहली नंतर धर्मपुर इमामनगर व आगरा याची माहीत आहे की नाही म्हणोन त्या फकीरास विच्यारिले त्यानी माहीत आहे म्हणोन सागितले नंतर बावानी विच्यारिले की तेथे आमचा सिशा भारआलीशा आहे त्याची तुम्हास माहीत आहे की नाही म्हणोन विच्यारिले त्याणी सागितले की माहीत आहे आसे म्हणताच त्या फकीरास सागितले की भारआलीशास सागुन पाठवून यावे त्याजवरून फिरत दोन च्यार वर्षांनी जाऊन भारआलीशास निरोप सागीतला ते निघाले कसबा भिलवडी येथे आले आणि बावापासी राहिले फुडे आणखी बावानी सिश केले त्याची नावे

| | |
|---|---|
| १ कडनशा फकीर | १ पीर महंमदशा फकीर |
| १ मनशा फकीर | १ कासीमशा फकीर |
| व चांदबावा | १ माहबतशा फकीर |
| १ मिराशा फकीर | १ दरगाईशा फकीर |
| १ इसकशा फकीर | |
| ४ | ४ |

८

यो आठ सिसे व भारआलीशा येकून नऊ होते त्यातील मिराशा व मोहबतशा या दोघास मिरजस देसरेसीस ठेविले होते तेथ समाध जाहले व इसकशा फकीर व दरगाईशा फकीर नादरेत मठात ठेविले ते हि मेले बाकी पाच सिसे बावापासी होते फुडे शामुदन साहेब याचा काल समीप आला तेव्हा भारआलीशा बावास जवल बोलावून आपली वडीलपणाची कितावत सदरहु सीशाचे गुजारतीन दिल्ही आणि आपली गुरूची निशानी दिल्ही नंतर येक दोन महिनेनी काल जाहला मग भारआलीशा बावानी त्याची समाधी बाधुन राहिले फुडे पाच साह वर्षांनी भारआलीशा बावाचे गुरुबंधु कडणशा फकीर को अस्टेस जाऊन राहीले व कासीमशा फकीर वसगडेस जाऊन राहिले पीर महमदशा हुकरीस गेले मनेशा फकीर याचा व चांदबावाचा काल येथ च जाहला येणे प्रमाणे चौघे चोकड गेले नतर भारआली बावा आपले मठाचा आनुभव करून राहिला त्याचे पुत्र इसकशाबावा आमचे बाप हे करीत आले त्या माग आम्ही आज परीयंत आनभवीत आहो मिरा फकीर याचा मार तर याचा आजा गरीब बावा त्याचा गुरू चिणगशिाचा सिशा आमदशा फकीर विज्यापुरात राहणार ते येथे भिकस जात येत होते त्याचे बोलसीने गरीबावा कुटुबासुधा आला त्यास तिघी लेकी त्यातील वडील लेक आलीशास लग्न करून दिल्ही दुसरी मुलगी आमचे आजे भार आलीशानी लग्न करून घेतली तिसरी कमालशा फकीर यास दिल्ही आणि गरीबबावा येथ राहीले काही दिवसानी त्याचा काल जाहला त्याचे पुत्र हुसन बावा व हसन बावा व कासीम बावा ऐश त्रिवर्ग आमचे घरी होते फुडे आमचे आजे भार आली बावा व मिरजस उरसास गेले होते तेथ आजार होऊन काल जाहला त्यास आणुन नादरेत त्याचे गुरू

आजे करम अलीशाबावापासी समाधी दिल्ही आणि तुरबत बाधली त्याचेपुत्र इस-कशा आमचा बाप लाहान होते तव्हा हुसन बावा आमचे घरी आमर्चा आजी साय-बू याचे विच्यारे नातेवाईक म्हणोन देखरेख पाहात होते फुड आमचे बाप इसकशा थोर जाहले आणि हुसनशास सांगितले जे आमची देखरेख आमची आम्ही पाहू तुम्ही आमचे घरातून निघोन जाणे म्हणोन सांगितले त्याजवरून हुसन बावा बोलले जे आमची बहीणीची मुल तुम्ही लाहान होता म्हणून तुमचे घरीची देखरेख पाहत होतो तुमची तुम्ही करावी आम्हास समध नाही अेश बोलील आपले भाऊ घेऊन निराली वेघली झोपडी बाधुन राहील काही दिवसानी हुसनशाचा काल जाहला फुडे दाहा पाच वर्षानी हुसनशाचा पुत्र आबदुला फकीर आम्हा बरोबर भाडु लागला त्याज बरोबर त्याचा चुलता आसन फकीर याचा पुत्र इसकशा व कासीम फकीर याचा पुत्र उसमान फकीर बोलू लागले नतर आम्ही जमखिंडीस श्रीमत कैलासवासी आपासाहेबपासी गेलो मार समजोन दिल्हा तो मनास आणुन कसबे मारचे कमाविसदार मोरोपत भावे यास पत्र व मोकदमान यास पत्र श्रीमंतानी दिल्हे त आणुन लाविले पुर्व(व)त प्रमाण आमचे आम्ही आनभवीत आहो फुड दुसरा मार करम अलीशा कमरबस्ते याचे सिशे तिघे काल जाहला त्या वेळेस निघोन गेले त्यांपैा आबदूलशा कमरबस्ते मसवडाहून मिरजस आले त्याचा मार त्याबरोबर बोलायाचा यात लिा कारण नाही सद्रहू लिा दिल्हे आहे यासिवाय आमचा मार त्याहवयाचा राहिला नाही ही लिा दिल्हो जबानी सई छ १० माहे जाावल उर्फ पौष मास सन १७४६

राजेश्री माकदमानी काा भिलवडी गोसावी यांस मान्येपत्र यो माहिद्दीनशा वाा इसकशा कमरबस्ते फकीर तकिया काा मार सुाा समस असरीन मया तैन व अलफ लिा दिल्हे मान्यपत्र अैसीजे आम्हात व मिरा वाा कासीम फकीर यात खटला होऊन तासगावी सरकारात गेलो सरकारातुन तुमचे नावे आज्ञापत्र दिल्हे जे खटला समजोन घेऊन तोडुन सरकारात समजावणे म्हणोन आज्ञापत्र घऊन नुम्हापासी आलो त्याजवरून तुम्ही आम्ही उभयेतास सागितले जे तुम्ही आपाअपली जबानी लिा आ(ण)णे म्हणोन सागितले प्रमाणे आम्ही जबानी लिा दिल्ही आहे त्याचे वाजवी कयास करून सागाल त्याप्रमाणे आम्ही मान्ये असो हे लिा दिल्हे सई तारीख छ २५ माहे रासर मार्गशीर्ष वाा १८ सन १७४६

विाा आपाजी लिगो कुलकर्णी काा मार

यादी आलीशा वाा मोहिद्दीनशा फकीर यासी पुरसीसीची कलमे कसबे भिलवडी सुाा निसा असरीन मया तैन व अलफ छ २१ जिलकाद्

१ मदनशा बावा यानी मार आली बावा यासी आणिला आणि आपले मठाचा मुसत्वाचा आधिकार व निशानी दिल्ही आसे जबानीत लिा दिल्हे त्यास मुसत्वाचा अधिकार व निशानी दिल्ही त्याची साक्षी कागदपत्र काये आहेत त आणुन दाखवणे वहीवाट कसी केली ती लिा देणे

१ मार आली यासी आधिकारी केला ते समई मदनशा बावा याचा काल जाह्ला असेता किंव्हा जिवन आसताना आधिकारी करून मग काल जाह्ला त्याचा माार कसा काये आहे तो लिाा देणे

१ मदन बावाची समाधी मार आली बावानी च बाधली किंव्हा कोणी बाधली ते लिाा देणे

१ तुमचे वडिलाचे वेलेस तुमचा मिरा फकीर याचे समजपत्र च्यार फकीर आणुन करून घेतली म्हणोन मिरा फकीर याणे आपले जबानीत लिाा दिल्हे आहे त्यास समजपत्रे जाह्ली किंव्हा नाही लिाा देणे

---

४

येकून च्यार फुरसीसी उतर लिाा देणे छ माार यासिवाये साधनसूत्र व कागदपत्र आणुन देणे नसल्यास आम्हापासी काही नाही म्हणोन लिाा देणे

जयानी आलीशा वाा महादीनशा फकीर तासिया कसबे भिलवडी सुाा तिसा असरीन मया तैन व अलफ पुरसीसीचें उतर

१ आमचे वडील मार आली यास मुदनशा बावा यानी आपले स्वस्थानाचा मुख्तत्व आधिकार व निशानी दिल्ही त केाा माारचे पाढरीचे साक्षीन पत्र करून शामुदनशा बावानी च करून दिल्हे आहे ते च पत्र समजोन घ्यावे आधिकारापासून तसया प्रकर्ण काही कागदपत्र आसतील ते समजोन घ्यावे

१ आमचे वडील मार आलीशा यासी शामुदनशा जिवत आसता आधिकार दिल्हा की याचा काल जाह्ले नंतर दिल्हा हे लिाा देणे त्यात सदरी कलमात पत्राचा मार लिाा आहे त्याजवरून समजू(न) घेणे

१ शामुदनशा बावाची समाधी बाधली म्हणोन लिाा त्यास समाधी बाधली व स्वस्थानाची देखरेख साधनसूत्र मार आली करीत होते त्या आलीकड आमचे आजे इसकशा व आमचे वडील माहीदीन ाा करीत आले

१ आमचे वडीलाचे वेळस समजपत्र जाह्ली किंव्हा नाही तो माार लिाा देणे त्यास समजपत्र आपणापासी नाही आम्ही तोडान काये सागाव

यासिवाय साधनसूत्र कागदपत्र काये आसतील ते समजोन देणे म्हणोन लिाा त्यास प्रथम कलमात च कागदपत्र समजोन दनो म्हणोन लिाा आहे

पुरसीस आलीशा वाा माहीदीनशा फकीर काा भिलवडी सुाा तिसा असरीन मया तैन व अलफ छ २६ जिलकाद

१ मारआलीपासून वहीवाट तासियाचा आज ताा कोणी कसी केली ती लिहून देणे व मुदनशा याणी मुख्तत्व व आधिकार व निशानी दिल्ही ते को माारचे साक्षीन पत्र करून दिल्ही व आधिकारापासून कागदपत्र आसतील ते सम-

जोन घ्यावे म्हणुन पहिले पुरसीसीचे उतरात लिा त्यास साक्षीपत्र व कागद्‌-
पत्र आसतील त्याच्या नकला करून फिरस्त कडून आणुन देणे

१ तसियाचा इनाम आमानत कशाबाा जाह्‌ले व कधीपासुन आहे ते लिा देणे

१ मुदनशा याणी आधिकार दिल्हा तो नियत आसता आधिकार देऊन वहीवाट केली किव्हा त्याचे पाटीमाग केली व आधिकार कोणते ठिकाणी दिल्हे ते वेळेस त्यास दुसर सिशे होते की नव्हते लिा देणे

१ मिराबावा फकीर खटला कधीपासून सागतो व त्याची वहिवाट कसी आहे ती लिा देणे

१ वडिलाचे वेळेस समजपत्र जाह्‌ली की नाहीत त्याचे उतर समजपत्र आम्हा-पासी नाही म्हणोन पेशजी पुरसीसीचे उतरात लिा दिल्हे त्यास समजपत्र जाह्‌ली की नाही व फकीर आणुन त्याचा ठराव केला होता की नाही ते लिा देणे

पुरसीसीचे उतर आलीशा वा माहीदीनशा फकीर कौ भिलवडी मुा तिसा आसरीन मया तैन व अलफ

१ मारआलीपासून वहिवाट तसियाचा आज तागाईत कोणी कसी केली ही लिा देणे मुदनशा यासि मुखत्व व आधिकार व निशानी दिल्ही ते कसबे मारचे साक्षीपत्र करून दिल्हे व आधिकारापासून कागद्‌पत्र आसतील ते समजोन घ्यावे म्हणोन पहिले पुरसीसीचे उतरात लिहिले त्यास साक्षीपत्र व कागद्‌पत्र आसतील त्याच्या नकला करून फिरस्त लाऊन आणुन देणे म्हणोन त्याचे उतर मुदनशाबावा यानी मारआलीबावा यासी आपले स्वस्थानास आधिकारी कौ मारी करून वहिवाट जिवत आसतानाचे करावयासी लाविली त्या ताा आजपावेतो वहिवाट आम्ही करीत आलो मिरा फकीर याची मावलण ती आमचे आजे इसकशा बावा याची मातुश्री त्या नातेन आमचे वडील लाहान मुल म्हणोन बाहेणीने भावास च्यार दिवस घरी ठेविले आमचे वडील थोर जाह्‌ले नतर मावलेस बाहीर काडुन दिल्हे पुर्वीपासून आधिकारातागायत कागद्‌पत्र जे काय आहेत त्याच्या नक(-ला क-)रून फरिस्त घालून दिल्हे आहे

१ तसियाचा इनाम आमानत कशाबाा जाह्‌ला व कधीपासुन आहे ते लिा देणे त्यास त्याचे उतर हुसनबावा बाहीर जाऊन राहिले नंतर त्याणी आमचे इसकशाबावा यास खटला काही केला नाही आलीकड आबुलशा याणी खटला केला आणि भास्करपंत कोलटकर यासी गैरवाका समजोन आमचे दाग्यातील बाजरीचे चलन फडुन बाजरी व पेवातील जारी जबरदस्तीने कोलटकर याजकडून नेह्‌ली नंतर आमचे वडील इसकशाबावा सरकारात जमाति-हीस श्रीमत राजश्री आपासाहेब साहेबाकडे गेले आणि आपला मार समजोन

घेऊन कमावीसदार व गावकरी यास पत्र दिल्हे ती पत्र आणुन वडीलानी का मारी दिल्ही मग कमाविसदार याणी गावकरी यास बोलावून आणुन आवदुलशा यास ताकीद केली की तू जबरदस्तीने समध नसतां बाजरी व जोरी नेहलीस याचा फडशा करून देणे + + काही बोलणे आसल्यास हुजूर जाणे येण प्रमाणे सागितले असता ते न करिता श्रीमत राजेश्री मत्री साहेव याजकडे गेला तेथे तेथे जाऊन गैरवाका समजाऊन देऊन इनामाच्या माहसुलास आडथळा केला नंतर आमचे वडील श्रीमत राजेश्री आपासाहेब याजकडे गेला नतर हालगार समजून दिल्हे मग साहेबानी आज्ञा केली की स्वारी को मारी जाणार आहे तेथ मंत्री कडील कारकून आहे त्यास आणुन तुमचा माहसूल मोकला करऊन दिल्हा जाईल या प्रो स्वारी आले नतर मत्रीसाहेबाकडील कारकून बोलावून आणुन त्याचे बोलणे समजून घेऊन आडथलले माहसुलाची मोकलीक केली आणि सन आर्बाचे साली अैवज गावकराकडून देविला त्यापासून वहिवाट आम्ही करीत असता आणीखी मिराबावा याणी सटला केला आणि गावकर याजकडे गेला आणि आम्हास बोलावणे केले नतर आमचे वडील हि तेथे गेले मग आपआ-पलीयाले मार समजुन दिल्हे मग गावकर याणी सागितले की इनामाचे माहसुलास आडथळा केला करू नको म्हणोन मिराबावास सागितले आणि कायै बोलणे आसलीयास रासी परीयंत बोलून घेणे म्हटले नंतर आमचे वाट-करी याणे इनामाची म्हनत केली सटलेचा मार भास्करपंत कोलटकर त्याजपा (सून त्याचेपुर्वी काही नाही

१ मुदनशा यानी आधिकार दिल्हे तो ते जिवंत आसता आधिकार देऊन वहिवाट केली किम्बा त्याचे पाटीमाग केली व आधिकार कोणते ठिकाणी दिल्हे ते वेलस त्यास दुसरे सिशे होते की नव्हते ते लिा देणे त्याचे उतर मुदनशा बावा जिवत आसता आधिकार दिल्हे वहिवाट आधिकारापासून करीत आले आधिकार हि कसबे मारीचे दिल्हे दुसर सिष आणीखी होती त्याची नाव

| | |
|---|---|
| १ कडनशा | १ पीर महमद |
| १ कासीमशा | १ मतशा व चा-द बावा |

येणेप्रमाणे होते फुड काही दिवसानी कडनशा आस्टेस गेला पीर महंमदशा हुकरीस गेला कासीमशा वसगडस गेला मतशा चांदबावा येथे च काल जाहला कलम

१ मिराबावा सटला कधीपासून सागतो व त्याची वहिवाट कसी आहे ती लिा देणे त्याचे उतर सटला म्हणोन आवदुला याणे भास्करपत याचे हि माहितीने (क)ला त्यापूर्वी त्याचे वडिलानी सटला म्हणोन केला नाही वहिवाट म्हणावी तरी

पुर्वीपासून याचा स्वस्थानास समध बोलावयासी संमध नाही वहिवाट म्हणावी तरी आमची आम्ही करीत आलो

१ वडिलाचे वेलस समजपत्र जाहली की नाही त्याचे उतर समजपत्र आप(णा)-पासी नाही म्हणुन पेशजीच्या पुरसीसीचे उतरात लिा दिल्हे त्यास समजपत्र जाहली की नाही व फकीर आणुन त्याचा ठराव केला होता की नाही त्याचे उतर समजपत्र म्हणावे तरी आम्हापासी नाहीत वडिलाचे तोडाचा अैकीव मार आबदूल यानी दोन च्यार फकीर आणिले होते त्यास आपला मार बोलत होता ते समई फकीर याणी आमचे वडील इसकशाबावा याश मार विच्यारला वडिलानी साफ उतर केले मिरा यानी आम्हास बोलावयासी समध नाही असे सागितले आसता आबदुला याण बालू गारे यास आणुन गैर समजुतीन पत्र दोन लिहिली आणि वडिलास वाचुन दाखविली . नंतर समंध नसता अैसी पत्र ल्यावयाचे कारण काये म्हणोन रागे भरून तासगावास निघाले ते वर्तमान गावकर यास समजले नतर गावकर सरकार वाड्यांत जाऊन बावास बोलाऊन माघारे आणिले मग बालु गारे यास आणुन तगादा करून त्याणे दोन पत्र लिा होती ती मोकासी व गावकर याणी घेतली आणि बावास सागितले की आपले तकि(या)त जाऊन खुसरूप राहणे त्याप्रो जाऊन ते राहिले

१ पुरसीस आलीशा वा माहिदीनशा फकीर तकिया को भिलवडी सुा सलासीन मया तैन व आलफ समजपत्र बालू गारे याणी केले त्यास आम्ही मान्ये जाहलो नाही समजपत्र बालू गारे याजपासून सरकारात घेऊन तगादा केला होता म्हणोन लिा दिल्हे आहे त्यास त्याचा दाखला काये आहे तो लिा देणे छ ५ जिल्हेज

१ पुरसीसीचे उतर आलीशा वा मोहीदींनशा फकीर तकिया को भिलवडी सुा सलासीन मया तैन व आलफ समजपत्र बालू गारे याण केले त्यास आम्ही मान्य जाहलो नाही समजपत्र बालू गारे याजपासून सरकारात घेऊन तगादा केला होता म्हणोन लिा दिल्हे आहे त्यास त्याचा दाखला काये आहे ते लिा देणे म्हणोन छ ५ जिल्हेज पुरसीस याचे उतर समजपत्र गैर समजोतीने बालू गारे याण लिहिली ती पत्र गावकर याणी मोकासी याजकडुन दोनी पत्र तगादा करून घेतली याचा दाखला आम्हापासी नाही ती पत्र च गावकरापासी व माहितगारी गावकर यासी आहे येणप्रो वडिलाचे मुखे अैकिले छ मार

१ पुरसीस आलिशा फकीर यास फकीर घेऊन बालू गारे याची हलची समजपत्र जाहली ती गैर समजोतीची सबब सरकारात समजपत्र घेऊन बालू गारे

१९

याजपासी गुनगारी घेतली ती समजपत्र हली निराली आहेत म्हणोन म्ह(ण)णे त्यास ती समजपत्र कोणाजवल आहेत त्याचा ठिकाण लावून देणे छ १९ माहरम सन सलासीन मया तेन व आलफ

१ पुरसीस आलीशा फकीर यास फकीर येऊन बालू गारे याची हनची समजपत्र जाहली ती गेरसमजोतीची सबब सरकारात समजपत्र घेऊन बालू गारे याजपासी गुनेगारी घेतली ती समजपत्र हली निराली आहेत म्हणोन म्ह(ण)णे त्यास ती समजपत्र कोणाजवल आहेत त्याचा ठिकाण लाऊन देणे म्हणोन छ १९ माहरमी पुरसीस घातली त्याचे उतर समजपत्र गेरसमजोतीन जाहली सबब आमचे वडील तासगावास सरकारात निघाले हे वर्तमान गावकरास समजोन त्यांणी जाऊन मंत्री याचे वाड्यात मोकासी यासी समजाविले त्यानी आमचे वडिलास गावकर याजकडून माघारे आणिले नंतर बालू गारे यास गुनेगारी लावली आणि समजपत्र दोनी मोकासी व गावकरी यानी घेतली त्याची पुरवणी पाढरीमते करून देऊ छ ५ माहे संफर सद्‌रहू प्रो पाढरमते पुरवणी करून देऊ + + उतर वाद सागतो हा आम्ही खोटे वाद सागणार नाही छ मार

पुरसीस आलीशा फकीर यास मुदनशा बावा व गरीबबावाचे वेलच्या सनंदा पारसी दक्षण आक्षराच्या ज्या होत्या त्या हुसनबावा याजपासी भाडार घरात होत्या तो मृत्यं पावलेवर ते कागद्‌पत्र इसकशा याणी ठेविले म्हणोन मिरा बावा याण लिा दिल्हे आहे त्यास सद्‌रहू प्रो कागद्‌पत्र कोणाचे वेलचे कोणाजवळ होते ते कोणी कोठे ठेविले व कागद किती आहेत त्याचा मार कसा आसल तो लिा देणे छ ७ सफर सन सलासीन

१ पुरसीस आलीशा फकीर यास मुदनशा बावा व गरीबबावाच्या वेलच्या सनंदा पारसी दक्षण आक्षराच्या ज्या होत्या त्या हुसन बावा याजपाशी भाडार घरात होत्या तो मृत्य पावलेवर ते कागद पत्र इसकशा याण ठेविले म्हणोन मिरा बावा याण लिा दिल्हे आहे त्यास सद्‌रहुप्रो कागद पत्र कोणाच्या वेलचे कोणाजवल होते ते कोणी कोठे ठेविले व कागद किती आहेत त्याचा मार कसा आसल तो लिा देणं म्हणोन छ ७ सफर सन सलासीन पुरसीस घातली त्याचे उतर

१ शामुद्‌नबावाच्या वेलच्या सनदा आहेत बीतपशील

| | |
|---|---|
| १ काो नाद्‌र | १ काा कपडे |
| १ काो भिलवडी | १ मौजे तिरगाव |
| १ मौजे आकलखोप | २ |
| ३ | |

यो पाच गावच्या सनंदा इद्वी पारसी आसल च आहेत समजोन त्याम्या चाचा तपसील

| चालतात | चालत नाही |
| --- | --- |
| १ काो नाद्र | १ काो कवठे |
| १ काो मिलवडी | १ मौजे सिरगाव |
| १ मौजे आकलसोप | २ |
| ३ | |

५

१ गरीबबावा हा चिणगीशा फकीर विज्यापुरी राहणार याचा सिसे चिमगीशा याच्या सनदा गरीबबावास ठाऊक येथील आमच्या शामुदन बावाच्या सनदा आहेत त्या सदरी लिा च आहेत गरीबबावा याचा येथ समध च नाही

१ हुसनबावा याजपासी माहारघरांत सनदा होत्या ते मृत्य पावलेवर इसकशा बावानी ठेविल्या म्हणोन पुरसीसीत लिहिले त्यास जे काही कागदपत्र शामुद्नशाबावा यानी आमचे पणजे भार आलीबावा याजपासी देऊन मृते पावले त्यापासून आमचे आप(णा)पासी च आहेत हुसनबावा म्हणावे तरी पणजीयाचा भाऊ म्हणजे तिजपासी होता माहारघर कोणाचे + + कोण माहारघराचा यास समधच नाही येणेप्रो आहे छ मार

१ यादी आलीशा वा माहिदीनशा फकीर तकिया काो मिरवडी मुा निसा आसरीन मया तेन व अलफ तकिया स्वस्थान समंधी वहिवाटीचे कागदपत्राच्या नकला छ ४ माहे जिल्हेज

१ शामुद्नशाबावा याणी भार आली यास कितावत मुसत्व सिलेपणाचा आधिकाराचे पत्र करून पाठरीचे साक्षीन पत्र करून दिल्हे ते पारसी आहे त्यास इली पारसी लिहिण येत नाही सबब ते च पत्र ठेविले कारण पडल ते वेलस देऊ

१ माई सताजी पाटील मौजे आकलसोप दाहृ मोहबत हू

छ आज दिल यकलास सेख मिराजी सलाम बाजेंत सलाम माहल लकबा सुद आकी येथील खेर जाणुन तुम्ही आपली खेर लिहीत जाणे दिगर मुदनशा फकीर याचा इनाम मौजे मारी आहे म्हणोन त्याचा वालका मारआली याणी आम्हास सागितले की ताकीदरोखा आणिलेया वेघले इनामाची जमीन चालत नाही तर तुमचे वडिलानी चालविले असले तर तुमचा कागद आमचे नावे व तेथे मौजे मारी कमावी(स)दार आहेत त्याचे कागद आला म्हणजे दरबाची ताकीद घेऊन देऊन विगर तुमचे लिहिणे आलिया वेघले हे काम होत नाही तरी खेरानीचे आहे वडिलानी केले मोडू येत नाही

जमी चालविली आसल तैसे लिा पाठविण ज्यादा काये लिहींण मेहर आसो दिजे हे कितावन मोर्तव आहे

१ पंडित नरसी पडित मा आकलखोप दाहा मोहबत हू

छ आज दिल येकलास सेख मिराजी सलाम याजन सलामं मोहबत सुत आकी येथील खैर जाणोन तुम्ही आपली खैर लिहिण दिगर मोजे मार हजरत मुदनशा फकीर याचा इनाम पहिलेपासून चालत आला आहे म्हणऊन येऊन त्याचा बालका भार आली यानी सागितला हली ताकीदरोखा हुजूरचा आलिया वेघले चालू देत नाही म्हणऊन सागितले तर आम्ही राजेश्री सताजी पाटिल + + + लिा आहे तरी तुम्ही त्यास विचारून काम धर्माचे खेगत च आहे त्याचे कैसं काये आहे ते पाटलाचा कागद व आपला कागद आलियाने दरबारचे ताकीदपत्र घेऊन पाठऊन देऊन गावकरानी चालविले असल ते मोडावे येसे नाही तर आपण हि धर्म-कृत आहे हे गोस्ट आगत्य लिा पाहिजे हे कितावत मोर्तब आहे

सिका आहे

१ तपोनीधि राजेश्री इसकशाबा(वा) फकीर तासिया को मिलवडी स्वामीचे सो कबज यो सेदाभाई गासा व चांदखान मुला मोजे आकलखोप सुा इहीदे सबेन मया ( व ) आलफ राजेश्री सुभानराव सुरवसी याची नोबत मातुश्री लक्ष्मीबाई पाटलीन याचे विदेमान्य रुपये ७० सतरीस विकत तुम्हास दिल्ही त्यापो रुो पावले

कीा ४० फालगुण शुा २

या रुो साट भरून पावलो हे कबज सई छ १ जिलकाद २

साक्ष

चिलापा तातुगडा १ — भिकू खुला १

सिवजी सोनार

विा लिगो माहदेव कुलकर्णी का मार

१ तपोनिधि राजेश्री इसकशावावा फकीर तसीया को मिलवडी यास कबज बो चांदखान मुलाणी मोजे आक(ल)खोप सुा इहीदे सबेन मया व आलफ राजेश्री सुभानराव सुरवसी नोबत रुो सतरीस तुम्हास विकत आमचे विदे-मान्ये दिल्ही त्यापो पेशजी रुो साठ आमचे पदरी घातले त्याचे कबज हा जिनस तुम्हाजवल आहे बाकी रुो दाहा राहिले होते ते आमचे पदरी घानले भरून पावलो हे कबज लिा सई छ १५ जिलकाद

साक्ष

फकीर खानबावा — चिलापा तातुगडा

साजाचा लेक

चि॥ लिंगो माहदेव कुलकर्णी का॥ मा॥

१ आजम इसकशा फकीर को भिलवडी यासि

कारकुनानि व मोकदमानि को मा॥ सु॥ इहीदे तिसैन मया व आलफ तुम्हापासी पेशजीच्या सनदा इनामाच्या आहेत त्याजपै॥ काही तुम्हाकडे जमीन चालती परंतु तर्हीयाचे साटवेच फार सबब सालमारी पासून पड जमीन बिघे ७२ तुम्हास दिल्ही आसे तरी कीदे माहमुर करून सुखरूप राहणे छ १८ जावल मोर्तब आहे ,

बार

१ आजम इसकशा बाबा फकीर तकिया का॥

भिलवडी गोसावी यांसि

करारपत्र बो समपा वीन लियाजी साटे वा॥ को मा॥ सु॥ इसने तिसैन मया व आलफ दिल्हे कागद असा जे तुमचे इनामा बा॥ पड जमीन बिघे ७२ दोन तुम्हास कौलाने दिल्ही पाच वर्ष तिजाई भाग तुम्हास जे उतपन होईल ते द्यावे साहवे वरसी पच भाग सातवे वरसी तुमचे सेत निकुंदी सोजवल करून तुमचे स्वाधीन करू यात आंतर पडल तर तुमचे इनामाचा दिनाव भरून देऊ हे लि॥ दिल्हे करारपत्र स छ १६ माहे रावल

साक्ष

१ राणोजी पंतोजी

चि॥ लिंगो मादव कुलकर्णी

को मजकूर

स्वरूपा पाठोला

भुजगा कालपा

१ राजेश्री मोरो लक्ष्मण माव्ये स्वामी गो॥

शेवक रामचद्र परशराम नमस्कार विनंती उपरी इसकशा फकीर को भिलवडी याची को मा॥री इनाम जमीन आहे ती याजकडे पेशजी पासून चालत आलेप्रमाणे भोगवटा होत असता हल्ली आबदुल्शा फकीर नवीन दिकत करून यासी सटला करितो व याचे पेवातील दाणे जबरदस्तीन नेल्हे म्हणोन विदित जाहले असीयास इसकशा फकीर याचा इनाम याजकडे चालत असता आबदुलशा फकीर कजिया करितो त्यास तुम्ही निखुन ताकीद करून इसकशा फकीर याचे दाणे पेवातील दाणे नेल्हे आसतील ते वगैरे याचे यास देऊन फिरून बोभाट न येही न करत जाणे धटाई केलेस जमीन इसकशाकडे चालती करून हरदूजणास हुजूर पाठवीण बाजवी मनास आणुन

आज्ञा करण ती केली जाईल रवाना छ २९ सफर सुाा इसने सलातीन मय तेन व आलफ हे विनंती

श्री गणपती

सिका नकल

आज स्वारी राजेश्री रामचद्र परशरांम

ताा मोकदमानी कोा मिलवडी सुाा इसने मया तेन व आलफ इसकशा कोा मार याचा इनाम जमीन आहे ती याजकडे पेशजीपासून चालत आले प्रो मोगवठा होत आसता हली आबदूलशा फकीर नवीन दिकत करून यासी सटला करतो व याचे पेवातील दाणे जबरदस्तीने नेहले म्हणोन विदित जाहले असीयास इसकशा फकीर याची जमीन इनाम याजकडे चालत आसता आबदूलशा कजीया करितो त्यास तुम्ही निक्षून ताकीद करून इसकशा फकिराचे दाणे पेवातील नेहले असतील ते वगैरे याचे यास देऊन फिरून बोभाट न ये त करणे धटाई केलीयास हरदूजणास पाटविणे बाजवी मनास आणुन आज्ञा करणे ती केली जाईल जाणिजे छ २९ माहे सफर मोर्तब

राजेश्री पांच पंचाईत मोकदमानी कसबे भिलवडी गोसावी यासि—— ——
करीणा बो मिराशा बा कासीम बाबा फकीर तकीये काा भिलवडी व नांद्रे सुाा समस आशरीन मया तेन व आलफ कारणे लिाा दिल्हे करीणा असा जे आम्हात व मोहिदीनशा यावात वतनदारीचा वगैरे सटला लागुन आम्ही उभयेता तुम्हापासी आलो त्यास तुम्ही सागितले जे तुमचा करीना काय आसल तो लिाा देणे त्याजवरून मदन-शाबाबा याचे गुरू करीम आली बाबा हिंदुस्थानातून चौथे सिष घेऊन आले त्याची नावे मदन बाबा व आयुलशा बाबा व महमदशा बाबा चौथ सिषाचे नावे स्मरणात नाही चौघ सिष व आपण मिळोन फिरत फिरत मिरजचे उरसास आले उरूस केला नतर करम अली बाबास समाधान वाटेनासे जाहले तेव्हा कवलापुरास घऊन आले (नं)तर तिथे सिष निघून गेले मदन बाबा येकठा होते नतर करम आलीबाबा याचा काल जाहला नतर पटीत घालून कवलापुरी ठेविले गुरूची आज्ञा होती की वाहते पाणीनजीक आमची समध जागा पाहून बाघणे असी आज्ञा गुरूची होती त्याप्रो जागा पाहत पाहत काा नाद्रेस आले नतर गावकरी याज पासी म + +
(जा)गा मागुन घऊन करम आली बाबा याची पेटी कवलापुरी होती ती आणुन समाध बाधली आणी गावकरी यानी मठाची जागा व जमीन दिल्ही त्याचे पत्र मदन बाबा याणी आपले गुरूचे नावे करून घेतले नंतर फुडे काही दिवसानी मदन बाबा मिरजचे उर-सास गेले आणी दर्गेत जाऊन पहिली जागा होती त्या जागेवर बसून उरूस केल ते समई चिणगीशा फकीर विज्यापुरकर हा हि उरूसास आला होता त समई उभय ताची गाट पडली आणि मदनबाबा यानी चिनगीशा बाबा फकीर याचा मुल मागी

नला तेव्हा बिनगीशा यानी आपला सिसे गरीबबावा यासी मदन बाबा याचे वोटन घातला ते समई उरसास समस्त फकीर स्वस्थानी व मलंग फकीर आले होते त्याचे विदेमान्य वोटन घातला फुडे आठ च्यार दिवसानी बाबा यास जागा पाहिजे म्हणोन मालगाव वसीबाहीर देवीचे देऊल होते तेथे जाऊन मदनबाबा बसले जवल गरी(ब) बाबा होता दोन तीन दिवस आसन घालून बसले गावात कोणी पुसले नाही सबब बाबानी तेथे च चमेंतकार दाखविला श्री देवी देवलात नाहीसी केली तो दुसरे दिवसी गुरव पुजा करावयासी आला तो देवी देवलात नाही तव्हा गुरवाने फकीरास विच्यारले तू येथ येसलास आणि देवी कोठे टाकलीस हे सांग तव्हा मदनबाबा यानी उतर केले की आम्हास तुझी देवी दखल नाही मग गुरव यानी गावात जाऊन सागितले की देवी देवलात नाही हे कल(प)ना फकीर येक मात्र देवीसमोर आसन घालून देवला-बाहीर बसला आहे अैसे वर्तमान सागता जे गावातील दाहा वीस माणस मिलोन आली आणि फकीरास विच्यारले की तू येथ का बसलास त्याने उतर केले की आम्हास बसावयास जागा पाहीजे म्हणोन बैसलो देवीची मुहूर्त देवलातील काये जाहली म्हणोन गावकरी याणी फकीरास विच्यारले त्यानी उतर केले की आम्हास ठाऊक नाही तुमची देवी सत्य आसली यास हाक मारणे म्हणजे तुम्हास भेटल त्याजवरून गावकरी यानी देवीस प्रार्थना केली की अैसी मुहूर्त देवीची काही देवलात मुहूर्त दिसेना तव्हा गावकरी मिळोन होते त्यानी येऊन मदनबाबास विनती केली की ही जागा आम्ही आपणास देतो देवीची भेट चमत्कार आमची करावी म्हणजे आम्ही देवी गावात घेऊन जातो आपण मठ बाधुन येथ राहावे अैसे बोलता च मदनबाबानी सागितले की देवीची दार लावावे म्हणता च दार लावले नतर फकिरानी देवीची प्रार्थना केली आणि हाक मारता च देवलाचे दार उघडले पाहता तो देवीची मुहूर्त आपले जागयावर आहे हे समस्त मिळोन होते त्यानी पाहीले नतर देवी गावात नेली आणि देवलाची जागा होती ती मदनबाबास मठ बाधावयास दिली बाबानी मठ बाधिला तेथे काही दिवस होते फुडे या मठाचे रखवालीस पाहिजे म्हणोन आपले गुरुबधु आबुलशा फकीर हे मसवडास होते त्यास बोलावणे पाटऊन आणील ते येते समई आपले दोघे सिसे घऊन मिरजस आले नतर काही दिवसानी आबुलशा बाबा याचा काल जाहला तेव्हा मठाफुडे समाधी दिल्ही आणी त्याचे दोघे सिसे मदन बाबापासी होते फुडे काही दिवसानी विज्यापूरचे बाछयास वर्तमान कलले की मिरजेत वली कोणी आला आहे त्याचे दर्शन घ्यावे म्हणोन आपला कारभारी पाठ-विला तो मिरजच्या मठात आला त्याने येऊन आर्ज केला की तुम्हास बाछयायानी बोलाविले आहे तेव्हा मदनबाबा यानी उतर केले की आम्ही काही येत नाही सिसे पाटऊन देतो अैसे बोलले नंतर आबुलशा याचे सिसे मठात दोघे होते ते पाटऊन दिल्हे बाछयायानी विच्यारले त्याचे उतर यानी केले त समई बाछयनी सतोष होऊन सनंदा करून दिल्हे त्या घऊन मिरजस आले आणि मदनबाबा

दाखविल्या बावानी पाहिल्या तो पाटविले होते यानी आपले नावे सनदा करून घेतल्या होत्या यानी मदनबावानी त्यासी पुसिले तुम्ही आपले नावे कागद करून घ्यावयास कारण काये त्यानी उत्तर केले आपले गुरुब-धुचे सिसे आणि तुमचे सिशे हेल्दान(!) नाहीत तेव्हां बोलल रागे भरले आणि त्यास काही दिवसानी मठातून काढून दिल्हे मग रसवलीस फकीर ठेवला आणि आपण निघून नादरस आले आबुलबाचे सिसे बाहीर घालविले होते त्यानी मिरजचे मठावर दावे धंदे दिवाण राऊल करू लागले तव्हा ठाणेदार यानी आणून मठात ठेविले मदन बावा नादरेहून का मारी आले तव्हा गरीबावा बरोबर आहे आलेत गावाचे पुर्वेस नदीतटाकी येऊन बसले तेथे गावकर यानी च्यार खण बाधुन दिल्हे आणि जमीन होती मठानजीक भांग तबाकुस दिल्ही काही दिवसानी नदीस पाणी येऊन मठ पडला तेव्हा गावाचे पश्चिमेस जागा दाखविली तेथे मदनबावानी मठ बाधला आणि राहिले दरवस पाडलीहून मतेशा व याचा लेक चांदबावा ऐशे दोघे जण आले त्याणी बावास गुरू करून मठात राहिले नतर मठाची देस चांदबावा करू लागले आणि गरीब बावाकडे गुराची व इनामाची वगैरे देखरेख करू लागले नतर काही दिवसानी मते-शाचा काल जाहला फुडे चादबावा वगैरे गरीबबावा होते नंतर मदनबावानी व चांद-बावानी गरीबबावाचे लग्न केले नंतर गरीबबावास मुले जाहली नंतर भार आलीबाव मलंग हा हि फिरत फसवे मारास आला तो मठात राहीला महिना दोन महिने राहिला नतर निघोन गेला फुड वर्षासाहा महिने न भार आलीबावा फिरून आला तो चांदबावानी ठेऊन घेतला मांत्रास शाहणा आहे म्हणोन ठेऊन घेऊन केस काढले आणि पहिला सिसे गरीबबावा मठात आहे दुसरा भार आलीबावा हि मठात ठेविले फुड काही दिवसानी कडनशा आला त्यास हि सिसे केला कडनशा बावात व चांदबावांत पडना तव्हा कडनशाबा(वा) उठोन आस्टेस गेले फुडे काही दिवसानी मदनशा बावाचा काल जाहला नंतर गरीबबावा याची लेक दुसरी चांदबावानी भार आली बावास दिल्ही आणि लग्न भारआलीचे केले थोरली मुलगी शा आलीबावा मिरजेच्या मठातील त्यास दिल्ही गरीबबावा व भार आली बावा येकत्र चालले फुडे काही दिवसानी चांदबावात व भार आली बावात पडना तव्हां भार आलीबावा नादरेत येकटा च मठात जाऊन राहिला बायको येथ च होती पीठमीठ येथून जात होते भार आली-बावाची बायको येथ होती भार आली जाऊन यऊन होता चांदबावानी गाई पाचशे होत्या त्या विकून पैका केला होता नंतर गरीबबावा मेला त्यास पुत्र तिघे होते लहान होते त्याची नावे वडील हुसनबावा दुसरा हसनबावा तिसरा कासीम बावा ऐस तिघे होत नतर चांदबावाचा काल जाहला फुडे मठात भार आलीबावा व हुसनबावा उभयता मठाचा देखरेख पाहू लागले भारआली यास पुत्र तिघे वडीलाचे नाव इसकशा दुसरा उसमानशा तिसरा हैदरशा ऐसे तिघ पुत्र काही

दिवसानी मिरजस उरुसास गेले तेथे भार आलीबाबाचा काल जाहला तेथुन आणून नांदरचे मठात समाधी दिल्ही फुड हुसनबावा व इसकशा दोघे येकत्र होते मठाची देखरेख उभयतानी केली संसार एकत्र होता नादरेचे मठात कोणी नाही तेव्हा हुसनबावानी आपला भाऊ हासनबावा ठेविला तो कुटुंब सुधा पाच पचेवीस वर्ष होता तथील वहिवाट हसनबावानी केली ती माहितगारी नादरेकर गावकर यास ठाऊक माहीत आहे गरीबबावा याचे व चांदबावाचे कालकीर्दीचा पैका होता तो खर्च हुसनबावानी व इसकशाबावानी करून मदनबावाचा मठ कसबे मारी बांधला त समई उभयताचे कुटुंब सुधा येकत्र होत हुसनबावाचा काल जाहला नंतर हुसन-बावाचा लेक आबदुल हेकत्र भांडार घरी राहिले आणी हासनबावास व कासीमबावास उभयेतास वाडी वसू लागली त समई भाडारघरचे पछेनस पाच खण मठातील लाकडे घालून बाधु त्या मालीत उभयेता होते फुड काही दिवसानी हुसनबावाचा लेक आबुल भांडार घरी होता त्यास ही काडुन आम्हाकडे लाऊन दिल्हे आम्ही त्रीवर्ग राहिलो इनाम सेताचे वगैरे दाणे आले गेलेस खर्च होऊन बाकी राहील ते इसकशा व हुसन बावा उभयतानी मिळोन घेतले होते आलीकडस इसकशा याचे पोटात कलपना येऊन कुरकुर करू लागला त समई नादरेचे घुमठाचे काम चालले होते गुमठास खर्च दोघे मिळवडीचे व नादरेचे इनामापों विकून खर्च कम भास्करपत कालटकर याचे कर्ज आबदुलशाने देण होते त्यास त्याचे देणस भाडार घरचे समईक बाजरीचा बलत होता त्यापैा बाजरी कोलटकरास घातली म्हणुन इसकशानी खटला केला आणि निघून जम-सिंडीस गेला आणि गावास ताकीदपत्र आणली की हुसनबावा व इसकशास भाडतो त्याचा समध नसता खटला करीतो त्यास ताकीद करणे म्हणोन आज्ञापत्र गावास घेऊन आले त्या उपरी आमचे वडील बधु जमसि(डी)स जाऊन आमचा तंटा समजा-विला नंतर त्यानी आज्ञापत्र गावकरी यास दिल्हे की पुर्व(व)त प्रो। उभयताचे वडील चालत आले प्रो चालवावे याप्रो। ताकीद करणे म्हणजे पत्र गावास आणिली त्यानंतर इसकशाचा लेक मोहीदीनबावा विसलामपुरास श्रीमन राजेश्री मश्रीसाहेब याजकडे गेला नतर आम्हास म्हणो लागले ननर आम्ही मोकासियाचे पत्र घेऊन विसलामपुरास गेलो पत्र श्रीमनास दिल्हे उभयताचा मार विच्यारून घेतला त्यानी सागितले की च्यार फकीर व गावकरी याजपासी जावे खटला तोडून घेणे खटला तुंट-परीयंत इनामास जप्ती म्हणोन पत्र दिल्हे ते पत्र घेऊन गावास आलो पत्र मोकासी-यासी दिल्हे आम्ही त्यास पत्र दिल्हे होते पत्र मोकासीयासी त्याणी दिल्हे नाही इनामाची जप्ती केली ती तीन वर्ष होती उभयेतानी देव बोलाऊन आणावे आणि समजोन घावे ऐसे ठरले आम्ही उभयता मिळोन मिरजस गेलो तेथील फकी-र व कवटेकर फकीर ऐसे घेऊन का मारचे मठात घरी समजोन घावयासी आलो तव्हा मिरजकर व कवटेकर यानी सागितले की तुम्हा उभयेताचे वडील चालत आले त्याप्रमाण तुम्ही उभयता चालावे याप्रो आम्ही त्यास व त्याणी आम्हास समजपत्र दिल्हे

२०

की पूर्व(ब)न चालत आले त्याप्रमो हली हि चालावे याप्रा ठरऊन कागद् येकमकास दिल्हे त्याजवर द.ह पाच वर्ष चालली हली माहीदीनशा याणी खटला करून हली इनामाचा माहसूल जप्ती ठेऊन तासगावास फिर्याद् होऊन आम्हास रोख केला आम्ही हि तासगावास गेलो त्यानी आज्ञा केली की का मारीचे पाढरीत बोलाऊन घेणे त्याजवरून उभयता पाढरीकड आलो त्यानी आज्ञा केली की तुमचा करीना लिा देणे त्याजवरून हे करीणा लिा दिल्हे असे सद्‌रहु लिा आहे यासिवाये काही ल्याहावयाचे राहिले नाही हे लिा दिल्ही जबानी सई तारीख छ १० माहे जावल ऊर्फ पौष मास सन १७४६

१ राजेश्री समस्त पाढर को भिलवडी गोसावी यासि राजीनामा चो मिराबावा वा कासीम बावा मट तकिया को मार सुा खमस आसरीन मया तैन व आलफ कारणे लिा दिल्हे राजीनामा ऐसा जे माहीदीन बावा याचा व आमचा घर खटला लागोन तुम्हा पाढरीपासी आलो त्यास राजीनामा लिा देणे म्हणोन आज्ञा केली त्याजवरून पाढरीस राजी आसो ज्याप्रो सागाल त्याप्रो ऐकून वर्तणुक करीन न केलेस देवाचे खोटे व सरकारचे गुनगारी पडन हा लिा दिल्हा राजीनामा सई तरीख छ १ जावल सन १७४६ तारण नाम सवछरे साक्ष बीा नरसो कोंडो कुलकर्णी कसबे मार

१ पुरसीस मिराशा वा कासीम बावा फकीर को भिलवडी सुा सीत आसरीन मया तैन व आलफ जबानी छ १० जावल सन खमस चीं लिा दिल्ही त्यात मार तुमच्या पैलस्ती पूर्वीचा लिा तो कशावरून त्यास साधन काये आसल ते लिा देणे छ ५ माहरम

याचे उतर वहिवाट चालत आली व वडील सांगत आले त्याप्रो लिा दिल्हे आहे कागद्पत्राचा दाखला आम्हापासी नाही छ मार

१ याद् मिरा वा कासीमशा फकीर यासी पुरसीस घालावयाची कलमे का भिलवडी सुा तिसा आसरीन मया तैन व आलफ छ १९ जिलकाद्

१ चिनगीशा फकीर विज्यापुरकर याचा सिसे गरीबबावा यासी मिरजचे उरसात पुर्वी मदनबावा यानी बोटन घेतला म्हणोन जबानीत लिा दिल्हे त्यास बोटन घेतले ते वेलस कागदपत्र आथवा साक्ष काये साधन आहे ते लिा देणे त्याचे उतर बोटन देवानी उरसात घातला कागद्पत्र व्हावे तर दुसरा वारीसदार कोणी नाही त्यापेक्षा कागद्पत्राचे कारण काये आसे केलेवर देवाचे गुजारतीने घेतला आणि आपला सिसे म्हणोन बरोबर घेऊन आले

१ गरीबबावा यासी मदनशाबावा याणी बोटन घेतला म्हणोन लिा त्यास फकीरीत दुसर पचे सिसे बोल्यात घ्यावयाची चाल आहे याचा स्वस्थानी फकीर व मलग फकीर याचे मत पुरवणी करून यावी म्हणोन पुरसीस घातली त्याचे

उतर चालीचा भार विच्यारीला त्यास मदनशाबाबा याणी देवाचे विच्यार घेतला त्या वेलस मलग फकीर व फकीर हि होते त्याचे गुजारतीने घेतला

१ गरीबबाबा प्रथम वोटत घेऊन मदनशाबाबानी जवल ठेऊन घेतला आणि कारभार व मठाचा आधिकार दिल्हे असे जबानीत लि॥ त्यास गरीबबाब आधिकारी आसोन भारआलीशा मठात का राहिला याचे कारण काये याचे उतर गरीबबाबा चांदबाबा स्वस्थानाचा कारभार करीत होते कुइ काही दिवसानी मलग फकीर भार आली आला तो मठात महिना दोन महिने होता तो निघून गेला नतर काही दिवसानी फिरत आला तेव्हा चांदबाबानी त्याचे सीर मुंडऊन त्यास मुलगी गरीबबाबाची दिल्ही आणि लग्न करून घरात ठेविला

१ कडनशाबाबा याची मदनशाबाबानी सिसे केला याचे चादबाबाचे पडेना सबब मठातून कडनशास चांद यानी बाहीर घालविला आसे जबानी लि॥ दिल्हे त्यास कडनशा व चांदबाबा हे दोघे सिसे मदनबाबाचे किंव्हा आणीकी होते किंव्हा नव्हते लि॥ देणे याचे उतर चांदबाबा व कडनशाबाबा आणीकी मुलकात मदनबाबाचे सिसे जिकडे गेले तिकडे बहुत केले हे दोघे चांदबाबा व कडनशाबाबा उभयेता येथ होते त्या दोघात पडनासे जाहले तव्हा कडनशा निघोन आस्टेस गेला च्यार कलमं

४

१ मदनशाबाबापासून कारभार मठाचा केला तो कागदोपत्री वहीवाट कसी ती लि॥ देणे याचे उतर मदनशाबाबा जिवंत होते ते समई गरीबबाबा कामकाज करीत होते फुडे मदनशाबाबा समाधलेवर गरीबबाबा काही दिवसानी ते हि समाधले नंतर गरीबबाबाचा वडिल लेक हुसनबाबा यानी मठाचा आधिकार करून मदनशाबा(बा)ची तुरबत बाधली नंतर गुमट बाधला त्या उपरा तिला आवार घालून सोपे बाधले झाडझुड हि केले त्याची माहीतगारी पाबरीस आहे

१ आमचा व इसकशाबाबाचा सटला पेशजी स्वस्थानी फकीर व मलंग फकीर यानी समजोन घेऊन तोडला त्याचे आमचे समजाने करून येकमेकास कागद लि॥ दिल्हे आहेत त्याप्रो वहिवाट केली म्हणोन जबानीत लि॥ दिल्हे कागद तुम्हापासी आहेत आणुन दाखवण आणि वहिवाटी पुरवणी करून घेणे त्याचे उतर उभयेतात सटला जाहला तेव्हा त्याणी व आम्ही आपलीयात समज करून घ्यावे याप्रमाणे ठरऊन उभयेतानी मिरजकर व कपटकर फकीर आणून त्यास बाका समजाविला तो अेकून घेऊन चोघानी उभयेतास सागितल जे वडिलापासून वहिवाट करीत आला त्याप्रो फुड हि वहिवाट करावी आसे सागोन समजपत्रे येकमेकाची यकमेकास दिल्ही त्या पत्राप्रमाणे वहिवाट उभयता करीत आलो फुडे माहीदीन याणी सटला केला सबब सुरलीत चालत नाही येकून कलमे साह

१ यादी पुरसीस मिरा बावा वा कासीम बावा फकीर तसिया को भिलवडी सुा तिसा आसरीन मया तेन व आलफ छ २६ जिलकाद

१ गरीब बावा यासी मुदनशा बावा याणी मिरजच्या उरसात वोटत देवानी घातला त्यास दुसरा वारीसदार नाही म्हणुन कागद पत्राचे कारण काये आसे देव बोलले म्हणोन पहिले पुरसीसीचे उतरात लिहील त्यास वोट्यात घातल्यास दिवस किती जाहले व कागदाचे कारण काये आसे बोलल ते कशावरून समजावे याची पुरवणी काये आसल ती करून देणे व वोट्यात देवाचे विच्यार घेतला ते वेलस मलंग फकीर व फकीर होते ते कोठील कोण कोण त्याचा दाखला काये आहे तो लिा देणे

१ इनामाची जसी कधी पासून कशाचा जाहला ती लिा देणे

१ आलिशा याचा आजा इसकशा यानी व आम्ही आपअपलेत समज करून घ्यावे याप्रो ठरऊन उभयतानी मिरजकर कवटेकर फकीर आणुन त्यास वाका समजाविला चौघानी उभयेतास सागितले जे वडिला पासून वहिवाट करीत आलो त्याप्रो करावी आसे सागोन समजपत्रे येकमेकास दिल्ही त्या प्रो वहिवाट उभयेता करीत आलो म्हणोन पहिले पुरसीचे उतरात लिा त्यास खटला कधी पासून लागला व समजपत्राचे पुर्वी वहिवाट कसी होती फुडे खटला कशाचा जाहला समजपत्र जाहल्यावर वहिवाट कसी किती दिवस जाहली ती लिा देणे

१ तसियाची वहिवाट मुदनशाबावापासून गरीबबावा करीत होते फुडे गरीबबावा याचा लेक हुसन बावा याणी केली म्हणोन पहिल्या उतरात लिा त्यास वहिवाटीस वर्ष किती जाहली त्यात गरीब व हुसन यानी किती दिवस केली त्या आलीकडे वहिवाट आज पावेतो कोणाकड कसी जाहली ती लिा देणे

१ चाद बावानी आलीबावा याचे सीर मुडुन गरीब बावाची मुलगी दिल्ही आणि घरात ठेविला म्हणोन पहिले पुरसीसीचे उतरात लिा त्यास चांदबावा तुमचा कोण मुलगी दिल्ही तव्हा गरीब बावा होते किव्हा नव्हते मठात ठेविल्यावर आज परीयंत ते काये करीत आल ते लिा देणे

१ पुरसीसीचे उतर मिरा बा कासीमशा बावा फकीर तसिया कसबे भिलवडी सुा तिसा असरीन मया तेन व अलफ छ २७ माहे जिलकाद

१ गरीब बावा यासी मुदनशा बावा यानी मिर(ज)च्या उरसात वोटत देवानी घातला त्यास दुसरा वारीसदार नाही म्हणोन कागदपत्राचे कारण काय अेस देव बोलले म्हणोन पहिले पुरसीसीचे उतरात लिा त्यास वोट्यात घातल्यास दिवस किती जाहले व कागदाचे कारण काये अेसे देव बोलल ते कशा-वरून समजावे याची पुरवणी आसल ती करून देणे वोट्यात देवाचे विच्यार घेतला ते वेलस मलंग फकीर व फकीर होते ते कोठील कोण कोण आहेत

लिा देणे याचे उत्तर मुदनशा बावा याणी वांट्यान घेतला त्यास दिवस किती जाह्मले म्हणोन पुसिले त्यास वर्षे आद्मासे यकवीस होत आलीं व कागदपत्राचे कारण काये आसे देव बोलले ते कशावरून समजावे म्हणोन पुसिले त्यास याचे उत्तर आमचा वडील चुलतभाऊ आबदुलशा फकीर याजबरोबर सटला करू लागला त्या वेलस आबदुलशा बोलत होता वांट्यात देवाचे विच्यार घेतला ते वेलस मलंग फकीर व फकीर होते कोठील कोण कोण त्याचा दाखला काये आहे तो लिा देणे त्याचे उत्तर वांट्यात घेतल्या दिवसा-पासून दोन पिड्या परीयेंत कोणाचा सटला जाह्मला नाही तव्हा वडिलानी मला मलंग फकीर व फकीर कोण कोटील होते ते सागावयाचे कारण पडले नाही तव्हा मी कशावरून सागाव कलमं १

१ इनामाची जमी कधीपासून कशाया जाह्मली ती लिा देणे याचे उत्तर समज-पत्र जाह्मलेवर वहिवाट करीत आलो तो मार आलाहिदा पुरसीसीत आला आहे फुड मोहिदीनबावा यानी आणीखी नवीन सटला करून माहसूल आड-थळून वाटकरी याजकडे ठेविला त्यास वर्षे आद्मासे दाहा आकरा जाह्मली

१ चादबावानी मारआली याचे सीर युडुन गरीबबावाची मुलगी दिल्ही आणि घरात ठेविला म्हणोन पहिले पुरसीसीचे उत्तरात लिा त्यास चांदबावा तुमचा कोण मुलगी दिल्ही तेव्हा गरीबबावा होते किव्हा नव्हते मठात ठेविलेवर त आजपरी(यें)त ते काये करीत आले ते लिा देणे याचे उत्तर मारआलीचे लग्न केले तव्हा गरीबबावा होते चादबावा व गरीबबावा गुरुबधु मारआलीचे लग्न जाह्मलेपासून आम्हापासी आहेत

१ तकीयाची वहिवाट मुदनशाबावापासून गरीबबावा करीत होते फुडे गरीबबावा याचा लेक हुसनबावा याणी केली म्हणोन पहिले पुरसीसीचे उत्तर लिा त्यास वहिवाटीस आजपरीयेंत वर्षे किती जाह्मली त्यात गरीबबावा व हुसनबावा यानी किती दिवस केली त्या आलीकडे कसी जाह्मली ती लिा देणे याचे उत्तर वहिवाटीची कारकीर्द गरीबबावाची वर्षे आद(मा)से तीस पस्तीस फुडे हुसनबावा याणी च्यालीस पंचेतालीस वर्षे केली त्या फुडे हुसनबावाचा लेक आबदूलबावा व आमचा वडील भाऊ हुसमालबावा यानी केली नतर आम्ही करीत आहो

१ आलीशा याचा आजा इसकशा यानी व आम्ही आपआपलेत समज करून घ्यावा याप्रो ठरऊन + + + मिरजकर व कवटेकर फकीर आणुन त्यास वाका समजाविला तेव्हा चवघानी उभयेतास सागितले वडिलापासून वहि-वाट करीत आला त्याप्रो करावी असे सागोन समजपत्र येकमेकास दिल्हे त्याप्रो वहिवाट उभयेता करीत आलो म्हणोन पहिले पुरसीसीचे उत्तरात लिा त्यास सटला कधीपासून लागला व समजपत्राचे पुर्वी वहिवाट कसी होती

फुड मटला कशाया। जाह्ला व समजपत्र जाहले तीं वहिवाट कसी किती दिवस नाही तीं लि॥ देणे याचे उतर समजपत्राचे पुर्वी वहिवाट उभयता करीत होतो तव्हा उसमान बावा व आबदूल बावा यांनी कोल्टकर यासी वलतातील बाजगी घातली म्हणोन इसकशा याने सटला करून जमखडीस निघोन गेला तो तो गेला तेव्हा आम्ही हि गेलो तव आज्ञा जाहली जे पुर्वत-प्रो चालावे काही बोलणे उभयेताचे आसल्यास च्यार फकीर मिलून वाटून घ्यावे असी आज्ञा जाहलेवर घरा(स) आलो सदरहू प्रो न करीता इसकशा बावा इसलानंपुरास गेला तो गेलेनतर आम्ही गेलो आणि उभयेताचा माार समजोन घेतल नंतर आज्ञा जाहली जे उभयेतानीं समजोन राहावे भाडु नये असी आज्ञा जाहलेवर इसकसा याणे आर्ज केलाजे मजकड चालवावे ऐस पत्र यावे म्हणोन बोलला ते ऐकून घेऊन त्यास उतर केले नाही आसे तेथेच समजले मग आज्ञा जाहली जे मोकासी यासी लखोटा देतो तो नेऊन त्यास पावता करावा तो लखोटा घेऊन आलो आणि राजेश्री व्यकटराव नाना यासि दिल्हा आणि आपले घरास गेलो फुडे नाना याणी इनामाची जती करून भागाने कुलास लाविले जप्ती जाहलेनंतर इसकशा आम्हास म्हणो लागला की च्यार फकीर मिरजकर व कवटेकर आ + + + न करून घेऊ याओ बोलले नतर उभयतानीं फकीर यास आणुन समजपत्र करून घेतल्या-वर जमीचा माहसूल देविला फुड उभयेतानी थेसापा व तवनापा चौगला यासी इनाम जमीन भागाने लाविली त्याप्रो त्याजकडे सात आठ वर्ष वहिवाट होती तो महसूल उभयेता घेत आलो फुडे आम्ही त्यानी जमिनीची मेहनत दोन वर्ष घरी च केली नतर सिदूस भागाने लाविली त्यास वर्ष पाच साहा आदमाने जाहली तो माहसूल उभयेता घेत आलो हे तरीज कलम

१ जयानी मिरा वा कासीम बावा फकीर तकीया को मिलवडी सुा सलासीन मया तैन व आलफ लि॥ दिल्ही जबानी ऐसी जे मुदनशा बावा कमरचस्तेचे व गरीच बावा आमचे आजे त्या वेलच्या सनदा पारसी व दक्षण आक्षराच्य ज्या होत्या त्या हुसन बावा याजपासी मडार घरात होत्या तो मृत्य पावलेवर ते कागदपत्र इसकशा याने ठेविले ते सनदा व कागदपत्र आणुन घ्याहते छ ५ सफर

१ पुरसीस मिरा बावा वा कासीम बावा सुा सलासीन मया तैन व आलफ समजपत्र जाहलेवर इनामाची माहसुलाची जप्ती होती त्याची मोकलीक सरकारातून करून दिल्ही म्हणोन लि॥ दिल्हे त्यास समजपत्र कोणते साली जाहली इनाम मोकला कोणत साली करून घेतला तो कोणी करून दिल्ह व कोणी करून घेतला तो येवज कोणी कडून कोणास कसा पावला ते लि॥ देणे छ ५ जिल्हेज याचे उतर आम्ही व इसकशा भाडलो तव्हा सरकार मत्री

यानी इनामाची जमी केली आणि गावकरी याजकडु(न) हेगापा जाधव यासि भगाचा कौल देऊन त्यास लाविला तो फुड काही दिवसानी उभयेताची समजपत्र जाह्ली ती समजपत्र आहेत तऱ्हा जमीची मोकलीक करून द्यावी म्हणुन मागत आसता त्याला दोन वर्ष जाह्ली उपरांतीला सरकारातून जमीची मोकलीक जाह्ल्यावर गावकरी यार्णी जाधव यास आणुन दोन सालच्या वसुलाचा यैवज ठराऊन ऐवज घेतला तो ऐवज देवाचे भितोंडाकडे वगैरे खर्चास दिल्हे काही उभयेतास पावला आहे छ १९ मोहरम

१ पुरसीस मिरा वा कासीम बावा फकीर को भिलवडी सुा सलासीन मया तैन व आलफ समजपत्र बालू गारे याचे हातचे तुम्हा जवल आहे त्यापो आलीशा फकीर याजवल आसावे त्यास आलीशाचे म्ह(ण)णे फकीर व बालू गारे यानी गेर सनाजोनीन समजपत्र लिहिली ती सरकारात आणुन ठेवली आणि बालू गारे याजपासून गुनगारी घेतली आसता समजपत्र दाखवितात हे कोटिल कसी जाह्ले ते आम्हास माहीत नाही त्यास समजपत्रे सरकारात घेऊन बालू गारे याजपासून गुनगारी घेतली की नाही व तुम्हाजवळ समजपत्र आहे हे त्या समजपत्रातील की दुसरे हे लिा घेतले ते कोणाचे हनच लिा देणे छ १९ मोहरम याचे उतर फकीर यानी ठराविक समजपत्र बालू गारे याची हातची लिा येकमेकाची येकमेकास दिल्ही ते समजपत्र आम्हापासी आहे दुसर समजपत्र आम्ही करून घेतले नाही व आम्हाजवल आहेत बालू गारे याजपासून गुनेगारी घेतली होती ती चौकसी करून गुनगारी माघारी दिल्ही आणि याचे समजोती बा गारे यास पागोटे भावी दिल्हा व याणे बाबले समजपत्र सरकारात घेऊन ठेविली ती ज्याची त्यास दिल्ही नही असी पुरवणी माहिदीनशा याणे केल्यास आम्हाजवल समजपत्र आहे ते खोटे व आम्ही वाद सागतो वाद खोटा वाद सागण + + + + + + +

१ राजेश्री आबदुलशा व हुसनशा व इसकशा नकिया को भिलवडी गोसावी यांसि समजपत्र बो इसमकशा व हैदरशा भार आली बावा तकीया को भिलवडी सुा इसने मया तैनव अलफ कारण लिा दिल्हे समजपत्र ऐसा जे तुम्हात व आम्हात काही घरवाटणीमुल कजीया लागोन दैवात आलो समस्त दैवाने सागितले वरून आम्ही मान्ये होऊन समजलो पेशजी वडील चालत आले त्या-प्रमाणे आम्ही फुडे हि चालू कोणे गोस्टीविसी आंतर देगार नाही हुसनशा बावा चालत आले त्याप्रो तुम्ही आम्ही चालावे न चालस देवाचे खोटे हे लिा दिल्हे समजपत्र आपले वडिलाचे इमान सही तारीख छ ५ माहे जावल सन १७२३ + + + सवछरे भाद्रपद शुा ६

साक्ष

१ मुलतानशा सदर मिरजकर तकीया मदारी

१ मिराशा मदारी वा। इसमालशा मदारी मिरजकर

१ मदूशा वा। दाऊदशा कवटेकर

१ इब्रामशा वा। बादूलशा कवटेकर

१ समदूशा वा। कमालशा आबदाल मिरजकर

हस्ताक्षर बालू गारे वा। को। भिलवडी

श्रीमंत मातुश्री काकु साहेब साहेबाचे सेवसी

कागद यो। इसमाल बावा फकीर को। भिलवडी सुा। तिसा सलासीन मया तैन व आलफ लिा। दिल्हे कागद असा जे इब्रामशा वा। आलीशा फकीर याचा व आमचा मट तकीयाविसी सटला पडोन सरकारात आलो त्याजवरून आज्ञा जाहली की गावकरी सारोष करून सांगतील त्यास तू राजी आहेस की नाही ते लिा। देणे म्हणोन त्यास गावकरी सारोष करून देतील त्यास मी राजी आहे हे लिा। दिल्हे कागद सई तेरीख छ १७ जिलकाद

चि॥ गोविंद रामचद्र कुलकर्णी

पालकर मुा। को। मार

श्रीमंत मातुश्री काकू साहेब

साहेबाचे सेवसी

जामीन कतबा यो। येसू बिन नरूहराम को। भिलवडी सुा। तिसा सलासीन मया तैन व आलफ लिा। दिल्हे जामीन कतबा असा जे इसमालशा वां मिरा बावा फकीर व महमंदशा वा। आमदंशा बावा फकीर या उभयताचा मट तकीयाविसी सटला पडोन सरकारात आलो त्यास अ.लाहिदा सरकारात कागद लिा। दिल्हे त्यास गावकरी सारोष करून जे सागतील त्याप्रो। इसमालशा अेकून राहील ते न अेके तरी मी अेकून देहीन इतके न जाहले तरी त्याचा ना सुकातीचा जाब करून देहील हे लिा। दिल्हे जामीन कतबा सई तेरीख छ २४ जिलकाद '

चिा। गोविंद रामचद्र कुलकर्णी

पालकर मुा। मार

पुरसीस इसमाल वा। मिरा फकीर मुा। को। भिलवडी सुा। अर्बैन मया तैन व अलफ तुसे वडील व इसकशा वा। मार आलीशा फकीर हे यकत्र होते फुडे इसकशानी तुसे वडील मुलेमाणसासुधा बाहीर घालविले नतर तुमचे पेटाची उपजीवका कसी करीत आला ते लिा। देणे तेरीख छ २६ रासर सदरहु पुरसीसीचे उतर अम्ही व इसकशा मिळोन येकत्र होतो आमचे आजे तिघे

वडील हुसन बावा दुसरा हसन बावा तिसरा कासीम, बावा हे दोघे हुसनबावा बानी त्यास दोघास वेघली माली बाधुन देऊन त्यास ठेविले आपण व इसकशा बाबा मंडार घरात वहिवाट करीत होते आणि त्या दोघास दाणे हुसन-बाबा मठा पैा देत हे(ते) त्या फुडे इसकशा बावानी हुसनशा मेलेवर त्याचे लेकास बाहीर घालविलेवर सटला होऊ लागला त्यापासून को मारचे इनाम-पैा पेट्यास घेत आहे छ मार

१ राजेश्री इसकशा बाबा फकीर को मिलवडी गोसावी यांसि

वायदेचो(टी) बो उदाजी हजारी को मार सुा आर्बा मया तेन व आलफ आम्ही तुम्हास चावडी बा सो १२१॥ येकसे साडेयकवीस हे अज-पासून पटीप्रो देऊ यांसि आंतर करणार नाही हे लिा दिल्ही वायदे चिटी सही छ १४ माहे जासर सके १७२५ आस्वीन बा १

साक्ष

१ घाला चोपडा दस्तुर सगापा कोर

१ राजेश्री ईसकशा बाबा फकीर मुा को भिलवडी गोसावी यांसि

वायदेचिटी घो विठोबा गुजर मुा को मार सुा आर्बा मया तैन व आलफ कारणे लिा दिल्ही वायदे चिटी ऐसीजे साल मारी सेताबा हुंकरी सो। ५६ सवाछेपन बठा सा ४॥। यो सो यकसस्ट रहिमतपुरी गाव सिरस्ते चावडी प्रो सो देऊ यादी रोसा घेऊ हे लिा दिल्हे वायदा सही तरीस छ १२ माहे जासर

साक्ष

सेटी कास्टी हस्ता आक्षर नंगिवाकर

श्रीगणराज




अज स्वारी राजेश्री गगाधरराव गोविंद ता इसकशा फकीर तकाया को नांद्रें प्रा रायेबाग सुा तिसा तिसेन मया व आलफ तु किले मिरज मुकामी येऊन आर्ज केला की आपला गुरु बावा मदनशा फकीर यास को मारी इनाम जमीन आट बिघे सरकार आकारी वजा देऊन चालत आहे त्या जमिनीचा येक साला सन सीत तिसैन चे देण यावासी गावकरानी तगादा केला त्यामुळ आपण दोन वर्ष बाहीर फिरतो त्यास आम्ही दुवागीर फकीर गरीब येक साली माफ असावी म्हणोन त्यावरुन तुला हे आज्ञापत्र सादर केले आसे तरी तू आपल्या तर्कायात जाऊन खिजमत करून राहणे फुडे यक साली सरकारात घ्यावयाचा जाहलेस तुला सदरहु आट बिघेचा येक सालीचा तगादा होणार नाही जाणीजे छ १ रावर मोर्तब आहे

श्रीगणपति जयति

(सिक्का)

१ आज स्वारी राजेश्री चितामणराव पाडूरंग ता। मोकद्मानि को। नाद्रे प्रा। रायेबाग सुा। समान मया तैन व आलफ इसंकशा। फकीर कमरबस्ते तकीया का। नाद्रे याणी हुजूर येऊन आर्ज केला जे आपला गुरू मदनशा बाबा फकीर को। मारी यासी इनाम जमीन आट बिघे आकारी वजा देऊन चालत आहे त्यास सन सीत तिसैनात त्या जमीनीची येक साली देणेविसी गावकरानी पेशजी आपलेस तगादा केला होता त्यास आम्ही दु( वा )गीर फकीर येक साली ध्यावयांचा नाही म्हणोनं श्रीमत राजेश्री बालासाहेब याणी येक साली माफ करून माझे नावचे पत्र करून दिल्हे त्यास हली गावकरानी येक सालीचा तगादा केला आहे हेविसी आज्ञा व्हावी त्यावरून हे आज्ञापत्र सादर केले आसे तरी फकीरास इनामजमिनीचे येक सालचा तगादा होणार नाही म्हणोन तीर्थस्वरूप राजेश्री काका साहेब याणी पत्र दिल्हे आहे त्याप्रो समस मया तैनचे येक सालीचा तगादा न करणे जाणिजे छ १६ रावर मोर्तब सुद

मोकद्मानी को। नाद्रे प्रा। मिरज गोसावी यासि

आज दिल येकलास छोटनशा सरगुरु मलग फकीर व मदारशा मलग जमागंज फकीर जागा खाजा मीर पीर सगादूम आकी दिगर सैर समस्तास छ ४ साबान पावेतो खुशाल आसो दिगर मार पेशजी माहिद्दीनशा व जीवनशा याचे खटले करिता आपले पत्र पाटविले होते त्याजवरून हरदू जणाचा कजिया मनास आणुनं उभयतास समजावून पेशजी प्रो चालावे या प्रो उभयेता राजी होऊन गेले आहेत हली उभयेता हि उरसास गेले नाही या करिता त्या बोलणेविसी मदारशा याची त्रोकात आणुन जमातानी विच्यारले की पेशजीप्रो चालावे याप्रो करार करून गेला आणि उरसास का नाही तऱ्हा मदारशा जमात राजी होऊन गेले आहेत तर आपण आपले गावचे फकीर मोहीदीनशा यासि ठाकोठाक पा। देणे आनमान कोणे गोस्टीचा हुजूर न करणे आगत्य आगत्य पा। फलावे ज्यादा काये लिा। हे कितावत हू

१ ती।। राजेश्री माहिद्दीनशा बाबा को नाद्रे प्रा। रायेबाग बा। वडिलाचे सेवसी समजपत्र यो। जीवनशा वां आलीशा तकीया कसबे मिरज सुा। सलास आसरीन मया तैन व आलफ कारणे लिा। दिल्हे समजपत्र ऐसी जे पेशजी आम्ही तुम्हास वडीलकीविसी खटला करून का। नाद्रे येथील पत्र आणुन देवास लाविले होते त्यास हली देवान आम्ही वडील हे आपले आपलेत समजोन पेशजीपासून तुमचे व आमचे वडिलाचे चालत आले त्याप्रो चालावे नवीन हर येकविसी खटला करू तरी

जमा(ती)चे गुनगारी या फकीर नदूत हे लिा दिल्हे समजपत्र सई तेरीख छ ६ माहे साबान सके १७३४ आंगीरसनाम सवछरे

साक्ष दस्तुर मोकदम पाटील मौजे नीलणी

१ सुलतानशा वाा खालशा हूली कोा मिरज
आबादा न नीाा दरगा

१ महमदशा तकया मौजे गोरवाड

१ रहिमानशा तकीया रेदाल

१ गाईबीशा तकीया मोलागाई खुर्द

१ बाफत आलीशा सरगुरु गाईखुर्द

१ मदारशा तकया मेट कसर्बा

( शिवाय मुसलमानी पाच सात साक्षी आहेत )

श्रीगणपती

१ नाा मोकदम कोा भिलवडी सुाा समान आसरे मया तेन व आलफ माहीदी-नशा फकीर याच्या तकीयात कोा मजकुरी जमीन आहे तेथे यावा फडनीस मला करणार होते सबब येविसी राजेश्री मोरो लक्ष्मण भावे याणी समजाविले यावरून येयाणा चोा कोा मार याचे विदेमान्ये चौकसी पाहता जमीन फकीर याची खरी त्याजवरून सदरहू जमीन फकीर याची याजकडे देविली आसे तरी आनभऊन राहिजे जाणिजे छ ४ जिलकाद मातंब आहे

१ चिरंजीव अलीशा वाा इबरामशा तकीया कोा नांद्रे व भिलवडी यासि
इनाहतनामा माहिदीनशा वाा इस्कशा याचा तकीया मार सुाा सीत आस-रीन मया तेन व आलफ कारणे लिा दिल्हे इनाहतनामा ऐसी जे आमचे सर-दारकीचे पागोटे व मर्द मरातब निशान वगैरे चेज स्वस्थानात आसल ते आम्ही तुम्हास इनाहत करून दिल्हे आसे तरी कोा माराचे हुकू(म) हाकमं करून परंपरा आनभवीत जाणे वडीलकीविसी व हरयेकविसी दुसरेस बोलावयासी आधिकार नाही आम्ही तुम्हास जमागंज व दिनाशा सरगुरु मलंग फकीर व च्यार गावचे मेडलधारी तकीयेदार व उभी पाढरी विदेमान्ये आम्ही तुम्हास दिल्हे आसे हा लिा दि(ल्हे) इना(ह)तनामा सई तरीख छ २७ साले सके १७४८ वये नाम सवछरे वैशाख वाा ४ रोज रविवार सायंकाली दोन घटका दिवसास गादी स्थापना केली आसे छ मार

सई पारसी आक्षर आहे

साक्ष

१ दीन आलीशा सरगुरु मलंग मकाण सरफाबाद
१ सबान आलीशा मलंग मकाण; फल-बादर

१ मोर्नाशा मलग म र्दीन्हे

१ राशनशा मलग मकाण उजईण

१ हुसनशा सदर तकीया बावा भडारी
काो मिरज

१ जमालशा ढडालकर

१ सुलतानशा आवदाल भादरगा

१ शाशाबावा कुपाडकरभा भाडारी

१ इसकर्शा सहर कवट साराल

१ हुसनशा साडाली काा पाली आसेकाल

१ सुलतानशा गोपड मिरजकर

१ रहीम आलीशा मलंग मकाण
तुजागड

१ हाजूरीशा मलंग भडारी यकसंबीर

१ मानुकशा मलंग मकाण सदलग

१ आबरशा जहर भडारी

१ इबरामशा फौजदार

१ इसन वां बावाशा भडारी

१ कासीमशा सी पुरकर कमरबस्ते

१ गुडाणशा वां बावाशा कवटे साराल

१ सुलतानशा कोतवाल काो मिरज

१ बीमां भगवत महीपाजी कुलकर्णी का
मिरज

सरगुरूच्या झतची साक्ष बीकलम

सेक आमीर पीर साहेब

१ राजेश्री इबरामशा वा आलीशा कमरबस्ते
तकीया काो नांदरे व भिलवडी यासि

कागद यो इबरामशा वा जीवनशा तकीया कमरबस्ते काो मिरज सुाा आर्बा सलासीन मया तैन व आलफ कारणे लिा दिल्हे कागद ऐसा जे तुमचा व आमचे वडीलीकीविसी सटला पडोन ———दरगा काो मिरज येथील चौकावर सरगुरू मदारशा मलंग दिलीवाले व जमागंज मडलधारी व सार्दिक दरगेकडील कारभारी याजपासी उभयेतानी राजीनामे दिल्हे त्याजवरून सर्वत्रानी कयासा करून ठराव केला जे आमचे वडील आबदुलशा कमरबस्ते याचे नावे सनदापत्र आसतील त्याप्रो आम्ही आनभऊन राहावे व मुदनशा कमर बस्ते याचे नावे सनंदापत्र आसतील त्याप्रो तुम्ही आनभऊन राहावे याप्रो ठरऊन त्याप्रो वर्तणूक करावी आणि तुम्हास आलीशा कमरबस्ते याचे पागोटे तुम्हास बाधुन त्याचे जागी गादीस तुम्हास बसविले त्याची यादी सरगुरू व समस्त देवानी सुधा मिळोन सरगुरूचे चौकावर दिल्हे दिल्ही त्याविसीचा दावा आम्ही बोलू नये याप्रो कागद लिा देऊ वहिवाट चालावी आसे ठरऊन कागद लिा मागितला त्याजवरून सदरहु ठरावास आम्ही मान्ये होऊन हे कागद लिा दिल्हे आहे तरी सदरी लिा प्रमाणे आम्ही वर्तणूक करू यास आम्हाकडून दिगर जाहलेस फकरीतून दूर व जमा(त) याची गुनगारी हे लिा दिल्हे कागद सई तेरीख छ २४ सावान सदरहु मुदनशा कमरबस्ते याचे नावे सनदपत्र नांदरे व भिलवडी व मिरज येथ आसल्यास त्याप्रो घ्यावे छ मार सके १७५५ ऊर्फ मार्गसीर्ष मास

इस्रमशा बा जीवनशा याचे हतचे राजीरुजु

साक्ष

| | |
|---|---|
| ७ कारभारी सार्दिंग दरगा | १ हुसनशा सद्र |
| १ सेख कासीम मुतवली | १ सयान आलीशा मलग |
| १ सेख माहिद्दीन मुतवली | १ सयान आलीशा मलग भंडारी |
| १ ——— | १ आंगाराशा यकसेबीकर |
| १ सेख आली वां सेख इसमाल मुतवली | १ हुजरीशा यकसबेकर |
| १ सराक मसलत | १ नती बसव यकसबेकर |
| १ सेख आमद मुसरीण | १ दारुशा गाद्ड मलग |
| १ कमाल मा मुसरीण | १ इसाकशा कवटेकर |
| ७ | १ घुडणशा कवटेकर |
| | १ आलीशा समडालीकर |
| | १ आंबरशा करणालकर |
| | १ इबरामशा फोजदार |

१ बा सखो लिगो कुलकर्णी मौजे धमणी का बेळी मिरज इलाखा दरगा को मरा

१ रुजू सदासिव धोडदव खासनीस दरगा को मार

सरगुरू याची हतची साक्ष यी कलम    हजरत शुद्दीन साहेब शेक

१ यादी दर जागा चौक जपागंज फकीर मदार बकशा सरगुरु ममकाण दिलीवाले याचे विद्देमान्य जमागंज याचे विद्देमान्य व मडलधारी तकेदार या समस्तानी आलीशा कमरबस्ते नाद्रेकर यानी आपडे वडीलकीचे पागोटे बाधुन आपले गादीवर इबरामशा यास बसऊन त्याचे हवाली स्वस्थान केले हजर मज्यालस दरगा   का मिरज सु॥ आर्बा सलासीन मया तेन व आलफ माहे साबान छ ४ रो

मज्यालस नाव निसी बितपसील

| | |
|---|---|
| १ सद्र हुशनशा | १ मखबूलशा सर गुरू आजात |
| १ इब्रांमशा फोजदार नी॥ भंडारी | १ सेक लिसर आलीशा आरगंकर |
| १ घुडणशा कवटेकर | १ रकई साहेब सुरतवाले नि॥ फकीर |
| १ जाफरशा मसूरीवाले | १ आलीशा समडालीकर |
| ७ दर जागा हजरत साहेबी | १ इसाकशा कवटेकर |
| १ कादीम सेख आली वा सेख इसमाल मुतवली रुजू | १ जुमाशा गोधड |
| | १ कासीमशा वसगडकर |
| १ सेख कासीम वां सेख दादे मुतवली | १ गेबीशा कागलकर |

१ सेस माहीदीन वां सेस सादीर मुनवली रुजू
१ सेस सादीर वां सेस कमलीक सर कमसलत रुजू
१ सेस हजरत सरीक मसलत
१ सेस आमद् वां थडे मावे मुसरीप रुजू
१ कमाल महंमदं मुसरीप रुजू

७

१ यहादर सतारेवाले
१ मिराशा कूच मुकावा
१ मिराशा नीा मडारी
१ आयरशा कुपावाडकर निा भडारी
१ आगांगशा येकसयेकर
१ सायान आली मलंग
१ जती थकष येकसयेकर
१ सुलतानशा कोतवाल निा भडारी
१ हुजूरीशा यकसयेकर
१ सायान आलीशा भडारी मुशाफर
१ मसदूम पाटील निलनी मौजे का हवेली मिरज
१ इयरामशा वा जीवनशा रुजू बीा सस्रो लिगो कुलकर्णी मौजे धामणी काा हवेली मिरज व सदासिव धाडदव सासनीस काा दरगा

श्री

मदारशा सर गुरु याचे हनचा विसमिला सेक आमीर पीर साहेब

१ राजेश्री इयरामशा वा जीवनशा कमरयस्ते तकीया काा मिरज यासि
कागद् यो इयरामशा वां आलीशा कमर यस्ते तकीया काा नादरे व भिलवडी सुा आर्बा सलासीन मया तैन व अलफ कारण लिा दिल्हे कागद् ऐसा जे तुमचा व आमचा वडीलकीविसी सव्ला पडोन हजरत दरगा काा मिरज येथील चौकावर सरगुरु मदारशा मलग दिलीवाले व जमागंज मडलधारी व सादिक दरगेकडील कारभारी याजपासी उमयतानी राजीनामे दिल्हे त्याजवरून सर्वत्रांनी कयास करून ठराव केला जे तुमचा वडील आबदुलशा कमरयस्ते त्याचे नांवे सनदापत्र आसतील त्याप्रो तुम्ही आनमऊन राहावे व मुदनशा कमरयस्ते याचे नावे सनदापत्र असतील त्याप्रो आम्ही आनमऊन राहावे याप्रो ठराऊन त्याप्रो वर्तणुक करावी आणे आम्हास आलीशा कमरयस्ते याचे पागोटे बाधुन त्याचे जागी गादीस आम्हास बसविले त्याची यांद सरगुरु व समस्त दैवानी सुधा मिळोन करून मलग याचे चौकावर दिल्हे त्याविसीचा दावा तुम्ही बोलू नये याप्रो कागद् लिा दऊन वहिवाट चालावी असे ठरऊन कागद् लिा मागितला त्याजवरून सदरहु ठरावास आम्ही मान्ये होऊन हा कागद् लिा दिल्हे आहे तरी सदरी लिाप्रो आम्ही वर्तणुक करू यासी आम्हाकडुन दिगर जाहलेस फकीरीतून दूर व जमा(ती)चे गुनेगार हे लिा दिल्हे कागद् सई तेरीस छ २४ सायान सदरहु आबदूलशा कमरयस्ते याचे नावे सनदापत्र नादरे व भिलवडी व मिरज येथील असलीयास याप्रो घ्यावे छ मार सके १७५५ ऊर्फ मार्गसीर्ष मास

इब्रामशा वा आलीशा कमरबस्ते
याचे हतची पारसी आहेरी राजी राजू
साक्ष

७ दरगेकडील कारभारी सादिक
१ सेख कासीम मुतवली
१ सेख माहिद्दीन मुतवली
१ सेख आली वा सेख इसमाल मुतवली
१ ———————
१ सेख हजरत सरीक मसलत
१ सेक आमद मुसरीप
१ कमाल मर्द मुसरीप
—
७
१ मखदूम पा मौजे निलवी
१ सेख वली मगदूम पाटील मौजे धामणी

१ हुसनशा सद्र
१ सयांन आलीशा मलंग
१ सयांन आलीशा भडारी
१ आगारा यकसयेकर
१ हुजूरुशा येकसयेकर
१ जती यकशा येकसयेकर
१ दाऊदशा गादृड मलंग
१ इसाकशा कवटेकर
१ घुडनशा कवटेकर
१ आलीशा समडीलीकर
१ आबरशा करनालकर
१ इब्रामशा फौजदार

बिा सखो लिंगो कुलकर्णी मौजे धामणी का हवेली मिरज इलाखा दरग का मार रुजू सदासिव धोंडदेव सासनीस दरगा का मार

१ जबानी बालापा गारे का मिलवडी सुा सलासीन मया तैन व अलफ कारणे लिा दिल्ही जबानी ऐसी जे पेशजी तकेतील फकीर याची पचाइती मोरगावचे फकीर याणी केली ते वेलस मजला समजपत्र लिाविसी नेहले सरकार परवानगी सुलतान भाट याणे आणली नेहले होते तीस पत्र उभयेनाची पचाईत फकीरानी सांगितले प्रो लिा दिल्हे आसना दुसरे दिवसी राजेश्री सदोबा मामा निा मत्री याजकडील सिपाई येऊन मजपासून दाहा रुा गुनगारीची निशा घेतली मग त्या पचाईत फकीराकडेस गेलो सध्याकाली निशा घेतली ती सरकारातून परत करून मजला पागोटे बाधोन आपले घरास लाऊन दिल्हे फकीर यानी पागोटे बाधले तसीयात समजपत्र पचाईत फकीर याजपासी होती ती कोणास दिल्ही ही मजला ठाऊक नाही हे लिा दिल्ही जबानी सई तेरीख छ ५ माहे जील्हेज हस्ताक्षर सुा

१ जबानी बालू गारे मुा का मिलवडी सुा सलासीन मया तैन व आलफ लिा दिल्ही जबानी ऐसी जे फकीर याचे समजपत्र आम्ही दोन दोघाची पेशजी लिा दिल्हे आहे त्यापैा येक समजपत्र आबदुलशा याचे नावे इसकशा याणे लिा दिल्हे ते हल्ली त्याचा भाऊ मिराबाबा याजपास आहे ते हल्ली मजला दाख-

विले त्यास ते पत्र माझे हतचे आहे पेशजी दोन समजपत्रें दोघाची लिहिली त्यातील हे आहे त्यासेरीज दुसरे समजपपत्र लिा दिल्हे नाही हे लिा दिल्ही जबानी सई तेरीस छ १२ सफर हस्तक्षर खुा

१ जबानी बालू गारे. को भिलवडी सुा सलासीन मया तेन व आलीफ लिा दिल्ही जबानी ऐसीजे इसकशा फकीर व आबदूलशा फकीर तकीया को मार याचा दोघाचा येकमेकास पेशजी समजपत्र मी लिा दिल्ही होती तो हली गावकर याणी आणून दाखविली ही माझे हतंची दोनी समजपत्र माझे हतची खरी आहेत या समजपत्रा सेरीज तिसरे काही लिहिले नाही हे लिा दिल्ही जबानी सई तेरीस छ २७ सफर हस्ताक्षर खुा

१ पुरसीस बालु गारे को भिलवडी मिराबावा याजपासी समजपत्र आहेत व गावकरी याजकडे दोघाच्या नावची समजपत्र आहेत ती मिळोन समजपत्र तीन फकीर या जवळली व दाखविले ते समई हे समजपत्र माझे हतचे दोन समजपत्रासेरीज तिसरे समजपत्र लिा नाही म्हणोन लिा दिल्हे गावकरी या जवळील समजपत्र दाखविली ती माझे च या सेरीज तिसरे समजपत्र लिा नाही म्हणोन दोन वेळा लिा दिल्हे आहे त्यास समजपत्र लिा किती व तुमचे हतची खरी कोणती हे लिा देणे छ २७ माहे सफर सन सलासीन मया तैन व आलफ याचे उतर समजपत्र गावकरी याजवल आहेत ती माझे हतची देनी खरी मिरा बावापासी समजपत्र आहे ते माझे हतचे नव्हे ते पेशजी माझे हतचे + + + जाहले वरून लिा दिल्हे तेथ मी आपले घरचे दूखण + + + त्यात होता सबब गैर समजोतीन लिा दिल्हे आहे परंतु ते खरे नव्हे गावकरी याजवल समजपत्र आहेत ती माझे हतची खरी छ २७ सफर गावकरी याचे पुरवणीचे कागद

१ पुरसीस मोकदम को भिलवडी आबदूलशा याची समजपत्र दोन बालू गोरे याचे हतची म्हणोन आणुन दाखविली ती तुम्हाजवल कोणी कोठे ठेविली ते लिा देणे सन सलासीन मया तैन व आलफ छ २७ सफर श्रावण वा ४

त्याचे उतर गैर समजोतीन लिा सबब सरकारात घेतली ती पेशजी लिा दिल्हे-चे आहे समजपत्र कमाविसदार याणी आपाजी लिगो कुलकर्णी याचे हवाली केली ते समई आमृतराव पाटील व भगवत यादव व लिगो यादव होते ते हली सरकारात मागितलेवरून आणोन दिल्हे आहेत छ मार

१ बाबा पाटील

१ पाटलाजी पाटील

१ केरूजी पाटील

१ बापू बाबु पाटील

१ आपाजी लिंगो

१ बापू जिवाजी

१ उभयताची समजपत्र

१ राजेश्री इसकशाबावा व हैदरशाबावा को भिलवडी वडिलाचे सेवेसी समजपत्र बो आबदूलशा बा हुसन बाबा व उसमान बा कासीमबाबा व इसीप बा हासनशाबावा तकीया को मार मुा इसने मया तैन व आलफ कारणे लिा दिल्हे समजपत्र ऐसी जे तुम्हात व आम्हात काही परबाटणीमुले कजया लागोन दैवात आलो समस्त दैवानी सागितलेवरून आम्ही मान्ये होऊन समजलो पेशजी वडील चालत आले त्याप्रो आम्ही फुडे हि चालू कोणे गोस्टीविसी नवा दिगर करणार नाही आमचे वडील हुसनबाबा व तुम्ही चालत आला त्याप्रो आम्ही तुम्ही चालू न चालू तर दैवाचे खोटे हे लिा दिल्हे समजपत्र आपले वडिलाचे इमान सई तेरीख छ ५ जावल सके १७२३ दूरमती नाम सवछरे भाद्रपद शुा ६

हस्ताक्षर बाळोजी गारे को मार

| साक्ष | निशान पना |
|---|---|
| १ सुलतानशा वा सदर मिरजकर तकीया भडारी | १ मनूशा बा दाऊदशा कवटेकर |
| | १ इमामशा बा बादलशा कवटेकर |
| १ मिराशा भडारी बा इसमालशा भडारी मिरजकर | १ बादूशा बा कमालशा आबदाल मिरजकर |

राजेश्री आबदुलशा व उसमानशा व इसकशा तकीया को भिलवडी गो समजपत्र बो इसकशा बा हैदरशा बा मार आलीशाबावा तकीया को मार मुा इसने मया तैन व आलफ कारणे लिा दिल्हे समजपत्र ऐसी जे तुम्हात व आम्हात काही परबाटणीमुल कजीया लागोन दैवान आलो समस्त दैवानी सागितलेवरून आम्ही मान्ये होऊन समजलो पेशजी वडील चालत आले त्याप्रो आम्ही फुडे हि चालु कोणे गोस्टीविसी अंतर देणार नाही हुसनशाबा(वा) व आम्ही चालत आलो त्याप्रो तुम्ही आम्ह चालावे न चालेस दैवाचे खोटे हे लिा दिल्हे सम(ज)पत्र आपले वडिलाचे इमान सई तेरीख छ ५ आहे जावल सके १७२३ दुरमती नाम सवछरे भाद्रपद शुा ६

साक्ष

| साक्ष | निशान पना |
|---|---|
| १ सुल्तानशा वा सदर मिरजकर तकीया भडारी | १ मनूशा बा दाऊदशा कवटेकर |
| | १ इमामशा बा बादलशा कवटेकर |

२२

१ मिराशा मदारी वां इसमालशा मदारी मिरजकर १ सादूशा वा कमालशा आवदाल मिरजकर

हस्ताक्षर बालू गारे को मार

१ यादी मुदनशा याचे इनाम पेशजी सरकारातून मोकला होऊन माहसूल सन आर्बा मया तेनात माघारा देविला आसता फुडे माहसूल आमानत ठेविला तो कशाबा ते लिा देणे छ २ रावल सन सलासीन मया तेन व आलफ म्हणोन मोकदम को भिलवडी यास याचे उत्तर मोहिदीन बावा नादरे मुकामी तिसा आसरात मिरजकराचे वादास गेला होता माग मिराबावा याने सिदू चौगला याने इनानात नागर धरला होता त्या नागरास अडथला केला त्याजवरून सिदू चौगला व मिरा गावकराकडे आले तव्हा मिरास सागितले जे माहिदीन बावा आलेवर तुम्ह बोलण आसलीयास बोलून घे सिदू चौ याज-पासी महसूल आहे म्हणोन सागितले सरकार परवानगी केले नाही सिदू चौ यास इनामाची लावणी मोहिद्दीन यानी केली होती छ मार

निा नागर २

बिा आपाजी लिंगो व हरी
माणकेस्वर कुलकर्णी
का मार

श्रीमत मातुश्री काकू साहेब
सा ईबाचे शेवेसी

कागद वो इमामशा वां आलीशा फकीर मट तखिया को भिलवडी सुा तिसा सलासीन मया तेन व आलफ लिा दिल्हे काग(द) असा जे आम्हात व इसमालशा वा मिराबावा यात का मारचे मट तखिया समधे खटला पडोन साहेबापासी आलो साहेबी आज्ञा जाहली जे गांवकरी सारोष करून सांगतील त्यास मान्य आहे किम्हा नाही ते लिा देण म्हणोन त्यास गांवकरी सारोष करून देतील त्यास मी मान्ये आसो हे लिा दिल्हे कागद सई तेरीख छ १९ माहे जिलकाद

बिा गोविंद बापुजी
कुलकर्णी को मार

१ श्रीमत मातुश्री काकूसाहेब
साहेबाचे शेवसी

जामीन कतबा वो नरसू बिन बापुजी पाटील कैा भिलवडी सुा तिसा सलासीन मया तेन व आलफ कारणे लिा दिल्हे कागद ऐसा जे इमामंशा वा आलीशा फकीर कमर बस्ते मट तखिया को मार यात व इसमाल वा मिरा फकीर यात कसबे मारचे वतन समधे खटला पडोन सरकारात गेले त्याज-

वरून उभयतापासून करीणे व मान्येपत्र घेऊन पुरसीसी घातल्या वहिवाटीचे कागदपत्राच्या नकला घेतल्या त्याचा सारोष करून सागणे बा। उभयेतापासी वर्तणुकीस जामीन मागितले त्यास आम्ही इमामशा वा आलीशा फकीर यास आम्ही जामीन आसो सारोष करून ठराऊन देतील त्याप्रो फकीर मार अैकून राहील न अैक तरी आम्ही अैकून हजीर करून देऊ न देऊ तर त्याचे ताळीकातीचा जाब करून देऊ हे लिा दिल्हे जामीन कतबा सई छ २५ जिलकाद्

बीा नरसो हरी कुलकर्णी
कोा मार

१ पुरसीस इमामशा वां आलीशा फकीर कोा मिलवडी सुा आर्बेन मया तेन व हुसनबावा वा गरीबबावास मुले माणसे सुधा तुम्ही आपले घरातून बाहीर घालविले त्यास सवस्थानापैा त्यास पोटास देत आला की नाही ते लिा देणें तेरीख छ ६ रासर सदरहु पुरसीचे उतर हुसनबावा यास इसकशाबावा याणी घरातून बाहीर घालविले त्या ना। आमचे आम्ही स्वस्थानाची वगैरे वहि-वाट करीत होता पुढे आबदूल फकीर याण सरकारात गैर वाका समजाऊन देऊन भास्करपत कोलटकर यानी माहमूल आमचा नेहला नंतर कैलासवासी श्रीमंत आपासाहेबापासी जमखडीस जाऊन मार समजोन देऊन ताकीदी आणील्या नंतर आमचा माहसूल आम्हास दिल्हे त्या ना। आमचे आम्ही आज्ञाप्रो वहिवाट करीत आलो सन तिसा आसरेचे साली मिराबावा यानी आमचे इनामातील नागरास आडथला करू लागला सबब महसूल वाटकरी याजपासी ठेवला आम्ही त्यास काही दिल्हे नाही छ मार

१ पुरसीस कोा मिलवडी सुा अर्बेन मया तेन व अलफ कोा मारचे समस्त पाढर यास मदमबावा फकीर याच्या सवस्थानासमधे मार आलीबावाच्या वौसीकाबरोबर गरीब बावाचे वौसिक सटला बोलतात येविसीची माहितगारी कसी आहे ती कागदोपत्री व मुखजबानी लिा देणे छ २७ रासर जेस्ट मास सदरहूचे उतर फकीर प्रकर्णी कागदपत्र म्हणावे तरी आम्हापासी नाहीत उभयता फकीर याचे करीण लिा दिल्हे आहेत त्या मारासिवाये आम्हास तोंडजबानी काही ठाऊक नाही छ मार

निा नागर

२

बिा गोपाल बापुजी व
सदासिव लिगो कुलकर्णी काा
मार

——— उभयेताचे करीण व पुरसीसासी यातीत हासील मोहदनिशा वा इसकशा फाकीर

१ मदनशावावा याणी कसबे मारचे फकीरीचे वतन मिळविले

२ मदन बाबा याणी भार आलीबावा सिशा केल्याला परदेशी होता त्यास आणोन आपली निशानी व स्वस्थानचा आधिकार दिल्हे सन १०९९ सालचे पत्र पारसी त्याजवर साक्षी का मारचे पाटलीणीच्या आहेत त्याची नावे

१ तुलजाबाई पाटलीन

१ कासाई पाटलीन

१ दारकाई पाटलीन

——— येणेप्रो आहे

३ भार आलीबावाचा लेक इसकशा व हैदरशा होते त्याजपैा इसकशा वडील मदन बावाच्या स्वस्थानची वहिवाट करीत होता

४ इसकशाच्या आलीकड इसकशाचा लेक वडील माहिदीनशा दुसरा इबरांमशा तिसरा आमदबावा पैा वडील लेक माहि(दी)नबावा हा स्वस्थानाचा वहि-वाट करीत होता

५ माहिदीन बावाच्या आलीकडे माहिदीनबावाचा भाऊ इबरांमशा याचा लेक आलीशा यास सिशा माहिदीनबावानी करून नांद्रेचे मुकामी आधिकार देऊन देवाचे गुजारतीन पत्र करून दिल्हे ते बाजीलस ! पत्र त्याची नकल घेतली आहे

६ आलीशाच्या आलीकडे आलीशाचा चुलता आमद बावा याचा लेक इबरांम यासी सिशा आलीशा बा(वा)नी करून आधिकार दिल्हे त्याचे पत्र मिरज मुकामी जाहले ते बाजीलस ( मर्जीलस ! ) आहे त्याची नकल घेतली आहे

७ मिरा फकीर याचा मार मिराचा आजा गरीबबावा त्याचा गुरू चिनगीशा फकीर विज्यापूरकर याचा सिशा आदंमशा फकीर विज्यापुरी राहणार तो येथ भिकेस जात येत होता त्याच्या ओलखीन गरीबबावा येथ कुटुबासुधा आला त्याची मुलगी दुसरी आमचे आजे भार आलीबावा यानी लग्न करून घेतले पुढे गरीबावा याचा काल जाहला त्याचा पुत्र हुसनबावा सुधा तिघ जण आमचे घरी होते पुढे आमचे आजे इसकशा थोर जाहले नतर हुसनशा सुधा तिघास बाहीर दुसरे घरे करून राहणे म्हटल्यावर त्याणी बांधून निगाले राहिले

८ समजपत्राचा मार उसमानशा वा कासीमशा हा मिराबावाचा भाऊ याणे च्यार फकीर बोलाऊन आणून त्याचे गुजारतीन समजपत्र बालू गोऱ्य याच्या हातची केली ती आमचे वडील] इसकशाबावा यास दाखविली नंतर बावानी उतर केले की त्याचा संमध नसता समजपत्र लिहिणचे कारण काये म्हणोन तास(गावास) निघाले नंतर गावकर याणी माघारे आण-

ऊन समजपत्र केली होती तीं सरकारात कमाविसदार व गावकर यानी घेतली आणि बालू गोरे यास गुनेगारी घेतली ती पत्रे मोकासी यानी गावकर यान-पासी ठेविली तीं पत्र गावकरापासी आहेत

८ —

——उभयताचे करीणेतील व पुरसीसीतील वर कलमें लिहिली आहेत त्यातील सारोष

१ मदनबावा याणी कोो मिलवडी येथील फकीरीचे स्वस्थान मिलविले पासून त्याचा सिशे भार आलीबावाचा वौशे व सिशे परंपरा अधिकार मुखेत्वे करीत आले त्याचा कागदोपत्री दाखला आहे

१ गरीबबावा मदनबावाचे स्वस्थानास खटला सांगतात त्याचा दाखला कागदो-पत्री कोठे लागत नाही त्यापेक्षां भार आलीच्या वौसिकाबरोबर स्वस्थाना-विसी वाद् सागणे च दिसत नाही

१ समजपत्र जाहली म्हणोन गरीबबावाच्या वौसिकाने मिराबावाने करणेत लिा दिल्हे आहे त्यास बालू गोऱ्यां याच्या इनषी समजपत्र त्याची चौकशी सरकारात पेशजी केली च आहे असे इमम|ा वा| आलीशा| याच्या लिहिणेत त्यास याची चौकशी पाहता समजपत्रे म्हणोन जाहली ती खोटी ती समजत्र सरकारात याजीलस आणून ठेविली सबब समजपत्राचा जाबसाल खोटा

१ गरीबबावा मिलवडीस येऊन राहिला नतर गरीब बावाची मुलगी भार आलीचा-(वा)स दिलीं उभयताची येकमेकना आहे त्यास वर्ष आद्‌मासे सवासे दीडसे सुमार जाहली पोटास गरीबबावाच्या कुटुंबास पावत होते असा भाव होता त्यास सरीरसमधाने किम्हा दोस्तीने पोषन होते हे कशावरून समजावे स्वंस्थानास गरीबावाच्या वौसिकाने बोलावयाचा समंध नाही परंतु बहुत दिवस त्याजवल राहिला सबब पाडरीचे व सरकारचे विच्यारे दोन बिघे ०२ जमीन डाग डोणापाचे सेता नजीक आहे तो त्याचे पोटास इमामशा| वा| आलीशा याने घ्यावा तो कसये मुारचे इनाम पैा सदरी डाग लिहिला आहे तो द्यावा

—
४

येकून सारोषाची कलमे ठराव केला आसे तेरीख छ ५ माहे जा| वल

निा| नागर २

सुभानराव बिन देवराव पाटील

१ बापु बालोजी पा|

मोनाजी बिन माहिपतराव पाटील

१ विटु पिरोजी पा|

१ बापू आणुजी पाटील
१ सुमानराव बिन जेरामा पाटील कसबे मार
१ येसू बिन सातापा पाटील
१ आपा बिन समाणा बालवेकर सारोपांप्रा साक्ष
१ सकोजी बिन चिलोजी तांतुगड पत्रा-प्रा साक्ष आस
१ पत्राप्रमाणे साक्ष येसू बिन राघू चोपडा का मार
१ हुसन बा माणिकभाई सुतार का मार
१ शाया बा सादिर सुतार का मार
१ ____________________
१ सतू बिन नाथाजी लाव्हारे को मार
१ धोंडी बिन मलोजी चाभार को मार
१ मानापा बिन मिरा चांभार को मार
१ बालू बा देवनाक माग का मार
१ केरू बा लिबाजी मांग का मार

१ पत्राप्रो साक्ष केरोजी पा को मार
१ आणा बिन आनंदा मयेतूप का मार
१ आपु बिन राघू मगदूम का मार
१ येसू सोमदा को मार
* १ रघुनाथभट बिंन बाळंभट जोशी कसबे मजकुर
१ सतू बिन बरमा कोली का मार
१ राघू बिन पद्मापा आवी का मार
१ बापू बिन सयू गुरव कसबे मार
१ येसू बिन नरूहराम धणगर का मार
१ वोमाणा बिन नरसापा हांजाम का मार
१ रावली बिन देवजी हाजाम का मार
१ ____________________

मिरा बा कासीमं फकीर

१ गरीबबावा चिनगीशा फकीर विज्यापुरकर हा मिरजच्या मुकामी आला होता तेथे मदनबावा उरसास गेले होते तेव्हा चिनगीशा फकीर विज्यापुरकर याजपासी मदन बावानी मुलगा मागितला तेव्हा चिनगीशा फकीर यानी आपला सिशा गरीबबावा मदनबावाच्या वाट्यात घातला आणि को मिलवडीस बरोबर घेऊन आले को मारी मदनबावानी स्वस्था(न) मिलवडी
२ दूरवस पाडलीहून मतेशा व त्याचा लेक चांदबावा आसे दोघे जण आले आणि मदनबावास गुरु करून घेतला नंतर मठाची देसरेख चांदबावा करू लागले गरीब बावाकडे गुराची व इनामाची वगैरे देसरेख करू लागले मतेशाचा काल जाह्ला गरीबबावाचे लग्न मदनबावानी केले नंतर गरीब बाबास मुले जाह्ली नतर भार आलीबावा मलग फकीर को मारचे तकेचे मठात राहिला चांदबावानी भार आलीबावाचे लग्न गरीबबावाची दुसरी लेक देऊन केले फुडे गरीब बावा व भार आली बावा हे दोघे जण येकत्र चालले फुडे गरीबबावाचा काल जाह्ला व भार आलीचा काल जाह्ला

* ही सही बाळबोधींत आहे.

गरीब बाबाचा लेक हुसनबाबा व मार आलीचा लेक हिसकशा हे उभयता येकत्र चालले पुढे हुसनबाबाचा काल जाह्ला पुढे हुसनबाबाचा लेक आबदूलशा व हिसकशा उभयेता येकत्र होते पुढे वाडी वसऊ लागले तेव्हां आपले भाऊ दोघे यास पाचे सण दुरर बाधून देऊन ठेविले पुढे काही दिवसानी इसकशाने आबदूलास हि आम्हाकडेस काढून लाऊन दिल्हे

३ इसकशाबाबाचे व आमचे आबदुलशाबाबाचा सटला होऊन येकमेकात फकीर तिराहीत आणोन समज करून घेणे म्हणोन कवटेकर व मिरजकर फकीर याचे गुजारतीने पेशजी वडील उभयेताचे चालत आले प्रमाणे चालावे म्हणोन बाळाजी गोरे याचे हातचे आमचे त्यास व त्याचे आम्हास समजपत्र जाह्ली

४ पुरसीस इसमल वा मिरा फकीर तुझे वडील व इसकशा वा मार आलीशा हे येकत्र होते पुढे तुजे वडिलास मुलामाणसासुधा बाहेर घालविले नतर तुमचे पोठाची उपजीवका कसी करीत आला ते लिा देणे याचे उतर आम्ही व इसकशा येकत्र होतो आमचे आजे तिघे वडील हुसनबाबा दुसरा हसनबाबा तिसरा कासीमबाबा इसनबाबानी त्या दोघास बिगली माली बाधुन देऊन ठेविले आपण इसकशाबा(वा) मिळो(न) वहिवाट करीत होते त्या दोघास दाणे हुसन बाबा मठापैा देत होते पुढे हिसकशाबाबानी हुसनशा बाबा मेलेवर त्याच्या लेकास बाहीर घालिवलेवर सटला होऊ लागला त्यापासून कौ मारचे इनामापैा पोटास घेत आहो

४

बिा गोपाल बापुजी व सदासिव लिगो कुलकर्णी कौ मार

साक्ष

१ सारोखामो साक्ष हरी आपाजी कुलकर्णी कौ मार
१ पत्रामों साक्ष बापु रामजी कुलकर्णी कौ मार
१ पत्रामो साक्ष रामाजी कोंडो कुलकर्णी का मार
१ राघु सिदापा चौगल पत्रामो साक्ष
१ राघु बिन विठोबा पाौ कसबे मजकूर
* १ विनाईक भट बिंन आनंतभट जोशि कसबे मजकूर

---

* ही सही बाळबोध लिपीत आहे.

१ सेरपाणा बिन भिकापा कुमारें का मार

१ लमाणा बिन आबुंता परीट का मार

१ मुरनाक गेलनाक माहार को मार

१ रामनाम वा येकनाक माहार को मार

१ हणमनाम वा होनमनाक माहार को मार

१ लियनाम वा चीलनाक माहार का मार

१ पत्रांप्रमांन बांपु वंलद इम्रांम कोरबू का मार

१ बापु वा लाडखान कोर्बी का मार

१ विटु बिन उदाजी रा मोसो कसबे मार

# जुनीं मराठी गीतें.

## खंडोबासंबंधीं पदें

१

घन मार्तंड मल्हार लावल ध्यान । कसा नांदतो पों आपल्या हिमतीन । कडे पठार महाराज लिंग । नांदं म्हाळसा घेऊनिया संग । कडे पठारावर देवाचे ठाण । तासि तांदळ गुपित लिंग दोन । देवची याद करुन त्याच भक्त काय रमण । नवबंद वाज खणखणा ध्याव ऐकून दकणांत नांदं महाराज । तेच्या आलिकड पारेव जानाबाई तिथ । गोसावीबुवाचा मठ माकड दाट हुइयाभुवनी हारनी दोनचार हुड । दकणांत गड जेजुरी नांद हौसन । तुकाराम वाग्या गातो पद ध्याव ऐकून । गाव जेजूरी मुकाम त्याच न्हान ॥ १ ॥

२

कडेपठार महाराज लिंग । नांदं म्हाळसा घेउनिया संग । कोट बांधिला मल्हारी देवान । झाड दिपमाळ लाऊन हौसन । देण्याच देग प्रधान मनोराज । असा कोट बांदला शिंया होळकरान ॥ १ ॥ उरमल्हारी इम निर्वारा दक्षिणामंदी मासूर । पिवळा झेंडा किल्ल्यावर हार्टकिला प्रधान । म्हाळसा तेला कजा सांगती । देऊरायाच्या परी बाणु म्हाळसा भांडती । काय मी सांगु नवल एकीमेकीच्या स्त्रियांच्या हानी । अगाग सवती सदरवरती स्वामीराज बसती । दीड दमडीचा तुझा संसार टैया किती बानशी ॥ २ ॥ वंगाळ जात बाणुची । काइ घरात परवड इजी[१] । काइ रानामंदि राहायाची । खाति भाजी मेल्या बकऱ्याची । सुद गेली मल्हारिची । बोलना खर हिला आसरा भारी । जाब उडविला वरिच्यावरी । हिला आसरा भारी । बाणु म्हाळसा दोघी सुंदरी भांडती देवाच्या नारी ॥ ३ ॥ धनगरणीला कुरुध आला । तवा भरली राग । फट माज सवती बाणीन । तुज गुण सांगीन आता । लिंगाइत म्हणविना काग बुदल्यात तुप खाता । डोळ्याच्या ग अंदारी करुन तस च वरपिता । जळन अंगी जमून गेली कागदाला शाई । तसच हातपाय आपट म्हाळसा आतां म्हईल काइ । माज्या देवाच घर निघालीस घरी केली सोयी । काइ तरी सुद धरुन बोलण बोलकी ग बाणाई । तुकाराम वाग्यान पद गायल जेजुरीत राही ॥ ४ ॥

## संकीर्ण गीतें

आरिंग्या बनामंदि कोण रडत आइका ।
सिताबाईला समजवाया बोरी बावळा बायका ॥ १ ॥
तुझा माझा माऊपणा किती येउ मी निंदा निंदा ।
तुज्या मंजुळ बोलण्यान मला सुचना कामधंदा ॥ २ ॥

---

१ पहा. २ विहीर. ३ महसूर ४ बोलाविला. ५ हिची.

देवाऱ्यावरी दिवा जळतो दिपतीचा ।
माज्या बाळायाच्या अंत नाही संपतीचा ।। ३ ।।
देवाऱ्यावरी दिवा जळतो लोणियाचा ।
माजा बाळ-राजु दारि कंदिल सोनियाचा ।। ४ ।।
बारा वरसाचा पुतहरु माता म्हणिति माजा ताना ।
आली अस्तुरी झाला शाणा ।। ५ ।।
बारा वरसाचा पुतहरु त्यो का झालाया वजिहरु ।
तेला देकिताना माता घेति पदहरु ।। ६ ।।
सुबान संतुबाई न्हाणी तुजी जोतियाची ।
माज्या बाळायाची स्नाण लागली मोतियाची ।। ७ ।।
शेजबाजवरी चिल्यापिल्याइचा पसारा ।
सयानु किती सांगु टाकी बिछाना दिसईरा ।। ८ ।।
ज्याचि गावात माजी बाळ त्याचि गावाच मला येड ।
बरकड लेडियाच पाणी लागना मला ग्वाड ।। ९ ।।
आंगड्या टोपड्याच बाळ दिसत कवइळ ।
चिट पुण्याच पिवइळ ।। १० ।।
आंगड्या टोपड्याची आली भरणी नकाशांची ।
माज्या बाळाच्या टोपड्याची ।। ११ ।।
आंगड्या टोपड्याच बाळ बसल तोरियान ।
झुलप झलती वारियान ।। १२ ।।
अंगड्या टोपड्याच बाळ येतया लगालगा ।
पिपळपाणायाच मोती करित झगाझगा ।। १३ ।।
छंदकन्या बाळा तुझ्या छंदाला करु काई ।
माजा बाळराजु भरल्या रांजणी धुतो पाई ।। १४ ।।
सबळे उदुइनु धुति रांजुण तळातीन ।
माज्या बाळाचान गंगा वतिली नारदान ।। १५ ।।
छंदकन्या बाळा सोड पदराचा पिळ ।
तुज्या छंदाला देति गुळ ।। १६ ।।
साकरचा पुडा पाण्याची रंवा जोक ।
झाला रतिबाजोगा लेक ।। १७ ।।
कळीच्या नारदान कळ घेतिली इकइतुं ।

६ बायको. ७ पदर. ८ दुसरा. ९ तन्हेतन्हेचा. १० सकाळ. ११ तळहातानें.
१२ विकत.

माज्या बाळाबाल मंदी सोडिल्य पिकाइगु ॥ १८ ॥
देवाभिल्य जाती उन लागत माज्या जिवा ।
माज्या बाळराजा छत्री उघड सदाशिवा ॥ १९ ॥
देवा जोतिबाला जाति जीव माजा खुशालीत ।
उबा ह्कण द्रवाजात ॥ २० ॥
देवा जोतिबाचा घोडा नाचतो थयाथया ।
यमाबाईच्या बना जाया ॥ २१ ॥
देवामंदि देव, देव जोतिबा किती काळा ।
तेच्या अंगुळिला लाग कस्तुरी सवा तोळा ॥ २२ ॥
देवा जोतिबाच्या वाट वाज नगारा तांबियाच ।
भक्त निघाला भागियाचा ॥ २३ ॥
परटीण धुण धुती निनाबाइच पानइळ ।
पाणी टाक्याला उतइळ ॥ २४ ॥
गाबी आल्यात्या कळवातिणी नाच घेत्यात भुइचा ।
माजा बाळराजु टाकी मंदिल होइईचा ॥ २५ ॥
निनाबाईच्या पारापाशी गार सावली पिपळाची ।
चुलत्या माज्या पंडिताची बोली मंजुळ गोपाळाची ॥ २६ ॥
देवाच्या देवळातु उबी राह्लिी गाबान्यातु ।
माजा बाळराजु मोती दिलाया अंगान्यातु ॥ २७ ॥
देवाच्या देवळातु उबी राह्लिी सांबाआडु ।
निना माज्या वाणिणीला इंति देवाला गेली जडु ॥ २८ ॥
देवाचया देवळात उबी राह्लिी सवत्र्यान ।
[१५]इंति घालिती जिवाल्यान ॥ २९ ॥
दिस्ट झाली म्हणू देवापरास गुरवाला ।
माज्या धंदुराया नग बसूस कवलाला ॥ ३० ॥
सरी दोपारीचा कोण उनाचा धाव घेतो ।
बहिणीकारण भाऊ जातो ॥ ३१ ॥
रागूमेना दोग किलबिलत गेली ।
रागुपरास मेना शाणी तेचा सबद झेली ॥ ३२ ॥
तोंडात घाली तोंड रागूची चोची लाल ।
मेना पिरतीची तू ग बोल ॥ ३३ ॥
कुरुल्या केसायाच मांगा पडत आकड ।

१३ इइचा=डोक्याचा. १४ माकणूक-विचार I. १५ देवास कौल लावतान त्याचा उल्लेख.

रुप याळच फिकड्ड ॥ ३४ ॥
साकरच लाडु तपांत इळमळ ।
माज्या बाळायाचा जेवता थाम गळ ॥ ३५ ॥
पिकला एवडा आंबा आगाशी इळमळ ।
झाली मुरुस तळमळ ॥ ३६ ॥
उथाळ पाण्यामंदि घागर बुडइना ।
मुरखाच्या बोलण्याचा मनी इसर पडईना ॥ ३७ ॥
वाटवइली सैंविदंड[16] काट तिच्या चवरंगी ।
लोकाला ठेवती नाव नार आपण चहुरंगी ॥ ३८ ॥
वाटवइली सवदंड काट तिच्या इंजइंजें[17] ।
दोगी नारीच्या भरताराचो एका पलंगी नाही नीज ॥
राळ्याचा लोंचाइट हालत लवालवा ।
दोगी नारीचा भरतारु करितु देवादेवा ॥ ४० ॥
एकीचा भरतारु जेवितु दुदभातु ।
दोगी नारीचा भरतारु चिंता करितु साऱ्या रातु ॥ ४१ ॥
लाल पिंजरीच कुकु नार लेतिया टिकइला ।
अंजिराची बाग साज्या राकितु एकइला ॥ ४२ ॥
लाल पिंजरीच कुकु मि का एकली कसी लेवु ।
हाइ धाकटी माजी जाऊ ॥ ४३ ॥
भावजी गुजइरी नग उठयान कुकु लिवू ।
हाइ वाणीचा माजा भाऊ ॥ ४४ ॥
भावजी गुजइरी टाक चिछाना झाडुइनी ।
माजा बंदुराया उद्या मंदिल काडुइनी ॥ ४५ ॥
बंदुजी आपइला भावज लोकाची कशी म्हणू ।
माज्या नागाची पद्मिणु ॥ ४६ ॥

---

सालाबादप्रमाणें हा गीतांचा हप्ता पाठविला आहे त्याचा सप्रेम स्वीकार व्हावा.

वा. दा. मुंडले.

---

१६ शमीचें झाड. १७ इंजण=झाडे.

श्रीरामसमर्थ

# शके १८३९ मधील नऊ महिन्यांतील संशोधन.

गेल्या वर्षी श्रावण महिन्यापासून संशोधनास आरंभ केला. प्रथम **सातारा** येथें गेलों. पहिल्यानें छत्रपतीसरकारचें दफ्तर पहावें अशी इच्छा असल्यानें त्या बाजूनें प्रयत्न केला. सरकारी दफ्तर हल्लीं एकंदर तीन ठिकाणीं विभागलें गेलें आहे. एक जलमंदिरांत, दुसरें खानगीकचेरींत व तिसरें माचीवरील सरकारी अदालत वाड्यांत. पैकीं जलमंदिरांत खुद्द महाराज राहात असल्यामुळें तेथें प्रवेश होण्यास बरी च अडचण आहे, म्हणून राहिलेल्या दोन ठिकाणांतील दफ्तरें पाहण्यास परवानगी मिळावी अशासाठीं बरा च प्रयत्न केला पण तो सिद्धीस गेला नाहीं. आपल्या मंडळा पैकीं रा. वासुदेवराव जोशी हे खानगीकचेरींतील दफ्तर पाहत आहेत व त्यामुळें आणखी एकासाठीं परवानगी काढणें जुळणार नाहीं असें मला सांगण्यांत आलें. नंतर दफ्तर नाहीं तर नाहीं पण निदान वरील ठिकाणें तरी पहावीं म्हणून कारभाऱ्यांस विचारतां त्यांनीं कबूल केलें; आणि लागली च खानगीकचेरी दाखविली. जलमंदिरा समोर च बाहेरच्या बाजूस ही इमारत एका बागेंत आहे. येथील इमारत बंगलेवजा दुमजली आहे. येथील दफ्तर बांधून चांगल्याप्रकारें ठेविलेलें आहे. हें साधारण १२५।१५० वर्षांपूर्वीचें आहे. मागें एकदां ज्यांच्या बद्दल " विकावयाच्या आहेत " म्हणून केसरींत जाहिरात आली होती, त्या जुन्या कांचेवरील तसबिरांपैकीं जवळ जवळ निम्या तसबिरा येथें आंतल्या दालनांत भिंतीस लाविलेल्या आहत. त्या रंगीत, सुबक काढलेल्या अशा आहेत; मात्र जुन्या तसबिरांत आढळणारा यथा-दर्शनाभावा ( Perspective ) चा दोष यांत हि आहे. ऐतिहासिक, पौराणिक व काल्पनिक अशा व्यक्तींच्या, स्थळांच्या या तसबिरी एकूण २३ आहेत. त्यांपैकीं फक्त ऐतिहासिक च खालीं देतों:—

१ तुकोजी होळकर. २ चंदीचंदावरकर राजे. ३ राणाजी उदेपूरकर (प्रताप-सिंह नव्हे ). ४ कृष्णराव राजे. ५ उदेपूरकर जैसिंग राणाजी. ६ Bonaparte तरुणपणांतील. ७ * माधोजी शिंदा ( पाटीलबावा. ) ८ श्री. सवाई माधवराव. अगदीं तरुणपणांतील; फार सुंदर व कोमळ चेहरा दाखविला आहे. ९ नाना फड-णीस. उतरत्या वयांतील, अत्यंत किडकिडीत, गाल पार बसून गेलेले, अशी. १० फरामरोझ. ११ जहांगीर. १२ जमशीद. १३ घोड्यावरील नादीरशहा.

याप्रमाणें १३ ऐतिहासिक तसबिरी आहेत. नंतर माचीवरील सरकारी अदालतवाडा पाहिला. त्यांत हि वरील तसबिरींच्या च दुसऱ्या प्रतिकृती आहेत. विशेष म्हणजे एक नेपो-

* आपल्या मंडळांत आहे ती निराळी आहे.

लियनची, मोठ्या थाटानें बर्लिनमध्ये प्रवेश करीत आहे ती व दुसरी त्याची च राज्याभि-षेकाची आणि तिसरी भट पेशव्यांपैकीं कोणा तरी एकाची, अशा तीन तसबिरी होत. नेपोलियनाच्या दोन्ही तसबिरी युरोपीय चित्रकारानें काढलेल्या आहेत. पेशव्यांच्या तसबिरीवर नांव दिसत नाहीं व कदाचित् असल्यास, तसबीर अतिशय उंचीवर टांगली असल्यामुळें त्याचा खालून कांहींच बोध होत नाहीं. भट कुळाचें वैशिष्ट्य जें लांबट चेहरा, सरळ नाक, उंच बांधा, पाणीदार डोळे, मराठी पागोटें ( शिरपेंचा सकट ) इत्यादि, तें या तसबिरींत दृष्टोत्पत्तीस येतें. असें वाटतें कीं, हें चित्र बाळाजी विश्वनाथाचें असावें. बाळाजीपंतनाना शिवाय इतर बहुतेक पेशव्यांच्या तसबिरी हल्लीं उपलब्ध झाल्या आहेत, त्यांपैकीं एकीसारखी हि ही नाहीं; म्हणून ती बाळाजीपंतांची असावी असें वाटतें. इचें छायाचित्र घेण्यास परवानगीची च अडचण पुढें आली. असो. हा वाडा पेशव्यांकरितां बांधलेला आहे. हल्लीं फक्त दर्शनी भाग राखून दोन्ही बाजूं-च्या इमारती नवीन बांधल्या गेल्या आहेत. पाण्याचा जुना हौद दुमजली आहे. या वाड्यांतील एका भागाकडे दृष्टि गेली म्हणजे मनाला फार वाईट वाटतें. वाड्याच्या अगदीं पिछाडीस असलेल्या एका ओंवरींत ३।४ हत्तींच्या ओझ्या इतके कागदपत्र पडलेले आहेत. पण दुःखाची गोष्ट कीं, तेथें च सरकारचीं खाजगी गुरें बांधलीं जात असल्यामुळें त्यांच्या मूत्रपुरीषोत्सर्गानें ते सडून कुजून त्यांचा भुगा होण्याची वेळ आली आहे! सरकारी कामगारांच्या सांगण्यांत, हे कागदपत्र महत्वाचे नसून, महत्वाचे असे ओंवरी शेजारील एका खोलींतील दफ्तरखान्यांत रुमालांत बांधून नीट ठेविले आहेत, असें आलें. या च पैकीं कांहीं रुमाल गु. राजवाडे यांनीं चाळले असून बाकीचे १५।२० अजून तसे च राहिले आहेत असें हि समजलें. हे रुमाल शोधण्याची, तसें च जलमंदिरांत दिल्लीच्या चक्रत्यांकडून छत्रपती सरकारास आलेलीं व ज्यांचीं भाषांतरें डफला मिळालीं होतीं, अशीं जीं अस्सल २२ पत्रें आहेत त्यांच्या नकला-अस्सल बरहुकुम नकला-घेण्याची निदान त्यांचीं छायाचित्रें मिळविण्याची फार खटपट केली पण यश आलें नाहीं. असो. या माचीवरील वाड्याला लागून च पुरंदरे यांचा वाडा आहे. हा मात्र पडक्या अवस्थेंत आहे. याच्या पुढें साधारण पाव मैलावर पण या च पट्टीस रंगमहाल नांवाचा शाहू-महाराजांनीं बांधलेला व जेथें त्यांचें देहावसान झालें असा वाडा आहे. हल्लीं हा हि फक्त एका दुमजली बंगल्याशिवाय सर्व पडलेला आहे. आंत एक भुयार आहे. येथून पुढें खडकांत कोरलेला किंवा बांधिलेला पीलखाना आहे. या सर्वांच्या मागें साताऱ्याचा प्रसिद्ध किल्ला अजीम ऊर्फ अजिंक्य तारा आहे. याचें फारशी खरें नांव 'उकाबैन' असें आहे. हुक्केबयान नव्हे. उकाबैन हा फारशी शब्द असून त्याचा अर्थ कोशांत, एक जातीचा तिकोनी आकाराचा पक्षी, असा सांपडतो आणि किल्ल्याचा आकार हि त्रिकोणी च आहे हें, त्याच्याकडे क्षणभर पाहिल्यासुद्धां नजरेस येतें. पूर्वपश्चिम भाग चिंचोळा म्हणजे चोंच व शेंपूट यासारखा असून दक्षिणोत्तर भाग रुंद, बाहेर आलेला म्हणजे पोटासारखा आहे. उकाबैन नंतरचें नांव 'सितारा' (उंच) होय. किल्ल्या-


वर हल्लीं जुन्या इमारतींपैकीं फक्त मंगळाईचें व महादेवाचें मंदीर आणि सरकारी वाडा आहे. वाड्यास इंग्रेज सोजिरांचा स्पर्श झाल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. १।२ तलाव हि वर आहेत. ईशान्येचा प्रयागजी प्रभूचा मंगळाईचा बुरूज मंगळाईच्या देवळा नजीक च आहे. गडावरून नैऋत्येस असलेल्या श्री सज्जनगडाचें दर्शन स्पष्ट होतें. असो. जलमंदिराला + लागून च असलेलें सरकारचें देवघर हि पाहण्यासारखें आहे. जलमंदिराच्या व देवघराच्या भोंवतीं असलेल्या तटाच्या दरवाज्यांतून आंत गेल्यावर ५० पावलांपुढें एक फाटक लागतें. या फाटकाच्या बाहेर, आंत जाणाऱ्याच्या डाव्या हातास असलेल्या देवडीवर सरकारी डंका, निशाणें आहेत. जरीपटका, *भगवाझेंडा व दुसरीं आणखी कांहीं निशाणें आहेत. तीं सर्व गुंडाळून वर टांगून ठेविलीं आहेत. मात्र एका कोंपऱ्यांत एक निशाण उभें, जमीनींत खोंचून ठेविलेलें आहे; त्याच्या माथ्यावर मोरांचीं पिसें लाविलेलीं असून त्याच्या कापडाचा रंग मराठ्यांच्या नेहमींच्या निशाणाच्या कापडाच्या रंगापेक्षां अगदीं च निराळा म्हणजे किरमिजी आहे. त्याला 'खास निशाण' म्हणतात व ते श्रीमंत थोरले शाहूमहाराज चकत्या कडून स्वराज्यांत परत येतांना त्यांना मिळालेलें आहे असें सांगण्यांत येतें व त्याच्या स्वरूपावरून तें खरें असावेंसें वाटतें हि. हल्लीं दसऱ्याच्या स्वारींत हीं डंका निशाणें निघतात. फाटकांतून आंत गेल्यावर एक पटांगण असून त्यांत शिकारी जनावरांचे पिंजरे आहेत. पटांगणाच्या पश्चिमेस देवघराची इमारत लागते. ही इमारत नवीन च आहे. कारण पूर्वीचें देवघर, श्री. आप्पासाहेब यांनीं शके १७६० च्या सुमारास बांधलेल्या नव्या वाड्यांत होतें व तें शके १७६६ त बांधलेलें असून त्याचें मोजमाप ८३′ × ४५′ × २५′ असें आहे. जेथें पूर्वीं हिंदवी पातशाहीची भवानी बसत असे तेथें हल्लीं इंग्रेजी न्यायकचेरी आहे. याच्या शेजारील व जो श्री. प्रतापसिंह महाराजांनीं शके १७४२।४३ चे सुमारास बांधला त्या, जुन्या वाड्यांत हि हल्लीं इंग्रेजी शाळा आहे !! असो. हल्लींच्या देवघराचें स्वरूप पूर्वीच्या प्रमाणें च उंच, लांब व अरुंद असें च आहे. देवीचा उत्सव नवरात्रांत होतो. त्या वेळीं देवघराला त्याच्या पूर्वीच्या सर्व सामानानें सजाविण्यांत येतें. ३।४ पुरुष उंचीचे मखमलीचे पडदे सभामंडपाच्या दोन्ही अंगांस सोडतात; रात्रीं, कमरे इतक्या उंच समया दुतर्फा तेवत असतात. पश्चिमेच्या शेवटच्या भिंतीपासून साधारणतः २५ पावलां वर पूर्वेस एक मखर घालून च इमारतीचे सभामंडप व गर्भागार असे दोन भाग केलेले आहेत. गाभाऱ्यांत आजमासें ५ हात चौरस चौरस असा एक शिसवीचा चांदीच्या फुल्या बसविलेला चौरंग आहे व त्यावर पायऱ्यापायऱ्यांचें एक सिंहासन आहे. या सिंहासनावरील व इतर गाभाऱ्यांत असलेल्या मूर्ति आणि दुसऱ्या ऐतिहासिक ज्या वस्तु आहेत त्या अशाः—

---

+ जलमंदीर हें शके १७४६।४७ त श्री. प्रतापसिंह महाराज यांनीं बांधिलें.

* जरीपटका व भगवाझेंडा हीं दोन्हीं एक नसून दोन निरनिराळीं असतात.

१ श्रीअष्टभुजादेवीः-मूर्ति सबंध सोन्याची, टीचभर लांबीची, टांकवजा आहे. थोरले महाराज लढाईवर जातानां ती गळ्यांत बांधीत असत असे सांगितात. २ महाकाली, ३ महालक्ष्मी, ४ महासरस्वती. या तिन्ही मूर्ति सोन्याच्या च असून लहान आहेत. ५ शाहूमहाराज थोरले व त्यांची पत्नि ( महाराणी सकवार बाई काय ? कारण त्या महाराजांमागें सती गेल्या आहेत ) यांचा एक सोन्याचा टांक. याच्यावर दोघांच्या मूर्ति कोरलेल्या आहेत. ६स्फटिकाचा महादेव. केवळ बाण नसून शाळुंकेसहित लिंग आहे. याची पूजा थोरले ( शिवाजी ) महाराज करीत. सिंहासनावरील शेवटची वस्तू म्हणजे ७ दक्षिणावर्ती शंख मूर्ति ही होय. या सिंहासनाच्या दोन्ही बाजूंस चौरंगावर वेष्टणांत गुंडाळून उभ्या केलेल्या दोन तरवारी आहेत; पैकीं एक साधी आहे व दुसरी महत्त्वाची आहे, ती म्हणजे, ८ श्रीभवानी होय असें सांगतात. थोरल्या महाराजांची भवानी, इंग्रेजानें ब्रिटिश म्यूझियम् मध्यें ठेविली आहे अशी पूर्वी समजूत होती पण ती साफ खोटी आहे, असें रा. विनायकराव भावे यांनीं ब्रिटिश म्यूझियमच्या रेकर्डकीपरच्या स्वदस्तुरच्या पत्रावरून सिद्ध केलें आहे ( पहा तृतीय संमेलनवृत्त पृष्ठ ११ ). ही सिंहासनाच्या उजव्या म्हणजे पाहणाऱ्याच्या डाव्या बाजूस चौरंगावर सिंहासनाला टेकून ठेविलेली असते. हिच्यावर तांबड्या कापडाचें वेष्टण असतें. म्यानाच्या खालच्या टोंकास जडावाचें मेढें बसविलेलें आहे; त्यांत लहान लहान ११७ माणकें, १२ हिरे व २ पाच आहेत; तसें च मुठीवर हि सोन्याचें मीनाकाम केलेलें असून मोठीं अशीं दोन माणकें जडविलीं आहेत. म्यान काढून तलवारीची लांबी मोजली असतां, माझ्या हातानें दोन हात व एक टीच भरली. मुठीपासून १॥। हात पर्यंत तलवारीची धार एकेरी असून पुढें शेवटपर्यंत दुहेरी आहे. मुठीपासून थोडेसें खालीं पानाच्या रुंद बाजूवर खालील खोदीव आकृति व अक्षरें आहेत:-



स र का र राजा शाहु छ त्र प ति का द + + +

CA CA CA

हें खोदकाम उथळ खोदलें गेल्यानें व तलवार नेहमीं घांसावी लागत असल्यानें तें अस्पष्ट झालें आहे, " काद् " या पुढील अक्षरें तर साफ उडून गेलीं आहेत. वरील अक्षरांवरून, ही थोरल्या महाराजांची भवानी नसावी अशी शंका येते. पण त्यांच्या पश्चात् शाहूमहाराजांनीं तिच्यावर आपलें नांव खोदविलें असावें असें हि मनांत येतें. याशी या अक्षरांनें मनाचें निःसंशय समाधान होत नाहीं व अद्यापी हि भवानीचा पत्ता

बिनचूक लागत नाहीं. मात्र एवढें खरें कीं, ह्या कारागीर गोम्याचा च पूर्तकाल नसला तरी दुसरा कोणी तरी फिरंगी असावा असें C A C A या अक्षरांवरून ध्यानांत येतें. वरील टिंबाटिंबाची जी आकृति आहे ती छत्रपतींच्या छत्राची निदर्शक आहे. बाळंतीण अडल्यास हिचें तीर्थ देतात व त्या तीर्थप्राशनानें तिची सुखरूप सुटका होते अशाबद्दल या तलवारीची सान्या सातान्यांत प्रख्याति आहे. असो; या सिंहासनाच्या उजव्या हातास एक खोली आहे; तिच्यांत ज्या कांहीं जिनसा आहेत त्या अशाः—

१ श्रीसमर्थांनीं थोरल्या महाराजांना प्रसाद म्हणून दिलेला लांकडी सोटा, त्याची लांबी साडे दोन हात भरली. वर चांदीची मूठ आहे. २ पिठोबाची लाकडी मूर्ति. ३ विटेवर कोरलेली श्रीमारुतिरायाची मूर्ति. श्रीसमर्थांनीं स्वहस्तें कोरून छत्रपतींना दिलेली असावी, ४ महापुरुषमूर्तिः–एक ब्राम्हण छत्रपति सरकार (कोणते?) यांच्या: कडून चुकून मारला गेला त्याची ही प्रतिमा आहे असें सांगतात. या सर्व मूर्तींची व वस्तूंची पूजा रोज होत असते. येथें च एका पेटींत थोरल्या महाराजांचें म्हणून दाखविण्यांत येणारें ५ चिलखत आहे; हें पोलादी नसून कापडी आहे. बखरींतून 'जरीकुडती' म्हणून याचा उल्लेख आहे. वर व खालीं रेशमी जाड अस्तर असून मधें रेशमाच्या वळलेल्या जाड लडीच्या लडी एकत्र गुंफलेल्या आहेत व त्यांचा अस्तराशीं सोन्याच्या तारांनीं शिवून एकजीव केला आहे. याची उंची माझ्या कानापर्यंत आहे, यावरून महाराज ठेंगु होते असें जें आपण ऐकतों त्याची सत्यता पटते. चिलखत इतकें जड आहे कीं, साधारण माणसाला तर तें सबंध उचलवत नाहीं च; पण एकाद्या दांडग्या सशक्त माणसाला हि उचललें गेल्यास लांब हात करून १०।१२ पळें कांहीं तें तोलविलें जाणार नाहीं; आणि असलें चिलखत महाराज अंगांत घालीत! असा च रेशमी लडी आंत असलेला ६ टोप आहे. तो चिलखताहून सुटा आहे. दोन्ही कान पूर्णपणें झांकले जातील अशी सोय त्या टोपास दोन, तसल्या च प्रकारच्या कापडाचे जोड लावून केलेली आहे. म्हणजे शिरस्त्राण व कर्णत्राण एकमेकांना जोडून च आहेत. पहिल्यानें वरवर पाहिल्यास असें वाटतें कीं, असल्या अंगरख्यानें शरीर कसें रक्षण होत असेल? पण रेशमावर शस्त्राचा घाव लागत नाहीं, अशी प्रख्याति आहे; त्यावरून व आपण हि तेथें प्रत्यक्ष थोडासा प्रयोग करून पाहिला म्हणजे खात्री होते कीं, याच्या वर शस्त्राचा मार चालणें शक्य नाहीं. असो. या सबंध देवघराचें छाया-चित्र घ्यावें म्हणून तेथील पुजान्यास विचारिलें असतां त्याला मुद्दाम महाराजांची परवानगी पाहिजे असें त्यानें सांगितलें. सातारा येथील बाजीराव पेठ, बाजीरावांची विहीर, गेंडा माळ वगैरे ऐतिहासिक स्थळांबद्दल माहिती प्रसिद्ध च आहे, तेव्हां ती न देतां, आतां मला येथें जो कांहीं प्राप्ती झाली ती देतों. प्रथमतः अप्पासाहेबांनीं एक व येथील रहिवासी श्री. रामचंद्रराव रघुनाथराव पंडितराव यांचेकडे गेलों. श्रीमंतांचे

२४

वय तरुण असून ते सुज्ञ, सुशिक्षित, हल्लींची काळवेळ जाणणारे आहेत. माझ्या पहिल्या भेटीला च त्यांनीं आपलें शिल्लक असलेलें दफ्तर दाखविण्याचें कबूल करून तें २।३ दिवसांत माझ्या हवालीं केलें हि. त्यांतील महत्त्वाच्या कागदांच्या नकला करून मूळ कागद परत केले. त्यांत शके १७५२ मधील राज्याभिषेक प्रकर्णाची एक ३७ बंदांची बखर आहे. तींत छत्रपतींना राज्याभिषेक कसा होत असे, त्या वेळीं कोणतीं दानें, विधी, दक्षणा, सेवकांस पोषाख वगैरे देण्यांत येई तसें च अष्टप्रधानांचे, युवराजाचे, गुणावगुण वगैरे हि उल्लेख आहे. इच्यांत छत्रपती सरकारचा राजमुगुट ३० तोळ्यांचा सोन्याचा, वर जडावाचें काम केलेला असे, असा निर्देश केलेला आहे. असो. दुसरी एक बखर म्हणजे पंडितराव ऊर्फ राजोपाध्ये व भोसले छत्रपती यांची, कालानुक्रमानें एके ठिकाणीं दिलेली वंशावळ ( साधारण ठोकळ माहितीसहित ) ही होय. भारतवर्षांत पंडितरावांची जी बखर प्रसिद्ध झालेली आहे तिच्यापेक्षां ही निराळी आहे. इच्या शेवटीं "येणेंप्रमाणें वंशावली शाहूमहाराज यांचे सिकामोर्तबाची असे "असा उल्लेख आहे. म्हणजे ही बखर खुद्द शाहूमहाराज यांनीं तयार करविलेल्या वंशावळीची नक्कल आहे. तिसरी बखर म्हणजे पंतप्रधान व पंतप्रतिनिधी यांचे झाडे होत. तींत मोरोपंत पिंगळ्याच्या आधीं नरहर आनंदराव म्हणून एक थोरल्या महाराजांचे पेशवे होते असें लिहिलें आहे. हें नांव नवीन च आहे. दिल्लीच्या चकत्याकडून आलेल्या पत्रांच्या नकलांचें एक बाड आहे. गु. राजवाड्यांच्या ८ व्या खंडांत हीं ११ पत्रें आहेत; तर प्रो. सरकार म्हणतात कीं इफला २२ पत्रांच्या नकला मिळाल्या होत्या. प्रभातांत हि यांपैकीं कांहीं छापल्या गेल्या आहेत. या बखरींत पत्रांची, संख्या २४ आहे. असो. कोल्हापूरकर संभाजी व सातारकर शाहूमहाराज यांच्या मधील झालेल्या शके १६५३ तील वारणेच्या तहाची व त्याणखी हि कांहीं कागदपत्रांच्या नकला इच्यांत आहेत. रायाराव ( मुरार जगदेवाचा कारभारी ), खेळोजी राजे, मलिक अंबर, बिबी मरियम, सिदी याकूब, कृष्णाजी हरजी राजे भोसले, शहाजी राजे भोसले यांचीं व पंतप्रधानांपैकीं २।३ पेशव्यांचीं, तसें च चत्रसिंग भोसले, राजाराम महाराज यांचीं व आणखी हि पुष्कळांचीं अस्सल पत्रें सांपडलीं आहेत. त्यांत एक मालोजी राजे यांचें हि अस्सल पत्र आहे. त्याबद्दल पुढें स्वतंत्रपणें च चर्चा करण्यांत येईल. यांच्या घरीं राजव्यवहार कोशाची अस्सल प्रत असावी म्हणून तपास केला पण सांपडली नाहीं.

यांचा जुना वाडा हल्लींच्या वाड्याच्या जवळ च सेनापतीच्या वाड्याशेजारीं होता. पण तो मागें च जळून गेला. त्यामुळें त्यांच्या येथें असलेल्या अमूल्य संग्रहाला आपण मुकलों आहोंत. यांच्या घरीं अद्यापि पूर्वीचीं म्हणजे पंडितरावांना छत्रपतीकडून देण्यांत येणारीं, चिरा, चादली, वगैरे राजवस्त्रें व चांदीचे सिक्के आहेत. सिक्का शाहुमहाराजांच्या वेळचा रामचंद्रराव पंडितरावांचा आहे. सिक्क्याचा छाप मंडळाच्या संग्रहीं आहे. पंडितराव हे, भोसल्यांच्या आर्वी, हिंगणीबेरडी, वगैरे या गांवचे कुळ-

कर्णी व जोशी हि आहेत. यांचें देवन आर्वी येथील मुद्गलेश्वर होय. पूर्वी यांचे उत्पन्न फार असे, पण हल्लीं जहागिरीचीं तीन गांवें मिळून सालिना ५ हजारांचे आहे. यांना आपल्या मंडळाचे सभासद् केलें आहे.

असो. नंतर शनिवार पेठेंतील ठाकुरदासबोवांच्या मठांत गेलों. तेथें त्यांच्या वंशजांनीं बरेचसे अस्सल कागदपत्र दिले, त्यांच्या नकला घेऊन ते परत केले. नागेश शुक्ल या व्यक्तीच्या नांवचा, श्री. आई ( ताराबाई ) साहेब, शाहूमहाराज, नानासाहेब, थोरले रावसाहेब, परशुरामपंत, श्रीनिवासपरशुराम, रघोजी भोंसले, बाजीराव बाबासाहेब ( यांच्या एका पत्रांत नाना फडणीस हे कन्हाडास प्रतिनिधीच्या मुंजीस गेल्याचा उल्लेख आला आहे), विसाजी बच्याजी, आबाजी महादेव यांच्या कडून आलेला पत्रव्यवहार आहे; त्यावरून त्यांचें गांव व त्यांच्या बद्दलची आणि त्यांच्या वंशजाबद्दलची बरी च नवीन माहिती लागते. आपल्या येथें हि ठाकुरदासबोवांचें मंदीर आहे. नंतर शनिवारांत च रा. कृष्णराव ऊर्फ काकाराव जोशी यांचेकडे गेलों. हे पेशवे सरकाराकडून हैदर व टिपू यांजकडे वकील असलेल्या कृष्णराव ऊर्फ तात्यासाहेब जोशी यांचे वंशज होत. यांचे येथील दफ्तर गु. राजवाडे व रा. पांडोबा पटवर्धन यांनीं एकदां पाहिल्याचें रा. काकारावांनीं सांगितलें. तरी आपण हि एकदां पहावें, असें वाटून सुमारें १०० रुमाल पाहिले. त्यांतून कांहीं कागद निवडून काढले; ते रा. काकाराव यांनीं मंडळाच्या संग्रहीं ठेवण्यास माझ्या हवालीं केले. टिपूशीं झालेल्या मराठ्यांच्या युद्धाबद्दलचीं, धोंड्या पंताच्या बंडाची, पेशवाई अखेरचीं, आंग्लाई आरंभीचीं, साताऱ्च्या पोतदारीचीं, वगैरे निरनिराळ्या प्रकारचीं सुमारें ५०० च्या वर हीं अस्सल कागदपत्रें आहेत. यांत डफ, राबर्टसन वगैरे इंग्रेजांचीं हि पत्रें आहेत. १९ व्या खंडांत यांच्या येथील कागद छापण्यांत आले आहेत. असो. नंतर यादो गोपाळ पेठेंतील आठल्ये दीक्षित या घराण्याचे कागदपत्र पाहिले. रा. रामचंद्र विष्णु ऊर्फ बापूराव दीक्षित हे माझे मित्र असल्यामुळें त्यांनीं स्वसंतोषानें आपल्या घरचा सर्व संग्रह मला दाखविला. यांचें घराणें श्रौताबद्दल व वैदिकीबद्दल पूर्वीपासून प्रख्यात असल्यानें त्या विषयावरील बरेचसे ग्रंथ यांच्या येथें आहेत. त्यांतून मीं निवड केल्यापैकीं कांहीं ग्रंथ त्यांनीं माझ्या पदरांत टाकिले ते अत्यंत जुने आहेत. पृष्ठमात्रेचा त्यांत बहुतेक ठिकाणीं उपयोग केलेला आहे. कांहीं ज्योतिषविषयक जैनकर्तृक जे ग्रंथ आहेत त्यांपैकीं भुवनदीपकवृत्ति नांवाचा ग्रंथ जवळ जवळ ४०० वर्षांचा जुना आहे, व बाकीचे ३५० वर्षांपूर्वीचे लिहिलेले आहेत. चतुर्वर्गचिंतामणीमधील व्रतखंडाची पोथी संवत १६२४ मधील लिहिलेली आहे. कांहीं कागदपत्रें हि मिळालीं आहेत, तीं म्हणजे श्री. आई ( ताराबाई )साहेब, श्री. राजाराम महाराज, सवाई माधवराव, दौलतराव शिंदे, बापूराव आंग्रे, कृष्णाजी त्र्यंबक अजह्त देशमुखदेशपांडे व चोगुले प्रांत कन्हाड, पैठण संस्थान यांच्या कडील आपल्यांना व इतर सरकारी कामदारांना आलेलीं

आहेत. त्यावरून आटल्यांच्या घराण्याची माहिती बरी च लागते. हा सर्व संग्रह आपल्या दफ्तरखान्यांत ठेविला आहे. यानंतर गुरुवार पेठेंतील रा. बाळकृष्ण रामचंद्र राजोपाध्ये वकील यांची भेट घेतली. त्यांचे हि दफ्तर गु. राजवाडे यांनीं तपासून त्यांतील कांहीं कागद १५ व्या खंडांत छापले आहेत. तरी पण मला पेशवाई अखेरीच्या छत्रपती सरकारच्या चिटणीस दफ्तरांपैकीं सरासरी अस्सल १०० बंद सांपडले. "चिटणिसीकडील राजपत्रावर शिक्का व मोर्तब व्हावयाची ती यादी" असें प्रत्येक बंदाच्या आरंभीं असून त्या दिवशीं बार केलेल्या प्रत्येक पत्राचा साधारण सारांश यांत दिलेला आहे. त्यामुळें इतिहासाच्या कामीं यांचा फार उपयोग होईल. त्याचप्रमाणें शेवटचे राजाराम महाराज, शाहुमहाराज व प्रतापसिंह महाराज आणि त्यांच्या राण्या यांचा या राजोपाध्यांशीं झालेला खाजगी अस्सल पत्रव्यवहार, तसें च प्रतापसिंहपदच्युतीच्या वेळचे हि कांहीं कागद सांपडले आहेत. निमकहराम होऊन परकीयास न मिळतां अखेरपर्यंत प्रतापसिंहमहाराजांशी टिकून राहिलेल्या कांहीं व्यक्तींपैकीं हे राजोपाध्ये प्रमुख होत. त्यासाठीं त्यांचीं वतनें हि खालसा करण्यात आलीं. अशा प्रसंगीं जो या स्वामीसेवकांत अस्सल पत्रव्यवहार झाला तो सांपडला असून त्यावरून त्या प्रसंगाचें खरें चित्र पहावयास सांपडतें. तसें च मौजे देऊळगांव ताा पाटस प्रांत पुणें व मौजे सिरापूर प्रांत मजकूर येथील छत्रपती सरकारांच्या पाटिलकीचे कांहीं कागद आणि मल्हार रामराव, त्र्यंबकराव दाभाडे सेनासरखेल वजारतमाब, ग्रिग्ज वगैरे लोकांचीं अस्सल पत्रें हि यांत आहेत. शिरोजी फर्जंदाचें एक पत्र असून त्यांत त्यानें आपल्यास महाराज अटकेंत असतां व अटकेंतून सुटतांना आपण जीं कांहीं कृत्यें केलीं त्यांचें वर्णन केलें आहे. तसें च आणखी एक महत्वाचें पत्र म्हणजे डफनें ८ जून सन १८२८ रोजीं विलायतेहून श्रीमंत प्रतापसिंह महाराजांना लिहिलेलें होय. डफनें १२ मे १८२७ मध्यें नौकरी सोडली व नंतर तो विलायतेस गेला. तेथें त्यानें आपल्या इडेन ( Eden ) या गांवाहून हें पत्र लिहिलेलें आहे. हें पत्र म्हणजे १८२७ च्या पुढील डफचें एक लहानसें आत्मचरित्र च होय. हें १० बंदांचें आहे. तें स्वतंत्र रीतीनें आपल्या पुढें केव्हां तरी येईल च. नंतर आपल्या मंडळाचे सभासद श्री. नानासाहेब गुजर यांनीं मला मल्हार रामरावी बखरीचीं कांहीं प्रकर्णें व आणखी कांहीं त्रुटित बखरी दिल्या त्या आपल्या दप्तरखान्यांत ठेविल्या आहेत. असो. यानंतर साताऱ्याहून

## श्रीसज्जनगड

येथें गेलों. पूर्वीं या ठिकाणीं २।३ वेळां जाण्याचा योग आला होता. महाद्वाराच्या आंत उजव्या हातास एक आरबी शिलालेख आहे, तो अद्यापि भाषांतरित झालेला नाहीं. तो लिहून आणला आहे. पुढें मागें देऊं. दंतकथा सांगते कीं, हा किल्ला ७०० वर्षां पूर्वीं दिल्लीच्या कोणा तरी चकत्यानें बांधिला. याची दुरुस्ती

शके १६९७ च्या सुमारास नारो बल्लाळ सोनी मामलेदार यानें केली. श्रीराममंदीर व श्री समाधी ही आक्काबाई यांनीं बांधिली, हें प्रसिद्ध च आहे, त्याचा जीर्णोद्धार परशुरामभाऊ यांनीं शके १७२२ व १७५२ च्या सुमारास केला. महाद्वारांतून आंत आल्यावर डाव्या-बाजूस कोंपऱ्यांत आंगलाई देवीचें देऊळ आहे. अंगापूरच्या डोहांतून चाफळीं स्थापिलेल्या श्रीरामाच्या मूर्तीबरोबर च या आंग्लाईची हि मूर्ति श्रीसमर्थांनीं बाहेर काढलेली होती. या देवळांत देवीच्या उजव्या हातास असलेल्या कोपऱ्यांत एक ओटा आहे. त्यावर श्रीसमर्थ बसत असत असें सांगतात. महाद्वाराच्या उजव्या बाजूस एक मशीद आहे. तिच्या मागें पाणी पिण्याचीं २।३ टांकीं आहेत. त्यांच्या पुढें मोकळें पटांगण असून पटांगणाच्या उजव्या बाजूस एका घरांत अक्काबाईचें वृंदावन आहे. आक्कांनीं १६४३ कार्तिक शु. प्रतिपदेस देह ठेविला. पटांगण टाकलें कीं, मुख्य मंदीर लागतें. बारा खणी सभामंडपांत श्रीरामासमोर लहानसशा देवळांत एका बाजूस मारुतिराय तर दुसऱ्या बाजूस गणपती यांच्या मूर्ति आहेत. सभामंडपांतून पायऱ्या चढून गेल्यावर देवळाची जी बांधणी आहे ती चाफळच्या देवळा प्रमाणें आहे. गर्भागार लहान असून सिंहासनावर श्रीराम– लक्ष्मण– सीता–मारुतिराय व श्रीसमर्थ यांच्या ताम्रमय मूर्ति आहेत. तंजावराहून श्रीरामाच्या मूर्ति १६०३ च्या माघ वद्य ५ लां गडावर आल्या व त्यांचें दर्शन घेऊन वद्य ९ ला श्रीसमर्थांनीं आपली मूर्ति गुप्त केली. तें ठिकाण श्रीरामाच्या खालीं असलेल्या भुयारांत आहे. समाधी साधारण १ हात उंचीची व रुंदीची आणि २ हात लांबीची आहे. मधोमध वरच्या बाजूस एक बारीक जी चीर आहे ती समाधिस्थ झाल्यावर कल्याणस्वामीस श्रीसमर्थांनीं दर्शन दिलें त्या वेळची आहे असें सांगतात. समाधीच्या मागच्या बाजूस कोनाड्यांत पितळी पेटींत पादुका आहेत त्या श्रीसमर्थ नेहमीं वापरीत. तेथें च त्यांची दत्तात्रेयानें दिलेली चंदनाची एक कुबडी व काठी आहे. दुसरी एक कुबडी येथें आहे; ती बाह्यतः कुबडी असून आंत गुप्ती आहे. ७।८ नंदादीप येथें रोज तेवत असतात. या ठिकाणीं एकांत वेळीं बसलें असतां जे विचार मनांत येतात ते कागदावर उतरतां येत नाहींत! प्रत्यक्ष तेथें जाऊन च त्याचा अनुभव घेतला पाहिजे!! मुख्य देवळाच्या उंजव्या हातास शेजघर आहे. पहिल्या शेजघराचें अर्थात च हें रूपांतर झालें असलें पाहिजे, मात्र स्थलांतर झालें नाहीं खास. आंत एक भस्माचें कुंड आहे. श्रीरामाच्या मूर्ति ज्या दगडी ओट्यावर प्रथम ठेविल्या होत्या तो ओटा, श्रीसमर्थांचा पाणी पिण्याचा तुंबा, पिंकदाणी, राजेश्रींनीं दिलेला व ज्यावर राजगुरु पहुडत असत असा पितळेच्या खुरांचा पलंग व त्या पलंगावर श्रीसमर्थांची त्यांच्या हयातींत एका शिष्यानें काढलेली तसबीर अशा वस्तु या शेजघरांत आहेत. पलंगाच्या लांबीवरून श्रीसमर्थांची मूर्ति उंच नसून ठेंगणी असावी असें दिसतें. दंतकथेची परंपरा हि ते ठेंगणे च होते अशी आहे. शेजघरांत आणखी २ अपूर्व वस्तु आहेत. त्या म्हणजे तांब्याचे हंडे होत. पैकीं

एक दोन घागरींचा व दुसरा तीन घागरींचा आहे. गडाखालील अर्ध्या मैलावरील उर्वशीगंगे ( उरमोडी ) च्या पाण्यानें ते दोन्ही हंडे भरून खांद्यावर घेऊन कल्याण स्वामी गडावर रोज श्रीसमर्थांसाठीं आणीत असत। देवळाच्या वायव्य कोपऱ्यांत ओंवरींत जें वृंदावन आहे ती च वेणुबाईची समाधी होय. त्या १६०० च्या चैत्र वद्य १४ सह ३० ला समाधिस्थ झाल्या. आवाराच्या बाहेर नैऋत्ये कडील कोपऱ्यांत तटाकडे तोंड करून एक लहानसें देऊळ असून त्यांत मारुती आहे. तिकडील जागा वर चढून येण्यास अवघड असल्यानें महाराजांनीं तेथें तटाचें काम सुरुं केलें होतें तें श्रीसमर्थांना समजतां च त्यांनीं काम बंद करून स्वहस्तें ही मारुतीरायाची मूर्ति स्थापिली आहे. अद्यापि हि हा तट अर्धवट च बांधलेला आहे. गडावरून साताराचा किल्ला स्पष्ट दिसतो, प्रत्येक मराठ्यानें एकदां तरी या क्षेत्राचें दर्शन घ्यावें। महाराष्ट्रीयानें महाराष्ट्रधर्माद्यप्रवर्तकाचार्यांच्या या पीठाचें दर्शन घ्यावयाचें नाहीं तर मग कशाचें घ्यावयाचें ! " जेथें जागृत श्रीरामदास विलसे " अशा या स्थानाला नमस्कार करून खालीं उतरून परत साताऱ्यास आलों. गडावर सुद्धां प्लेग होता त्यामुळें वर पुजाऱ्या शिवाय कोणीं च नव्हतें. खालीं परळींत हि प्लेग असल्यानें तेथील ज्यांच्यापाशीं कागद आहेत म्हणून शोध लागला होता त्यांची भेट झाली नाहीं. असो; साताऱ्याहून

## यवतेश्वरास

गेलों. यवतेश्वराचा डोंगर साताऱ्याच्या पश्चिमेस शहराच्या मागें च आहे. युवत म्हणजे कळक. येथें पूर्वीं वेळू पुष्कळ होते व त्यांच्या बेटांत हें लिंग सांपडलें म्हणून युवतेश्वर किंवा यवतेश्वर असें याला म्हणतात, अशी दंतकथा आहे. हें देऊळ शिलाहारकालीन दिसतें. शिलालेख कोठें आढळला नाहीं. सरकारी वाड्यांत जाणारें पाणी येथून च नेलें आहे असें सांगतात. कारण, या पाण्यांत लोह आहे. यवतेश्वराच्या डोंगराच्या शिखराचें नांव "बंड्या" असून तें अजीम ताऱ्या पेक्षां हि उंच आहे. यवतेश्वराचे पुजारी द्रविड आडनांवाचे आहेत. येथून साताऱ्यावरून कृष्णावेण्या संगमीं असलेल्या

## माहुलीस

आलों. हीं क्षेत्र व संगममाहुली अशीं दोन गांवें आहेत. पैकीं क्षेत्र माहुलींत पुष्कळ देवळें आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं देतों:—

श्रीपतराव प्रतिनिधींचीं ३ देवळें आहेत. एक बिल्वेश्वराचें शके १६६४ च्या सुमाराचें, दुसरें संगमेश्वराचें (संगमाच्या ठिकाणीं असलेलें) शके १६०० च्या वेळचें आणि तिसरें विश्वेश्वराचें शके १६५७ च्या सुमारास बांधलेलें आहे. सर्व क्षेत्रांत हें च देऊळ मोठें आहे, मोजमाप ५०′ × २०′ आहे. येथील घंटेवर 1744 असा आंकडा ( सनाचा निदर्शक ) आहे. कृष्ण दीक्षित चिपळुणकर यांनीं शके १६७६ त कृष्णाबाईचें व कृष्णेश्वराचें १७१२ त अशीं दोन देवळें बांधलीं. राधाशंकराचें बाईसाहेब सचींव इनें

१७४७ च्या सुमारास, रत्नेश्वराचें—परशराम नारायण अमगळ देहेगांवकर यानें १६२२ त, श्रीरामाचें—त्रिंबक विश्वनाथ पेठे यानें १६७४ त, विठोबाचें—विठ्ठलभक ज्योतिपंत महाभागवत चिंचणेरकर यानीं १६५२ त, आणि भैरवाचें—कृष्णंभट्ट नाटके यानें १६९२ त, अशीं हीं देवळें बांधलीं आहेत. श्री शाहूमहाराजांच्या समाधीचें व भार्गवरामाचें अशीं आणखी २ देवळें आहेत. महाराजांच्या आवडत्या कुत्र्याचें हि थडगें जवळ च आहे. घाटांपैकीं, गिरीघाट—बापूभट बिन गोविंद भट यानें १७०२ त, बिल्वेश्वरा जवळील आनंदराव भिवराव देशमुख अंगापुरकर यानें १६६०त बांधलेला, श्री बाजीराव बाबासाहेब यांचा अपुरा व त्याला लागून च परशराम अनगळाचा, याप्रमाणें मोठमोठे घाट आहेत. रत्नेश्वर महादेवाच्या समोरच्या नंदीवरील झूल फार सुबक असून त्याच्या दोन्ही पायांच्यामध्यें एक लिंग, त्यावर नाग असून जवळ दोन स्त्रिया आहेत. संगमांत घनसापुरी गोसाव्याचें एक व त्याच्या शिष्यांचीं चार अशीं एकंदर पांच वृंदावनें आहेत. असो. येथें संस्कृत वैदिकी २ ग्रंथ मिळाले. येथें पूर्वी संशोधन झालेलें असल्यानें व रात्रवयास सवड नसल्यानें मिळालेल्या सामुग्रींत च समाधान मानून

## लिंब

येथें गेलों. येथें सदानंद गोसाव्याचा मठ आहे. त्याचे सुमारें २०० च्या वर कागदपत्र गु. राजवाडे यांनीं १५ व्या खंडांत छापले आहेत. तसें च येथील आपटे घराण्याला हि पूर्वी वरे च वेळां संशोधकांचा स्पर्श झालेला आहे. तरी सुद्धां श्री. नरहर विश्वनाथ आपटे यांनीं त्या वेळीं त्यांना फुरसत नसल्यानें पुढें मागें कागदपत्र दाखविण्याचें कबूल केलें आहे. गांव सातारकर महाराजांचा खाजगी आहे. कृष्णाबाईच्या पात्रांत लिंब व गोवें यांच्या मधोमध कोटेश्वराचें देऊळ आहे. असो; येथून

## सायगांव

ला आलों. लिंबाहून सडकेला लागल्या वर थोडीशीं सडक चालून गेल्या नंतर, मधील रस्त्यानें च सायगांवचा रस्ता फुटतो; त्यानें जरा पुढें गेल्या वर मध्यें च रायगांव लागतें. गांवाबाहेर महादेवाचें एक देऊळ आहे. पण तें जुनें नसून जुन्याचा जीर्णोद्धार करून नवीन बांधलें गेलें आहे. येथून १ कोसावर सायगांव आहे. सायगांव हा गांव आपटे घराण्यांत जहागीर आहे. हे आपटे म्हणजे सातान्यास नाना फडणीसांचे विश्वासु व त्यांच्या तर्फे छत्रपतींच्या जवळ असणारे जे बाबूराव कृष्ण यांचे वंशज होत; व या गांवाचे मूळ संपादक हि बाबूराव च होत. श्री. सवाई माधवराव यांनीं बाबूरावांला हें गांव दिलें व मग त्याचीं राजपत्रें श्री. रामराजे महाराज यांनीं राजशक १०१ त करून दिलीं. असो; मला मिळालेल्या कागदपत्रावरून या घराण्याची थोडीशी नवीन माहिती मिळते. छत्रपती—पेशवे बखेड्यांत बाबुरावाचें कुटुंब छत्रपतींनीं अटकेंत ठेविलें, त्यांचीं इनामें व घरेंदारें जप्त केलीं. त्या वेळीं श्री. बाबासाहेब पंतप्रधान यांनीं तीं सोडविलीं

वगैरे माहिती यांत आहे. असो, यांच्या येथें श्रीसमर्थांची एक हातानें काढलेली तसबीर आहे. गडावरील तसबिरीच्या नकला सुद्धा सातारा शहरांत व सातारा जिल्ह्यांतील बऱ्याचशा गांवांत पुष्कळ घरीं पाहावयास सांपडतात. या गांवीं एक आजानुबाहूचा मठ आहे. अजानुबाहू लिंगायत होता. रा. सा. कृष्णराव गंगाधर आपटे यांच्या सांगण्यांत त्यांच्या येथील सर्व कागद साताऱ्यास वडील घराण्यांत आहेत. असो. येथून **मेरुलिंग**च्या डोंगरावर गेलों. सायगांवाहून डोंगराचा पायथा अर्ध्या तासाच्या वाटेवर आहे. माथ्या वर जाण्यास १ तास लागतो. मार्ग सोपा आहे; मात्र एके ठिकाणीं जरा बिकट आहे. त्या ठिकाणीं कडा तुटला असल्यानें एक २ पुरुष उंचीचा उभा खडक चढून जावा लागतो. पायाचे चवडे ठेवण्यापुरते च त्याला खळगे केलेले आहेत. त्यांत हात व पाय ठेऊन जपून चढावें लागतें. पाय घसरल्यास १००।१२५ फूट खोल दरीचा तळ पाहण्याची पाळी यावयाची. या खडकाला "शिडी" असें सार्थ नांव मिळालें आहे. अशा हि ठिकाणांतून मेरुवरील बायका, मुलें, पाठीवर सामानाचा बोजा घेऊन चढतांना पाहिलीं म्हणजे सवईच्या परिणामाची कल्पना येते. मी गेलों तेव्हां श्रावण संपून अधिक भाद्रपद लागला होता; शुद्ध प्रतिपदेच्या शनिवारीं मी वर होतों. वास्तविक हे थंडीचे दिवस नसून त्या रात्रीं मला तेथें अतीशय थंडी वाजली. संध्याकाळपासून च तेथें थंड वारा वाहण्यास सुरवात होते. मूळ हा डोंगर च उंच आहे. यवतेश्वराच्या 'बंड्या' बरोबर किंबहुना त्याच्या पेक्षां हि थोडासा हा उंच असल्यानें याला गरिबाचें महाबळेश्वर म्हणतात. वरील वस्ती बहुतेक गुरवाची व महारांची मिळून २५।३० झोपड्यांची आहे. हे च गुरव येथील पुजारी आहेत. देव महादेव असून हल्लींचें त्याचें नांव मेरुबा आहे. पूर्वीचें "नरफदेव" होतें व तें तत्कालीन कागदपत्रांतून दिसतें हि. दंतकथा सांगते कीं, हें स्थान पुरातन पांडवापासून आहे. पांडवांच्या वनवासांत कांहीं काल त्यांचा या ठिकाणीं मुक्काम होता. प्रथम त्यांनीं हें देऊळ बांधलें. नंतर कानड्या रामराजानें, पुढें चंद्रराव मोऱ्यानें, नंतर सायगांवच्या अजानुबाहूनें व त्यापुढें म्हणजे हल्लीचें ब्रम्हेन्द्रस्वामीनें बांधलें. आजानुबाहूच्या वेळीं येथें अतीशय झाडी होती. अजानुबाहू आपल्या गाई घेऊन येथें चारण्यास येई व संध्याकाळीं परत सायगांवीं जाई. दूध काढतांना सगळ्या गाई दूध देत पण एक देत नसे. त्याच्या कारणाचा छडा लावतांना कळकाच्या बेटांत एका जागीं ती गाय भर दोनप्रहरीं आपल्या आंचळांतून दुधाच्या धारा सोडीत असतांना त्याला दिसली; त्या रात्रीं महादेवानें स्वप्नांत येऊन मीं तेथें आहे, मला वर काढ, असें त्याला सांगितलें. त्यावरून दुसरे दिवशीं बरोबर कांहीं मंडळी घेऊन अजानुबाहूनें देवाला वर काढून त्यावर एक लहानसें देऊळ बांधलें. पण अशी च गोष्ट धावडशीकर ब्रह्मेन्द्रस्वामी बद्दल हि सांगतात. शिवाय ब्रह्मेंद्राला "आजानुबाहू" व "बावा" अशीं नांवें होतीं हें प्रसिद्ध च आहे. तेव्हां हें स्थान खरें कोणीं उजेडांत आणलें, त्याची नक्की हकीकत अस्सल कागदपत्राशिवाय लागणें शक्य नाहीं. येथील कारभारी सायगांवकर आपटेघराणें होय. दंतकथा असें हि सांगते कीं,

मेरुबा हा चंद्रराव मोऱ्याचा कुलदेव होय; इकडे तर प्रतापगडच्या पायथ्याच्या पार-गांवीं असलेली "श्रीरामवरदायिनी" देवी चंद्ररावाची कुलदेवता म्हणून दाखविण्यांत येते. बाकी इ० संग्रहांत प्रसिद्ध झालेल्या "जावळीकर मोरे यांच्या छोट्या बखरींत" थोरल्या महाराजांच्या पत्रास उत्तर देतांना रावराजे कृष्णाजी बाजी मोरे यांनीं "आमचा राजा श्रीमहाबळेश्वर. त्याच्या कृपेनें राज्य करितों" असें म्हटलें आहे (इ. सं. ऐ. स्फु. लेख पान २६). त्यावरून मोऱ्यांचें कुलदैवत महादेव—कदाचित् मेरुबा—असावें असें वाटतें. असो. देवळाच्या चारी बाजूंस कोट असून महाद्वार उत्तरेस आहे. वेशीच्या वर दोहींकडे घोड्यांचीं तोंडें बसविलीं आहेत. वेशी-जवळील उजव्या बाजूच्या बुरुजावर एका दैत्याच्या डोक्यावर बसलेली गोजिरी गजाननमूर्ति आहे. मुख्य वेशीवर गर्धा आहे. आंतील पुन्हां दोन वेशी टाकल्यावर पटांगण आहे; पटांगणाच्या मधोमध मुख्य देऊळ आहे. त्याच्या मागील तटांत, एक उजव्या सोंडेच्या गणपतीचें व दुसरें महादेवाचें अशीं दोन देवळें व एक ओंवरी आहे. उत्तरेच्या तटांत हि एक, दोन विती उंचीच्या विष्णुमूर्तीचें व दुसरें महादेवाचें अशीं लहान कोनाड्यांसारखीं देवळें आहेत. मुख्य देवळा समोर दोन दीपमाळा असून एक अखंड दगडाची २ पुरुष उंचीची व दुसरी घडीव दगडाची ४ पुरुष उंचीची आहे. समोर च एक सतीचा दगड दाखवितात. त्यावर पंजासकट हात कोरलेला आहे. तटाच्या बुरुजांपैकीं कांहीं वर मोडक्या मूर्ति आहेत. दक्षिणेस एक धर्मशाळा आहे, हिची बांधणी मुख्य देवळापेक्षां जुनी आहे. बाहेर महादेवाचें धर्मशाळेच्या च जवळचें एक देऊळ आहे, त्यांत नेहमीं पाणी असतें. मुख्य वेशीच्या बाहेर पूर्वाभिमुख एक दगडी १२ खांबांचा मंडप आहे; खांबांची घडण कोल्हापूरच्या अंबाबाईच्या देवळांतील खांबाप्रमाणें आहे. मंडपाची उंची ८' असून पुढें पाण्याचें कुंड आहे. गांवाला पिण्याला पाणी हें च. हें मंडपाखालून बांधून काढलेल्या एका जीवंत झऱ्यांतून येतें. जवळच्या एका कोनाड्यांत विष्णुमूर्ति आहे. असें च दुसरें कुंड व पडक्या मंडपाचा अवशेष, मुख्य वेशीच्या उजव्या हाताला आहे. मुख्य देऊळ लाल रंगाच्या दगडांचें आहे. ग्रेनाइट जातीचा दगड नसल्यानें तो टिकण्यास कच्चा आहे. हें च मच्छेन्द्रानें बांधलें म्हणतात. त्याला तीन शिखरें असून पुढें नंदी आहे. गाभाऱ्यांत मेरुबाचें लिंग असून त्याची उंची १॥ वीत आहे. तें स्वयंभू—घडविलेलें नसून—खडबडीत व ओबडधोबड असून त्यांतून सात ठिकाणांमधून सतत पाणी झिरपत असतें. त्यामुळें शाळुंका नेहमी पाण्यानें भरलेली असते. मागच्या भिंतीवर महादेवाचा पितळी मुखवटा व एक पार्वती आहे. त्यांचें तोंड पूर्वेस आहे, अगदीं सकाळीं सूर्याचें ऊन मूर्तीवर पडतें. प्रत्यहीं २० च्या वर नंदादीप जळतात. गाभाऱ्यांत डाव्या हाताच्या कोपऱ्यांत अंधारांत एक मोठी घंटा असून तिच्या वर।+।

असा ऋास आहे, तिची उंची ३ विती आहे. देवाचा उत्सव चैत्र शुद्ध एकादशीस होतो, त्या दिवशीं महादेवपार्वतीचें लग्न होतें. देवाला ६० गांवांतून उत्पन्न आहे. येथील

संस्थानाचे कागदपत्र सायगांवकर आपल्याकडे आहेत, ते पाहिले पाहिजेत. शिलालेख वगैरे कोठें हि नाहीं. येथून निघून सायगांवच्या विरुद्ध बाजूनें डोंगर उतरून

## धावडशीस

आलों. या रस्त्यांत हि एके ठिकाणीं २५।३० पावलें चिकट वाट आहे. धावडशीत कऱ्हाडे ब्राम्हणांचीं घरें फार आहेत, ब्राम्हणांचीं म्हणून जेवढीं घरें आहेत त्यांपैकीं एक शिवाय बाकी सर्व कऱ्हाड्यांचीं च आहेत. मुख्य देऊळ भार्गवरामाचें. ब्रम्हेन्द्रस्वामीची समाधी त्यांत च आहे. मंदिरा वरील शिलालेख रा. पारसनीसांनीं १८३६ च्या अहवालांत ( पृ. १७६ वर ) दिला आहे, तो शुद्ध आहे देवळाचें शिखर हल्लीं मुकलें आहे तें लवकर दुरुस्त केलें पाहिजे. संस्थान पंचांच्या ताब्यांत आहे. ब्रम्हेंद्रानं वाघजई व मारुती यांचीं दोन देवळें बांधलेलीं गांवांत च आहेत. पैकीं वाघजईच्या देवळा शेजारीं एक १६७५ मधील शिलालेख आहे, तो उतरून आणला असून पुढें मागें देऊं. वाघजई ( देवी ) च्या हातांत वाटी, कमळ, त्रिशूळ व खांडा ( रुंद तलवार ) आहे व मागें सिंह आहे. गांवांत शिरतांना दिसणारी वेस व जवळचा पडका वाडा, मंदीराजवळील तलाव व त्याच्या कांठचे भुयारांतील महादेव मंदीर, इतकीं कामें ब्रम्हेंद्राच्या हातचीं आहेत. पैकीं वेशीला चावीच्या दगडाच्या जवळ मोठा तडा पडला असून ती अद्याप उभी आहे; अशा च स्थितींत ती ५०।६० वर्षें आहे असें येथील वृद्ध सांगतात. असो येथील दफ्तर पूर्वीं गु. राजवाड्यांनीं पाहिलें होतें व त्यांपैकीं ३ ऱ्या खंडांत जवळ जवळ २४० पत्रें त्यांनीं प्रसिद्ध केलीं हि आहेत. शिल्लक असलेलें दफ्तर मीं तपासलें. त्यांतून कांहीं निवडून घेतलें आहे. त्या च प्रमाणें कांहीं कागद येथील रहिवासी रा. हरीभाऊ भागवत यांनीं हि मजजवळ दिले. रा. गंगाधर भिकाजी ऊर्फ बापुसाहेब भागवत यांनीं बरी च मदत केली. संस्थानचे चांदीचे शिक्के पाहण्यांत आले. हल्लीं त्यांचा उपयोग करीत नाहींत. सांपडलेला पत्रव्यवहार महत्त्वाचा असून त्यांत खालील व्यक्तींपैकीं पुष्कळांचीं हस्ताक्षरें सांपडतात. श्रीमंत नानासाहेब, चिमाजीआपा, थोरले व धाकटे रावसाहेब, शेवटचे बाबासाहेब, श्री. प्रतापसिंह छत्रपती, जगजीवन परशराम, परशराम श्रीनिवास ( प्रतिनिधी ), मुधोजी व साबाजी निंबाळकर, भगनजी जाधवराव, श्रीविद्यानरसिंहभारती; तसें च रसालगड – पांडवगड – विजयदुर्ग – सुवर्णदुर्ग– जयगड– पुरंधर – महिपतगड – व्याघ्रगड – चंदन – वंदन – वगैरे किल्ल्यांचे किल्लेदार, राघोजी आंगरे, दौलतराव सिंदे, बसवंतराव खासखेल, बाळाजी कुंझारराव घाटगे, पहिले सयाजीराव गाईकवाड इत्यादि इत्यादि व्यक्तींचा हा अस्सल पत्रव्यवहार आहे. हीं हस्ताक्षरें यथावकाश आपल्या पुढें येतील च. असो; येथून

## विरमाडें

ऊर्फ इंरमाडें येथें आलों. धावडशीहून येथें येतांना पुन्हां मेरूचा पर्वत चढून उतरावा लागतो; मात्र ही गणेशखिंडीची वाट सोपी आहे. खिंडीच्या मधोमध गणपतीचें पूर्वाभिमुख देऊळ आहे. येथून सभोंवारचा प्रदेश अगदीं स्पष्ट दिसतो. उत्तरेकडे सायगांव, रायगांव, वैराटगड व वैराटगडचा. रायघशाचा प्रचंड म्हसवडचा वड, दक्षिणेस यवतेश्वर, सातारा किल्ला व गांव हीं दिसतात. विरमाड्यास सोनवणी आडनांवाच्या मराठ्यांचीं घरें फार आहेत. पत्रें धावडशीसंदर्भात सांपडलीं आहेत. हें गांव भगवंती संस्थानास इनाम आहे. प्रतापगडावरील श्रीदेवीची मूर्ति ज्यानें गंडकीहून आणिली व ज्याला थोरल्या महाराजांनीं देवीच्या संस्थानाची हवालदारी सांगितली आणि पुढें ज्याला राजशक २१ मध्यें श्रीराजारामहाराज यांनीं देवीच्या भोपेपणाची सनद करून दिली त्या मंयाजी बिन गोमाजी नाईक पानसरे जुन्नरकर सोनवण्याचे वंशज येथें च आहेत. त्यांच्या जवळ वरील अस्सल सनद आहे. पण ती ते दाखवीत नाहींत. पुन्हां एकदां प्रयत्न झाला पाहिजे. येथून

## पांचवडास

आलों. हें गांव दरोबस्त येथील (पुण्याच्या) तातूंस इनाम आहे. तें बाळाजी-पंततातास छत्रपतींनीं इनाम दिलें. अस्सल सनद दाखविण्यांत येत नाहीं. मला तिची नक्कल ओझरती पहाण्यास मिळाली होती; त्या वेळीं तिचें त्रोटक टांचण करून ठेविलें होतें. त्यावरून "राजशक १५६ विरोधी संवत्सर अश्विन शुद्ध दशमी सोमवारीं श्रीप्रतापसिंह महाराज यांणीं राजश्री बाळाजी नारायेण तातू यांणीं स्वामीसेवा येकनिष्ठ-पणें केली सबब त्यांचे चालवणें आवश्यक जाणोन स्वामींनीं कृपाळु होऊन मौजे पांचवड हा गांव नूतन इनाम करून दिल्हा" एवढा मजकूर सांपडतो. बाळाजीपंतानें येकनिष्ठपणें मराठी साम्राज्याची कोणती स्वामीसेवा केली तें सर्वश्रुत च आहे!! राजोपाध्ये यांच्या कडील कागदपत्रांत चिटणिशी दफतरांत या सनदेच्या बाराची तारीख खालील प्रमाणें आहे "छ. १५ गोसर सुना सलासीन मया तेन व अलफ तारीख १४ आक्टोबर सन१८२९ इसवी." असो. येथील विष्णूच्या देवळाची धर्तीं आपल्या येथील बेल-बागेच्या विष्णूच्या देवळा सारखी आहे. रुक्मावाईस घाट आहे. येथे एक नवलाई देवीचें देऊळ आहे. नवलाई ही चांदोरकर घराण्याच्या पांच कुलदेवतांपैकीं एक होय. अंबाबाई (कोल्हापूर) सारखें च हिचें ध्यान आहे. येथून

## वांईस

आलों. येतांना डावे बाजूस चोरवणा उर्फ दुधल्या डोंगराच्या मागें वैराटगड लागतो. तो एका महारानें शाहुमहाराजांच्या कारकीर्दीत मोंगलांकडून मिळविला; त्याबद्दल बक्षिस म्हणून वांई संस्थानांतील नागेवाडीची पाटिलकी त्याला महाराजांनीं बहाल केली. त्याबद्दलचे कांहीं कागद मला मिळाले आहेत. असो. वांईचें सर्व वर्णन रा. गोविंदराव

आपटे यांनीं आपल्या वाईवर्णनांत केलें आहे. रास्ते कुटुंबानें येथें ४९ देवळें बांधलीं आहेत असें म्हणतात. विष्णूच्या व लक्ष्मीच्या देवळांत एक गमतीची जागा आहे. देवळाच्या मागच्या भिंतींत, देवाच्या बरोबर मागल्या अंगास १ अंगुळ उंच व ३ अंगुळें लांबीची दगडाची एक चीप आहे. सबंध भिंत मोठमोठ्या चिऱ्यांनीं बांधलेली असतां फक्त एवढ्या च जागीं अगदीं लहान अशी चीप कां असावी! वांई जुनें गांव व क्षेत्र असल्यामुळें जाहागीरदार, इनामदार, तसे च भटभिक्षुक व शास्त्रीपुराणिक यांच्या येथें बरा च संग्रह आहे. सातारा, पुणें या प्रमाणें वांई येथील हि बहुतेक घरें शोधिलीं पाहिजेत. शिवाय, येथें मोठमोठ्या वाड्याच्या खालीं अंधारें आहेत. तीं सुद्धां पाहिलीं पाहिजेत; कारण गु. राजवाड्यांना मिळालेलीं येरंड्याचीं कागदपत्रें असल्या च एका अंधारांत होतीं. अशा च दुसऱ्या एका अंधारांत एक लोखंडी कड्याचें अर्धे चिलखत सांपडलेलें येथील द्रविडहायस्कुलांत आहे. सयव हीं अंधारें हें हि शोधाचें एक ठिकाण होऊन बसलें आहे. असो. येथें मला वांईच्या कदीम देशपांड्याचे जुने म्हणजे शिवकालीन व पुढचे अस्सल कागद मिळाले. त्यांची एकंदर ५०० पर्यंत संख्या असेल. अफझलखान, जोत्याजी केसरकर, सूर्याजी व दत्ताजी विसाळ, आलि आदिलशहा, शामजी लिंगोजी, वांईचे चिकणे, वाकडे वगैरे सावकार, पंतसचीव, प्रतिनिधी, यमाजी, शिवदेव मुतालिक, पंतप्रधान इत्यादिकांचे हे कागद आहेत. शिवाय, करिने, महजर, कैफियती, निवाडपत्रें, सवादपत्रें सुद्धां वरीं च आहेत. जावली सोन्याच्या इतिहासाचा बराचसा भाग या कागदपत्रांत सांपडणार आहे. मला गेल्या वर्षी मिळालेल्या सर्व संपर्कांत हा च संग्रह पहिल्या प्रतीचा आहे. एवढें च त्याबद्दल येथें नमूद करतों. यांचा एक स्वतंत्र खंड च काढावा लागेल. नंतर येथील दुसरें जुनें घराणें थिटे यांचें. येथील दफ्तर तपासलें. त्यांत हि बरे च कागद, बखरी, बाडें मिळालीं; तसा च एक अपूर्व ग्रंथ हि मिळाला. श्रीज्ञानेश्वरमहाराज व श्रीएकनाथमहाराज यांच्या दरम्यानच्या काळाबद्दल म्हणजे १४ व्या शतकाबद्दल आपण बहुतेक अंधारांत च आहों. चॉंभ्यांनें तो थोडासा नाहींसा केला, पण फार च थोडा, आतां मला मिळालेल्या या ग्रंथानें तर बराचसा नाहींसा होईल अशी आशा आहे. त्यावर आपल्या पुढें स्वतंत्र निबंध च वाचण्यांत येईल. देशपांडेपणाबद्दल या थिटे कुळकर्ण्यांमध्यें श्रीशिवाजीमहाराजांच्या पूर्वीपासून वाद चालला होता. त्याच्या निवाड्याचे विजापूरच्या महंमद व आलि या दोन आदिलशहांच्या वेळचे कागद सांपडले आहेत. येथील श्रीसमर्थपादिष्ट घराण्यांपैकीं म्हणजे थिटे, चित्राव व पिटके यांपैकीं थिट्यांचे कागद कांहीं मला मिळाले. चित्रावांचे कागदपत्र गु. राजवाड्यांनीं २० व्या खंडांत प्रसिद्ध केले आहेत; यांच्या घरीं श्रीसमर्थांनीं दिलेली ताम्रमय श्रीरामाची मूर्ति आहे. येथील मुसलमान जहागीरदार शेखमिरे यांचें दफ्तर हल्लीं त्यांच्या येथें नसून त्याचें दुसरीकडे स्थलांतर झालें आहे. येथें गंड या आडनांवाचें एक घराणें आहे, ते पूर्वी पांडवगडचे गडकरी होते. पांडवगड पेशवाईच्या अखेरीस नागपूरकर भोसल्याकडे होता. हल्लीं हि गडाच्या आसपासचीं कांहीं

खेडीं जहागीर म्हणून त्यांचयाकडे चालत आहेत. गंड व भोसल्याचे हल्लींचे पांडवगडचे कारभारी यांच्याकडे शोध केला पण कांहीं सांपडलें नाहीं. 'वृत्तसारा'चे संपादक रा. नानासाहेब वैद्य यांच्या घरीं जुने १५०।२०० रुमाल व बराचसा गळाठा पडला होता. तो तपासला. तत्पूर्वी गु. राजवाडे यांनीं यांचें दफ्तर पाहिलें होतें. यांच्या येथील संग्रहांत– लघुचिंतामणी, यजुरारण, महिम्न ( संवत् १८४२ ) देवीमाहात्म्य ( शके १६२२ ), सिद्धांत मुक्तावली, नक्षत्रचूडामणि, संस्कृत मूळ भारताचीं कांहीं पर्वें, ज्ञानेश्वरी ( त्रुटित ), योगरत्नाकर ( शके १६६६ ) वगैरे ग्रंथ व थोरल्या महाराजांच्या वेळच्या तुकदेव घराण्याच्या बद्दलचे अस्सल ५०।७५ पत्रें; रघोजी भोसले, पंत राजाज्ञा, पंतप्रधान, पंतसचीव, भानू फडणीस, श्रीविद्या नरसिंह भारती, भणगेघराणे, भवानीशंकर हैबतराव, देवकुळे, बाळाजी नारायण नातू यांचे कागद, शके १७४८ मधील पुण्याच्या प्रतिष्ठित घराण्यांची यादी, शके १७४७ मध्यें पुण्यास तुळशीबागेंत ब्रह्मवृंदांची सभा होऊन परभुप्रकरणांच्या लागलेल्या निकालाचे कागद, त्रिंबकजी डेंगळ्याकडे खवासखानी अंमल आल्या बद्दलचीं पत्रें, शके १७५१ तील रामोशाच्या बंडाचे कागद, शके १७४६ मधील नाशकाच्या सोनाराचें वेदोक्तप्रकरण, दात्यांची व या वैद्यांची कैफीयत, गढेमंडळाकडील पत्रें वगैरे—बरेचसे कागद मिळाले. या सर्वांपेक्षां यांच्या घरीं एका अपूर्व वस्तूचा लाभ झाला आहे. ती वस्तू मला वाटते ती च ठरल्यास भारतेतिहासमंडळाच्या भांडारांत एक अमूल्य रत्न चमकत राहील. याबद्दल आपल्या पुढें स्वतंत्र टांचण—ती वस्तु प्रत्यक्ष पुढें ठेऊन—वाचण्यांत येणार आहे. असो. गंग पुरांत एक निमजगा आहे. त्याच्या मुजावरास छत्रपती सरकाराकडून २० रु. दरसाल मिळतात. हा हकीम मराठ्यासारखा वागतो. याचे पूर्वज बाटले होते. याच्या घरीं नरसिंहाची मूर्ति असून तिची रोज पूजा होत असते. या प्रांतांत हि आतार व हकीम यांची जात, हिंदूंचे सर्व रीतिरिवाज, बहुतेक सण, पेहेराव, लग्न कार्यांतील कांहीं विधी, मूर्तिपूजा वगैरे पाळते. खानदेशांत हि असले लोक आहेत. ते हि औरंगजेबाच्या वेळीं वतना करितां बाटलेले हिंदू असून वरील प्रमाणें च हिंदूंच्या चालीरीतीनें वागतात. मुसुलमानाप्रमाणें निका लावीत नसून हिंदूप्रमाणें मुहूर्त काढून लग्नविधी करतात. त्यांना मुसुलमानांबद्दल फारसें प्रेम वाटत नाहीं. असो. वरील हकिमाच्या पूर्वजास असवली ( ता। वाई ) गांव इनाम होतें. हल्लीं तें काढून घेतलें आहे. येथील रा. केशवराव नानजकर यांनीं त्यांच्या जवळ असलेल्या श्री. सवाई माधवराव व श्री. सौ. यशोदाबाईसाहेब यांच्या तेलीया रंगाच्या मोठ्या तसबिरी माझ्या ह[illegible] केल्या. त्या अलीकडील नसून जुन्या च आहेत, असें त्यांच्याकडे बघितल्याबरोबर लक्षांत येईल. यांत हि यथादर्शनदोष आहेच. मला अशी शंका आहे कीं, या मेणवली येथील नानांच्या संग्रहांतील च असाव्यात. कारण तेथील चित्रसंग्रह वाईस व इतर ठिकाणीं पांगत गेलेला पुष्कळदां दृष्टीस पडतो. वाईच्या प्रत्येक

घांटावर जो कृष्णाबाईचा उत्सव होतो त्यांत जीं मखरें उपयोगांत आणलीं जातात, त्यांना लाविलेल्या तसबिरींपैकीं बऱ्या च तसबिरी, तसें च वाई येथील जुन्या घरांच्यांत आढळणाऱ्या काहीं तसबिरी व मेणवलीच्या नानांच्या संग्रहांतील तसबिरी या अगदीं सारख्या आहेत; त्यांच्यांतील वळण एका च कारागिरीचें आहे. वाई सोडली तरी परगांवीं सुद्धां असल्या च तसबिरी पाहण्यांत येतात. सातान्यास रा. ब. पारसनीस यांच्या संग्रहीं ज्या तसबिरी आहेत त्यांत हि हें च कारागिरी वळण स्पष्ट दृग्गोचर होतें असो. गंगापुरींतील रा. नारायण लक्ष्मण हळवे यांच्या कडून कांहीं नागी विकत घेतलीं. येथें आणखी हि कांहीं प्राप्ति झाली आहे. येथील कीचक किंवाचा जो वाडा आहे त्याच्या कांहीं एक पडका जुना वाड असून त्याच्या शेजारीं एक पडका बुरूज व पडलेल्या वाड्याच्या पाया आहे. तो वाडा अफजलखानाचा म्हणून दाखविला जातो. तेथील जवळची मशीद ( व. नं. २०८१ ) म्हणजे पूर्वीच्या एका ब्राम्हणाचें घर होय, असें तिच्या जागेच्या सनदीपत्रावरून दिसतें. मूळ वाई म्हणजे हा च भीमकुंडाकडील भाग होय. पुढें पुढें गंगापुरीकडे वस्ती वसत गेली आहे. असो. येथून

## बावधन

येथें आलों. येथें राहाण्यास फार वेळ नसल्यामुळें येथील कुलकर्णी रा. दिगंबर पांडुरंग रोडे यांनीं कांहीं कागद दिले. तेवढे घेऊन लगे च परत आलों. त्यांत अवरंगजेबाच्या वेळीं सर्व हिंदुस्थानचीं जमाबंदी किती होती त्याचे ३० बंद आहेत. भारतवर्षांत असली एक याद प्रसिद्ध झालेली आहे; मात्र तिच्यापेक्षां ही जास्त विस्तृत आहे. या रोडयांचे पूर्वज टोंकें येथील नबाबाचे कारभारी होते; त्याबद्दल त्यांना ३५०० चा सरंजाम होता. पालखीची तैनात होती. ज्यानें हें उत्पन्न मिळविलें त्याचें नांव चिटको जगजीवन होय, व ज्यानें दिलें तो टोंक्याचा हकीमखान होय. चिटको व याचा भाऊ अमृतराव जगजीवन यांचीं कांहीं पत्रें मिळालीं आहेत. तीं शके १६९९ मधील व त्याच्या मागचीं पुढचीं आहेत. रा. दिगंबरपंत हे चिटको पासून पांचवे पुरुष होत. येथून

## मेणवली

स गेलों. वाईहून मेणवली १ कोस आहे. हल्लींचे श्री. नानासाहेब भानू हे मेणवलीस बहुतेक रहात नसतात ( पुणें ) येथें असतात. नानांचा वाडा फार मोठा नसून साधारण च आहे. वाड्याचा दिंडीदरवाजा पश्चिमेस आहे. तो टाकून पुन्हा दुसऱ्या दरवाजांतून आंत गेल्या वर डाव्या हाताकडे एका कोनाड्यांत डाव्या सोंडेच्या गणपतीची मूर्ति आहे. उजवी कडील देवडीच्या पलीकडे एका खोलींत, आपल्या येथें बेलबागेंत जसें एक मोराचें जोडपें आहे तसें तेथें हि आहे. नानांना मोरांचा नाद असावा असें दिसतें. पलीकडे म्हातगाड्याचा विहिर आहे, तिथें पाणी

उत्तम आहे. मधल्या चौकांत मोडकें कारंजें पडलें आहे. खालीं ओटी, भोजघर, चौक, स्वयंपाकघर, देवघर वगैरे असून मागें पडवी टाकली कीं, आंगणाच्या पलीकडे मोठा दरवाजा आहे. तेथपासून थेट कृष्णाबाईच्या पात्रापर्यंत घाट बांधलेला आहे. कृष्णा नदी येथें द्वाराकडे तोंड करून उत्तरे कडे येऊन वळसा घालून पूर्वाभिमुख होऊन पुढें वांईकडे जाते. वाडा एक चौकी च आहे. वर पश्चिम बाजूस ज्या २ । ३ खोल्या आहेत त्यांपैकीं एक नानांचें शय्यागृह होय. खोलीच्या चाऱ्ही भिंती रंगवुन वर चित्रें काढविलेलीं आहेत. त्यांत कांहीं पौराणिक व कांहीं शृंगारिक हि आहेत. या च खोलींत नानांचा अप्रतिम व बहुमोल असा चित्रांचा संग्रह आहे. किनखाबी कापडाचीं १० । १५ दफ्तरें मिळून हीं २०० । २२५ चित्रें आहेत. ऐतिहासिक, पौराणिक, शृंगारिक, सृष्टीच्या देखाव्यांचीं, पशुपक्ष्यांचीं, स्त्रियांचीं, तशीं च कांहीं जाळीदार आणि कांहीं फिरंगी कारागिरीचीं अशीं नानाविध चित्रें या दफ्तरांत आहेत. या च खोलींत नानांचे कांहीं अंगरखे–साधे व दरबारी- खुंट्यांस टांगून ठेविले आहेत, त्यांपैकीं एकाच्या टोंकास खालील अक्षरें लिहिलेली एक चिठ्ठी डकविलेली आहे. "मेजवानी बा। कृष्णराव बलवंत मेहेंदळे छ ७ जिल्काद् सन सलास तिं (सेन) खगा काकोळी (?) सेल्याचा १ येक" सन सलास तिसेन (मया व अलफ) म्हणजे ११९३ च्या जिल्कादच्या ७ व्या चंद्राला शालिवाहन शके १७१४ तील आषाढ शुद्ध नवमी (गुरुवार) येत्ये. या दिवशीं नाना या (मंडळाच्या कार्यालयाच्या) वाड्यांत भोजनास आले होते. असो. चौकावरील माडींत व आणीक २ । ३ खोल्यांमधें अजून नानांचा दफ्तरखाना शिल्लक असलेला दृष्टीस पडतो. ७०० । ८०० तरी रुमाल असावेत. यांचें संशोधन व्हावयास नको काय? पुढील दिवाणखान्यांत मस्तानीची मोठी तसबीर आहे. शिवाय कांचेवरील आणीक हि कांहीं चित्रें आहेत. शेजारच्या खोलींत नानांचा पलंग आहे. दिवाणखान्यांतून परत फिरून डावे बाजूच्या गच्चीकडे गेलें म्हणजे तेथें खेळण्याची केलेली जागा दृष्टीस पडते. खालील जमीन लांकडाच्या फळ्यांची केली आहे. येथून चोफेर दृष्टी फेंकली म्हणजे सुंदर देखावा दृष्टीस पडतो; पांचगणीचा डोंगर, त्याच्या पलीकडे अंधुक दिसणारें महाबळेश्वर, कृष्णाबाई, वांई, पांडवगड, चिंचखिंड, आंबडखिंड वगैरे ठिकाणें दिसतात. असो; हल्लीं वाडा उदास दिसतो. 'खुप शर्तीनें राज्य राखणाऱ्या' नानांचा सहवास ज्या वाड्यास कांहीं काळ झाला त्याची आजची स्थिती पाहिली म्हणजे दुःखानें "कालाय तस्मै नमः" एवढा च उद्गार तोंडांतून निघतो।

मागच्या दारीं घाटाच्या पलीकडे असलेल्या महादेवाच्या समोर एक घंटा, आहे. ती नानांनीं पोर्तुगीजाकडून आणविली असें म्हणतात. ही जवळ जवळ नारो शंकरी एवढी च असून इच्यावर उठावाचीं खालील अक्षरें आहेत.

BENE SONANTIBUS LAUDATE
DOMINAM IN CYMBALIS

शिवाय कड्यावर खिंडीत घेतलेली अशी मेरीची मूर्ति असून तिच्या खालीं 1707 हा आंकडा हि आहे. असो. व दुसरी घंटा नानांनीं माहुलीच्या किल्ल्यांतून नेऊन भिमा-शंकरास दिली आहे असें समजतें.

येथून वाईस परत आलों. वाईला रा. केशवराव नानजकर, रा. नानासाहेब व त्यांचे नातु रा. गोविंदराव वैद्य, रा. श्रीपाद विष्णु ऊर्फ काका पंडित व आपले रा. शंकरराव जोशी ( सातारा ते वाईपर्यंत सहप्रवासी च होते. ) यांच्या मदतीमुळें बरें च काम झालें. असो नंतर **भुइंज** येथें आलों; येथें जाधव, भोसले जाहागीरदार आहेत. त्यांची भेट झाली नाहीं. पण वेताळपंचविशी, भानुदास, नारायणराव पेशवे यांच्या बखरी, केळंज-गडचे कांहीं कागद असे येथें मिळाले. येथून थेट साताऱ्यास परत येऊन तेथून

**सासपड** गांवीं गेलों. येथें चाकणकर कचेश्वर ब्रम्हयांचे वंशज असतात. तेथें त्यांची भेट झाली नाहीं; पण त्यांनीं अगत्यपूर्वक साताऱ्यास येऊन आपल्या येथील कांहीं कागद, कचेश्वरयावाची कविता, अस्सल सोळा सनदांचें फेरिस्त, वंशावळी वगैरे संग्रह माझ्या हवालीं केला. नंतर परत **पुणें** येथें आलों. येथें मंडळाचे कचेरींतील कांहीं काम करून १०।१५ दिवसांनंतर

## कोल्हापुरास

गेलों. येथील महालक्ष्मीच्या देवळांत एकंदर ४ शिलालेख आहेत. पैकीं ३ उघड्यावर असून ४ थ्या वर रंग देऊन टाकल्यामुळें तो दिसत नाहीं. हे चार हि Graham नें आपल्या पुस्तकांत दिले आहेत. पण ग्राहामचें पुस्तक दुर्मिळ आहे. असो. संभाजीराजांनीं अंबाबाईस कांहीं देणगीची सनद दिली आहे. पण पुजारी ४० च्या वर असल्यामुळें ती कोणापाशीं आहे तिचा पत्ता लागत नाहीं. हें देऊळ पूर्वीं जैनांचें असून त्यांत अंबाबाईची स्थापना वैदिकधर्माभिमानियांनीं नंतर केली असें म्हणतात. देवळाची बांधणी व त्यावरील निरनिराळ्या आसनस्थ अर्ध वा पूर्णनग्न मूर्ति पाहिल्या म्हणजे हें म्हणणें खरें असावेसें वाटतें. या देवळाचे खांब म्हणजे इकडे दक्षिणेंत आढळणाऱ्या जुन्या देवळांच्या खांबांचे मूळचे नमुने ( model ) होत. अंबाबाईची मूर्ति पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाप्रमाणें किंवा नाशीकच्या पंचवटीच्या श्रीरामाप्रमाणें वाळूची आहे म्हणतात पण तें खरें नाहीं. असो. गांवा-बाहेरील फिरंगाई अथवा प्रत्यंगिरा देवीचें देऊळ व मंगळवार पेठेंतील विठोबाचें आणि त्याच्या शेजारचें विश्वेश्वराचें देऊळ हीं अंबाबाईच्या देवळा इतकीं च जुनीं आहेत. विश्वेश्वराच्या देवळाच्या बाहेरील पूर्वकडील भिंतीवर एक हळेकन्नड लिपींतील शिलालेख आहे. त्याचा उल्लेख अद्याप कोठें केलेला पाहण्यांत नाहीं; यावरून हा अप्रसिद्ध असावा असें वाटतें. तो उतरून आणला आहे, तो पुढें मागें देऊं. पंचगंगेवरील राजघराण्यांतील समाधिस्थल पाहण्यासारखें आहे. रंकाळ्याच्या समोर एक प्रचंड नंदी आहे. गांवांतील वेशींपैकीं हल्लीं बहुतेक नाहींशा झाल्या

आहेत. अंबाबाईच्या देवळाजवळील जुन्या राजवाड्यामधील कांहीं ठिकाणें पाहण्यालायक आहेत. चौकांत भवानीचें देऊळ असून तेथें च एका कोपऱ्यांत श्री ताराबाईसाहेब यांचें सिंहासन आहे. ती साधी च गादी असून तिच्या वर जरीची बुट्टेदार चादर आहे. तिच्या पुढें एक नंदादीप तेवत असतो. खालीं चौकांत भगवा झेंडा व जरीपटका आहे. जलाच्या ठिकाणीं स्थलाचा व स्थलाच्या ठिकाणीं जलाचा भास मयसभेंत कसा होई, त्याचें थोडेंसें प्रत्यंतर येथील जलमंदिरांत येतें। अगदीं वरच्या मजल्यावर एका बाजूस मोठ्या दिवाणखान्यांत शस्त्रागार आहे. तें पाहण्याजोगें आहे. निरनिराळ्या प्रकारचीं असंख्य शस्त्रें यांत आहेत, त्यांचीं सर्वांचीं नांवें सुद्धां या कालीं कोणास माहित नसतील. हीं खांडा, पेषकबज, कट्यारी, खंजीर, भाले, गदा, पट्टे, वगैरे होत. भिंतीला लावलेला एक वाघनखांचा जोड आहे, प्रत्येकाला ५।५ वाघाच्या नखासारखे वांकडे पोलादी आंकडे असून बोटांत चढविण्यास कड्या आहेत. ब्रिटिश म्यूझिअम् मध्यें महाराजांचीं वाघनखें नाहींत. मग तीं कोठें आहेत ! हीं तर नव्हेत ! असो. येथें कृष्णामाहात्म्याची एक बखर मिळाली. येथें कोणाची फारशी ओळख नसल्यानें व प्लेगाची कुणकुण असल्यानें परत पुण्यास येऊन, २।३ दिवसांनंतर खानदेशांत

## धुळें

येथें गेलों. खानदेशांत या वेळीं बहुतेक सर्वत्र प्लेग असल्यानें फार दिवस एका जागीं राहतां आलें नाहीं. जरूर तितके च दिवस राहून मिळेल ती सामुग्री घेऊन हिंडत होतो; असो. धुळ्याहून **फागणे, मुकटी, पारोळें** या गांवांवरून **म्हसवें** येथें आलों. येथील देशमुखांपाशीं म्हसवे परगण्याचे, देवीचे वगैरे कांहीं कागद मिळाले. देवळासमोर दोन दीपमाळा आहेत; त्या अशा बद्दल प्रख्यात आहेत कीं, एकीवर चढून जाऊन शिखरावर बसून दुसरीला पाय लाऊन ती लोटली असतां ती व जिच्यावर आपण बसलों असतों ती अशा दोन्ही हि दीपमाळा हलतात; पण दीपमाळेस दिवे ठेवण्याचे लहानसे दगड असल्यामुळें वर चढण्यास धीर झाला नाहीं. दीपमाळा एकमेकास अगदीं जवळ आहेत; असो. येथून

## येरंडोल

गांवीं आलों. हा गांव बरा च जुना आहे आणि घरा करितां पाया वगैरे खणतांना त्याची साक्ष पटते हि. पेशवाईंत याचा समावेश चांदसर परगण्यांत होत असे. शक २७२ च्या सुमारास राज्य करणाऱ्या समुद्रगुप्तानें अलाहाबाद येथें एका स्तंभावर आपल्या विजयाची प्रशस्ती कोरली आहे; त्यांत दक्षिणापथांतील ७।८ देशांचीं जीं नांवें आलीं आहेत त्यांपैकीं एरंडपल्ल हें एक होय. हें एरंडपल्ल म्हणजे हल्लींच्या कोणत्या देशाचें अगर नांवचें गांव याचा समाधानकारक शोध लागला नव्हता. पण तज्ज्ञांच्या मतें हें एरंडोल च तें होय. या तर्काला पुष्टी देणारा पुरावा नुकता च मला आढळला आहे. येथील एका अग्निहोत्र्यांकडील ग्रंथ चाळीत असतां एका ग्रंथाच्या

२६

शेवटीं " येरंडवल्लीपुर निवासी ...शिवप्रसाद पांठक कृते शतचंड्यादि विधानं" असा उल्लेख आहे. ही पोथी २५० वर्षा पूर्वींची आहे. या वरून २५० वर्षांपूर्वी एरंडोलाचें येरंडवल्ली हें नांव प्रचारांत होतें हें उघड आहे. समुद्रगुप्ताचें एरंडपल्ल व या शिवप्रसादपाठकाचें येरंडवल्ली यांत इतकें साम्य आहे कीं, हीं दोन्ही नांवें एक च होत. याबद्दल आतां शंका राहात नाहीं. 'प' चा 'व' होतो, त्या प्रमाणें एरंडपल्लचें एरंडवल्ल अथवा एरंडवल्ली होणें मुळीं च अशक्य नाहीं. म्हणजे एरंडोल हें गांव हजार वर्षां पूर्वीपासूनचें आहे. येथें जी दंतकथा आहे ती गांवाच्या प्राचीनपणाचीं निदर्शक च आहे. ती म्हणजे ह्या गांवाला एकचक्रा नगरी म्हणतात व येथें पांडव लाक्षागृहांतून बाहेर पडल्यानंतर अज्ञातवासांत राहिले होते व येथून जवळ च पद्मालयाचें रान म्हणजे बकासुराचें रान असून भीमानें या रानांत च त्याचा वध केला, ही होय. हें ठिकाण अद्यापि हि दाखवितात. पण ही दंतकथा असत्य आहे. पांडव ज्या एकचक्रा नगरींत राहिलें तें हें नसून पांचाल देशाच्या आसपास उत्तर हिंदुस्थानांत च असावें. असो. वरील अग्निहोत्र्याकडून दोन ग्रंथ मिळाले. त्यांपैकीं विष्णुसहस्रनाम हें नेहमींचें प्रचारांतील नसून निराळें च आहे. यांच्या जवळ आढमल्ल याचा शार्ङ्गधरदीपिका नांवाचा वैद्यक ग्रंथ आहे, त्यांच्या सांगण्यांत तो अप्रसिद्ध असून कोणीं प्रकाशित करीत असल्यास ते देण्यास तयार आहेत.* ग्रंथ शार्ङ्गधर वैद्यक ग्रंथावरची टीका आहे. त्याचा आरंभ व शेवट उतरून घेतले आहेत. त्यावरून तो हम्मीरपूरच्या भावसिंहाचा पुत्र होय असें दिसतें. ग्रंथाचा लेखनशक १७०३ आहे; असो. येथील देशमुखाकडील कागद मला मिळाले आहेत. त्यांत फारशी कागद हि कांहीं आहेत; त्यावरून एरंडोलावर पेशवाईंत व पेशवाई अखेरीस कोणा कोणाचा अंमल होता, तसें च एरंडोलांत या देशमुखांचे कोण कोणते हक्क होते, याचा बोध होतो. येथील देशपांड्याला औरंगजेबानें दिलेली अस्सल सनद मिळाली. तिची नक्कल करून ती परत केली. तिच्यावरून खानदेशांत त्या काळीं कशी उजाडी होती व ह्या प्रांत वसविण्यास त्या देशपांड्यास कोणकोणत्या सवलती दिल्या होत्या तें कळतें. येथें ज्ञानेश्वरी, मुक्तेश्वराच्या भारताचीं कांहीं पर्वें व कांहीं बाडें हि मिळालीं आहेत. येथें पांडवाचा वाडा म्हणून एक पडका वाडा दाखविण्यांत येतो. ही इमारत मुसलमानाची मशीद आहे. अशी च एक मशीद अन्हिलपट्टणास आहे. ह्या वाडा लंब चौरस अजमासें १५०' X १२५' चा आहे. मुख्य दार पूर्वेस आहे. तेथें पूर्वी द्वारमंडप ( porch ) होता तो हल्लीं पडला आहे. आंत फक्त चार बाजूंच्या चार भिंती व ३ घुमट यांशिवाय कांहीं हि नाहीं. ह्या सर्व वाडा हिंदु देवळाच्या अवशेषानें बांधलेला आहे. पूर्वेकडील भिंतींत मुख्य दाराच्या दोन्ही बाजूंस ९।९ मिळून १८ मोठमोठ्या कमानी—पीलखान्याप्रमाणें—आहेत.

* रा. कवडे शास्त्र्यांच्या म्हणण्यांत ह्या ग्रंथ हल्लीं निर्णयसागरांत छापीत आहेत असें समजलें.

एका कमानींत वर जाण्याम जिना आहे; वर कांहीं हि नाहीं. उत्तरेकडील भिंतींत मधोमध एक घुमट असून त्याच्या दोन्ही अंगास १२।१२ मिळून २४ कमानी आहेत; याच प्रमाणें दक्षिणेकडील भिंतींत हि मध्यें घुमट व २४ कमानी आहेत; या दोन्ही हि घुमटांत कांहीं नाहीं. मात्र यांच्या छतावरचें नकस काम पाहाण्या सारखें आहे. पश्चिमेची बाजू च मुख्य आहे. या भिंतींत मोठा घुमट असून ती च जुमा म्हणजे शुक्रवार मशीद होय. यांत मुसलमानी पद्धतीची कमान, तींत कोनाडा आणि पायऱ्या आहेत. याचे १७ खांब कोल्हापूरच्या अंबाबाईच्या खांबा सारखे च साधारणतः आहेत. मधल्या कोनाड्यांत अगदीं मधोमध गदे सारखें एक चिन्ह आहे. कमानीच्या चौक-टीचें कोरीव काम फार च अप्रतिम आहे; तें निरनिराळ्या नमुन्याचें जाळीदार काम आहे. या घुमटाच्या छतांत हि कोरीव काम बरें च आहे. मुख्य इमारत ती ही च. हिच्या दोन बाजूंस भिंतींत च या घुमटांतील कमानीप्रमाणें २।२ मिळून ४ कमानी मोंवतालच्या जाळीदार चौकटी सहित आहेत. त्यांच्या हि आंत गदे सारखें च चिन्ह आहे; तें कशाचें द्योतक आहे हें येथल्या मुजावरास कांहीं सांगतां येत नाहीं. या चार हि कमानींच्या वर चार आरबी शिलालेख होते; पैकीं हल्लीं, एक सबंध असून तिघांचीं थोडशीं च अक्षरें शाबूत राहिलीं आहेत. तसें च मुख्य दारांतून आंत शिरल्यावर डाव्या बाजूस जे कांहीं दगड पडले आहेत त्यांपैकीं एका दगडावर हि आरबी अक्षरें कोरलेलीं आहेत. मीं या सर्वांची नक्कल घेतली आहे. तेथील मुजावर किंवा उर्दू शाळेचा मुख्य शिक्षक यांना हि तीं वाचतां येत नाहींत. वरील १७ खांब हिंदू देवळां-तील आहेत असें उघड दिसतें. पडक्या भिंतींत मोडक्या मूर्ति व इतर हिंदू अवशेष दिसतात. मुसलमान म्हणतात कीं, ही जाहांगीर-सेलीमनें बांधली. या गांवच्या एका भागास जहांगीरपुरा असें नांव हि आहे; प्रत्येक कमानींत एक एक जाळीदार खिडकी आहे. या प्रत्येक जाळीचा नमुना निरनिराळा आहे. ज्याला शिल्पशास्त्राची माहिती असेल त्यानें ते नमुने कागदावर प्रमाणबद्ध उतरून ठेवावे असें वाटतें. मुख्य घुमटाच्या समांतर उत्तर दक्षिण असा सभामंडप पूर्वी होता; हल्लीं तो सर्व पडला असून खांब व खांबाखालील कुंभ्या याशिवाय त्याचा मागमूस हि नाहीं. पडका हौद व कारंजें समोर आहे. एक अष्टकोनी विहीर आहे. बाकी आंत सर्व मैदान आहे. जवळ च केशवरावा ( श्रीकृष्णाचें )चें मंदीर आहे. ती मूर्ति या वरील विहिरींत सांपडली म्हणतात; मूर्ति यादवकालीन आहे; मला असें वाटतें कीं, केशवाचें मंदीर पूर्वीचें या च जागीं असावें व तें मोडून मुसुलमानांनीं तेथें ही जुमामशीद बांधली असावी; असो. गांवास अद्यापि ६ वेशी चांगल्या स्थितींत आहेत; त्या पश्चिमे शिवाय प्रत्येक दिशेस २।२ असून त्यांचीं नांवें अशीं आहेत; पूर्वेकडील १ रंगारी ( ही मुख्य ),२ तेलाटी, दक्षिणेच्या ३ देवगिरी ( दौलताबाद कडे तोंड असल्यानें), ४ कासारी, उत्तरेच्या ५ आमळनेरी व ६ बुधवारी. बुधवारी वर आपल्या येथील श्रीधर विठ्ठल दात्ये यांनीं बंगला बांधला आहे. तसें च हल्लींचें केशवरावाचें मंदीर हि त्यांनीं च बांधलें

आहे. येथील पडक्या गढींत मुसुलमानी प्रयोग झालेली पण पूर्वीची, सुंदर अशी एक गजगौरीची मूर्ति आहे. अमळनेरी वेशीच्या बाहेर येथील देशमुखाच्या शेतांतील पायविहिरीच्या पूर्वाभिमुख भिंतीवर खालील शिलालेख आहेः—

१ राजेमान्य राजेश्री २ मथुरादासस्य प्र भा ज (!)
३ मकुंद जोसी हरीचंद जोसी ४ संवत १७८८ सके १६५३
वि जो स्तु (!)

शिळा चौकोनी २॥।–२॥ वितींची असून खालून १॥ पुरुष उंचीवर आहे. हे मकुंद जोसी व मथुरादास कोणाचे कोण ते येथें कोणास माहीत नाहीं. मात्र येथील देशमुखांच्या एका पूर्वजाचें नांव मुलकचंद असून त्याचा दगडी पुतळा त्याच्या समाधीवर विहिरीजवळ च बसविलेला आहे. विहिरींतील उत्तरेकडील भिंतींत २ विटा अशा आहेत कीं, एकीवर एक सुरूचें झाड व दुसरीवर एक मासा उठविलेला आहे. विहिरीच्या आसपास मोठमोठ्या दगडी कुंड्या पडल्या आहेत. ज्या वेळीं देशमुखाकडे पागा होती त्या वेळीं तींतील घोड्यांच्या पाणी पिण्या कडे त्यांचा उपयोग होई. गांवाबाहेर म्हसावद सडकेच्या दक्षिणेस पांडवांच्या वाड्यांतील घुमटाप्रमाणें च आणीक दोन घुमट आहेत. त्यांत मुसुलमानी २ थडगीं असून वर नकसकाम केलेलें आहे. यांची बांधणी जुमा मशिदीच्या च वेळची आहे. यांच्या अगदीं विरुद्ध दिशेस सरासरी १ हजार पावलांवर एका बुरुजावरील बारद्वारी आहे. तो बुरूज व ती बारी हीं सुद्धां घुमटाच्या च वेळचीं व तसल्या च नकशीचीं आहेत. हे घुमट बाहेरून आपल्या देवळासारखे दिसतात. असले च घुमट सातान्याकडे भुईंज, विटेमायणी या भागांत बरे च दृष्टीस पडतात; मात्र ते मुसुलमानी नसून त्यांत हिंदूंच्या समाधी आहेत. एरंडोल अद्यापि एका गोष्टीबद्दल प्रसिद्ध आहे, ती म्हणजे तेथील जहांगीरपुऱ्याजवळील कागदीपुऱ्यांत तयार होणारे कागद. हे कागद तयार करणार कागदी मुसलमान असून त्यांचे १५।२० कारखाने तेथें आहेत व अजून सुद्धां सर्व नाहींत तरी ७।८ कारखाने चालू असून त्यांचें सर्व कागद व्यापारी लोक आपल्या जमाखर्चाच्या वह्यांच्या उपयोगां करितां खरेदी करतात. कागद टिकाऊ व गुळगुळीत पण जाड असतो. एकाद्या तज्ज्ञ शास्त्र्यानें ( Scientist ) त्यांत सुधारणा करून हा घरगुती धंदा ( Cottage industry ) भरभराटीस आणावा. टीपकागद हि हे करीत असतात. महंमदपुरा, कागदीपुरा, जहांगीरपुरा, लांडणापूर व खुद्द गांव मिळून हें एरंडोल किंवा एरंडपल्ल शहर होय. असो. येथून निघून

## पिंपरी

येथें गेलों. येथल्या एका पाटला जवळ हिंदुस्थानी कवितांचा संग्रह बरा च आहे. त्यानें तो देण्याचें कबूल केलें आहे. येथें मुक्तेश्वराचें सभापर्व, अवधुतानुचर मुक्तेश्वरविरचित कौतुहल नाटक, काशीयात्रेस पुण्याहून जाण्यास रस्ता कोसवार व मजलवार

ज्यांत दिलेला आहे अशी यादी, अनंतसुत विठ्ठलकृत कांहीं काव्यें, गंगाजी कोनेरकृत सुदाम चरित्र वगैरे काव्य मिळालें. मग

## पिंपळकोठें

येथें गेलों. येथील पाटील रजपूत आहे. त्याच्या जवळ कागद आहेत पण प्लेगमुळें गांव बाहेर ते असल्यानें मिळाले नाहींत. तेव्हां तेथून

## पाळधी

स आलों. येथील देशमुख देशपांडे दोन्ही हि एक च घराणें असून तें मुसुलमानाचें आहे. खानदेशांत अवरंगजेबाच्या काळीं वतनाकरितां जे हिंदू बाटले त्यांपैकीं च एक या देशमुखांचे पूर्वज होते. येथें शिवकालीन कांहीं अस्सल कागद व रंगात्मज, वामन, आनंदसुतप्रभु, आनंदनंदन, यांचे काव्यग्रंथ हि मिळाले. नंतर

## जळगांव

येथें आलों. हें गांव पूर्वीं भोइटे इनामदारास जहागीर होतें. हल्लीं त्यांना थोडीशी वार्षिक देणगी मिळते व चरितार्था करितां नाडापुडीचीं दुकानें त्यांना काढावीं लागलीं आहेत. पेशवाईत व अव्वल आंग्लाईत ३ कोसांवरील नशीराबाद तालुका होता तो मोडून ५०।६० वर्षांपूर्वी जळगांव तालुका झाला व १९०६ मध्यें जिल्हा झाला. जिल्हा झाल्यापासून इतर काय फायदे झाले असतील ते होवोत पण दिवसेंदिवस जास्त महागाई झाली व होत आहे हा मात्र तोटा झालेला आहे, याचा अनुभव माझें राहाण्याचें तें गांव असल्यामुळें मला स्वतःला आलेला आहे. येथील, श्रीधरस्वामीकृत ( संस्कृत ) सुबोधिनी टीका ( भगवद्गीते वरील ), दामोदर विठ्ठलदास कृत कविता, कृष्णदास मुद्गलकृत युद्धकांड, कचेश्वरकृत सुदामचरित्र व आणखी कांहीं कवितेचीं बाडें इतका संग्रह माझ्या जवळ आहे. गांव नवीन च पुढें आलें असल्यानें, येथें जुनीं घराणीं भोइटे व ग्रामजोशी यांशिवाय दुसरीं मुळीं च नाहींत. असो. घरीं ८।१० दिवस राहिल्यावर

## नेरी

या गांवीं गेलों. येथें मानभावाचा एक मठ आहे. तेथें कांहीं प्राप्ति झाली नाहीं. वाघूर नदीनें गांवाचे खुर्द व बुद्रुक असे दोन भाग झाले आहेत. पैकीं नदीच्या अलीकडील गांव जाहागिरीचा आहे. जहागीरदार गांवीं नसल्यानें त्यांची भेट झाली नाहीं. एक हिंदी कवितेचें मोठें बाड मिळालें तेवढें च घेऊन जळगांवीं परत आलों.मग तेथून :

## पिंप्राळें

गांवीं गेलों. जळगांव ज्या वेळीं खेडें होतें त्या वेळीं पिंप्राळें हा कसबा होता. मोठे जुनाट वाडे हल्लीं सुद्धां येथें दृष्टीस पडतात. कोष्ट्यांची वस्ति येथें फार आहे. गांवाचें जुनें गांव व पेठ असे २ भाग आहेत. जळगांवाच्या भोइट्यांपैकीं हैबतराव भोइटे

यांनीं ही पेठ वसविली व तो येथें राहात असे. त्याबद्दलचे कांहीं कागद व मुक्तेश्वर-भारताचीं कांहीं पर्वे आणि शिवदिनकेसरीच्या घराण्यांतील शिवलीलामृताची पोथी येथें मिळाली. येथें ही मानभावाचा एक मठ आहे. येथून पुढें

### वैजनाथ

नांवाच्या गिरणेच्या कांठीं असलेल्या गांवीं आलों. हें एरंडोलच्या देशपांड्यांचें गांव आहे; गांवा बाहेरील ल्क्ष्मनशा व अलीकडील च बांधलेल्या देवळांतील महादेवाचें च नांव वैजनाथ होय. येथून

### पिंपळकोठें

गांवास आलों. मार्गे आलेलें पिंपळकोठें निराळें व हें निराळें. येथें पूर्वीपासून ताडीची दारु तयार करून ती विकण्यांत येई. हल्लीं हि येथें एका पारशानें ताडांची मुद्दाम बागेंत लागवड करून तिची दारु काढण्याचा कारखाना जळगांवास काढला आहे. येथून जवळ च असलेल्या

### रिंगणगांव

या जहागिरीच्या गांवीं गेलों. येथील जहागीरदार हे इतिहासप्रसिद्ध चिमणाजी दामोदर या व्यक्तीचे वंशज होत. यांचें उपनाम मोघे आहे. हल्लींचे जहागीरदार रा.वासुदेव रामचंद्र मोघे हे सुशिक्षित असल्यानें त्यांची भेट झाल्या वर त्यांनीं आपलें अवशिष्ट असलेलें दफ्तर— कारण बरे च रुमाल पाणी तापविण्याच्या हंड्याखालीं गेले होते व कांहीं पावसानें कुजून गेले होते !— माझ्या हवालीं केलें. गांव प्लेगमुळें बाहेर च. झोंपड्यांत राहून त्यांच्या दफ्तरांतील निवडक कागदपत्रांच्या नकला करावयास आरंभ केला. साधारण १५०।१७५ कागद आहेत. चिमणाजी दामोदर यांची बरीचशी नवीन माहिती यांत येईल. मात्र ताराबाईकडून फुटून शाहूमहाराजांना प्रथम मिळाल्या वर कांहीं दिवसांनीं त्यांना सोडून पुन्हां करवीरकराकडे तो कां गेला याच्या कारणाचा कांहीं त्यांत उलगडा होत नाहीं. निजामअलीकडून त्याला सबंध चांदसर, सबंध अमळनेर हे दोन परगणे जहागीर मिळाले होते. पण डभईच्या लढाईंत श्री. थोरल्या बाजीरावांचे विरुद्ध चिमणाजीपंत लढल्यानें त्याला कैद केल्यावर बाजीरावांनीं त्यांची ही सबंध जहागीर खालसा करून फक्त रिंगणगांव त्यांच्याकडे कायम केलें. पुढें त्यांच्या मुलाचा व नातवाचा जरी पेशव्यांशीं अत्यंत घरोब्याचा संबंध होता व खाजगी पत्रांत ते चिमणाजीच्या सिवाजी नांवाच्या भावास " तीर्थरूप, काका" किंवा मुलास "चिरंजीव" वगैरे लिहीत, तरी पण जहागिरीची केलेली जप्ती त्यांनीं अखेर पर्यंत उठविली नाहीं. हल्लीं यांना १।२ गांवांचा मोकासा तेवढा मिळतो. यांच्या बद्दल जास्त माहिती यांचे कागद छापले जातील त्या वेळीं देऊं. रा. वासुदेवराव यांनीं अस्सल कागद न देतां नकला करण्यास सांगितल्या मुळें बरे च दिवस तेथें काढावे लागले. कागद महत्वाचे आहेत. कांहीं फारशी हि आहेत, त्यांचें भाषांतर करणें जरूर

आहे. या कागदपत्रांत श्री. रघुनाथरावदादासाहेब यांचीं कांहीं अस्सल पत्रें आहेत त्यांत त्यांचा जो सिक्का आहे तो माझ्या पहाण्यांत इतरत्र नाहिं. यांचें येथें अवचितसुत काशीचें द्रौपदीस्वयंवर मिळालें. त्याचा रचनाशक १६१८ धाता, पौष वद्य १० गुरुवार असून या पोथीचा लेखनशक १६५५ प्रमादी, मार्गशीर्ष शुद्ध ९ इंदुवार, आहे. म्हणजे मूळ पोथीच्या नंतर ३७ वर्षांनीं ही नक्कल केलेली आहे. तसें च १७०६ मधील लिहिलेली रामविजयाची पोथी हि मिळाली. असो. नंतर येथून

## सुकेश्वर

या स्थानीं आलें. हें गांव नसून गिरणेच्या कांठावरील एक जुनें महादेवाचें मंदीर आहे. हे एकांताचें ठिकाण आहे. देवळाची बांधणी मेरुलिंगावरील धर्मशाळेप्रमाणें म्हणजे शिलाहारकालीन आहे. हल्लीं अर्धें अधिक देऊळ जमिनींत गाडलें गेलें असून राहिलेलें पडण्याच्या बेतांत आलें आहे. येथल्या महादेवाची स्थापना १५।२० वर्षांपूर्वीं एका गोसाव्यानें जवळ च बांधलेल्या नवीन देवळांत केली आहे; त्या गोसाव्याची समाधी हि येथें च आहे. देऊळ दरडीवर आहे; दरडीच्या पायथ्याशीं देवाचा बाग आहे. त्यांत २ कुंडें आहेत. एकांत जिवंत झरा असून त्यांतील च पाणी दुसऱ्यांत जातें. बागेंतील झाडांना जुन्या देवळाच्या दगडांचे ओटे घातले आहेत, त्यांच्यावर कोठें नकशी, कोठें देवाच्या मूर्ति कोरलेल्या दिसतात. शिलालेख नाहीं. परत येतांना

## खर्ची, खेडी

या गांवीं आलों. खर्चीचा पाटील रजपूत असून त्याच्या जवळ कागद असावेत. खेडी गिरणेच्या कांठीं आहे; समोरच्या कांठावर एक पडका घुमट आहे. त्यावर शिलालेख नाहीं. येथून

## कढोली

गांवीं आलों. खेडी, कढोली हीं २ गांवें परवां परवां पर्यंत मामटे लोकांकरितां प्रसिद्ध होतीं. ज्याप्रमाणें इकडच्या भागांत आपले ( पुणें ) येथील मामटे प्रसिद्ध, त्याप्रमाणें खानदेशाच्या त्या टापूंत खेडीकढोलीचे प्रसिद्ध. हे जातीचे रामोशी असत. हल्लीं यांची वस्ती येथून उठली असून जे कांहीं थोडे राहिले आहेत त्यांपैकीं कांहींनीं तो धंदा सोडून मोलमजुरी व शेती करण्यास आरंभ केला आहे. येथें संवत १८२९ मधील भट्टोत्पल याची षट्पंचाशिका व मथुरादासविरचित श्रीवृषभानुजा नाटिका हे ग्रंथ व कांहीं अभंगांचीं बाडें मिळालीं. मग

## चोरटकी

स आलों. हें खेडें टेंकडीवर असून त्याच्या चारी बाजूंस जंगल व टेंकड्या आहेत. समोंवार उजाड असल्यानें या भागांत संध्याकाळच्या वेळीं सुद्धां रस्तालूट होते, म्हणून तेव्हांपासून च या रस्त्यानें गाडीवान गाड्या नेत नाहींत. या पुढें

## विखरण

गांवीं गेलों. गांव जुनाट आहे. तट व वेशी पडक्या अवस्थेंत आहेत. गांवाबाहेर एक पायविहीर असून तिच्या वर शिलालेख आहे. पण शिळा कच्ची असल्यानें अक्षरें धुपून गेलीं आहेत. तत्राप गांवच्या वृद्ध लोकांकडून समजतें कीं, विहीर गांवकऱ्यानींच ६०।७० वर्षांपर्वी बांधली असून त्या च वेळचा तो शिलालेख आहे. हल्लींच्या कुळ-कर्ण्यांकडे कागद सांपडले नाहींत. येरंडोलचे देशमुख हे च येथील हि देशमुख आहेत. असो. विश्वामित्रकल्पादि गायत्रीपुरश्चरण–संवत् १७३७ मधील, काशीनाथकृत शीघ्रबोध–संवत् १८०६ तला, संवत १८३१ तील महामहोपाध्याय श्रीकृष्णानंद वागीश भट्टाचार्य यांचा तंत्रसार, महोपाध्याय ठक्कुर नृसिंह विरचित ताराभक्ति सुधा-र्णव–संवत् १८०३, हे ग्रंथ येथें मिळाले. शेवटचे २ ग्रंथ मोठे आहेत. पुढें

## पद्मालय

येथें आलों. हें डोंगराच्या माथ्या वर असून, मुख्य दैवत गणपती आहे. ठिकाण फार जुनें आहे. जुनें देऊळ मोडून त्या जागीं गोविंदबुवा नांवाच्या ब्रम्हचाऱ्यानें हल्लींचें नवें बांधलें आहे. देवळा समोर मोठा तलाव असून त्यांत पूर्वी फार कमळें असत आणि त्यावरून च पद्मालय हें नांव मिळालें आहे. हल्लीं तलावांत एकादें च कमळ दृष्टीस पडतें. तलावाला घाट आहे. गोविंद बुवानें उत्तराहिंदुस्थानांतून एक प्रचंड घंटा आणविली आहे. येथें गांव वगैरे कांहीं नसून फक्त पुजारी व २।३ भिल्ल यांच्या च काय त्या झोंपड्या आहेत. बर्जेस म्हणतो कीं, येथें एक शिलालेख आहे, पण मला तो कोठें हि आढळला नाहीं, कोणाला माहित हि नाहीं. मात्र हल्लींच्या नवीन देवळाच्या बांधणीच्या वेळचा एक लेख आहे. संस्थानास पेशवाईमध्यें २१०० ची नेमणूक होती. हल्लीं इंग्रज ६०० रु. देतो. अस्सल कागदपत्रें व सनदा मालकाजवळ आहेत, असें पुजाऱ्यानें सांगितलें. मालक परगांवीं राहतो, येथें नसतो. या ठिकाणचें पूर्वीचें नांव प्रवाळक्षेत्र; कारण तलावाच्या आंत जी विहीर आहे तींत पोंवळ्याची गणेशमूर्ति आहे असें म्हणतात. या गांवाचा व एरंडोलचा संबंध बकासुराच्या दंतकथेनें कसा जुळविला आहे हें वर आलें च आहे. विश्रांतीवड म्हणजे जेथें भीम–बकासूर युद्ध झालें तें ठिकाण. भिमकुंड म्हणजे बकासुराला मारल्या वर भीमानें पाणी पिण्या कारितां एका ठिकाणीं कोपर मारून काढलेलें पाण्याचें कुंड वगैरे स्थळें अद्याप हि दाखविण्यांत येतात. पैकीं ही भिमकुंडाची जागा फार शांत व अगदीं एकांतांत आहे. चारी बाजूंस उंच डोंगर व झाडी आहे. या क्षेत्राहून

## टोळी

गांवीं आलों. हें खेडें येथील ओढयाच्या पाण्यामुळे एरंडोलच्या या भागांत फार मस्त्यात आहे. खानदेशी चढ्या किंवा हिंदुस्थानी बाटया किंवा आपण ज्याला गाकर म्हणतों त्याचे सकाळीं भक्कम जेवण करून याचें पाणी प्यालें असतां पुन्हां रात्रीं नेहमीं सारखी च भूक लागत्ये. वास्तविक हें जेवण म्हणजे २४ घंट्यांची मात्रा

होय; पण हें पाणी फार पाचक ( चुनखडींतून आलेलें ) असल्यानें कसल्या ही जडान्नाचें पचन होतें. येथें बारामासी, संवत् १८२७ मधील गीतापदार्थबोधिनी, शके १७३० मधील रुक्मिणीस्वयंवर, सगंमेश्वरमाहात्म्य, हिंदी रमलग्रंथ, शके. १६४५ तील रसिकप्रिया नांवाचें ब्रिज प्रकरण, जयरामसुताची कांहीं कविता वगैरे संग्रह मिळाला. येथून

## वांभोरी

स आलों. टोळी व वांभोरी यांच्या मध्यें एक मारुतीचें देऊळ आहे. तेथें पूर्वी गांव होतें, हल्लीं तेथें एक हि घर नाहीं; मारुतिराय आपल्या जवळ वस्ती होऊं देत नाहींत म्हणतात. वांभोरीस श्रीदासचोधांचें मुखवस्त्र म्हणून प्रत्येक दशकांतील सारांशपर ओव्यांचें एक प्रकरण मिळालें. अद्याप हें प्रकरण कोठें हि माझ्या पहाण्यांत नाहीं. याच्या शेवटीं "दास" हें च नांव आहे. श्रीसमर्थांनीं असलें एकादें प्रकरण केल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. असो. शके १६५१ मधें लिहिलेलें अभंगांचें एक बाड, विप्रानंदराघवाची कविता, हिंदीभाषेंतील कांहीं काव्य, शके १७१३ मधलि शिवगीता, संवत १७३५ तील नवरात्रविधान, संवत १७६४ तील राशीविवरण, हिंदी भाषावालविके वास्तुप्रकरण, श्रीमन्महाराजाधिराज-महाराज-राजेंद्र श्रीसवाई-प्रतापसिंहजी-विरचित मारवाडीभाषेंतील शिळेवर छापलेला अमृतसागर नामक वैद्यक ग्रंथ व शके १५६८ तील भट्ट रामेश्वरसूनु नारायणभट्टकृत और्ध्वदेहिक पद्धति इतके ग्रंथ येथें मिळाले. येथून मग धरणगांवमार्गें आगगाडीनें जळगांवीं आलों. पुढें पुन्हां तेथून कासोदें— फरकांडें— धरणगांव या भागांत फिरावयास गेलों व तिकडे कांहीं प्राप्ती हि झाली आहे. पण तो प्रवास या ( १८४० चैत्र ) वर्षांतील असल्यानें येथें त्याचा उल्लेख करणें अप्रस्तुत होय. मात्र एवढें येथें नमूद करतों कीं, या वर्षी पहिल्या च महिन्यांत ज्या कवीच्या संबंध ग्रंथाबद्दल आजपर्यंत पुष्कळ शोध चालू होता, पण १।२ भागांखेरीज जास्त भाग ज्याचे उपलब्ध होत नसत, असला १४ वे शतकांतील एक ग्रंथ संपूर्ण मला सांपडला. असो. जळगांवाहून धुळ्यास जाऊन मंडळाचें कांहीं काम होतें तें करून

## पुणें

येथें ४।५ दिवसांपूर्वी दाखल झालों.

वर जो संग्रह मिळाला म्हणून नोंद केली आहे त्याशिवाय आणीक खालील ग्रंथसंपत्ति नमूद करावयाची राहिली आहे.

१ प्रथम व द्वितीय पंचिका ( शके १६७७ ), २ शिवकवच ( १६९० ), ३ विष्णु अपामार्जन ( संवत १८४८. ), ४ एकोत्तिष्ठ श्राद्धविधी ( संवत १८०४ ), ५ गोमुखप्रसव ( सं. १८४१ ), ६ शिक्षाचतुष्टय ( श. १६७५ ), ७ स्मृतिकौस्तुभ ( श. १७१२ ), ८ शार्ङ्गधरपद्धति–कविचक्रचूडामणि श्री शार्ङ्गधर विरचिता—

(शके १६८५) वैद्यकावर नसून काव्यशास्त्रावरची आहे. शिवाय अभंगांची, वैद्यकाचीं वगैरे बरीं च बाडें, कांहीं जुनीं चित्रें– अजमासें १५–२० असून त्यांतील निम्म्याच्या वर ऐतिहासिक आहेत–, २ मूर्ति, अभ्रकाचीं जाळीचीं बरीचशीं चित्रें, पेशवाईतील एका प्रसिद्ध घराण्यांतील कांचेच्या कांहीं वस्तु, थोडीशीं नाणीं, ५०।६० पंचांगें* इ. इ. इतर हि संग्रह मिळालेला आहे.

या प्रमाणें गेल्या वर्षीं श्रावण ते फाल्गुन या महिन्यांत ज्या ज्या ठिकाणीं हिंडलों व तेथें जी जी प्राप्ति झाली त्याचें संक्षिप्त टांचण आपल्यापुढें ठेवीत आहे. गेल्या वर्षीं पावसाळा व प्लेग यानें प्रवासांत बरा च अडथळा झाला. पावसाळ्यांत न हिंडतां मिळविलेल्या संग्रहाची विल्हे व लेखनकर्म वगैरे काम करावें असें मला वाटतें. या कामास ४ महिने जरूर पाहिजेत; कारण संग्रहापैकीं कांहीं कागदपत्रें व ग्रंथ, नकला करून घेण्याच्या बोलीनें मिळविलेले असतात; तेव्हां ते परत करणें भाग असतें. नक्कलकार असा पाहिजे कीं, ज्याला या विषयाचें कांहीं तरी ज्ञान असेल; नाहीं तर त्याच्या अज्ञानानें व अनभ्यस्तपणानें लेखनांत इतक्या चुक्या होतात कीं त्या दुरुस्त करण्या पेक्षां आपण पुन्हां नवीन च नक्कल केलेली पुरवली असें वाटतें। संग्रह मिळविण्यास काय अडचणी येतात हें संशोधकांच्या शिवाय इतरांच्या लक्षांत चांगलें येत नाहीं. ज्याच्या जवळ संग्रह असतो, तो पहिल्यानें दाखविण्यास कसा नाखुष असतो, आग्रह केल्यास दाखविण्यास दिवसगत कसे लावतो, चिकाटी धरल्यास दाखविल्यावर निवडलेल्या कागदांना घराबाहेर कसा जाऊं देत नाहीं वगैरे अडचणी त्या कामांत पडलेल्यांना च माहीत. आपण पुन्हां या च गांवीं येऊं असा कांहीं नियम नसल्यानें—कारण ती खर्चाची बाब आहे,– मालकाच्या टाळाटाळीनें निराश न होतां, अखेर तो संग्रह किंवा त्याच्या नकला मिळवाव्या लागतात. मात्र अशांत पुष्कळ दिवस खराब होतात; पण त्याला कांहीं इलाज नाहीं. एक तर संग्रह मिळविण्याचा नाद सोडावा किंवा हे दिवस तो मिळविण्याकडे खर्च करावेत, या शिवाय तिसरा मार्ग नाहीं. हें सर्व सांगण्याचें कारण इतकें च कीं, संशोधनानभ्यस्तांना असें वाटण्याचा संभव आहे कीं, पुष्कळ दिवसांत संशोधन करून त्या मानानें संग्रह थोडा कां मिळावा ? संशोधकाच्या कामाचें महत्त्व त्यानें मिळविलेल्या संग्रहाच्या कमीजास्त प्रमाणावरून किंवा हिंडलेल्या ठिकाणांच्या संख्येवरून अजमावयाचें नसून त्यानें केलेल्या श्रमावरून तें जोखावयाचें असतें, एवढा च निष्कर्ष या संशोधनानभिज्ञांनीं लक्षांत ठेवावा.

आतां, संशोधकास आपल्या बरोबर कोणती साधनसामुग्री अवश्य पाहिजे त्याची नोंद देऊं; कारण या सामुग्रीशिवाय तें संशोधन लंगडें व अपुरें होतें. (१) टेप. १०० फुटांचा, निदान ५० फुटांचा तरी असावा. पुष्कळ वेळां मोजण्याचें काम पडतें. तेथें मग पावलें किंवा हात यांनीं काम भागवावें लागतें. पण ज्या ठिकाणीं एकादी अप्रतिम

* यांत जुन्यांतलें जुनें पंचांग शके १६७१ चें आहे.

बांधणीची जुनी इमारत, देऊळ, स्तंभ किंवा किल्ला असेल व जो संशोधक वास्तु-शास्त्राचा थोडा बहुत जाणता असेल त्याला त्या कामाचा नकाशा ( Plan & Elevation ) काढून तो आपल्या मडंळांत ठेवावा अशी इच्छा साहजीक च होते व त्यावेळीं ( वरील प्रकारचें हात किंवा पाय यांच्या साह्याचे ) अंदाजी मोजमापाचा बिलकुल उपयोग नसून अगदीं तंतोतंत मोजमाप घेण्यास वरील टेपा शिवाय दुसरें सोईचें व आटोपसर साधन नाहीं. माझें असें म्हणणें नाहीं कीं, वरील परकीय मोजमाप पाहिजे; आपलें भारतीय यव–अंगुळ–हात हें मापन असल्यास कांहीं हरकत नाहीं; पण तें तरी ज्यावर छापलेलें आहे अशी एक लांब फितीची पट्टी असावी; व माझी तर मंडळास अशी सूचना आहे कीं, त्यानें हें भारतीय मोजमाप पुन्हां प्रचारांत आणण्याचें श्रेय घ्यावें. (२) जोड दुर्बीण ( Binocular ); हिची हि फार आवश्यकता आहे. कोठें कोठें शिलालेख उंच अगर अशा अडचणीच्या ठिकाणीं असतो कीं, तेथें प्रवेश होणें अशक्य असतें व लांबून तो बरोबर वाचतां येत नाहीं. अशा ठिकाणीं हिची जरूरी आहे. (३) सूक्ष्म-दर्शनकांच. अस्सल दस्तऐवजांतील संशयित अक्षरें, अस्पष्ट सिक्के, ताम्रपटांतील दुर्बोध अक्षरें यांच्या वाचनाच्या कामीं इचा उपयोग होतो. ( ४ ) पर्वताची उंची मोजण्याची नळी. किल्ल्याची अगर एखाद्या पर्वताच्या शिखराची ( ज्याच्याशीं कांहीं ऐतिहासिक संबंध निगडित झालेला आहे अशा शिखराची ) उंची काढावयाचें साधन याशिवाय दुसरें कोणतें आहे ? ( ५ ) साधारण मध्यम आकाराची, गळ्यांत अटकवितां येऊन जवळ बाळगतां येईल अशी एक प्रकाशलेखनपेटी ( Camera ); मग ती Kodak ची असो अगर दुसऱ्या कोणाची असो. स्थावर वस्तूंचीं, हस्तलेखांचीं वा ताम्रपटाचीं छायाचित्रें घेण्यास इचा उपयोग होतो, म्हणून सर्वांत जास्त इची फार जरूर आहे. ( ६ ) लहानसा विद्युद्दीप. वाईसारख्या गांवीं जेथें अंधारें हें सुद्धां संशोधनाचें एक क्षेत्र होऊं शकतें तेथें याची जरूरी नितांत भासते. असो; ही मुख्य साधनसामुग्री झाली; एवढी एकट्याच्यानें आपल्या खर्चानें घेणें साधणार नाहीं. मंडळाला च तें शक्य आहे. वरील साधनें जरी प्रत्येकाच्या आटोक्यांतील नसली तरी पुढील सामुग्री ज्याची त्यास तयार करतां येईल. (७) आजपर्यंत कोणते शिलालेख व ताम्रपट प्रसिद्ध झाले आहेत व कोणते प्रसिद्ध व्हावयाचे राहिले आहेत आणि ते कोठकोठें सांपडतील वगैरेची एक यादी. ( ८ ) महाराष्ट्रांतील– तूर्त संशोधकाचें क्षेत्र महाराष्ट्र च असावें, कारण अद्यापि येथं च पुष्कळ काम शिल्लक राहिलें आहे— कुल संस्थानिक, जहागीरदार, इनामदार मंडळी व देवस्थानें, मठ वगैरे स्थळें यांची एक याद. असली याद प्रत्येक तालुक्याच्या मामलेदार कचेरींत असते, तिची नक्कल मिळविण्यास अडचण पडणार नाहीं. ( ९ ) जुन्या लिपीचें ओझा यांचें किंवा तत्सदृश एखादें पुस्तक इ. इ. आणखी हि कांहीं साधनें लागतील पण तीं किरकोळ व सहज मिळूं शकतील अशीं असल्यानें त्यांचा नामनिर्देश येथें करण्याचें कांहीं कारण नाहीं. अशा साधनांनीं युक्त होऊन संशोधक बाहेर पडल्यास त्याला फार फायदा होईल. त्याचें संशोधन सुकर होईल. असो. गेल्या वर्षी मला कोणता संग्रह मिळाला त्याचें स्थूलदृष्ट्या खालीं वर्गीकरण करतों:–

(१) **काव्यग्रंथः**— १००।१२५ यांत वेदांतपर, पौराणिक व शास्त्रीय वगैरे सर्व प्रकारचे आहेत.

(२) **गद्यग्रंथः**— ५०।३० वैद्यक, पौराणिक किंवा ऐतिहासिक. यांत च स्थलमाहात्म्याच्या बखरी यांचा समावेश केलेला आहे.

(३) **ऐतिहासिक कागदपत्रेंः**— (अ) शिवपूर्वकाल— २५; (आ) शिवपश्चात्काल— १००; (इ) पेशवेकाल— १५००; (उ) आंग्लाईअव्वलकाल— ५००; (ऊ) फारशी— १००।१५०.

(४) **जुनीं नाणींः**—४।५

(५) **जुन्या तसबिरीः**— (अ) ऐतिहासिक— ५।६, (आ) पौराणिक— २।३, (इ) सृष्टिदेखावा— १, (उ) गायनशास्त्र विषयक— ३ । ४, (ऊ) इतर— २।३.

(६) **शिलालेखः**— ८।१०

(७) **मूर्तिः**— २

(८) **इतर जुन्या वस्तु**— कांचेच्या दिवल्या, अभ्रकांच्या चित्रांच्या जाळ्या वगैरे.

याप्रमाणें गेल्यावर्षी श्रावण ते फाल्गुन या (अधिक भाद्रपद धरून) नऊ महिन्यांत ठिकठिकाणीं हिंडून मला जो कांहीं संग्रह मिळाला तो मी आज मंडळाच्या दफ्तरखान्यांत ठेवीत आहे. उत्तरोत्तर भारतेतिहासमंडळाला ऐतिहासिक सामुग्री जास्त जास्त उपलब्ध होऊन मंडळाचा दफ्तरखाना व संग्रहालय सर्व भरतखंडांत पहिल्या प्रतीचें होवो, अशी श्रीसमर्थचरणीं प्रार्थना करून येथें च लांबलेलें हें संशोधनवृत्त समाप्त करतों.

पुणें वैशाख शुद्ध १० राज्याभिषेक शक २४४ सोमवार

**पांडुरंग मार्तंड चांदोरकर.**

# थोरले बाजीराव साहेबांची उत्तरहिंदुस्थानावरील पहिली स्वारी.

( ले.–भा. रा. भालेराव. )

आम्ही उत्तरहिंदुस्थानावरील मराठ्यांच्या ज्या पहिल्या स्वारीचा उल्लेख करणार आहों तिजबद्दलचा उल्लेख पेशव्यांच्या बखरीच्या ४ थ्या आवृत्तीच्या (१९०३) ३६ व्या पृष्ठावर आहे. माल्कमच्या मध्यहिंदुस्थानावरील ग्रंथाच्या ( तिसरी आवृत्ति १८८० ) ४४–४५ पृष्ठांवर इचें वर्णन कांहीं विपर्यस्त रूपानें लिहिलें आहे. दोघांच्या मतें बाजीरावांनीं स्वतः होऊन च उत्तरहिंदुस्थानावर स्वारी केली; व जयसिंहानें उज्जन वगैरे प्रांत ब्राह्मणास दान किंवा त्यांच्या मर्जीखातर दिले. पण त्यांत कांहीं तथ्य नाहीं. खालील पत्रांवरून दिसून येईल कीं, जयसिंहानें च बाजीरावसाहेबांस माळव्यावरील मुसलमानी सत्तेला हुसकून लावण्याच्या व अप्रत्यक्षपणें आपलें पोट भरण्याच्या उद्देशानें च स्वारी करण्यास उत्तेजित केलें. मराठ्यांची उत्तरहिंदुस्थानावर ही पहिली स्वारी इ. स. १७२२–२३ चे दरम्यान झाली होती.

ह्या स्वारीचें महत्त्व व ही च मराठ्यांची उत्तरहिंदुस्थानावरील पहिली स्वारी म्हणण्याचें कारण हि तितकें च बळकट आहे. माल्कमच्या इतिहासावरून ( पृ. ५१ ) कळतें कीं, मराठ्यांनीं इ. स. १६९६ पासून च माळव्यावर स्वारी करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. पण त्या वेळच्या म्हणजे इ. स. १७२२–२३ पूर्वीच्या स्वाऱ्यांत अन्तस्थ राजकारण नसल्यानें तो महत्त्वाचा समजण्यास कांहीं च पुरावा नाहीं. तेव्हां मराठ्यांची उत्तर हिंदुस्थानावर पहिली व खरी स्वारी म्हणजे वरील च होय. माल्कमच्या मतें मोंगली सत्तेमुळें माळव्यांतील हिंदुधर्मास आघात झाल्यामुळें व मुख्यतः दिल्लीच्या महमदशहा बादशहाच्या अव्यवस्थित कारकीर्दींत माळव्याचा सुभेदार दया बहादूर याच्या जुलुमामुळें तेथील लोकांनीं सवाई जयसिंहाच्या द्वारें बाजीराव साहेबांस माळव्यावर स्वारी करण्यास उत्तेजित केलें ( पहा पृ. ६८–६९ ). खालील पत्रांवरून या च म्हणण्यास दुजोरा मिळतो. हीं पत्रें अशीं— [ इंदूरचा मंडलोई राव नंदलाल हा मोठा धोरणी मुत्सद्दी होता. त्यानें च माळव्यांतील लोकांच्या वतीनें बाजीरावास जयपुराधीश जयसिंहाच्या द्वारें पत्र पाठविलें. ]

( १ ) सिधे श्री महाराजाधिराज महाराजा श्री सवाई जयसिंगजी देव बंचनाला नंदलाल हिसे सुप्रसाद बंचा अपरंच पंडितराम ने दोसन मेज्यो थे सो + + आवला लाहे बदर मो दे याने अपनी हरताई पोहचाव दीजो. मिती भादस चिदी १२ संमत १७८०

घनलाल नारायनदास दिवान नकल लिखा

राजा किसन
सिंग सवाई
जैसिंग महाराज

( अर्थात् सवाई जयसिंहाला नंदलालचा नमस्कार. आम्ही दक्षिणेस आमचा वकील पाठवीत आहों. याचे बरोबर स्वार देऊन पोंचता करणें. या पत्रावर च शिक्का मारून जयसिंहानें तें पत्र पेशव्यांकडे पाठविलें. त्याचें उत्तर म्हणून बाजीरावसाहेबांनीं पत्र पाठविलें तें असें— )

( २ ) छ. २५ माहे जिल्हेज इसने सलासीन मया व आलफ रायनंदलालजी यांचे नांवें पत्र शिक्का मोहोरी आपला पत्र सवाई जैसिंह महाराज याचे घेऊन मयाराम जोसी वकील मुकाम बऱ्हाणपूरचे येथें भेटले सर्व मजकूर मदतीचे कळवून नालछा व मांडव मुकामी जमाव मदतीचे आहे दया बहादुरच्या जुलमामुळें जमीदार व प्रजा नाराज म्हणोन आमची खात्री केली, त्यास आम्ही निघून रेवातीरी आलो आहे मयाराम बंधु राघोदास असल्यानें नेमाड इलाख्यांतील चौधरी कानुगो + + + पाच हजार जमाव झाल्याने आपलेकडील मदतीचा अनुभव आल्यानें मोठी खुसी जाहली जानिजे छ २५

मोर्तब
सुद:

परंतु रावनंदलाल यानें बाजीराव साहेबांस माळव्यावर स्वारी करण्याबद्दल पत्र पाठविल्याची बातमी मोगलाचा माळव्यांतील सुभेदार दया बहादुर यास लागली. तेव्हां मराठ्यांस साहाय्य न करण्याविषयीं त्यास प्रार्थना केली. परंतु त्यानें मुसलमानी सत्तेस माळव्यांतून हुसकून लावण्यासाठीं मराठ्यांस कुमक वगैरेची बरीच साह्यता केली; त्याजबद्दलचा उल्लेख या पत्रांतून केला आहे. त्या हिंदुस्थानी भाषेंत लिहिलेल्या पत्रांच्या नकला सोबत जोडीत आहे. याजबद्दल बरींच पत्रें इंदूर व उज्जनी येथील कानुगो मंडळीकडे आम्हांस उपलब्ध जाहलीं आहेत. पण त्यांपैकीं निवडक आठ पत्रांच्या नकला येथे सोबत पाठवीत आहों. मराठ्यांस माळव्यांत बोलावणाऱ्या राव नंदलाल व त्याचा मुलगा तेजकरण यांचीं चित्रें हि पाठवीत आहों. गुरुवर्य राजवाडे यांच्या ६ व्या खंडांत ह्यासंबंधीं कांहीं पत्रें छापलीं आहेत, तीं हि जिज्ञासूंनीं पहावीं.

---

टीपः—रा. मालेराव यांनीं पाठविलेल्या पत्रांच्या नकला मंडळाच्या दप्तरीं आहेत.— चिटणीस.

माझें

# इतिहास-संशोधन-वृत्त.

(शके १८३९)

या वर्षी मी खालील ठिकाणीं संशोधन केलें:—

| | |
|---|---|
| (१) वाळवें | (६) डिग्रज |
| (२) पलूस | (७) अष्टें |
| (३) देवराष्टें | (८) सुखवाडी |
| (४) मिलवडी | (९) तावदरवाडी |
| (५) अंकलखोप | (१०) नांद्रें |

याशिवाय तासगांव, दुधगांव, ऐतवडे वगैरे गांवांतील ऐतिहासिक घराण्यांसंबंधी बरी च माहिती मिळविली.

## (१) वाळवें

'वाळवें' हें इतिहासप्रसिद्ध व प्राचीन गांव आहे. येथें एक संस्कृत शिलालेख आहे. त्यांत ह्यास "वाल्मीकपूर" असें नामाभिधान दिलेलें आहे. त्यावरून हें गांव महाराष्ट्राच्या वसाहतकालीं त्या नांवानें प्रसिद्ध असावें, असें वाटतें. ब्राह्मणी राज्याच्या वेळेपासून तेथें, "थोरात" ह्या लढवय्या क्षत्रिय जातीचा निवास आहे. शिलाहारांच्या व शालिवाहनांच्या कालीं हि तें चांगलें भरभराटलेलें व ठाण्याचें गांव असावें, असें तेथील देशपांड्यांच्या व थोरातांच्या घरच्या ताम्रपत्रादिकांवरून अनुमान होतें. छत्रपति शाहू महाराजांचे वेळीं तेथें कुसाजी भोंसले यांचें ठाणें होतें. येथें देशपांडे, थोरात, ग्रामोपाध्ये, नाडगौडा, डुबल, नायकवडी, काजी, मुल्ला, मुजावर वगैरे वतनदार जुनीं घराणीं आहेत. त्यांचे कडे ऐतिहासिक कागदपत्रें मुबलक आहेत. चालू वर्षीं येथें मंत्रतंत्राचीं बाडें, ज्योतिषविषयक प्रकरणें हैबती कवीच्या अध्यात्मपर भेदक लावण्याच्या वह्या, सातारकर व करवीरकर छत्रपतींच्या सनदा, थोरातांच्या-तैनातजाबता, सरंजाम, वगैरे संबंधी-याद्या, कांहीं फारसी सनदा वगैरे सामुग्री मिळाली. आणखी कितीतरी प्राप्ति येथें होण्यासारखी आहे; ती आस्ते आस्ते करतां येईल.

## (२) पलूस

पलूस हें हि पुरातन वस्तीचें गांव आहे, असें तेथील जुनाट देवळें, कुसवें, तट वगैरे बाह्य चिन्हांवरून अनुमान होतें. येथें जैन धर्मीयांच्या नग्न देवतांचीं पुरातन मंदिरें

आहेत यावरून तर या अनुमानास ज्यास्त च बळकटी येते. सागरेश्वर महात्म्यांत यास "पलाशवन" हें अभिधान दिलेलें आढळतें. येथें पूर्वकालीं पळसाचीं झाडें फार होतीं असें म्हणतात; परंतु सध्यां फारशी नाहींत, क्वचित् आहेत. "पलाशवन" हें नांव सदर गांवास वसाहतकालीं मिळालें असावें. त्याचें च अपभ्रष्टरूप "पलुस" हें आहे हें उघड आहे. येथें गांवाच्या मध्यभागीं महादेवाच्या देवळाजवळ रस्त्यावर च उत्तराभिमुख एक "प्रस्तरस्तंभ" आहे. तो जमिनीवर सुमारें ४।५ फूट असून भूमि-गर्भांत हि तितका च असावा. त्यावर प्राचीन लिपींत लेख खोदलेला आहे. तो अशोक किंवा कनिष्क यांचें अनुशासन असावें, असा माझा तर्क आहे. तो लेख तज्ज्ञांनीं अवश्यमेव लावावा. त्यायोगें चांगला महत्त्वाचा शोध लागेल. येथें 'पटवर्धनी तलाव,' या नांवानें प्रसिद्ध असणारा एक विस्तृत तलाव आहे. परशुरामभाऊंनीं तो बांधविला असें म्हणतात. स्वाशा स्वारीचा मुक्काम तासगांवीं असला म्हणजे फौजेचा तळ त्या तलावावर पडे असें समजतें. या गांवीं एका कोष्ट्याजवळ जुन्या पोथ्या-पत्रांचा बरा च संग्रह आहे. त्यांतून मला गोरखनाथप्रणित 'गोरख गोधडी' ह्या मंत्रविद्येचा ग्रंथ आणि दैवती कविकृत कपिल गीतेवरील "ज्ञानप्रकाश" नामक प्राकृत टीका, हे ग्रंथ मिळाले. येथें भोंसले, बर्गे, घोरपडे, जाधव वगैरे सरदार घराणीं नांदत आहेत. त्यांना पटवर्धनांकडील व इंग्रजांकडील पोलिटिकल पेनशनें चालूं आहेत. या सरदार मंडळींनीं आपलेकडे " संशोधनास या " म्हणून मला निमंत्रित केलें होतें. परंतु या च वेळीं प्लेगराजानीं उग्रस्वरूप धारण केलेमुळें संशोधनास जातां आलें नाहीं. तथापि भोंसले कुलांतील एका सद्गृहस्थानीं उदार मनानें आपले येथील कागदपत्र माझे घरीं पावते केले त्यांत परशुरामभाऊंच्या कर्नाटकांतील मोहिमेसंबंधीं कांहीं पत्रें आहेत. तीं यथावकाश मंडळापुढें येतील च.

## ( ३ ) देवराष्ट्रे

भिलवडीचे इनामदार व माझे मित्र रा. रा. सदाशिव वासुदेवराव गुणे यांनीं संशोधनास मुद्दाम बोलावल्यावरून मी देवराष्ट्र्यास गेलों. वाटेंत सागरेश्वराचें रम्य स्थान लागलें. तेथें सागरेश्वरमंदिरापुढें दोन शिलालेख आहेत. लेखाची लिपी जुनी बालबोध आहे. लेख फार च जुनाट असून उन्ह–वारा इत्यादींच्या प्रभावानें धुपून गेले आहेत; यामुळें बरोबर लागत नाहींत. देवळांत " सागरेश्वर माहात्म्य " नामक संस्कृत पोथी आहे. ती नकलून घेण्यास पुजाऱ्यांनीं सांगितलें. परंतु वेळेच्या अभावामुळें तें शक्य च नव्हतें. येथील पुजाऱ्यानें कांहीं ऐतिहासिक दंतकथा सांगितल्या. त्यांची नोंद माझ्या स्मरणवहींत आहे. या देवस्थानास शाहू महाराजांनीं सनदा करून देऊन जमिनी बहाल केल्या आहेत. त्यांपैकीं एका सनदेंत, शाहू महाराज कांहीं राजकारणा-मुळें चिंताक्रांत असतां स्वप्नांत एक साधु आला आणि त्यानें महाराजांस सागरेश्वर-दर्शन घेण्यास सांगितलें. तेव्हां महाराज दर्शनास आले, आणि त्यायोगें त्यांच्या

संकटाचा परिहार झाला, असा उल्लेख आहे. ती सनद त्या स्थानापासून जवळ च असणाऱ्या शिरगांव गांवच्या इनामदाराकडे आहे असें समजतें. या देवस्थानापासून जवळ च देवराष्टें आहे. हें गांव फार च पुरातन आहे. राष्ट्रकूटांच्या एका ताम्रपटांत या गांवाचा नामनिर्देश असल्याचें समजतें. येथें रा. गुण्यांच्या घरीं संशोधन केलें. ह्या गुण्यांचे मूळपुरुष बाळाजी जनार्दन गुणे. हे शाहू महाराजांचे वेळीं नारोराम मंत्री यांचे मुतालीक होते. यांचे घराण्यांत हा हुद्दा वंशपरंपरा मराठेशाहीच्या अखेरपर्यंत चालत होता. या शिवाय यांच्यांतील एक पुरुष रामाजी बल्लाळ हा नागपूरकर भोसल्याकडे वकील होता. लक्ष्मण बल्लाळ पेशव्यांकडे होता. हरि बल्लाळ व कृष्णराव बल्लाळ हे शिवाजीराव थोरात वाळवेकर यांजकडे होते. त्यांचें पथक घेऊन ते पानिपतच्या समरांगणावर हि गेले होते. पैकीं हरि बल्लाळ धारातीर्थी पतन पावला वगैरे यांची हकीकत मीं मंडळांत दिलेल्या यांच्या कैफियतीमध्यें आहे. या घराण्याच्या एका शाखेकडील संशोधन मीं केलें आहे. परंतु यांच्या इतर घराण्यांतून संशोधन झालें पाहिजे. यांचीं दोन घरें भिलवडीस, दोन तीन कालें येथें, दोन तीन निजामशाहींत व एक धार येथें आहे. मीं तपासलेल्या शाखेंत त्या घराण्याची कैफीयत, त्यांच्या सनदा, पेशव्यांकडील पत्रें, माळव्याच्या थोरातासंबंधीं कागदपत्रें, छत्रपति प्रतापसिंह यांच्या जहागिरीची यादी, दिल्लीश्वर शहा अलम बादशहाचे फर्मान, वजीर नासिर जंग, निजाम-उल्मुल्क यांच्या फारसी सनदा, पोथ्या, पत्रें, औषधी वाडें, काव्यें वगैरे पुष्कळ च महत्त्वाची सामुग्री मिळाली. येथें गुळदणी उपनामक गृहस्थांचे घरीं कागदपत्रांचा बरा च मोठा संग्रह आहे; तसें च तेथील इनामदार श्रीमंत कानेटकर यांजकडे हि बरे च कागदपत्र असावेत. येथें आणखी पुष्कळ च शोध केला पाहिजे.

## (४) भिलवडी

भिलवडी हें तासगांवकर परशुरामभाऊंचें लष्करी ठाणें. येथें परशुरामभाऊंचा वाडा व यांनीं बांधलेला कृष्णेकांठचा सुंदर घाट हीं त्यांचीं स्मारकें आज हि विद्यमान आहेत. हा घाट परशुरामभाऊंनीं कुठलासा घुमट पाडून आणून त्या साहित्यानें बांधला असें म्हणतात. असा सुंदर घाट काशीशिवाय हिंदुस्थानांत अन्यत्र कोठें नाहीं, असें लोकांच्या बोलण्यांत येतें. या गांवचें भिलवडी, हें नांव 'भिल्लवाडी' अथवा संस्कृत 'भिल्लवाटिका' या शब्दापासून निघालें असावें, असें अनुमान आहे. जुन्या कागदांतून 'भीलवाडी' असें म्हटलेलें आढळतें. पूर्वी येथें भिल्लांची वस्ती असावी. हल्लीं कांहीं येथें आहेत. या गांवीं ऐतिहासिक पत्रसंग्रह पुष्कळ आहे. येथें दोन च ठिकाणीं मीं संशोधन केलें. पहिलें संशोधित ठिकाण म्हणजे मदनशहा पिराचा दर्गा. ह्या पिराला आदिलशाही पासून जहागीर चालत आलेली आहे. ह्या संस्थानच्या गादीवर आजवर कित्येक शिष्य बसलेले आहेत. ते राजवैभवानें राहात आले आहेत. ते धार्मिक आचरणांत राहून राजकारणांत हि पडत असत. शिवाजीचे गुरु जसे रामदास तसे

२८

विजापुरकरांचे गुरु हे मदनशहा होते. प्रसंगविशेषीं विजापूरचे बादशाहा मदनशहांची सल्लामसलत घेत असत. यामुळें त्यांचा तत्कालीन पत्रव्यवहार महत्त्वाचा आहे. तो सर्व फारशींत आहे. संस्थानसंबंधीं सनदा, निवाडपत्रें, महजर वगैरे कागद बरे च आहेत. ह्या कागदपत्रांचें सर्व भांडार विद्यमान मठपति मे० लालशाबुवा यांनीं उदार अंतःकरणानें माझे स्वाधीन केला आहे. पैकीं शिवकालीन मोडी सनदांच्या नकला व संस्थानसंबंधीं सर्व माहिती ज्यांत एकत्र संगतवार आलेली आहे अशा एका निवाडपत्राची नक्कल मीं मंडळांत सादर केलेली आहे. अली अदिलशहाच्या चार फारशी सनदा ज्या मीं मंडळापुढें पाक्षिक सभेंत मांडल्या होत्या, त्या येथील च. अशा फारशी सनदांचें भाषांतर करून पाठविण्याचे कामीं माझे मित्र श्रीयुत दिवाकर भालचंद्र कामत बी. ए., बी. टी., इन्स्पेक्टर ऑफ् स्कूल्स, परभणी ( निजामस्टेट ) यांचें फार साह्य झालें आहे आणि होत आहे. त्यांचें साह्य न होतें तर फारसी कागदांचा समाचार मला घेतां आला नसता. आपल्या मंडळाला कोणी उत्साही, उद्योगी व इतिहासप्रेमी फारसी भाषाभिज्ञ लाभल्याखेरीज येथील कागदपत्रांचा समाचार घेतां येणें शक्य नाहीं. मुसलमान लोकांनीं इकडे आपली राजकीय सत्ता प्रस्थापित करून आपली स्थायी वस्ती केल्या नंतर ठिकठिकाणीं मशिदी, दर्गे, निमजगे, घुमट, तकिये वगैरे निर्माण केले आणि त्यांच्या व्यवस्थेकरितां इनामें करून देऊन लहान मोठीं संस्थानें निर्माण केलीं. अशा सर्व संस्थानांचे कागदपत्र आपणास पाहिले पाहिजेत. तसें च पूर्वी मुसलमानी राजकर्त्यां बरोबर मुसलमानी लढवय्ये पुरुषांनीं येऊन जशी इकडे वस्ती केली तशी च काजी, मुलाणी, मुजावर, फकीर, मलंग, मौलवी इत्यादि अन्य वृत्तिवंत लोकांनीं हि केली. अशा लोकांस बादशहांनीं निरनिराळ्या कारणांनीं इनामें वगैरे दिलेलीं आहेत. यामुळें व शिवाय हे लोक आपलें काम संभाळून राजकीय मानगडींत, लोकांच्या खटल्यांत वगैरे मन घालीत यामुळें यांचे वंशजाकडे तत्कालीन कागदपत्रें पुष्कळ च असतात. याकरितां अशा घराण्यांच्या कागदपत्रांचें संशोधन केलें पाहिजे. मुसलमानी कागदपत्रांचें संशोधन अगदीं च थोडें झालें आहे. या इतिहाससाधनांचा शोध करून प्रकाशन झालें तर बरें, नाहींतर आपल्या संशोधनकार्यांत तें एक मोठें च व्यंग राहिलें, आपलें संशोधन एकतर्फी च झालें, असें म्हणावें लागेल.

या गांवांतील दुसरें संशोधन कार्यम्हणजे संभुराज कवीच्या काव्याचें केलेलें संशोधन होय. या संभुराज कवीवर एक निबंध लिहून तो मीं मंडळांत सादर केला आहे. ह्या कवीच्या १०१ वह्या आज रोजीं आम्ही ( मीं आणि माझ्या मित्रांनीं ) सुरक्षित ठेविल्या आहेत. हा कवि बुद्धिमान व मोठा चतुर होता. याचीं चित्रकाव्यें तर अत्यंत बहारीचीं आहेत. यानें पोवाडे, साक्या, लावण्या, दिंड्या, कटाव वगैरे विविध प्रकारची व विविध रसात्मक कविता केली आहे. हा कवि तुरेवाला शाहीर होता.

कलगीवाले आणि तुरेवाले शाहीर कोणास म्हणावें, त्यांचें ध्येय काय, गुरु कोण वगैरे माहिती उभय पक्षांच्या काव्यांच्या आधारें निबंध लिहून मीं मंडळांत दिली आहे. ह्या शाहीर वर्गांची कविता महाराष्ट्रांत खेडोखेडीं फार च आहे. त्यावरून अशिक्षितांचे अथवा अल्प शिक्षितांचे विचार, ज्ञान, रीतीरिवाज भोळ्या समजुती वगैरेंचें आपणांस ज्ञान होतें. शिवाय यांतील कोट्या मोठ्या खुबीच्या असतात. ते लोक सणावारांचे दिवशीं देवळांत, चावडींत अगर चवाठ्यावर बसून ह्या कविता मोठ्या भक्तीनें व एकतानतेनें गात असतात. या गाण्यांस "मेदिक लावण्या" म्हणतात. यांचा संग्रह करण्याचें कोणा संशोधकानें पत्करल्यास केवढा तरी प्रचंड साधनसामुग्री जमणार आहे. आम्ही या कलगी–तुरेवाल्यांची बरी च कविता संग्रहित केली आहे.

## ( ५ ) अंकलखोप

हें गांव भिलवडीपासून एक मैलावर कृष्णेच्या पैलतीरीं आहे. ह्या गांवाच्या पश्चिमेस एक मैलावर एकांत व रम्य स्थानीं नाथपंथांतील गैबीनाथ यांची समाधि आहे. त्यास पूर्वापार चालत आलेलीं इनामें आहेत. त्यांच्या सनदा विद्यमान वहिवाटदारापासून मीं मिळविल्या आहेत. तसें च या गांवीं म्हसोबाचें एक पुरातन देवस्थान आहे. त्यास विजापूरच्या बादशहानें दिलेलीं इनामें आहेत. त्यांच्या फारसी सनदा मजकडे मालकांकडून आलेल्या आहेत. येथील देशपांडे घराणीं व सूर्यवंशी नामक मराठ्यांचें घराणें यांचे कडे जुन्या कागदपत्रांचा बरा च संग्रह आहे.

## ( ६ ) डिग्रज

डिग्रज हें ऐतिहासिक गांव आहे. छत्रपति शाहू महाराजांचे वेळीं येथें उधोजी चव्हाण नामक पुंड सरदार होता. तो आपणांस कधीं कोल्हापूरकर छत्रपतींचा आश्रित म्हणवी तर कधीं सातारकर छत्रपतींचा आश्रित म्हणवी. पण वास्तविक स्वतंत्रपणें स्वेच्छेनें वर्तन करी. या चव्हाणांचा थोडा पत्रव्यवहार मिळाला आहे. वंशावळ मिळाली आहे आणि एक भलें मोठें निवाडपत्र हि मिळालें आहे. येथील चव्हाण घराण्यांत शोध केल्यास येथें पुष्कळ च महत्त्वाची सामुग्री मिळण्यासारखी आहे.

## ( ७ ) अष्टे

या गांवास 'सव्वालाखी अष्टे' म्हणतात. तसें नांव त्यास कां पडलें तें अद्याप समजलें नाहीं. येथें दरसाल "भावई" या नांवाचा खेळ होतो. त्याचे मुखवटे आहेत. त्या मुखवट्यांच्या पेटींत तीन ताम्रपट आहेत. ते शाक्त लोकांसंबंधी असावेत. कारण हा खेळ शक्तीचे उपासक शाक्त लोक यांचा आहे. हे मुखवटे वाळवेकर थोरातांना कर्नाटकाच्या लुटींत मिळाले होते. इतर मालांच्या लुटीबरोबर ही पेटी थोरातांच्याकडे आली. हा खेळ करण्याचा दिवस पुढें एक महिना आहे तों हे मुखवटे घुमूं लागले. पेटींत घुमतें काय तें पाहावें म्हणून थोरातांनीं पेटी उघडली तों एक मुखवटा उडून गेला व एक राहिला. पुढें थोरातांनीं ते ताम्रपट वाचून पाहिले त्यावरून त्यांना

या खेळाची माहिती समजली. तेव्हां त्यांनीं शिल्लक असलेल्या, मुखवट्याच्या जोडीस दुसरा मुखवटा बनवून हा खेळ प्रचारांत आणला; वगैरे कथा लोक सांगतात. हा खेळ मोठा चमत्कारिक आहे. यांत पिसें, अरगडी, मुखवटे, वेले वगैरे पात्रें असतात. यांत जोगण्या व चिटक्या– मिटक्या म्हणून उपक्रीडा अथवा दुसरे खेळ आहेत. त्यांत बारा बलुत्यांना भाग घ्यावा लागतो. या खेळासंबंधीं स्वतंत्र निबंध लिहावयाचा असल्यामुळें येथें येवढी च माहिती पुरे. ह्या मुखवट्यांच्या पेटींतील ताम्रपट मिळविण्यास मी गेलो होतों. परंतु ते मुखवटे खेळ झाला म्हणजे जे भुयारांत टाकण्यांत येतात ते पुढील वर्षीं काढण्यांत येतात. मध्यंतरीं ते काढल्यास देवतेचा कोप होईल, अशी पुजारी मंडळींची भावना असल्यामुळें नाइलाज झाला.

## (८) सुखवाडी

येथें भारती पंथाचे लोक राहतात. त्यांचा तेथें मठ आहे. मठांत भारती पंथासंबंधीं हस्तलिखित जुन्या ग्रंथांचा संग्रह आहे. ह्या पंथाची राहणी कांहींशी मानभावी पंथासारखी आहे. ह्या पंथासंबंधीं माहिती मी लौकर च निबंधरूपानें मंडळापुढें ठेवणार आहें.

## (९) तावदरवाडी

येथें मानभावी लोकांची वस्ती आहे. त्यांचा तेथें एक मठ हि आहे. मठांत त्यांच्या पंथासंबंधीं सांकेतिक लिपींत व नागरी लिपींत लिहिलेले ग्रंथ आहेत. आपल्या मंडळाच्या ग्रंथांवरून मीं त्यांना त्यांच्या पंथासंबंधीं माहिती दिली. तेव्हां त्यांना आपलें गुप्तज्ञान लोकांना कसें कळलें, याचें मोठें आश्चर्य वाटलें. येथें सांकेतिक लिपींत लिहिलेला एक छोटासा मानभावी ग्रंथ मिळाला. मठांत बसून तेथल्यातेथें त्यांच्या ग्रंथांच्या कोणीं नकला घेतल्यास त्यांस ते आपला सर्व संग्रह दाखविण्यास तयार आहेत.

## (१०) नांद्रे

या गांवीं जैन लोकांची वस्ती फार आहे. येथील एका नेमगौडा पाटलांच्या कडून जैन धर्मी मराठी ओंवीबद्ध ग्रंथ मिळाला. रचना अलीकडची आहे; परंतु काव्य रसाळ व मनोरंजक आहे, भाषा सुंदर. याशिवाय येथें ख्वाजा कबीर करमअली बावा या पिराच्या दर्ग्याच्या वहिवाटदाराकडून त्यांच्या इनामा संबंधीं फारसी सनदा मिळाल्या आहेत.

## (११) मिरज

गुरुवर्य राजवाडे यांनीं अतार लोकांविषयीं कांहीं माहिती काढण्यास मला लिहिलें होतें. त्यावरून ती माहिती काढण्यास मी मिरजेस गेलों होतों. तेथील अतार लोकांकडील व एका मुजावराकडील कागद तपासले, त्यांत जी माहिती पाहिजे होती ती कांहीं मिळाली नाहीं. परंतु इतर माहितीचे कागद मात्र बरे च मिळाले. त्यांत उल्लेख करण्यासारखे कागद म्हणजे मिरा साहेबांच्या दर्ग्या संबंधीं आदिलशाही सनदा, त्यांचा बखरवजा इतिहास ज्यांत आहे असें एक भेंडोळें व चिंतामण पांडुरंग पटवर्धन यांचीं पत्रें, हे होत.

आठ दहा गांवीं सहजासहजीं केलेल्या संशोधनाची ही हकीकत आहे. तर मग मुद्दाम, अत्यंत कळकळीनें व त्या कार्यास वाहून घेऊन काम केलें तर केवढें तरी मोठें कार्य होणार आहे. चालू वर्षी मला माझ्या कांहीं इनामदार मित्रांनीं संशोधना-करितां आपले घरीं निमंत्रित केलें होतें, परंतु प्रकृतीचें अस्वास्थ्य आणि वेळेचा अभाव यामुळें मला संशोधनास जातां आलें नाहीं. यामुळें कित्येक स्नेही मजवर रुष्ट झाले आहेत. स्वानुभवावरून मला आतां स्पष्टपणें कळून आलें कीं, महाराष्ट्रांत संशोधनाला पुष्कळ व जागा आहे. जें संशोधन झालें आहे तें, जें संशोधन अद्याप व्हावयाचें आहे त्याच्या मानानें कांहीं च नाहीं. संशोधन करणाऱ्याकरितां अफाट कार्यक्षेत्र पडलेलें आहे. संशोधकांची च वाण आहे. कामकरी जर मिळतील तर प्रांतो-प्रांतीं इतिहासमंडळें काढून तीं चालविणें कांहीं अशक्य काम नाहीं. आपल्या मंडळास असे इतिहासप्रेमी संशोधक अनेक लाभोत आणि प्रांतोप्रांतीं मंडळाच्या शाखा काढ-ण्याचा योग येऊन देशांत इतिहासचर्चा वाढो; अशी मनकामना प्रकट करून हें छोटेसें संशोधनवृत्त पुरें करितों.

शि. ला. आतार.

# वरदनागेश.

शोलापूर जिल्ह्यांतील वडवाळ गांवच्या, वडवाळसिद्धनागनाथ नांवाच्या एका संत-कवीनें 'वरदनागेश' नांवाचा एक ग्रंथ केला आहे, अशी समजूत आजच्या घटकेपर्यंत आहे; तसें च मराठी काव्याच्या प्रदेशांत, 'अज्ञानसिद्धनागेश' या नांवानें चमकणारे कवि म्हणजे दुसरे कोणी नसून, 'वडवाळसिद्धनागनाथ' च होत असें हि मत या क्षणापर्यंत आहे; पण या दोन्ही समजुती साफ चुकीच्या आहेत—आतां होत्या——असें आज ठरत आहे; आणि तें ठरविणारें साधन म्हणजे आजच्या या टिपणाचा विषयीभूत ग्रंथ जो **वरदनागेश** तें होय. वरदनागेश हा ग्रंथ, वरदनागेश या च कवीनें केला असें म्हणत असत; आणि तो तंजावरच्या श्रीसरस्वती महालांत आहे, असें रा. देवांनीं दिलेल्या तेथील ग्रंथांच्या यादीवरून दिसून येतें ( अहवाल १८३५, पृ. ५ पहा) पण तो आपल्या इकडे आज पर्यंत उपलब्ध झाला नव्हता. तो गेल्या वर्षी, मला वांई येथील रा. रा. नारायण दत्तात्रेय थिटे यांचे येथें मिळाला; तो च सध्यां आपल्या पुढें ठेविला आहे.

ग्रंथ पोथीवजा सुटा नसून एक बाड आहे. नमूद करण्यास फार वाईट वाटतें कीं, याच्या १ ल्या अध्यायाचीं १४॥ ओंव्या लिहिलेली पत्रें नाहींशीं झालीं आहेत; त्या मुळें आपण याच्या आरंभींच्या भागास मुकलों आहोंत. त्यांत कवीची किती माहिती गेली असेल देव जाणे! त्या पुढील ग्रंथ मात्र सबंध आहे. याचे अध्याय ११ असून संख्या १८३८ किंवा ठोकळ १८५० आहे. खालीं प्रत्येक अध्यायाचें नांव व संख्या देतों:—

| अध्याय | नांव | ओंवी संख्या |
|---|---|---|
| १ | स्वरूपसाक्षात्कार | २४४ |
| २ | स्वरूपदृढकरण | १४१ |
| ३ | पंचीकृतउत्पत्ति | १८५ |
| ४ | त्वंपदतत्पदमिश्रित पिंडब्रम्हांडऐक्यता | ५३३ |
| ५ | स्थूळदेहउपाधीनिरसन | २१७ |
| ६ | लिंगदेहउपाधीभेदनिरसन | ७२ |
| ७ | कारणदेहउपाधीभेदनिरसन | ६१ |
| ८ | महाकारणदेहउपाधीनिरसन | ७५ |
| ९ | तत्पदार्थदेहत्रयउपाधीनिरसन | ९८ |
| १० | तत्पदभेदनिरसन | ६६ |
| ११ | महावाक्यविवरणजिवशिवभेदऐक्यता | १४६ |
| | | १८३८ |

श्रीमत् दासबोधाप्रमाणें हा ग्रंथ गुरुशिष्य-संवादरूपाचा आहे, असें प्रत्येक अध्यायाच्या शेवटच्या ओवीवरून दिसून येतें. "इतिश्री गुरुसिष्यसंवादे..." असा हा शेवट आहे. सर्व ग्रंथ वेदांत-अध्यात्म-पर आहे; अध्यात्मज्ञान सोप्या भाषेंत सांगितलें आहे. मात्र या अध्यात्मज्ञानाच्या व्याख्यानांत कवि स्वतः नाथपंथी असल्यानें योगाचें वर्णन ज्या ज्या ठिकाणीं येतें तेथें तेथें त्यानें त्याचें विस्तृत प्रमाणावर विवेचन केलें आहे (अध्याय ५ वा पहा). ही पोथी अस्सल नाहीं. कारण, कवीच्या काळांतील शब्दांचीं व प्रयोगांचीं रूपें यांत नसून ग्रंथाच्या भाषेला अर्वाचीन पोषाक चढविलेला स्पष्ट दिसत आहे, मात्र तो सुद्धां १५ व्या शतकाच्या आरंभीचा आहे, असें उकारान्त रूपें व लेखकाची अक्षरश्रेणी (अ, च, ठ, ण, र, ल, ह, ) या वरून उघड होत आहे. ग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग केलेले असून पहिले चार अध्याय पूर्वार्धांत व पुढील सर्व अध्याय उत्तरार्धांत येतात. ग्रंथांत मधून मधून लाल शाईचें लिखाण आहे. याची ओवी श्रीज्ञानेश्वरांच्या ३॥ चरणी व श्रीनाथांच्या ४॥ चरणी मधील आहे. असो.

**ग्रंथाचें नांव**— "वरद नागेश ग्रंथ" असें आहे. प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं तें " वरदनागेश ग्रंथ " असें च दिलें आहे; मधून मधून हि या च नांवाचा उल्लेख आला आहे.

**कवीचें खरें नांव-अज्ञान.**

**कवीच्या गुरूचें खरें नांव-सिद्ध नागेश** किंवा **नागनाथ** ऊर्फ नागेशु. उदाहरणार्थ-मी तंव ठाईंचे **अज्ञान** । **नागनाथ** सर्वज्ञ. सबंध ग्रंथांत कवीचीं व त्याच्या गुरूचीं नांवें खालील प्रमाणें आढळतात:-

ऐसें श्रीगुरु **नागनाथें** । प्रबोधुनी **अज्ञान** सिष्यातें । ३/१८५

ऐसें सांगोनी सद्गुरु **नागेशु** । फेडिला **अज्ञान** सिष्याचा भ्रांति सोसु । ४/५८३

तूं उदारु **नागनाथा** । फेडी **अज्ञानाची** वेथा । ५/१९१

**सद्गुरु नागनाथें । उपदेसिलें अज्ञान सिष्यातें** । ५/२१७

**अज्ञानाचे** भ्रांतीचा निरासु । करिता सद्गुरु **नागेशु** । ६/७१

**नागनाथें...** । निरसुनी **अज्ञान**मतितें । १०/१२

आतां या च बाडांत हा ग्रंथ संपल्यानंतर अज्ञानांचे च कांहीं अभंग व इतर कविता लिहिलेली आहे, तींत त्यांनीं आपल्या गुरूनां खालील नांवानें आळविलें आहे.

सिवयोगी, नागेश्वर, सिधलिंग, सिव नागलिंग, सिधराजा,

सिध नागेश्वर, सिध नागनाथ इ. इ.

**ग्रंथांत** साधारणपणें— सद्गुरु, शिष्य, साधू, आत्मानुभव, जीव, ब्रम्ह, माया, तीन अहंकार, तीन शक्ति, पंचदशतत्वें, त्रिपुटी यांचीं लक्षणें; सहज स्थिती, सद्गुरुमहती, सुषुप्ती-मुक्ताभेद, भूमिकाचतुष्टय, मानसपूजा, पंचीकरण, पिंडब्रह्मांडऐक्य, तत्वमसि, अजपाजप, विषयपंचक, संप्रज्ञात समाधि यांचें विवरण— हे विषय आले आहेत.

**कविकाव्याचा मासलाः**— अज्ञानाच्या कृतीचा थोडासा मासला पाहूं–

**सद्गुरुवर्णनः**— जय जय सद्गुरु जयेवंता । विजये विजये विजयवंता । सहज सहज सहज आत्मता । निज निवता नित्यरूपा ॥१॥ शांत शांत परम शांता । त्राहे त्राहे अनाथ त्राता । पाहे पाह्नी पुण्यवंता । सद्गुरुनाथा करुणानिधी ॥ २ ॥ उदयो उदयो पूर्ण उदिना । अभय अभयहस्तकु दाता । निर्भय निर्भय पदार्थी । प्रासी कारिसी॥३॥ अक्षय अक्षय अक्षइता । अभंग अभंग अभंगता । नामी नामी नामिकरु देना । उधारिता जडजीवां ॥ ४ ॥ स्थिर स्थिरत्व स्थिरता । अगम्य अगम्य अगम्यता । गुह्य गुह्या गुह्यात्मता । निरासिसी चिंता अज्ञानाची ॥ ५ ॥ अज्ञान अविद्येचा पासाळा । ज्ञान अहंतेचा उसाळा । देउनी स्तंभन कारिसी निश्चळा । विज्ञानस्वरूपीं ॥ ६ ॥ म्हणउनी कुळसीळ कुळदैवत । येक सद्गुरु ऐसे जे मानित । तया गुरुरूपा प्राप्त । जाहाली म्हणणें ॥ ७ ॥

**ब्रह्मवर्णनः**— पवना पुढें मार्गें मध्यगत । असोनी अचंचळ चंचळातीत । तें परब्रम्ह नित्य । सर्वगत समत्वें ॥ २१ ॥ जे गगनाचां पाठीं पोटीं । सुन्येत्वाची करुनी आटाटी । स्वानंदभारित शृष्टी । निजस्वरूप ॥ २२ ॥ जे सर्वत्र विवर्तनां । सर्वांगा आतळोनी नातळता । अंगा अंगत्वें निसंगता । निजात्मता निजांगें ॥ २३ ॥ आनंत अगणित अपार अमित्य । अकाळ अविनास अगम्य अलिप्त । अजत्व अचोज असंगत्व । आनभये अविकारी ॥ २६ ॥ ते सद्गुरु रूपा पाविजे । जाणिवेविणे जाणिजे । जाणिवेनेणिवेते जाणिजे । तें परब्रम्ह ॥ २९ ॥

**मायोद्भवः**— जैसें गगनाचां पोटीं । अभ्र असंख्यात उठी । क्षणां पाहतां दृष्टी । कांहीं चि नाहीं ॥ ४८ ॥ गगन तें निराकार । तेथें अभ्र दिसे साकार । इछे विण अपार । उठिले पाहे पा ॥४९॥ ब्रम्ह निराकार तैसें । माया तेथें अभ्र भासे । इछे विण परियेसे । उद्भवती जहाली ॥५० ॥

**पंचभूतोपत्तिः**— गगन तरी निर्व्यापारी । वायो उद्भवला तया भीतरीं । तो सर्व व्यापार करी । त्रिभुवनीं ॥ ८ ॥ अथवा त्या वायो पासाव । जे उद्भवले दहनत्व । तयाचें वेगळें कर्तुत्व । दहनादीक ॥९॥ त्या पासोनी जीवन । त्याचे हि वेगळे चि गुण । करी व्यापार लक्षण । रसगुणेसी ॥ १० ॥ त्या पासोनी धरणी । ते हि वेगळी व्यापारगुणी । धरणादिकें करूनी । असे देखां ॥ ११ ॥ हे येक येकां सारिसें नाहीं । याचा शुभाशुभ व्यापार पाही । तो हि नळगे कांहीं । गगनासी ॥१२॥

**मायास्वरूपः**— येक उभा गंगातिरीं । तो दिसे उदका भीतरीं । परि हा आपुला शरीरीं । अलिप्त असे ॥ २९ ॥ ते आहे म्हणों तरी ध्रतां नये । नाहीं म्हणों तरी दिसताहे । असे मायामये असे ना नसे ॥ ३० ॥ कां पाहतां मुख दर्पणीं । दुसरे दिसतें नयेनीं । तें अरुप रुप ज्ञानी । पाहा कैसें ॥३१॥ तें असे म्हणो तरी नसे । नसे म्हणो तरी असे । तैसें अरुप रूप पांसें । जाण मायेचें ॥ ३२ ॥

इतके उतारे बस्स झाले. यावरून अज्ञाननाथांच्या काव्याचें स्वरूप, मगदूर व योग्यता आपल्या लक्ष्यांत येईल च. ग्रंथाचा शेवट खालीलप्रमाणें करण्यांतआला आहे.

ऐसें **नागेशाचें** वचन। फेडी **अज्ञान सिष्याचें** भ्रांतिज्ञान। करी स्थिति विज्ञान। आसंडीत ॥ ११४६ ॥ इति श्रीमद्गुरुसिष्य संवादे । **वरदनागेश ग्रंथ** महावाक्य-विवरण-जीवसिव-भेदऐक्यतानाम सप्तमोध्याय * ॥ ७ ॥ उत्तरार्ध संपुर्णमस्तु ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ ग्रंथ लिखिते गोविंद वेंकटाद्रि कसबे मीळवडीकर कोष्णा' तीर मिरज विळायेत ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

**कवीचा काल व साधारण माहिती:–** सदर ग्रंथांत कवीनें आपल्या बद्दल– फक्त स्वतःच्या व गुरूच्या नांवांशिवाय– कांहीं च माहिती दिलेली नाहीं. पण शके १८३५ च्या इतिवृत्तांत रा. शंकरराव देवांचें वडवाळ सिद्धनागनाथ नांवाचें एक टिपण प्रसिद्ध झालें आहे; त्यांत या नागनाथांच्या संकटहरण शिवग्रंथाचा काल "शके १३१३" असा आला आहे (पृ. ४०). त्या ग्रंथांतील "करी अज्ञाना ज्ञान-सिद्धी" या चरणावरून सदरचा ग्रंथ वडवाळ नागनाथांचा नसून त्यांच्या अज्ञान शिष्याचा आहे हें स्पष्ट दिसतें–(अज्ञान व सिद्ध नागनाथ ही एक च व्यक्ति, या प्रचलित समजावरून रा. देवांनीं ग्रंथाचें कर्तृत्व वडवाळ सिद्ध नागनाथाकडे दिलें आहे). यावरून अज्ञानाचा काल शक १३१३ होय हें उघड होतें. नागनाथांची कथा भक्त-विजयांत आलेली स्मरते. असो; यांच्या नांवावर (१) वरदनागेश, याशिवाय (२) कालज्ञान–५००,–(३) गुरुशिष्यसंवाद–५१७,–(४) अविंध भार्येतील पंचीकरण-प्रमेय आणि (५) संकटहरणी शिवग्रंथ–१४१–असे ५ ग्रंथ आढळतात. शिवाय अभंग, पदें वगैरे स्फुट कविता हि बरी च आहे. माझ्याजवळील ग्रंथाच्या प्रतीची भाषा १३१३ च्या सुमाराची नसून १५०० च्या सुमाराची आहे म्हणजे ही प्रत मिलवडीकर गोविंद वेंकटाद्रि यानें १५०० च्या सुमारास लिहिलेली आहे असें वाटतें व तें इच्यांतील अक्षरश्रेणी व शब्दांचीं रूपें यावरून दिसतें हि.

**सामान्य विवेचनः—** हा ग्रंथ श्रीसमर्थांच्या पहाण्यांत आला होता असें दिसतें. कारण याची छाया श्रीमत् दासबोधाच्या कांहीं समासाच्या कांहीं ओव्यांवर पडलेली असावी असें वरद नागेशाच्या ( $\frac{१}{१७, २३, ४८, ४९, ८०, १२८–३०}$, $\frac{८}{४९, ६० \text{ ते } ७०}$, $\frac{११}{९७}$, $\frac{१}{११४, १२१, १२२}$ $\frac{१}{१८४, १९१ \text{ ते } ९५}$, $\frac{२}{३५, ३६, ६५}$ ) या ओव्यांवरून दिसून येतें. या बाडांत मधून मधून कांहीं चित्रें काढलीं आहेत. पैकीं २ मारुतिरायांचीं व कांहीं शंख, चक्र वगैरेचीं आहेत; मात्र बायका ठिपक्या ठिपक्यांच्या रांगोळींत जसा

* सप्तम म्हणजे उत्तरार्धातील सातवा, पूर्वार्धातील चार धरून हा अकरावा.

१ भक्तविजय अध्याय ४४ पहावा.

नाग काढतात तसल्या प्रकारच्या नागांचीं चित्रें बरीं च आहेत. इतकीं नागांचीं च चित्रें यांत येण्याचें कारण कर्वीचे गुरु नागनाथ आहेत हें कदाचित् असूं शकेल. या च बाडांत अज्ञाननाथांचे बरे च अभंग आहेत व ते बहुतेक योगावर व अध्यात्मपर आहेत.

**वडवाळ नागनाथ व सिद्धनागनाथः—** या दोन व्यक्ति भिन्न नसून एक च होत. आज पर्यंतची समजूत वडवाळसिद्ध नागनाथ व अज्ञानसिद्धनागनाथ एक च अशी आहे. पण यांत एक चूक—व ती हि फार मोठी चूक—आहे, अज्ञान सिद्धनागनाथ ही एक च व्यक्ति नसून तें नांव दोघांचें म्हणजे ( सिद्धनागनाथ ) गुरूचें व ( अज्ञाननाथ या ) शिष्याचें आहे. सूचींत अज्ञान सिद्ध नागेश, वडवाळसिद्ध नागेश आणि वरदनागेश अशीं तीन भिन्न भिन्न नांवें प्रसिद्ध झालीं आहेत. तीं हि वरील भ्रामक समजुतीच्या आधारावर च होत. आतां सिद्ध नागनाथ हे च वडवाळ नागनाथ होत अशाबद्दल पुरावा या ग्रंथांत आला आहे तो असाः—

जाणे हें ब्रम्हांड । नागेशु आखंड । **वडवाळ** वितंड । हे
विश्वरूप ॥ ११ ॥ साठवी **नागेशु । वडवानळ** भासु ।
जठरीं तो हुतासु । धरियेळा जेणें ॥ १२ ॥ अकलु ते
सकळ । विश्वरूप **वडवाळ । सिधलिंग** निर्मळ । **गुरु**
**नागनाथु** ॥ १३ ॥

यावरून **अज्ञाननाथाचे गुरु वडवाळ सिधलिंग नागनाथ** हे होत हें अगदीं स्पष्ट झालें. असो. अज्ञाननाथ आपल्या योगास "सिवयोग" म्हणून "सिवतत्वें उजळलों" असें सांगतात. गु. राजवाडे यांचें म्हणणें "असमसाहस" शब्द ज्ञानेश्वरी नंतरच्या काव्यांत फारसा येत नाहीं. या ग्रंथांत एका अभंगांत ( ३११-१२ ) हा शब्द आला आहे.

**सारांशः—**

( १ ) वडवाळ नागनाथ आणि सिद्धनागनाथ ऊर्फ सिद्धलिंगनागेश या व्यक्ति भिन्न नसून एक च होय.

( २ ) अज्ञान ऊर्फ अज्ञाननाथ हें नांव वरील नागनाथांच्या एका शिष्याचें असून त्यानें

( ३ ) वरदनागेश व आणखी कांहीं काव्य निर्माण केलें आणि

( ४ ) त्याचा काल शक १३११ चा आहे,

इतका च निष्कर्ष या लेखाचा आहे.

पां. मा. चांदोरकर

# सूची ( षष्ठ संमेलन )

अ

अकलेचा –संदूक, गाभा, कांदा ७४

अठरा विश्वे दारिद्र्य ७७

अति शहाण्याचा बैल रिकामा ७७

अन्नपचनाचा श्लोक ५३

अनुपगीर गोसावी– मराठ्यांचा पक्षपाती ४, ५;–पाटिल बावाकडे मदत मागतो ६,– यास मदतीबद्दल पातशहाचें निमंत्रण १८

अनंतदेव व अनंतदेन ३८

अफरासियाबखान ( नजबखानाचा मुलगा व मराठ्यांचा पक्षपाती ) ४,८– यास वजिरीचीं वस्त्रें ५,– पाटिलबावांची मदत मागतो ६,– याचा खून ( ता. २।११।१७८४ )८, २३

अस्सल पत्रें ( शके १५१८, १५२१–१५३६ ) ८७–९०

अहिल्याबाई–चा कारभार व शिफारशीचीं पत्रें १०२;–च्या कारकीर्दीतील प्रजा १०८;–च्या कंजूषपणाचा परिणाम १०६;–च्या इच्छेला कर्तेपणाची जोड नाहीं त्याचा परिणाम १०५; चे गुण, तपश्चर्या ९७;–संबंधीं कागदपत्र ९८;– गुणदोष, दोषाचे आधार १०३– १०४;–च्या जड हाताचें उदाहरण ११४;–च्या माथीं येणारें अपयश ११४;–चा दानधर्म व योग्यता १०७; –ची पेशव्यांच्या राजकारणी स्त्रियांशीं तुलना १०४; –चें बेकायदेशीर उत्तर १०२;–विषयीं गैरसमजूत ( व. पुरुषोत्तम ) १०४; –विषयीं केसोपंताचें म्हणणें १०३–१०४; –स स्पष्ट सवाल १०९; –चा व्यक्तिविषयक मोठेपणा १०८, त्याचा साम्राज्यावर अनिष्ट परिणाम १०९, ११७; ११८–ची शिल्लक ११४, –विषयीं परकीयांचें अनुमान १०७, –विषयीं 'पुरुषोत्तमाचें' धाडस १०९, –चा सैल कारभार, त्यास आधारपत्रें १०५;–ची सैन्याकडील व्यवस्था १०९.

अंडर्सनची रोजनिशी ३–४

अंबाजी इंगळे १६, १८, १९– पाटिलबावांचा दिल्लींतीलससैन्य सरदार ७

आगापिछा ७२

आग्रा मराठ्यांनीं घेतली ( ता. २७।१७८५–२३,)

अटापीट ७५

आनंद नरसी ९

आपाजीराम दामोळकर १४

आर्यांची शिस्त ११६

आवळ्यांचा मार ४७

इ

इतिहाससंग्रह १

इब्राहिमखान गारद्याचा वंश ८१

इस्माल बेग मराठ्यांना प्रतिकूल ५,— यांस पातशहामें मदतीस येण्याबद्दल पत्र १८
ईमजा—कडील बातम्या १६–१७—चा पाटिलबावावर मारेकरी घालण्याचा निष्फळ प्रयत्न —४ राजकीय संस्कृति ..११४.
इंदुरची सुमेदारी १०४
इंद्रसेन पाटिलयोवांकडून जाण्याचें खरें व खोटें कारण १५

उ

उकिरड्यावर लग्नविधी ४७
ऊठणें ७२
उद्धव वीरेश्वर चितळे—भाजेकर,—सुभेदार जुन्नर ८१
उपहासात्मक विशेषणें ७५
ऊंस लावणें ५०

ए

एकविरा ४३
एल्फिन्स्टनचे शिरस्तेदार ( शामजी बंडु नाना रानडे ) ८२
एस्कालिअर्‌रूल शिवाजीस्वरूपवर्णन ५९
ऐतिहासिक शब्द ६७
ओम्हर यात्रा ( नव वधूच्या डोक्यावरील केस काढणें—रा. आचार्य ) ४४
ओंकाराचें आडनांव ८२

क

कडूदेशमुख—चाकण ८०
कडेकोट बंदोबस्त ७४
कजाख ७०
कदम्ब—कदम ( इ. स. ६०० च्या सुमारचें हें आडनांव ) १२६
करवारचें राज्य कोणीं स्थापिलें १२३
करोल ७०
कर्तें व कायदेशीर नायक ११२
कमाल ७५
कमालखानी ७३
काटक—काई ७१
काफर ७१
कावाड ७३
कापडावरील शिक्का १३४
काशीकर ७१–१२१
कांची—चे पल्लवे —येथें इ. स. —या शतकांत महाराष्ट्रियांचें राज्य, १२२ १२३;
कुलकर्णी ( पटल, मानजी सीद इ. ) नावें—हुद्दे ५ व्या शतकाचे शेवटीं असल्याबद्दल शंका—प्रो. गुणे—३४
कुश— ( श्रीराम पुत्र•) उत्पत्ति ४४
केसो भिकाजी दातार—शिंद्याच्या दरबारांतील पेशव्याकडील वकील १०३
कोन ७७

ख

खरजाई ४२
खरजेचें औषध ४६
खवणोबा = नागवा देव—४१
खंडोजी इंगळे १६
खंडोबाच्या स्मरणानें उमाजीचा गळफास तुटला—रा. आचार्य ४३
खाजगीवाले=लिमये ८२,—चा वाडा ९०
खेड येथें दिलावरखानाचें थडगें त्यावर लेख आहे—८०
खेळेल तो पोळेल ७६
खोकलाई ४२

ग

गजा—धनगरांच्या ढोलापुढें माचणारा— ४६

गण-सुवासिणी ५१
गदा मागणें ४६
गलवत ७५
गल्हारगर्दी १८
गंगेचे दोन अर्थ ६८
गाशा गुंडाळणें ७३
गुराढोरांना भाषेंत प्राधान्य कां ६७
गुलाम ७५
गुलाम कादर १७;–चे पातशहाशीं युद्धाचें कारण व युद्ध १८–मीर बक्षिगिरीचीं
घर्खे पातशहास मागतो १८
गुळे करी ७३
गोमा–४९
गोमाजी कापसे ७४
गोविंदराव पुरुषोत्तम, पेशव्यांचा दिल्लींतील वकील,–चें पेशव्यांकडे निकडीचें म्हणणें १२, १३; पुण्याकडे इषारा १५–१६; –चें गल्हारगर्दीचें पत्र १८;–चें पाटिलबावांचा हट्टी व महत्त्वाकांक्षी स्वभावदर्शक बातमी पत्र १९
गोहदचा जाठ–पाटिलबावांचा वैरी ५१
ग्वालेर ९
ग्रंथ व शिलालेख यांतील फरक –प्रो. गुणे –२८

घ

घोड्याचा विशेष व त्यावरील म्हणी ६७ ते ६९;–चे पंख ५१
घुबडाचें दगड उगाळणें ५०

च

चकती ७६
चक्र फिरलें ७६
चंडीराम महाराजांचा मठ ८०
चढती कमान ७०
चाकण ८०
चालुक्य=चाळके (हें उपनाम इ.स. ६०० च्या सुमारचें –प्रो. गुणे १२६;)– चें गोत्र १५६
चांभार लोकांतील स्त्रीजात ५०
चांदरात ७५
चिकुर्डे येथील ताम्रपट, दहा शंका प्रो. गुणे ३२–३३
चोराचीं पावलें ७४
चिमणाजी माधवरावांचा शिक्का १३४

छ

छत्रपती ७७

ज

जगदीशपूर=जलालपूर ८३, ८४
जयपूरकर रावराजा व पाटिलबावा १३; –शीं युद्ध १७;–चा पराभव (ता. २८।७।१७८७) २६
जहांगीरखानाचा लखनौच्या वजिराकडे व इंग्रजांकडे मराठ्यांविरुद्ध निरोप १४
जंग (लढाई) ७०
जातीवंत मराठे लोकांतील स्त्रीवर्ग ५०, ५१
जामानिमा ७५
जिजापूर ८१
जिजाबाईचें आज्ञापत्र ८३
जुना दगडी नळ ६०
जुनीं पंचांगें (शके १७०५ ते १७७०) ११९–१२०
जुनें मोडी पत्र (शके १३७६ ५४)
जुवाबख्त शाहजादा–आग्र्याचा सुभेदार होतो मग पाटिलबावाविरुद्ध खटपट करतो १५
जैनुल आबदीखान–हमदानीचा भाऊ–६

जैसिंग कन्हय्या ८
जोगवा ४६
जोधपूरकराकडून पाटिलबावांना 'हिंदूचें राज्य व्हावें ' हा आलेला निरोप १७

ट

टकमक ७४
टांक-देव ४२-४३

ड

डिभाई ९
डोक्यावर धोंडा ७६
डंबलकर देसाई व त्यांस इनाम ८१

ढ

ढमढेरे=देवधर ८२
ढालगज ७०

त

ताटाखालचें मांजर ७४
तातोबा=वाल्मिक ऋषी ४४
ताबाई आवा विठोजी राजे यांची बायको ९३
तिरशिंगराव ७३
तिस्मारखान ७३
तीस चाम ७८
तुकाई ४५
तुकाराममहाराजांचा वंशवेल ८५
तुकोजी होळकर-ची कामगिरी १०२ -ची बेताल वागणूक १०५ -व अहल्याबाईचें वैमनस्य, माल्कम साहेब १०७ -चें अहिल्याबाईशीं ऐकमत्य नव्हतें, त्यास आधार १०५
तुळशीदास शाहीरकृत शिवाजीवर्णन ५७
तुळापूर नांव कसें पडलें ८२
तेली ५१

थ

थुगांव (जि. नाशीक) दान दिल्याचा ताम्रपट ६३
थोरल्या माधवरावांची कारकीर्द १०१-१०२
थोरोबा-देव, -डोंगर ता. कऱ्हाड ४१

द

दत्तो त्रिमलकृत शिवाजी स्वरूपवर्णन ५८
दाजी फडके ७३
दांतकिसळी ४१
दाम ७७
दामु मुंजा ८०
दावा -वेदारी, -उगवणें ७६
दिपत धरणें ४१
दिल्याला निरोप देणें ४८
दिलावरखानाचें थडगें, खेड येथें ८१
दिल्लींतील पेशव्यांच्या वकिलानें कळविलेली स्पष्ट वार्ता १६;- दरबारांतील यादवी २, ४, -प्रकरण ११३ -माहितीचीं साधनें १ -च्या जुलमाचें व लुटालुटीचें वकिलानें केलेलें वर्णन ८
देव उलटणें ५०
देवस्की, देव घालणें ४१
देवांतील कोतवाल -भैरव ४२
द्राविड देशांत प्रथम ब्राह्मण गेले (-रा. चिं. वि. वैद्य) १२५

ध

धनगरांच्या कुळ्या, -देव, -देव पूजा ४८; -ची लग्न लावण्याची रीत ४७
धरणें -कौज० जमीन० ७२ -पारणें ७५
धानोरे ८०
धामण ४८

धायगुडे=घोडके ( यजुः शाखी ) ८२;
=वाघ ( देशस्थ ऋग्वेदी ) ८२
धांवणें आलें ७४
धुळीवरील सारवण १३
धोशा,- आडनांव ७१

न

नजव कुलीखान- सरदार,-मराठ्यांचा पक्षपाती ५;-यांस पातशाहाचें मदतीचा. पत्र १८; -ची मराठ्यांचे म्हणण्यास नाकबुली, त्याचा मृत्यु (ता. २२।४। १७८२ ) २, ५
नरसिंह जनार्दन वाघ=धायगुडे-घराणें ( मोर्वे-लोणंद नजीक ) ८२
नाइकवाडी येथील ताम्रपट ८०
नागरगांव ( कोरेगांव जवळ ) यासच तुळापूर नांव पडलें ८२
नाग लोक-मूळचे कोठले-१२३; -महाभारतांतील उल्लेख १२३
नाजर मंजूर अलीखान १५
नाना-आणि महादजी सिद्ध साधक ४; -चा राघो बल्लाळ मार्फत शीख व मुसलमान एक होऊन विरुद्ध झाल्या-बद्दल पाटिलबावाकडे पाठविलेला निरोप १४
नारायणदास ७
नारो शंकरी घाट ७३
नाशिककर ७१
नेताजी पालकर ८६
नौबतराय खत्री १६-जिवबादादानंतर पाटिलबोवांकडील सेनापती-१९
न्हावी व मराठे ५१

प

पट्टा ७१
परभूंचे दोन शिक्के १३४
परसोजी राजे ८७
पल्लव=पालवे, -च गात्र १२६; -विषयी पाश्चात्यांचा तर्क १२१-१२२;क्षत्रिय मराठे १२२-शिवभक्त,-कृत लेणीं, -पहिला राजा १२६ -बद्दलचे पुरावे १२४-१२५-१२६ - बद्दल ह्युएन सिंगाचें म्हणणें १२४;-चा इतिहास इ.स. १५०-८००;-चें मूळ ठिकाण-१२१
पवार शब्द केव्हांचा ३४
पहिला बाजीराव ११२
पळसदेव- येथें शिलालेख आहे- ९०
पंहिरराव घराणें ९२, ९५
पंचतंत्र २९;-चा काल (ज्ञानेश्वरानंतर) १२५
पंचहत्यारी ७०
पंचाईत ७५
पंचाळाची वरात ४७
पंताजी गोपीनाथ ( भोळीगांवकर ) ८१
पागे- स लावणें,-चें तट्टू ७३
पाट लावण्याची रीत ५१
पाटणच्या शिलालेखावरील राजवाड्यांचें म्हणणें,- त्याचें खंडण (प्रो. गुणे) ३६-३७
पांचावर धारण ७८
पाटिलबावा-व जयपुरप्रकरण १७;-ना जोधपुरकरांकडील निरोप- चा निश्चय १७- स गोविंदपंत वकील नाना-विरुद्ध लिहितात १५;-ची नानांविरुद्ध कागाळी १४-१५- चें नानांच्या निरोपास उत्तर १४;-चें धुळीवरील सारवण १३;- कडील फौजफितुरी १७; -ना दिल्लीच्या व्यवस्थेविषयीं मिर्जा सफीचें जाहीर निमंत्रण ४;-ना

दिल्लीच्या मुखत्यारीची वस्त्रें देण्याचा समारंभ (ता. १५।१७८५)—११; —बद्दल पातशहाचें पेशवेवकिलांजवळ बोलणें ,—पुनःनिर्मंत्रण १८;—गोव्हदचा किल्ला घेतला (ता. २४।२।१७८४) —२२;—ग्वालेरकिल्ला २२;—नीं नायबतीची वस्त्रें घेतलीं (ता. १५। १७८५)—२३;—मिर्जा सफीशीं दुसरी भेट २७,५; —च्या कामगिरीचा पहिला व दुसरा विभाग १–२;—चें इमदानीस उत्तर 'आम्हांस बादशाहीचा लोभ नाहीं बंदोबस्त करून स्थापना करूं' ७;—च्या विरुद्ध शाहजादा होतो १५;—ची खबरदारी १२;—चा राग १६—चा हट्टीपणा १३;—चा दुर्गुण २०;—ची मध्यस्ती ७;—नीं दिल्लीकडील कारभाराचें अहिल्याबाईस पाठविलेलें सारांशपत्र १९–२०;—च्या मुक्कामांचा तक्ता २१ ते २७; —वर इंग्रजांचा खोटा आरोप ४-५; —पुण्याचा कारभार हातीं घेऊं पहात होते यास पुरावा ३;—चें सालबाईच्या तहापर्यंचें वर्तन १; ची कामगिरी ११; —स मुतलकी व मीर बक्षिगिरीची प्राप्ती ९;—आपल्या नांवचा शिक्का पेशव्यांना न कळवितां चालवितात ११;-दिल्लीच्या आठ वर्षांच्या अनुभवानें झालेला फेरफार—१

पातशहा, दिल्ली—चें मराठेच दिल्लीस यावें यावद्दल वकिलाशीं बोलणें ९;—पाटिलबोवांची फौज येत नाहीं म्हणून इंग्रज वगैरेकडे मदतमागणी पत्रें १८;—चें पाटिल बावांस दिल्लीस न येण्याबद्दल पत्र १९;—चीं फितुरी पत्रें १२

पावळ येथील तुरबत ८०
पार्शी जुन्या ग्रंथाची लिपी १२१
पारोळ ८४
पालखीपदस्थ ७७
पाहुणा रावळा ७७
पाहुणे देव ४२
पिच्छा ७२
पुरंधरे घराणें ८१
पूर्तकाल ७०
पेशव्यां—चे उपाध्ये (कर्वे) त्यांजकडील कागदांतील नवीन माहिती,एक आख्यायिका ८३—चे दिल्लीकडील वकिलाची फौजमागणी ११;—वरील अकरण दोष १०१
पोळ जत्रा ५२
पेंडजत्रा ६८
पोतराज ५२
प्रतापगडचे हवालदार सोनावणे ८४
प्राकृत (चिं. वि. वैद्य) १२४
प्राचीन द्राविडी राज्य १२१

फ

फत्ते लष्कर ७७
फरमाश ७७
फागनिपुर ३१

ब

बगाड,—गाडे ५३
बयाबाई (चिमाजी आपांची मुलगी) ८२
ब्राह्मणपूरचा शिलालेख ८४
बलवंतराव "राजाज्ञा" शहाजी महाराजांचे मानलेले पुत्र—चा शिक्का १३४
बळीराजाचे वंशज—कुणबी ५१

बाजीरावकाळी धांतर जोडा, चे वेत ७३

बायजाबाई ७३

बारगीरपत्रक-पटवर्धनाकडील--१००

बाळाजी विश्वनाथ पेशवे—सरसुभेदार, सेनाकर्ते ७९

बाळाजी सखदेव—पाटिलबावांकडील कारकून १६

बिनीवाले—चिंचाळकर, ८२

बिचलकर—किल्लेवाले ८३

ब्रिटिश साम्राज्याशीं तुलना १११–११२

बैदा ७१

भ

भाषा—कशी बदलते ६६;
—च्या पूर्वकालीन अस्तित्वाविषयीं दोन पुरावे (प्रो. गुणे)–२८

भिलवडी (जि. सातारा). येथील मदन शहाचा दर्गा—त्याचा इतिहास, १३७—१७६

भुरके (सातारा) सोनार घराणें १२८

भुस्कुटे—गाडगीळ ८४

भूमिछिद्रन्याय ६४

भेटणें ७६

भोळी (पंताजी गोपीनाथाचें मूळ गांव) ८१

म

मकसले दर्गा (नगर येथील) ८३

मतिमंप्रधान ८०

मराठी भाषा—चा कालनिर्णय —च्या जुनेपणाविषयीं ग्रंथ व अनुमान– २८; — हल्लीं ची भाषा ६६;– तील शब्द अपभ्रंशांत हि आहेत ३७–प्राकृतांत हि आहेत ३८; तील श. १३–१४ शेंच्या पुढचीं नावें ३४; चा पत्ता ३२; — दहाव्या शतकापलिकडे जात नाहीं (प्रो. गुणे) ३५; — च्या कालासंबंधीं तिच्या उगमा कडून विचार ३५

मराठ्यां—ची दिल्ली कडील स्वारी बद्दलची कल्पना १–२;—नीं दिल्लीच्या तख्तावर शहा अलमास बसविले स. १७७१ —५—ना दिल्लींतील अनुकूल प्रतिकूल मंडळी ५;—चा वेळोवेळीं प्रकट झालेला स्वभाव ११०– १११, ११७; —चा वतनाबद्दल अभिमान १०५; —मध्यें शिस्तीचा अभाव ११५

मल्हारराव सुभेदारांची साम्राज्यनिष्ठा व मदत १११;– चा मृत्यु १०१

मलिक अंबरचें अस्सल पत्र शके १५२९–९५

मलूखान ४६

मल्लारी ४३

महमद बेग हमदानी २१४;–आग्र्याचा सुभेदार, ५—जयपुर जोधपूर वाल्यांस मदत करतो, पाटिलबावा मार्ग रूतात १७;—चा मृत्यु (ता २८।७।१७८७) १७, २६

महादजी सामराज—शिवशाहींतील अमलदार—बारगडच्या लढाईत मृत्यु ७९

महाराष्ट्र—च्या महाभारत व मनुस्मृती.

वरून मर्यादा १२५;–साम्राज्यनाशाचं कारण(प्रो. भानू)१०६, ११४,११६, ११७;–साम्राज्य-प्रेमी सरदारांची वागणूक ११३;–सत्तेशीं मांडलीक सरदारांचा संबंध ११२;–ची कारकीर्द १००; चा दस्तुर १०२; च्या अडचणी ११३;–ची प्राणप्रतिष्ठा ९८;– चा हेतु ,–ची कक्षा, –चे कर्णधार ९९, १००

माळजन ७५

माग काढणें, लावणें ७४

माधवराव गंगाधर–पाटिलबोवांकडील दिवाणी कारभारी, पाटिलबावांस पैका देत नाहींत, कामावरून बडतर्फ १६

मानभाव लोकांचें शिष्यत्व ५१

मारग, मार्ग– मळणें ४२

मालोजी, ८७

मालोजी राजे ( विठोजीराजे यांचे पुत्र ) यांचे पत्र ९२, ९३

मांग व मोळ ५१

मांगांचा मांडव ४७

मिर्जा सफी २,४;–चा खून ( ता. २३। ९।१७८३ ) ५,६, २२

मुबारकाबाद ५४

मुलूख मोडणें ७२

मेजर ब्राऊन –दिल्ली येथील इंग्रजाचा वकील –याचा इंग्रजांचा दिल्लींत शिरण्याचा प्रयत्न ८, ९

मेट } कोट ७४
मेढ }

मेंढजोगी ४६

मेंढगी –भाकीत सांगणारे ४७–४८

मेहेंदळे घराणें ८२

य

म्हातारे गृहस्थ ( १०४ वर्षे ) १२६

यमाई ४५

योगरत्नमालेचें भाषांतर –जादूमंत्रतंत्रावरील ग्रंथ २९

र

राघोगडचा किल्लेदार १६

राजमाचांकर=भट ८३

राजवाडे खंड १२–१

राणा ६३

रामजी पाटील १६

रांझेकर –सामराज नीलकंठ छत्रपतींचे १ ले पेशवे ७९

राष्ट्रकूट १२६; –ची प्रशस्तीवरमद्रा ६३

रेसिडेंट पालमर १२

ल

लढाईचा खर्च १०६

लतापत अलीखान ४

लवाची उत्पत्ति ४४

लष्कराच्या भाकरी ७२

लाडोजी शिंदे १७

लाडोजी शितोळे देशमुख १७, १८

लाहारिया –पांच आण्यांचें नाणें १३५

लिंग उतरणें ५१

व

वहिवाटीस आणणें ७३

वाद ७६

वाफगांव ८०

वारांबद्दलच्या समजुती ४३

विठल मोरेश्वर गोळे ८१

विठोजी राजे,–त्यांचे पुत्र,–चा मृत्यु ९३
विठोबा–धनगरी व ब्राह्मण ४७
विदग्ध वाङ्मयांतील भाषेच्या पुराणत्वाविषयीं येणारें वैगुण्य २८
विभुराज राष्ट्रकूटाचें ताम्रशासन ६३, ६४
विलिवायकुवर २ रा ( पैठणचा आंध्रभृत्य इ. स. ११३ ते १३८ ) १२१
विसाजीपंत ९–१३

## श

शहाजाद्या–चीं पाटिलबावाविरुद्ध इंग्रजाकडे व बादशहाकडे खटपट १२;–स हेस्टिंग्ज शिंद्याकडे पाठवितो १०;
शाकपंथाची एक चमत्कारिक चाल ५०
शाह निजामउद्दीन–पातशाहाचा कारभारी १७
शिक्के १२७ ते १३३;– तील उल्लेख १३४
शिखर शिंगणापूर ४३
शिपाई लोकांची विलायत ७१
शिलेदाराची घोडी ६७
शिवराई ७७
शिवाजी –आज्ञापत्र ८१; चें स्वरूपवर्णन ५७–५९; –च्या दोन तसबिरी ५७; –चें स्वरूपवर्णन करणाऱ्या बखरी ५७, ५८, ५९; चे दृश्य चित्रांतील साम्य व फरक ५९, ६०;–च्या प्रस्तुतच्या तसबिरींतील विशेष व शंका ६० - ६२; प्रतिमा ५७, ६०
शिंदे–सेंट्रक १२६
शिंदेशाही तोडे ७३
शिंदेहोळकरांमधील फूट ११३
शेखोजी आंगरे ७४
शेवग्याचें झाड ५१
श्रावण बेळगोळ्याचा शिलालेख ३४

## स

सदाशिव दिवाकर ८
सरदारांचा स्वार्थत्याग १११
साऊस सय्यद जान–नाना फडणिसांचा विश्वासू अरब ८३
साकुर्डीकर दीक्षित गोपिनाथ ओक ८३
सात वेळ पाट लावणें ५२
सामराज नीलकंठ ७९
सालबाईचा तह ९
सांगलीकरसंग्रह ८४
सुरतेची घालमेल १२०
सोनोरी –पानसे घराणें ८०
स्वामिभक्तीचा कडेलोट ७४

## ह

हर हर महादेव ७१,७२
हमदानी बेग ७– मराठयांच्या स्वाधीन होतो ८;
हुसबनीस = फडके ८२
हळदीच्या डागाची नवरी ५२
हिंदुस्थानी –लोकां संबंधीं सदाशिव दिवाकराचे उद्वेगाचे उद्गार ८; –चे मापचे दृष्टीनें दोन भाग, त्यांच्या मर्यादा १२३

ह्विवरेनागोरा ७२
हुल ७२
हेन्री आलेक्संडर व शिवाजीस्वरूप ५९
हेस्टिंग -ची नाउमेद ३; चे पाटील-
बावाविषयीं मत १०; विलायतेस
जातो ता. १।२।१७८५ – २३;
त्या वर्तनाबद्दल पार्लमेंट मधें वाद १७
होन ९१
होला पक्षी ४९
होळकरांचे अग्रेसरत्वाचा ऱ्हास ११३
ह्यूएनसिंगची हिंदुस्थानांतील वर्षे १२४

## आभार.

मार्गे पृ. १३७ ते १७६ पर्यंत हजरतवली महनशहांच्या संस्थानसंबंधीचें निवाडपत्र छापण्यात हनगंडचे श्री. पायाप्पा देसाई यांनीं रु. १०० ची देणगी दिली हें कळविण्यास आनंद वाटतो.

# परिशिष्ट ऐ

सभासदांची यादी—शके १८४०

## आश्रयदाते सभासद

| नों. क्र. | नांव | गांव |
|---|---|---|
| ४१ | श्रीमंत सर परशुरामराव भाऊसाहेब पटवर्धन, के. सी. आय्. ई. चीफ ऑफ सं. जमखंडी ... | जमखंडी |

## हितकर्ते सभासद

| | | |
|---|---|---|
| ३३* | श्रीमंत नारायणराव गोविंदराव ऊर्फ बाबासाहेब घोरपडे, चीफ् ऑफ् सं. इचलकरंजी ... ... | इचलकरंजी |

## सभासद वर्ग १ (४४)

| | | |
|---|---|---|
| २५२ | रा. रा. रामदास कृष्ण अलाहाबादकर ... | अलाहाबाद |
| २००* | श्री. रा. वामन श्रीधर आपटे ... ... | मुंबई |
| ४२८+ | रा. रा. कृष्णाजी हरि केळकर, बी. ए., एलूएलू. बी. | मुंबई |
| ५* | रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एलएल. बी. | पुणें |
| १८५* | श्रीमती कृष्णाबाई खरे, बी. ए. ... ... | पुणें |
| ४२ | रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, बी. ए. ... | पुणें |
| २२७ | ना. श्री. गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे .... | उमरावती |
| ४३ | श्री. मार्तंड त्रिंबक गद्रे, इनामदार ... | पुणें |
| ४४ | श्री. व्यंकटराव तात्यासाहेब गुजर, जहागीरदार ... | नागपूर |
| ४१६*+ | रा. रा. हरि केशव गोखले, वॉचमेकर ... | मुंबई |
| ४५ | रा. रा. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, बी. ए. एल्. एल्., बी. | मुंबई |
| ४९३+ | श्री. यशवंतराव माधवराव ऊर्फ नानासाहेब चंद्रचूड | पुणें |
| ४६* | रा. रा. मुकुंद रामराव जयकर, एम. ए., बार. ॲट-लॉ. | मुंबई |
| २६६ | डॉ. कृष्णाजी केशव जोशी, एम.ए.पी.एच.डी. | पुणें |
| १८१* | रा. रा. बाळ गंगाधर टिळक, बी.ए.एल.एल.बी. ... | पुणें |

४८*श्रीमंत रामराव अमृतराव ऊर्फ आबासाहेब डफळे, चीफ् ऑफ् सं. जत ... ... जत
३१५*प्रो. पंढरीनाथ काशीनाथ तेलंग एम. ए. ... मुंबई
७०*रा. रा. सदाशिव महादेव दिवेकर ... कल्याण
१०८ श्री. रा. पंजाबराव बाजीराव देशमूख ... सेंदुरजणें
३६२*श्री. पायाप्पा जखाप्पा ऊर्फ आप्पा-साहेब देसाई ... ... ... हनगंडी
३ श्री. रा. विनायक नीळकंठ नातू, इनामदार ... पुणें
१६*रा. रा. अनंत विनायक पटवर्धन, बी. ए. ... पुणें
४९*श्री. सरदार गोविंद बळवंत पटवर्धन शास्त्री ... नवसरी
२४ रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन ... .... पुणें
४९४+श्री. राघवेंद्रराव सदाशीवराव ऊर्फ बाळासाहेब पुरंदरे पुणें
२५*रा. रा. दत्तो वामन पोतदार, बी.ए. (चिटणीस) ... पुणें
५१ रा. रा. अनंत सखाराम फडके ... ... खामखेड
४२४*+रा. रा. लक्ष्मण बळवंत फाटक ... ... पुणें
४८३*+रा. रा. डी. जी. फाळके ... ... नाशीक
५२ रा. रा. सदाशीव रामचंद्र बखले बी. ए. एल एल. बी. मुंबई
११० श्री. सरदार परशुरामराव कृष्णराव बिवलकर ... अलिबाग
५३*रा. रा. नारायण मल्हार बेदरकर, बी. ए. एलएल. बी. उमरावती
३९९ शेट मयाशंकर मूळशंकर भट्ट ... ... मुंबई
२६*रा. रा. विनायक लक्ष्मण भावे, बी. एस सी. ... [illegible]
५४ रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी, एम. ए. ... अकोला
१०*श्री. सरदार गंगाधरराव नारायणराव ऊर्फ आबासाहेब मुजुमदार ( खजिनदार ) ... पुणें
२*श्रीमंत सरदार खंडेराव चिंतामणराव मेहेंदळे, बी. ए. ( चिटणीस ) ... ... पुणें
१८ रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे बी. ए. ... तळेगांव दा०
३५४*रा. रा. विनायक विष्णु रानडे ... ... पुणें
२६४ श्री. स. विश्वनाथ खंडेराव रास्ते... ... पुणें
११ के. प्रो. हरि गोविंद लिमये, एम. ए. ... पुणें
७*रा. रा. चिंतामण विनायक वैद्य, एम. ए. एलएल. बी. कल्याण
५६*ना. रा. ब. गणेश कृष्ण साठे, सी. आय. ई. ... सोलापूर
६*रा. ब. काशिनाथ नारायण साने, बी.ए. (अध्यक्ष)... कल्याण